म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३९८८

# आदर्श राज्य

ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोच्या ' REPUBLIC ' चा अनुवाद

अनुवादक: डॉ. ज. वा. जोशी

REFBK-0025146

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

नोंदणी
३९८६
२५१४६
१८/१०/८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

10 DEC 1986

18 JAN 1987

4 FEB 1987

11 FEB 1987

4 MAR 1987

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

# आदर्श राज्य

# (Plato's Republic)

# आदर्श राज्य

(ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोच्या ' Republic ' चा अनुवाद)

अनुवादक

**डॉ. ज. वा. जोशी**

प्रताप तत्त्वज्ञान केंद्र

अमळनेर, जिल्हा जळगाव

REFBK-0025146

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती
मार्च, १९८६

प्रकाशक
श्री. सू. द्वा. देशमुख
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

© प्रकाशकाधीन

मुद्रक
व्यवस्थापक
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय
पुणे ४११ ००१.

किंमत रुपये ८२.५० पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९८६
निबंध
शाखा (स्थळ प्रत)

# निवेदन

जगातील उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे करून ती प्रसिद्ध करण्याचीही महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची योजना आहे. डॉ. ज. वा. जोशी यांचे प्लेटोच्या ' रिपब्लिक ' या ग्रंथाचे भाषांतर प्रसिद्ध करणे या योजनेचाच एक भाग आहे. या ग्रंथाचे एक भाषांतर इ.स. १९३९ साली श्री. ज. ग. जोगळेकर यांनी प्रकाशित केले होते. परंतु हे भाषांतर दुर्मिळ झाल्यामुळे मंडळाने ' रिपब्लिक 'चे सुधारित भाषांतर करण्याचे काम डॉ. ज. वा. जोशी, प्रताप तत्त्वज्ञान केंद्र, अमळनेर, जिल्हा जळगाव यांच्याकडे सोपविले होते. डॉ. जोशी यांनी या ग्रंथाचे भाषांतर करून दिले त्याबद्दल मंडळाच्या वतीने मी त्यांचा आभारी आहे. प्लेटोच्या ' रिपब्लिक ' या ग्रंथाचा हा अनुवाद प्रसिद्ध करण्यास मंडळास आनंद होत आहे. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाप्रमाणेच सामान्य वाचकही या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

४२, यशोधन
मुंबई ४०० ०२०
२६ फेब्रुवारी, १९८५

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

# अनुक्रमणिका


| प्रकरण | प्रकरणाचे नाव | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | ऋणनिर्देश | .. | अकरा |
| | प्रस्तावना | | तेरा |
| १ | न्याय म्हणजे प्रामाणिकपणा (I-327—331-D) | ... | १ |
| २ | न्याय म्हणजे मित्रांना मदत करणे आणि शत्रूंचा सूड घेणे (I-331-E—336-A) | .. | ६ |
| ३ | न्याय म्हणजे बलिष्ठांचे हित (I-336-B—347-E) | .. | १५ |
| ४ | अन्याय हा न्यायापेक्षा फायदेशीर असतो का ? (I-347-E—356) | .. | २८ |
| ५ | न्याय हा मानवी स्वभावातून निर्माण होतो, व्यावहारिक सोयीतून नव्हे ! (II-357-A—367-E) | .. | ३९ |
| ६ | सामाजिक जीवनाची मूलतत्त्वे (II-367-E—372-A) | .. | ४९ |
| ७ | समृद्ध सामाजिक जीवन (II-372-A—374-E) | .. | ५६ |
| ८ | प्रशासकांचा स्वभाव (II-375-A—376-E) | .. | ६० |
| ९ | आदर्श राज्यातील शिक्षणपद्धती (II-376-E—III-412-B) | .. | ६४ |
| | (१) साहित्याचे शिक्षणातील स्थान व स्वरूप | .. | ६५ |
| | (२) धर्म, देवता, पुराणकथा यांचे शिक्षणातील स्थान व स्वरूप | .. | ७४ |
| | (३) नाटच, रंगभूमी यांचे शिक्षणातील स्थान व स्वरूप | .. | ८२ |

| प्रकरण | प्रकरणाचे नाव | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | (४) संगीत, वाद्यवादन आणि छंदोरचना यांचे शिक्षणातील स्थान व स्वरूप | .. | ८९ |
| | (५) शिक्षणाचे तत्त्वज्ञान | .. | ९२ |
| | (६) शारीरिक शिक्षणाचे स्वरूप : आदर्श राज्यातील वैद्य व न्यायाधीश यांचे स्थान व कार्य | .. | ९६ |
| १० | **प्रशासकांची निवड आणि जीवनपद्धती**<br>(III-412-B—IV-421-C) | .. | १०७ |
| ११ | **प्रशासकांची कर्तव्ये**<br>(IV-421-C—427-C) | .. | ११५ |
| १२ | **राज्यातील सद्‌गुण**<br>(IV-427-C—434-D) | .. | १२४ |
| १३ | **आत्म्याचे तीन भाग**<br>(IV-434-D—441-C) | .. | १३५ |
| १४ | **व्यक्तीमधील सद्‌गुण**<br>(IV-441-C—445-B) | .. | १४५ |
| १५ | **स्त्रियांचे समान हक्क**<br>(IV-445-B—V-457-B) | .. | १५१ |
| १६ | **कुटुंब संस्थेचे उच्चाटन**<br>(V-457-B—466-D) | .. | १६२ |
| १७ | **युद्धाचे उपयोग**<br>(V-466-D—471-C) | .. | १७४ |
| १८ | **तत्त्वज्ञ राज्यकर्ते**<br>(V-471-C—474-B) | .. | १८१ |
| १९ | **तत्त्वज्ञ आणि तत्त्वज्ञान**<br>(V-474-B—483) | .. | १८५ |
| २० | **तत्त्वज्ञाची राज्यकर्ता होण्याची पात्रता**<br>(VI-484-A—487-A) | .. | १९५ |
| २१ | **समाजात तत्त्वचिंतक निरुपयोगी का ठरतो ?**<br>(VI-487-B—497-A) | .. | २०० |

| प्रकरण | प्रकरणाचे नाव | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २२ | तत्त्वज्ञ राज्यकर्ता मिळणे अशक्य नाही (VI-497-A—502-C) | .. | २१२ |
| २३ | अंतिम सत्तेचे स्वरूप (VI-502-C—509-C) | .. | २१९ |
| २४ | ज्ञानाच्या चार श्रेणी (VI-509-D—513-E) | .. | २२९ |
| २५ | अंधारातून प्रकाशाकडे ! (VII-514-A—521-B) | .. | २३३ |
| २६ | उच्च शिक्षणपद्धती (VII-521-C—531-C) | .. | २४१ |
| २७ | वादपद्धतीचे अध्ययन (VII-531-C—535-A) | .. | २५५ |
| २८ | शिक्षणपद्धतीची रचना व कालमर्यादा (VII-535-A—543-B) | .. | २५९ |
| २९ | आदर्श राज्याचे अधःपतन (VIII-543-C—550-C) | .. | २६८ |
| ३० | अल्पजनसत्ता : स्वरूप आणि मूल्यमापन (VIII-550-C—555-B) | .. | २७६ |
| ३१ | लोकशाही : स्वरूप आणि मूल्यमापन (VIII-555-B—562-A) | .. | २८३ |
| ३२ | हुकूमशाही : स्वरूप आणि मूल्यमापन (VIII-562-A—IX-576-B) | .. | २९३ |
| ३३ | सुखी कोण ? न्यायी व्यक्ती की अन्यायी व्यक्ती ? (IX-576-B—588-A) | .. | ३१० |
| ३४ | फायदेशीर काय ? न्याय की अन्याय ? (IX-588-B—594) | .. | ३२८ |
| ३५ | तत्त्वज्ञान आणि काव्य (X-595-A—602-B) | .. | ३३४ |

| प्रकरण | प्रकरणाचे नाव | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ३६ | नाटयवाङ्मयाची मीमांसा (X-602-C—605-C) | .. | ३४५ |
| ३७ | नाटयवाङ्मयाचे नैतिक परिणाम (X-605-C—608-B) | .. | ३५० |
| ३८ | आत्म्याचे अमरत्व (X-608-C—612-A) | .. | ३५४ |
| ३९ | ऐहिक जीवन आणि न्यायाची फलश्रुती (X-612-A—613-E) | .. | ३५९ |
| ४० | न्यायी जीवनाची मरणोत्तर फलश्रुती : 'अर 'ची कथा (X-613-E—End) | .. | ३६२ |
| | परिशिष्ट १ : प्लेटोने लिहिलेले संवाद | .. | ३६९ |
| | परिशिष्ट २ : उपयुक्त संदर्भ | .. | ३७० |
| | परिशिष्ट ३ : उपयुक्त लेख | .. | ३७३ |

# ऋणनिर्देश

'प्लेटो' या जगद्विख्यात ग्रीक तत्त्वज्ञाच्या 'रिपब्लिक' या जगद्विख्यात तात्त्विक संवाद ग्रंथाचे हे मराठी भाषांतर महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित होत आहे.

'प्लेटोची आदर्श राज्य घटना' हे श्री. जनार्दन गणेश जोगळेकर यांनी इ. स. १९३९ साली प्रसिद्ध केलेले भाषांतर दुर्मिळ झाले होते. त्यामुळे कॉर्नफोर्ड, जोवेट यांनी केलेली सर्व प्रसिद्ध इंग्रजी भाषांतरे 'प्लेटो आणि रिपब्लिक' यावर आधारलेले अभ्यास व संशोधन ग्रंथ समोर ठेवून, तत्त्वज्ञान विषयाचे जिज्ञासू, अभ्यासक यांना उपयुक्त ठरू शकेल अशी सुधारित संपादित आवृत्ती प्रसिद्ध करण्याचा हा प्रयत्न.

'रिपब्लिक' ग्रंथाची भूमिका, मध्यवर्ती समस्या, त्यामधील तात्त्विक चर्चेत आलेले महत्त्वाचे विषय इत्यादी संबंधीचे विवेचन व रूपरेखा प्रस्तावनेत मांडली आहे. 'प्लेटोच्या आदर्श राज्यात' प्रस्थान ठेवण्यापूर्वीचे हे हृद्गत, त्याचा अंतरंग परिचय करून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असे वाटते.

प्लेटोने लिहिलेले संवाद, प्लेटोचे जीवन, कार्य व तत्त्वज्ञान यावर आधारलेले महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ; विशेषतः 'रिपब्लिक' ग्रंथाच्या अभ्यासास उपयुक्त ठरणारे ग्रंथ, लेख यांची 'सूची' शेवटी दिली आहे.

ही आवृत्ती तयार करताना प्रा. मे. पुं. रेगे यांनी केलेल्या सूचना उपयुक्त ठरल्या. लेखनकार्य, संदर्भशोध, मुद्रिते तपासणे इत्यादी बाबतीत माझ्या सुविद्य पत्नी डॉ. सौ. सुनीता जोशी यांनी सर्व प्रकारचे सहकार्य दिले. ग्रंथाचे मुद्रण व प्रकाशन यांना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र. बारलिंगे यांनी आस्थेने चालना व प्रोत्साहन दिले. शासकीय फोटोझिंको मुद्रणालयाने ग्रंथाचे मुद्रण अतिशय सुबक व सुंदर केले आहे. मी याबद्दल या सर्वांचा मनःपूर्वक ऋणी आहे, कृतज्ञ आहे.

'आदर्श राज्य' हे प्लेटोचे स्वप्नशिल्प, तत्त्वज्ञान व मानवी संस्कृतीच्या अभ्यासकांना आवडेल, उपयुक्त ठरेल ही अपेक्षा.

**ज. वा. जोशी**

# प्रस्तावना

मानवी जीदनाची मूलग्राही मर्मदृष्टी देणारे तत्त्वज्ञान तत्त्वचिंतकाच्या जीवनानुभवातून स्फुरते. त्याच्या जीवनाची जडणघडण ही तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात झालेली असते. ते संस्कार आणि स्वानुभवाधारित विदेक यांतून त्याचे जीवनभाष्य प्रगट होते. प्राचीन ग्रीक संस्कृतीचे माहेर असणाऱ्या अथेन्समध्ये इ.स.पू. ४२७ मध्ये जन्मलेल्या, उच्चवर्गीय उमराव घराण्याचे संस्कार लाभलेल्या, संवेदनशील वृत्तीच्या, प्लेटोसारख्या तरुणाला, तत्कालीन समाजात, राज्यकारभारात, शिक्षणव्यवस्थेत, साहित्य आणि कला क्षेत्रांत जे ताण, त्रुटी जाणवल्या त्यांतून त्याचे 'आदर्श राज्य' हे स्वप्नशिल्प साकारले आहे.

सॉक्रेटिससारख्या धीरोदात्त महामानवाच्या सहवासातून त्याला 'तत्त्वजिज्ञासा' आणि 'संवादपद्धती' यांचा परिचय झाला. मॅगार, इटली, इजिप्तमधल्या भ्रमंतीकालात त्याचे केवळ शास्त्राध्ययनच झाले नाही, तर विविध स्तरांतल्या सांस्कृतिक समस्यांचा डोळस परिचय झाल्याने त्याची प्रज्ञा प्रौढ बनली. 'अॅकॅडमी'सारख्या शिक्षणसंस्थेची स्थापना आणि विकास यातून त्याने मानवी जीवनाचे आदर्श शोधणारे, संपादन करणारे कार्यक्षम तरुण, कार्यकर्ते, मुत्सद्दी, प्रशासक, राज्यकर्ते तयार करण्याचा ध्येयवादी प्रयत्न केला. 'तत्त्वज्ञ राजा' तयार करण्याचे आणि त्याद्वारा 'आदर्श राज्य' उभारण्याचे त्याचे स्वप्न सिरॅक्यूज येथे प्रत्यक्षात आणण्याचा त्याने प्रयत्न केला. पण तो विफल झाला. या विफलतेतून 'सिद्धांत' आणि 'व्यवहार' यांमधील, 'स्वप्न' आणि 'सत्य' यांमधील दरी त्याला जाणवली. त्यामुळे त्याचे सामाजिक आणि राजकीय तत्त्वचिंतन अधिक व्यवहार्य आणि वास्तववादी झाले. 'रिपब्लिक'च्या तुलनेने, अशी प्रौढ भूमिका त्याच्या 'लॉज' ग्रंथात दिसून येते.

अनेकविध विषयांवर मर्मग्राही स्वरूपाचे तात्त्विक संवाद त्याने लिहिले. शिक्षण आणि तत्त्वज्ञान यांचा, व्यक्तिमत्त्व विकासाशी, समाजपरिवर्तनाशी सांधा असला पाहिजे, प्रज्ञावंत निर्माण झाले पाहिजेत आणि त्यांनी अनेकविध मानवी समस्यांचा मर्मदृष्टीयुक्त अभ्यास करून समाजाला प्रगतीच्या दिशा आणि पाऊलवाटा दाखवल्या पाहिजेत. याकरिता प्लेटोने तन, मन, धन वेचले. या कर्मयोगी, कलावंत, तत्त्वज्ञ वृत्तीच्या महामानवाचा इ.स.पू. ३४७ मध्ये अंत झाला.

प्लेटोच्या 'रिपब्लिक' ग्रंथाची इंग्लिश भाषांतरे कॉनफोर्ड, जोवेट इ.नी केली आहेत. त्यांनी त्या भाषांतरास प्रदीर्घ स्वरूपाच्या विवेचक प्रस्तावनाही लिहिलेल्या आहेत. 'रिपब्लिक' ग्रंथातील विविध विषयांचा साक्षेपी परिचय करून देणारे भाष्यग्रंथ, व्याख्याने, समीक्षालेख संग्रहही प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांपैकी काही उपयुक्त ग्रंथांची, लेखांची सूची सोबत जोडली आहे.

'आदर्श राज्य' ग्रंथातील, तात्त्विक संवाद पद्धतीने केलेल्या प्रतिपादनाचे दहा भाग आहेत. विषयांची मांडणी, उकल या दृष्टीने ग्रंथातील विवेचन पाच टप्प्यांमध्ये पूर्ण झाले आहे. पहिला भाग आणि दुसऱ्या भागाचा काही अंश यांमध्ये माणसाचे प्राप्तव्य, कर्तव्य इ. संबंधीच्या काही प्रधान, प्रचलित भूमिकांचा ऊहापोह आहे. माणूस काही नीतितत्त्वांच्या आधारे जगू पाहतो. उदाहरणार्थ :–

"न्याय म्हणजे खरे बोलणे.

न्याय म्हणजे दुसऱ्याकडून जे घेतले असेल ते परत देणे.

न्याय म्हणजे प्रत्येकास त्याच्या योग्यतेप्रमाणे देणे.

न्याय म्हणजे बलिष्ठ माणसाचे हित.

न्याय म्हणजे प्रजेचे कल्याण." इत्यादी.

अशा भूमिका स्वीकारून वागताना प्रत्यक्ष जीवनातल्या वस्तुस्थिती नैतिक तत्त्वाशी संवादी नाहीत ; जीवनातले यश माणसाच्या नैतिकतेवर आधारित असते, असे दिसत नाही, हे जाणवू लागले. तत्त्व आणि व्यवहार, सदाचरण आणि समृद्धी यांच्यातील तफावत जाणवते. या चर्चेतूनच 'रिपब्लिक'मधील मध्यवर्ती समस्या रूप घेते. ती म्हणजे–

> नैतिकता म्हणजे काय ? कोणत्याही बाहच, तात्कालिक परिणामांवर अवलंबून न राहता अशी शुद्ध, निर्भेळ नीती माणसाच्या अंतरंग जीवनात, आत्म्यात कशी प्रादुर्भूत होते ? मानवी जीवनात तिचे निरपेक्ष महत्त्व काय आहे ? इ.

दुसऱ्या भागाचा उर्वरित अंश ते चौथ्या भागाअखेर प्लेटोने मानवी जीवनातील नीतीचा उगम, स्वरूप, कार्य स्पष्ट करण्याकरिता मानवी समाज, सामाजिक संस्था यांचा उगम, स्वरूप, विकास विशद केला आहे. मानवी स्वभावातील सर्व मूलभूत घटकांना ज्या समाजात, सामूहिक जीवनात परिपूर्ण वाव मिळतो, तो आदर्श समाज होय. मानवी प्रकृती, स्वभाव यांचे अंतरंग स्पष्ट करताना प्लेटोने त्रिविध घटकांचे स्वरूप व परस्पर संबंध स्पष्ट करणारे मानसशास्त्र सांगितले आहे. प्लेटोच्या मते व्यक्तिगत मानवी प्रकृतीचे व्यापक स्वरूप म्हणजे समाज. साहजिकच मानवी प्रकृतीमधील सुष्टता, दुष्टता यांचे प्रतिबिंब समाजरचनेत पडते, सुसंघटित, समन्वयी मानवी प्रकृती, न्याय, नीती, सुख यांचे प्रतीक असते. तिचेच व्यापक प्रतिबिंब असणाऱ्या समाजातील त्रिविध वर्गांचे सुसंघटित, समन्वयी जीवन म्हणजे सामाजिक न्याय, सामाजिक हित होय.

भाग पाच ते सातमध्ये ही आदर्श सामाजिक स्थिती निर्माण करण्याकरिता कोणते उपाय, साधने उपयुक्त ठरतील यांचा ऊहापोह आहे. स्वभावातील दुष्टता हीच माणसाला दुःखी करते, प्रकृतीच्या विरोधी जगायला लावते. ती दूर करण्याकरिता प्रज्ञेचा विकास महत्त्वाचा आहे. "तत्त्वज्ञ राज्यकर्ता झाला किंवा राज्यकर्ते तत्त्वज्ञ असतील" तर समाजात न्याय, कल्याण, हितबुद्धी विकसित होते. माणसाचे व्यक्तिगत आणि सामूहिक जीवन भावविवशता,

वासना यांनी नियंत्रित होण्यापेक्षा ते प्रज्ञेने प्रभावित व्हावे, मार्गदर्शित व्हावे ; ज्ञान आणि नीतीची मर्मदृष्टी असणाऱ्या प्रज्ञावंतांनी समाजाचे अनुशासन करावे, असा प्लेटोच्या भूमिकेचा अभिप्राय दिसतो. योग्य माणसांची निवड करून, त्यांना साहित्य, शास्त्र, क्रीडा, कायदा. इ. क्षेत्रांतले प्रशिक्षण देऊन, त्यांना विविध सामाजिक कार्यातील अनुभव देऊन असे आदर्श राज्यकर्ते तयार करता येतील. अशी माणसे निःस्वार्थ, समर्पण वृत्तीने समाजाचे शासन न्यायोचित रीतीने सांभाळतील. यामुळे अनीती, अन्याय, दुष्टता, दुःख यांचे निर्मूलन घडू शकेल आणि असे 'आदर्श राज्य' म्हणजे आदर्श मानवी जीवनाचे सजीव, साकार प्रतीक असेल, असा ध्येयवाद, आशावाद व प्रयत्नवाद प्लेटोच्या भूमिकेत दिसून येतो.

भाग आठ आणि नऊ यांमध्ये प्लेटोने व्यक्ती आणि समाज यांच्या अधःपतनाचे शब्दचित्र दिले आहे. मानवी स्वभाव, प्रकृती यांमधील नीचस्तरीय घटकांचे प्राबल्य झाले. स्वभावातील एकसंघतेचा भंग झाला, प्रकृतीकडे दुर्लक्ष झाले तर एकूण व्यक्तिजीवनाचे क्रमशः अधःपतन होत जाते आणि न्यायी माणसाऐवजी दुष्ट, अन्यायी, वासनालोलुप, क्रोधी अशा माणसाचा उदय होतो. समाजातही त्याचे पडसाद उमटतात. समाजाचे सुसंघटित, समन्वयी रूप नष्ट होते. क्रमशः दुष्ट, दुष्टतर, दुष्टतम अशा समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था अवतीर्ण होतात आणि सामूहिक जीवनाला अवकळा प्राप्त होते, ते सामूहिक जीवन अन्याय, कलह, संघर्ष, दुःख यांचे आगर होते.

दहावा भाग तसा एकूण ग्रंथाच्या रचनेमध्ये अलग स्वरूपाचा वाटतो. त्याच्या अर्ध्या भागात, प्लेटोने पूर्वीच तिसऱ्या भागात केलेल्या कला, काव्यविषयक मीमांसेची पुनरुक्ती आढळते. उरलेल्या, अखेरच्या अर्ध्या भागात जीवात्म्याच्या मरणोत्तर जीवनाचे शब्दचित्र आढळते. नीतिमान वा अनीतिमान जीवन जगणाऱ्या व्यक्तीला मरणोत्तर अवस्थेत कोणते भवितव्य प्राप्त होते त्याचे विवेचन या भागात आहे.

'रिपब्लिक' ग्रंथाच्या पहिल्या भागातच जीवनातील सदाचाराचे महत्त्व, त्याकरिता उपलब्ध संपत्तीचा योग्य उपयोग करण्याचे महत्त्व स्पष्ट करताना सिफालस म्हणतो, "सॉक्रेटिस, आपला अंतकाळ जवळ आल्याचे माणसाला जाणवते, त्यावेळी पूर्वी त्रास न झालेल्या काही गोष्टींबद्दल माणसाला भय आणि चिंता वाटू लागते. 'आपण या जगात केलेल्या पापाबद्दल परलोकात शिक्षा भोगावी लागते', अशा समजुतीची आपण पूर्वी चेष्टा केली असली, तरी मृत्यूची चाहूल लागताच कदाचित या सर्व गोष्टी खऱ्या असू शकतील असे भय माणसाला वाटते. म्हातारपणातील दुर्बलता किंवा मृत्यूच्या जाणीवेतून विकसित होणारी सूक्ष्मदृष्टी यामुळे माणूस अस्वस्थ होतो. संशय, भय यांनी व्यथित होतो. आपण कोणाचे अहित तर केले नाही ना, याचा तो विचार करू लागतो. आपण बरीच दुष्कृत्ये केली आहेत असे जाणवले, तर झोपेतून घाबरून जागा होतो. आपल्या भवितव्याची भेसूर चित्रे त्याच्या मनःचक्षूपुढे उभी राहतात. पण आपण एकही दुष्कृत्य केलेले नाही, अशी त्याची

खात्री पटली...तर म्हातारपणातील त्याचा सांभाळ करणारी परिचारिका–'आशा' त्याचे मन आपल्या भवितव्याबद्दल त्याला दिलासा देते, आनंद देते."

आपल्या जीवनातील नीतीचे, न्यायाचे, सुखोपभोगाचे, सुखसाधनांचे स्थान कोणते? अनीती, अन्याय, दुःख का निर्माण होतात? आदर्श मानवी जीवन कोणते? अशा प्रश्नांनी 'रिपब्लिक' ग्रंथाचा प्रारंभ होतो आणि जीवात्म्याच्या परलोकातील भवितव्यतेच्या दर्शनाने ग्रंथाची समाप्ती होते. आप-पर, इह-पर जीवनाची नैतिक अधिष्ठाने आणि सुचरित जीवनदृष्टी यांचे मर्मग्रामी शब्दशिल्प 'रिपब्लिक' ग्रंथाने उभे केले आहे.

'रिपब्लिक' ग्रंथाचा उद्देश काय? त्यामध्ये कोणत्या मध्यवर्ती समस्येचा तात्त्विक ऊहापोह आहे, याबद्दल अभ्यासकांत मतभेद दिसतात. राज्यसंस्थेचा उगम, विकास, उद्देश, कार्यपद्धती इ. प्रश्नांची यात चर्चा आहे. म्हणून हा ग्रंथ राजनीती शास्त्रावरील तात्त्विक संवादग्रंथ आहे असे प्रथमदर्शनी वाटते. व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनात 'न्याय' हे श्रेष्ठ जीवनमूल्य कसे प्रस्थापित होईल याची चर्चा या ग्रंथात आहे. त्या अनुषंगाने मानवी स्वभाव, प्रकृती यांचे विश्लेषण प्लेटोने त्याच्या भूमिकेतून केलेले आहे. त्यामुळे 'आदर्श व्यक्ती' आणि 'आदर्श समाज' यांचे शब्दचित्र तो रेखाटतो, त्यांची तात्त्विक अधिष्ठाने तो उकलून दाखवितो. एकाकी अवस्थेपेक्षा सामूहिक जीवनाच्या संदर्भातच माणसाच्या सुप्त शुभ क्षमता विकसित होतात, त्याला त्याचे प्राप्तव्य, कल्याण संपादन करता येते, अशी प्लेटोची भूमिका आहे. मानवी जीवनाच्या नैतिक आदर्शांची चर्चा 'रिपब्लिक'मध्ये असल्याने आणि 'न्याय' या नैतिक मूल्याच्या मध्यवर्ती समस्येच्या संदर्भात प्लेटोने कला, साहित्य, शिक्षण, तत्त्वज्ञान, गणित-भूमिती इ. शास्त्रांचा अभ्यास इत्यादींचे विवेचन केलेले असल्याने 'रिपब्लिक' हा ग्रंथ नीतिमीमांसा ग्रंथ आहे हे प्रगट होते. मानवी व्यक्तीचा पूर्णत्वाच्या दिशेने होणारा प्रवास, सामूहिक जीवनातील नैतिक आदर्शांचा परमोत्कर्ष, ज्याप्रमाणे प्लेटो दाखवितो, त्याचप्रमाणे व्यक्ती व समूह यांची अधःपतनाची वाटचाल, त्याची कारणमीमांसाही प्लेटो करतो. केवळ 'हे जग' समोर ठेवून तो विवेचन करीत नाही तर आत्म्याचे पारलौकिक भवितव्यही सदाचरण, दुराचरण यांच्या संदर्भात तो प्रगट करतो. साहजिकच 'रिपब्लिक' हा ग्रंथ म्हणजे प्लेटोने केलेली 'मानवी संस्कृतीची सर्वंकष मीमांसा' किंवा प्लेटोचे 'जीवनभाष्य' अशा पद्धतीचा वाटतो. अनेकविध गुंतागुंतीच्या संकीर्ण प्रश्नांची चर्चा यात आहे. प्लेटोची मते अनेक ठिकाणी वादग्रस्तही ठरली आहेत. प्लेटो ज्या काळात वाढला, ज्या काळात त्याचे जीवनचिंतन विकसित झाले त्या प्राचीन ग्रीक समाजात 'राज्यशास्त्र' आणि 'नीतिशास्त्र' यांच्यात फरक केला जात नव्हता. 'नागरिक' आणि 'नैतिककर्ता' यांचे जीवन समकक्ष मानले जात होते. साहजिकच दंडनीती, धर्म, व्यक्तिगत जीवन, सामाजिक परंपरा यांच्यातील आज रूढ असणारे वैचारिक आणि व्यावहारिक भेद त्या समाजपद्धतीत नव्हते. म्हणूनच 'रिपब्लिक' ग्रंथातील तत्त्वचिंतनाचे स्वरूप 'सर्वस्पर्शी' झालेले आढळते.

'रिपब्लिक' मध्ये तत्कालीन कायदे, संस्थात्मक व्यवहार, सामाजिक प्रथा, कला आणि साहित्यविषयक मते, धार्मिक भूमिका, राज्यकर्त्यांचे वर्तन इत्यादीसंबंधी टीका आहे. अनेक ठिकाणी ही टीका परखड स्वरूपाचीही आहे. स्वतःच्या राजकीय आणि नैतिक ध्येयवादामुळे प्लेटोची मते अनेक ठिकाणी एकांगी, दुराग्रही स्वरूपाचीही वाटतात. पण प्रचलित प्रश्नांच्या अभ्यासातून प्लेटोला केवळ एक राज्यशास्त्रीय सिद्धान्त, उपपत्ती निर्माण करावयाची नाही, असे दिसते. 'रिपब्लिक' लिहिण्यामागची त्याची प्रेरणा, भूमिका, उद्देश हा सुधारकाचा, क्रान्तदर्शी राजर्षीचा दिसतो. सभोवतालच्या व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनातील स्वार्थ, अहंकार, अन्याय, शोषण, दुःख, दुष्टता दूर करण्याचे उपाय शोधण्याची त्याची भूमिका आहे. या अन्वेषणातून आदर्श मानवी जीवनाचे 'स्वप्नचित्र' किंवा 'शब्दशिल्प' उभारण्याची त्याची दृष्टी आहे. त्याची 'अॅकॅडमी' म्हणजे नैतिक शिक्षण, राजकीय प्रबोधन यांद्वारा समाजसुधारक, लोककल्याण दृष्टी असणाऱ्या प्रज्ञावंतांची जडणघडण करण्याची 'प्रयोगशाळा' होती. 'रिपब्लिक', 'लॉज' यांसारख्या ग्रंथांतून प्लेटोने नीतितत्त्वाधारित समाजपरिवर्तनाची साध्ये आणि साधने, प्रमेये आणि रीती, सिद्धान्त आणि व्यवहार विशद करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

त्याने स्वीकारलेली 'संवादपद्धती' एकूण प्रश्नांची मांडणी प्रत्ययकारी बनवते. सॉक्रेटिसने संवादपद्धतीच्या आधारेच ज्ञानशास्त्रीय आणि नीतिशास्त्रीय प्रश्नांचा ऊहापोह केला. 'रिपब्लिक' मध्ये 'सॉक्रेटिस' हे व्यक्तिमत्त्वच मध्यवर्ती आहे. पण सॉक्रेटिसची व्यक्तिरेखा अनेक ठिकाणी प्लेटोची जीवनदृष्टी प्रगट करते, माध्यम म्हणून प्रगट होते. बर्कले, बनियन यांनी आपल्या तात्त्विक संवादग्रंथांतून व्यक्तिरेखांचा उपयोग करून तात्त्विक समस्यांची संवादचित्रे उभी केली. 'संवादपद्धती'च्या स्वीकारामुळे रुक्ष, प्रबंधात्मक, युक्तिवादात्मक विवेचनाऐवजी जिवंत, नाट्यमय रीतीने तात्त्विक भूमिका, विचारप्रवाह यांचे रूपदर्शन घडते. पण याचे तोटेही आहेत. एक म्हणजे संवादातल्या व्यक्तिरेखा या विशिष्ट भूमिकेच्या प्रतिनिधी ठरतात, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व उरत नाही. शिवाय विचारप्रबोधन, नैतिक प्रबोधन हा संवाद हेतू ठेवल्याने प्रत्यक्ष जीवनातल्या घटना, प्रसंग, बारकावे, विसंगती, विरोधाभास इत्यादींच्या विलोभनीय दर्शनाने जी कलापूर्ण नाट्यवस्तू उभी राहणार तीही उभी रहात नाही. ज्या ठिकाणी सूक्ष्मग्राही वैचारिक प्रमेयांचे विश्लेषण, चर्चा, चिकित्सक समीक्षा अपेक्षित आहे त्या ठिकाणी ललित संवादपद्धती अडथळा ठरू शकते. प्रतिपाद्य संकल्पनांचा नेमका अर्थ, तिच्या वापराचा वैचारिक संदर्भ स्पष्ट होत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी निबंध/प्रबंध स्वरूपाची रचना असती, तर युक्त ठरले असते असे वाटते. 'रिपब्लिक'मध्ये जेव्हा प्लेटो ज्ञानमीमांसा करतो, परममूल्य, परमसत्ता या संज्ञा स्पष्ट करतो त्यावेळी सरळ, युक्तिवादात्मक विश्लेषक पद्धती अधिक सूक्ष्मग्राही ठरली असती, असे वाटते.

'रिपब्लिक'च्या भाग दोनमध्ये प्लेटोने समूहजीवन कसे निर्माण होते ? त्यामध्ये श्रमविभाग तत्त्व कसे काम करते ? विविध सामाजिक गट कसे बनतात ? प्राथमिक गरजा,

सुखसाधने, समृद्धी यांच्या अपेक्षापूर्तीतून उत्पादन, वितरण, उपभोग इ. कार्ये कशी चालतात इत्यादी समस्यांचे विवेचन करतो. या ठिकाणी प्लेटो मानवी संस्कृतीचे ऐतिहासिक पद्धतीने सिंहावलोकन, विश्लेषण, समीक्षा करतो आहे असे प्रथमदर्शनी वाटले, तरी वस्तुतः ती ऐतिहासिक पद्धती नव्हे. 'समाज' ही संकल्पना स्वीकृत केली तर तिच्या तार्किक विश्लेषणातून जे पर्याय, अभिप्राय सामोरे येतात, त्यांचे प्लेटोने विवेचन केले आहे.

त्याचप्रमाणे मानवी 'आत्म्याचे विभाग' जेव्हा प्लेटो समजून देतो त्यावेळी त्याची रीत, निरीक्षण प्रयोगाधारित मानसशास्त्राची आहे, असे नाही. तर मानवी प्रकृती, स्वभाव, वर्तन, व्यक्तिमत्त्व ही संकल्पना स्वीकृत केली तर तिच्या तार्किक पृथःकरणातून कोणते संदर्भ, पर्याय, अभिप्राय निष्पन्न होतात ते प्लेटोने दाखविले आहे. 'रिपब्लिक'च्या भाग आठ आणि नऊ मध्ये तो जेव्हा व्यक्तीच्या व राज्याच्या अधःपतनाच्या पायऱ्या क्रमशः दाखवतो तेव्हाही अशीच संकल्पनात्मक तार्किक विश्लेषण पद्धती त्याने वापरली आहे, असे दिसून येते.

अर्थात प्लेटोच्या विवेचनाला कोणताच ऐतिहासिक आधार नव्हता, असे म्हणता येणार नाही. पण तो आधार समकालीन, तत्कालीन, सामाजिक, राजकीय परिस्थितीच्या अवलोकनाचा आहे. मुख्यतः प्राचीन ग्रीक शहर राज्यांचा कारभार, अथेन्सचे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवन पाहून प्लेटोने ही मीमांसा केलेली दिसते. जागतिक मानवी इतिहासाचे, सांस्कृतिक समीक्षेचे व्यापक परिमाण प्लेटोच्या तत्त्वचिंतनाला होते, आणि तशा व्यापक ऐतिहासिक पद्धतीने त्याने राज्यशास्त्रीय, नीतिशास्त्रीय प्रमेयांची उकल व बांधणी केली आहे, असे दिसत नाही.

'रिपब्लिक' हा प्लेटोचा ग्रंथ त्याच्या संवादपद्धतीमुळे, आकर्षक ललित शैलीमुळे, त्यामधील तात्त्विक मर्मदृष्टीमुळे जागतिक वाङ्मयात विलोभनीय ठरला असला, तरी त्याची विविध संदर्भातली मते वादग्रस्त, आधुनिक दृष्टिकोनातून अस्वीकार्य ठरलेली आढळतात.

भाग दोन आणि तीनमध्ये त्याने राज्यकर्त्यांच्या शिक्षणपद्धतीचा विस्ताराने विचार मांडला आहे. राज्यकर्त्यांच्या उच्चस्तरीय अभ्यासातील शास्त्राभ्यास, तत्त्वज्ञानात्मक अभ्यास यांविषयीच्या भूमिका सातव्या भागात मांडल्या आहेत. शिक्षणात ललित साहित्य, कला यांना त्याने स्थान दिले आहे. पण साहित्य आणि कला यांना नैतिक प्रचाराचे, प्रबोधनाचे साधन, माध्यम केले आहे. कलामूल्यांची स्वायत्तता स्वीकारणाऱ्या भूमिकेस हे पटणार नाही. शिवाय राज्यकर्त्यांच्या हाती शिक्षण आणि कला यांमधून संस्कार करण्याचे काम सोपविले तर मतलबी राजकीय प्रचाराचे माध्यम म्हणून त्यांचा दुरुपयोग होण्याची शक्यता वाढते. राज्यकर्त्यांना हव्या असणाऱ्या मनोवृत्तींचा विकास, राजनिष्ठ माणसांची घडण त्यामधून होते. त्यामुळे स्वयंप्रकाशी, निर्भय, स्वत्वसंपन्न असे प्रज्ञावंत कसे निर्माण होऊ शकतील?

साहित्य, कला, शास्त्रे, तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासातून, क्रीडा शिक्षणातून, प्रत्यक्ष सामाजिक कार्यानुभवातून परिपक्व स्वरूपाचे राज्यकर्ते 'घडविण्याची' प्लेटोची 'योजना'

प्रथमदर्शनी रास्त वाटते. परंतु 'आत्मशोधातून स्वयंशिक्षण आणि स्वयंशिक्षणातून आत्मविकास' हे व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तिप्रतिष्ठा या मूल्यावर आधारलेले शैक्षणिक तत्त्वज्ञान स्वीकारले तर 'आदर्श माणसे घडविण्याची प्रयोगशाळा' या दृष्टीने शिक्षणपद्धती, शैक्षणिक संस्था यांचा वापर राजसत्तेच्या हाती राहणे, वा राजनिष्ठ भूमिकेतून होणे योग्य ठरणार नाही. साहित्यिक आणि कलावंत यांचेही निर्मितीस्वातंत्र्य अबाधित राहणे युक्त ठरते. विशिष्ट नैतिक भूमिका, आदर्श राजकीय मतप्रणाली यांची 'बांधिलकी' असेल तर प्रतिभेच्या सृजनशील सामर्थ्याला आणि निर्मिती स्वातंत्र्याच्या प्रतिष्ठेला अर्थ उरणार नाही.

"तत्त्वज्ञ हे राज्यकर्ते असले किंवा राज्यकर्ते हे तत्त्वज्ञ असले", तर व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनात समतोल, सामंजस्य, न्याय इत्यादींचा प्रादुर्भाव, उत्कर्ष साधेल ही प्लेटोची ध्येयवादी भूमिकाही प्रथमदर्शनी रास्त वाटते. परंतु असे प्रज्ञावंत 'घडवणे' किंवा 'तयार करणे' कितपत शक्य आहे? शिवाय 'काही शहाण्या' माणसांनी बहुजन समाजावर आपली प्रभुसत्ता टिकविणे कितपत रास्त आहे? काही प्रज्ञावंतांच्या समर्थ मार्गदर्शनाने वेगाने सामाजिक प्रगती साधेलही, पण अशा 'काही निवडक' व्यक्तींचा विवेक नेहमीच ग्राहचयुक्त ठरेल कशावरून? त्यांनी प्रमाद केले तर 'न्याय' कुठे आणि कसा मागायचा? याची व्यवहार्य उत्तरे प्लेटोच्या शब्दशिल्पात सापडत नाहीत. पूर्णतः निःस्वार्थ, निरहंकारी, परसेवारत, परहितदक्ष अशा 'राजर्षि' व्यक्ती प्रत्यक्षतः अपवादात्मक असतात. त्यांनी सामाजिक व राजकीय अनुशासनास मार्गदर्शन करावे पण 'सल्लागार' ही भूमिका वेगळी आणि 'राज्यकर्ता' ही भूमिका वेगळी. प्लेटोने अशा परिणतप्रज्ञ प्रज्ञावंतांचे 'आचार्यकुल' सुचवले असते, तर ज्ञान, नीती, धर्म, राजकारण, साहित्य आणि कला, आर्थिक व्यवहार, सामाजिक व्यवस्थापन यांना यथोचित ध्येयदृष्टी देण्याचे कार्य काही प्रमाणात साधले असते. पण तत्त्वचिंतन आणि राजकीय ध्येयवाद यांची सांगड घातल्याने एकतर तत्त्वचिंतन राजकीय मतलबग्रस्त होण्याची शक्यता वाढते किंवा राजकारणास तत्त्वचिंतनाची झिलई प्राप्त करून देण्याचा प्रयत्न घडू शकतो. प्रत्यक्ष राजकारण, सामाजिक व्यवस्थापन हे दुय्यम श्रेणीची बुद्धिमत्ता सांभाळू शकते. तिला उदात्त ध्येयदृष्टी देण्याचे कार्य प्रज्ञा आणि प्रज्ञावंत यांनी जरूर करावे, पण दैनंदिन राजकारणाची वास्तवता लक्षात घेता 'स्थितप्रज्ञाचे राजकारण' एक तर अव्यवहार्य होण्याची शक्यता वाढते किंवा ते अनावश्यक ठरू शकते.

आजच्या लोकशाही युगात 'प्रज्ञावंतांची हुकूमशाही' मान्य होण्यासारखे राजकीय तत्त्वज्ञान वाटत नाही. प्लेटोने व्यक्तिगत आणि सामाजिक अधःपतनाची प्रक्रिया स्पष्ट करताना भाग आठ आणि नऊमध्ये विविध राज्यपद्धतींची नैतिक समीक्षा केली आहे. त्याने लोकशाहीवर केलेल्या परखड टीकेमागे, त्याला अथेन्समध्ये त्या वेळच्या शहर राज्यातील अनुभवास आलेल्या राजकीय लोकशाहीच्या दुरावस्थेचा संदर्भ दिसतो. अपात्र माणसांची निवड, नियुक्ती, स्वैराचारी लोकजीवन त्याच्यापुढे होते. या लोकशाही राजवटीतच त्याने आपल्या परमप्रिय गुरूचा 'सॉक्रेटिस'चा खटला, विषप्राशन शिक्षेतून झालेला करुण अंत

पाहिला होता. या तात्कालिक प्रतिक्रियेतूनही ही परखड टीका निर्माण झाली असणे शक्य आहे. पण लोकशाहीमध्ये कितीही दोष असले तरी समाजातल्या सामान्यातील सामान्य नागरिकास लाभणारे विवेक स्वातंत्र्य, निवड स्वातंत्र्य, विचार करण्याचे, निर्भयतेने मांडण्याचे स्वातंत्र्य, मतभेद प्रगट करण्याचे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे. अशा बहुजन अर्धशिक्षित, असंस्कृत, अप्रगत बहुजन नागरिकांमध्ये सर्वंकष स्वरूपाची जीवनदृष्टी विकसित झालेली नसेलही. पण न्याय, अन्याय, शोषण, दुःख, दुष्टता ओळखण्याचे तारतम्य अशा नागरिकांत असतेच. त्याला वाव देणे, ते अधिक डोळस, जागृत करणे, संघटित करणे महत्त्वाचे आहे. चुका करीत, चुका समजून घेत, दुरुस्त करीत लोकशाही जीवन आणि राज्यव्यवस्था यांचा धीरेधीरे विकास झाला, तरी हरकत नाही. पण व्यक्तिस्वातंत्र्य, सामान्य माणसाची व्यक्तिप्रतिष्ठा या मूल्यांचा अव्हेर करून काही ज्ञानी, काही सत्ताधारी, काही धनवान यांची प्रभुसत्ता निर्माण करणे, हे परिणामी जनहित, जनकल्याण ठरेल असे नाही.

वासना, अस्मिता आणि बुद्धी असे प्लेटोने मानवी प्रकृतीचे 'भाग' दाखविले आहेत. त्यांच्या प्राबल्यानुसार उत्पादक, संरक्षक आणि शास्ते यांचे सामाजिक वर्ग दाखविले आहेत. संयम, शौर्य आणि ज्ञान हे त्यांचे सद्गुण सांगितले आहेत आणि यांचा समन्वयी विकास म्हणजे आंतरिक सामंजस्य, व्यक्तिजीवनातील न्याय आणि सामाजिक सामंजस्य, सामूहिक जीवनातील न्याय अशी भूमिका मांडली आहे. मानवी प्रकृतीची आणि सामाजिक जीवनाची ही 'त्रिगुणमीमांसा' प्रथमदर्शनी सुटसुटीत, आकर्षक वाटते. पण मानवी स्वभावाची संकीर्णता सामाजिक संस्था व व्यवहार यांची संकीर्णता लक्षात घेता ही मीमांसा मानवी स्वभावाचे, सामाजिक रचनेचे 'यथार्थदर्शन' घडविते असे दिसत नाही.

प्लेटोच्या आदर्श राज्याच्या शब्दशिल्पातील एक योजना फारच वादग्रस्त ठरली ती म्हणजे शासकांच्या संदर्भात त्याने सुचविलेला साम्यवाद. प्रज्ञावंत शासकांच्या संदर्भात त्याने खाजगी मालमत्तेचा हक्क तर नाकारला आहेच, पण त्यांचे वैवाहिक, कौटुंबिक जीवनही पूर्णतः 'सामायिक' ठरविले आहे. उत्तम संतती निर्माण होण्यासाठी पूर्वनियोजित पद्धतीने चिठ्ठ्या टाकून स्त्री-पुरुषांचा समागम घडविणे, सर्वांचे खाणे-पिणे, निवास एकत्र सामूहिक निवासकेंद्रात ठेवणे, मुलांना आपले माता-पिता ओळखता येऊ नयेत याची दक्षता घेणे, मुलांचे संगोपन सार्वजनिक संगोपन केंद्रात करणे, उच्च-नीच क्षमतांच्या स्त्री-पुरुषांचा संबंध येणार नाही याची दक्षता घेणे, शासकांना खाजगी घर, जमीन, पैसा इ. लाभणार नाही हे पहाणे, त्यांना द्रव्याच्या स्वरूपात मोबदला न देता वस्तूंच्या स्वरूपात देणे इत्यादी योजना प्लेटोच्या साम्यवादात, स्त्रिया व मुले यांच्या सामूहिक मालकी संकल्पनेत दिसतात.

व्यक्तिस्वार्थ विरहित पूर्णतः समाजकल्याण बुद्धी असणारे तत्त्वज्ञ राज्यकर्ते तयार व्हावेत, त्यांनी सामूहिक आचारसंहितेचे काटेकोर परिपालन करावे आणि समाजनीतीची अधिष्ठाने, न्यायाची तात्त्विक अधिष्ठाने सुदृढ रहावीत, इत्यादी प्लेटोचे उद्देश प्रथमदर्शनी स्तुत्य वाटतात. पण या सर्व स्वप्नरंजनात मानवी प्रकृतीची, स्वभावाची, कोमल भावजीवनाची

वास्तविक आणि व्यवहार्य जाणीव आणि त्याच्याशी संवादी कार्ययोजन दिसत नाही. ज्यांच्याकडे 'सत्ता' आहे त्यांना 'धनलोभ' असू नये, जे 'ज्ञानी' आहेत त्यांनी 'सेवाधर्म' स्वीकारावा. सामाजिक, राजकीय अनुशासनात स्वार्थी हितसंबंध असू नयेत, गुंतले जाऊ नयेत, ही अपेक्षा रास्त आहे. पण त्याकरिता वैवाहिक, कौटुंबिक जीवनामागील भावसंस्कृतीचा उच्छेद इष्ट, आवश्यक आहे असे नाही.

प्राप्त जीवनातील सुप्त, शुभ क्षमतांचा विकास साधण्याचे, आपले इष्ट, प्राप्तव्य ठरवण्याचे, त्याच्या प्राप्तीची साधने निश्चित करण्याचे, अपूर्णतेतून पूर्णतेचा वेध आणि शोध घेण्याचे प्रत्येक मानवी व्यक्तीला अबाधित स्वातंत्र्य असले पाहिजे. कोणताही माणूस बाहय राजकीय बलिष्ठ सत्तेचा, ज्ञानाची मक्तेदारी असणाऱ्या ज्ञानसत्तेचा किंवा स्वार्थी धनसत्तेचा गुलाम असू नये. कितीही उदात्त हेतूने निर्माण झालेली असो, किंवा उदात्ततेचे वलय पांघरलेली असो ; सत्ता, ज्ञान, धन यांच्या प्रभुसत्तेमुळे खरा मानवी विकास घडत नाही. त्यामधून 'गुलामांची संस्कृती' वाढते. धर्मसुधारणा, सामाजिक सुधारणा, प्रबोधनयुग, उदार मानवतावाद, लोकशाही समाजवाद, सर्वोदय, अंत्योदय इत्यादी विचारप्रवाहांनी विसाव्या शतकातील जीवनदृष्टीला आकार आणि अर्थ प्राप्त झाला आहे.

अशा वेळी 'काही' जणांची ज्ञान, सत्ता, धनविषयक मक्तेदारी आणि प्रभुसत्ता आणि त्यांच्या मार्गदर्शनाने, दिग्दर्शनाने 'इतरेजनांचा' विकास ही भूमिका आजच्या शतकातील माणसाला मानवणारी नाही. त्यामुळेच प्लेटोचे सामाजिक, राजकीय 'पुनर्रचनेचे तत्त्वज्ञान' हे 'बंदिस्त समाजाचे तत्त्वज्ञान' आहे असा आक्षेप घेतला जातो.

अर्थात हे आणि अशा प्रकारचे आक्षेप, मर्यादा असल्या तरी प्लेटोच्या 'रिपब्लिक' ग्रंथातील तत्त्वचिंतनात काही चिरंतन महत्त्वाची जीवनदृष्टीही आहे. व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनाला नीतीचे अधिष्ठान असावे हा प्लेटोचा आग्रह आजही मोलाचा आहे. साहित्य, कला, शिक्षण, राजकारण या सर्वांतून विध्वंसक, अशुभ, दुष्ट अशा संस्कारांऐवजी विधायक, रचनात्मक, शुभ, सुष्ट वृत्तीचे संस्कार व्हावेत ही प्लेटोची भूमिका मोलाची आहे. केवळ व्यक्तिहित, बलिष्ठांचे हित हे राजनीतीचे सूत्र असू नये ; तर समाजात सामंजस्य, न्याय, ज्ञान, नीती यांची कदर, आदर वाढेल, या मूल्यांना समाजात प्रतिष्ठा लाभेल, असे समाज व्यवस्थापन असावे ; असे राजकीय नियोजन असावे ही प्लेटोची दृष्टी मोलाची आहे. 'पशु' वृत्तीचा संयम आणि नियंत्रण, 'मानवी' वृत्तीचा विकास आणि 'दिव्य' क्षमतांचा परिपोष यांमधून एकूण मानवी संस्कृतीच्या 'विकासाचा आलेख' तयार होतो. 'धर्मादर्थश्च कामश्च ।' असे व्यास महर्षी म्हणाले, 'राजकारणास नीतीचे अधिष्ठान असावे' असे महात्मा गांधींनी सांगितले. मानवी संस्कृतीच्या इतिहासात क्रान्तदर्शी महामानवांनी मानवी कल्याणाच्या भूमिकेतून काही 'पथदर्शक पाथेय' दिले आहे. त्यामध्ये 'कालोचित' आणि 'चिरंतन' असे वैचारिक घटक असतात. त्यांना त्यावेळी जे योग्य वाटले त्याचेही प्रबोधन ते करतात आणि एकूण मानवी स्वभाव, प्रकृती, समाजाची जडणघडण आणि मानवी कल्याण यादृष्टीने काही चिरंतन मानवी जीवनमूल्यांचे प्रबोधन ते करतात.

मानवी प्रकृती, स्वभाव किंवा समाज ही ठराविक साच्यात, नकाशात बंदिस्त करता येईल अशी काही 'स्थिरवस्तू' नाही. त्यामधील गतिमानता, परिवर्तनशीलता लक्षात घेऊनच 'प्रगतीच्या पाऊलवाटा' नव्याने शोधाव्या लागतात. अशा वेळी पूर्वसूरींची केवळ 'पुनरुक्ती' न करता किंवा त्यांचे शब्दशः 'अनुकरण' न करता त्यांच्या जीवनभाष्यातील 'कालबाह्य' भाग सोडून देणे आणि 'चिरंतन' भागाला उजाळा देणे, त्याच्या आधारे सामाजिक पुनर्रचनेचे, व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान निश्चित करणे महत्त्वाचे आणि शहाणपणाचे आहे. क्रान्तदर्शी महापुरुषांच्या प्रबोधनाचा अंधश्रद्ध, पोथीनिष्ठ स्वीकार परिणामी हितकर ठरत नाही, किंबहुना तो त्यांनाही अभिप्रेत नसतो. मग ती पोथीनिष्ठा प्लेटोच्या, मार्क्सच्या वा महात्मा गांधींच्या संदर्भातली असो.

सामाजिक पुनर्रचना, राजकारण, धर्मसुधारणा, शिक्षण, कला आणि साहित्य या संस्कृतीच्या विविध अंगांचा विस्तार आणि विकास साधताना म्हणूनच 'विवेकनिष्ठा' महत्त्वाची आहे. तिच्याच आधारे प्लेटोचे 'आदर्श राज्य' हे स्वप्नशिल्प, 'शब्दशिल्प' अभ्यासले पाहिजे. म्हणजे तो केवळ 'प्रतिभाविलास' वाटणार नाही किंवा राजकीय कार्यक्रमाची 'गीता' वाटणार नाही. मानवी संस्कृतीच्या इतिहासातील एक 'अमोल लेणे' या दृष्टीने प्लेटोचे 'आदर्श राज्य' समजून घेतले पाहिजे. व्यक्ती आणि समाजविषयक प्रश्नांच्या संदर्भात यामुळे काही प्रमाणात अंतर्दृष्टी, मर्मदृष्टी, समीक्षावृत्ती विकसित झाली, तरी हे स्वप्नचित्र, शब्दशिल्प सार्थ ठरेल. कोणत्याही श्रेष्ठ वैचारिक कृतीचा, कलाकृतीचा विशेष म्हणजे ती संवेदनशील, जिज्ञासू वाचकापुढे मानवी जीवनविषयक प्रश्नचिन्ह उभी करते. प्रश्न सोडविण्याच्या 'तयार रीती' पुरविण्याऐवजी आस्वादकाला अंतर्मुख करून आत्मशोधाची प्रेरणा देते. वास्तवता आणि आदर्श यांतील द्वन्द्वे, अंतर्विरोध, ताण यांचे प्रत्ययकारी दर्शन घडविते आणि व्यक्ती व समाज यांच्या अंतरंग घडणीची विविध परिमाणे दाखविते. आदर्श व्यक्ती आणि आदर्श समाज यांचा 'पूर्णत्वाचा प्रवास' आणि 'पतनाची वाटचाल' जी प्लेटोने दाखविली आहे तिचे आजच्या दृष्टीने 'पुनरावलोकन' घडले तर आज जाणवणाऱ्या अनेकविध संदर्भातील 'अधःपतनाची मीमांसा' डोळसपणे सुरू होईल आणि 'पूर्णत्वाच्या प्रवासाची प्रेरणा' लाभू शकेल.

'आदर्श माणसांचे आदर्श राज्य' केव्हा व कसे निर्माण होईल याचे आशाळभूत स्वप्नरंजन न करता आपल्या हातांनी निर्माण केलेले प्रदूषित जीवन आपल्याच प्रयत्नांनी नैतिक दृष्ट्या 'निर्मल' करण्याची व्यक्तिगत आणि सामूहिक प्रेरणा निर्माण झाली तर 'रिपब्लिक' सारख्या ग्रंथांचे प्रयोजन सफल झाले, असे म्हणता येईल. अशा प्रयत्नात परभृत आणि परप्रकाशी जीवनाच्या स्वीकृतीऐवजी स्वयंप्रकाशी अस्मिता, कार्यशील प्रज्ञा जागृत झाली तर प्रयोजन सफल झाले असे म्हणतात. महामानवांची 'स्वप्ने' ही 'उद्याची वास्तवता' असते. निदान 'उद्या'चे स्वप्नशिल्प तयार करण्यापेक्षा 'आज'चे सामाजिक आणि राजकीय 'वास्तव' समजून घेण्याची प्रेरणा झाली तरी 'आदर्श राज्य' ही 'फार दूरची गोष्ट' किंवा 'परीकथा' उरणार नाही. अन्यथा महाभारत लिहूनही 'व्यासांचा

आक्रोश' हेच दारूण सत्य उरले. 'आदर्श राज्य' लिहूनही 'प्लेटोचा आक्रोश' हे एक 'अरण्यरुदन' ठरू शकेल.

'रिपब्लिक'च्या सातव्या भागात 'ज्ञान', 'अज्ञान' या संकल्पनांचे स्वरूप विशद करताना प्लेटोने 'गुहेची रूपककथा' मांडली आहे. अंधाऱ्या गुहेतून गुहेबाहेरील प्रकाशात येऊन वास्तव सृष्टीचे ज्ञान झालेला, सूर्याकडे पाहू शकणाऱ्या ज्ञानी माणसाला आपले पूर्वायुष्य, अंधार, भास आणि भ्रम यांचे छायांचे जग यात गेल्याची खंत वाटते. गुहेतील बांधवांना त्यांच्या अज्ञानाची जाणीव करून देण्याकरिता, 'अंधारातून प्रकाशाकडे' नेण्याकरिता तो प्रयत्न करतो, पण अज्ञान, अंधार यांनाच ज्ञान समजण्याची सवय लागलेल्या अडाणी लोकांकडून त्याची अवहेलना होते. प्रसंगी ते त्याच्या हत्येचाही प्रयत्न करतात. प्रबुद्ध झालेले 'तथागत' जेव्हा 'बुडती हे जन न देखवे डोळा ।' या करुणेने लोकोद्धाराचे काम करतात तेव्हा असमंजस, दुराग्रही, अडाणी समकालिनाकडून त्यांची अवहेलना होते, छळ होतो. प्रसंगी त्यांना क्रूसावर चढवले जाते. अशा वेळी आत्यंतिक क्षमाशीलतेने असे प्रज्ञावंत 'परमेश्वरा त्यांना क्षमा कर. ते काय करीत आहेत, याची त्यांनाच कल्पना नाही!' अशी करुणार्द्र भूमिका घेतात.

प्लेटोला अभिप्रेत असलेला प्रज्ञावंत प्रज्ञा आणि करुणा यांचे प्रतीक आहे. त्याला निष्क्रीय, शब्दपंडित मान्य नाही. या विभागातील सॉक्रेटिसच्या मुखातील संवाद लक्षणीय आहेत.

"ज्या माणसाला वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात सुज्ञपणाने वागावयाचे आहे, त्याने आपल्यासमोर सत्तत्त्वाचा आदर्श ठेवला पाहिजे.... अज्ञानी आणि आयुष्यभर फक्त ज्ञानसाधना करणारे असे दोन्ही प्रकारचे लोक राज्यकारभारास नालायक असतात.... पहिल्या प्रकारच्या व्यक्तिगत, सामाजिक जीवनास कोणतीही प्रेरणा नसते आणि दुसऱ्या प्रकारचे लोक फक्त स्वतःला सुदैवी समजून कोणतेही काम करण्यास प्रत्यक्षतः तयार नसतात.... नागरिक आणि अधिकारी या दोन्ही दृष्टीने इतरांपेक्षा अधिक पूर्णतः चांगले शिक्षण लाभलेल्या या लोकांना उच्च वातावरणातून खाली उतरून लोकगंगेत मिसळले पाहिजे.... ज्या राज्यात शहाणी माणसे सत्ता वापरण्यास नाखूष असतात, तो राज्यकारभार शांतपणे, उत्तमपणे चालतो. ज्या राज्यात राज्यकर्ते कारभार करण्यास फार उत्सुक असतात ते राज्य वाईट पद्धतीने चालते.... खाजगी फायद्याकरिता हपापलेले लोक जेव्हा राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतात त्या वेळी सर्वत्र अव्यवस्थितपणा माजतो. कारण असे लोक अधिकाराच्या जोरावर फायदा करून घेण्याची आपणांस मुभाच आहे, असे समजतात. अशा राज्यात अधिकाराची जागा ही भांडणाचा विषय बनते. यातून आपापसातील कलह. भांडणाऱ्या गटांचे नुकसान होते. परिणामी राज्याचेही होते.... सत्तेचा लोभ नसणाऱ्या लोकांनी राज्यकारभार केला पाहिजे. नाही तर अधिकाराकरिताच लोक भांडत राहतील."

प्लेटोला अभिप्रेत असणारे प्रज्ञावंत राजकारणी, मुत्सद्दी, शास्ते हे सत्ता हे लोककल्याणाचे साधन, लोकसेवा व्रताचे साधन मानणारे आहेत. अशा लोकांच्या हाती ज्ञान, धन, सत्ता

असेल तर 'पृथ्वीवर स्वर्ग' निर्माण होऊ शकेल. पण ज्ञान, धन, सत्ता यांचा लोभ असणाऱ्या स्वार्थी लोकांच्या हाती समाजव्यवस्थापन गेले तर प्रज्ञावंतांची हुकूमशाही आणि लोकशाहीचे विडंबन संभवते.

प्लेटोचे 'आदर्श राज्य' हा 'स्वप्नभूमीचा प्रवास' नसून आदर्श मानवी जीवनाचे स्वप्न वास्तवात येण्याच्या दृष्टीने कोणता साध्य-साधन विवेक इष्ट ठरेल त्याचे विचारदर्शन आहे. प्लेटोच्या जीवनदृष्टीमागे तत्त्वज्ञानविषयक जी भूमिका आढळते ती लक्षणीय आहे.

कोणतेही जिवंत तत्त्वज्ञान हे सामाजिक वास्तवाच्या अभ्यासातून, सामाजिक अनुभवातून स्फुरले पाहिजे (Philosophy by Social Practice). तत्त्वचिंतनाचे स्वरूप सामाजिक समस्यांचा सावध, साक्षेपी अभ्यास, त्या आधारित सिद्धान्तन, सामाजिक भूमिका, दृष्टिकोन यांचा अंतरंग शोध, हे असले पाहिजे (Philosophy of Social Practice) आणि तत्त्वचिंतनातून सामाजिक परिवर्तनाच्या, प्रगतीच्या दिशा, पाऊलवाटा लाभल्या पाहिजेत. सामाजिक उत्कर्षाची विचारसंहिता आणि आचारसंहिता त्यातून गवसली पाहिजे, त्यामुळे सामाजिक पुनर्रचनेची प्रमेयसूत्रे निश्चित करता आली पाहिजेत (Philosophy for Social Practice).

तत्त्वज्ञ आणि राज्यकारभार यांचा सेतू बांधत असताना हे भान प्लेटोत आढळते. प्रज्ञावंत आणि बहुजन समाज यांच्यात असणारी वैचारिक दरी, विनिमयाचा अभाव (Consciousness and communication gap between elites and masses) हेच सामाजिक दुरवस्थेचे मुख्य कारण ठरते. कारण प्रज्ञावंत हे समाजाचे नेत्र असतात. इतिहास आणि संस्कृती यांच्या समस्यांचे काल, आज, उद्या या सर्व संदर्भातील सावधपण आणि साक्षेप सांभाळून समाजाला यथोचित, निर्भय, निःस्पृह मार्गदर्शन करणे, लोकशिक्षण आणि समाजप्रबोधन करणे, कार्याच्या प्रेरणा देणे, कार्ययोजन करणे हे जागृत प्रज्ञेचे, डोळस प्रज्ञेचे, सामाजिक करुणाप्राप्त प्रज्ञेचे कार्य आहे. जेव्हा समाजाच्या गुरुस्थानी असणारे प्रज्ञावंत निष्क्रीय, स्वार्थी होतात तेव्हा समाजाचे नेत्र बिघडले जातात. स्वतः अंध असणारे इतरांना कोणती जीवनदृष्टी देऊ शकतील ?

'रिपब्लिक'च्या अभ्यासाने समाजातील प्रज्ञावंतांची अस्मिता, क्रियाशीलता, सामाजिक ऋणबद्धी जागृत झाली तर निदान 'राज्य' आणि 'राज्यकारभार' सुधारू शकेल. 'आदर्श राज्य' हे प्रयत्नसाध्य स्वप्न आहे. स्वप्नाच्या साक्षीने वास्तव सत्याचे विदारक दर्शन घडले तर प्रज्ञावंताची पुरुषार्थ प्रेरणा जागृत होईल. पुरुषार्थ संपन्न प्रज्ञावंत ज्या समाजात असतात त्या समाजात अस्मिता, स्वत्व, स्वयंप्रकाशित्व टिकून राहते. जेव्हा अशी प्रज्ञा मावळते त्यावेळी तो समाज, ती संस्कृती इतिहासजमा होते. ज्यांनी इतिहास घडवायचा तेच इतिहासजमा झाले. ज्यांनी जीवनदृष्टी द्यायची तेच आंधळे असतील तर त्या समाजाला,

संस्कृतीला भवितव्य उरत नाही. तत्त्वज्ञान म्हणजे 'संस्कृतीची समीक्षा' असते. प्लेटोने 'आदर्श राज्य' स्वरूपात एका मानवी संस्कृतीचे शब्दशिल्प समोर उभे केले आहे. त्या संस्कृती समीक्षेची फलश्रुती म्हणून स्वतः आणि सभोवतालचे जग यांमध्ये काही तेजस्वी सस्कृतीची बीजे पेरण्याचे, जोपासण्याचे सामर्थ्य लाभले, तर तो 'रात्रीच्या गर्भातील उद्याचा उषःकाल' म्हणता येईल.

**ज. वा. जोशी**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९८६
ग्रंथ २५७७६
१८।१।७८६
शाखा (स्थळ)

## प्रकरण एक

# न्याय म्हणजे प्रामाणिकपणा

**[I-327—331-D]**

**कथासूत्र :**

[व्यक्तिगत व सामाजिक न्यायाची व त्याद्वारे आदर्श राज्याची कल्पना प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथात विशद केली आहे. हा ग्रंथ संवादरूप आहे. त्याचा प्रारंभ या प्रकरणात होतो. सर्व संवाद काल्पनिक स्वरूपाचा आहे. अथेन्सपासून सुमारे पाच मैलांवर असलेल्या पीरिअस या बंदराजवळ बेंडिस या ग्रीक देवतेची जत्रा असते. सॉक्रेटिस हा काही मित्रांबरोबर ती जत्रा पाहून परत येतो त्यावेळी त्याला सिफालस या स्थानिक नागरिकाच्या घरी येण्याचे निमंत्रण मिळते. त्याच्या घरीच या संवादाला प्रारंभ होतो. सिफालस ही सेवानिवृत्त वृद्ध अशी सत्प्रवृत्त व्यक्ती आहे. वडिलार्जित व स्वकष्टार्जित संपत्तीचा उपयोग देवाचे व मानवाचे देणे देण्यासाठी करावा, त्यामुळेच माणसाला मानसिक समाधान व शांती लाभते असे त्याचे मत आहे. आपले सारे आयुष्य प्रामाणिकपणे जगणे यालाच तो 'न्याय' असे म्हणतो. 'न्याय' या संज्ञेची तार्किक व तात्त्विक मीमांसा अर्थातच त्याला जमत नाही. पण सत्प्रवृत्त, कर्तव्यदक्ष अशा सर्वसामान्य माणसाचा नैतिक दृष्टिकोन मात्र त्याच्या सर्व संभाषणामधून व्यक्त होतो. सॉक्रेटिसची मीमांसापद्धती, वडील व्यक्तीबद्दलची आदरबुद्धी आणि ज्ञानजिज्ञासा यांचाही प्रत्यय येतो. त्या दृष्टीने या ग्रंथाचे हे पहिले प्रकरण पुढच्या विस्तृत चर्चेची नांदीच होय. सॉक्रेटिस हाच या सर्व चर्चेचा सूत्रधार आहे.]

* * * * *

बेंडिस देवतेची प्रार्थना करण्यासाठी ॲरिस्टॉनचा मुलगा ग्लॅकॉन याजबरोबर काल मी पीरिअसला गेलो होतो. जत्रा प्रथमच भरत होती. ती पहावी असा माझा हेतू होता. अथेनिअन नागरिकांनी मिरवणूक काढली, ती पाहून मला फार समाधान वाटले. थ्रेशिअन लोकांची मिरवणूकही सुंदर होती. देवीची पूजा आटोपली. आमची जिज्ञासा पूर्ण झाली. आम्ही शहराकडे परत निघालो. तेवढ्यात, सिफालसचा मुलगा पोलेमार्क्स याने काही अंतरावरून आम्हांस पाहिले. ताबडतोब त्याने आपल्या नोकरास आमच्याकडे पिटाळले आणि थांबण्यास सांगितले. नोकर माझ्यामागे आला. माझा कुडता धरून तो मला म्हणाला, "माझे मालक पोलेमार्क्स आपणांस थांबण्याची विनंती करीत आहेत." मी मागे वळून म्हटले, "कुठे आहेत तुझे मालक ?" तो म्हणाला, "ते पहा ! ते तुमच्या मागून येत आहेत.

तुम्ही थोडे थांबावे." ग्लॅकॉन म्हणाला, "ठीक आहे, आम्ही थांबतो." काही वेळाने ग्लॅकॉनचा भाऊ ॲडिमँट्स, निसिअस्चा मुलगा निसेरट्स आणि आणखी काही लोक यांसह पोलेमार्क्स जत्रेहून परतताना आमच्याजवळ आला.

**पोलेमार्क्स** : सॉक्रेटिस, तुम्ही शहराकडे जात आहात ना ?

**सॉक्रेटिस** : तुझा अंदाज खरा आहे.

**पोलेमार्क्स** : आम्ही कितीजण आहोत, ते पाहिले ना ?

**सॉक्रेटिस** : हो.

**पोलेमार्क्स** : मग तर तुम्ही सर्वजण आमच्याहून अधिक समर्थ आहात असं तरी सिद्ध करा किंवा आमच्या बोलण्याला मान देऊन इथंच थांबा.

**सॉक्रेटिस** : पण आम्हाला जायला परवानगी द्या असं म्हटलं तर जाऊ द्याल ना ?

**पोलेमार्क्स** : पण आम्ही तुमचे ऐकायला तयारच नाही, मग आमचं मन तुम्ही कसं वळवणार ?

**ग्लॅकॉन** : ते अशक्यच.

**पोलेमार्क्स** : मग आम्हाला तुमचं म्हणणं मान्य नाही याची खात्री असू दे.

**ॲडिमँट्स** : संध्याकाळी घोड्यावरून, देवतेच्या सन्मानार्थ मशालींच्या शर्यती होणार आहेत. तुम्हांस हे ठाऊक आहे ना ?

**सॉक्रेटिस** : काय घोड्यावरून ? मग ती एक नवीनच मजा आहे ! घोडे धावत असतानाच पेटत्या मशालींची देवाणघेवाण करावयाची, असंच त्या शर्यतीचं स्वरूप आहे ना ?

**पोलेमार्क्स** : हो. शिवाय रात्री भरणारी जत्रा पाहण्यासारखी आहे. आपण जेवण करू आणि बघायला येऊ. तिथं खूप तरुण भेटतील. त्यांच्याशी संवाद करायला मिळेल. म्हणून, तुम्ही इथंच रहा, अशी आमची विनंती आहे, तिला मान द्यावा.

**ग्लॅकॉन** : आता आपल्याला इथंच मुक्काम करावा लागणार असं दिसतं.

**सॉक्रेटिस** : तुमची इच्छा असेल तर आपण मुक्काम करू.

नंतर आम्ही पोलेमार्क्सच्या घरी गेलो. त्याचे भाऊ लिसिआस आणि युथिडिमस, चॅलसिडानचा थ्रॅसिमाक्स, पेनिअनचा चारमन्टिड्स व ॲरिस्टॉनीमसचा मुलगा क्लिटोफोन तिथं होते. पोलेमार्क्सचे वडील सिफालस हेही होते. त्यांना खूप दिवसांनी मी पाहिले. बरेच थकलेले दिसले. अंगणात यज्ञ सुरू होता. डोक्याला माळा गुंडाळून एका गादीच्या खुर्चीवर ते बसले होते. लोकांना बसण्यासाठी त्यांच्या आसपास खुर्च्या टाकलेल्या होत्या. आम्ही त्यांवर

बसलो. त्यांनी मला पाहिले. माझे स्वागत करून ते म्हणाले, " तुम्ही पीरिअसला क्वचितच येता. खरं म्हणजे, तुम्ही वारंवार इथं आलं पाहिजे, आम्हाला भेटलं पाहिजे. मला ताकद असती तर मीच शहरात आलो असतो, तुम्हाला भेटलो असतो. मग तुम्हाला इकडे येण्याची तसदी पडली नसती. पण मी पडलो अशक्त. तेव्हा तुम्हीच वरचेवर या. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा की, ज्या प्रमाणात माझ्या शारीरिक वासना कमी होत आहेत, त्या प्रमाणात तात्त्विक संवादसुखाची माझी भूक वाढली आहे. माझी तुम्हांस विनंती आहे की, तरुणांना तुमचा सहवास मिळवून द्या आणि मित्राच्या आपलेपणाने मला वरचेवर भेटत जा." मी म्हटले, " सिफालस ! खरं बोलायचं तर मला वयोवृद्धांबरोबर बोलायला फार आनंद वाटतो. आयुष्याच्या वाटचालीत ही वृद्ध माणसे ज्या वाटेनं गेली आहेत, त्या वाटेनं आम्हालाही जायचं आहे. ही वाटचाल कठीण आहे का सोपी आहे ? तो रस्ता गुळगुळीत आहे का खडबडीत आहे ? ते आम्ही त्यांच्याकडून समजून घेतलं पाहिजे. तुम्हा मंडळींची अवस्था " लागले नेत्र रे पैलतिरी ! " अशी आहे असं कवींच्या भाषेत मला वाटतं. म्हणूनच तुमचा अभिप्राय मला अधिक योग्य व प्रमाण वाटतो. मी आपणांस विचारतो, " अंतकालाच्या उंबरठ्यावर असताना, आयुष्य क्लेशदायी वाटतं कां ? तुमचं काय मत आहे ? "

**सिफालस :** सॉक्रेटिस, माझा याबद्दलचा अनुभव ऐका. जुन्या म्हणीप्रमाणे आम्हा वृद्धांना वरचेवर एकत्र भेटण्याची उत्सुकता असते. अशा भेटीत आम्हाला तरुणपणातील प्रणयप्रसंग, जेवणावळी, मद्यपानाच्या मैफली आठवल्या की दुःख होते. तरुणांच्या सुखाचा हे वृद्ध हेवा करतात. शोक करतात. ते वृद्ध सुस्कारा सोडीत म्हणतात, " गेले ते दिवस ! तेव्हाच आपण खरे सुखी होतो, खरे जगत होतो. आता फक्त दिवस पुढे ढकलीत आहोत. इतकेच ! " शारीरिक दुर्बलता, नातेवाईक व्यक्तींकडून होणारे अपमान, गाऱ्हाणी हे लोक सांगत बसतात. इतर अनेक दुःखद प्रसंगांची कथा सांगत वार्धक्याची निंदा करतात. पण सॉक्रेटिस, मला वाटतं, ही माणसं आपल्या दुःखाचं खरं कारण विसरतात. वार्धक्य हे जर खरं कारण असतं तर मला आणि माझ्या समवयस्कांना तसेच क्लेश जाणवले असते आणि त्रास झाला असता. पण अनेक वृद्धांचा आणि माझा अनुभव वेगळा आहे. वयोवृद्ध सोफोक्लस या कवीबद्दल तुम्हाला सांगतो. मी असताना कुणीतरी त्याला विचारले, " सोफोक्लिस, प्रेमाबद्दल तुम्हाला काय वाटतं. अजूनही तुम्हाला प्रेमाची ऊर्मी आहे काय ? " तो म्हणाला, " छे ! छे ! कृपया माफ करा ! प्रीतीसारख्या लहरी आणि रानटी मालकिणीपासून मी मुक्त झालो, याचा मला फार आनंद वाटतो." सोफोक्लिसचे हे उद्‌गार मला तेव्हाही शहाणपणाचे वाटले, आजही वाटतात. वार्धक्य हे प्रेम व अन्य विकार यांपासून माणसाला मुक्त करते, त्याच्या मनाला गाढ शांती मिळते. वासना थंडावतात, त्यांचा जोर कमी झाला की सोफोक्लिस म्हणतो त्याप्रमाणे जुलमी मालकापासून मुक्तता झाल्याचा आनंद मिळतो. खरं म्हणजे विविध प्रकारची दुःखं, नातेवाईकांकडून होणारे अपमान, याचे कारण म्हातारपण हे नाही. माणसाचा स्वभाव हेच त्याचं कारण. माणसाचं मन व्यवस्थित असेल, स्वभाव शांत असेल, तर म्हातारपण सुसह्य होईल. पण ज्याचा असा स्वभाव नाही त्याला तारुण्यही वार्धक्यासारखेच त्रासदायक होणार.

सिफालस यांच्या बोलण्याचं मला फार कौतुक वाटलं. त्यांनी पुढं बोलावं म्हणून मी म्हटलं, "सिफालस मला वाटतं, लोकांना तुमची मतं पटत नाहीत, कारण तुमच्या सुस्वभावीपणामुळे नव्हे तर श्रीमंतीमुळे तुम्ही म्हातारपण सहन करू शकता !" श्रीमंतांना सारी सुखे अनुकूल असतात, हे मत प्रसिद्धच आहे.

**सिफालस** : ठीक आहे ! काही प्रमाणात लोकांचं म्हणणं खरं आहे त्यामुळे त्यांना माझं पटणार नाही. पण ते समजतात तितकं त्या लोकांचं खरं नाही. सेरिफियनने थेमिस्टोक्लसला कुचेष्टापूर्वक म्हटले, "तुझा बोलबाला तुझ्या सद्गुणांवर आधारलेला नाही, तर देशाच्या कीर्तीवर अवलंबून आहे." त्यावर तो म्हणाला, "मी सेरिफस देशाचा नागरिक असतो, तर इतका मोठा झालो नसतो. पण तू अर्थिनिअन असतास तरी मोठा झाला नसतास !" थेमिस्टोक्लसच्या उत्तरात खूपच सत्यांश आहे. जे श्रीमंत नाहीत पण असमाधानी आहेत, त्या वृद्धाबाबत असं म्हणता येईल की, जसा सज्जन-दरिद्री म्हातारपणी सुखी असणार नाही तसा दुर्जन-श्रीमंत कधीच सुखी होणार नाही."

**सॉक्रेटिस** : पण सिफालस, ही तुमची मिळकत वडिलार्जित आहे की स्वकष्टार्जित आहे ?

**सिफालस** : सॉक्रेटिस, मी स्वतः काय मिळवलं ? असंच तुम्हाला विचारायचं आहे ना ? पैसा मिळवण्यात मी आजोबा व वडील यांच्यामध्ये आहे. मला आजोबांचं नाव ठेवण्यात आलं. त्यांना माझ्याइतकीच वडिलार्जित इस्टेट मिळाली. पण ती त्यांनी खूप वाढवली. लिसेनिअस या माझ्या वडिलांनी मात्र त्यापैकी बरीच घालवली. माझ्याबद्दल इतकंच म्हणेन की, वडिलार्जित इस्टेटीपेक्षा थोडी जास्त संपत्ती माझ्या मुलांना मी राखू शकलो तर त्यात मला समाधान आहे.

**सॉक्रेटिस** : मी तुम्हाला हे विचारलं, त्याचं कारण तुम्हाला द्रव्यलोभ दिसत नाही. वडिलार्जित इस्टेट ज्यांना मिळाली, त्यांच्या बाबतीत असं दिसतं. पण ज्यांची इस्टेट स्वकष्टार्जित आहे, त्यांना मात्र तिच्याविषयी फार आसक्ती असते. कवीचे कवितेवर प्रेम असते. पित्याचे पुत्रावर प्रेम असते. त्याचप्रमाणे स्वसंपादित म्हणून या लोकांचे पैशावर प्रेम असते. केवळ उपयुक्ततेच्या भूमिकेतून ते संपत्तीकडे पहात नाहीत (अर्थात इतरांनाही उपयोगी पडतो म्हणून पैसा प्रिय असतोच). त्यांची सारी स्तुती फक्त संपत्तीविषयकच असते. अशा लक्ष्मीप्रिय लोकांची संगत अर्थातच इतरांना नकोशी होते.

**सिफालस** : तुमचं म्हणणं खरं आहे.

**सॉक्रेटिस** : ठीक ! आता तुम्हाला आणखी एक प्रश्न विचारण्याची अनुज्ञा असावी. श्रीमंतीचा सर्वांत मोठा फायदा कोणता ?

**सिफालस** : माझे मत फारच थोडयांना पटेल. माणसाचे मरण जवळ आले की पूर्वी ज्या गोष्टीपासून त्याला त्रास झाला नाही, तो होऊ लागतो. भीती आणि चिंता जाणवू लागते. 'पृथ्वीवर केलेल्या पापांना स्वर्गात शिक्षा होते' या मताची तो पूर्वी कुचेष्टा करीत असेल. पण आता ते मत त्याला खरे वाटू लागते. भीतीने तो संत्रस्त होतो. म्हातारपणातील दुर्बलता

किंवा अंतकालाची जाणीव, यांमुळे गूढ गोष्टींबद्दल त्याची दृष्टी सूक्ष्म होते. संशय आणि भय यांनी त्याचे मन ग्रासले जाते. आपण कोणाचे अहित तर केले नाही ना ? हा प्रश्न त्याला भेडसावू लागतो. आपण खूप दुष्कृत्ये केली आहेत, असे जर त्याला समजले तर त्याची भीतीने गाळण उडते. लहान मुलासारखा तो झोपेतून घाबरून उठतो. भवितव्याची भेसूर चित्रे त्याच्या मनापुढे उठत राहतात. आपण एकही दुष्कृत्य केले नाही, अशी त्याच्या मनाची जर खात्री झाली, तर पिंडारच्या शब्दांत म्हणता येईल की, वृद्धापकाळात सांभाळ करणारी दयाळू दाई आशा त्याला आनंद देते. सॉक्रेटिस, न्यायी व सदाचारी माणसाच्या आयुष्याचे पिंडार कवीने फार सुरेख चित्र रेखाटले आहे. तो म्हणतो, " मर्त्य लोकांच्यां लहरी वासनांना प्रतिबंध करणारी आशा, न्यायी व सद्‌गुणी माणसाची वार्धक्यात प्रेमळ सहचारिणी असते. तीच त्याचा सांभाळ करते, उत्साह देते." पिंडारचे मत फारच अर्थपूर्ण आहे. म्हणून मला वाटतं की, श्रीमंती सर्वांना महत्त्वाची नसली तर सत्प्रवृत्त माणसाला आवश्यक असते. अज्ञानाने झालेली लबाडी किंवा बोललेले असत्य यांपासून ती त्याचे संरक्षण करते. जवळच्या पैशाने तो देवाचे नवस पूर्ण करू शकतो, उसने घेतलेले पैसे परत करू शकतो. त्यामुळे मरणाविषयी तो निर्भय होतो. सुखाने तो परलोकाची वाटचाल करू शकतो. श्रीमंतीचे इतरही अनेक उपयोग असतील. परंतु देवाचे देणे आणि मानवाचे देणे परत करून समाधान मिळवणे, हाच शहाण्या व धोरणी माणसाच्या दृष्टीने संपत्तीचा खरा महत्त्वाचा उपयोग होय.

**सॉक्रेटिस** : सिफालस, तुम्ही फारच छान सांगितलेत. पण तुम्ही न्याय व सद्‌गुण यांबद्दल काही म्हणालात, त्याचा काय अर्थ आहे ? सत्य भाषण आणि ऋणांची परतफेड एवढाच ' न्याय ' या संज्ञेचा अर्थ आहे का ? अशा प्रकारच्या काही कृती कधी न्याय्य असतात तर कधी अन्याय्य असतात, खरे ना ? उदाहरणार्थ, एखाद्यानं जवळची हत्यारे मित्राजवळ ठेवावयास दिली, तेव्हा तो शुद्धीत व शहाणा होता. पण जेव्हा ती त्याने परत मागितली तेव्हा जर तो बेशुद्धीत वा वेडाच्या भरात असला, तर ती हत्यारे परत करणे न्याय्य होणार नाही. शिवाय अशा माणसाला ' सत्य ' सांगणे हेही न्याय्य होणार नाही, हे कोणीही कबूल करेल.

**सिफालस** : तुमचे मत ठीक दिसते.

**सॉक्रेटिस** : मग सत्य भाषण व ऋणमुक्ती अशी न्यायाची मर्यादित व्याख्या युक्त होणार नाही.

**पोलेमार्कस** : सॉक्रेटिस, सायमॉनिड्सचे म्हणणे खरे असेल तर अशीच व्याख्या स्वीकारली पाहिजे.

**सिफालस** : बराय ! आता पुढचा संवाद तुम्ही करा. माझी यज्ञाची वेळ झाली.

**सॉक्रेटिस** : पोलेमार्कस हा या वादविवादातला तुमचा वारस ना ?

[सिफालस हसून म्हणाले, " अर्थातच ! " नंतर ते यज्ञासाठी निघून गेले.]

□ □

## प्रकरण दोन

# न्याय म्हणजे मित्रांना मदत करणे आणि शत्रूंचा सूड घेणे

**[I-331-E—336-A]**

**कथासूत्र :**

[सिफालस निघून गेल्यानंतर त्याचा मुलगा पोलेमार्क्स सॉक्रेटिसबरोबर न्यायाविषयी चर्चा सुरू करतो. 'प्रत्येकाला आपण जे त्याचे देणे लागतो ते देऊन टाकणे म्हणजे न्याय,' किंवा 'न्याय म्हणजे इतरांना मदत आणि शत्रूंचा सूड'; अशा तऱ्हेच्या न्यायाविषयीच्या व्याख्या तो मांडतो आणि आपल्या बौद्धिक मीमांसेने सॉक्रेटिस चर्चेतून त्या व्याख्या अपुऱ्या कशा आहेत ते उघड करून सांगतो. मानवी जीवनातील सर्व नैतिक संदर्भास पुरेशी पडेल अशी न्यायाची सम्यक् व्याख्या तयार करणे हे सॉक्रेटिसच्या तत्त्वचिंतनाचे ध्येय आहे.

बायबल किंवा गीता यांसारखा प्रमाण असा नीतिशास्त्रीय किंवा धर्मशास्त्रीय ग्रंथ प्राचीन ग्रीक लोकांना उपलब्ध नसल्याने, या संदर्भातील प्रश्नांचा विचार करताना होमर, हिसियडसारख्या कवींचा दृष्टिकोन, भूमिका यांचा आधार लोक घेत असत. सॉक्रेटिसने आपल्या निर्भय स्वतंत्र प्रज्ञेने त्यामधील उणिवा स्पष्ट केल्या आहेत. नैतिक जीवनाची तुलना वैद्यक, नौकानयन यांसारख्या व्यवहारोपयोगी कलांशी करून नीतिमान आयुष्य ही एक 'जीवनकला' आहे, असे सॉक्रेटिस वारंवार दाखवून देतो. आणि नैतिक सद्‌गुणांचे ज्ञान, नैतिक जीवनाचे साध्य आणि साधन यांविषयी तो मीमांसा करतो. न्याय हे या नैतिक जीवनाचे परममूल्य आहे. केवळ साधनमूल्य नाही, ही भूमिका घेऊन प्लेटोने सॉक्रेटिसच्या मुखातून व्यक्ती आणि समाज यांच्या परमकल्याणाचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या दृष्टीतून पोलेमार्क्सची न्यायाची कल्पना अपुरी व एकांगी असल्याचे त्याने या प्रकरणात दाखवून दिले आहे. सिफालस आणि पोलेमार्क्स यांच्या भूमिका सर्वसामान्य माणसाच्या मनोवृत्तीचे प्रतीक असल्याने त्या मनोवृत्तीवरच ही टीका आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** पोलेमार्क्स, आपल्या चर्चेचे उत्तरदायित्व आता तुझ्याकडे आहे. त्यामुळे तुला या वादात भाग घेण्याचा हक्कच आहे. तेव्हा सायमॉनिडसने युक्त वर्तन किंवा न्याय याची कोणती व्याख्या केली आहे, ती सांग पाहू.

**पोलेमार्कस** : " ज्याला आपण काही देणे लागतो, ते त्याचे त्याला देऊन टाकणे म्हणजे न्याय होय." माझ्या कल्पनेप्रमाणे, सायमॉनिडसची ही व्याख्या योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : सायमॉनिडस हा ज्ञानवृद्ध आणि प्रतिभासंपन्न आहे. साहजिकच त्याने या संदर्भात जे म्हटले आहे, त्यावर विश्वास न ठेवणे अवघड आहे. पण तो जे म्हणतो ते तुला समजले असले तरी मला समजले नाही. एका व्यक्तीने दुसऱ्याकडे विश्वासाने वस्तू ठेवावयास दिली. दरम्यान तिला वेड लागले. वेडाच्या भरात तिने ती परत मागितली. तर ती तिला परत करावी असे सायमॉनिडसला म्हणायचे नाही. आणि मलाही अजून असे वाटते की, ठेवीवर मालकीहक्क जो ठेव ठेवतो त्या व्यक्तीचाच असतो.

**पोलेमार्कस** : हे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : परंतु वस्तू परत मागणारी व्यक्ती ती परत मागताना शुद्धीवर नसेल तर तिला ती परत देणे कितपत बरोबर आहे ?

**पोलेमार्कस** : साहजिकच ते बरोबर नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणून, ज्याचे जे देणे असेल ते त्याला देऊन टाकणे म्हणजे न्याय होय असे जेव्हा सायमॉनिडस म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ वेगळा असला पाहिजे.

**पोलेमार्कस** : अर्थातच ! तो म्हणतो की, दोन व्यक्ती जर मित्र असतील तर ते मैत्रीऋण त्यांनी परस्परांचे वाईट न करता चांगलेपणाने वागून फेडले पाहिजे.

**सॉक्रेटिस** : समजले ! दोन मित्रांपैकी एकाने दुसऱ्याजवळ पैसे ठेवावयास दिले. पैसे परत करणे किंवा घेणे यामुळे अपाय घडत असेल तर ज्याने पैसे ठेवले त्याला ते परत करणे न्याय्य होणार नाही. सायमॉनिडसला असेच म्हणावयाचे आहे ना ?

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : बरे ! आपल्या शत्रूंचे जे आपण देणे लागतो ते त्यांना दिले पाहिजे की नाही ?

**पोलेमार्कस** : अर्थातच. त्यांचे जे देणे असेल ते त्यांना दिले पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणे शत्रूंचे देणे म्हणजे त्यांना अपाय करणे होय. शत्रूसंबंधात अपायच योग्य असतो.

**सॉक्रेटिस** : न्याय म्हणजे काय हे सांगताना कवींची कूट पद्धतीच सायमॉनिडसने वापरली आहे असे या सगळ्यावरून दिसते. ज्याची जी योग्यता त्यानुसार त्याला देणे म्हणजे न्याय होय, अशी सायमॉनिडसची कल्पना दिसते. पण आपण जर त्याला विचारले की, वैद्यक-कलेमध्ये ' योग्य ' म्हणजे काय आणि ते कोणास द्यावयाचे ? या प्रश्नाला त्याच्याकडून काय उत्तर येईल ?

**पोलेमार्कस** : वैद्य शरीरावर इलाज करतो. त्यासाठी शरीराला आवश्यक असणाऱ्या वस्तू परवणे हे योग्य होय. (उदा. औषध, आहार, पेये, इ.)

**सॉक्रेटिस :** पाककलेमध्ये ' योग्य ' म्हणजे काय आणि ते कोणास द्यावयाचे ?

**पोलेमार्क्स :** तयार होणाऱ्या अन्नास मसाला पुरवणे हे योग्य होय.

**सॉक्रेटिस :** तर मग न्यायाच्या संदर्भात ' योग्य ' म्हणजे काय आणि ते कोणास द्यावयाचे ?

**पोलेमार्क्स :** मी जे पूर्वी म्हणालो, त्यानुसार मित्राला मदत आणि शत्रूला अपाय करणे योग्य होय.

**सॉक्रेटिस :** म्हणजे तुझ्या म्हणण्याप्रमाणे सायमॉनिडसच्या मते मित्रांच्या संदर्भात चांगुलपणा आणि शत्रूंना अपाय असा न्यायाचा अर्थ होतो.

**पोलेमार्क्स :** हो, मला तसे वाटते.

**सॉक्रेटिस :** आजारी असताना मित्रांना वाचविणारा आणि शत्रूंचा नाश करणारा तज्ज्ञ कोण ?

**पोलेमार्क्स :** डॉक्टर.

**सॉक्रेटिस :** जलप्रवास करताना धोक्याच्या वेळी मित्रांना मदत करणारा आणि शत्रूंचे निवारण करणारा कोण ?

**पोलेमार्क्स :** जहाजाचा कप्तान.

**सॉक्रेटिस :** ठीक. न्यायी मनुष्य आपल्या मित्रांना कुठे आणि कशी मदत करू शकतो ?

**पोलेमार्क्स :** युद्धामध्ये मित्रांच्या बाजूने शत्रूंशी युद्ध करून.

**सॉक्रेटिस :** ठीक. पोलेमार्क्स, ज्यांची प्रकृती चांगली आहे त्यांना डॉक्टरांची मदत आवश्यक नसते हे तुला कबूल असेल.

**पोलेमार्क्स :** हो.

**सॉक्रेटिस :** जे किनाऱ्यावर राहतात त्यांना कप्तानाची गरज नसते.

**पोलेमार्क्स :** हो.

**सॉक्रेटिस :** जे युद्ध करीत नाहीत त्यांना न्यायी मनुष्य निरुपयोगी असतो का ?

**पोलेमार्क्स :** छे ! तसे नाही.

**सॉक्रेटिस :** मग शांततेच्या काळातसुद्धा न्याय उपयुक्त असतो काय ?

**पोलेमार्क्स :** हो.

**सॉक्रेटिस :** मग शेती ही उपयुक्त आहे का ?

**पोलेमार्क्स :** हो.

**सॉक्रेटिस** : आणि चांभाराची कला ?

**पोलेमार्क्स** : अर्थातच !

**सॉक्रेटिस** : धान्य मिळविण्यास शेती आणि पादत्राणासाठी चांभाराची कला जशी उपयुक्त असते, त्याप्रमाणे शांततेच्या काळात न्यायाचा कोणता उपयोग होतो ?

**पोलेमार्क्स** : उद्योगधंद्यामध्ये.

**सॉक्रेटिस** : म्हणजे संयुक्त भागीदारीमध्ये ना ?

**पोलेमार्क्स** : हो.

**सॉक्रेटिस** : बुद्धिबळ खेळताना चांगला व उपयुक्त भागीदार कोण ? न्यायी मनुष्य की बुद्धिबळपटू ?

**पोलेमार्क्स** : अर्थातच बुद्धिबळपटू.

**सॉक्रेटिस** : बांधकामामध्ये गवंडी जास्त उपयुक्त की न्यायी मनुष्य ?

**पोलेमार्क्स** : न्यायी माणसाचा तिथे काही उपयोग नाही.

**सॉक्रेटिस** : संगीताच्या बाबतीत सारंगिया न्यायी माणसापेक्षा जास्त उपयुक्त भागीदार असतो, त्याप्रमाणे कोणत्या भागीदारीत न्यायी माणूस सारंगियापेक्षा अधिक श्रेष्ठ असतो ?

**पोलेमार्क्स** : पैशाच्या.

**सॉक्रेटिस** : ठीक. पण पोलेमार्क्स, पैसे खर्च करण्याच्या बाबतीत न्यायी माणसाचा उपयोग नसतो. उदा. घोडयाची खरेदी-विक्री करताना अश्वपरीक्षा करणाराच भागीदार उपयोगी पडेल असे मला वाटते.

**पोलेमार्क्स** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : जहाजाची खरेदी-विक्री करताना जहाज बांधणारा किंवा कप्तान चांगला भागीदार असेल.

**पोलेमार्क्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : हे जर तुला मान्य असेल तर सोने वा चांदी यांच्या संयुक्त उपयोगाची अशी कोणती वेळ असते की जेव्हा न्यायी माणूस इतरांपेक्षा अधिक उपयुक्त ठरतो ?

**पोलेमार्क्स** : पैसे जेव्हा विश्वासाने सुरक्षित ठेवावयाचे असतात तेव्हा.

**सॉक्रेटिस** : म्हणजे पैसे खर्च न करता, फक्त ठेवावयाचे असतात तेव्हाच ना !

**पोलेमार्क्स** : हो, त्याच वेळी.

**सॉक्रेटिस** : म्हणजे, याचा अर्थ जेव्हा पैशाचा प्रत्यक्ष उपयोग नसतो तेव्हा त्या बाबतीत न्यायी माणूस उपयोगी असतो.

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : म्हणजे, कोयता केवळ सुरक्षित ठेवण्याकरिता न्यायीपणाचा उपयोग ! पण प्रत्यक्ष उपयोग करताना न्यायापेक्षा द्राक्षाचे खुडण्याचे कौशल्यच अधिक उपयोगी.

**पोलेमार्कस** : उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणजे, ढाल, वीणा यांचा उपयोग न करता त्यांना फक्त ठेवून द्यावयाचे असेल तेव्हा न्यायीपणाचा उपयोग आणि जेव्हा त्यांना वापरावयाचे असेल तेव्हा युद्धकला किंवा संगीतकला याच अधिक उपयोगी, असंच ना ?

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : मग इतर सर्व बाबतीतही तसेच म्हणता येईल. जेव्हा वस्तूंचा उपयोग असतो तेव्हा न्याय निरुपयोगी असतो आणि जेव्हा वस्तू निरुपयोगी असतात तेव्हा न्याय उपयुक्त असतो.

**पोलेमार्कस** : हो, हे सिद्ध होते.

**सॉक्रेटिस** : तर मग जर न्यायाचा उपयोग फक्त निरुपयोगी वस्तूंच्या बाबतीत होणार असेल तर त्याला विशेष महत्त्व नाही. अर्थात आपली चर्चा आपण पुढे चालू ठेवू. कुस्तीमध्ये जी व्यक्ती प्रतिस्पर्ध्याला ठोसे देण्यात निष्णात असते ती ठोसे टाळण्यातही असते, खरे ना ?

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : जी व्यक्ती रोगाचा प्रतिकार करण्यात किंवा तो टाळण्यात निष्णात असते, ती दुसऱ्यात रोग उत्पन्न करण्यातही निष्णात असते, खरे ना ?

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : ज्याला शत्रूवर एकदम चढाई करता येते तिला आपल्या सैन्याचे चांगले संरक्षणही करता येते.

**पोलेमार्कस** : निःसंशय.

**सॉक्रेटिस** : जो चोरी चांगली करू शकतो तो पैशाचे चांगले संरक्षणही करू शकतो, खरे ना ?

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : म्हणजे, न्यायी माणूस पैशाचे संरक्षण करण्यात जर निष्णात असेल तर त्याची चोरी करण्यातही तो निष्णात असणार !

**पोलेमार्कस** : असा निष्कर्ष निघतो खरा !

**सॉक्रेटिस :** म्हणजे, न्यायी मनुष्य एक प्रकारे चोरच असतो असे सिद्ध होते. ही विचारसरणी तुम्ही होमरकडून शिकला असाल. होमरला ओडिसिअसच्या आईचे वडील ऑटोलिक्स यांच्याविषयी आदर होता. त्यांच्या बाबतीत होमर म्हणतो, 'ऑटोलिक्सने चोरी करणे आणि खोटे बोलणे या बाबतीत सर्वांवर मात केली आहे.' होमर, सायमॉनिडस आणि तू यांच्या मते न्याय म्हणजे चोरी करण्याची कला होय. मित्रांना मदत करणे आणि शत्रूंना अपाय करणे हा तिचा उपयोग होय, खरे ना ?

**पोलेमार्क्स :** छे, तसे मुळीच नाही. पण माझ्या बोलण्याचा मलाच अर्थ कळेनासा झाला आहे. तरीही मित्रांना मदत आणि शत्रूंना अपाय हा न्याय होय असे मला वाटते.

**सॉक्रेटिस :** तथापि, अस्सल प्रामाणिक आणि दिखाऊ प्रामाणिक यांपैकी कोणत्या माणसाला तू खरा मित्र ठरवशील ? शत्रूचीही व्याख्या अशीच करता येईल ना ?

**पोलेमार्क्स :** प्रामाणिक वाटणाऱ्या लोकांवर माणसाने प्रेम करावे आणि दुष्ट वाटणाऱ्या लोकांचा द्वेष करावा असे मला वाटते.

**सॉक्रेटिस :** परंतु या संदर्भात चूक होण्याची शक्यता नाही का ? जे खरे प्रामाणिक नाहीत ते प्रामाणिक वाटतात आणि जे खरे दुष्ट नाहीत ते दुष्ट वाटतात, खरे ना ?

**पोलेमार्क्स :** हो.

**सॉक्रेटिस :** अशा वेळी सज्जनांना शत्रू आणि दुष्टांना मित्र समजले जाणार नाही का ?

**पोलेमार्क्स :** हो.

**सॉक्रेटिस :** मग त्यावेळी दुष्टाना मदत आणि सज्जनांना अपाय म्हणजे न्याय ठरेल.

**पोलेमार्क्स :** हो, तसे बाह्यतः वाटते.

**सॉक्रेटिस :** सज्जन न्यायाने वागतात. अन्याय त्यांच्या स्वभावात बसत नाही.

**पोलेमार्क्स :** हो.

**सॉक्रेटिस :** मग तुझ्या मतानुसार अन्याय न करणाऱ्यांना अपाय करणे हा न्याय ठरेल.

**पोलेमार्क्स :** परमेश्वर करो आणि तसे न घडो ! ही विचारसरणी चांगली नव्हे.

**सॉक्रेटिस :** मग, अन्यायी लोकांना अपाय आणि न्यायी लोकांना मदत म्हणजे न्याय म्हणता येईल.

**पोलेमार्क्स :** पहिल्या मतापेक्षा हे ठीक वाटते.

**सॉक्रेटिस :** परंतु पोलेमार्क्स अशा अनेक उदाहरणांत, शत्रू व मित्र चुकीने ठरवले जाऊन, खरे मित्र शत्रू मानले जातील आणि मित्रांना अपाय करणे न्यायाचे ठरेल. तसेच शत्रूला चुकीने सज्जन मानले जाऊन त्यांना मदत केली जाईल. त्यामुळे सायमॉनिडसच्या म्हणण्याच्या आपण केलेल्या अर्थाच्या विरोधी आपले म्हणणे घडेल.

**पोलेमार्कस** : तसे घडणे अगदी शक्य आहे. पण 'शत्रू' आणि 'मित्र' यांच्या आपल्या व्याख्याच कदाचित चुकल्या असाव्यात. तेव्हा त्या बदलल्या पाहिजेत.

**सॉक्रेटिस** : पोलेमार्कस, तुझी व्याख्या काय होती ?

**पोलेमार्कस** : जो प्रामाणिक दिसतो तो मित्र होय.

**सॉक्रेटिस** : आता नवी व्याख्या काय ?

**पोलेमार्कस** : जो प्रामाणिक दिसतो आणि खरोखरच तसा असतो, तो मित्र होय. जो खरा प्रामाणिक नाही पण तसा वाटतो तो दिखाऊ मित्र होय. शत्रूबद्दलही असे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : या व्याख्येनुसार, सज्जन हा मित्र असेल व दुर्जन हा शत्रू ठरेल.

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : तर, शत्रूंना अपाय आणि मित्रांना मदत ही व्याख्या योग्य होणार नाही. सज्जन मित्राला मदत आणि वाईट शत्रूला अपाय म्हणजे न्याय अशी सुधारणा करावी लागेल.

**पोलेमार्कस** : तशी व्याख्या बरोबर ठरेल.

**सॉक्रेटिस** : न्यायी माणसाने अपाय केलाच पाहिजे का ?

**पोलेमार्कस** : अर्थात. दुष्ट शत्रूंना अपाय करायलाच हवा.

**सॉक्रेटिस** : समजा, घोड्यांना दुखवले तर त्यांच्यात सुधारणा होते की ते बिघडतात ?

**पोलेमार्कस** : बिघडतात.

**सॉक्रेटिस** : घोडे म्हणून ते वाईट बनतात की कुत्रे म्हणून ?

**पोलेमार्कस** : घोडे म्हणून.

**सॉक्रेटिस** : आणि कुत्र्यांना दुखवले तर घोड्यांच्या नव्हे तर कुत्र्यांच्या गुणांच्या बाबतीत ते बिघडतात, खरे ना ?

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : पण घोडा किंवा कुत्रा यांना दुखवणे म्हणजे त्यांची पूर्णता कमी करणे नव्हे का ?

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस** : त्याच भूमिकेनुसार, माणसाला दुखवणे, अपाय करणे म्हणजे त्यांना बिघडविणे किंवा मानवी श्रेष्ठतेपासून खाली ओढणे नव्हे का ?

**पोलेमार्कस** : हो.

**सॉक्रेटिस :** न्याय हा एक माणसाचा श्रेष्ठ सद्‌गुण नव्हे का ?

**पोलेमार्क्स :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** मग ज्यांना आपण अपाय करणार, त्यांना कमी न्यायी बनवणार नाही का ?

**पोलेमार्क्स :** असे वाटते खरे.

**सॉक्रेटिस :** संगीततज्ज्ञ आपल्या कलेने लोकांना अरसिक कसा बनवेल ?

**पोलेमार्क्स :** अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस :** अश्वविद्यापटू आपल्या कलेने इतरांना हिणकस घोडेस्वार कसा बनवेल ?

**पोलेमार्क्स :** अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस :** न्यायी माणूस न्याय्य वागताना इतरांना अन्यायी कसा बनवेल ? सारांश, सज्जनांचा सज्जनपणा इतरांना दुष्ट कसा बनवेल ?

**पोलेमार्क्स :** हो, ते अशक्यच.

**सॉक्रेटिस :** उष्णता थंडी कशी निर्माण करेल ?

**पोलेमार्क्स :** ते शक्य नाही.

**सॉक्रेटिस :** अवर्षणातून ओलावा कसा निर्माण होईल ?

**पोलेमार्क्स :** ते शक्य नाही.

**सॉक्रेटिस :** सज्जन व्यक्ती कोणालाही कसा अपाय करू शकेल ?

**पोलेमार्क्स :** ते शक्य नाही.

**सॉक्रेटिस :** न्यायाने वागणारा सज्जन असतो ना ?

**पोलेमार्क्स :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच पोलेमार्क्स, मित्रांना वा शत्रूंना अपाय करणे हा सज्जनाचा स्वभाव होणार नाही. तो अन्यायी माणसाचाच धर्म असणार.

**पोलेमार्क्स :** सॉक्रेटिस, तुमचे म्हणणे योग्य वाटते.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच, न्याय म्हणजे ज्याचे देणे त्याला देऊन टाकणे याचा अर्थ मित्रांना मदत आणि शत्रूंना अपाय, असा जर कुणी केला तर ते अज्ञानाचे लक्षण मानावे लागेल. कुणासही दुखवणे हे न्यायीपणाचे होणार नाही, हे आपण पूर्वीच सिद्ध केले आहे.

**पोलेमार्क्स :** तुमचा दृष्टिकोन मला मान्य आहे.

**सॉक्रेटिस :** तर मग सायमॉनिडस, बिॲस, पिटाकस इ. किंवा अन्य कुणी ज्ञानी, प्रसिद्ध माणसाचा तसा दृष्टिकोन आहे, असे जर कोणी म्हणाला तर त्याला तुमचा व माझा विरोध असणार ना ?

**पोलेमार्क्स :** बरोबर. तुमच्या बाजूने विरोधास माझी मान्यता आहे.

**सॉक्रेटिस :** मित्रांना मदत आणि शत्रूंना अपाय म्हणजे न्याय, या भूमिकेचा समर्थक मी कुणास मानतो, याची कल्पना आहे तुला ?

**पोलेमार्क्स :** कोण तो ?

**सॉक्रेटिस :** थीब्जचा इसमिनियस, पिरिआँडर, पेरिडिकस किंवा क्सरसिस वा स्वतःला श्रीमान, शक्तिमान समजणारा माणूस याचा समर्थक असावा, असे मला वाटते.

**पोलेमार्क्स :** तुमचे बोलणे युक्त आहे.

**सॉक्रेटिस :** ठीक. न्याय व अन्याय यांची व्याख्या आपण निकालात काढली आहे. आणखी कोणी एखादी सुचवणार आहे का ?

□ □

# प्रकरण तीन

# न्याय म्हणजे बलिष्ठांचे हित

**[I-336-B—347-E]**

**कथासूत्र :**

[पोलेमार्क्‌सचा चर्चेमध्ये पराभव झाल्यावर थ्रॅसिमॅक्‌स प्रवेश करतो. ही व्यक्ती तत्कालीन ' सोफिस्ट ' या शब्दच्छल, वादविवाद यात निष्णात असणाऱ्या तर्कपंडिताची प्रतिनिधी आहे. ' बळी तो कान पिळी ' या भूमिकेतून न्यायाची मीमांसा थ्रॅसिमॅक्‌स करतो. ' सत्ताधीशांचे स्वार्थसाधन ' नैतिक दृष्ट्या युक्त असल्याचा त्याचा अभिप्राय आहे. न्याय-अन्यायाचा विधिनिषेध त्याला मान्य नाही.

व्यक्ती आणि समाज यांच्या नैतिक स्थैर्यास व विकासास ही भूमिका घातक असल्याने सॉक्रेटिसने तिचा तपशीलवार समाचार घेतला आहे. तो घेत असताना खऱ्या तत्त्वचिंतकाचा निर्भय बुद्धिवाद, अनाग्रही सौजन्य, त्याने प्रगट केले आहे. स्वहिताचे कायदे करताना बलिष्ठ सत्ताधीशही चुकणे शक्य आहे असे तो दाखवून देतो. वैद्यक, नौकानयन यांसारख्या व्यवहारोपयोगी कलांचे ध्येय व श्रेष्ठत्व रोगी बरे करण्यात, खलाशांचे प्राण वाचविण्यात असते असे तो दाखवतो. त्यानुसार राज्य शासनाच्या कलेचेही ध्येय व श्रेष्ठत्व प्रजाजनांच्या कल्याणात अंतर्भूत असते हे तो सिद्ध करतो. मेंढ्यांची कत्तल करून स्वहित साधणे, हे मेंढपाळाचे मेंढपाळ म्हणून खरे ध्येय नसते. तसेच बलिष्ठांचे स्वार्थसाधन म्हणजे न्याय ठरत नाही. पैसा, प्रतिष्ठा, लोकप्रियता इत्यादी गोष्टींची प्राप्ती राज्यकर्त्यांना झाली तरी ते शासनकलेचे दुय्यम किंवा उपफायदे होत. ती साधनमूल्ये आहेत. शासनकला व्यक्ती व समाज यांच्या नैतिक जीवनास आधारभूत असते. म्हणून शासनाचे किंवा नीतीचे परमसाध्य व्यक्तिगत स्वार्थसाधन हे नाही तर प्रजेचे कल्याण हे आहे असे सॉक्रेटिस दाखवून देतो. कायदा, प्रशासन आणि नीती यांच्या परस्पर संबंधाविषयीची उत्कृष्ट मीमांसा प्लेटोने या प्रकरणात केली आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** आमची चर्चा चालू असताना, थ्रॅसिमॅक्‌स ती थांबविण्याच्या विचारात होता. काही आक्षेप त्याला उपस्थित करायचे होते. पण ज्यांना चर्चा अखेरपर्यंत ऐकावयाची होती, ते थ्रॅसिमॅक्‌सला दरवेळी थांबवीत होते. मी शेवटचे वाक्य बोललो आणि थोडा वेळ गप्प बसलो. थ्रॅसिमॅक्‌सला अगदी राहवेना. क्रूर श्वापदाप्रमाणे जणू आम्हाला फाडण्याच्या इराद्याने त्याने आम्हावर झडप घेतली. पोलेमार्क्‌स आणि मी दचकलो. दूरवर ऐकू जाईल इतक्या मोठ्या आवाजात तो ओरडला.

**थ्रॅसिमॅक्स** : सॉक्रेटिस, पोलेमार्क्स आणि तुम्ही इथे जमलेले सारे यांनी काय मूर्खपणाची बडबड चालविली होती ? सॉक्रेटिस, न्याय म्हणजे काय हे तुला समजून घ्यायचे असेल तर नुसते प्रश्न विचारीत बसू नको किंवा दुसऱ्यांची उत्तरे खोडून काढण्याचा देखावा करू नको. उत्तर देण्यापेक्षा प्रश्न विचारणे सोपे असते हे तुला माहीत आहे. तुझ्या मते न्याय म्हणजे काय त्याचे स्वरूप तू स्वतःच सांग. न्याय म्हणजे कर्तव्य, फायदा, आपत्तीकाळातील वर्तन असली काही व्याख्या करू नको. जी काही तुझी व्याख्या असेल ती स्पष्ट आणि थोडक्यात सांग. तुमची पूर्वीची मूर्ख बडबड मात्र मी ऐकून घेणार नाही.

**सॉक्रेटिस** : हे उद्गार ऐकून मी घाबरलो आणि आश्चर्याने इतरांकडे पाहू लागलो. तो मला पहात होता. जर त्यापूर्वी मी त्याला पाहिले नसते तर माझी दातखिळीच बसली असती ! आमची चर्चा चालू असताना, त्याचा वाढणारा राग मी पाहिला होता. त्यामुळे त्याला प्रत्युत्तर देणे मला जमले. कापऱ्या आवाजात मी म्हटले, " थ्रॅसिमॅक्स, असा आमच्यावर रागावू नको. आमच्या चर्चेमध्ये, आमची चिकित्सा सुरू असताना मी आणि पोलेमार्क्स यांचे काही चुकले असेल, पण खात्रीने आम्ही त्या चुका मुद्दाम केलेल्या नाहीत. सोने शोधतानासुद्धा चुकांकडे दुर्लक्ष करून ते शोधण्याची संधी आम्ही वाया घालविणार नाही. मग त्याहून अधिक मूल्यवान असा जो न्याय, त्याबद्दल बोलताना, त्याची व्याख्या निश्चित करण्यासाठी धडपड केल्याशिवाय आम्ही गप्प बसू असे तुम्हांस कसे वाटते ? तू आमचा मित्र आहेस म्हणून व्यक्तिशः तुझे काहीही मत असले तरी चर्चेचा विषय अवघड आहे असे मला वाटते. म्हणून तुझ्यासारख्या बुद्धिमान व्यक्तींनी न रागावता आमच्याबद्दल सहानुभूती ठेवणे हे योग्य आहे." [माझे हे बोलणे ऐकून तो तिरस्कारयुक्त हसला आणि म्हणाला]

**थ्रॅसिमॅक्स** : वाः रे ! शाबास ! ! सॉक्रेटिसच्या ढोंगी नम्रपणाचे हे आणखी एक प्रतीक. कोणी प्रश्न विचारला तर उत्तराची टाळाटाळ करणे आणि अज्ञान पांघरणे या गोष्टी तू करशील हे मला माहीतच होते. त्याची कल्पना मी इतरांना अगोदरच दिली होती.

**सॉक्रेटिस** : थ्रॅसिमॅक्स महाराज, आपण खरे ज्ञानी आहात ! समजा एखाद्याला बारा या संख्येचे किती भाग पडतात असे विचारले, शिवाय त्याला जाणीव दिली की बारा म्हणजे सहाच्या दुप्पट, चाराच्या तिप्पट, दोहोच्या सहापट वा तिनाच्या चौपट, असे मूर्खपणाचे उत्तर देऊ नकोस तर तो माणूस अर्थातच काही बोलणार नाही, हे तुम्हाला माहीत आहेच. पण जर तो तुला म्हणाला की, थ्रॅसिमॅक्स की तुम्ही जी उत्तरे टाकावू मानली त्यांपैकी एखादे खरे असले तर ते सुद्धा मी देऊ नये असे तुम्ही का म्हणता ? तुमचे बोलणेच मला समजत नाही. मग मी खोटे बोलावे असे का तुम्हांस वाटते ? थ्रॅसिमॅक्स महाराज, तुम्ही अशा वेळी काय म्हणाल ?

**थ्रॅसिमॅक्स** : वा, वा ! म्हणजे या दोन्ही गोष्टी सारख्याच का ?

**सॉक्रेटिस** : त्या सारख्याच असोत वा नसोत, पण खरे आणि बरोबर उत्तर देण्यास तुम्ही हो किंवा नाही म्हटले तरी ते उत्तर देण्यापासून तो माणूस परावृत्त कसा काय होईल ?

**थ्रॅसिमॅक्स** : जी उत्तरे मी नको म्हटली आहेत, त्यापैकीच तुम्ही एखादे देणार आहात काय ?

**सॉक्रेटिस** : मला एखादे उत्तर विचारपूर्वक योग्य वाटले तर मी निश्चितच देईन.

**थ्रॅसिमॅक्स** : पण त्याहून वेगळे आणि चांगले उत्तर जर मी दिले तर तू कोणती शिक्षा भोगण्यास तयार होशील ?

**सॉक्रेटिस** : शहाण्या माणसाकडून शिकणे हीच अडाणी माणसाला मिळणारी योग्य शिक्षा होय. अशी शिक्षा, मी आणि इतर तुझ्याकडून भोगण्यास तयार आहोत.

**थ्रॅसिमॅक्स** : सॉक्रेटिस, तुम्ही एक अजब माणूस आहात. मी जर तुम्हाला शिकविले तर त्याबद्दल तुम्ही मला मोबदला दिला पाहिजे.

**सॉक्रेटिस** : असले पैसे तर देईन.

**ग्लॅकॉन** : थ्रॅसिमॅक्स, पैशाची काळजी नको. चर्चा पुढे चालू राहू दे. आम्ही सॉक्रेटिसकरिता पैसे देण्यास तयार आहोत.

**थ्रॅसिमॅक्स** : तुम्ही तर द्यालच ! आपण काही उत्तर देऊ नये, दुसऱ्यांनी दिलेले उत्तर मात्र खोडावे, ही सॉक्रेटिसची नेहमीचीच तऱ्हा आहे. तसेच तुम्हाला यावेळीही वाटत असणार !

**सॉक्रेटिस** : "मित्रा ! जो स्वतः अडाणी आहे असे स्वतःच कबूल करतो त्याला काय उत्तर देता येईल ? याशिवाय एखाद्या शहाण्या माणसाने त्याला बोलण्यास बंदी केली तर त्यास आपले विचार कसे सांगता येतील ? स्वतःजवळ काही सांगण्यासारखे आहे असे जर तुला वाटते तर तूच बोलण्यास सुरवात करणे योग्य नव्हे का ? तेव्हा तू काही बोलून मी, ग्लॅकॉन आणि इतर यांच्या ज्ञानात भर घाल आणि आमचे समाधान कर."

मी एवढे म्हटले, ग्लॅकॉन आणि इतरांनीपण त्याला बोलण्यास सांगितले. स्वतःच्या ज्ञानाने आपण फड मारणार याची थ्रॅसिमॅक्सला खात्री होती. बोलण्यास अधीर असूनसुद्धा मी अगोदर बोलावे असे तो खोटेच भासवीत होता. अखेर त्याला वाचा फुटली. तो म्हणाला,

**थ्रॅसिमॅक्स** : पहा सॉक्रेटिसचे शहाणपण ! स्वतः ज्ञानदान तर करावयाचे नाहीच, पण इतरांकडून शिकून साधी कृतज्ञताही व्यक्त करायची नाही.

**सॉक्रेटिस** : थ्रॅसिमॅक्स, इतरांकडून मी ज्ञानग्रहण करतो हे खरे असले तरी मी कृतज्ञ नाही हे तुमचे मत चुकीचे आहे. मी गरीब माणूस ! मी फार तर स्तुती करू शकेन. तू उत्तर तरी दे. एखादा चांगला बोलला तर मी त्याची कशी स्तुती करतो हे तुला समजून येईलच. तुझे भाषण चांगले असेल अशी मला अपेक्षा आहे.

**थ्रॅसिमॅक्स** : ऐका ! ' बलिष्ठाचे हित म्हणजे न्याय होय ' ऐकलेत ? मग माझी स्तुती करण्यास तुम्ही नाखूष का ?

**सॉक्रेटिस** : तसे नव्हे, तू काय म्हणालास तेच आम्हाला समजले नाही. ' बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय ' या वाक्याचा अर्थ काय ? पॉलिडॅमस हा पैलवान आहे. आपले बळ वाढविण्यासाठी गोमांस खाणे त्याच्या दृष्टीने ठीक आहे. पण आमच्यासारख्या दुबळ्या माणसांनी ते खाणे यात आमचे हित व न्याय आहे असे तुला वाटते का ?

**थ्रॅसिमॅक्स** : सॉक्रेटिस, माझे मत सहजपणे उडवून लावता येईल असा तू जो अर्थ केलास तो खोडसाळपणाचा आहे.

**सॉक्रेटिस** : छे ! छे ! तसे नव्हे. पण तू आपले विधान अधिक स्पष्ट केलेस तर बरे होईल.

**थ्रॅसिमॅक्स** : काही ठिकाणी हुकूमशाही असते, काही ठिकाणी लोकशाही असते तर काही ठिकाणी तज्ज्ञांचा कारभार असतो, हे तुला माहीत आहे ना ?

**सॉक्रेटिस** : अर्थात.

**थ्रॅसिमॅक्स** : प्रत्येक राजसत्तेमध्ये शासनाधिकाऱ्यातच सत्ता आणि शक्ती केंद्रित होते ना ?

**सॉक्रेटिस** : अर्थात.

**थ्रॅसिमॅक्स** : प्रत्येक शासन संस्था स्वतःच्या हिताला अनुकूल असेच कायदे करते. हुकूमशाहीमध्ये दडपशाहीला पूरक कायदे होतात, तर लोकशाहीमध्ये बहुमतानुसार कायदे होतात. हे सर्व कायदे करताना ' जे शासनास हितकारक ते प्रजेच्या दृष्टीने न्याय्य ' असे सत्ताधारी जाहीर करतात. जो हे तत्त्व मोडतो त्याला बेकायदेशीर वर्तनाबद्दल शिक्षा होते. म्हणून मला असे वाटते की, राजसत्तेचे जे हित त्यालाच सर्व राज्यपद्धतीत न्याय मानले जाते. सरकारचे सामर्थ्य आणि त्यानुसार हा विचार ठरलेला असतो म्हणूनच ' सर्वत्र बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय ' असे मानतात.

**सॉक्रेटिस** : समजले. तुझे म्हणणे योग्य की अयोग्य आता मी जरा समजून घेतो. थ्रॅसिमॅक्स, न्यायाच्या व्याख्येत हित हा शब्द तू वापरलास, मला मात्र तो वापरण्यास विरोध केलास. ' बलिष्ठांचे हित ' असे शब्द वापरून तू व्याख्येत भर घातलीस हे निःसंशय.

**थ्रॅसिमॅक्स** : मी घातलेली ही भर तुझ्या दृष्टीने अगदीच किरकोळ असेल ना !

**सॉक्रेटिस** : ती महत्त्वाची आहे की नाही ते आपण पाहू. पण तू मांडलेले तत्त्व खरे की खोटे ते अगोदर ठरवू. न्याय आणि हित परस्पर सुसंगत असतात. याविषयी आपले एकमत आहे. पण बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय या तुझ्या व्याख्येला माझा विरोध आहे. त्याच्याविषयी आपण थोडे अधिक बोलले पाहिजे.

**थ्रॅसिमॅक्स** : ठीक, पुढे ?

**सॉक्रेटिस** : प्रजेने राज्यकर्त्यांच्या आज्ञांचे पालन करणे म्हणजे न्याय ना ?

**थ्रॅसिमॅक्स** : होय.

**सॉक्रेटिस** : कोणत्याही शासनव्यवस्थेत राज्यकर्त्यांच्या हातून काही वेळा चुका होणे शक्य आहे की अशक्य आहे ?

**थ्रॅसिमॅक्स** : अर्थात, चुका शक्य आहेत.

**सॉक्रेटिस** : कायदे करण्याच्या कामात राज्यकर्त्यांकडून कधी बरोबर घडेल, कधी चूक घडेल, होय ना ?

**थ्रॅसिमॅक्स** : हो.

**सॉक्रेटिस** : राज्यकर्त्यांच्या हितास अनुकूल ते बरोबर आणि प्रतिकूल ते चूक, असेच ना.

**थ्रॅसिमॅक्स** : हो.

**सॉक्रेटिस** : राज्यकर्त्यांचे कायदे लोकांनी पाळणे म्हणजे न्याय, होय ना ?

**थ्रॅसिमॅक्स** : अर्थात.

**सॉक्रेटिस** : मग बलिष्ठांनी स्वहितानुसारच नव्हे तर त्याविरुद्धही कायदे करणे म्हणजे न्याय असे अनुमान निघते.

**थ्रॅसिमॅक्स** : मला समजले नाही.

**सॉक्रेटिस** : तुझ्याच बोलण्याचा मी अभिप्राय सांगितला. थोडे स्पष्टीकरण देतो. शासनाधिकारी प्रजेवर कायदे लादताना स्वहितास अनुकूल कोणते ते समजण्यात चुकतात आणि त्यांचे कायदे पाळणे प्रजेच्या दृष्टीने न्याय होय. हे तू पूर्वी मान्य केले नाहीस काय ?

**थ्रॅसिमॅक्स** : हो.

**सॉक्रेटिस** : मग तुझ्या म्हणण्याचा अर्थ असा होतो की, जेव्हा राज्यकर्ते नकळत स्वहितविरोधी कायदे करतात आणि त्यांच्या आज्ञा पाळणे प्रजेच्या दृष्टीने न्याय असतो; त्यावेळी बलिष्ठांच्या हिताविरुद्ध वागणे न्यायाचे ठरते. म्हणजेच थ्रॅसिमॅक्स, बलिष्ठ राज्यकर्त्यांच्या हिताविरुद्ध वागणे म्हणजे न्याय असे अपरिहार्यपणे सिद्ध होते.

**पोलेमार्क्स** : हो.

**सॉक्रेटिस** : तुझे म्हणणे स्पष्ट आहे.

**क्लिटोफोन :** तुम्ही सारे सॉक्रेटिसच्या बाजूचे असल्याने तुम्हांस त्याचेच म्हणणे खरे वाटणार.

**पोलेमार्कस :** आम्ही सॉक्रेटिसची बाजूच कशास घ्यावयास हवी ? स्वहितविरोधी कायदे सत्ताधारी करतात आणि अशा कायद्यांचे पालन हा प्रजेच्या दृष्टीने न्याय असतो असे थ्रॅसिमॅकसने स्वतःच म्हटले आहे.

**क्लिटोफोन :** पोलेमार्कस, थ्रॅसिमॅकसच्या म्हणण्याचा हा अर्थ नव्हे. राज्यकर्त्यांची आज्ञा पाळणे म्हणजे न्याय असे त्याला म्हणावयाचे आहे.

**पोलेमार्कस :** हो क्लिटोफोन, राज्यकर्त्यांची आज्ञा पाळणे म्हणजे न्याय आणि बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय असे दोन्ही दृष्टिकोन त्याने मांडले आहेत. शिवाय स्वहिताविरुद्ध वागण्यास राज्यकर्ते प्रजेला भाग पाडतात असेही त्याने म्हटले आहे. या सगळ्याचा अर्थ असा की न्याय म्हणजे बलिष्ठांचे हित आणि अहितही होय.

**क्लिटोफोन :** पण थ्रॅसिमॅकसच्या म्हणण्याचा अर्थ असा की, बलिष्ठांचे हित म्हणजे त्यांना स्वतःला जे वाटते ते आणि दुर्बळांनी ते पाळणे म्हणजे न्याय होय.

**पोलेमार्कस :** पण तसे तो म्हणाला नाही.

**सॉक्रेटिस :** पोलेमार्कस, ठीक आहे. थ्रॅसिमॅकसचे जर तसे मत असेल तर हरकत नाही. बलिष्ठांना प्रत्यक्षतः हिताचे असो वा नसो पण त्यांना जे वाटते ते हित, तोच न्याय ही व्याख्या थ्रॅसिमॅकसला मान्य आहे काय ?

**थ्रॅसिमॅकस :** मुळीच नाही. जो चुका करतो तो बलिष्ठ असतो असे कसे म्हणता येईल ?

**सॉक्रेटिस :** पण तू तसे म्हणतोस असे मला वाटते. राज्यकर्त्यांची स्खलनशीलता तू मान्य केली आहेस.

**थ्रॅसिमॅकस :** चर्चेमध्ये सॉक्रेटिस तू शब्दच्छलपटू आहेस. रोग्यावरील उपचारात चूक करणाऱ्या डॉक्टरला आपण खरा डॉक्टर कसे म्हणू ? हिशेब चुकणाऱ्यास चांगला हिशेब करणारा कसे म्हणता येईल ? वैद्य किंवा कारकून कामात चूक करतील पण खऱ्या धंदेवाईक दृष्टीने ते चुका करीत नाहीत. कारागीर चुकत नाही. अज्ञानामुळे चुका होतात. जेव्हा चूक घडते तेव्हा तो खरा कारागीर उरत नाही. म्हणूनच एखाद्या वैद्याने किंवा राज्यकर्त्याने चूक केली असे आपण सामान्यपणे म्हणू शकलो तरी खऱ्या तज्ज्ञांच्या दृष्टीने जेव्हा कारागीर, तत्त्वज्ञ वा राज्यकर्ता वागतो तेव्हा तो चुकत नाही. म्हणजेच जेव्हा राज्यकर्ता हा राज्यकर्ता असतो तेव्हा तो चुकत नाही, तो स्वहितानुसारच कायदे करतो आणि ते प्रजेने पाळणे आवश्यक असते. आणि या अर्थाने 'बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय' असे मी म्हणतो.

**सॉक्रेटिस :** वा थ्रॅसिमॅकस ! तरीही तूच मला शब्दच्छलपटू म्हणतोस काय ?

**थ्रॅसिमॅकस :** हो, अगदी पक्का.

**सॉक्रेटिस :** वादात तुमचा दोष उघड व्हावा म्हणून खोडसाळपणे मी काही विचारले असे तुला वाटते काय ?

**थ्रॅसिमॅकस :** खात्रीपूर्वक वाटते. पण त्याचा उपयोग नाही. बेसावधपणे पकडून, उघडपणे माझा चर्चेत पराभव करणे तुला जमणार नाही.

**सॉक्रेटिस :** मित्रा, तसे मी मुळीच करणार नाही. पण आपल्यात गैरसमज व्हावयास नकोत म्हणून मी विचारतो की, बलिष्ठ राज्यकर्त्यांच्या हिताचे पालन प्रजेने केले पाहिजे असे जेव्हा तू म्हणतोस त्यावेळी 'राज्यकर्ते आणि बलिष्ठ' हे शब्द तू सामान्य अर्थाने वापरतोस की, आता सांगितलेल्या अर्थाने वापरतोस ?

**थ्रॅसिमॅकस :** राज्यकर्ता हा शब्द मी खऱ्या अर्थाने वापरतो. खोडसाळपणा आणि शब्दच्छल यांचा वापर तू करू शकशील. मला तुझ्या दयेची तर जरुरी नाहीच पण तुझा प्रयत्नही फसणार !

**सॉक्रेटिस :** सिंहाची आयाळ पकडण्याचा मूर्खपणा मी कसा करेन ?

**थ्रॅसिमॅकस :** पूर्वी एकदा तू केलासच ! अर्थात नाइलाजाने तो सफल झाला नाही.

**सॉक्रेटिस :** आता थट्टा नको ! मला सांग. खऱ्या वैद्याचे काम काय ? पैसा मिळविणे की रोग्यांना बरे करणे ? तू खऱ्या वैद्याबद्दल बोलतो आहेस हं !

**थ्रॅसिमॅकस :** खरा वैद्य रोग्यांना बरे करतो.

**सॉक्रेटिस :** जहाजाचा कप्तान हा खलाशी असतो की खलाशांचा नेता असतो ?

**थ्रॅसिमॅकस :** खलाशांचा नेता असतो.

**सॉक्रेटिस :** मला वाटते, त्याचे जहाजावर असणे महत्त्वाचे नाही. त्याला खलाशी नाही म्हटले तरी बिघडत नाही. जहाजावर असण्यामुळे त्याला कोणी कप्तान म्हणत नाहीत. त्याच्याजवळचे कौशल्य आणि सत्ता यामुळेच त्याला कप्तान म्हणतात.

**थ्रॅसिमॅकस :** ठीक आहे.

**सॉक्रेटिस :** हे सर्वजण स्वतःचे असे काही ध्येय पूर्ण करीत नसतात काय ?

**थ्रॅसिमॅकस :** असतात.

**सॉक्रेटिस :** ती ध्येयपूर्ती हेच प्रत्येक कलेचे उद्दिष्ट नसते काय ?

**थ्रॅसिमॅकस :** असते.

**सॉक्रेटिस :** पूर्णावस्था गाठण्याशिवाय कलेला इतर काही ध्येय असते काय ?

**थ्रॅसिमॅकस :** म्हणजे काय ?

**सॉक्रेटिस** : शरीर ही एक स्वयंपूर्ण यंत्रणा असताना त्याला इतर काय हवे असते ? असे जर तू मला विचारलेस तर मी म्हणेन की त्याला बऱ्याच गरजा असतात. विकृतीपासून शरीराचे संरक्षण होण्यासाठी वैद्यककला निर्माण झाली, होय, ना ?

**थ्रॅसिमॅकस** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : डोळा, कान यांच्या विकृती दूर करण्यासाठी वैद्यककलेची आवश्यकता असते. त्या किंवा इतर कलेतील दोष दूर करण्यासाठी आणखी एखाद्या कलेची गरज असते काय ? दुसऱ्या कलेला तिसरीची याप्रमाणे अगणित कला असतात काय ? कलेला स्वतःचे हित सांभाळता येते काय ? एखाद्या कलेत दोष नसल्यामुळे किंवा स्वतःच्या क्षेत्रापलीकडे जाण्याची गरज नसल्यामुळे, दुसरीच्या मदतीने आपल्यातील उणिवा शोधण्याची गरज नसते, खरे ना ? नीट विचार करून उत्तर दे.

**थ्रॅसिमॅकस** : प्रत्येक कला स्वयंपूर्ण असल्याने तिला इतर कलांची गरज नसते.

**सॉक्रेटिस** : पण वैद्यककला स्वहितापेक्षा शरीराचे हित पाहते ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : अश्वविद्यासुद्धा स्वहितापेक्षा घोड्यांचे कल्याण पाहते. याचप्रमाणे इतर कलाही स्वहिताऐवजी त्यांच्या विषयाकडे पाहतात.

**थ्रॅसिमॅकस** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : प्रत्येक कला आपापल्या विषयांचे नियंत्रण करते हे थ्रॅसिमॅकस तुला मान्य असेल. [त्याने हे विधान नाखुषीने मान्य केले.] प्रत्येक शास्त्र आणि कला बलिष्ठांचे हित याबद्दल विचार करीत नाही किंवा त्यासंबंधी कायदे करीत नाही. जे त्यांचे विषय अशक्त, त्याबद्दल शास्त्र किंवा कला कायदे करतात.[याही विधानाला त्याने विरोध केला. पण शेवटी ते मान्य केले.] खऱ्या वैद्याला स्वहितापेक्षा रोग्यांचे आरोग्य महत्त्वाचे वाटते. कारण तो केवळ पैसे मिळवणारा नसतो तर शरीर सांभाळणारा असतो. तू हे पूर्वीच मान्य केले आहेस.

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : जहाजाचा कप्तानसुद्धा केवळ खलाशी नसून खलाशांचा नेता असतो.

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : मग हा कप्तान केवळ स्वहिताऐवजी इतर खलाशी वा अन्य लोक यांच्या कल्याणाचाच विचार करील. [पुन्हा नाखुषीने त्याने हे मान्य केले.]

तर मग थ्रॅसिमॅकस, खरे राज्यकर्ते स्वहिताचा विचार न करता किंवा स्वहितानुसार कायदे न करता प्रजेच्या हिताचा विचार करतात आणि प्रजेच्या हितानुसार कायदे करतात. लोककल्याणाच्या दृष्टीने जे योग्य असेल ते बोलतात आणि करतात. [आम्ही आमच्या चर्चेतून या भूमिकेपर्यंत पोहोचलो, आणि थ्रॅसिमॅकसला त्याने केलेली न्यायाची व्याख्या अप्रमाण ठरल्याचे दिसून आले तेव्हा तो सरळ उत्तर न देता म्हणाला,]

**थ्रॅसिमॅकस** : सॉक्रेटिस, तुमच्या घरी दाई आहे का ?

**सॉक्रेटिस** : असे विचारण्यापेक्षा तू मी विचारलेल्या प्रश्नाला सरळ उत्तर का देत नाहीस ?

**थ्रॅसिमॅकस** : त्याचे कारण, दाईच्या निष्काळजीपणामुळे जशी तुझी लाळ गळते, नाक अस्वच्छ राहते, त्याचप्रमाणे मेंढ्या आणि धनगर यांतील फरकही तुला समजत नाही.

**सॉक्रेटिस** : कशावरून ?

**थ्रॅसिमॅकस** : कारण तुझ्या मते जेव्हा धनगर वा गुराखी आपल्या मेंढ्यांची वा बैलांची काळजी घेतात आणि त्यांना लठ्ठ बनवितात त्यावेळी स्वहितापेक्षा किंवा धन्याच्या फायद्यापेक्षा त्यांना मेंढ्या व बैल यांचीच काळजी वाटते. तू असे समजतोस की, खरे राज्यकर्ते फक्त स्वतःच्या फायद्याचा विचार करीत नाहीत आणि प्रजेला मेंढराप्रमाणे समजत नाहीत. माझ्या मते, सॉक्रेटिस, न्याय आणि अन्याय, न्यायी आणि अन्यायी यांविषयी तुझी मते चुकीची आहेत. त्यामुळेच न्याय म्हणजे बलिष्ठांचे हित आणि अन्याय म्हणजे प्रजेचे अहित हे तुला समजत नाही. अर्थात, बलिष्ठ हे नेहमी प्रजेवर अन्यायच करतात असे नाही. अन्याय करणारा सरळ व न्यायी वृत्तीच्या लोकांवर हुकमत गाजवितो, पण त्याच्याकडे सत्ता असल्याने सर्व प्रजा त्याचेच कल्याण साधतात, स्वतःचे हित पूर्ण करू शकत नाहीत. सॉक्रेटिस, तू अगदी भोळा आहेस. मी तुला काही उदाहरणे देतो, त्यावरून हे सिद्ध होईल की, अन्यायी माणसापेक्षा न्यायी माणसाचा नेहमीच पराभव होत असतो. उदा. खाजगी व्यवहारात न्यायी व अन्यायी भागीदार असले आणि त्यांचा करार मोडण्याची वेळ आली तर अन्यायी माणसापेक्षा न्यायी माणसाला नेहमीच तोटा सहन करावा लागेल. जेव्हा या लोकांचा शासनाशी संबंध येईल त्यावेळी असे दिसेल की, न्यायी माणूस अन्यायी माणसापेक्षा जास्त प्राप्तीकर भरेल, शिवाय न्यायी माणसापेक्षा अन्यायी माणसालाच सरकारकडून अधिक प्राप्ती होईल. समजा, समान अधिकारावर ते दोघे आहेत तर असे दिसेल की, न्यायी माणसाचे जरी नुकसान झाले नाही तरी दुर्लक्ष केल्यामुळे त्याचा स्वतःचा कारभार अव्यवस्थित होतो. न्यायी माणसाची नीती सार्वजनिक पैशातून त्याला काही फायदा करू देत नाही. शिवाय त्याला आपल्या मित्रांचे किंवा ओळखीच्या लोकांचे कल्याणही साधता येत नाही. त्यामुळे त्यांचाही राग त्याला सहन करावा लागतो.

याउलट प्रकार अन्यायी माणसाचा असतो. त्याचे हाती सत्ता आली म्हणजे तो तिचा किती मोठ्या प्रमाणावर वापर करतो याबद्दल मी पूर्वी म्हटलेच आहे. म्हणूनच न्यायी वर्तनापेक्षा अन्यायी वर्तनाचा फायदा कसा जास्त असतो हे जर ठरवावयाचे असेल तर अन्यायी माणसाच्या वर्तनाकडे तुम्ही पाहिले पाहिजे. परिपूर्ण अन्याय्य वर्तन म्हणजे अत्यंत सुखी जीवन होय. त्यात अन्याय करणारा सुखी होतो आणि अन्याय केला जाणारा, प्रतिकारहीन माणूस दुर्दैवी होतो हे जर तुम्ही पाहिलेत, तर माझ्या म्हणण्याचा खरेपणा तुम्हांस पटेल. ही एक प्रकारची जुलूमशाहीच आहे.

यामध्ये सार्वजनिक, खाजगी संपत्ती, पवित्र-अपवित्र वस्तू उघडपणे किंवा कारस्थानाने किरकोळ स्वरूपात नव्हे तर मोठ्या प्रमाणात लांबविली जाते. जर या संदर्भात कुणी किरकोळ गुन्हा केला तर तो पकडला जाऊन शिक्षेमुळे कलंकित होतो. असे अर्धेकच्चे गुन्हेगार, भ्रष्टाचारी, चोर, डाकू, घरफोडे मानले जातात. पण जर एखाद्याने आपल्या लोकांची संपत्ती हस्तगत केली, त्यांना गुलाम केले तर स्वजनाकडूनच नव्हे तर त्याच्या अन्यायाची कीर्ती ऐकणाऱ्या परकियाकडूनही त्याला दूषण न दिले जाता सुखी व सुदैवी मानले जाते. जेव्हा लोक अन्यायाला नावे ठेवतात तेव्हा ते त्यास घाबरतात असे नव्हे तर अन्यायाचा त्रास त्यांना सोसत नसतो. हा मोठ्या प्रमाणावरील अन्याय न्यायापेक्षा अधिक श्रेष्ठ, समर्थ असतो. म्हणूनच सॉक्रेटिस, न्याय म्हणजे बलिष्ठांचे हित आणि अन्याय म्हणजे स्वहित असे मी म्हणतो.

**सॉक्रेटिस :** आंघोळीच्या अखेरीस सगळी बादली डोक्यावर ओतून घ्यावी त्याप्रमाणे थ्रॅसिमॅक्सचा हा अखंड वाक्प्रवाह सुरू होता. भाषण आटोपून तो जाण्याची तयारी करीत होता, पण माझ्या मित्रांनी त्याला न सोडता आपल्या बोलण्याचे समर्थन करण्याचा आग्रह केला. मीसुद्धा थ्रॅसिमॅक्सला विनंती केली, " मित्रा, आपले म्हणणे बरोबर की चूक हे पटवून न देता किंवा स्वतः न समजावून घेता असे निघून जाणे बरोबर नाही. जीवनात फायदा आणि सुख होईल अशा जीवनदृष्टीचा विचार आपण करीत नसून एखाद्या किरकोळ प्रश्नाबद्दल बोलत आहोत असे तुला वाटते काय ? "

**थ्रॅसिमॅक्स :** किरकोळ प्रश्नाबद्दल आपण बोलत आहोत असे मला वाटत नाही.

**सॉक्रेटिस :** पण तुला तसे वाटत असावे असे वाटते. तुला जे माहीत आहे ते आम्हांस माहीत नाही, त्यामुळे आमचे आयुष्य चांगले म्हणता येत नाही. अर्थात, आमच्या अज्ञानाबद्दल तू उदासीन आहेस ! कृपया, तुला जे माहीत आहे ते आंम्हांस सांग. जर तू आमच्यावर कृपा केलीस, तर आम्ही तुला धन्यवाद देऊ. स्वैर अन्याय हा न्यायापेक्षा फायदेशीर असतो याबद्दल माझी खात्री पटलेली नाही. आणि तसे सिद्धही होत नाही. मित्रा ! अन्यायी माणसाला लबाडी वा शिरजोरी करण्याची परवानगी दिली तरी अन्याय्य वर्तन हे न्यायापेक्षा फायदेशीर असते असे मला खात्रीने वाटत नाही. इतरांचेही असेच मत आहे. म्हणून आमच्या दृष्टीने न्याय हा अन्यायापेक्षा श्रेष्ठ आहे. आमच्या मतांमधील चूक तू आम्हाला दाखवून दे.

**थ्रॅसिमॅक्स** : मी आतापर्यंत इतका बोललो तरी तुम्हांस पटले नाही. तुमचे मन वळविण्यास मी अधिक काय करू शकेन ? मी माझे विचार तुमच्या डोक्यात घुसवावे अशी तुमची इच्छा आहे काय ?

**सॉक्रेटिस** : परमेश्वर दया करो ! तू तुझ्या विचारांना चिकटून रहा. जर ते बदलायचे असतील तर आमची फसवणूक न करता उघडपणे बदल एवढेच आम्हास वाटते. थ्रॅसिमॅक्स, खऱ्या वैद्याची व्याख्या तू केली होतीस. पण खऱ्या धनगराची व्याख्या करताना तू पूर्वीचा अर्थ कायम ठेवला नाहीस, उलट तू असे म्हटलेस की, धनगर मेंढरांच्या कल्याणाकरिता त्यांना खाऊ घालीत नाही तर चांगली किमत यावी, मेजवानी थाटात व्हावी म्हणून त्यांना खाऊ घालतो.

याउलट मला असे वाटते की, खरा धनगर मेंढ्यांचेच कल्याण साधतो. त्यातच मेंढपालन कलेची पूर्णता असते. यानुसार असे म्हणता येईल की, जेव्हा सरकार हे सरकार म्हणून काम करते तेव्हा ज्यांच्यावर सत्ता चालवावयाची, ज्यांचे पालन करायचे अशा लोकांचेच कल्याण सरकार पाहते. मग या शासनाचे स्वरूप खासगी असो वा प्रातिनिधिक असो. तुझा काय दृष्टिकोन आहे ? खरे शासक स्वखुशीने कारभार करतात, असे तू समजतोस का ?

**थ्रॅसिमॅक्स** : मला केवळ वाटते असे नव्हे, तर ते स्वखुशीने कारभार करतात याची मला खात्री आहे.

**सॉक्रेटिस** : थ्रॅसिमॅक्स, कोणत्याही व्यक्तीला शासनाचे सर्वसाधारण काम नको असते. आपल्या कामाचा स्वतःऐवजी दुसऱ्यांना फायदा होतो हे लक्षात आल्याने कोणीही मोबदल्याशिवाय काम करीत नाही हे तू लक्षात घेतले नाहीस काय ? शिवाय मी विचारतो की, प्रत्येक कलेला इतरांहून भिन्न असे विशिष्ट काम नसते का ? मित्रा, स्वतःच्या मनाविरुद्ध बोलू नकोस त्यामुळे चर्चा पुढे जाणार नाही.

**थ्रॅसिमॅक्स** : प्रत्येक कलेला विशिष्ट कार्य असते हे मान्य.

**सॉक्रेटिस** : प्रत्येक कलेपासून विशिष्ट फायदा होत नाही काय ? उदा. वैद्यकामुळे आरोग्य सांभाळले जाते, नौकानयनामुळे जलप्रवास सुखकर होतो, असे नाही का ?

**थ्रॅसिमॅक्स** : अर्थात.

**सॉक्रेटिस** : पैसे मिळवून देणारी एखादी कला नसते का ? वैद्यक आणि नौकानयन या एकाच प्रकारच्या कला का ? एकजण जहाजाचा कप्तान म्हणून काम करतो त्यावेळी जलप्रवासाने एखाद्याची प्रकृती सुधारली त्यावेळी नौकानयन म्हणजे वैद्यक असे तू म्हणशील का ?

**थ्रॅसिमॅक्स** : नाही.

**सॉक्रेटिस** : रोग बरे केल्याबद्दल डॉक्टरास पैसे मिळतात म्हणून वैद्यक ही पोटभरू कला आहे काय ?

**थ्रॅसिमॅक्स** : नाही.

**सॉक्रेटिस** : प्रत्येक कलेचा विशिष्ट उपयोग असतो हे आपण मान्य केले नाही का ?

**थ्रॅसिमॅक्स** : हो.

**सॉक्रेटिस** : मग सर्व कलावंतांना जो सर्वसाधारण फायदा मिळतो तो एका गोष्टीच्या सर्वसाधारण उपयोगापासून मिळत नाही का ?

**थ्रॅसिमॅक्स** : असे दिसते खरे.

**सॉक्रेटिस** : म्हणून मला असे वाटते की, कलावंतांना जो पैशाचा फायदा होतो तो स्वतःच्या कलेऐवजी पैसे मिळविण्याच्या कलेचा उपयोग केल्यामुळे होय.

[त्याने हे नाखुशीने मान्य केले.] म्हणजेच कोणत्याही कलेपासून पैसे हे मिळत नाहीत. वैद्यकामुळे आरोग्य राखले जाते. स्थापत्यामुळे घर बांधण्यास मदत होते; शिवाय पैसे मिळविण्याच्या कलेमुळे कलावंतांना पैसेही मिळतात. इतर कलांबद्दलही असे म्हणता येईल. प्रत्येक कला आपल्या कार्यात आपल्या विशिष्ट विषयाचा हेतू सफल करीत असते. पण कलावंताला पैसे नाही मिळाले तर स्वतःच्या कलेचा त्याला काय फायदा होईल ?

**थ्रॅसिमॅक्स** : होणार नाही हे उघडच.

**सॉक्रेटिस** : पण कलावंत जेव्हा मोबदला न घेता कार्य करतो तेव्हा तो कोणताच फायदा करून घेत नाही का ?

**थ्रॅसिमॅक्स** : नाही. माझ्या कल्पनेप्रमाणे तो फायदा करून देतो.

**सॉक्रेटिस** : तर थ्रॅसिमॅक्स तुला हे कळून चुकेल की, कोणतीही कला किंवा सरकार स्वहितासाठी काही करू देत नाही. उलट पूर्वी मान्य केल्याप्रमाणे कला आपल्या विषयाचे कल्याण आणि सरकार आपल्या प्रजेचे कल्याण यांची काळजी घेतात. त्याबद्दलचे नियम तयार करतात. या त्यांच्या कार्यात बलिष्ठांच्या हिताऐवजी दुर्बलांच्या हिताकडे ते लक्ष पुरवितात. म्हणूनच मला असे वाटते की, कोणीही स्वखुशीने अधिकाराची जागा स्वीकारीत नाही. किंवा मोबदला मिळाल्याशिवाय लोकांची सुधारणा करू इच्छित नाही. खरा कलावंत हा स्वहिताऐवजी कलेचे हित पाहतो. म्हणूनच जे लोक अधिकारपद स्वीकारतात त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळाला पाहिजे. मग तो पैसा, कीर्ती किंवा काम नाकारण्याबद्दलची शिक्षा यांपैकी कोणताही असो.

**ग्लॅकॉन** : सॉक्रेटिस, तुमचे बोलणे कळले नाही. दोन मोबदल्यांचा अर्थ समजला पण मोबदल्याच्या बदली शिक्षा कोणती व कशी ते कळले नाही.

**सॉक्रेटिस** : सद्‌गुणी माणसे ज्या कारणास्तव अधिकारपद स्वीकारतात तो मोबदला तुला माहीत नाही. महत्त्वाकांक्षा आणि लोभ हे दुर्गुण नव्हेत का ?

म्हणूनच पैसा किंवा कीर्ती यासाठी सज्जन लोक अधिकारपद स्वीकारत नाहीत. उघडपणे सेवेचा मोबदला घेतला तर ‘भाडोत्री’ माणूस असे दूषण त्यांना दिले जाईल. ते स्वीकारण्याची त्यांची तयारी नसते. आपल्या अधिकाराचा गुप्त वापर करणे त्यांना ‘चोरी’ वाटते. तिलाही त्यांची तयारी नसते. ते महत्त्वाकांक्षी नसतात त्यामुळे कीर्तीचीही हाव त्यांना नसते. साहजिकच सक्ती आणि शिक्षेचे भय यांच्या मदतीनेच त्यांना अधिकारपद स्वीकारण्यास भाग पाडावे लागते. त्याशिवाय स्वेच्छेने अधिकारपद स्वीकारणे ते कमीपणाचे समजतात. स्वतः अधिकारपद नाकारले तर वाईट व्यक्तीकडून अधिकार गाजवून घेणे यापेक्षा अधिक कडक शिक्षा कोणतीच नाही. या कडक शिक्षेच्या भीतीमुळेच सज्जन माणसे अधिकारपद स्वीकारण्यास तयार होतात असे मला वाटते. साहजिकच हे अधिकारपद मिळाल्यावर आपणांस बहुमान मिळाला असे ते समजत नाहीत. आवश्यक कर्तव्याची पूर्ती एवढीच त्यांची भूमिका असते. अधिकारपदाचा उपयोग चैन करण्यात ते करू इच्छित नाहीत. केवळ त्यांच्याहून अधिक चांगला योग्य माणूस मिळत नाही, म्हणूनच केवळ ते काम करू इच्छितात. जर राज्यात केवळ सज्जनच असते, तर अधिकारपद मिळविण्याच्या स्पर्धेऐवजी ते टाळण्याची स्पर्धा लागली असती. यावरून हे सिद्ध होते की, खरा राज्यकर्ता हा स्वहिताऐवजी प्रजेचे हित पाहणारा असतो. प्रत्येक सज्जन व्यक्ती स्वतः कष्ट सोसून लोकांकडून फायदा उपटण्याऐवजी लोकांचा फायदा करून देणारी असते. म्हणून या बाबतीत “बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय” ही थ्रॅसिमॅक्सची भूमिका मला कधीच मान्य होणार नाही.

□ □

**थ्रॅसिमॅकस** : नाही.

**सॉक्रेटिस** : प्रत्येक कलेचा विशिष्ट उपयोग असतो हे आपण मान्य केले नाही का ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : मग सर्व कलावंतांना जो सर्वसाधारण फायदा मिळतो तो एका गोष्टीच्या सर्वसाधारण उपयोगापासून मिळत नाही का ?

**थ्रॅसिमॅकस** : असे दिसते खरे.

**सॉक्रेटिस** : म्हणून मला असे वाटते की, कलावंतांना जो पैशाचा फायदा होतो तो स्वतःच्या कलेऐवजी पैसे मिळविण्याच्या कलेचा उपयोग केल्यामुळे होय.

[त्याने हे नाखुशीने मान्य केले.] म्हणजेच कोणत्याही कलेपासून पैसे हे मिळत नाहीत. वैद्यकामुळे आरोग्य राखले जाते. स्थापत्यामुळे घर बांधण्यास मदत होते; शिवाय पैसे मिळविण्याच्या कलेमुळे कलावंतांना पैसेही मिळतात. इतर कलांबद्दलही असे म्हणता येईल. प्रत्येक कला आपल्या कार्यात आपल्या विशिष्ट विषयाचा हेतू सफल करीत असते. पण कलावंताला पैसे नाही मिळाले तर स्वतःच्या कलेचा त्याला काय फायदा होईल ?

**थ्रॅसिमॅकस** : होणार नाही हे उघडच.

**सॉक्रेटिस** : पण कलावंत जेव्हा मोबदला न घेता कार्य करतो तेव्हा तो कोणताच फायदा करून घेत नाही का ?

**थ्रॅसिमॅकस** : नाही. माझ्या कल्पनेप्रमाणे तो फायदा करून देतो.

**सॉक्रेटिस** : तर थ्रॅसिमॅकस तुला हे कळून चुकेल की, कोणतीही कला किंवा सरकार स्वहितासाठी काही करू देत नाही. उलट पूर्वी मान्य केल्याप्रमाणे कला आपल्या विषयाचे कल्याण आणि सरकार आपल्या प्रजेचे कल्याण यांची काळजी घेतात. त्याबद्दलचे नियम तयार करतात. या त्यांच्या कार्यात बलिष्ठांच्या हिताऐवजी दुर्बलांच्या हिताकडे ते लक्ष पुरवितात. म्हणूनच मला असे वाटते की, कोणीही स्वखुशीने अधिकाराची जागा स्वीकारीत नाही. किंवा मोबदला मिळाल्याशिवाय लोकांची सुधारणा करू इच्छित नाही. खरा कलावंत हा स्वहिताऐवजी कलेचे हित पाहतो. म्हणूनच जे लोक अधिकारपद स्वीकारतात त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळाला पाहिजे. मग तो पैसा, कीर्ती किंवा काम नाकारण्याबद्दलची शिक्षा यांपैकी कोणताही असो.

**ग्लॅकॉन** : सॉक्रेटिस, तुमचे बोलणे कळले नाही. दोन मोबदल्यांचा अर्थ समजला पण मोबदल्याच्या बदली शिक्षा कोणती व कशी ते कळले नाही.

**सॉक्रेटिस** : सद्‌गुणी माणसे ज्या कारणास्तव अधिकारपद स्वीकारतात तो मोबदला तुला माहीत नाही. महत्त्वाकांक्षा आणि लोभ हे दुर्गुण नव्हेत का ?

म्हणूनच पैसा किंवा कीर्ती यासाठी सज्जन लोक अधिकारपद स्वीकारत नाहीत. उघडपणे सेवेचा मोबदला घेतला तर ‘भाडोत्री’ माणूस असे दूषण त्यांना दिले जाईल. ते स्वीकारण्याची त्यांची तयारी नसते. आपल्या अधिकाराचा गुप्त वापर करणे त्यांना ‘चोरी’ वाटते. तिलाही त्यांची तयारी नसते. ते महत्त्वाकांक्षी नसतात त्यामुळे कीर्तीचीही हाव त्यांना नसते. साहजिकच सक्ती आणि शिक्षेचे भय यांच्या मदतीनेच त्यांना अधिकारपद स्वीकारण्यास भाग पाडावे लागते. त्याशिवाय स्वेच्छेने अधिकारपद स्वीकारणे ते कमीपणाचे समजतात. स्वतः अधिकारपद नाकारले तर वाईट व्यक्तीकडून अधिकार गाजवून घेणे यापेक्षा अधिक कडक शिक्षा कोणतीच नाही. या कडक शिक्षेच्या भीतीमुळेच सज्जन माणसे अधिकारपद स्वीकारण्यास तयार होतात असे मला वाटते. साहजिकच हे अधिकारपद मिळाल्यावर आपणांस बहुमान मिळाला असे ते समजत नाहीत. आवश्यक कर्तव्याची पूर्ती एवढीच त्यांची भूमिका असते. अधिकारपदाचा उपयोग चैन करण्यात ते करू इच्छित नाहीत. केवळ त्यांच्याहून अधिक चांगला योग्य माणूस मिळत नाही, म्हणूनच केवळ ते काम करू इच्छितात. जर राज्यात केवळ सज्जनच असते, तर अधिकारपद मिळविण्याच्या स्पर्धेऐवजी ते टाळण्याची स्पर्धा लागली असती. यावरून हे सिद्ध होते की, खरा राज्यकर्ता हा स्वहिताऐवजी प्रजेचे हित पाहणारा असतो. प्रत्येक सज्जन व्यक्ती स्वतः कष्ट सोसून लोकांकडून फायदा उपटण्याऐवजी लोकांचा फायदा करून देणारी असते. म्हणून या बाबतीत “बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय” ही थ्रॅसिमॅकसची भूमिका मला कधीच मान्य होणार नाही.

□ □

## प्रकरण चार

# अन्याय हा न्यायापेक्षा फायदेशीर असतो का ?

**[I-347-E—356]**

**कथासूत्र :**

[नैतिक मूल्यांना व्यक्तिगत स्वरूपाच्या व्यावहारिक उपयुक्ततेपलीकडे महत्त्व नाही. त्यांना वस्तुनिष्ठ परमसाध्य किंवा परममूल्य म्हणून स्थान, अर्थ, महत्त्व नसते. ही थ्रॅसिमॅकसची तात्त्विक भूमिका सॉक्रेटिसने खोडून काढल्यानंतर; न्याय आणि अन्याय यांच्या व्यावहारिक उपयुक्ततेची चर्चा सुरू होते. इतरांवर अधिकाधिक अन्याय करण्याचे कौशल्य, निपुणता याला थ्रॅसिमॅकस सद्गुण किंवा ज्ञान म्हणतो. याउलट व्यक्ती व समाज यांचे नैतिक हित साधण्यासाठी आवश्यक असणारी मर्मदृष्टी म्हणजे ज्ञान; आणि आवश्यक असणारे चारित्र्य म्हणजे सद्गुण असे सॉक्रेटिस सिद्ध करतो.

अतिरेकी, एकांतिक स्वरूपाची स्वार्थवादी भूमिका योग्य नाही असे सॉक्रेटिसने सिद्ध केले आहे. गाताना किंवा वाद्य वाजविताना कलावंतास ताल व लय यांचे ज्ञान असणे जसे आवश्यक असते, त्याचप्रमाणे जीवनातील समतोल आणि सुसंवाद बिघडू न देणे हे खऱ्या सूज्ञ व्यक्तीचे लक्षण असते.

चोर, दरोडेखोर यांसारख्या दुष्प्रवृत्त व्यक्तींनाही परस्परांशी व्यवहार करताना मैत्री, सहकार्य या विषयांच्या नियमांचे पालन करावेच लागते. जो केवळ विविध वासनांच्या आहारी जातो त्याच्या आंतर्बाह्यच जीवनात विसंगती आणि गोंधळ निर्माण होऊन तो दुर्बल बनतो, असे सांगून सॉक्रेटिसने संयम, शिस्त, सहकार्य, न्याय इत्यादी मूल्यांची अपरिहार्यता विशद केली आहे.

निसर्गातील, समाजातील आणि मानवी शरीरातील प्रत्येक घटकाला विशिष्ट कार्य नेमून दिलेले असते. ते कार्य समर्थपणे करण्यातच त्या घटकाची श्रेष्ठता आणि सद्गुण प्रगट होतात. हा ‘विशिष्ट कार्यसिद्धांत’ (Doctrine of specific function and virtue) मांडून सॉक्रेटिसने मानवी जीवनातील ‘न्याय’ या मूल्याची निरपेक्ष आणि अपरिहार्य स्वरूपाची श्रेष्ठता सिद्ध केली आहे. दृष्टीचे सामर्थ्य नसणारा डोळा अर्थशून्य असतो. तसेच सॉक्रेटिस म्हणतो की, बुद्धी ही माणसाला लाभलेली विशिष्ट शक्ती आहे. सद्सद्विवेक हे तिचे कार्य आहे म्हणून व्यावहारिक फायद्या-तोटयांचा विचार न करता, न्यायशुद्ध जीवन जगणे हाच मानवी जीवनातील खरा पुरुषार्थ आहे. कारण नीती आणि न्याय हे मानवी आत्म्याचे सहजाविष्कार असतात. असे जीवन हेच खरे सुखी जीवन होय.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** न्यायापेक्षा अन्याययुक्त आयुष्य अधिक श्रेयस्कर होय असे थ्रॅसिमॅकसचे मत आहे. तेव्हा आपली सध्याच्या प्रश्नाची चर्चा थोडी बाजूस सारून त्याच्या भूमिकेचाच आपण अधिक विचार करू या. ग्लॅकॉन, तुला कोणती भूमिका पटते ? कोणता विचार खरा वाटतो ?

**ग्लॅकॉन :** माझ्या दृष्टीने न्याययुक्त जीवन अधिक फायदेशीर असते.

**सॉक्रेटिस :** थ्रॅसिमॅकसने अन्याय्य जीवनातील प्रिय गोष्टींची मालिका सांगितली ती तुला आठवते का ?

**ग्लॅकॉन :** ऐकली तरी मला तशी खात्री नाही.

**सॉक्रेटिस :** मग थ्रॅसिमॅकसचे म्हणणे खोटे असल्याचे त्याला आपण पटवून देऊ या का ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** आपण प्रथम न्यायाचे फायदे सांगू. थ्रॅसिमॅकस त्याला उत्तर देईल. त्याला आपण प्रत्युत्तर देऊ. ही पद्धती स्वीकारल्यावर उभय भूमिकांतील फायदे-तोटे ठरविण्यास आपल्याला त्रयस्थ न्यायाधीश लागतील. पण परस्परांची मान्यता घेऊन जर आपण वाद केला तर आपल्याला वकीलही होता येईल आणि न्यायाधीशही होता येईल.

**ग्लॅकॉन :** ठीक.

**सॉक्रेटिस :** तुला काय मान्य आहे ?

**ग्लॅकॉन :** दुसरी.

**सॉक्रेटिस :** तेव्हा थ्रॅसिमॅकस, आपण पुन्हा चर्चा सुरू करू. पूर्ण न्याय आणि पूर्ण अन्याय यांपैकी कशामुळे अधिक फायदा होतो याचे तू उत्तर दे.

**थ्रॅसिमॅकस :** त्याबद्दल मला संशय नाही. ते मी पूर्वीच सकारण सांगितले आहे.

**सॉक्रेटिस :** त्यांपैकी एक सद्‌गुण व दुसरा दुर्गुण असे तू म्हणशील का ?

**थ्रॅसिमॅकस :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** म्हणजे न्याय हा सद्‌गुण आणि अन्याय हा दुर्गुण ना ?

**थ्रॅसिमॅकस :** वा ! वा ! माझ्या दृष्टीने अन्याय फायदेशीर आणि न्यायामुळे तोटा होतो. मग मी तसे कसे म्हणेन.

**सॉक्रेटिस :** मग तुझी भूमिका काय ?

**थ्रॅसिमॅकस :** तुमच्या उलट.

**सॉक्रेटिस :** म्हणजे न्याय हा दुर्गुण का ?

**थ्रॅसिमॅकस :** तसे नव्हे. मला तो सुस्वभावाचे लक्षण वाटतो.

**सॉक्रेटिस :** म्हणजे अन्याय हा वाईट स्वभाव का ?

**थ्रॅसिमॅक्स** : नव्हे. मी त्याला चांगले धोरण मानतो.

**सॉक्रेटिस** : अन्यायी माणूस शहाणा आणि चांगला असतो का ?

**थ्रॅसिमॅक्स** : हो. जी माणसे पूर्ण अन्यायी आणि इतर शहरे व राष्ट्रे यांना गुलाम करण्यास समर्थ असतात ती शहाणी आणि चांगली असतात. माझ्या दृष्टीने जर खिसेकापू लोक पकडले गेले नाहीत तर त्यांचीही कामे फायदेशीर असतात. अर्थात, हुकूमशहाबरोबर त्यांची तुलना करणे योग्य नव्हे.

**सॉक्रेटिस** : समजले. पण, अन्याय म्हणजे सद्‌गुण व शहाणपण आणि न्याय म्हणजे त्याविरुद्ध असे तू समजतोस याचे मला आश्चर्य वाटते.

**थ्रॅसिमॅक्स** : हो. मला तसे वाटते.

**सॉक्रेटिस** : तुझी भूमिका ताठर स्वरूपाची असल्याने काय म्हणावे ते समजत नाही. अन्यायामुळे फायदा होतो असे समजून जर तू अन्याय म्हणजे दुर्गुण असे म्हटले असतेस तर थोडे तरी बोलता आले असते. पण तुझ्या दृष्टीने अन्यायात सामर्थ्य असते. न्यायाच्या बाबतीत जे जे सद्‌गुण आम्ही मान्य करतो ते ते तू अन्यायाला चिकटवितोस. सद्‌गुण आणि शहाणपण यांच्याइतके महत्त्व अन्यायाचे असते असे तू मानतोस.

**थ्रॅसिमॅक्स** : तुमचा अंदाज ठीक आहे.

**सॉक्रेटिस** : पण थ्रॅसिमॅक्स, थट्टा न करता तू खरे बोलत आहेस असे जोपर्यंत मला वाटते तोपर्यंत मी तुझ्याशी वाद घालीनच.

**थ्रॅसिमॅक्स** : मी खरे बोलत असेन किंवा खोटे बोलत असेन, त्याच्याशी तुम्हाला काय कर्तव्य ? तुला माझे म्हणणे खोडता येत नाही ना ?

**सॉक्रेटिस** : ठीक आहे.* पण एक सांगशील काय ? एक न्यायी मनुष्य दुसऱ्या न्यायी मनुष्यास विरोध करील काय ?

**थ्रॅसिमॅक्स** : नाही. कारण तो बावळटच राहणार.

**सॉक्रेटिस** : न्यायी माणूस सरळमार्गी असतो का ? तो मर्यादेबाहेर जाईल का ?

**थ्रॅसिमॅक्स** : नाही.

**सॉक्रेटिस** : तो अन्यायास विरोध करील का ? ते त्याचे कृत्य न्याय्य असेल की अन्याय्य ?

**थ्रॅसिमॅक्स** : त्याला तो न्याय वाटेल. पण तसे करण्याचे धाडस त्याच्यात असणार नाही.

---

* यापुढील भाग Conford च्या आवृत्तीत गाळला असल्याने त्याचे भाषांतर Jowett च्या प्रतीवरून केले आहे.

**सॉक्रेटिस :** तसे नव्हे. न्यायी मनुष्य अन्यायाला विरोध करण्याची इच्छा व निश्चय करेल पण न्यायी माणसाविरुद्ध तो जाणार नाही, खरे का ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** पण अन्यायी माणूस न्यायाविरुद्ध जाण्यास तयार असतो का ?

**थ्रॅसिमॅकस :** अर्थातच. तो सर्वांपुढे जाऊ इच्छितो.

**सॉक्रेटिस :** याचा अर्थ अन्यायी माणूस दुसऱ्या अन्यायी माणसाच्या विरोधी जाईल, त्याच्यावर अन्याय करेल आणि फायद्यासाठी धडपडेल, खरे ना ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** याचा अर्थ न्यायी माणूस समानधर्मियांविरुद्ध जात नाही फक्त आपल्या विरोधकांना विरोध करेल. अन्यायी माणूस मात्र समशीलांनाही विरोध करेल.

**थ्रॅसिमॅकस :** तुमचा युक्तिवाद उत्तम आहे.

**सॉक्रेटिस :** शिवाय अन्यायी माणूस शहाणा आणि चांगला असतो. न्यायी माणसात मात्र शहाणपणाही नसतो आणि चांगुलपणाही नसतो.

**थ्रॅसिमॅकस :** फारच छान !

**सॉक्रेटिस :** अन्यायी माणसात शहाणपणा आणि चांगुलपणा असतो, न्यायी माणसात अजिबात नसतो, खरे ना ?

**थ्रॅसिमॅकस :** निश्चितच ! प्रत्येक माणसाचा स्वभाव त्याच्या वैशिष्टयानुसार असतो. विरोधी माणसाच्या स्वभावाशी त्याचे साम्य नसते.

**सॉक्रेटिस :** प्रत्येकाचा स्वभाव ज्याच्याशी त्याचे जमते त्याच्यासारखा असतो.

**थ्रॅसिमॅकस :** तुम्हास काही वेगळे वाटते काय ?

**सॉक्रेटिस :** ठीक. एक व्यक्ती संगीतात तज्ज्ञ असते व दुसरी अनभिज्ञ असते, खरे ना ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** दोघांपैकी शहाणे कोण आणि अज्ञानी कोण ?

**थ्रॅसिमॅकस :** संगीततज्ज्ञ शहाणा आणि अनभिज्ञ हा अज्ञानी.

**सॉक्रेटिस :** ज्या विषयात जो शहाणा त्यात तो चांगला आणि ज्यात जो अनभिज्ञ त्यात तो वाईट, असे तू म्हणतोस का ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** वैद्यक कलेबद्दल हेच तुझे मत आहे काय ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस** : मित्रा, संगीततज्ज्ञ, तंबोऱ्याच्या तारा घट्ट किंवा सैल करताना इतर संगीत-तज्ज्ञांपेक्षा स्वतःस अधिक शहाणा समजतो का ?

**थ्रॅसिमॅक्स** : नाही.

**सॉक्रेटिस** : अनभिज्ञ माणसापेक्षा आपण अधिक शहाणे आहोत असे तो मानीत नाही का ?

**थ्रॅसिमॅक्स** : मानेल.

**सॉक्रेटिस** : रोग्याला पथ्य सांगताना डॉक्टर वैद्यकीय ज्ञानाविरोधी जाईल का ?

**थ्रॅसिमॅक्स** : नाही.

**सॉक्रेटिस** : पण वैद्यकशास्त्र न समजणाऱ्या अडाणी माणसाविरुद्ध तो जाईल का ?

**थ्रॅसिमॅक्स** : हो.

**सॉक्रेटिस** : शास्त्रीय ज्ञान संपादन केलेला माणूस दुसऱ्या शास्त्रज्ञाहून अधिक काही बोलेल, करील की इतर जे करतील तेच तो करेल ?

**थ्रॅसिमॅक्स** : दुसरी भूमिका योग्य वाटते.

**सॉक्रेटिस** : अडाणी माणूस ज्ञानी आणि अज्ञानी यांच्याविरुद्ध वागेल ना ?

**थ्रॅसिमॅक्स** : वागेल.

**सॉक्रेटिस** : शास्त्रज्ञ शहाणा असतो का ?

**थ्रॅसिमॅक्स** : हो.

**सॉक्रेटिस** : शहाणा सज्जन असतो का ?

**थ्रॅसिमॅक्स** : हो.

**सॉक्रेटिस** : अर्थात, ज्ञानी व सज्जन व्यक्ती समशीलाविरोधी वागणार नाही. स्वतःहून भिन्न असलेल्या व्यक्तीविरोधी वागेल.

**थ्रॅसिमॅक्स** : असे वाटते खरे.

**सॉक्रेटिस** : जी व्यक्ती वाईट आणि अडाणी आहे, ती समशील आणि विरोधी या उभयतांना विरोध करेल.

**थ्रॅसिमॅक्स** : ठीक.

**सॉक्रेटिस** : अन्यायी माणूस समशील आणि आपल्याहून भिन्न स्वभावाच्या माणसाला विरोध करतो असे तू म्हणाला होतास ना ?

**थ्रॅसिमॅक्स** : हो.

**सॉक्रेटिस** : न्यायी माणूस समशीलाविरोधी जात नाही, विरोधकांना विरोध करतो ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : मग न्यायी माणूस हा ज्ञानी आणि सज्जन ठरतो. आणि अन्यायी माणूस हा अज्ञानी व दुष्ट ठरतो.

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : प्रत्येकाचा स्वभाव ज्याच्याशी त्याचे जमते त्याच्यासारखा असतो.

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : म्हणजे, यावरून असे सिद्ध होते की, न्यायाने वागणारी व्यक्ती ज्ञानी आणि सज्जन असते तर अन्यायाने वागणारी व्यक्ती ही अज्ञानी आणि दुष्ट असते.*

[मी हे सारे सांगत असताना थ्रॅसिमॅकसने माझे विधान खूप विरोध करून नाखुषीने, आडवळणाने कबूल केले. आमच्या चर्चेच्या वेळी हवा गरम होती. तो घामाघूम झाला होता. त्याला लाजताना मी प्रथमच पहात होतो. न्याय म्हणजे सद्‌गुण आणि ज्ञान, अन्याय म्हणजे दुर्गुण आणि अज्ञान ही आता आमची भूमिका ठरली. चर्चा पुढे सुरू झाली.] थ्रॅसिमॅकस. अन्यायी माणूस समर्थ असे तू म्हटले होतेस, ते आठवते का ?

**थ्रॅसिमॅकस** : हो, आठवते. पण तू जो निष्कर्ष काढलास तो मला मान्य आहे किंवा तुला उत्तर देण्यास मी असमर्थ आहे असे तू समजू नकोस. मी बोललो तर याने पाण्डित्य प्रकट केले असे समजाल म्हणून मला जे बोलावेसे वाटते ते बोलू दे किंवा केवळ तुम्हालाच प्रश्न विचारायचे असले तर विचारा म्हणजे आजीबाई गोष्ट सांगताना ज्याप्रमाणे मुले वा ! वा ! हो ! नाही ! असे म्हणत माना हलवितात त्याप्रमाणे मी फक्त उत्तर देईन.

**सॉक्रेटिस** : अशी स्वतःची अवहेलना करू नकोस.

**थ्रॅसिमॅकस** : जर तुम्ही मला नीट बोलू देत नाहीत तर तुमच्या अपेक्षेप्रमाणे तरी घडू दे. आणखी काय ?

**सॉक्रेटिस** : काही नाही. तुझी परवानगी असेल तर विचारतो.

**थ्रॅसिमॅकस** : सुरुवात कर.

**सॉक्रेटिस** : ठीक. न्यायाचे स्वरूप काय ते आपण अन्यायाशी तुलना करून ठरवीत होतो. त्या चर्चेच्या वेळी विचारले तेच पुन्हा विचारतो. अन्याय हा न्यायापेक्षा समर्थ असतो असे म्हटले होतेस, पण न्याय म्हणजे ज्ञान आणि सद्‌गुण आणि अज्ञान म्हणजे अन्याय असा आपला आता निष्कर्ष निघाल्यानंतर अन्यायाहून न्याय हा समर्थ असतो हे आपोआपच सिद्ध होते. पण हे जरा वेगळ्या तऱ्हेने मी दाखवून देतो. एका शहर राज्याने इतरांना गुलाम करावे, अन्यायाने वागावे, हे तुला पटते काय ?

---

* Jowett च्या आवृत्तीच्या आधारे.

**थ्रॅसिमॅकस** : निश्चितच. पूर्ण अन्यायी उत्तम राज्य असे करणारच !

**सॉक्रेटिस** : समजले. पण इतरांना गुलाम करणाऱ्या राज्याची सत्ता न्यायाशिवाय टिकते का, याची आपण चर्चा करू.

**थ्रॅसिमॅकस** : जर न्याय म्हणजे शहाणपण तर न्यायाची गरज आहे, असे तुमचे म्हणणे. पण जर माझी भूमिका योग्य नसेल तर अन्याय आवश्यक !

**सॉक्रेटिस** : थ्रॅसिमॅकस, लहान मुलाप्रमाणे केवळ मान न हालवता तू योग्य तऱ्हेने प्रतिसाद देत आहेस याचे समाधान वाटते.

**थ्रॅसिमॅकस** : त्याकरिताच मी हे बोलतो आहे.

**सॉक्रेटिस** : तुझ्या कृपेबद्दल आभारी आहे. या कृपेमध्ये थोडी भर घाल आणि सांग की एखादे शहर राज्य, सैन्य, दरोडेखोरांची टोळी संगनमत करून अन्याय्य कृत्य करतात पण जर ती परस्परांशीच अन्याय करू लागली तर त्यांना आपल्या कामात यश मिळेल का ?

**थ्रॅसिमॅकस** : नाही.

**सॉक्रेटिस** : जर त्यांनी परस्परांतील अन्याय टाळला तर त्यांना यश मिळेल का ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : याचा अर्थ असा की, न्यायामुळे लोक एक होतात, मित्र बनतात. अन्यायामुळे माणसांत संघर्ष, शत्रुत्व, भेद निर्माण होतात.

**थ्रॅसिमॅकस** : मी तुमच्याशी भांडू इच्छित नसल्याने तुमच्या मताशी सहमत आहे.

**सॉक्रेटिस** : त्याबद्दल आभार ! आता आणखी थोडं सांग. जर अन्याय वाढला तर द्वेष उत्पन्न होईल, मग स्वतंत्र किंवा गुलाम लोकसुद्धा एकत्र काम करण्यास लायक ठरणार नाहीत, खरे ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : अन्यायामुळे लोकांत संघर्ष आणि द्वेष निर्माण होऊन ते परस्परांचे शत्रू होतील आणि न्यायी माणसाचेही शत्रू होतील, खरे ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : मित्रा, जर मनात अन्याय वाढला तर तो तिथे कायम टिकेल की नाहीसा होईल ?

**थ्रॅसिमॅकस** : कायम राहील.

**सॉक्रेटिस :** मग जेथे अन्यायाने कायमची वस्ती केली आहे, ते राज्य, कुटुंब, सैन्य इ. यांच्यात एकी आणि सहकार्य राहणार नाही. संघर्ष आणि भेद निर्माण करणारा अन्याय स्वतःचा आणि इतरांचा शत्रूच होतो, खरे ना ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** जर व्यक्ती अन्यायी झाली तरी हेच घडते. अंतःस्थ भांडणे, मानसिक गोंधळ यांमुळे त्याला काहीच काम करता येत नाही. तो स्वतःचाही शत्रू होतो आणि सज्जनांचाही शत्रू होतो, खरे ना ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** देवांना न्याय आवडतो का ?

**थ्रॅसिमॅकस :** ते न्यायप्रिय असतात असे आपण गृहित धरू.

**सॉक्रेटिस :** याचा अर्थ न्यायी मनुष्य देवांचा मित्र होतो तर अन्यायी मनुष्य देवांचा शत्रू असतो.

**थ्रॅसिमॅकस :** आपल्या वादविवाद कौशल्याचा आनंद आकंठ उपभोगा. इतरांसमोर अपमान नको म्हणून मी तुला विरोध करीत नाही.

**सॉक्रेटिस :** आमचा आनंद परिपूर्ण होण्यासाठी उत्तर देण्याची तयारी दाखव. अन्यायी माणसापेक्षा न्यायी माणूस अधिक शहाणा, कर्मकुशल आणि चांगला असतो, हा निष्कर्ष आपण सिद्ध केलेला आहे. अन्यायी माणसांत एकजूट नसते. निदान एकदा तरी अन्यायी माणसे एकजुटीने काम करू शकतील असेही म्हणता येत नाही. कारण ती एक होतात. याचाच अर्थ ती पूर्ण अन्यायी नसतात. जर ती पूर्ण अन्यायी असतील तर त्यांनी एकमेकांचे प्राणच घेतले असते. अशा अपूर्ण अन्यायी मांणसात न्यायबुद्धी अंशतः असते म्हणून मित्र व शत्रू यांना ते एकदम दुखवीत नाहीत. त्यामुळे त्यांचा थोडा फायदा होतो. जो पूर्ण अन्यायी तो पूर्ण दुर्जन असतो, तो काहीच करू शकणार नाही. ही माझी भूमिका रास्त असून, थ्रॅसिमॅकस, तुझी भूमिका चुकीची आहे.

आता आणखी एक प्रश्न आपण विचारात घेऊ. न्यायी माणूस अन्यायी माणसापेक्षा अधिक सुखी असतो का ? हा तो प्रश्न होय. माझ्या मताने तो अधिक सुखी असतो. पण माणसाचे वर्तन कसे असावे याविषयी आपली चर्चा असल्याने थोडी या प्रश्नाची खोलवर चर्चा केली पाहिजे.

**थ्रॅसिमॅकस :** मान्य. तू सुरू कर.

**सॉक्रेटिस :** बरं, मी प्रारंभ करतो. घोडा उपयुक्त असतो, खरे का ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस** : मग घोड्याचा उपयोग होण्यासाठी घोड्याशिवाय इतर कोणते साधन असते ?

**थ्रॅसिमॅकस** : मला कळलं नाही.

**सॉक्रेटिस** : असे पहा, डोळे नसतील तर पाहता येते का ?

**थ्रॅसिमॅकस** : नाही.

**सॉक्रेटिस** : कान नसतील तर ऐकता येते का ?

**थ्रॅसिमॅकस** : नाही.

**सॉक्रेटिस** : दर्शन आणि श्रवण ही या इंद्रियांची कामे होत, असेच ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : द्राक्षाचा वेल चाकू, कात्री इ. शस्त्राने छाटता येतो का ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : केवळ तेवढेच काम ज्या शस्त्राने होते त्याहून वेगळ्या शस्त्राने तो छाटता येईल का ?

**थ्रॅसिमॅकस** : नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणजे वेल कापणे हे कात्रीचे कार्य असेच ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : प्रत्येक वस्तूला जे कार्य नेमून दिलेले असते ते कार्य तीच वस्तू साधन मानल्याशिवाय शक्य आहे काय ? माझ्या प्रश्नाचा अर्थ तुला आता समजला असेल.

**थ्रॅसिमॅकस** : समजला. मला तो मान्य आहे.

**सॉक्रेटिस** : ज्या वस्तूचे जे विशिष्ट कार्य असते त्यानुसार तिचा गुणधर्मही असतो, खरे ना ? पूर्वीच्याच उदाहरणाप्रमाणे डोळ्याला विशिष्ट कार्य असते ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : डोळ्याचा विशिष्ट गुणही असतो ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे कानाचेही विशिष्ट कार्य असते ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस** : शिवाय कानाचाही विशिष्ट गुण असतो ना ?

**थ्रॅसिमॅकस** : हो.

**सॉक्रेटिस :** इतर सर्व बाबतीत असेच घडते का ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** योग्य गुणाच्या अभावी किंवा दुर्गुणामुळे डोळे कार्य करू शकतील का ?

**थ्रॅसिमॅकस :** दृष्टीऐवजी आंधळेपणा आला तर कसे कार्य होणार ?

**सॉक्रेटिस :** म्हणजेच योग्य गुण नसतील तर डोळ्यांचे कार्य होणार नाही. कोणतीही वस्तू स्वतःच्या विशिष्ट गुणांमुळेच आपले कार्य पुरे करू शकते, आणि स्वतःच्या विशिष्ट दुर्गुणांमुळे हे कार्य बिघडते, हे खरे का ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** कानाचे गुण नष्ट झाले तर श्रवणाचे काम बिघडेल ना ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** हेच तत्त्व सर्व बाबतीत लागू होईल ना ?

**थ्रॅसिमॅकस :** असे म्हणणे शक्य आहे.

**सॉक्रेटिस :** आता आणखी एका प्रश्नाचा विचार करू या. आत्म्याचे काही कार्य असते ते आत्म्याशिवाय इतर कशाने पूर्ण होईल काय ? उदा. देखरेख, विचार, निर्णय इ. कार्ये आत्म्याचीच ना ? ती दुसऱ्या कोणास शक्य आहेत ?

**थ्रॅसिमॅकस :** ती इतरांना जमणार नाहीत.

**सॉक्रेटिस :** जगणे हे आत्म्याचेच कार्य ना ?

**थ्रॅसिमॅकस :** निश्चितपणे.

**सॉक्रेटिस :** आत्म्याचाही काही विशिष्ट गुण असतो ना ?

**थ्रॅसिमॅकस :** हो.

**सॉक्रेटिस :** त्याच्या विशिष्ट गुणाशिवाय त्याला कार्य करता येईल का ?

**थ्रॅसिमॅकस :** नाही

**सॉक्रेटिस :** वाईट आत्मा निर्णय, देखरेख, विचार ही कामे वाईटपणे करील तर चांगला आत्मा चांगल्या तऱ्हेने करेल.

**थ्रॅसिमॅकस :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** न्याय हा आत्म्याचा गुण आणि अन्याय हा त्याचा दुर्गुण हे आपण मान्य केले आहे.

**थ्रॅसिमॅकस :** होय.

**सॉक्रेटिस** : मग न्यायी आत्मा आणि न्यायी मनुष्य चांगले आयुष्य जगेल आणि अन्यायी मनुष्य वाईट आयुष्य जगेल हे सिद्ध होते.

**थ्रॅसिमॅक्स** : तुझा निष्कर्ष खरा आहे.

**सॉक्रेटिस** : जो चांगला वागतो तो कृतार्थ आणि सुखी होतो, जो वाईट वागतो त्याला दु:ख भोगावे लागते, खरे ना ?

**थ्रॅसिमॅक्स** : यात सशय नाही.

**सॉक्रेटिस** : याचा अथ न्यायामुळे माणसाला सुख होते व अन्यायामुळे दु:ख भोगावे लागते.

**थ्रॅसिमॅक्स** : हो, असे म्हणावयास हरकत नाही.

**सॉक्रेटिस** : दु:खापेक्षा सुखच फायदेशीर असते.

**थ्रॅसिमॅक्स** : अर्थात.

**सॉक्रेटिस** : मग थ्रॅसिमॅक्स, न्यायापेक्षा अन्यायाने कधीच फायदा होत नाही.

**थ्रॅसिमॅक्स** : ठीक. आज मेजवानीचा दिवस आहे. आपली चर्चा हीच मेजवानी आहे.

**सॉक्रेटिस** : या मेजवानीबद्दल थ्रॅसिमॅक्स, मी तुझा आभारी आहे. माझ्यावरील तुझा राग शांत झाला, पण तरीही माझे अजून समाधान झालेले नाही. अर्थात दोष माझाच आहे. खादाड माणूस एक पक्वान्न वाढले जात असता, ते सोडून दुसऱ्यावर झडप घेतो, तसे घडले. न्याय म्हणजे काय ? हा मूळ प्रश्न तसाच राहिला. तो प्रश्न सोडविण्याऐवजी सद्गुण, शहाणपणा, दुर्गुण, मूर्खपणा यांच्या स्वरूपाचीच आपण चर्चा केली. शिवाय न्यायापेक्षा अन्याय कितपत उपयुक्त आहे या प्रश्नाच्या चर्चेमुळे मूळ विषय बाजूलाच राहिला. या सगळ्याचा परिणाम एकच की, वाद संपला पण मला ज्ञान मात्र झाले नाही. न्याय म्हणजे काय हे समजल्याशिवाय त्याला सद्गुण म्हणता येईल की नाही. न्यायी माणूस सुखी असतो की दु:खी या प्रश्नासंबंधी खरे ज्ञान होणे शक्य नाही.

□ □

## प्रकरण पाच

# न्याय हा मानवी स्वभावातून निर्माण होतो, व्यावहारिक सोयीतून नव्हे !

**[II-357-A—367-E]**

**कथासूत्र :**

['रिपब्लिक' या ग्रंथाच्या पहिल्या भागात सॉक्रेटिसने न्यायाविषयीचे समाजात प्रस्थापित झालेले विविध दृष्टिकोन कसे अपूर्ण आहेत ते दाखवले. व्यक्ती व समाज यांची पूर्णता ज्या न्याय या नैतिक मूल्यावर आधारलेली असते, त्याचे स्वरूप काय ? त्याची निर्मिती कशी होते ? त्यावर आधारलेले व्यक्तिगत व सामाजिक जीवन कसे अधिकाधिक परिपूर्ण होत जाते ? यांची विधायक मीमांसा प्लेटोने या भागापासून करण्यास प्रारंभ केला आहे. त्यानुसार आदर्श राज्य का ? व कसे ? या व्यापक प्रश्नांची उकलही या भागापासून त्याने केली आहे.

'बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय' या थ्रॅसिमॅक्सच्या दृष्टिकोनाचे सॉक्रेटिसने पूर्वी खंडन केले आहे. ग्लॅकॉन आणि ॲडिमँट्स यांनी न्याय-अन्याय यांच्या संदर्भात आणखी एका प्रचलित दृष्टिकोनाचे स्वरूप मांडले आहे. न्याय आणि नीती या गोष्टी सामाजिक व्यवहारात सोय-गैरसोय लक्षात घेऊन निर्माण होतात, बदलतात. न्यायी माणसाला व्यवहारात शिक्षा आणि यातना भोगाव्या लागतात, तर अन्यायी माणूस आपली बुद्धिमत्ता आणि इच्छाशक्ती यांचा दुरुपयोग करून व्यावहारिक फायदे मिळवत असतो. नैतिक नियम हे निसर्गनियमही नव्हेत किंवा परमेश्वरी इच्छाही नव्हेत. लोकांनीच तयार केलेल्या आणि स्थल, काल, व्यक्ती आणि परिस्थितीसापेक्ष अशा त्या प्रथा, परंपरा, संकेत होत. लोकमताच्या दडपणाने व्यक्ती सद्‌गुणाने वागते, पण ते थोडे जरी दूर झाले तरी व्यक्तीच्या स्वार्थी प्रेरणा उफाळून येतात. परंपरागत धर्म आणि पुराणकथा यांमध्येसुद्धा स्वर्ग, नरक, पाप, पुण्य या कल्पनांच्या द्वारा निःस्वार्थ नैतिक जीवनाऐवजी संधिसाधू व्यावहारिक उपयुक्ततेचाच पुरस्कार केलेला आढळतो.

ग्लॅकॉन आणि ॲडिमँट्स यांनी हा दृष्टिकोन मांडून न्यायाचे महत्त्व कसे स्वतः सिद्ध, स्वतः प्रमाण असते ते दाखविण्यास सांगितले आहे आणि त्याद्वारा आदर्श राज्याचे नैतिक अधिष्ठान विशद करण्यास आवाहन केले आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** माझे बोलणे संपले. आमची चर्चाही संपली असे मी मानीत होतो, कारण ही चर्चा म्हणजे वादविवादाचा फक्त प्रारंभ होता. आतापर्यंतच्या चर्चेत थ्रॅसिमॅक्स पराभूत झाला. पण आतापर्यंत गप्प बसलेला ग्लॅकॉन मात्र त्यामुळे अस्वस्थ झाला. तो मला म्हणाला,

**ग्लॅकॉन :** अन्यायापेक्षा न्यायाचे वागणे नेहमी चांगले असते हे सॉक्रेटिस, तू आम्हाला पटवून देणार का ? तशी आमची समजूत पटली आहे असे तू गृहीत धरणार का ?

**सॉक्रेटिस :** माझ्या शक्तीप्रमाणे तुमची तशी खात्री पटवून देण्यास मला समाधान वाटेल.

**ग्लॅकॉन :** पण तू अजून तसे काही करीत नाहीस. मी एक प्रश्न विचारतो. ज्या वस्तू मिळाल्या म्हणजे माणसाला आनंद वाटतो पण हा आनंद परिणामस्वरूप नसतो असा वस्तूंचा वर्ग असल्याचे तू मानतोस का ? निरुपद्रवी वस्तूंच्या उपभोगापासून आपल्याला त्यावेळी आनंद होतो. पण अखेरीस त्याचा मनावर ठसा रहात नाही असे मी उदाहरणार्थ म्हणतो.

**सॉक्रेटिस :** अशा काही वस्तूंचा वर्ग मी मानतो.

**ग्लॅकॉन :** शिवाय वस्तू म्हणून नव्हे तर त्यांचा परिणाम म्हणून आपल्याला काही गोष्टी आवडतात. त्यांचा एखादा वर्ग तू मानतोस का ? उदा. बुद्धी, दृष्टी, आरोग्य इत्यादी.

**सॉक्रेटिस :** हो.

**ग्लॅकॉन :** काही गोष्टींपासून त्रास झाला, तरी त्या उपयुक्त असतात. उदा. रोग्याची सेवा, वैद्यक व्यवसाय, पैसे मिळविण्याची धडपड, व्यायाम यांमध्ये त्रास असला तरी त्यांचा फायदा व परिणाम यांमुळे आपण त्यांना स्वीकारतो. यांचा एक तिसरा वर्ग तू मानतोस का ?

**सॉक्रेटिस :** हो. असा तिसरा वर्ग मानता येईल.

**ग्लॅकॉन :** मग या तिन्हींपैकी **न्यायाचा** समावेश कशात करता येईल ?

**सॉक्रेटिस : ज्या वस्तूंची प्राप्ती** त्यांच्याकरिताच आणि त्यांच्या परिणामाकरिताही माणसाला **महत्त्वाची** वाटते अशा सर्वश्रेष्ठ वस्तूंच्या वर्गात न्यायाचा समावेश करता येईल.

**ग्लॅकॉन :** पण सर्वसामान्य माणसाला हे मान्य नाही. न्यायाकरिता न्याय त्याला नको असतो. न्याय हा त्याच्या दृष्टीने त्रासदायक वस्तूंच्या वर्गात मोडतो. कीर्ती मिळत असेल, फायदा होत असेल तर माणूस न्यायाचा स्वीकार करतो.

**सॉक्रेटिस :** सामान्य माणसाची ही भूमिका मला मान्य आहे. हीच भूमिका स्वीकारून थ्रॅसिमॅक्स, अन्यायाचा गौरव आणि न्यायाची निंदा करीत होता. पण, माझ्या मंदबुद्धीमुळे ते त्याला पटले नाही.

**ग्लॅकॉन :** मी माझे मत सांगतो मग तुम्ही बोला. तुझ्या बोलण्याची मोहिनी थ्रॅसिमॅक्सवर एखाद्या नागाप्रमाणे पडली. पण, न्याय आणि अन्याय यासंबंधी तुम्ही जे बोललात त्यामुळे माझे अजून समाधान झाले नाही. न्यायाचे फायदे-तोटे लक्षात न घेता, आत्म्याच्या ठिकाणी

असलेले न्यायाचे स्वयंभू स्वरूप मला समजून घ्यायचे आहे. तुझी हरकत नसेल तर थ्रॅसिमॅक्सची भूमिका पुन्हा मांडून न्यायाच्या स्वरूपाविषयीची सामान्य समजूत मी मांडतो. जे न्यायाने वागतात ते स्वतःच्या इच्छेविरुद्ध वागतात. न्यायाला श्रेष्ठ मूल्य न मानता अपरिहार्य गरज मानतात असे मी म्हणतो. अर्थात, सामान्य माणसाच्या समजुतीत विचारीपणा आहे असे मी म्हणेन. न्यायी माणसापेक्षा, अन्यायी माणसाचे जीवन सुखी व चांगले असते असे तो मानतो. अर्थात, हे माझे स्वतःचे मत आहे असे नव्हे पण, थ्रॅसिमॅक्ससारखी अनेक माणसे नेहमी हेच मत सारखे मांडीत असतात. त्यामुळे माझ्यासारख्या व्यक्ती गोंधळून जातात. न्याय हा अन्यायापेक्षा श्रेष्ठ आहे असे योग्य तात्त्विक प्रतिपादन मी अजून ऐकले नाही. न्यायाचे गौरवपूर्ण विवेचन मी ऐकू इच्छितो. इतरांपेक्षा तुमच्याकडून ऐकणे मला अधिक आवडेल. याकरिता अन्यायी माणसाची मी जास्तीत जास्त स्तुती करणार आहे. कारण तेवढ्याच जोरदारपणे न्यायाचा गौरव आणि अन्यायाचे खंडन मला तुझ्याकडून ऐकता येईल. तुला हे पसंत आहे ना ?

**सॉक्रेटिस :** निश्चितच. जिज्ञासू माणसाला यापेक्षा इतर कोणता अधिक आवडीचा विषय असू शकतो.

**ग्लॅकॉन :** उत्तम सांगितलेस. आता न्यायाचे स्वरूप आणि मूळ याविषयी मला काही सांगावयाचे आहे.

'अन्याय्य वर्तन हे मूलतः चांगले असते पण त्याचा अनुभव वाईट असतो.' असे सांगतात. अन्यायाच्या अनुभवाने येणारा वाईटपणा अन्याय्य वर्तनाने मिळणाऱ्या चांगलेपणापेक्षा जास्तच असतो. अन्यायाच्या अनुभवाचे चटके आणि अन्याय्य वर्तन या दोन्हींचे अनुभव घेतल्यावर अन्याय सोसण्याला आणि करण्याला असमर्थ असलेल्या लोकांनी न्याय्य वर्तन करायचे ठरवले. यामुळे माणसामाणसांत कायदे आणि करार निर्माण झाले. म्हणून कायदा जे ठरवील ते 'न्याय्य' आणि 'कायदेशीर' असे ठरले. हेच न्यायाचे स्वरूप आहे. अशी न्यायाची निर्मिती झाली. अन्याय्य वर्तन करून शिक्षा न भोगणे ही चांगली अवस्था आणि प्रतिकार न करता आल्यामुळे अन्याय भोगणे ही वाईट अवस्था. न्यायाची जागा या दोन अवस्थांमध्ये आहे. न्यायतत्त्व दोन विरुद्ध अवस्थांचा मध्य असल्याने त्याचे पालन समाधानवृत्तीने होते. अन्याय्य वर्तन करणारे लोक दुर्बल असल्याने ते न्यायतत्त्व मानतात. न्याय चांगला आहे म्हणून ही मान्यता मिळते असे नाही. सर्वसामान्य लोक म्हणतात की, जो खरा समर्थ आहे आणि अन्याय करण्याची ताकद ज्यांच्यात आहे अशी माणसे 'माणसाने अन्याय्य वर्तन' करू नये या तत्त्वाला मान्यता देणार नाहीत. असा करार करण्याइतकी ती दुर्बल होणार नाहीत. न्यायाच्या निर्मितीविषयी सॉक्रेटिस, अशी सामान्य समजूत असते, न्यायतत्त्वे लोक मोडत नाहीत कारण ते सामर्थ्य त्यांच्यात नसते'. मी पुढे जे म्हणतो त्यावरून हे लगेच लक्षात येईल. समजा आपण सत्प्रवृत्त आणि दुष्प्रवृत्त लोकांना पाहिजे तसे वागू दिले आणि ते आपणहून काय करतात ते पाहिले तर अन्यायी माणसाचे अनुकरण न्यायी माणूस करतो आहे, असे दिसते. प्रत्येक माणूस स्वभावतः लोभी

असतो. तसे वागण्यात त्याला बरे वाटते. त्यानुसार तो वागत असतो. कायद्याचे दडपण आणि सामाजिक समतेचा आदर्श यामुळे या प्रवृत्तीला थोडी मुरड पडते. प्राचीन इतिहासामधील, लिडियाचा सम्राट क्रीसस याचे पूर्वज गिजिस याचेजवळ अफाट सामर्थ्य होते. चांगल्या आणि वाईट प्रवृत्तीच्या माणसांना जर ही शक्ती मिळाली तर परिपूर्ण स्वरूपाचे आचारस्वातंत्र्य ते उपभोगू शकतील. ही गोष्ट प्रसिद्ध आहे. गिजिस नावाचा एक धनगर त्या वेळच्या राजाकडे नोकर होता. एकदा मोठे वादळ झाले, धरणीकंप झाला. जोरात पाऊस पडला. तो धनगर जिथे मेंढ्या चारीत होता त्याजवळच मोठा खड्डा पडला. त्याला फार आश्चर्य वाटले. तो त्या खड्ड्यात घुसला. खूप आश्चर्यकारक गोष्टी त्याला आढळल्या. त्यामध्ये खिडक्या असलेला एक पोकळ पितळी घोडापण होता. त्याने आत डोकावून पाहिले. त्यात एक भले मोठे प्रेत होते. प्रेताच्या हातातील सोन्याची अंगठी घेऊन तो बाहेर आला. त्यानंतर धनगरांची सभा भरली. राजाकडे मेंढपाळीचा मासिक अहवाल पाठवावयाचा होता. इतरांबरोबर बसला असताना त्याने हातातील अंगठी फिरविली. कोंदण दिसताच तो इतरांना अदृष्य झाला. तो तिथे नाही असे समजून इतर धनगर त्याच्याविषयी बोलू लागले. त्याने उलट अंगठी फिरविल्याबरोबर तो प्रगट झाला. अंगठीचा हा चमत्कार त्याने बऱ्याच वेळा अनुभवला, कोंदण आत ओढले की आपण अदृष्य होतो आणि बाहेर ओढले की प्रगट होतो हे त्याला कळून चुकले. लागलीच त्याने राजाला अहवाल देणारा दूत म्हणून आपली नेमणूक करून घेतली. तो राजवाड्यात गेला. राणीला त्याने वश केले. तिच्या मदतीने राजाचा वध केला आणि स्वतःच सम्राट बनला.

समजा अशा दोन अंगठ्या आहेत. न्यायी आणि अन्यायी माणसांनी त्या वापरल्या तर काय दिसेल ? मोह टाकून कोणीही न्यायाने वागणार नाही. बाजारात गेल्यावर काहीही करण्याचे स्वातंत्र्य असेल तर शेजाऱ्याच्या वस्तूला हात न लावण्याचा निश्चय कोणाचाही होणार नाही. कोणाच्याही घरात शिरण्याची, कोणत्याही स्त्रीचा उपभोग घेण्याची, कुणासही ठार मारण्याची किंवा तुरुंगातून सुटका करण्याची किंवा देवासमान काहीही करण्याची शक्यता असताना एकही व्यक्ती मोहापासून दूर राहणार नाही. याचा अर्थ इच्छापूर्तीच्या कार्यात न्यायी माणूस हा अन्यायी माणसासारखाच वागेल. दोघांचा मार्ग एकच असेल. मानवी प्रवृत्तीचा हा सबळ आधार आहे.

यावरून असे सिद्ध होते की, न्याय हा स्वेच्छेने कुणाला आवडत नाही. नाखुषीने तो पाळला जातो. कारण न्यायामुळे फायदा होत नाही. कुठलाही अडथळा नसेल तर लोक न्याय मोडतात. प्रत्येक व्यक्ती मानते की, स्वतःच्या दृष्टीने अन्याय हा न्यायापेक्षा उपयुक्त आहे. जे हे तत्त्व मानतात त्यांना ते योग्य वाटते. पूर्ण स्वातंत्र्य असताना जर एखादी व्यक्ती अन्यायाने वागली नाही किंवा दुसऱ्याची संपत्ती तिने हिरावून घेतली नाही तर ती मूर्खच म्हटली पाहिजे. मनातल्या मनात लोक अशा माणसाची कीव करतील. तोंडासमोर मात्र त्याची स्तुती करतील. मला वाटते एवढे सांगणे पुरे आहे.

आता आपण पूर्ण न्यायी आणि पूर्ण अन्यायी अशा माणसांची तुलना करून निर्णय घेऊ म्हणजे त्यांच्या जीवनाविषयी काही ठरविता येईल. अन्यायी माणूस अन्याय करण्यात आणि न्यायी माणूस न्यायाने वागण्यात उणे पडत नाहीत. आपापल्या वर्तनात ते पूर्ण आहेत असे आपण गृहित धरू. अन्यायी माणूस तज्ज्ञ कारागिराप्रमाणे वागतो. त्याचे कारण उत्तम कप्तान किंवा डॉक्टर व्यवहाराच्या दृष्टीने फायदा-तोटा कशात आहे हे जाणत असतात. फायद्याची गोष्ट करतात आणि तोटयाची टाळतात. जर काही चुकले तर दुरुस्त करतात. म्हणजे आपल्या अन्याय्य कृत्यामध्ये अन्यायी माणूस चुकत नाही असे आपण गृहित धरू. जर चुकला तर तो त्या बाबतीत अज्ञानी मानला पाहिजे, न्यायाने वागत नसताना तसे दाखवणे हा अन्यायाचा उच्चांक होय. म्हणून पूर्ण अन्यायी पराकाष्ठेचा अन्याय करतो असे आपण गृहित धरू. अन्याय करीत असतानासुद्धा या माणसाची न्यायी व्यक्ती म्हणून प्रसिद्धी असते असेही आपण गृहित धरू. आपल्या वाईट वागण्याबद्दल जर कोणी विचारले, तर प्रभावी वक्तृत्वाने तो स्वतःचे समर्थन करू शकतो. धाडस, सामर्थ्य, मित्र, पैसा यांचा लागेल तसा उपयोग करतो. स्वतःच्या चुका सावरतो असे आपण मानू. अशा अन्यायी माणसाची तुलना, एश्चिलसच्या मते,[1] जो सज्जन वाटतो त्याच्याशी नव्हे तर खऱ्या सत्प्रवृत्त, सरळमार्गी उदार मनाच्या माणसाशी केली पाहिजे. त्याचा वरवरचा न्यायीपणा दूर ठेवला पाहिजे. त्याच्या बाह्य न्यायीपणामुळे त्याला प्रसिद्धी, सन्मान, देणग्या मिळतात. यामुळे त्याचा न्यायीपणा ठरतो की न्यायाबद्दलच्या त्याच्या आवडीमुळे ठरतो हे मग ठरवणे कठीण असते. म्हणजेच न्यायी माणसापासून सर्व अन्याय्य प्रवृत्ती दूर काढल्या पाहिजेत आणि अन्यायी माणसापासून सर्व न्याय्य प्रवृत्ती दूर काढल्या पाहिजेत. एकही अन्याय न करता तो अन्यायी म्हणून प्रसिद्ध असला पाहिजे. असे झाले म्हणजे त्याच्या सद्‌गुणांची कसोटी लागेल आणि अपकीर्तीच्या परिणामांना तो कसे तोंड देतो ते कळून येईल. अगदी मरेपर्यंत तो न्यायाने वागला तरी अन्यायी म्हणून त्याची दुष्कीर्ती झाली पाहिजे. अशा तऱ्हेने न्याय आणि अन्याय यांच्या एकांतिक भूमिकांचा विचार केल्यावर न्यायी माणूस सुखी असतो की अन्यायी माणसाचे जीवन सुखी असते हे ठरवणे शक्य होईल.

**सॉक्रेटिस :** छान ! ग्लॅकॉन, तू तुझे म्हणणे फारच उत्तम रीतीने सांगितलेस. दोन सुबक मूर्तीतील चांगली कोणती याची निवड करण्याचे कामच तू माझ्यापुढे ठेवले आहेस.

**ग्लॅकॉन :** माझ्या शक्तीनुसार मी बाजू मांडली आहे. अशा तऱ्हेने न्यायी व अन्यायी माणसाचे स्वरूप सांगितल्यानंतर, त्यांच्या आयुष्याविषयी अंदाज करण्यात काही अडचण येणार नाही असे मला वाटते. त्याविषयीच्या विवेचनास मी आता सुरुवात करतो. अर्थात ते विवेचन मुद्देसूद झाले नाही तर तो दोष माझा नसून न्यायापेक्षा अन्यायच अधिक श्रेष्ठ आहे असे समजणाऱ्या लोकांचा आहे असे समजावे. त्यांच्या मते मारणे, निरनिराळी संकटे

---

[1] Seven against Thebes 574.

आणणे, बांधून ठेवणे, डोळे काढणे इ.सारख्या नानाविध शिक्षांच्या द्वारे न्यायी माणसाला त्रास देऊन शेवटी त्याला मृत्युदंडही दिला जातो. त्यामुळेच खऱ्या न्यायीपणापेक्षा वरवरचा न्यायीपणाच अधिक चांगला असे न्यायी माणसाला वाटू लागते. एश्चिलसचे वर्णन न्यायी माणसापेक्षा अन्यायी माणसालाच योग्य ठरते. कारण अन्यायी माणूस खरोखरच अन्यायाने वागत असतो. खोटया अन्यायाने नव्हे, तर खरोखरच अन्यायाने तो वागतो. अन्यायाने वागण्याचे तो ढोंग करीत नाही "त्याचे मन खोल व सुपीक जमिनीसारखे असल्याने त्यात शहाणपण सहज रुजते' आणि खूप योजना सफल होतात."[1] त्याच्या गुणाच्या कीर्तीमुळे अधिकाराच्या जागा त्याला मिळतात, त्याच्या आवडत्या स्त्रीशी त्याला विवाह करता येतो, आपल्या मनाला येईल त्या घराण्यात मुली देता येतात. शिवाय स्वतःच्या इच्छेनुसार कोणाबरोबरही करार व भागीदारी करता येते. तसेच अन्यायाने वागण्याच्या बाबतीत बेफिकीर असल्यामुळे त्याला अनेक गोष्टी मिळवून श्रीमंत बनता येते. जेव्हा शत्रूबरोबर वैयक्तिक किंवा सार्वजनिक संघर्ष निर्माण होतो त्यावेळी शत्रूंचा नायनाट करून तो श्रीमंत बनतो. मित्रांचा फायदा आणि शत्रूंचे नुकसान करू शकतो. भव्य स्वरूपात यज्ञयाग करून तो देवतांना संतुष्ट करू शकतो. या प्रकारे देव आणि त्याची आवडती माणसे यांना संतुष्ट ठेवल्यामुळे न्यायी माणसापेक्षा अन्यायी माणूसच देवांना प्रिय होण्याची शक्यता असते. म्हणून सॉक्रेटिस, न्यायी माणसापेक्षा अन्यायी माणसाचे जीवन सुखी करण्याची देव आणि मानव यांच्याकडून तजवीज होते.

[ग्लॅकॉनचे बोलणे संपले. त्याच्याशी काय बोलावे याबद्दल मी विचार करीत होतो. तेवढ्यात त्याचा भाऊ ॲडिमँट्स म्हणाला :]

**ॲडिमँट्स** : वरील सिद्धान्ताचे योग्य स्पष्टीकरण झाले आहे असे सॉक्रेटिस तुला वाटते ना ?

**सॉक्रेटिस** : हो. पण तुम्हा दोघांना अधिक काही बोलावयाचे आहे काय ?

**ॲडिमँट्स** : मुख्य तेच सांगावयाचे राहून गेले.

**सॉक्रेटिस** : मग ' भावाला भाऊ मदत करो ' या म्हणीप्रमाणे ग्लॅकॉनच्या बोलण्यात जे दोष असतील ते तू दूर कर. खरे सांगावयाचे तर ग्लॅकॉनचे बोलणेच माझा पराभव करण्यास पुरेसे आहे. न्यायाचा गौरव करण्यास आता मी असमर्थ आहे.

**ॲडिमँट्स** : काहीतरीच काय ! आता थोडे माझ्या बोलण्याकडे पहा. मी थोडे ग्लॅकॉनच्या विरुद्ध—अन्यायाची निंदा करणार आहे, न्यायाची स्तुती करणार आहे—वागणार आहे. ग्लॅकॉनच्या बोलण्याचा अभिप्राय अधिक स्पष्ट होण्यास मला हे बोलले पाहिजे. मला असे वाटते की, आई-वडील किंवा अन्य माणसे मुलांना किंवा ज्यांच्याबद्दल आस्था वाटते अशा लोकांना ' न्यायाने वागले पाहिजे ' असे सांगतात, तेव्हा ती स्तुती न्यायाची नसते तर न्याय्य

---

[1] Seven against Thebes 574.

वर्तनाला जी सामाजिक मान्यता असते तिचा तो गौरव असतो. पालकांना असे वाटते की, मुले न्यायाने वागली की त्यांना कीर्ती मिळेल, बढती मिळेल, चांगल्या ठिकाणी लग्न जुळेल इत्यादी. शिवाय ग्लॅकॉनने वर्णन केलेले न्यायी माणसाच्या न्याय्य वर्तनापासून मिळणारे फायदेही मिळतील. कीर्तीचे इतरही फायदे आहेत. सज्जन माणसाला देव अनेक देणग्या देतात असे हिसियड, होमरसारख्या कवींनी म्हटले आहे. आपल्याविषयी देवाचे मत चांगले झाले तर त्या मिळतात.

हिसियड म्हणतो, "प्रभूकृपेने न्यायी माणसाचे ओक वृक्ष फुला-फळांनी बहरून जातात. मधमाशा वृक्षांच्या फांद्यावर घोंगावतात. मेंढरांना भरगच्च लोकर येते"[1] इतरही फायदे देवकृपेने होतात.

होमर म्हणतो, "सद्‌गुण आणि शहाणपण यांनी युक्त असा देवतुल्य, निष्कलंक राजा जसा न्यायाने वागतो तसाच न्यायी माणूसही वागतो. त्यामुळे त्याच्या जमिनीत गहू व इतर पिके भरपूर येतात. त्याच्या बागा फळांनी भरून जातात. त्याच्या मेंढयांना खूप संतती होते. समुद्रात त्याला खूप मासे मिळतात."[2] म्युझेस आणि त्याचा मुलगा युमोलपस् यांनी केलेले न्यायी माणसाला देवाकडून मिळणाऱ्या देणग्यांचे वर्णन यापेक्षाही अधिक सुखकारक आहे. पितृलोकामध्ये मेजवानीच्या प्रसंगी न्यायी माणसाला सज्जनाजवळ बसवितात. त्याच्या डोक्यावर फुलांचा मुकुट घातला जातो. त्याला मद्य प्यावयास मिळते. प्रलयापर्यंत मद्यपानाची परवानगी हे सद्‌गुणाचे बक्षीस होय.

काही व्यक्तींनी या दैवी देणग्यांची संख्या वाढविली आहे. जे सज्जन दिलेले वचन पाळतात त्यांची मुले व वंशज सुखी होतात. न्यायाची जशी अशी स्तुती आढळते, तशीच अन्यायी माणसाला भोगावे लागणारे भोग ह्यांचेही वर्णन आढळते. यमलोकामध्ये अन्यायी माणसाला दलदलीत बुडविले जाते. चाळणीतून पाणी आणण्याची शिक्षा होते. त्याच्या जिवंतपणी त्याला दुष्कीर्ती मिळते. खऱ्या न्यायी माणसाला जी दुष्कीर्ती जिवंतपणी भोगावी लागते ती दुष्कीर्ती अन्यायी माणसाला मरणोत्तर भोगावी लागते. यापेक्षा अधिक वर्णन त्यांनी केलेले नाही. न्यायाची स्तुती आणि अन्यायाची निंदा त्यांनी केली आहे.

न्याय आणि अन्याय याबद्दल सॉक्रेटिस, आणखी एका तऱ्हेने सामान्य लोक विचार करतात. न्यायाने वागणे योग्य असले तरी अवघड व त्रासदायक असते. याउलट अन्यायाने मिळणारी सुखे सहजगत्या मिळणारी असतात. केवळ कायदा आणि लोकनीती यांमुळेच त्यांना निषिद्ध मानले जाते. सर्वसामान्य माणसाच्या मते अप्रामाणिकपणा हा प्रामाणिकपणापेक्षा जास्त फायदेशीर असतो. दुष्ट माणसे श्रीमंत किंवा अधिकारी असली तर लोक त्यांचे खाजगी किंवा सार्वजनिक सत्कार करतात. उलट जे लोक गरीब, दुबळे पण चांगले असतात त्यांना लोक तुच्छतेने वागवून अन्याय करतात. देव आणि सज्जन यांबद्दल पण त्यांची विपरित विचारसरणी असते. देव सज्जनांना दुःख भोगावयास लावतो तर

---

[1] Hesiod Works and Days 231. [2] Homer Odyssey XIX 109.

दुर्जनांना सुखात ठेवतो. ढोंगी ज्योतिषी श्रीमंतांना सांगतात, "आम्हांस मिळालेल्या दैवी शक्तीच्या मदतीने, मंत्रांचे पुरश्चरण करून, अन्नछत्र घालून आपण पूर्वजांनी केलेली पापे धुऊन काढू शकतो. न्यायी व अन्यायी अशा कोणत्याही माणसाचे पारिपत्य तुम्हांस करावयाचे असेल तर आम्ही मंत्रसामर्थ्याने ते थोडक्या खर्चात करून देऊ. देव आम्हांला वश आहे." ही सामान्य माणसे दुर्गुणांची थोरवी गाताना महाकवींचाही आधार घेतात.

हिसियड म्हणतो, "दुर्जनता लोकांत सहज आढळते. दुष्टतेचा मार्ग सरळ असतो. सद्‌गुणासाठी मात्र घाम गाळावा लागतो. पापाचे घर जवळ असते तरी ईश्वराघरी जाण्याचा रस्ता मात्र लांब आणि चढणीचा असतो."[1] देवही आपमतलबी असतात, असे लोक थोरांची वचने आधारभूत घेऊन म्हणतात. होमर म्हणतो, "देव प्रार्थनेने वश होतो. दुसऱ्यास त्रास दिला, पाप केले आणि देवाची करुणा भाकली, देवांना धूप, दीप, बळी अर्पण केला तर देवतांचा राग शांत होऊन त्या दया करतात."[2] सिलीन, म्युझेस यांची मुले असणारे म्युझियस आणि ऑर्फ्युस यांनी लिहिलेली धार्मिक विधींच्या विषयीची पुस्तके सामान्य लोक आधारास घेतात. त्यानुसार जिवंतपणी वा मेल्यावर पापमुक्त होण्यासाठी काही यज्ञ, व्रतवैकल्ये ते करतात. हीच विचारसरणी ते सर्वत्र पसरवितात. हे विधी केल्याने पाप व दुःख यांपासून मुक्ती मिळते, जर ते केले नाहीत तर भयकर आपत्ती भोगावी लागते असा धाक ते इतरांना घालतात. सद्‌गुण आणि दुर्गुण यांच्याविषयी देवता आणि माणसे यांना काय वाटते याविषयी सॉक्रेटिस, जेव्हा अशी मते वारंवार प्रसृत होतात तेव्हा त्यांचा सत्प्रवृत्त तरुण मनांवर काय परिणाम होईल ? तरुणांना उडत्या पक्षाप्रमाणे भर्रकन विचार करून निष्कर्ष काढण्याची सवय असते. कोणते आयुष्य चांगले, कोणता स्वभाव, कोणता मार्ग युक्त याविषयी ही तरुण माणसे काय निष्कर्ष काढतील. पिंडारच्या भाषेत हे तरुण स्वतःशी म्हणतील, "किल्ल्यासारखे बळकट आणि श्रेष्ठ स्थान मी न्यायमार्गाने गाठावे की लबाडीने गाठावे. लोक म्हणतात न्यायी माणसाला योग्य कीर्ती मिळत नाही, फायदा न मिळता उलट त्रास होतो. उलट अन्यायी असतानाही न्यायी असल्याचा देखावा केला तर लौकिक आणि सुख मिळते." जर शहाणी माणसे आतल्या सत्तेऐवजी बाह्य देखाव्याने सुख मिळते असे सांगतात तर दिखाऊपणाचाच मार्ग मी स्वीकारला पाहिजे. केवळ बाह्य देखाव्यासाठी बाहेर एखाद्या सद्‌गुणाचे चित्र लावून, आर्चिलोकस म्हणतो त्याप्रमाणे लुच्चेपणा आणि चापल्य यांचे प्रतीक असलेले कोल्हयाचे चित्र मी प्रमाण मानले पाहिजे. अर्थात दुष्टपणा झाकून ठेवणे सोपे नाही, असा आक्षेप येथे कोणी घेईल, त्यावर असे म्हणता येईल :

जगात कोणतीच मोठी गोष्ट सोपी नसते. सुख हवे असेल तर हे पत्करलेच पाहिजे. असाच याचा अर्थ ! अशा फसवणुकीसाठी गुप्त मंडळांची मदत घेता येईल, न्यायसभा आणि लोकसभा यांचे मन वळविता येईल, त्यासाठी योग्य शिक्षकाकडून वक्तृत्वकला शिकता येईल आणि अशा तऱ्हेने इष्ट वा अनिष्ट मार्गाने स्वार्थ साधून निर्भय अप्रामाणिकपणाचे

---

[1] Hesiod Works and Days 287. [2] Illiad IX 497.

जीवन जगता येईल. यावरही कोणी असे म्हणेल की, देवांना फसविता येत नाही किंवा आपल्या इच्छेप्रमाणे करण्यास त्यांच्यावर सक्ती करता येत नाही. पण देव जर अस्तित्वातच नसले किंवा मानवी व्यवहाराबद्दल उदासीन असले तर काळजीचे काय कारण ? आणि जर ते असले तर दंतकथा आणि कवींची मते यांनाच काय ते त्यांचे ज्ञान आहे. हीच माणसे देवांना यज्ञ, प्रार्थना, नवस, देणग्या यांनी वश करता येते असे सांगतात.

देव आहेत आणि नाहीत अशी दोन्ही मते आपण खरी मानली पाहिजेत. देवांच्या अस्तित्वावर आपण विश्वास ठेवला तर पापाच्या पैशाने त्यांना नवस करता येईल. न्यायाने वागले तर देव शिक्षा करणार नाही हे खरे पण मग अन्यायाने मिळणारे फायदे मिळणार नाहीत. उलट जर आपण अन्यायाने वागलो तर व्यावहारिक फायदे मिळतीलच आणि प्रार्थनेने पाप व गुन्हा यांमुळे मिळणारी शिक्षा टाळता येईल.

अर्थात या जन्मी जिवंतपणी केलेल्या पापाचे प्रायश्चित्त स्वतःला व मुलांना यमलोकात भोगावे लागेल असे कोणी म्हणतील. मंत्र आणि पापक्षालक देवता यांच्या सामर्थ्यावर आपण विश्वास ठेवावा असे त्याबाबत म्हणता येईल. बलाढ्य नेते, प्रतिभासपन्न द्रष्टे आणि महाकवी यांनीही तसेच सांगितले आहे.

तर सॉक्रेटिस, अन्यायापेक्षा न्यायाने वागणे योग्य या तत्त्वाबद्दल आता काय म्हणता येईल ? जर आपण शिष्टाचार, व्यवहार यांत अन्यायाने वागत राहिलो तर देवता आणि मानव यांच्याबरोबर आपल्याला या आणि पुढच्या आयुष्यात मनासारखे वागता येईल. थोर लोकांचे असेच म्हणणे आहे. बुद्धिमत्ता, सौंदर्यसृष्टी, श्रीमंती, कुलीनपणा यांनी युक्त असलेली व्यक्ती हे सर्व लक्षात घेऊन कधी न्यायाने वागेल का ? न्यायाची स्तुती ऐकून तो हसणार नाही काय ? मी जे म्हटले ते असत्य असे जर कोणी दाखविले आणि न्यायच श्रेष्ठ असा जर कोणाचा विश्वास असला तर तो माणूस अन्यायी माणसावर रागावणार नाही, त्याला क्षमाच करेल. अन्यायाची चीड असणारे देवतुल्य खरे ज्ञानी लोक सोडले तर कोणत्याही व्यक्तीला स्वेच्छेने न्यायाचे पालन नको असते. भीती, वार्धक्य, दुबळेपणा यांमुळे अन्यायीपणाने वागण्यास असमर्थ असणाऱ्या व्यक्ती, अन्यायी जीवनास नावे ठेवतात. जर एखाद्या व्यक्तीला उच्च दर्जाचा अधिकार मिळाला तर तो लगेच अन्यायाने वागू लागतो यावरून हे लगेच सिद्ध होते.

मी आणि माझा भाऊ सुरुवातीस जे म्हणालो तेच, सॉक्रेटिस, यामागचे खरे कारण आहे. न्यायीपणाने वागल्याने लोकप्रियता, मानसन्मान, संपत्ती मिळते. म्हणूनच इतिहासातील सुप्रसिद्ध व्यक्तींनी किंवा न्यायाचा पुरस्कार करणाऱ्यांनी न्यायी जीवनाची प्रशंसा आणि अन्यायी जीवनाची निंदा केली आहे. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे की, माणसाच्या आत्म्यामध्ये न्याय आणि अन्याय यांचे नियंत्रण करणारी देव आणि मानव यांना न दिसणारी जी एक शक्ती असते तिचे स्वरूप आजपर्यंतच्या वाङ्मयात कधीही पूर्णपणे प्रगट झाले नाही. अन्याय हा आत्म्याचा पापरूप कलंक आणि न्याय म्हणजे आत्म्याचे पुण्यरूप मानचिन्ह, असे कुठेही म्हटलेले दिसत नाही. अन्यायाने आत्म्याला पाप चिकटते असे मानून प्रत्येकाने स्वतःबद्दल खबरदारी घेतली असती पण तरुणांना त्यांच्या लहानपणापासून तसे कुणी शिकविले नाही, त्यांच्या मनाची घडण केली नाही.

थ्रॅसिमॅक्ससारख्या व्यक्ती, न्यायाविषयी आणि अन्यायाविषयी माझ्यापेक्षाही अधिक समर्थपणे बोलू शकतील आणि न्याय-अन्याय यांचे विपरित स्वरूप विशद करू शकतील. पण मला, सॉक्रेटिस, तुमच्यापासून काही लपवायचे नाही. उलट न्याय हा अन्यायापेक्षा कसा श्रेष्ठ आहे त्याचे जोरदार समर्थन मला तुमच्याकडून ऐकायचे आहे. त्याकरिताच मी दुसरी बाजू जोरदारपणे मांडली आहे. मात्र केवळ अन्यायाहून न्याय श्रेष्ठ आहे एवढेच तू न सांगता त्यांचा मानवी जीवनावर काय परिणाम होतो, त्यानुसार 'न्यायी जीवन योग्य का ?' 'अन्यायी जीवन निषिद्ध का ?' ते तू आम्हांला समजावून सांग. त्याचप्रमाणे न्याय आणि अन्याय याबद्दलचा लौकिक विचार न करता न्यायाचे सत्य स्वरूप तू समजावून दे. केवळ बाहय स्वरूपाची चिकित्सा तू करू नकोस. कारण ती फक्त वरवर स्वरूपाची न्यायाची स्तुती वा अन्यायाची निंदा होईल. थ्रॅसिमॅक्ससारखे बलिष्ठांचे हित म्हणजे न्याय आणि दुर्बलांच्या हिताविरोधी कायदा म्हणजे अन्याय असे तुझे मत आहे, असे आम्हांला वाटेल. दृष्टी, श्रवण, विचार, आरोग्य या गोष्टी उपयुक्त असतात म्हणून चांगल्या असतात असे नव्हे तर त्या स्वभावतःच चांगल्या असतात. अशा सद्वस्तूंच्या श्रेष्ठ मूल्यांच्या वर्गात तू न्यायाचा समावेश केला आहेस, म्हणजेच न्याय केवळ उपयुक्ततेचे साधन मूल्य नसते तर न्याय म्हणजे उच्च दर्जाचे स्वभावगत स्वयंभू मूल्य आहे असे तू मानतोस. म्हणूनच न्यायामुळे मिळणारा स्वभावगत फायदा आणि अन्यायाने होणारा तोटा या भूमिकेतून तू न्यायाची प्रशंसा केली पाहिजेस. इतर सामान्य लोक न्याय-अन्यायापासून होणारे फायदे-तोटे, मिळणारी कीर्ती किंवा अपकीर्ती, होणारा सन्मान किंवा अवमान ही भूमिका घेऊ देत. कारण तुम्ही सामान्य लोकांचा दृष्टिकोन स्वीकारून बोलणे मला प्रशस्त वाटत नाही. कारण तुझे सर्व आयुष्य श्रेष्ठ प्रकारच्या तत्त्वचिंतनात तू घालवले आहेस. याकरिता देवता किंवा मानवी व्यक्ती यांना कळो वा न कळो, पण 'न्याय हा माणसाचा सर्वश्रेष्ठ आदर्श का ?' आणि 'अन्याय हे पाप का ?' ते तू आम्हांस दाखवून दे. अन्यायापेक्षा न्याय का चांगला, त्याची केवळ तार्किक सिद्धता न करता, मानवी जीवनातील न्यायाच्या श्रेष्ठत्वाचे तात्त्विक स्वरूप तू आम्हांस समजावून दे.

□ □

# प्रकरण सहा

# सामाजिक जीवनाची मूलतत्त्वे

**[II-367-E—372-A]**

**कथासूत्र :**

[व्यक्ती आणि समाज यांचे जीवन आदर्श होण्याच्या दृष्टीने सामाजिक पुनर्रचनेच्या प्रश्नाचा विचार सॉक्रेटिसने सुरू केला आहे. सामाजिक जीवन व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक असल्याचे मांडून व्यक्ती व समाज यांच्या जीवनाचा प्रारंभ कसा होतो, ते त्यांनी मांडले आहे. मात्र त्याचे विवेचन ऐतिहासिक विकासाचे स्वरूप दाखविण्याकरिता नाही. सामाजिक जीवन मानवी संस्कृतीत कुठे ? केव्हा ? कसे सुरू झाले ? हे शोधणे अवघड व अशक्य आहे. म्हणून सॉक्रेटिसने मूलभूत स्वरूपाच्या मानवी गरजा व प्रेरणा यांचे स्वरूप प्रथम मांडले आहे. आणि त्याच्या पूर्ततेसाठी आवश्यक असणारे किमान स्वरूपाचे सामाजिक जीवन कसे असेल त्याचा विचार केला आहे. म्हणजेच त्याचे विवेचन मानसशास्त्रीय आणि तार्किक विश्लेषणावर आधारलेले आहे.

कोणतीही व्यक्ती स्वयंपूर्ण नसते म्हणून सर्वांना सुसंघटित सामाजिक जीवनात परस्परावलंबी आणि परस्पर सहकार्याचे जीवन जगणे युक्त ठरते. त्याकरिता आपल्या प्रवृत्तीनुसार विशिष्ट क्षेत्रात, व्यवसायात, प्राविण्य, कौशल्य संपादन करणे हे व्यक्तीच्या व समाजाच्या हिताच्या दृष्टीने फायदेशीर ठरते. श्रम विभागाच्या तत्त्वाचा स्वीकार करून प्लेटोने या प्रकरणात प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामाजिक व आर्थिक जीवनाचे चित्र रेखाटले आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** ग्लॅकॉन आणि ॲडिमँट्स बोलत असताना मला फार आनंद होत होता. अर्थात दोघांच्या बुद्धीबद्दल मला प्रथमपासूनच आदर होता. मेगाराच्या लढाईत यश मिळविल्यावर ग्लॅकॉनच्या स्तुतिपाठकाने आपल्या काव्यात त्याच्या मर्दुमकीचे वर्णन करताना म्हटले आहे, "ॲरिस्टॉनच्या देवतुल्य मुलांनो ! तुम्ही वडिलांची कीर्ती योग्य तऱ्हेने सांभाळली आहे !" त्या उद्‌गारांची आठवण देऊन मी त्या दोघांना म्हटले, "प्रिय मित्रांनो, न्याय हा अन्यायापेक्षा श्रेष्ठ आहे याची पूर्ण खात्री तुम्हांस नसतानादेखील तुम्ही त्याचे अप्रत्यक्ष समर्थन फारच चांगले केले आहे. तुमचे बोलणे बरेच खरे आहे. तुमचे मनही सत्प्रवृत्त आहे. न्यायाच्या श्रेष्ठत्वाची तुम्हांस पक्की खात्री नसल्याने, मी तुमच्यावर पूर्णपणे

भरवसा ठेवू शकत नाही. जसा माझा तुमच्यावरील विश्वास वाढतो आहे, तसा माझ्या भूमिकेच्या समर्थनाविषयी माझ्या मनातला गोंधळही वाढतो आहे. मी थ्रॅसिमॅक्सला अन्यायापेक्षा न्यायाची श्रेष्ठता दाखवून दिली होती. पण अजूनही तुमचे समाधान झालेले नाही. अर्थात मी माझे काम अधिक समर्थपणे कसे करू ते मला समजत नाही. अर्थात माझे प्राण आणि वाणी यांच्यात जोपर्यंत सामर्थ्य आहे, तोपर्यंत घाबरटपणे न्यायाची बाजू सोडून देणे मला भयंकर पाप वाटते. माझ्या कुवतीप्रमाणे न्यायदेवतेला मदत करणे हेच मी माझे कर्तव्य मानतो."

त्यानंतर ग्लॅकॉन व इतर व्यक्तींनी चर्चा न थांबवता, न्याय व अन्याय यांच्या स्वरूपाविषयी पूर्णपणे तात्त्विक चिकित्सा करावी आणि त्यांच्या उपयुक्ततेविषयी खरे मार्गदर्शन करावे आणि न्यायदेवतेस मदत करावी अशी मला विनंती केली. त्यावेळी मला जे प्रामाणिकपणे वाटले ते मी त्यांना सांगितले.

यानंतर चर्चा न थांबवता न्याय आणि अन्याय यांच्या स्वरूपाविषयी संशोधन करून त्याविषयी नक्की तत्त्व कोणते हे ठरविण्याची विनंती ग्लॅकॉन आणि इतर मंडळींनी केली, म्हणून मी पुढे सुरुवात केली.

**सॉक्रेटिस** : आपली सध्याची चर्चा ही साध्या विषयावर नसून त्याकरिता प्रखर बुद्धिमत्तेची आवश्यकता आहे. परंतु, माझ्याजवळ तशी बुद्धिमत्ता नसल्याने माझ्या विवेचन पद्धतीप्रमाणेच आपण चर्चा सुरू करावी असे मला वाटते. आपण असे गृहीत धरू की, आपली दृष्टी बेताची असून आपणांस बारीक अक्षरांतले लिखाण दूर अंतरावरून वाचावयास सांगितले आहे. आपल्या सुदैवाने जर तेच लिखाण मोठ्या अक्षरांत लिहिलेले असेल, तर आपण तेच आधी वाचू आणि लहान अक्षरांतील लिखाण त्याप्रमाणेच आहे की नाही हे पडताळून पाहू.

**ॲडिमँट्स** : नक्कीच. पण सॉक्रेटिस या उदाहरणाचा आपल्या न्यायाच्या चर्चेशी काय संबंध ?

**सॉक्रेटिस** : ऐक. व्यक्तीच्या मनात जशी न्यायाची वस्ती असते, त्याप्रमाणेच शहरातही असेल असे आपण मानतो ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : शहर मनुष्यापेक्षा लहान का मोठे ?

**ॲडिमँट्स** : अर्थातच मोठे !

**सॉक्रेटिस** : मग न्याय हा शरीरापेक्षा मोठ्या अशा शहरात निश्चितच आपणांस लवकर सापडू शकेल. म्हणून तुमची संमती असेल तर शहरातील न्यायाचे स्वरूप आपण प्रथम पाहू आणि नंतर त्या स्वरूपाची तुलना व्यक्तीतील न्यायाशी करू.

**ॲडिमँट्स :** छान ! तुमची कल्पना मला पसंत आहे.

**सॉक्रेटिस :** मग आपण आपल्या कल्पनेनुसार शहराची रचना केली तर आपल्याला त्यात न्याय आणि अन्याय यांचे प्रमाण कळू शकेल ना ?

**ॲडिमँट्स :** होय, तशी शक्यता आहे.

**सॉक्रेटिस :** जर असे करता आले तर आपल्याला अशीही आशा बाळगता येईल की, आपल्या शोधाचा विषय आपल्याला लवकर सापडेल.

**ॲडिमँट्स :** हो बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मग आता माझ्या पद्धतीप्रमाणे आपण काम करावे ना ? हे काम महत्त्वाचे असल्याने आपण विचारपूर्वक उत्तर द्यावे.

**ॲडिमँट्स :** आम्ही पूर्ण विचार केला आहे. आपण पुढे चला.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. मनुष्याच्या गरजांवरच शहराची उभारणी होते असे मला वाटते. कारण कोणतीही व्यक्ती पूर्णतः स्वावलंबी नसते. उलट प्रत्येकाच्या गरजाच अधिक असतात. शहराच्या निर्मितीचे यापेक्षा वेगळे कारण असू शकेल काय ?

**ॲडिमँट्स :** नाही. माझेही मत तुमच्यासारखेच आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या गरजा पुष्कळ असल्याने आणि प्रत्येक व्यक्तीला स्वतःची गरज भागविण्यास दुसऱ्या व्यक्तीची गरज आवश्यक असल्याने मदत करणारे लोक एकेच ठिकाणी असावे लागतात. या एकत्र राहण्याच्या ठिकाणालाच आपण शहर म्हणतो ना ?

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** प्रत्येक व्यक्ती दुसऱ्याला काहीतरी देऊन त्याच्या मोबदल्यात काहीतरी घेते. अशी देवाण घेवाण करताना " आपला यात फायदाच आहे " अशी प्रत्येकाची खात्री असते.

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** तर मग आपण आता काल्पनिक शहराची उभारणी करू या. आपल्या नैसर्गिक गरजांच्या पायावरच शहराची उभारणी होईल असे मला वाटते.

**ॲडिमँट्स :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** अत्यंत आवश्यक गरज म्हणजे अन्न होय.

**ॲडिमँट्स :** अर्थातच

**सॉक्रेटिस :** दुसरी गरज निवारा व तिसरी गरज वस्त्रे.

**ॲडिमँट्स :** बरोबर आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९८६
दा. क्र. २५९१४
निबंध
ग्रंथ शाखा

**सॉक्रेटिस :** मग या गरजा शहराकडून पूर्ण होण्याकरिता कोणते लोक पुरेसे होतील याचा आपण विचार करू. शेतकरी, गवंडी आणि विणकर या लोकांपासून सुरुवात केली पाहिजे. एवढे लोक आपणांस पुरतील काय ? का चांभार व त्याच्यासारखेच इतर लोक यांचाही समावेश करावा ?

**ॲडिमँट्स :** काही हरकत नाही.

**सॉक्रेटिस :** तर मग सर्वांत लहान असे शहर चार-पाच लोकांचेच होईल.

**ॲडिमँट्स :** होय, असे होईल खरे.

**सॉक्रेटिस :** आता ह्या लोकांपैकी प्रत्येकाने आपले काम सर्व लोकांपुढे ठेवायचे काय ? उदा. शेतकऱ्याने चारजणांकरिता अन्न तयार करून व त्या अन्नाच्या तयारीला लागणारा वेळ आणि श्रम चौपट खर्च करून इतरांबरोबर आपली वाटणी घ्यावी काय ? का इतरांची पर्वा न करता केवळ स्वतःच्या वाटणीच्या अन्नाकरिता एक-चतुर्थांश वेळ खर्च करून, बाकीचा वेळ कपडे शिवण्यात, बूट शिवण्यात घालवावा ? स्वतःचे काम स्वतःकरिता करून बाकीच्यांशी वाटणी करण्याची कटकट टाळावी असे तुम्हाला वाटते काय ?

**ॲडिमँट्स :** सॉक्रेटिस, दुसऱ्यापेक्षा पहिला मार्ग सोयीस्कर दिसतो.

**सॉक्रेटिस :** बरोबर आणि तो शक्यही आहे. तुझे उत्तर ऐकून मला आठवले की. मूलतः कोणतीही दोन माणसे अगदी एकमेकांसारखी जन्माला येत नाहीत. शिवाय स्वभावामध्ये भिन्नता असतेच. एकाला एक काम येते, तर दुसऱ्याला दुसरेच. तुला असे वाटते ना ?

**ॲडिमँट्स :** अगदी असेच वाटते !

**सॉक्रेटिस :** माणसाला सुयश केव्हा मिळते ? पुष्कळसे उद्योग करण्यात श्रमले असता मिळते की एकाच धंद्याला पूर्णपणे वाहून घेतल्यावर ?

**ॲडिमँट्स :** एकाच धंद्यात पूर्णपणे लक्ष केंद्रित केल्यावर.

**सॉक्रेटिस :** कोणत्याही कामाचा योग्य काळ गमावला की तो परत येत नाही हे उघडच आहे.

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** कारण नेहमी जे काम करायचे असते ते करणाऱ्याच्या लहरीवर लांबणीवर पडते. याविरुद्ध काम करणाऱ्याने ते सर्वांत महत्त्वाचे समजून त्याच्या पाठीमागे लागले पाहिजे.

**ॲडिमँट्स :** हेच करणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** प्रत्येक माणसाने आपल्या स्वभावानुरूप उद्योगात योग्य वेळी, इतर गोष्टींत अडकून न पडता पूर्ण लक्ष घालावे. त्यामुळे तयार होणारा माल संख्येने आणि दर्जाने उत्तम होऊन थोडक्या वेळात करता येतो. हेच वरील विचारावरून सिद्ध होत नाही काय ?

**ॲडिमँट्स :** खात्रीने !

**सॉक्रेटिस :** मग आपण सांगितलेल्या गरजा पुरविण्यास चारपेक्षा जास्त माणसे लागणार. कारण शेतकरी नांगर, कुदळ वगैरे शेतीव्यवसायाला लागणारी अवजारे चांगल्या प्रकारे करू शकणार नाही. त्याचप्रमाणे गवंडीसुद्धा त्याला लागणारी उपकरणे बनवू शकणार नाही. हीच गोष्ट चांभार आणि कोष्टी यांच्या बाबतीत आहे.

**ॲडिमँट्स :** बरोबर: हे खरे आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणून लोहार, सुतार आणि तशाच प्रकारचे इतर कारागीर आपल्या या छोटया राज्याकरिता लागल्यामुळे आपली लोकसंख्या वाढू लागेल.

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** शेतकऱ्यांना नांगराकरिता बैल पुरवले पाहिजेत. गवंड्यांना, शेतकऱ्यांना शेतीकरिता गाढवे आणि विणकर, चांभार यांना लोकर व चामडे मिळाले पाहिजे याकरिता आपण गुराखी, धनगर किंवा त्या वर्गातले इतर लोक शहरात आणले तरीसुद्धा ते मोठे होणार नाहीत.

**ॲडिमँट्स :** हे सगळे लोक लक्षात घेतल्यावर त्याला छोटे राज्य म्हटले जाणार नाही.

**सॉक्रेटिस :** शिवाय बाहेरून आयातीची आवश्यकताच पडणार नाही अशा जागेत शहर वसवणे अशक्य आहे.

**ॲडिमँट्स :** होय, ते बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मग शहराला लागणाऱ्या वस्तू बाहेरच्या शहरांतून आणण्यास दुसऱ्या नवीन लोकांचा वर्ग आपल्याला लागेल.

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** आपल्या शहराला लागणाऱ्या वस्तू आपणाला ज्या लोकांकडून आणायच्या आहेत त्यांना आवश्यक असलेल्या वस्तू न घेता आपला दलाल रिकाम्या हाताने गेला तर, त्याला मोकळेच परत यावे लागेल, नाही का ?

**ॲडिमँट्स :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** म्हणून शहरांनी घरच्या घरी स्वत:पुरत्या मालाचे उत्पादन न करता आपल्याला ज्यांची गरज लागणार आहे अशा लोकांच्या रुचीनुसार त्यांना पुरतील अशा वस्तू निर्माण केल्या पाहिजेत.

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** मग आपल्याला शेतकरी आणि इतर कारागिरांची जरूर अधिक लागेल असे मला वाटते.

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : याव्यतिरिक्त, विविध वस्तू आणवणे आणि त्या दुसरीकडे पाठवणे यासाठी दलालही भरपूर लागणार. दलाल म्हणजे व्यापारीच नाहीत का ?

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : म्हणजेच आपल्याला व्यापारी लागणार.

**ॲडिमँट्स** : अर्थात.

**सॉक्रेटिस** : जर व्यापार समुद्रमार्गाने करायचा असेल तर नौकायनात पटाईत असलेले लोकही बरेच आवश्यक असणार.

**ॲडिमँट्स** : होय. लागणार.

**सॉक्रेटिस** : मग शहरातल्या शहरात मालाची देवाणघेवाण कशी करणार ? हा व्यापार वाढविण्यासाठी आपण लोकसंघ स्थापून राज्य स्थापले पाहिजे.

**ॲडिमँट्स** : खरेदी-विक्री करूनच ते देवघेव करतील.

**सॉक्रेटिस** : याकरिता बाजाराची स्थापना होऊन देवघेवीसाठी हुंडणावळीची आवश्यकता भासेल.

**ॲडिमँट्स** : होय. खात्रीने.

**सॉक्रेटिस** : आता विचार करा, एखादा शेतकरी वा कारागीर आपला माल घेऊन बाजारात आला आणि त्याच्या मालाला गिऱ्हाईक मिळाले नाही, तर आपला धंदा सोडून त्याने आळसात वेळ घालवावा हे तुम्हाला पटते का ?

**ॲडिमँट्स** : अर्थात नाही. गिऱ्हाईक मिळवून देण्याचे दलालाचे काम करणारे काही लोक असतात आणि सामान्यतः सुसंघटित राज्यात श्रमाची कामे करायला असमर्थ असलेले अशक्त लोकच असे काम पत्करतात. यांचे काम हेच की, बाजारात उभे राहून ज्यांना माल पाहिजे त्यांना, ज्यांना पैशाच्या मोबदल्यात माल द्यायचा आहे अशांच्याकडून माल देणे हे होय.

**सॉक्रेटिस** : अशा प्रकारची गरज निर्माण झाल्यामुळे आपल्या शहरात किरकोळ मालाची विक्री करणारा वर्ग निर्माण होतो. कारण बाजारात उभे राहून खरेदी-विक्री करणाऱ्या माणसांना आपण किरकोळ विक्रेते आणि एका शहरातून दुसऱ्या शहरात हिंडणारे व्यापारी म्हणतो.

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस :** शिवाय कामकऱ्यांचा आणखी एक वर्ग असतो. बुद्धिमत्ता नसल्याने, मदतनीस होऊ शकत नसले तरी त्यांची शारीरिक क्षमता श्रमाचे काम करण्यास पुरेशी असते. हे लोक आपल्या श्रमांच्या मोबदल्यात भाडे घेतात म्हणून त्यांना भाडोत्री मजूर म्हणतात.

**ॲडिमँट्स :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मग मजूर हा आपल्या राज्याचा एक पूरक वर्ग आहे की नाही ?

**ॲडिमँट्स :** आहे.

**सॉक्रेटिस :** ॲडिमँट्स, आपण असे म्हणू शकतो की, आपले शहर आता पूर्णपणे उभारले गेले आहे.

**ॲडिमँट्स :** कदाचित असे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस :** न्याय आणि अन्याय आपल्याला येथे कोठे सापडतील ? आपल्या शहराच्या उभारणीस आवश्यक वस्तूंबरोबरच कोणत्या तत्त्वामधून त्यांनी प्रवेश केला ?

**ॲडिमँट्स :** मी कल्पना करू शकत नाही. पण वर आपण जे माणसांचे परस्पर संबंध विचारात घेतले, त्या संबंधात त्यांचे अस्तित्व सापडू शकेल.

**सॉक्रेटिस :** असू दे. तुझे म्हणणे कदाचित बरोबर असेल. पण आपण धीर न सोडता अधिक संशोधन केले पाहिजे.

□ □

# प्रकरण सात
# समृद्ध सामाजिक जीवन

**[II-372-A—374-E]**

**कथासूत्र :**

[फक्त प्राथमिक गरजांच्या पूर्तीवर आधारित असे साधे सामाजिक जीवन विशद केले होते. पण त्याची पूर्तता झाली म्हणजे सर्व प्रकारचा सामाजिक विकास झाला असे मात्र नव्हे. म्हणून प्लेटोने या प्रकरणामध्ये माणसाच्या विकासाच्या अधिक वरच्या अवस्था दाखवून संपन्न, समृद्ध, वैभवशाली सामाजिक जीवनाचे चित्र रेखाटले आहे.

परंतु, अशा सामाजिक जीवनात दुर्गुणांचा कसा अंतर्भाव होतो ते सांगून त्यापासून न्यायावर आधारलेले आदर्श राज्य सुरक्षित राखले गेले पाहिजे याबद्दलचा इशाराही दिलेला आहे. तत्कालीन समृद्ध ग्रीक संस्कृतीचे चित्र जसे यात अप्रत्यक्षपणे प्रगट झाले आहे, त्याचप्रमाणे त्यामधील नैतिक दोषही प्लेटोने समर्पकपणे प्रगट केले आहेत. प्लेटोच्या वेळची राजनीती ही शहर-राज्यापुरतीच मर्यादित होती. त्यानुसार हे विवेचन झाले आहे. विविध शहर-राज्यांत नेहमीच झगडे होत. म्हणून आपल्या आदर्श राज्याच्या सुस्थितीकरिता प्लेटोने प्रशासक, संरक्षक आणि उत्पादक असे सामाजिक वर्ग तयार केले आहेत.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** लोकांची कामानुसार व्यवस्था लावून दिल्यानंतर ते आयुष्य कशा प्रकारे घालवतील याचा आपण विचार करू. माझ्या मते धान्य, दारू, कपडे, चपला इत्यादी वस्तू तयार करण्यात, घरे बांधण्यात त्यांचा वेळ जाईल. उन्हाळ्यात अंगात पातळ कपडे घालून ते अनवाणी कामे करतील, तर हिवाळ्यात उबदार कपडे व बूट-मोजे वापरतील. जव व गहू यांच्या पिठापासून तयार केलेल्या पोळ्या वा पुऱ्यांवर आपली गुजराण करतील. गवताच्या चटया किंवा स्वच्छ पानांचा जेवणासाठी व यू व मर्टल झाडांच्या फांद्यांचा बसण्यासाठी उपयोग करून आपल्या मुलाबाळांसह मजेत जेवण करतील. गळ्यात हार घालून, मद्यप्राशन करत, ईश्वराचे गुणगान करीत आनंदाचा आस्वाद घेतील. शिवाय युद्ध आणि दारिद्र्य या संकटांना घाबरून मर्यादित प्रजोत्पत्तीबाबत दक्ष राहतील. [मी असे बोलत असतानाच ग्लॅकॉनने मला अडविले.]

**ग्लॅकॉन :** भाकरीला चव आणणारे काहीही पदार्थ नसताना तुमचे लोक मजा करतात हे आश्चर्यच आहे !

**सॉक्रेटिस** : अरे हो ! विसरलोच की ! मीठ, ऑलिव्हची फळे, लोणी व खेडेगावात मिळणारे उकडलेले कांदे आणि कोबी हे रुचकर पदार्थही त्यांना मिळू शकतील. तसेच अंजीर, वाटाणा, घेवडा वगैरे पदार्थ जेवणानंतर मुखशुद्धीसाठी मिळू शकतील. शिवाय विस्तवावर भाजलेली मर्टल आणि बीच फळे आणि त्याबरोबर मद्यप्राशनही. अशा तऱ्हेने आनंदमय व शांततापूर्ण दीर्घायुष्य जगून मुलांनाही तशाच प्रकारचे आयुष्य मिळावे अशी व्यवस्था करून परलोकाच्या प्रवासास सुरुवात करतील.

**ग्लॅकॉन** : तुम्ही ज्या प्रकारच्या जेवणाचे वर्णन करीत आहात त्यावरून, सॉक्रेटिस, मला असे वाटते की, तुम्ही डुकरांचा संघ स्थापन करीत आहात.

**सॉक्रेटिस** : ग्लॅकॉन, मग तुझ्या मते त्यांची राहणी कशी असावी ?

**ग्लॅकॉन** : अर्थातच सुधारलेल्या माणसाला शोभेल अशी ! जर केवळ कष्टमय आयुष्य त्यांना व्यतित करावयाचे नसेल तर त्यांनी टेबलावर जेवण घेतले पाहिजे व त्यांचे जेवण आधुनिक पद्धतीनुसार तयार केलेले असून त्यानंतर फलाहार असणे आवश्यक आहे.

**सॉक्रेटिस** : असं ! म्हणजे केवळ साध्या शहराची वाढ लक्षात न घेता विलासी शहराचा विचार केला पाहिजे असे तुम्हाला म्हणावयाचे आहे. ठीक आहे. तुमची सूचना चांगली आहे. कारण अशा मोठ्या शहरात न्याय व अन्याय यांचा समावेश कोठून व कसा होतो हे आपणांस लवकर सापडेल. मी आता वर्णन केलेले शहर व्यवस्थित व आरोग्यसंपन्न आहे असे मला वाटते. पण विलासी शहराचाच विचार करावा अशी तुमची इच्छा असेल, तर माझा त्याला विरोध नाही. काही लोकांना अत्यंत साधे आयुष्य आवडत नाही. त्यांना टेबल, खुर्च्या वगैरे सामान अत्यावश्यक वाटेल. तसेच नाना प्रकारची सुगंधी द्रव्ये, तेले, वेश्या आणि मिठाई याही गोष्टी त्यांच्या दृष्टीने आवश्यकच असतील. शिवाय अत्यंत साध्या प्रकारची घरे, वहाणा इ. त्यांची गरज भागवू शकणार नाहीत. त्यामुळेच चित्रकला, शिवणकला इत्यादी कलांची आवश्यकता भासेल व सोने आणि हस्तिदंत यांपासून तयार केलेल्या आकर्षक वस्तूही तयार कराव्या लागतील. होय ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : तर मग या गरजांनुसार आपल्याला आपल्या शहराचा विस्तारही वाढवावा लागेल. कारण इतक्या गरजा आपले पहिले छोटेसे पण आरोग्यसंपन्न शहर पुरवू शकणार नाही. नैसर्गिक गरजा भागविण्याच्या दृष्टीने आवश्यक नसलेले असे अनेक उद्योगधंदे आपणांस निर्माण करावे लागतील. उदा. पारधी, रंग आणि आकृत्या यांचा उपयोग करून प्रतिसृष्टी निर्माण करणारे चित्रकार, गायक, कवी आणि कवी ज्यांचा उपयोग करून घेतात असे असंबद्ध बोलणारे नट, मक्तेदार आणि नर्तक, सगळ्या प्रकारच्या वस्तू निर्माण करणारे आणि बायकांचे पोशाख तयार करण्यात प्रवीण असणारे लोक, शिक्षक, दाया, कपडे शिवणाऱ्या बायका, न्हावी, स्वयंपाकी, हलवाई इ. लोक आपणाला नोकर म्हणून लागतील. तसेच, आपल्या शहराला पूर्वी ज्या लोकांची आवश्यकता नव्हती असे वडार लोक आपल्याला या शहराकरिता लागणार. जनावरेसुद्धा सर्व प्रकारची सांभाळावी लागतील. कारण काही त्यांचे मांस खाणारे असतात.

**ग्लॅकॉन** : होय. ती आपणांस ठेवावी लागतील.

**सॉक्रेटिस** : आता आपल्या नवीन शहरात पूर्वीच्या शहरापेक्षा डॉक्टरांची गरज जास्त लागणार !

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे आपले पूर्वीचे शहर लोकांना पुरत होते, पण आता ते पुरणार नाही असे तुला वाटते ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : मग कुरण आणि शेती यांना भरपूर जमीन असण्याकरिता शेजारची जमीन घेणे भाग आहे. त्याचप्रमाणे शेजाऱ्यांनी आपल्या गरजा आवश्यकतेपेक्षा वाढविल्या आणि अमर्याद संपत्ती साठवावी असे त्यांना वाटले म्हणजे त्यांनाही आपल्याप्रमाणेच दुसऱ्याची जमीन घ्यावीशी वाटेल.

**ग्लॅकॉन** : सॉक्रेटिस, असे होणारच.

**सॉक्रेटिस** : तर मग ग्लॅकॉन, युद्ध करणे हीच आपल्यापुढची दुसरी गोष्ट आहे असे तुला वाटत नाही काय ?

**ग्लॅकॉन** : होय, असेच वाटते.

**सॉक्रेटिस** : सध्या तरी युद्ध हे चांगले किंवा वाईट याविषयी विचार न करता आपणांस एवढेच म्हणता येईल की, युद्धाच्या उत्पत्तीची कारणे राज्यातल्या व्यक्तींवर आणि सगळ्या राज्यावर संकटे आणण्यास कारणीभूत असतात.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : मित्रा, आपल्या राज्यात आणखी एका महत्त्वपूर्ण बाबीची आवश्यकता आहे, ती म्हणजे सैन्य. राज्यातल्या सगळ्या मालमत्तेचे संरक्षण करणे हेच सैन्याचे काम आहे. स्वारी करणाऱ्या लोकांबरोबर त्यांनी युद्ध केले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : असे का ? आपण मघाशी ज्यांच्याविषयी चर्चा करीत होतो ते लोक संरक्षण करण्यास समर्थ नाहीत काय ?

**सॉक्रेटिस** : आपण राज्य उभारताना ज्या तत्त्वांचा स्वीकार केला आहे ती बरोबर धरली तर ते समर्थ नाहीत असेच म्हटले पाहिजे. कारण आपण असे तत्त्व लक्षात घेतले आहे की, एकाच माणसाला पुष्कळ धंदे चांगल्या पद्धतीने करता येत नाहीत.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : युद्ध हा एक स्वतंत्र धंदा नाही काय ?

**ग्लॅकॉन** : होय. आहे.

**सॉक्रेटिस** : चांभाराच्या उद्योगाविषयी आपण जसा विचार करतो, तसाच युद्धाविषयीही करणे योग्य होईल.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** मघाशी चांभाराला आपण असे सांगितले की, त्याचे काम चांगले होण्यासाठी त्याने शेतकरी, कोष्टी किंवा गवंडी यांचे काम करण्याचा प्रयत्न करता कामा नये. त्याचप्रमाणे प्रत्येक कामगाराला त्याच्या कलाप्रमाणे काम दिले आणि बाकी गोष्टींकडे लक्ष न देता, आपला सगळा वेळ आणि मिळत असणारी संधी यांचा पुरेपूर फायदा घेऊन त्याने काम केले, तर तो यशस्वी कामगार गणला जाईल. युद्धाचे काम चांगल्या तऱ्हेने होणे अतिशय महत्त्वाचे नाही काय? ज्याप्रमाणे बुद्धिबळे किंवा फासे यासारखे खेळ लहानपणी अभ्यास केल्याशिवाय, फावल्या वेळात खेळून, कोणालाही जमत नाहीत, त्याप्रमाणे शेतकऱ्याचे किंवा चांभाराचे काम सांभाळून त्या लोकांना युद्धाचे काम योग्य रीतीने करता येईल इतके ते सोपे नाही. नुसती हत्यारे वापरून माणसाला चांगला कामगार किंवा पहिलवान होता येत नाही किंवा त्या हत्यारांचे सामर्थ्य आणि व्यावहारिक उपयोग यांचा अभ्यास केल्याशिवाय त्या हत्यारांचा माणूस चांगला उपयोग करू शकत नाही. त्याचप्रमाणे ढाल किंवा इतर शस्त्रास्त्रे माणसाला वापरता आली म्हणजे त्याच दिवशी मोठ्या सैन्यात किंवा लष्करात त्याला आपले काम उत्तम रीतीने करता येईल हे कसे शक्य आहे?

**ग्लॅकॉन :** हत्यारांचा वापर, जर तो युद्धाच्या कामात निष्णातपणे करणारा असेल, तर बहुमोल समजला पाहिजे.

**सॉक्रेटिस :** मग, संरक्षकांना ज्या प्रमाणात असे महत्त्वपूर्ण कार्य करावयाचे आहे त्याच प्रमाणात इतर धंद्यापासून त्यांना मोकळीक मिळाली पाहिजे. म्हणजे युद्धामध्ये असामान्य कौशल्य आणि सावधानता त्यांना दाखविता येईल.

**ग्लॅकॉन :** माझेही असेच म्हणणे आहे.

**सॉक्रेटिस :** या विशिष्ट उद्योगाला नैसर्गिक आवडीची जरुरी लागेल ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** मग राज्याच्या संरक्षणाकरिता तशा प्रकारची आवड असणारे लोक शोधण्याचे काम आपल्याला केले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** आणि हे काम नक्कीच किरकोळ नाही. तरीसुद्धा प्रयत्नांची पराकाष्ठा करून आपण ते केले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** या बाबतीत आपण माघार घेता कामा नये.

□ □

## प्रकरण आठ

# प्रशासकांचा स्वभाव

**[II-375-A—376-E]**

**कथासूत्र :**

[प्रशासक, संरक्षक आणि उत्पादक हे तीन आदर्श राज्यातील प्रमुख वर्ग होत असे सांगितल्यावर त्यांच्या स्वभावाविषयीची प्राथमिक कल्पना प्लेटोने दिली आहे.

शेतकरी, कलावंत, कारागीर, व्यापारी या सर्वांचा उत्पादक या शेवटच्या वर्गात समावेश होतो. समाजाची समृद्धी त्यांच्यावर अवलंबून असते.

अंतर्गत यादवी आणि बाह्यशत्रूंचे आक्रमण यांपासून राज्याचे संरक्षण करण्याचे कार्य सैनिकांचे असते. ते प्रशासकांचे सहाय्यक असतात.

आदर्श राज्यातील सर्वांत महत्त्वाचा वर्ग म्हणजे प्रशासकांचा होय. या सर्व सत्ताधारी व्यक्ती प्रज्ञावंत, तत्त्वचिंतक आणि निस्वार्थ समाजसेवक असल्या पाहिजेत अशी प्लेटोची अपेक्षा आहे. तरच समाजाचे नैतिक नियंत्रण आणि व्यवस्थापन चांगल्या प्रकारे होऊ शकेल.

वासना, अस्मिता आणि प्रज्ञा या तीन मानवी स्वभावातील प्रमुख घटकांवरून हे तीन सामाजिक वर्ग तयार होतात, असे प्लेटोने म्हटले आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** संरक्षणाच्या कामाला लागणाऱ्या गुणांमध्ये चांगल्या अवलादीचा कुत्रा आणि पराक्रमी तरुण यांमध्ये तू काही फरक समजतोस काय ?

**ग्लॉकॉन :** तुझे बोलणेच मला समजले नाही.

**सॉक्रेटिस :** ते दोघेही शत्रूला शोधून काढण्यात तत्पर असले पाहिजेत. त्याला शोधून काढल्यावर त्याच्यावर हल्ला करण्याची चपळता त्यांच्यात असली पाहिजे. शत्रू समोर उभा ठाकला असताना प्रतिकार करायची शक्ती त्यात असली पाहिजे, असे मला वाटते.

**ग्लॉकॉन :** अर्थात, या सर्व गुणांची आवश्यकता आहे.

**सॉक्रेटिस :** चांगले लढण्याच्या कामीदेखील ते शूर असले पाहिजेत.

**ग्लॉकॉन :** निश्चितच !

**सॉक्रेटिस :** पण घोडा, कुत्रा किंवा दुसरा एखादा प्राणी अंगात पराक्रम नसतानादेखील शूर असू शकेल काय ? जे तेज अंगी असल्यावर प्रत्येक प्राणी कोणत्याही संकटात निर्भय आणि अजिक्य होतो, असे तेज तू पाहिले नाही असे दिसते.

**ग्लॅकॉन :** नाही, मी ते पाहिले आहे.

**सॉक्रेटिस :** तर मग, आपल्या संरक्षक लोकांमध्ये कोणते शारीरिक गुण असले पाहिजेत ते तुला समजले.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** त्याचप्रमाणे मानसिक गुणदेखील समजले. त्यांच्यात तेज असले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** ग्लॅकॉन, असे जर त्यांचे स्वाभाविक गुणधर्म असतील, तर परस्परांशी आणि शहरात राहणाऱ्या लोकांशी ते जुलमाने वागणार नाहीत अशी व्यवस्था करावयास पाहिजे ना ?

**ग्लॅकॉन :** खरोखर ही अडचण दूर करणे अशक्य आहे.

**सॉक्रेटिस :** तरीसुद्धा मित्रमंडळींशी त्यांनी साधेपणाने वागले पाहिजे आणि फक्त शत्रूंनाच ताप दिला पाहिजे. नाहीतर शत्रूंकडून होणाऱ्या नाशाची वाट न पाहता ते स्वतःचाच प्रथम नाश करतील.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** मग आपणांस काय करावयास हवे ? सभ्य आणि तेजस्वी स्वभाव आपल्याला कोठून मिळणार ? सभ्य आणि तेजस्वी स्वभाव परस्परविरुद्ध असत नाहीत काय ?

**ग्लॅकॉन :** स्पष्टच आहे.

**सॉक्रेटिस :** तरीदेखील ज्या माणसात सभ्यपणा आणि तेजस्वीपणा नाही तो संरक्षक बनण्यास असमर्थ आहे. ज्याअर्थी, हे दोन गुण एकत्र आढळणे अशक्य, त्याअर्थी, उत्तम संरक्षक सापडणेही कठीण आहे.

**ग्लॅकॉन :** होय, असे दिसते खरे.

या ठिकाणी मी खूप गोंधळलो. संभाषणाचा पुन्हा विचार केला आणि ग्लॅकॉनला म्हटले,--

**सॉक्रेटिस :** मित्रा, आताचे उदाहरण सोडून दिल्यावर आपण गोंधळलो हे योग्यच आहे.

**ग्लॅकॉन :** असे कसे ?

**सॉक्रेटिस :** आपल्या हे लक्षातच आले नाही की अशा विरोधी गुणधर्मांचे मिश्रण असलेले स्वभाव आढळतात.

**ग्लॅकॉन :** कोठे आढळतात ?

**सॉक्रेटिस :** पुष्कळशा पशूंमध्ये तुला ते आढळतील. जो पशू आपण आपल्या संरक्षकाच्या तुलनेसाठी घेतला तो या मिश्र स्वभावाचे उत्तम उदाहरण आहे. तू जाणतोसच की, उत्तम अवलादीचे कुत्रे मित्रांबरोबर आणि ओळख असलेल्या माणसांबरोबर नम्रतेने वागतात, मात्र हेच परक्यांशी अगदी उलटपणे वागतात.

**ग्लॅकॉन :** होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या संरक्षकाच्या स्वभावाविषयीचा आपला प्रयत्न निसर्गविरोधी तर नाहीच, पण अशक्यही नाही.

**ग्लॅकॉन :** अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस :** मग जो उत्तम संरक्षक असावा लागतो त्याचा स्वभाव तत्त्वज्ञानी आणि तेजस्वी असावा असे तुला वाटते ना ?

**ग्लॅकॉन :** तुझे बोलणे माझ्या ध्यानात आले नाही.

**सॉक्रेटिस :** मी सांगतो तो आश्चर्यकारक गुण तुला कुत्र्यात दिसून येतो.

**ग्लॅकॉन :** तो कोणता बरे ?

**सॉक्रेटिस :** परका मनुष्य कोणत्याही पद्धतीने त्यांना चिडवत नसताना कुत्री त्याच्यावर रागावतात. पण ओळखीचा मनुष्य असला तर त्याच्या दयाळूपणाचा अनुभव नसताना ते त्याच्याशी प्रेमाने वागतात.

**ग्लॅकॉन :** आतापर्यंत मी इकडे लक्ष दिले नव्हते, पण त्यांचे वागणे अशा तऱ्हेचे असेल यात संशय नाही.

**सॉक्रेटिस :** परंतु कुत्र्यांमध्ये अशी प्रवृत्ती उपजतच असते हे मनोरंजक आहे. ते खऱ्या तात्त्विकपणाचे द्योतक असते.

**ग्लॅकॉन :** ते कसे काय ?

**सॉक्रेटिस :** कारण मित्राचा आणि शत्रूचा चेहरा ओळखण्याची एकच खूण तो जाणतो. ती म्हणजे मित्राविषयी ज्ञान आणि शत्रूविषयी अज्ञान असते. परिचित आणि बाहेरचा हे तो ज्ञान आणि अज्ञान ह्याच्या सहाय्याने ओळखतो. असा प्राणी ज्ञानाचा चाहता असल्याशिवाय कसा राहील ?

**ग्लॅकॉन :** खात्रीने.

**सॉक्रेटिस :** ज्ञानलालसा आणि तत्त्वज्ञानाकडे असणारा कल ह्या गोष्टी एकच आहेत असे तुला वाटत नाही काय ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** तर मग माणसाविषयीदेखील आपण खात्रीने असे म्हणू शकतो की, जो ओळखीच्या माणसांशी आणि नातेवाईकांशी आदर दाखवतो तो ज्ञान व तत्त्वज्ञान यांचा भोक्ता आहे.

**ग्लॅकॉन :** होय, असे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस :** मग आपल्या विचारांनुसार असे ठरते की, जो माणूस स्वभावतः राज्याचा उत्तम संरक्षक होण्याची पात्रता दाखवतो, तो माणूस तत्त्वज्ञानी, तेजस्वी, चापल्यपूर्ण आणि ताकदवान असावयास हवा.

**ग्लॅकॉन :** खात्रीने.

**सॉक्रेटिस :** असा संरक्षकाचा मूलस्वभाव असला पाहिजे हे ठरले. आता त्याच्या पालनपोषणाची आणि शिक्षणाची काय व्यवस्था करावी ? आपल्या चर्चेचा जो मूळ विषय ' राज्यामध्ये न्याय आणि अन्याय यांचा प्रादुर्भाव कसा होतो ' त्याच्याविषयी वरील प्रश्नाच्या चर्चेचा उपयोग होईल काय ? आपल्या संशोधनात आवश्यक ते सोडायचे नाही आणि अनावश्यक असेल त्याचा विचार करावयाचा नाही असा आपला हेतू आहे.

**ॲडिमँट्स :** या संशोधनाचा विचार आपल्या मूळ उद्देशास पोषक ठरेल असे माझे मत आहे.

**सॉक्रेटिस :** प्रिय ॲडिमँट्स, असे जर असेल तर वेळ लागला तरी आपण याचा पाठपुरावा सोडायचा नाही.

**ॲडिमँट्स :** खरोखरच सोडता कामा नये.

**सॉक्रेटिस :** मग चला तर, फावल्या वेळात गोष्टी सांगणाऱ्या लोकांप्रमाणे आपण संरक्षकांच्या शिक्षणाचा विचार करू या.

**ॲडिमँट्स :** हो. चालेल.

□ □

## प्रकरण नऊ

# आदर्श राज्यातील शिक्षणपद्धती

**[II-376-E—III-412-B]**

**कथासूत्र :**

[प्राथमिक शिक्षण आणि प्रगत अभ्यासक्रम असे प्लेटोने एकूण शैक्षणिक व्यवस्थेचे दोन भाग केले आहेत. प्रगत अभ्यासक्रमाचे स्वरूप प्लेटोने पुढे विशद केले आहे. राज्यकर्त्यांना आवश्यक असणाऱ्या प्राथमिक स्वरूपाच्या शैक्षणिक पूर्वतयारीचा विचार इथे केलेला आहे.

प्लेटोच्या काळातील अथेन्समधील शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षण देण्याची व्यवस्था खाजगी संस्थांकडून् केली जात असे. त्या अभ्यासक्रमात वाचन, लेखन, गायन, पाठांतर यांचा मुख्यत्वे समावेश असे. महाकाव्य, नाटयकाव्य, वाद्यवादन, भावगीत गायन, प्राथमिक स्वरूपाचे गणित व भूमितिशास्त्राचे ज्ञान यांचा त्यात समावेश असे.

प्लेटोने शैक्षणिक व्यवस्थापनाचे कार्य, व्यक्तींच्या खाजगी इच्छा किंवा खाजगी शिक्षण संस्था यांच्यावर सोपवले नाही. शिक्षणाची साध्ये व साधने यांचे नियंत्रण त्याने शासनाकडे सोपवले आहे. प्रचलित शैक्षणिक पद्धतीतील अनेकविध दोष लक्षात घेऊन, त्यापासून आदर्श राज्यातील तरुण पिढी सुरक्षित रहावी याकरिता शैक्षणिक सुधारणेचा सर्वंकष कार्यक्रमच त्याने मांडला आहे.

या संदर्भातच ग्रीक पुराणकथा आणि त्यावर आधारलेली होमर, हिसियड यांसारख्या महाकवींची काव्ये, त्यांमधून प्रगट होणारी परंपरागत धार्मिक जीवनदृष्टी यांवर प्लेटोने प्रखर हल्ला केला आहे. त्यामधील देवदेवतांची काल्पनिक वर्णने त्याने रद्द ठरवली आहेत. अनेक देवता नसून एक देव आहे आणि हा ईश्वर सत्य, पावित्र्य आणि सौंदर्य यांचे प्रतिक आहे, असे सांगून तशी वर्णने अभ्यासक्रमातील वाङ्मयात आली पाहिजेत, असा त्याचा आग्रह आहे. म्हणजेच व्यक्तीचे नैतिक उदात्तीकरण हा धर्म, साहित्य आणि कला यांचा हेतू असला पाहिजे असा त्याचा दृष्टिकोन आहे.

या संदर्भात नाटयवाङ्मयावरही त्याने हल्ला केला आहे. नाटककार स्वतःचा स्वभाव विसरून व्यक्तिरेखांच्या स्वभावाशी समरस होतो. पात्रे व्यक्तिरेखांशी समरस होतात आणि प्रेक्षक नाटककार, व्यक्तिरेखा आणि पात्रे यांच्याशी समरस होतात. प्लेटोच्या मते यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा एकसंधपणा नष्ट होतो. त्यामधून दुर्गुण निर्माण होतात.

संगीताचे स्वर आणि वाद्यांचा स्वरमेळ हा मानवी व्यक्तिमत्वाची किंवा आत्म्याची एकसंधता टिकविण्यास योग्य असला पाहिजे, असे त्याचे मत आहे. अतिरेकाचा अभाव, साधेपणा आणि सुसंवाद ही त्याने मार्गदर्शक तत्त्वे मानली आहेत.

साहित्य आणि संगीत यांमध्ये शैलीचे स्वरूप अलंकारिक, दुर्बोध, विलासी असू नये, असे त्याचे मत आहे.

शिक्षणक्रमाचे सांस्कृतिक शिक्षण (म्युझिक) व शारीरिक शिक्षण (जिम्नॅस्टिक) असे दोन भाग केले आहेत. सांस्कृतिक शिक्षणाचा हेतू व्यक्तीच्या वैचारिक, भावनात्मक, नैतिक आणि अध्यात्मिक जीवनात सुसंवाद निर्माण करणे आणि त्याद्वारा सामाजिक जीवन आणि सृष्टी यांच्या विविध व्यापारांतील आंतरिक सुसंवाद समजावून घेण्याची मर्मदृष्टी व्यक्तीला येणे हा होय, असे प्लेटोचे मत आहे. असे जीवन हेच न्याय व पूर्णता यांचे प्रतीक होय, असा प्लेटोचा दृष्टिकोन आहे.

शरीर सुदृढ नसेल, तर मन दुर्बल बनते आणि दुर्बल मनात दुर्गुण जन्म घेतात. याकरिता प्लेटोने शारीरिक शिक्षणाचाही तपशीलवार विचार केला आहे. समाजातील कायदेपंडित, व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनातील गुन्हेगारी म्हणजेच मानसिक दुर्गुण समजावून घेतात आणि त्यांचे निर्मूलन करतात, तर डॉक्टर्स आणि सर्जन्स शारीरिक रोग, यातना यांचे निर्मूलन करतात. या संदर्भात वैद्य आणि न्यायाधीश यांच्या कार्यांचे मार्गदर्शक विवेचन प्लेटोने केले आहे.

सामर्थ्यसंपन्न, कुशल असे नागरिक आणि राज्यकर्ते सुस्थिर सांस्कृतिक जीवन जगू शकतात हे लक्षात घेऊन प्लेटोने व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासावर आधारलेली ही शिक्षणव्यवस्था विशद केली आहे.]

* * * * *

### (१) साहित्याचे शिक्षणातील स्थान व स्वरूप

**सॉक्रेटिस** : शिक्षण कोणत्या प्रकारचे असावे ? शरीराला व्यायामाचे आणि मनाला संस्कृतीचे शिक्षण द्यावे असे अनुभवावरून सिद्ध झाले आहे. याहून अधिक उत्तम प्रकारची शिक्षणपद्धती दुर्मिळच.

**अॅडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : आपल्या शिक्षणपद्धतीच्या चर्चेचा प्रारंभ आपण सांस्कृतिक शिक्षणापासून करू या का ?

**अॅडिमँट्स** : हरकत नाही.

**सॉक्रेटिस** : सांस्कृतिक ज्ञानामध्ये आपण वर्णनात्मक वाङ्मयाचा अंतर्भाव करू या ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : हे साहित्य दोन प्रकारचे असते—खरे आणि काल्पनिक.

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : या दोन्ही पद्धतीच्या साहित्याचा समावेश आपण अभ्यासक्रमात करणार आहोत. प्रथम काल्पनिक स्वरूपाच्या साहित्याचे शिक्षण द्यायचे ना ?

**ॲडिमँट्स** : मला तुमच्या बोलण्याचा अर्थ समजला नाही.

**सॉक्रेटिस** : लहान मुलांच्या शिक्षणाचा प्रारंभ आपण काल्पनिक गोष्टी सांगून करतो ते तुम्ही जाणताच. अशा कथांमध्ये जरी सत्य स्वरूपाची नीतितत्त्वे असली तरी त्या कथा सर्वसामान्यपणे असत्यच असतात. शारीरिक शिक्षणापूर्वी मुलांना आपण अशा प्रकारच्या गोष्टी सांगतो.

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच शारीरिक शिक्षणापूर्वी सांस्कृतिक शिक्षण देणे योग्य असे मी म्हणत होतो.

**ॲडिमँट्स** : तुमचा दृष्टिकोन योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : प्रत्येक कामात विशेषतः कोवळ्या मनोवृत्तीच्या तरुणांच्या संदर्भात शिक्षणाचा प्रारंभच महत्त्वाचा असतो. या कालामध्ये त्या व्यक्ती जलद शिकतात आणि संस्कारही आत्मसात करतात.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : पण आपल्या मुलांनी कोणत्याही लेखकाच्या कोणत्याही गोष्टी वाचणे किंवा ऐकणे योग्य होईल का ? कारण तसे झाले तर आपल्याला नको असलेले संस्कार त्यांच्या मनावर बिंबणार नाहीत का ?

**ॲडिमँट्स** : तसे घडू देणे बरोबर होणार नाही.

**सॉक्रेटिस** : त्यासाठी चांगल्या कथा निवडणे, वाईट गाळून टाकणे, लेखकावर नजर ठेवणे हे आवश्यक ठरते. शरीरापेक्षा मनाची घडण योग्य व्हावी म्हणून चांगल्या गोष्टींची निवड आई किंवा दाई यांनी केली पाहिजे. पण त्यासाठी सध्याच्या उपलब्ध वाङ्मयातील बराचसा भाग गाळून टाकावा लागेल.

**ॲडिमँट्स** : अशा कोणत्या गोष्टी गाळणे आवश्यक ठरेल ?

**सॉक्रेटिस** : सामान्यतः लहान आणि दीर्घ गोष्टींमध्ये आशय सारखाच असतो.

**ॲडिमँट्स** : हो, पण कोणत्या मोठ्या गोष्टी ?

**सॉक्रेटिस :** होमर, हिसियड यांसारख्या कवींनी काल्पनिक वर्णनात्मक गोष्टी रचल्या आहेत. त्यांना मोठ्या गोष्टी म्हणता येईल.

**ॲडिमँट्स :** पण त्यांच्या कथांमधून कोणते दोष दिसून येतात ?

**सॉक्रेटिस :** कल्पित गोष्टीमध्ये सौंदर्याचा अभाव असेल आणि पुढील प्रकारचे दोष त्यामध्ये असतील तर त्या साहित्याचा आपण निषेध केला पाहिजे.

**ॲडिमँट्स :** असे कोणते दोष ?

**सॉक्रेटिस :** वास्तवाशी विसंगत चित्र जसे चित्रकार काढतो, त्याचप्रमाणे देवता किंवा वीर पुरुष यांच्या स्वभावातील वाईट दृश्याचे विसंगत वर्णन लेखक करतात.

**ॲडिमँट्स :** अशा दोषांचा निषेध केलाच पाहिजे. तू तुझे म्हणणे काही उदाहरणांनी स्पष्ट कर.

**सॉक्रेटिस :** उदाहरणार्थ हिसियडने उरानसच्या वर्तनाचे किंवा क्रोनसने त्यांच्यावर उगवलेल्या सूडाचे केलेले वर्णन. मोठा कवीसुद्धा अतिशय असत्य आणि कल्पनारम्य गोष्टी कशा रचतो त्याचे हे नमुने आहेत.[1] क्रोनसचे, त्याच्या मुलाच्या वागणुकीचे वर्णन जरी सत्य असले तरी अविचारी तरुणापुढे कोणतीही मर्यादा न बाळगता असे वर्णन[2] करणे योग्य नव्हे. अशी वर्णने गाळली पाहिजेत. किंवा जर काही कारणाकरिता या गोष्टीची माहिती त्यांना देणे आवश्यक ठरले तर डुकराच्या नव्हे तर क्वचित प्रसंगी मिळणाऱ्या प्राण्याच्या यज्ञाच्या वेळी मोजक्या लोकांसमोर गुप्त गोष्टी म्हणून त्या सांगण्यात याव्यात.

**ॲडिमँट्स :** खात्रीने. ह्या संतापजनक गोष्टी आहेत.

**सॉक्रेटिस :** ॲडिमँट्स म्हणूनच त्या आपल्या शहरात सांगू नयेत. आपण अशा तऱ्हेचा उपदेश तरुणांना देता कामा नये की, मोठे गुन्हे म्हणजे अपकृत्ये करणे नाही. वडिलांनी केलेल्या कृत्यांबद्दल त्यांना कशाही प्रकारे शासन करणे म्हणजे अत्यंत श्रेष्ठ देवाचे अनुकरण होय असे सांगणे.

**ॲडिमँट्स :** या गोष्टींचे प्रयोजन नसण्याबाबत तुमचे माझे एकमत आहे.

**सॉक्रेटिस :** त्याचप्रमाणे आपले भावी संरक्षक एकमेकांशी क्षुल्लक कारणाने न भांडावेत अशी आपली इच्छा असेल तर, तसे न करण्यास जर आपणांस शिक्षण द्यायचे असेल, तर देवांच्यात एकमेकांविरुद्ध कावेबाजपणे भांडणे होतात, युद्धे होतात असे सांगणेदेखील योग्य नाही. राक्षसांच्या लढाया आणि देव व वीर पुरुषांचे आपापसातील भांडण याचे वर्णन करणारे वाङ्मय आणि चित्रकला आपण शिकवू देता कामा नये. जर या संरक्षकांचे मन वळविणे शक्य असले, तर आपल्या बांधवांबरोबर भांडणारे पापी आपल्या राज्यात कोणी

---

[1] Theogony 154. [2] Theogony 459.

नाहीत असे बोलणे प्रथमपासूनच वृद्धांनी, बायकांनी आणि सगळ्या वडील मंडळींनी त्यांच्यापुढे बोलले पाहिजे. आणि अशीच भाषा वापरून काव्य करण्यास आपल्या कवींनाही भाग पाडले पाहिजे. 'हिराला तिच्या मुलाकडून बांधण्यात आले, आईला बाप मारतो आहे हे पाहिल्यावर हिफिइस्टने आईची बाजू घेण्याची धडपड केली म्हणून त्याला स्वर्गातून ढकलून देण्यात आले.' अशा प्रकारच्या देवांमधील लढाया होमरने लिहिल्या आहेत. त्यांचे स्वरूप रूपकात्मक असले तरी आपल्या राज्यात त्यांची मनाई केली पाहिजे. रूपक आणि खरे यांच्यातला भेद ओळखण्याची बुद्धी मुलांना नसते. त्या वयात श्रद्धेने स्वीकारलेले बोलणे मनात पक्के बसून वज्रलेप होतो. म्हणून मुले जे प्रथम बोलतात किंवा ऐकतात ते, त्या गोष्टी, सद्‌गुण वाढीस लावणाऱ्या असतील अशी निवड करायची हे एक महत्त्वाचे काम आहे.

**ॲडिमँट्स** : हे म्हणणे बरोबर आहे. पण यातली कथानके कोणती आणि आदर्श कथा कोणत्या अशा प्रश्नाला आपण काय उत्तर देऊ शकणार?

**सॉक्रेटिस** : ॲडिमँटस, तू आणि मी या क्षणी कवी नाही. आपण आहोत राज्याचे संस्थापक. आपली कथानके लिहिताना कवींनी कोणती पद्धती स्वीकारली पाहिजे आणि कोणती पद्धती स्वीकारता कामा नये, हे संस्थापकांना माहीत पाहिजे. त्या कथानकांचे लेखन त्यांनीच केले पाहिजे असे निर्बंध कोणीही घालू शकणार नाही.

**ॲडिमँट्स** : बरोबर, पण ईश्वरविषयक तत्त्वज्ञानाच्या पद्धती काय असाव्यात?

**सॉक्रेटिस** : त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे असावे. कवी महाकाव्य, भावपूर्ण काव्य, नाटचकाव्य लिहीत असला तरी त्यात खरोखर जसा ईश्वर आहे तसे त्याचे वर्णन आले पाहिजे.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : मूलतः परमेश्वर चांगला म्हणून त्याचे वर्णनसुद्धा त्याचप्रमाणे केले पाहिजे की नाही?

**ॲडिमँट्स** : खात्रीने.

**सॉक्रेटिस** : जे चांगले आहे त्याने अपाय होतो काय?

**ॲडिमँट्स** : मुळीच नाही.

**सॉक्रेटिस** : आणि जे अपायकारक नसते ते अपाय करते काय?

**ॲडिमँट्स** : नाही.

**सॉक्रेटिस** : जे अपायकारक नसते ते काही वाईट करू शकते काय?

**ॲडिमँट्स** : अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस :** जे वाईट करू शकत नाही ते कोणत्या वाईटाला कारणीभूत असू शकते असे तुला वाटते काय ?

**ॲडिमँट्स :** ते कसे असू शकते ?

**सॉक्रेटिस :** जे चांगले असते ते फायदा करून देत नाही काय ?

**ॲडिमँट्स :** होय, देते.

**सॉक्रेटिस :** त्याचप्रमाणे चांगली परिस्थिती निर्माण करण्यास ते उपयुक्त ठरत नाही काय ?

**ॲडिमँट्स :** होय, ठरते.

**सॉक्रेटिस :** सत् हे सर्व सदसत् वस्तूंचे कारण नसून केवळ सत्‌ला कारणीभूत असते. आणि सत्‌पासून वाईट निर्माण होत नाही.

**ॲडिमँट्स :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** ईश्वराचा चांगुलपणा मान्य केला तर सामान्य समजुतीप्रमाणे तो सर्वच घटनांचे कारण असत नाही. मानवी जीवनातील थोडयाच गोष्टींना तो जबाबदार ठरतो. बऱ्याच गोष्टींना तो ठरत नाही. वाईट-गोष्टीपेक्षा चांगल्या घटनांची जबाबदारी ईश्वराकडे असते. अनिष्ट घटनांची कारणे ईश्वराशिवाय अन्यत्र पाहिली पाहिजेत.

**ॲडिमँट्स :** तुझे म्हणणे मला पूर्णपणे खरे वाटते.

**सॉक्रेटिस :** होमर किंवा अन्य कवींनी देवाच्या बाबतीत पुढील वर्णन केलेले दिसते : "झ्यूसने[1] आपल्या अंगणात दोन माठ ठेवले आहेत. एकात चांगल्या आणि दुसऱ्यात वाईट गोष्टी साठवलेल्या आहेत." "झ्यूस इष्ट-अनिष्ट घटनांचे मिश्रण करून ज्या व्यक्तीला देतो, तिला एक दिवस आनंदाचा आणि दुसरा दुःखाचा अनुभवावयास मिळतो. ज्याला फक्त एकाच माठातील गोष्ट मिळते त्याला वखवखलेली वासना, सर्व जीवनभर सतावते." "झ्यूस हा मानवी जीवनातील सुखदुःखांचा वाटप करणारा आहे." "पिंडारनेसुद्धा[2] ठरविलेल्या आज्ञा, तह, ॲथनी आणि झ्यूस यांनी मोडले."

जर कुणी अशी मूर्ख-चुकीची वर्णने केली, तर ती आपण निषिद्ध समजली पाहिजेत.

"देवादेवांतील युद्धस्पर्धा, थेमिस, झ्यूस यांच्या पाठिंब्याने घडली"[3] ; "जेव्हा ईश्वराला एखाद्या घराचा नाश करायचा असतो, तेव्हा तो घरातील व्यक्तींच्या मनात गुन्हेगारी आणि पापवृत्ती यांची बीजे पेरतो."[4]

---

[1] Illiad XXIV 527. [2] Illiad XX 69. [3] Illiad XX 4. [4] In a lost Tragedy.

एश्चिलसने केलेली अशी विधाने आपण आपल्या तरुणांच्या पुढे ठेवून चालणार नाहीत. नियोबीची दुःखे, पिलोप्सच्या घराण्यावर आलेल्या आपत्ती, ट्रॉयवर आलेले दुःखद प्रसंग, यांची वर्णने एश्चिलसने आपल्या नाटकात केली आहेत. पण अशा घटनांचे कारण ईश्वर आहे असे आपण कवीला मांडू देऊ शकणार नाही. जर त्याला तसे म्हणायचेच असेल, तर त्याने आपण ज्या सिद्धांताचा शोध घेत असतो त्यानुसार त्यानें स्पष्टीकरण दिले पाहिजे. ईश्वर हा न्यायी आणि चांगला असतो. ईश्वराने ज्यास शिक्षा दिली, त्यामुळे माणसांचे कल्याणच होते. दुर्दैवी माणसाने केलेली शिक्षा ईश्वराने केली असे म्हणता येणार नाही. ईश्वर हा सत्स्वरूप–सत्यरूप आहे. तो कोणतीच वाईट गोष्ट करत नाही, असे विचार साहित्यिकांनी व्यक्त केले पाहिजेत. तशा अनुकूल विचारांना आपला विरोध नाही, पण त्या विरुद्धच्या विचारांचा आपण प्रतिकार केला पाहिजे. अशा विकृत कथा, कविता आपल्या आदर्श राज्यामध्ये वृद्ध किंवा तरुण यांनी गद्य किंवा पद्य स्वरूपात म्हणता किंवा ऐकता कामा नयेत. अशा कथा-कवितांतील भाषा ईश्वराविषयी अनादर वाढविणारी, अपायकारक व घातक असते.

**ॲडिमँट्स** : तुमचा हा नियम मला योग्य वाटतो. माझी त्याला संमती आहे.

**सॉक्रेटिस** : अशा तऱ्हेने ईश्वरविषयक तत्त्वज्ञानाच्या संदर्भात जे आदर्शभूत नियम असले पाहिजेत, त्यांपैकी आपण एक शोधून काढलेला आहे. ईश्वर हा सर्व घटनांचे कारण नसून चांगल्या किंवा कल्याणप्रद घटनांचेच कारण असतो हे तत्त्व वक्ते आणि लेखक यांनी अंगिकारले पाहिजे.

**ॲडिमँट्स** : तुम्ही या तत्त्वाची मांडणी फारच चांगली केली.

**सॉक्रेटिस** : आणखी एका तत्त्वाचा विचार करायला हवा. ईश्वर हा विविध कारणांसाठी विविध रूपे आकार धारण करणारा, बदलणारा, फसवणारा, खोटे भास निर्माण करणारा आहे असे म्हणता येईल का ? त्याऐवजी ईश्वराचे स्वरूप मंगलप्रद, स्थिर व अचल असते, ही भूमिका योग्य नव्हे का ?

**ॲडिमँट्स** : या प्रश्नाचे उत्तर मी एकदम देऊ शकणार नाही.

**सॉक्रेटिस** : एखाद्या वस्तूतील होणारा फरक स्वतः त्या वस्तूकडून किंवा दुसऱ्या वस्तूकडून होतो, असे तुला वाटत नाही काय ?

**ॲडिमँट्स** : खात्रीने.

**सॉक्रेटिस** : ज्या वस्तू उत्तम आहेत त्या वस्तू बाहयवस्तूंकडून बदलण्याचा वा बिघडण्याचा संभव कमी असतो. उदा. मांस, दारू आणि व्यायाम शरीरात फरक करतात. त्याचप्रमाणे प्रत्येक झाडात सूर्यप्रकाश, वायू आणि इतर गोष्टींनी बदल होतो. पण मुळातच शरीर आणि रोपटे अत्यंत ताकदवान अथवा निरोगी असेल, तर त्यामध्ये थोडा फरक पडतो.

**ॲडिमँट्स** : खरे आहे.

**सॉक्रेटिस :** मनाच्या बाबतीतही असेच आहे. पराक्रमी आणि ज्ञानी आहेत त्यांच्यावर बाह्य आघातांनी अतिशय कमी फरक पडत नाही काय ?

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** सामान, घर, कपडेलत्ते या ज्या मानवनिर्मित गोष्टी आहेत त्या याच तत्त्वाशी संलग्न आहेत. ज्या गोष्टी उत्तम रीतीने तयार केलेल्या आहेत आणि ज्या उत्तम स्थितीत आहेत त्या काळ व इतर गोष्टींनी कमी परिणामित होतात.

**ॲडिमँट्स :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** नैसर्गिक रीत्या वा कृत्रिम रीत्या जी गोष्ट उत्तम असते ती दुसऱ्या वस्तूकडून फार कमी प्रमाणात बदलली जाते.

**ॲडिमँट्स :** असे दिसते खरे.

**सॉक्रेटिस :** स्वतः परमेश्वर आणि त्याने निर्माण केलेल्या वस्तू सर्व दृष्टींनी उत्तम असतात.

**ॲडिमँट्स :** खात्रीने.

**सॉक्रेटिस :** मग बाह्य परिणामांनी परमेश्वरास विविध रूपे घ्यायला भाग पाडले गेले असेल तर हे असंभवनीय आहे.

**ॲडिमँट्स :** फारच असंभवनीय.

**सॉक्रेटिस :** स्वतःमध्येच बदल घडवून तो स्वतःला बदलू शकेल हे शक्य वाटते काय ?

**ॲडिमँट्स :** आपण होऊन बदलला तर शक्य आहे.

**सॉक्रेटिस :** स्वतःमध्ये बदल केल्यावर तो अधिक चांगला सुंदर होतो की अधिक कुरूप होतो ?

**ॲडिमँट्स :** तो जर स्वतः फरक करत असेल तर नक्कीच तो कुरूप होतो. ईश्वराच्या सौंदर्यात आणि सौम्यपणात अपूर्णत्व आहे, असे आपण म्हणू शकणार नाही.

**सॉक्रेटिस :** तू म्हणतोस ते योग्य आहे. पण कोणताही देव वा माणूस आपखुशीने स्वतःला कुरूप बनवून घेईल असे वाटते का ?

**ॲडिमँट्स :** असे वाटणे अशक्य आहे.

**सॉक्रेटिस :** ईश्वरालासुद्धा स्वतः आपखुशीने फरक करून घेणे आवडणे अशक्य आहे. कारण प्रत्येक देव पूर्ण असून सौंदर्यात आणि सौम्यतेत तो परिपूर्ण असल्याने स्वतःच्या रूपात काहीएक फरक तो करणार नाही हे उघड आहे.

**ॲडिमँट्स :** हा निर्णय अटळ आहे.

**सॉक्रेटिस** : मग प्रिय मित्रा, "देव असंख्य रूपे घेऊन, भटक्या परकीय लोकांप्रमाणे ह्या शहरातून त्या शहरात भटकतात"[1] असे आपल्याला कोणत्याही कवीने सांगता कामा नये. त्याचप्रमाणे प्रेटिअस व थ्रेटीस यांची कोणीही बदनामी करू नये. तसेच शोकान्त वा इतर प्रकारच्या काव्यात, "हिरा आपले स्वरूप पालटून भिकारणीच्या वेशात आरगॉसच्या इनाच्युस नदीच्या शूर मुलांसाठी भीक मागत हिंडते आहे"[2] असे वर्णन कुणीही करू नये. अशाच प्रकारच्या इतर भ्रामक गोष्टींना आपण मनाई केली पाहिजे. देव परकी लोकांचे वेष धारण करून रात्री हिंडत असतात. अशा प्रकारच्या असमंजस गोष्टी ज्या कवी सांगतात त्या आपल्या मुलांना सांगून मातांनी आपल्या मुलांना घाबरवू नये. या गोष्टींमुळे माता देवांची निंदा करतात आणि मुलांच्यात भीती निर्माण करतात.

**अॅडिमँट्स** : अशा गोष्टींना आपण मनाई केलीच पाहिजे.

**सॉक्रेटिस** : पण स्वत:मध्ये फरक करण्याची देवांची वृत्ती नसली तरी जादूने व फसवून ते रूपे बदलतात असे भासवत असतील.

**अॅडिमँट्स** : होय. असे करीत असतील.

**सॉक्रेटिस** : आपल्या डोळ्यांसमोर भूत उभे करून, शब्दाने अथवा कृतीने देव असत्याला होकार देईल काय ?

**अॅडिमँट्स** : मी नक्की उत्तर देऊ शकणार नाही.

**सॉक्रेटिस** : सगळे देव आणि मानव खऱ्या असत्याचा तिटकारा करीत नाहीत काय ?

**अॅडिमँट्स** : तुमचे बोलणे मला समजले नाही.

**सॉक्रेटिस** : आपल्या सर्वोत्तम भागाची प्रतारणा, सर्वोत्कृष्ट विषयाबद्दल खोटे बोलणे कोणीही स्वखुशीने पत्करत नाही. उलट प्रत्येकजण सर्वोत्तम भागात असत्याला जागा देणे भीतीदायक समजतो.

**अॅडिमँट्स** : अजूनही तुम्ही काय म्हणता ते मला समजत नाही.

**सॉक्रेटिस** : तुला माझ्या बोलण्यात काही गूढ वाटते. मी असे म्हणतो आहे की, निरुपाधिक सत्तत्त्वाविषयी खोटे बोलणे किंवा फसवणूक होणे, अज्ञानी असणे व आत्म्याच्या भोगामध्ये असत्याला थारा देणे कोणताही माणूस पसंत करत नाही. असत्याला आत्म्यात स्थान देणे सर्वांना तिरस्करणीय वाटते.

**अॅडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : फसलेल्या माणसाच्या आत्म्यातले अज्ञान म्हणजे मी म्हणतो ते खरे असत्य होय. कारण शाब्दिक असत्य आत्म्याच्या अंतर्गत अवस्थेची एक प्रकारची नक्कल व दृश्य स्वरूप आहे. ते शुद्ध व निर्मळ असत्य नव्हे. मी काही चुकीने सांगतो काय ?

---

[1] Odyssey XVII 455. [2] Lost play of Aeschylus.

**ॲडिमँट्स :** नाही. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मग खरे असत्य, देव आणि मानव त्यजितात.

**ॲडिमँट्स :** मला असे वाटते.

**सॉक्रेटिस :** शाब्दिक असत्य व्यवहारात उपयुक्त असल्याने त्याचा तिरस्कार करता येत नाही. या मुद्याची आपण आता चर्चा करू. शाब्दिक असत्याचा शत्रूबरोबर व्यवहार करताना उपयोग नसतो का ? आपला स्नेही अपायकारक गोष्टी वेडाच्या भरात करू लागला तर असत्य हाच त्याला त्याच्या विचारापासून परावृत्त करण्याचा उपाय आहे. तसेच प्राचीन इतिहासाचे वास्तव ज्ञान नसल्यामुळे पौराणिक गोष्टींवरच त्या खऱ्या समजून विश्वास ठेवावा लागतो ना ?

**ॲडिमँट्स :** हो, वस्तुस्थिती तरी अशी आहे.

**सॉक्रेटिस :** मग यांपैकी कोणत्या कारणाकरिता खोटे बोलणे योग्य असते ? प्राचीन इतिहासाचे अज्ञान असत्याचा अवलंब करण्यास कारणीभूत होते काय ?

**ॲडिमँट्स :** असे म्हणणे केवळ हास्यास्पद आहे.

**सॉक्रेटिस :** असे जर असेल, तर मग कवीच्या असत्याला ईश्वराजवळ जागा मिळणार नाही.

**ॲडिमँट्स :** होय, मलाही केवळ असेच वाटते.

**सॉक्रेटिस :** शत्रूच्या भीतीमुळे ईश्वर कधी असत्य बोलेल काय ?

**ॲडिमँट्स :** शक्यच नाही.

**सॉक्रेटिस :** त्याचे मित्र मूर्ख-वेडे आहेत म्हणून तो खोटे बोलेल काय ?

**ॲडिमँट्स :** नाही. मूर्ख अथवा वेडा मनुष्य ईश्वराचा मित्र असणे शक्य नाही.

**सॉक्रेटिस :** यावरून ईश्वराला खोटे बोलण्यास काहीच कारण नाही असे दिसते, होय ना ?

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** कसाही विचार केला तरी आपल्याला असेच दिसून येते की, देव व दैवी स्वभावाचे लोक कधी खोटे बोलत नाहीत.

**ॲडिमँट्स :** हो, खरे आहे.

**सॉक्रेटिस :** तर मग आपल्याला असे म्हणता येईल की, ईश्वराच्या कृतीत व शब्दांत साधेपणा व खरेपणा असतो. तसेच तो स्वतःमध्ये फरक करीत नाही अथवा नानाविध चेष्टांनी सुषुप्तीमध्ये वा जागृत अवस्थेत कोणाला फसवीत नाही.

**ॲडिमँट्स :** तुमचे हे म्हणणे मला विश्वासार्ह वाटते.

**सॉक्रेटिस** : "चेटक्याप्रमाणे ईश्वर निरनिराळी रूपे घेत नाही किंवा तो आपल्याला शब्दाने वा कृतीने फसवत नाही " असे आपल्याला म्हणता येईल. आणि या तत्त्वानुसार कवी लोकांनी ईश्वराविषयी बोलले वा लिहिले पाहिजे असे तुम्हाला वाटते ना ?

**अॅडिमँट्स** : हो, मला असे वाटते.

**सॉक्रेटिस** : मग यानुसार, जरी 'होमर' कवी आपल्याला आवडत असला तरी त्याच्या काव्यातील झ्यूसने अॅगॅमेमूनानला स्वप्न पाडल्याची गोष्ट[1] आपण अयोग्य ठरविली पाहिजे. तसेच, एश्चिलसमध्ये थेटिसच्या लग्नाच्या वेळेस पोलो गात असतानाच खालील उताराही आपण त्याज्य ठरविला पाहिजे. "त्याने माझ्या आनंददायक मातृत्वाचे व आरोग्यपूर्ण दीर्घायुष्याचे वर्णन केले. दैवी कृपेने सर्वसंपन्न बनलेल्या सुमधूर आवाजात माझ्या आत्म्यास आनंदित केले. मलाही त्याचे वर्णन दैवी, सत्य व भविष्यसूचक वाटले. पण लग्नातील ज्या पाहुण्याने माझ्या भाग्याचे गीत गायले त्यानेच माझ्या मुलाचा मृत्यू घडवून आणला."[2] अशा प्रकारची भाषा जर कवी देवाबद्दल वापरेल तर आपल्याला त्याचा राग येईल व आपण त्याला गायक साथीदार मिळवून देणार नाही. आपले संरक्षक देवतुल्य व देवाबद्दल आदर बाळगणारे असे तयार करायचे असल्यामुळे अशा कवींचे काव्य शिक्षकांनी मुलांना शिकवू नये असे मला वाटते.

**अॅडिमँट्स** : तुमच्या म्हणण्याला माझी पूर्ण अनुमती आहे आणि त्यांना कायद्याचे स्वरूप देणे मला जास्त पसंत आहे.

## (२) धर्म, देवता, पुराणकथा यांचे शिक्षणातील स्थान व स्वरूप

**सॉक्रेटिस** : ईश्वराविषयी विचार व्यक्त करताना कसे बोलावे, कसे बोलू नये हे आपण निश्चित केले पाहिजे. देव, माता-पिता, यांविषयी आदर आणि परस्पर मैत्री यांविषयीचे शिक्षण ज्यांना द्यावयाचे त्यांच्या कानावर चांगले शब्द जाणे आवश्यक आहे.

**अॅडिमँट्स** : हो. माझ्या कल्पनेप्रमाणे आपला दृष्टिकोन योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : बरे. जर आपल्या आदर्श राज्यातील नागरिक धैर्यवान व्हावयाचे असतील तर त्यांना मृत्यूचे भय वाटणार नाही असे शिक्षण मिळणे जरूर आहे ना ? ज्याला मृत्यूची भीती वाटते तो शूर असतो काय ?

**अॅडिमँट्स** : माझे तसे मत नाही.

**सॉक्रेटिस** : यमलोकातील भयंकर नरकयातनांवर ज्याचा विश्वास आहे असा माणूस निर्भयतेने युद्धातील पराजय आणि गुलामगिरी यापेक्षा मृत्यूचे स्वागत करील का ?

---

[1] Illiad II 1. [2] From a lost play.

**अॅडिमँट्स** : ते शक्यच नाही.

**सॉक्रेटिस** : मग यमलोकातील नरकयातनांविषयी लोकांना लिहिण्याची बंदी केली पाहिजे आणि यमलोकाची निंदा न करता त्याच्याविषयी चांगले मत प्रसृत झाले पाहिजे. त्याचे कारण निंदा खरी नसते आणि शूराच्या दृष्टीने हितकारकही नसते.

**अॅडिमँट्स** : अर्थात. तसे आपण लेखकांना सांगितले पाहिजे.

**सॉक्रेटिस** : मग त्यासाठी आपल्याला पुढील प्रकारचे किंवा तशासारखे उतारे सध्याच्या शिक्षणातून काढून टाकावे लागतील. उदा. :

(१) "मी एक वेळ रित्या धान्याच्या कोठाराचा बेढब धन्याचा नोकर होऊन शेतावर काबाडकष्ट करेन पण, मृत लोकांचा राजा होणार नाही."[1]

*(२) "देवतांनासुद्धा किळस वाटेल अशा नरकातील भयंकर ओलसर, कुजट, गलिच्छ खोल्या मर्त्य आणि अमर्त्य लोकांनी पाहिल्या पाहिजेत."[2]

(३) "अरेरे! यमलोकात आत्मे आणि भुते राहतात पण त्यांच्यात बुद्धीच नाही."[3]

*(४) "चपळ आणि काळचा भुतांमध्ये टिरेसियस हाच काय तो शहाणा होता."[4]

*(५) "अगदी ऐन तारुण्यात त्याच्यावर मृत्यूचा घाला पडला. आपल्या दुर्दैवाबद्दल शोक करीत त्याचा आत्मा शरीराबाहेर पडून अदृश्य झाला आणि नरकात पळून गेला."[5]

*(६) "त्याचा आत्मा अस्पष्टपणे बडबडत धुरासारखा पाताळात दिसेनासा झाला."[6]

*(७) "एखाद्या गुहेमध्ये भयानक खोल जागेत दगडांच्या राशींना वटवाघुळे चिकटलेली असतात. एक जरी निसटले तरी बाकीची सर्व परस्परांना घट्ट धरून किंचाळत फिरतात. त्याप्रमाणे भुतेसुद्धा परस्परांना घट्ट धरून किंचाळत होती."[7]

असल्या कविता आपण रद्द केल्या पाहिजेत. आपण कवींना सांगू, "कवींनो, कृपया रागावू नका. तुमच्या कविता काव्य म्हणून वाईट आहेत, त्या लोकांना आवडणार नाही असे आम्ही म्हणत नाही. पण स्वतंत्र वृत्तीच्या मृत्यूऐवजी गुलामगिरीला भिणाऱ्या शूर सैनिकांना आम्हास तयार करावयाचे असल्याने, या मुलामाणसांच्या कानांवर असल्या कविता पडू नयेत असे आमचे मत आहे.

**अॅडिमँट्स** : बरोबर. आपण तशी विनंती केली पाहिजे.

---

[1] Odyssey XI 489. [2] Illiad XX 64. [3] Illiad XXIII 103.
[4] Odyssey X 495. [5] Illiad XVI 856. [6] Illiad XXIII 100. [7] Odyssey XXIV 6.
* अशी खूण असलेले संदर्भ Conford च्या आवृत्तीत गाळलेले असल्याने ते Jowett च्या आवृत्तीवरून घेतले आहेत.

**सॉक्रेटिस :** यमलोकाबद्दल बोलताना, 'यमपाश', 'यमदंड', 'नरक', 'हाडांचा सापळा' असे भयचकित करणारे, घाबरून सोडणारे शब्द आपण साहित्यातून काढले पाहिजेत. अशा भयकारक कथांचा इतर काहीही उपयोग असला तरी सैनिकांच्या दृष्टीने त्या अहितकारक, त्याज्य आहेत. अशा भयाच्या धाकामुळे आपले सैनिक तेजोहीन, बायकी बनतील.

**ॲडिमँट्स :** आपली भीती साधार आहे.

**सॉक्रेटिस :** मग असले शब्द काढून टाकले पाहिजेत ना ?

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** आपल्या आदर्श शिक्षणपद्धतीप्रमाणेच लोकांना भाषण व लेखनाची परवानगी द्यायची ना ?

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** मग त्यासाठी प्रख्यात वीरपुरुषांनी व्यक्त केलेला शोकसुद्धा काढून टाकायचा ना ?

**ॲडिमँट्स :** जर पहिल्या प्रकारचे साहित्य टाकाऊ तर अर्थात दुसऱ्याही प्रकारचे टाकाऊ.

**सॉक्रेटिस :** आता वरील प्रकारची वर्णने गाळून टाकणे योग्य की अयोग्य ते आपण पाहू. सज्जन मनुष्य, स्वतःच्या मित्रावर ओढवलेला मृत्यूसारखा प्रसंग भयप्रद मानीत नाही असे आपले तत्त्व आहे.

**ॲडिमँट्स :** होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणून आपल्या मित्रावर फार मोठे संकट कोसळले आहे असे त्याला वाटणार नाही.

**ॲडिमँट्स :** अर्थातच !

**सॉक्रेटिस :** सज्जन मनुष्याजवळ सुखावह आयुष्याला उपयोगी असा गुण पूर्णांशाने असतो आणि त्याचे जीवन स्वावलंबी असल्यामुळे तो इतरांपासून स्वतंत्र असतो.

**ॲडिमँट्स :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** तसेच, मुलगा, भाऊ वगैरे नातेवाईक वा इतर ऐहिक संपत्ती नष्ट झाली असता त्याचे दुःख इतरांच्या मानाने खूपच कमी असते. होय ना !

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** स्वतःवर संकट कोसळले असता तो ते शांतपणे व नम्रपणे सहन करील.

**ॲडिमँट्स :** होय. खरे आहे.

**सॉक्रेटिस :** तर मग, प्रसिद्ध लोकांच्या तोंडी घातलेली शोकगीते, सामान्य दर्जाच्या बायकांच्या व हलक्या दर्जाच्या पुरुषांच्या तोंडी घालू. अन्यथा ज्यांना आपण देशाचे संरक्षक बनविणार आहोत त्यांना त्यांच्याबद्दल तिरस्कार वाटू लागेल.

**ॲडिमँट्स :** आपले म्हणणे अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** होमर व इतर कवींनी खालील प्रकारची वर्णने करू नयेत अशी आपण त्यांना पुनः एकवार विनंती करू :

*(१) देवतेचा पुत्र अचलिस, एकदा या अंगावर तर कधी वर बघत, तर कधी खाली बघत लोळतो आहे. नंतर वेडाच्या भरात अमर्याद सागराच्या किनाऱ्यावर भटकत आहे.[1]

*(२) दोन्ही हातांत काळीकुट्ट राख घेऊन ती आपल्या डोक्यावर टाकीत आहे व निरनिराळ्या प्रकारांनी शोक करीत आहे.[2]

*(३) देवांचा नातेवाईक, प्रियम, चिखलात लोळत पडला आहे आणि प्रत्येकाला मोठ्याने नावाने हाक मारून विनवणी करीत आहे.[3]

*(४) अरेरे ! काय माझे दुर्दैव ! सर्वांत शूर मुलाची ती माता असूनही त्याचाच मृत्यू पाहण्याचे माझ्या नशिबी आले. सर्व देवांचा जर त्यांना इतका मान ठेवावयाचा नसेल तर निदान अत्यंत श्रेष्ठ देवाला तरी खालीलप्रमाणे शोक करावयास लावू नका अशी कळकळीची विनंती करू.[4]

*(५) अरेरे ! ज्याच्यावर माझे प्रेम आहे त्याच्या शहराच्या तटाभोवती असलेला पाठलाग मला माझ्या डोळ्यांनी बघावा लागत असल्यामुळे मला फार दुःख होत आहे.[5]

*(६) काय माझे दुर्दैव पहा ! मर्त्य लोकांतील माझा जो अतिशय आवडता सारपिडान, तो मिनिशसच्या पॅट्रोक्लस नावाच्या मुलाकडून लढाईत मारला जावा ना ![6]

प्रिय मित्रा, आपल्या तरुण लोकांनी वरील प्रकारची वर्णने ऐकली तर त्यांच्यापैकी कोणीही ती अयोग्य समजून हसणार नाही. त्यांच्यापैकीच कोणी असे वागले तरी त्यात काही अयोग्य आहे असे त्याला वाटणार नाही. कारण देवसुद्धा असे करतात, असे तो म्हणेल. लज्जा अथवा आत्मसंयमन ह्यांच्या अभावामुळे तो सारखा शोकगीते गात बसेल व अतिशय क्षुल्लक गोष्टींबद्दलही शोक करीत बसेल.

**ॲडिमँट्स :** तुमच्या म्हणण्यात बरेच तथ्य आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या चर्चेच्या निर्णयानुसार त्याने असे करू नये. पण जोपर्यंत दुसरे एखादे तत्त्व मिळत नाही तोपर्यंत आपण हाच निर्णय योग्य मानला पाहिजे.

**ॲडिमँट्स :** अर्थातच त्याने असे करू नये.

---

[1] Illiad XXIV 10. [2] Illiad XVIII 23. [3] Illiad XXII 414.
[4] Illiad XVIII 54. [5] Illiad XXII 168. [6] Illiad XVI 433.

* अशी खूण असलेले संदर्भ Conford च्या आवृत्तीत गाळलेले असल्याने ते Jowett च्या आवृत्तीवरून घेतले आहेत.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे, आपल्या सैनिकांनी फार हसता कामा नये. कारण मोठ्याने हसण्याची प्रतिक्रिया तितकीच जोरदार असते.

**ॲडिमँट्स** : माझेही मत तसे आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणून जर एखाद्या कवीने एखाद्या मोठ्या माणसाच्या हसण्याचे वर्णन केले, तर आपण त्याचा निषेध केला पाहिजे. जर देवांच्या हास्याची वर्णने केली असतील तर आपण अधिकच निषेध केला पाहिजे.

**ॲडिमँट्स** : अर्थातच केला पाहिजे.

**सॉक्रेटिस** : होमर म्हणतो, "हे फिजिस्टिअस या दालनातून त्या दालनात गडबडीने जात होता ते पाहून देव फार हसले.[1] असे देवाविषयींचे वर्णन आणि भाषा वापरण्यास आपण परवानगी देणार नाही.

**ॲडिमँट्स** : ही माझी मते आहेत असे हवे तर म्हणा ! पण आपण तशी परवानगी देऊ नये.

**सॉक्रेटिस** : सत्यालाही आपण श्रेष्ठ स्थान दिले पाहिजे. असत्य हे देवांना निरुपयोगी व माणसांना औषधाप्रमाणे उपयोगी असते असे आपण पूर्वी म्हटले. त्यानुसार असत्याचा उपयोग फक्त डॉक्टरांनीच करावा. अडाणी लोकांनी त्यात पडू नये.

**ॲडिमँट्स** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : केवळ राज्याचे कल्याण करण्यासाठी शत्रू किंवा नागरिक यांना फसविण्याचा हक्क फक्त राज्यकर्त्यांनाच असला पाहिजे. शासनाधिकाऱ्यांकडे जर खासगी व्यक्ती खोटे बोलली, तर ते रोग्याने डॉक्टरांना, विद्यार्थ्याने शिक्षकाला आपल्या शरीराच्या अवस्थेबद्दल असत्य सांगून फसवल्यासारखे होईल किंवा ते एखाद्या खलाशाने कप्तानाला स्वतःबद्दल किंवा जहाजावरील माणसांबद्दल सांगताना असत्य सांगून फसविल्यासारखे चुकीचे वर्तन घडेल.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच अधिकाऱ्यांना "कामगार, ज्योतिषी, विद्वान, डॉक्टर, सुतार"[2] यापैकी जर कोणी असत्य बोलताना आढळले, तर आपल्या राज्यात तशी वाईट प्रथा पाडल्याबद्दल त्याला त्याने शिक्षा करावी. कारण जहाजाप्रमाणे राज्यसुद्धा अशा दुर्गुणांनी नाश पावते.

**ॲडिमँट्स** : जर तो खोटे बोलला आणि खोटे वागला तर शिक्षा केलीच पाहिजे.

---

[1] Illiad I 599. [2] Odyssey XVII 383.

**सॉक्रेटिस** : आपल्या राज्यातील तरुणांचा स्वभाव सनदशीर आणि नेमस्त पाहिजे. खरे ना ? ते आत्मसंयमी हवेत.

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : अधिकाऱ्यांनी दिलेल्या आज्ञा पाळणे, त्याचप्रमाणे भूक, तहान, कामवासना या इंद्रियसुखांविषयी आत्मसंयमन करणे म्हणजे नेमस्तपणा ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : डायोनिडीसच्या तोंडी घातलेली पुढील वाक्ये आपण पसंत करू :

* "मित्रा, शांत बैस आणि माझे ऐक."[1] किंवा "आपल्या नेत्याला मनात घाबरलेले एचिईयन्स रागाने निश्वास टाकीत पुढे चालले."

**ॲडिमँट्स** : ही विधाने पसंत करण्यास हरकत नाही.

**सॉक्रेटिस** : परंतु*, "कुत्र्यासारखे भुंकणारा, हरणासारखे भित्रे हृदय असलेला दारुडा."[2] आणि असेच शब्द त्याचप्रमाणे गद्य-पद्य मजकुरातील श्रेष्ठांबद्दल कनिष्ठांनी वापरलेले अपमानकारक शब्द आपण मान्य करू काय ?

**ॲडिमँट्स** : आपण ते मान्य करणार नाही.

**सॉक्रेटिस** : अशा शब्दांनी जरी करमणूक झाली तरी तरुण लोकांमध्ये त्यामुळे गंभीरपणा वाटत नाही, खरे ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : *[3] "मेजवानीच्या टेबलावर भाकरी, मांस भरपूर वाढले आहे. जमलेले लोक नक्षीदार पेल्यांतून मद्याचे पेले भरून सर्वांना देत आहेत." यापेक्षा आनंददायक दृश्य जगात नाही, असे ज्ञानी माणसाच्या तोंडचे वाक्य, किंवा

*[4] "दुष्काळाशी झगडताना भुकेने व्याकुळ होऊन मरणे फार वाईट" अशी वर्णने वाचून तरुण व्यक्तीला आत्मसंयम साधेल का ? किंवा

*[5] सगळे देव व माणसे गाढ झोपली. झ्यूस स्वतःशीच विचार करीत होता. हिराला पाहताच तो कामवासनेने बेभान झाला. "आईवडिलांच्या नकळत भेटलो असताही आपण इतके कामांध झालो नव्हतो" असे तो म्हणाला. "शय्यागृहात जाईपर्यंतही त्याला स्वतःची कामवासना आवरता आली नाही." असे झ्यूसचे वर्णन योग्य आहे का ?

*[6] "हिफिअस्टने एरीस व ॲफ्रोडॉइट यांना त्यासाठीच बांधून ठेवले" अशा गोष्टी वर्णन करणे अयोग्य नव्हे का ?

---

[1] Illiad IV 412. [2] Illiad I 225. [3] Odyssey IX 8.
[4] Odyssey XII 342. [5] Illiad XIV 281. [6] Odyssey VIII 266.
* अशी खूण असलेले संदर्भ Conford च्या आवृत्तीत गाळलेले असल्याने ते Jowett च्या आवृत्तीवरून घेतले आहेत.

**ॲडिमँट्स** : अशा गोष्टी फारच आक्षेपार्ह आहेत.

**सॉक्रेटिस** : अर्थात संकटकाली थोर व्यक्तींनी शब्दांनी, कृतीने दाखवलेल्या धैर्याचे वर्णन आपण मान्य करू. उदा. "छातीवर हात ठेवून, स्वतःची निर्भत्सना करीत तो आपल्या हृदयास म्हणाला, "हृदया, कृपया गप्प रहा. याहून अधिक संतापजनक प्रसंगातून तू गेला आहेस."[1]

**ॲडिमँट्स** : अर्थात असे वर्णन चालेल.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे, आपल्या नागरिकांनी लाचखाऊ, धनलोभी होऊन चालणार नाही.

**ॲडिमँट्स** : अर्थात नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच "देणग्या, नवस यांनी उग्र प्रकृतीचे राजे किंवा देवता वश होतात."[2] असे तरुणांपुढे वर्णन करता उपयोगी नाही. त्याचप्रमाणे, ॲचिलसचे गुरु फोनिक्स यांनी त्याला "ॲचिअन्सकडून देणगी मिळाली तर सहकार्य कर, नाहीतर जरूर रागव."[3] हा केलेला उपदेश योग्य आहे असे आपण समजून चालणार नाही. ॲगॅमेम्नानकडून देणग्या घेऊन किंवा पैसे घेऊन प्रेते विकण्याचे मान्य करण्याइतका ॲचिलस लोभी होता. यावर आपण विश्वास ठेवू नये किंवा तरुणांनाही ठेवू देऊ नये.

**ॲडिमँट्स** : खरेच, हे मान्य करणे योग्य नाही.

**सॉक्रेटिस** : मला होमरविषयी आदर वाटतो. त्यामुळे ॲचिलसविषयी अशा गोष्टी दुसऱ्या कोणी सांगितल्या असत्या तर त्यावर विश्वास ठेवणे मला पाप वाटले असते. ॲचिलस ॲपोलोला म्हणतो, "तुझ्यासारखी विनाशकारी देवता अन्य नाही. तुझ्यामुळे माझे नुकसान झाले. माझ्याकडे सत्ता असती तर मी तुझा सूड घेतला असता"[4] किंवा "ॲचिलस उद्धटपणे जलदेवतेच्या अंगावर धावून जातो"[5] किंवा "स्पर्शियस नदीमध्ये समर्पण केलेला आपला केस त्याने पेट्रोक्लसच्या प्रेतावर अर्पण केला"[6] अशा गोष्टी आपण अविश्वसनीय मानल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे "पेट्रोक्लसच्या थडग्याजवळ ॲचिलसने हेक्टरला ओढले आणि कैद्यांना चितेवर जाळले."[7] अशा गोष्टी आपण असत्य मानल्या पाहिजेत. झ्यूसचा अतिहुशार तिसऱ्या पिढीचा राजपुत्र पेलिअस व देवता यांचा मुलगा आणि ज्ञानी गुरु चैरेन याचा गुरु म्हणजे ॲचिलस होय. "त्याचे मनात देव आणि माणसे यांचा क्षुद्रपणा, त्याविषयीचा तिरस्कार यांविषयीचे विचार व विकार वाढून गोंधळ निर्माण झाला होता."[8] असे त्याचे वर्णन आपण तरुणांपुढे ठेवणार नाही.

**ॲडिमँट्स** : तुमची भूमिका योग्य आहे.

---

[1] Odyssey XX 17. [2] Supposed to be from Hesiod. [3] Illiad IX 515. [4] Illiad XXII 15. [5] Illiad XXI 130. [6] Illiad XXIII 151. [7] Illiad XXII 394. [8] Illiad XXIII 175.

**सॉक्रेटिस :** *पोसिअड्सचा मुलगा थेस्युअस आणि झ्यूसचा मुलगा पेरिश्यूअस यांनी स्त्रियांवर अत्याचार केले. किंवा देवतातुल्य वीर पुरुषांनी भयंकर पापे केली असे आज प्रचलित असलेल्या मतांवर आपण मुळीच विश्वास ठेवणार नाही. आपण कवीं व साहित्यिक यांनाही असे सांगू की, वरील गोष्टी त्या थोर पुरुषांनी केल्या नाहीत आणि जर केल्या असतील तर त्यांना देवता म्हणू नये. आपल्या आदर्श राज्यातील लोकांना देवता पापे करतात आणि शूरांचे वर्तन सामान्यासारखे असते असे जर कोणी शिकवले, तर त्याचा निषेध करू. अशी वर्णने ईश्वराच्या दर्जास अपमानास्पद व खोटी आहेत. जगात जे वाईट आहे, ते देवांनी निर्माण केले नाही असे आपण पूर्वीच सिद्ध केले आहे.

**ॲडिमँट्स :** खरोखरच, आपण ते सिद्ध केले आहे.

**सॉक्रेटिस :** जे लोक अशा तऱ्हेची वर्णने ऐकतात त्यांच्याही दृष्टीने ते घातक असते. "झ्यूसचे व देवतांचे नातेवाईक, ज्यांच्या आकाशातील कडा टेकडीवर झ्यूस देवाकरिता केलेल्या यज्ञविधी आहेत, ज्यांच्या अंगात दैवी रक्त आहे, असे लोक पाप करतात म्हणून आपणही पापाचरण करण्यास हरकत नाही."[1] अशी वर्णने ऐकणारा प्रत्येकजण पापाचरण करू लागेल. म्हणून आपल्या तरुणांची दुष्प्रवृत्ती वाढू नये म्हणून अशी वर्णने काव्यातून दूर केली पाहिजेत.

***ॲडिमँट्स :** मला हे मान्य आहे.

**सॉक्रेटिस :** वर्णन योग्य आणि अयोग्य अशा कोणत्या विषयी आपण अजून बोलावयाचे राहिले आहे. ईश्वर देवता, वीर पुरुष, मृत व्यक्तींचे आत्मे यांचे वर्णन करताना कोणत्या नियमांचे पालन केले पाहिजे, ते आपण अगोदरच ठरवले आहे.

**ॲडिमँट्स :** हो !

**सॉक्रेटिस :** मग मानवी जीवनाविषयी कसे वर्णन करावे, याची चर्चा अजून आपण केलेली नाही.

**ॲडिमँट्स :** हो, पण ती राहिली आहे.

**सॉक्रेटिस :** पण या संदर्भात काही निश्चित निर्णय करणे अवघड आहे.

**ॲडिमँट्स :** तसे आपण का करू शकत नाही ?

**सॉक्रेटिस :** त्याचे कारण अन्यायी व्यक्ती सुखी दिसते आणि न्यायी व्यक्ती दुःखी दिसते. अन्याय उघडकीस आला नाही, तर तो फायदेशीर वाटतो. न्यायाने वागणे इतरांना फायद्याचे ठरते, स्वतःचा मात्र तोटा होतो ; असे विचार कवी वा साहित्यिक जेव्हा मानवी जीवनाविषयी व्यक्त करतात तेव्हा ती त्यांची दृष्टी चुकीची असते असे म्हटले पाहिजे. अशा भूमिकेपेक्षा विरुद्ध भूमिका घेऊन त्यांनी आपले काव्य वा साहित्य लिहावे अशी आपणांस त्यांना आज्ञा करणे भाग पडेल, खरे ना ?

---

[1] From the Niobe of Aeschylus

*हा भाग Conford च्या आवृत्तीत गाळलेला असल्याने Jowett च्या आवृत्तीवरून घेतला आहे.

**ॲडिमँट्स** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : जर हे मान्य असेल तर आपण जो शोध घेत आहोत त्याबद्दलची भूमिका तुम्ही कबूल केली आहे असे मी स्पष्टपणे म्हणू शकणार नाही काय ?

**ॲडिमँट्स** : तुमचा तर्क योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : त्याकरिताच न्याय म्हणजे काय, त्याचे स्वरूप ठरल्याशिवाय आणि न्यायी माणसाला तो बाहचतः कसाही असो, स्वाभाविक फायदा होतो असे आपण सिद्ध केल्याशिवाय मानवी जीवनाविषयी बोलताना कसे वर्णन करावे याविषयी निर्णय घेणे आपण थोडे लांबणीवर टाकणे चांगले नाही का ?

**ॲडिमँट्स** : तुमचे म्हणणे निश्चितच योग्य आहे.

### (३) नाटच, रंगभूमी यांचे शिक्षणातील स्थान व स्वरूप

**सॉक्रेटिस** : वर्णनात्मक विषयाची चर्चा आता आपण थांबवू या. यानंतरचे आपले काम म्हणजे साहित्याचा आकार, अभिव्यक्ती किंवा पद्धती काय असावी याचा शोध घेणे हे होय. त्यामुळे काय वर्णन केले पाहिजे, कसे वर्णन केले पाहिजे याची चर्चा पूर्ण होईल.

**ॲडिमँट्स** : तुमचे म्हणणे मला समजले नाही.

**सॉक्रेटिस** : पण तुम्ही माझी भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. आता मी जे बोलेन त्यामुळे तुम्हांस माझी भूमिका अधिक चांगली समजू शकेल. कवी आणि कथाकार यांचे सर्व साहित्य म्हणजे भूत, वर्तमान व भविष्यकालातील घृणांचे वर्णन नव्हे का ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : कवीने स्वतः केलेले किंवा काल्पनिक पात्रांच्या तोंडून सांगितलेले किंवा वास्तविक किंवा काल्पनिक अशा उभय पद्धतींनी मांडलेल्या वर्णनामुळे लेखकाला आपला हेतू सफल करता येत नाही का ?

**ॲडिमँट्स** : मी तुमच्या भूमिकेविषयी अंधारात चाचपडतो आहे.

**सॉक्रेटिस** : जर मला माझे म्हणणे स्पष्टपणे मांडण्यास अवघड जाते, तर शिक्षक म्हणून माझी पात्रता हास्यास्पदच म्हटली पाहिजे. म्हणून सामान्य पातळीवरून प्रश्न न सोडविता वक्त्याप्रमाणे उदाहरणाने मला काय म्हणायचे आहे ते मी विषद करतो. "खिसीसने मुलगी सोडून देण्याविषयी ॲगॅमेमूनानला विनंती केली. त्यावेळी तो त्याच्यावर रागावला." हा ईलियड काव्याचा प्रारंभ तुम्हांला माहीत आहे काय ? आपल्या मागणीचा अव्हेर झाला म्हणून अचिअन्सचा सूड घेण्यासाठी खिसीसने परमेश्वराची प्रार्थना केली ना ?

**अॅडिमँट्स** : हो. मला ईलियडमधील तो भाग माहीत आहे.

**सॉक्रेटिस** : "सर्व ॲचिअन्सजवळ, विशेषत: सर्व सैन्याच्या अग्रभागी जी ॲट्रिअसची दोन मुले चालत होती, त्यांना खिसीसने विनंती केली." या ओळी कवीने स्वत:च म्हटल्या आहेत. आपल्यापेक्षा इतर कोणी हे म्हणत आहे अशी वाचकाची समजूत करून देण्याचा तो यत्न करीत नाही हेही तुम्हांला माहीत असेलच. पण यानंतरचे वर्णन खिसीसच्या मुखाने केले आहे. ते वर्णन करताना होमर हा कवी बोलत नसून वृद्ध पुरोहितच बोलत आहे असा कवी भास निर्माण करतो. अशा तऱ्हेने 'ओडेसी' काव्यात कवीने ट्रोजन युद्ध इथाकामध्ये घडलेल्या घटना यांचे वर्णन केले आहे.

**अॅडिमँट्स** : आता मला समजले.

**सॉक्रेटिस** : या काव्यात अधूनमधून कवीचे विचार दाखविले असले किंवा घडणाऱ्या हकीकतीचे तो वर्णन करीत असला तरी त्याला वर्णनच म्हटले पाहिजे.

**अॅडिमँट्स** : अर्थातच !

**सॉक्रेटिस** : पण जेव्हा काल्पनिक पात्राच्या मुखाने होमर कवी बोलतो तेव्हा ज्याचे तो वर्णन करतो त्याची हुबेहूब नक्कल तो करीत असतो असे आपण म्हणू शकणार नाही काय ?

**अॅडिमँट्स** : हो. तसे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्याचा आवाज वा चेहरा याप्रमाणे आपला आवाज किंवा चेहरा करते, तेव्हा ती नक्कल किंवा ते अनुकरण नसते का ?

**अॅडिमँट्स** : असते.

**सॉक्रेटिस** : मग त्यावेळी होमर किंवा इतर कवींची पद्धती अनुकरणात्मक असते.

**अॅडिमँट्स** : हो. तशी ती असते.

**सॉक्रेटिस** : पण होमरने आपले स्वत:चे व्यक्तिमत्व काव्यात कोठेही दडवले नसले तर त्याच्या साहित्यात अनुकरण आले नसते. "मला समजले नाही" असे तू म्हणशील म्हणून मी अधिक स्पष्टीकरण देतो. "खिसीस दीनपणे आपल्या मुलीकरिता खंडणी घेऊन ॲचिअन्स आणि त्यांचा राजा यांच्याकडे याचक म्हणून आला." असे वर्णन केल्यावर होमरने जर स्वत:ला खिसीस मानून न बोलता स्वत:च्याच भाषेत पुढचा भाग सांगितला असता, तर ती नक्कल न ठरता ते साधे वर्णन ठरले असते. ती घटना पुढीलप्रमाणे सांगता आली असती. मी स्वत: कवी नसल्याने ते गद्यातच सांगतो :

*"पुरोहिताने आल्यावर देवाची प्रार्थना केली की, ग्रीकांना ट्रॉयवर ताबा मिळून सुरक्षितपणे घरी जाता यावे. त्यापूर्वी तो देत असलेले पैसे त्यांनी घ्यावेत. तो आणि देव

* हा मजकूर Conford च्या आवृत्तीत गाळलेला असल्याने तो Jowett च्या आवृत्तीवरून घेतला आहे.

याविषयी कृतज्ञता दाखवून त्याच्या मुलीची सुटका करावी. पुरोहित असे बोलल्यावर सर्वांनी आदरयुक्त भीतीमुळे त्याच्या म्हणण्यास मान्यता दिली. परंतु अॅगॅमेम्नानला राग आला. त्याने पुरोहितास निघून जाण्यास व न परतण्यास आज्ञा केली. पुरोहिताच्या हातातील अधिकार, दंड आणि देवासाठी आणलेले हार या उपयोगी नाहीत, असेही त्याने कुत्सितपणे म्हटले. पुरोहिताची कन्या आपल्याबरोबर अॅगॅसिमध्ये राहील आणि जेव्हा ती म्हातारी होईल, तेव्हाच तिची सुटका करता येईल, असे तो म्हणाला. यापुढे स्वतःला अधिक राग न यावा म्हणून आणि शारीरिक दुखापत होऊ नये म्हणून पुरोहिताने तात्काळ निघून जावे, असा त्याने इषारा दिला. वृद्ध पुरोहित घाबरला. अधिक गडबड न करता निघून गेला. तंबूबाहेर त्याने अपोलो देवतेची प्रार्थना केली. देवासाठी आपण बांधलेली देवळे, केलेले यज्ञ यांची देवतेला त्याने आठवण करून दिली. अनेक स्तुतिस्तोत्रांनी तिला आळवले. 'आपल्या बाणांनी अॅचिअन्सचा निःपात कर आणि माझे अश्रू व दुःख यांचे परिमार्जन कर' अशी त्याने *भक्तिभावपूर्वक प्रार्थना केली."

मित्रा, अशा पद्धतीने अनुकरणाशिवाय साधे वर्णन कवीला करता आले असते.

**अॅडिमँट्स :** हो, ते मला समजले.

**सॉक्रेटिस :** मी तुम्हांस हे पटवून देऊ इच्छितो की, जेव्हा कवी कथमधून स्वतःचे शब्द वगळून फक्त संवाद किंवा संभाषण असे स्वरूप ठरवतो, त्यावेळी याउलट परिणाम घडलेला आढळतो.

**अॅडिमँट्स :** हो, तेही समजले. शोकांतिकेमध्ये असेच घडते.

**सॉक्रेटिस :** तुझी समजूत योग्य आहे. आणखी एक मी सांगू इच्छितो की, काव्य किंवा कवितालेखन हे साहित्याचे स्वरूप पूर्णतः अनुकरणात्मक असते. उदा. दुःखान्तिका आणि सुखान्तिका हे नाट्यप्रकार. आणखी एका प्रकारच्या साहित्यात कवी सर्व निवेदन स्वतःच्या भाषेतच करीत असतो. उदा. डिथिरँबिक हे आवेशपूर्ण रंगेल काव्य. तिसऱ्या प्रकारच्या साहित्यात कवीचे आत्मनिवेदनात्मक वर्णन आणि अनुकरण असे उभयविध म्हणजेच मिश्र स्वरूप असते. उदा. महाकाव्यासारखे साहित्य.

**अॅडिमँट्स :** हो, प्रथम तुम्ही जे सांगितले ते आता मला चांगले समजले.

**सॉक्रेटिस :** आता आपण पूर्वी जे म्हटले त्याची आठवण करून देतो. वाङ्मयाच्या विषयासंबंधी आपण निर्णय घेतला. आता मांडणी, पद्धती यांविषयी विचार करायचे राहिले आहे.

**अॅडिमँट्स :** आठवले.

---

* हा मजकूर Conford च्या आवृत्तीत गाळलेला असल्याने तो Jowett च्या आवृत्तीवरून घेतला आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या आदर्श राज्यात कवींनी साहित्यलेखन करताना अनुकरणाचा अंगीकार पूर्णपणे करावा, मुळीच करू नये किंवा थोडा करावा, या भूमिकांसंबंधी आपण एकवाक्यता केली पाहिजे आणि अनुकरण करणे असल्यास ते कोणत्या तत्त्वाने केले पाहिजे हे ठरवू.

**ॲडिमँट्स :** माझ्या कल्पनेप्रमाणे आपल्या आदर्श राज्यात दुःखान्त किंवा सुखान्त नाटके करण्याची परवानगी द्यावी का ? याविषयी तू विचार करीत आहेस.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. पण यापेक्षा अन्यही विषय आपण विचारात घेतले पाहिजेत. मला स्वतःलाच अजून त्यांविषयी पूर्ण माहिती नाही. वाऱ्याच्या दिशेने जहाज जाते, तसा चर्चेचा ओघ जिकडे जाईल त्या दिशेने आपला मुक्तिवार झाला पाहिजे.

**ॲडिमँट्स :** तुमचे बोलणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** ॲडिमँट्स ! आपल्या आदर्श राज्यातील संरक्षकांनी वा सैनिकांनी नकलाकार व्हावे काय असा प्रश्न आहे. अर्थात त्याचे उत्तर आपण अगोदरच दिले ना ? एका व्यक्तीने एकच काम चांगले करावे, अधिक कामे करू नयेत. खूप कामे करण्याचा प्रयत्न केला, तर कोणत्याच कामात प्राविण्य लाभत नाही. ही भूमिका आपण पूर्वी मान्य केली नाही का ?

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** अनुकरणाविषयी हेच तत्त्व मान्य करता येणार नाही का ? माणसाला एखादी नक्कल चांगली जमते, पण अनेक गोष्टींची नक्कल शक्य आहे काय ?

**ॲडिमँट्स :** निश्चितच नाही.

**सॉक्रेटिस :** मग जर एखादी व्यक्ती महत्त्वाच्या उद्योगात गुंतली असेल, तर अनेकांचे अनुकरण करून यशस्वी होणे तिला अशक्य आहे. अनुकरणाच्या दोन समान शाखांमध्येसुद्धा उत्कृष्ट यश मिळविणे फार कठीण आहे, असे मला वाटते. उदा. सुखान्त आणि दुःखान्त यांना आपण नुकतेच अनुकरणांचे प्रकार म्हटले नाही काय ?

**ॲडिमँट्स :** हो. एकाच माणसाला दोन्ही प्रकारांत सारखे आणि चांगले यश मिळणे अशक्य आहे, हा तुमचा दृष्टिकोन योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** काव्यलेखन, काव्यगायन आणि नाटक हे व्यवसाय एकाच माणसाला करणे अशक्य आहे.

**ॲडिमँट्स :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** एकाच नटाला सुखान्त आणि दुःखान्त नाटकातील भूमिका जमणार नाही. त्याचा समावेश अनुकरणामध्येच होतो ना ?

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस** : माणसाच्या ज्ञानशक्तीचे याहून अधिक सूक्ष्म भेद आहेत. त्यामध्ये माणसाला अनेक गोष्टी सारख्याच चांगल्या तऱ्हेने जमत नाहीत. जिथे अनुकरण आहे अशा गोष्टी त्याला येत नाहीत.

**ॲडिमँट्स** : तुझे म्हणणे खरे आहे.

**सॉक्रेटिस** : जर आपली पहिली भूमिका आपण टिकवणार असू तर आपल्या प्रशासकांनी अन्य कोणताही व्यवसाय करू नये. देशाच्या स्वातंत्र्याकरिता त्याला खूप कौशल्याने आपली भूमिका पार पाडायची असते. त्याला पूरक एवढ्याच गोष्टी त्यांनी केल्या पाहिजेत. अन्य गोष्टी करण्याच्या सवयी त्यांना लागता कामा नयेत किंवा इतरांचे अनुकरण-नक्कल करण्याचा प्रयत्न त्यांनी करू नये. जर त्यांना अनुकरण करायचे असेल तर लहानपणापासून त्यांच्या श्रेष्ठ व्यवसायाला योग्य अशा शूर, सभ्य, धर्मशील, सन्माननीय, उदार आणि आत्मसंयमी अशा व्यक्तींचेच अनुकरण त्यांनी करावे. हलकट, क्षुद्र अशा कोणत्याही प्रकारच्या वर्तनाची सवय त्यांना असू नये किंवा त्याची नक्कल करण्याची निपुणता त्यांनी दाखवू नये. तसे झाले तर अनुकरणाऐवजी खरेखुरे दुर्गुणच त्यांच्या अंगी येतील. शारीरिक हावभाव, आवाजातील चढउतार, विचारपद्धती, मनोवृत्ती यांचे अनुकरण व्यक्तीने लहानपणापासून केले तर प्रथम तिला सवयी जडतात आणि त्यामधूनच स्वभाव निर्माण होतो असे आपण पूर्वीच पाहिले आहे.

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : म्हणून ज्यांच्याविषयी आपण फार जागृत आहोत, जे उत्तम नागरिक व्हावेत असे आपणांस वाटते त्यांनी नाटकात काम करून एखाद्या दुःखी, दुर्दैवी, शोक करणाऱ्या तरुण वा वृद्ध स्त्रीची नक्कल करावी. पुरुषांना शिव्या द्याव्यात, देवतांची निंदा करावी आणि हे करण्यात आनंद मानावा हे आपणांस पसंत नाही. आजारी, प्रेमवेड्या कामगार स्त्रीची नक्कल तर त्यांनी मुळीच करू नये.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे स्त्री किंवा पुरुष गुलामांची नक्कल त्यांनी करू नये.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आपल्या वर्णनाविरुद्ध ज्यांचे वर्तन असते असे भित्रे, दुर्गुणी, परस्परांना शिव्या देणारे, अकारण हसणारे, झिंगणारे, सर्वत्र शांत वातावरण असताना अचकट-विचकट बोलणारे, एकमेकांविरुद्ध किंवा इतरांविरुद्ध शब्दाने गुन्हा करण्याची सवय ज्यांना आहे असे, यांचे अनुकरण त्यांनी करू नये. आपल्या आदर्श राज्याच्या संरक्षकांना पुरुषांतील आणि स्त्रियांतील वेड्या, दुर्गुणी, दुष्ट व्यक्तींची माहिती असणे जरी आवश्यक असले, तरी त्यांनी स्वतः तसे वागू नये किंवा त्याचे अनुकरण करू नये.

**ॲडिमँट्स** : ते खरे आहे.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे लोहार, वल्हेकरी, जहाजावरील अधिकारी, अन्य कारागीर यांचे अनुकरण त्यांनी करावे का ?

**ॲडिमँट्स** : अर्थातच नाही. अशा व्यवसायाकडे लक्ष देण्यास त्यांना परवानगी असणार नाही.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे घोड्यांचे खिंकाळणे, बैलासारखे डुरकणे, नद्यांचा खळखळाट, मेघांचा गडगडाट, समुद्राची घनगर्जना यांचे त्यांनी अनुकरण करावे काय ?

**ॲडिमँट्स** : मुळीच नाही. कारण त्यांनी स्वतः वेड्यांसारखे वागू नये किंवा वेड्यांचे अनुकरण करू नये.

**सॉक्रेटिस** : जर तुझे म्हणणे मला समजले असेल तर वर्णनाच्या दोन पद्धती दिसतात. एक पद्धती सभ्य व सुसंस्कृत माणसाला वर्णन करावयास सांगितले असता जिचा वापर तो करील अशी आणि ज्याचा स्वभाव आणि शिक्षण विरुद्ध प्रकारचे असेल अशी व्यक्ती जी पद्धती वापरेल ती.

**ॲडिमँट्स** : हो. या दोन अभिव्यक्तींच्या पद्धती आहेत खऱ्या.

**सॉक्रेटिस** : सुसंस्कृत मनुष्य जेव्हा सत्प्रवृत्त माणसाच्या बोलण्याचे किंवा कृतीचे वर्णन करेल तेव्हा स्वतः समरस होऊन करेल. जेव्हा अशा माणसाचे वर्तन निश्चित व शहाणपणाचे असेल तेव्हा त्याचे वर्णन करण्यास त्यास संकोच वाटणार नाही. पण जेव्हा सज्जन माणसाच्या मनावरचा ताबा आजारपण, प्रेमभावना, मद्यप्राशन, दुर्दैवाचा आघात यांमुळे नष्ट झालेला असतो, त्यावेळी त्याच्या वर्तनाचे वर्णन तो संयमाने करील. सुसंस्कृत माणसाला आपल्यापेक्षा हलक्या आणि अयोग्य अशा व्यक्तीचे वर्णन करायचे असेल तेव्हा तो ते विशेष अभ्यासपूर्वक करणार नाही. तिच्या सद्वर्तनाचे तो वर्णन करेल. पण दुर्वर्तनाचे करण्यास त्यास लाज वाटेल. कारण त्या स्वभावाचे अनुकरण करण्याची सवय त्याला नसते. हलक्या लोकांसारखा आपला स्वभाव व्हावा हे त्याला मान्य नसते. केवळ मनोरंजनासाठी कलेचा उपयोग त्याला कमीपणाचा व तिरस्करणीय वाटतो.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : मग सुसंस्कृत व्यक्ती आपण होमरच्या काव्याबद्दल बोलताना ज्या वर्णनात्मक शैलीचा विचार केला, तिचा उपयोग करील ना ? म्हणजे तो अनुकरण आणि साधे निवेदन यांचे मिश्रण वापरील. आणि थोडाच भाग नकलेच्या स्वरूपात सांगेल. माझे म्हणणे चूक आहे का ?

**ॲडिमँट्स** : नाही. पद्धतीच्या स्वीकाराबद्दल तुम्ही योग्य ते सांगितले आहे.

**सॉक्रेटिस** : जर माणसाचा स्वभाव तसा नसेल, ज्या प्रमाणात तो स्वभाव तिरस्करणीय असेल, त्या प्रमाणात त्या व्यक्तीला साहित्यात गाळण्यासारखे निषिद्ध असे जाणवणार नाही. अशी व्यक्ती इतरांसमक्ष कोणताही भाग न गाळता सगळ्यांचेच अनुकरण करील. मेघांचा

गडगडाट, वादळ, वारे, चाक, फिरकी, तुतारी, बासरी, अलगूज यांचा आवाज, कुत्र्याचे भुंकणे, मेंढीचे बें बें करणे, पक्ष्यांचे आवाज या सर्वांचे तो अनुकरण करील. त्याच्या पद्धतीत साधे वर्णन फारच थोडे असणार आणि बहुतेक अनुकरणच असणार.

**ॲडिमँट्स** : हो, तो तशी पद्धत वापरेल.*

**सॉक्रेटिस** : मला साहित्याच्या संदर्भात ज्या दोन पद्धती अभिप्रेत आहेत त्या याच होत.

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : त्यांपैकी एकात बदल आणि विविधता कमी असते. जर आपल्याला स्वरमेळ आणि लय या गोष्टी साधता आल्या तर पद्धत न बदलता एकतानतेत बरोबर वर्णन करता येते. केला जाणारा बदल किरकोळ असल्याने लयही साध्य होते.

**ॲडिमँट्स** : ठीक आहे.

**सॉक्रेटिस** : दुसऱ्या पद्धतीत अनेक व विविध बदल असल्याने सर्व तऱ्हेचे स्वरमेळ, ताल, लय यांची गरज लागते.

**ॲडिमँट्स** : अर्थात.

**सॉक्रेटिस** : कवी आणि लेखक या दोन पद्धतींपैकी कोणत्या तरी एकीचा किंवा संमिश्र पद्धतीचा उपयोग करीत नाहीत का ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : मग या तीन पद्धतींपैकी या किंवा त्या किंवा मिश्र पद्धतीला आपण आपल्या आदर्श राज्यात परवानगी द्यावी का ?

**ॲडिमँट्स** : माझ्या दृष्टीने सद्‌गुणी माणसाच्या वर्तनाचे वर्णन करण्यास योग्य अशा शुद्ध साध्या निवेदन पद्धतीलाच आपण परवानगी द्यावी.

**सॉक्रेटिस** : पण ॲडिमँट्स, मिश्र पद्धती आकर्षक असते, तुला जी पद्धत पसंत आहे, त्यापेक्षा वेगळी किंवा विरोधी पद्धती मुलांना, नोकरांना, सामान्य लोकांना अधिक आकर्षक वाटते.

**ॲडिमँट्स** : हो. त्यांना तशी वाटते.

**सॉक्रेटिस** : पण तू असे म्हणशील की, आपल्या आदर्श राज्याच्या धोरणाला अनुसरून ही पद्धत नाही. आपण प्रत्येकाला वेगळा व्यवसाय नेमून दिला आहे आणि दोन किंवा अनेक व्यवसाय करणारी व्यक्ती आपण मान्य करीत नाही.

**ॲडिमँट्स** : तुमची भूमिका योग्य आहे. ती पद्धती विसंगत ठरेल.

---

*हा मजकूर Conford च्या आवृत्तीत गाळलेला असल्याने तो Jowett च्या आवृत्तीवरून घेतला आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच आपल्या राज्यात चांभार चांभाराचे काम करतो, तो जहाजाच्या तांडेलाचे काम करीत नाही. शेतकरी शेतीचेच काम पाहतो, त्याच्या जोडीने न्याय पंचायतीत पंच म्हणून काम करीत नाही. शिपाई शिपायाचेच काम करतो, व्यापाऱ्याचे नाही.

**अॅडिमँट्स :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** कोणतीही भूमिका घेऊन कोणत्याही विषयाची नक्कल करून, आपल्या बुद्धीची करामत करवून दाखवू म्हणणारा असा एखादा हुशार माणूस आपल्या राज्यात आला तर आपण त्याचा सज्जन म्हणून सन्मान करू. अभिनंदन करू. पण आपल्या राज्यात कायद्याप्रमाणे अशा माणसाला राहता येत नाही असे त्याला सांगू. त्याचे डोके तेलाने माखून लोकरीच्या पट्ट्याने त्याचे केस बांधून त्याला आपण दुसऱ्या राज्यात पाठवून देऊ ! अशा माणसापेक्षा अधिक कणखर मनोवृत्तीचे कमी आकर्षक पण साधेपणाने राहणारे कवी आणि कथाकार आपण आपल्या हिताकरिता पदरी ठेऊ. आपल्या राज्यातील योद्धयांच्या शिक्षणपद्धतीविषयी विचार करताना ज्या सद्‌गुणसंपन्न माणसाच्या राहणीचे वर्णन आपणांस हवे आहे असे काव्य व कथा ते लिहितील. त्यांचे लिखाण योद्धयांच्या शिक्षणपद्धतीशी सुसंगत असेल.

**अॅडिमँट्स :** हो. जर आपल्याकडे सत्ता असली तर आपण तसे जरूर करू.

**सॉक्रेटिस :** प्रिय अॅडिमँट्स, साहित्याचा विषय आणि पद्धती यांविषयी आपण आतापर्यंत चर्चा केली. आणि त्यानुसार आपला त्या संदर्भातील शिक्षणविषयक विचार पूर्ण झाला आहे.

**अॅडिमँट्स :** हो. मलासुद्धा तसेच वाटते.

### (४) संगीत, वाद्यवादन आणि छंदोरचना यांचे शिक्षणातील स्थान व स्वरूप

**सॉक्रेटिस :** यानंतर आपल्याला गीत आणि काव्य यांच्या शैलीचा विचार करावयाचा आहे.

**अॅडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** आपल्या पूर्वीच्या निर्णयानुसार यासंबंधी काय म्हणावे ? त्यांचे स्वरूप काय असावे ? याबद्दल विचार करणे कोणालाही सहज शक्य होईल.

**ग्लॅकॉन :** सॉक्रेटिस ! 'कोणालाही !' या शब्दात मी येत नाही त्याचे कारण आपण कोणते प्रकार मान्य करावेत याविषयी मला शंका आहे. मी निश्चयपूर्वक काहीच सांगू शकत नाही.

**सॉक्रेटिस :** तुला निदान एवढे तरी माहीत आहे की, गीतामध्ये तीन प्रकार असतात–शब्द, स्वरमेळ, लय.

**ग्लॅकॉन :** होय. ते मला माहीत आहे.

**सॉक्रेटिस :** शिवाय आतापर्यंत आपण ज्या पद्धतींचा विचार केला त्या दृष्टीने गेय शब्द आणि गद्य शब्द यांत काही फरक नाही.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** स्वरमेळ आणि लय शब्दाशी सुसंगत हवेत हे मान्य आहे ना?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** शिवाय शोकगीते आणि विलापिका यांची आपल्याला गरज नाही असे आपण म्हटलेच आहे.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** तू संगीतज्ज्ञ आहेस म्हणून कोणते स्वरमेळ शोकसूचक असतात ते सांगशील का?

**ग्लॅकॉन :** मिश्र लिडियन आणि हायपर लिडियन हे आणि असेच!

**सॉक्रेटिस :** असे स्वरमेळ आपण वगळले पाहिजेत, कारण पुरुषांनाच नव्हे तर स्त्रियांनासुद्धा सद्‌गुणी करण्यास त्यांचा उपयोग नाही.

**ग्लॅकॉन :** बरोबर!

**सॉक्रेटिस :** मदिरासक्ती, नाजूकपणा, आळस हे दुर्गुण आपल्या राज्यकर्त्यांना शोभणारे नाहीत.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** नाजूकपणा आणि मदिरासक्ती दाखविणारे स्वरमेळ कोणते?

**ग्लॅकॉन :** आयोनियन आणि लिडियन हे मृदू स्वरमेळ.

**सॉक्रेटिस :** सैनिकांच्या शिक्षणासाठी त्याचा काही उपयोग आहे काय?

**ग्लॅकॉन :** मुळीच नाही. यानंतर डोरियन आणि फ्रिजिअन स्वरमेळ उरले आहेत.

**सॉक्रेटिस :** मला स्वरमेळ कळत नाही. त्याकरिता युद्ध व तशा भयंकर प्रसंगात वीरांना अपयश आले, ते जखमी झाले, आसन्नमरण स्थिती त्यांना प्राप्त झाली किंवा अन्य काही अडचण आली, तर ज्यामुळे दुर्दैवाचे आघात धीरोदात्तपणे सहन करण्याची ताकद येते असा वीरश्रीयुक्त, स्वर व आवाज यांनी बनलेला स्वरमेळ कोणता ते मला सांग. त्याचप्रमाणे शांत वातावरणात ईश्वराची भक्तिभावाने प्रार्थना करण्यासाठी किंवा इतरांनी केलेली तशी प्रार्थना ऐकून, वीरश्री प्राप्त करण्यास उपकारक ठरणारा, उद्दामपणाऐवजी शांत, नेमस्त वागण्यास प्रोत्साहन देणारा, कोणत्याही प्रसंगास तोंड देण्यास समर्थ करणाऱ्या आणि ज्यात शांत व निर्भय पुरुषाचा स्वभाव व्यक्त होतो तो दुसरा एक स्वरमेळाचा प्रकार मला सांगा. म्हणजेच दुःखात आणि सुखात ज्याने व्यक्तीचा नेमस्तपणा आणि धैर्य प्रकट होते असा शांत आवेश प्रकट करणारा स्वरमेळ कोणता ते दाखवा.

**ग्लॅकॉन :** ठीक. डोरियन आणि फ्रिजियन हे आताच सांगितलेले स्वरमेळ त्यासाठी उपयोगी पडतील.

**सॉक्रेटिस :** गीतासाठी किंवा वाद्यसाहित्यासाठी पुष्कळ तारा असलेले आणि सर्व सूर असणारे एकच वाद्य असण्याची आपणाला गरज नाही.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** हार्प किंवा डुलसिमर वा पुष्कळ तारा असणारी, पुष्कळ स्वरमेळ वाजविता येण्यासारखी वाद्ये तयार करणारे खास कारागीर आपण नेमणार नाही.

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** पण मुरली तयार करणारे, वाजविणारे कलावंत आपण स्वीकारू. कारण इतर वाद्यांपेक्षा मुरलीमध्ये अधिक सूर असतात. पॅन हार्मोनियम मुरलीसारखीच असते हे माझे मत बरोबर आहे ना ?

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** उरलेली सारंगी, वीणा यांसारखी वाद्ये शहरातील लोकांच्या उपयोगासाठी आहेत. खेड्यातील धनगरास पावा चालू शकेल.

**ग्लॅकॉन :** असे आपल्या चर्चेतून निष्पन्न होते.

**सॉक्रेटिस :** मारस्यस आणि त्याच्या वाद्याऐवजी, अपोलो आणि त्याची वाद्ये आपण पसंत करीत आहोत. ही आपली सुधारणा अयोग्य नाही.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** बरे. शहरातील ऐषआरामी वातावरणामुळे निर्माण झालेली घाण आपण आपल्या राज्यातून नकळत काढून टाकीत आहोत.

**ग्लॅकॉन :** हे चांगलेच आहे.

**सॉक्रेटिस :** त्यानुसार ही घाण साफ करण्याचे काम आपण लवकर पूर्ण करू. स्वरमेळाविषयीचा विचार आपण पूर्ण केला आहे. आता लयविषयक नियमांची थोडी चर्चा करू. त्यांचे सर्व प्रकार किंवा वैचित्र्य यांच्याऐवजी सुव्यवस्थित, धैर्यवान आयुष्य जगण्यासाठी कोणते स्वाभाविक लय उपयोगी पडतात ते ठरविले पाहिजे. त्यानंतर जीवन हे गीत आणि गीतातील ताल-लय यांना अनुकूल बनविण्याऐवजी, जीवनाशी त्या सुसंगत कशा होतील हे पाहिले पाहिजे. स्वरमेळ जसे तुम्ही ठरविलेत तसे लयांचे स्वरूप व प्रकार तुम्ही ठरविले पाहिजेत.

**ग्लॅकॉन** : पण मला ते ठरविणे अवघड आहे. माझ्या माहितीनुसार मी एवढेच म्हणेन की, जसे चार प्रकाराने आवाजाचे रूपांतर स्वरमेळात होते, तसे लयाचे तीन मुख्य प्रकार असतात. पण कोणता लय कोणत्या प्रकारच्या आयुष्याचे प्रतीक असतो हे मात्र मी सांगू शकणार नाही.

**सॉक्रेटिस** : त्यासाठी आपण डेमानचा सल्ला घेऊ. क्षुद्रता, उद्धटपणा, वेड आदी दुर्गुण दाखविणारे लय कोणते आणि त्याविरुद्ध गुण दाखविणारे लय कोणते ते आपणांस डेमान सांगू शकेल.

*माझ्या आठवणीप्रमाणे डेमानने मिश्र क्रेटिक, डिक्टिलिक आणि हिरॉईक असे लयांचे वर्णन केले आहे. हा अनुक्रम तो कसा लावतो ते मला माहीत नाही. प्रत्येक पदाचे लघु-गुरू अक्षरांत विभाग करून आरोह-अवरोह यांची तालबद्धता त्यांनी दाखविली आहे. पहिले लघु, दुसरे गुरू अशा दोन अक्षरांनी तयार होणाऱ्या गणांच्या पदास 'आयम्बिक' आणि पहिले गुरू, दुसरे लघु अशा दोन अक्षरांनी तयार होणाऱ्या गणांच्या पदास 'ट्रोके' असे त्याने म्हटले आहे. केव्हा तो पदांची गती, लय किंवा दोहोंचे मिश्रण यांची निंदा किंवा स्तुती करतो, पण मला त्याविषयी नेमके काहीच माहीत नाही. हे प्रश्न आपण डेमानलाच विचारले पाहिजेत. कारण त्या प्रश्नांची चर्चा करणे कठीण नाही का ?*

**ग्लॅकॉन** : माझेही तसेच मत आहे.

**(५) शिक्षणाचे तत्त्वज्ञान**

**सॉक्रेटिस** : सौंदर्य आणि कुरूपता, चांगली आणि वाईट लय यांचा वर्तनावर परिणाम होतो, हे खरे ना ?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : चांगली आणि वाईट लय स्वभावतःच चांगल्या आणि वाईट पद्धतींचे परिणाम असतात. आपल्या म्हणण्याप्रमाणे लय आणि स्वरमेळ शब्दाशी सुसंवादी असतात. म्हणून चांगला आणि वाईट स्वरमेळ असेही आपणांस म्हणता येईल.

**ग्लॅकॉन** : लय आणि स्वरमेळ शब्दाशी अनुकूल असलेच पाहिजेत.

**सॉक्रेटिस** : काव्याचा आशय आणि त्याची अभिव्यक्ती ही व्यक्तीच्या चारित्र्यावरच अवलंबून राहते.

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : इतर सर्व गोष्टीसुद्धा यानुसारच ठरतात.

**ग्लॅकॉन** : हो.

---

*हा मजकूर Conford च्या प्रतीमध्ये गाळलेला असल्याने तो Jowett च्या प्रतीवरून घेतला आहे.

**सॉक्रेटिस :** भाषा, स्वरमेळ, आकर्षकपणा, लय या सर्वांचे सौंदर्य साधेपणावर अवलंबून असते. अर्थात साधेपणा वा सत्प्रवृत्ती म्हणजे बावळटपणा नव्हे. नैतिक चारित्र्य हे सत्प्रवृत्त, उदार मनाचे प्रतीक असते.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** आपल्या आदर्श राज्यातील तरुणांनी योग्य स्वधर्माचे पालन करायचे असेल तर त्यांनी हे नैतिक सद्‌गुण अंगी बाळगले पाहिजेत ना?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** हे गुण चित्रकला, विणकाम, नक्षीकाम यांसारख्या कलांमध्ये, तसेच सजीव प्राण्यांची शरीरे, वनस्पती यांमध्ये आढळतात. सौंदर्य आणि कुरूपता या सर्वांत आढळतात. सौंदर्य, लय, सुस्वरता या गुणांचा अभाव वाईट वर्तन किंवा अशुद्ध चारित्र्य दाखवतो, तर हे गुण जिथे आढळतात ते वर्तन शौर्य, धैर्य, शांती यांचे प्रतीक असते.

**ग्लॅकॉन :** तुझी भूमिका अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** जर माझी भूमिका बरोबर असेल तर, कवी, साहित्यिक यांच्या निर्मितीवर आपण देखरेख ठेवली पाहिजे. त्यांनी आपल्या वर्तनात नैतिक आदर्श रंगवले नाहीत, तर त्यांना आपण मनाई का करू नये? कोणत्याही व्यावसायिक कारागिरावर देखरेख ठेवून दुर्वर्तन, व्यभिचार, क्षुद्रता, कुरूपता यांचे वर्णन त्यांनी करू नये. किंवा तशा वस्तू, व्यक्ती, घटना रंगवू नयेत, अशी दक्षता घेणे आवश्यक नाही का? जे कलावंत असे वागणार नाहीत त्यांना आपल्या राज्यात राहण्यास मनाई केली पाहिजे, नाही का? तसेच, कुरणातील रोगट गवत पशू थोडे थोडे खातात, त्याप्रमाणे प्रत्येक दिवशी विविध कवींच्या काव्यातील दुर्गुणांचा साठा आपले संरक्षक अंतःकरणात करणार नाहीत आणि ते दुर्गुणी होणार नाहीत याची दक्षता आपण घ्यावयास नको का? याउलट जे कलावंत आपल्या संरक्षकांना सुंदर, शोभिवंत जे असेल ते दाखवून त्यांचे मन निरोगी बनवतील, संकल्पनांचे दर्शन त्यांना करवतील असे स्वयंप्रज्ञ कलावंत आपण शोधून काढावयास नकोत का? जी भूमी आरोग्यदायक असते, तिच्यावरून वाहणाऱ्या वायुलहरीपण आरोग्यकारक असतात. म्हणून आपल्या संरक्षकांना सत्कृत्यांची कीर्ती ऐकण्यास मिळेल, आणि दृष्टीला शुभ कृत्ये दिसतील, आणि त्याचा परिणाम म्हणून त्यांची बुद्धी सहजपणे सृष्टीतील प्रेम आणि सुसंवाद यांचा स्वीकार करेल. असा परिणाम ज्या कलांचा होतो, त्या कला निर्माण करणारे कलावंत आपण शोधून काढले पाहिजेत ना?

**ग्लॅकॉन :** हो. असे शिक्षण फारच श्रेष्ठ होय.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच आपण संगीत, साहित्य कला यांच्या शिक्षणाला विशेष महत्त्व देत नाही का? लय आणि स्वरमेळ यांचा मानवी अंतःकरणात प्रवेश झाला की त्याला सौंदर्य प्राप्त होते. सद्वर्तनाने मनुष्य सुंदर दिसतो, तर दुष्प्रवृत्तीच्या संस्काराने तो कुरूप बनतो.

ज्याच्यावर शिक्षणाचे सुसंस्कार झाले आहेत त्यांना कला आणि मानवी स्वभाव यांतील नेमके दोष पाहण्याची तीक्ष्ण दृष्टी लागते. त्या दोषांविषयी तिरस्कार वाटतो. जे जे सुंदर त्याविषयी आदर वाटतो. त्याचा स्वीकार करून आस्वाद घेऊन अशी व्यक्ती उदार मनाची आणि सद्‌गुणी बनते. त्याच्या प्रज्ञेची वाढ होण्यापूर्वी जे जे कुरूप त्याविषयी त्याला तिटकारा वाटतो. त्याचा तो निषेध करतो. त्याच्या बुद्धीचा विकास जेव्हा होतो, तेव्हा सुसंस्कारामुळे त्याची बुद्धी जे चांगले आणि सुंदर त्यांचा स्वीकार करते.

**ग्लॅकॉन :** म्हणून तर आपण संगीताचे किंवा सांस्कृतिक स्वरूपाचे शिक्षण दिले पाहिजे यात शंका नाही.

**सॉक्रेटिस :** तुला हे माहीत आहे की, जेव्हा आपण एखाद्यास वाचावयास शिकवितो तेव्हा प्रथम ज्यांनी शब्द तयार होतात ती अक्षरे त्यास ओळखण्यास शिकवितो. अक्षर ओळखीविना शिक्षण सुरू होत नाही. शब्द लहान असो वा मोठा असो, प्रथम अक्षर ओळखीची काळजी आपण घेतो.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** स्थिर पाण्यात किंवा आरशात अक्षरांची प्रतिबिंबे उमटतात. त्या अक्षरांच्या प्रतिकृती असतात. जर अक्षरेच माहीत नसली तर त्याचे ज्ञान होणार नाही आकृती आणि तिचे प्रतिबिंब यांचे ज्ञान कलेच्या अभ्यासाने होते.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणून आपल्या आदर्श राज्यातील संरक्षकांना आत्मसंयम, धैर्य, औदार्य, दानशूरता यांसारख्या सद्‌गुणांची रूपे माहीत असायला हवीत. त्याविरुद्ध गुणांचीही रूपे माहीत हवीत. ती लहान वस्तूत वा मोठ्या वस्तूत प्रतिबिंबित झाली असोत, त्याविषयी त्यांना अनादर असू नये. कारण त्या सद्‌गुणांच्या स्वरूपाचे ज्ञान एकाच कलेच्या अभ्यासाने होत असते असे त्यांनी समजले पाहिजे. कोणत्याही वर्तनात, घटनेत त्या रूपांची प्रतिबिंबे असली तरी ती त्यांना ओळखता आली पाहिजेत. त्याशिवाय आपले संरक्षक खऱ्या अर्थाने सुसंस्कृत होणार नाहीत.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** ज्याला ही मर्मदृष्टी लाभली आहे त्याच्या व्यक्तिमत्वात आत्म्याचे नैतिक सौंदर्य आणि शरीराचे बाहय सौंदर्य यांचा सुंदर समन्वय आढळतो. अशा माणसाच्या दर्शनापेक्षा कोणतेच अधिक सुंदर दृश्य नसते.

**ग्लॅकॉन :** खरेच, याहून अधिक सुंदर काही नसते.

**सॉक्रेटिस :** जे अतिशय सुंदर असते ते अतिशय रमणीय असते, खरे ना ?

**ग्लॅकॉन :** अर्थात.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच खरा सुसंस्कृत मनुष्य नैतिक आणि शारीरिक सौंदर्याची पूर्णावस्था ज्यांच्यात आढळते अशांवरच प्रेम करतो. ज्या व्यक्तीत शारीरिक आणि आत्मिक सुसंवाद नसतो अशी व्यक्ती त्याला आवडत नाही.

**ग्लॅकॉन :** जर व्यक्तीत आत्मिक दोष असला तर तिला ती आवडणार नाही. पण केवळ शारीरिक दोष असेल तर तो क्षम्य मानून तिच्यावर प्रेम करेल.

**सॉक्रेटिस :** समजले. तुझी एक अशी आवडती व्यक्ती होती—अजूनही आहे. म्हणून माझे बोलणे मी इथेच थांबवतो. आता हे सांग की, अतिरेकी स्वरूपाची सुखासीनता आणि संयम, यांत सुसंवाद असतो का?

**ग्लॅकॉन :** कसा असेल? दुःखाप्रमाणे अतिसुखही अस्वस्थता निर्माण करते.

**सॉक्रेटिस :** मग सद्‌गुण आणि अतिसुख यात तरी सुसंवाद असतो का?

**ग्लॅकॉन :** मुळीच नाही.

**सॉक्रेटिस :** मग अतिसुखाचा स्वैरपणाशी—व्यभिचाराशी तरी?

**ग्लॅकॉन :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** इंद्रियजन्य सुखाच्या तृप्तीपेक्षा अधिक मोठे तीव्र सुख सांगशील काय?

**ग्लॅकॉन :** मी सांगू शकत नाही. शिवाय अशा सुखापेक्षा अधिक वेगळेपणाचे सुखही मी सांगू शकणार नाही.

**सॉक्रेटिस :** खरे प्रेम शांत व सुसंवादी स्वभावात आढळते. अशा माणसाला सत्प्रवृत्त सुंदर माणसाविषयी प्रेम वाटते, खरे ना?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** मग वेड आणि दुष्टता यांना खऱ्या प्रेमाजवळ येऊ देता कामा नये.

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** याचा अर्थ खऱ्या प्रेमाच्या बाबतीत स्वैराचार असू नये. ज्यांच्या वर्तनात खरे प्रेम दिले किंवा घेतले जाते, अशा व्यक्तींनी स्वैराचारी होऊन सुख मिळवू नये.

**ग्लॅकॉन :** हो, तसे त्यांनी घेऊ नये.

**सॉक्रेटिस :** ज्या आदर्श राज्याचे स्वरूप आपण ठरवीत आहोत, त्यामध्ये आपण असा एक कायदा करू की, प्रियकराने प्रेयसीवर प्रेम करावे, तिच्या संगतीत रहावे आणि तिची परवानगी असेल तर आई आपल्या मुलाचे ज्या उदात्त वात्सल्याने चुंबन घेते किंवा आलिंगन देते तसे त्याने तिला द्यावे. पण दोघांनी अतिपरिचय वाढवू नये. जर ते तसे वागले तर अश्लीलता आणि हीन अभिरुची याबद्दल त्यांचा निषेध होईल.

**ग्लॅकॉन :** मला हे मान्य आहे.

**सॉक्रेटिस :** आपली काव्य आणि साहित्य यांतून व्हावयाच्या सांस्कृतिक शिक्षणाविषयीची चर्चा पूर्ण झाली, खरे ना ? जिथे ही चर्चा संपली पाहिजे तिथे ही संपली आहे असे आपण म्हणू शकू. सांस्कृतिक शिक्षणाची परिणती प्रेम आणि सौंदर्य यांच्या साक्षात्कारात झाली पाहिजे.

**ग्लॅकॉन :** मलाही तुझ्यासारखे वाटते.

### (६) शारीरिक शिक्षणाचे स्वरूप : आदर्श राज्यातील वैद्य व न्यायाधीश यांचे स्थान व कार्य

**सॉक्रेटिस :** आपल्या तरुणांच्या एकंदर अभ्यासक्रमामध्ये व्यायामाला दुसरे स्थान आहे.

**ग्लॅकॉन :** खात्रीने.

**सॉक्रेटिस :** संगीतासारखेच व्यायामाचे आहे. यामध्ये काळजीपूर्वक शिक्षण लहानपणापासून आयुष्यभर कायम ठेवले पाहिजे यात काही आश्चर्य नाही. माझ्या म्हणण्यासंबंधी विचार कर. माझे असे मत आहे की, चांगले उत्तम शरीर उत्तम आत्मा बनवू शकेलच असे नाही, पण चांगला आत्मा आपल्या चांगलेपणाने शरीराला पूर्णावस्था आणू शकेल, असे तुला वाटते ना ?

**ग्लॅकॉन :** मला तुमच्याप्रमाणेच वाटते.

**सॉक्रेटिस :** तर मग प्रथम सुसंस्कृत मनाची घडण करून त्यावरच आरोग्यविषयक योजना तयार करण्याचे काम सोपवू आणि विस्ताराची मर्यादा लक्षात घेऊन आपण सर्वसामान्य तत्त्वांची चर्चा करू. असे करणे बरोबर होईल का ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** आपण पूर्वी म्हटलेच आहे की, सैनिकांनी मद्यपान करता कामा नये. सैनिकांनी दारू पिऊन धुंद होणे व स्वतःला विसरणे या अत्यंत अश्लाघ्य गोष्टी आहेत, असे माझे मत आहे.

**ग्लॅकॉन :** संरक्षकाला स्वतःच्या संरक्षणास दुसऱ्याची गरज लागणे हे खरोखर हास्यास्पद आहे.

**सॉक्रेटिस :** ठीक. आता आपण आहाराविषयी काय नियम करावेत ? आपल्या लोकांना, अत्यंत महत्त्वाच्या खेळात भाग घ्यावयाचा आहे ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** तालमीत कुस्ती खेळणाऱ्या पैलवानांनी ज्याप्रमाणे त्यांच्या शरीराला खाण्यापिण्याची सवय लावलेली असते तशी सवय आपल्या लोकांनी लावणे योग्य होईल काय ?

**ग्लॅकॉन :** कदाचित होईल.

**सॉक्रेटिस** : पण अशी सवय झोप वाढविणारी असून ती आरोग्याला अनिष्ट आहे. कारण नियमित व्यायाम घेणारे लोक व्यायामाव्यतिरिक्त वेळ झोपून काढतात आणि ठराविक आहारापेक्षा थोडासा जरी वेगळा आहार घेतला, तरी ते भयंकर रोगाने पछाडले जातात असे तुम्हाला आढळले आहे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : तर मग त्यांनी राखण करणाऱ्या कुत्र्याप्रमाणे सदैव जागृत राहून दृष्टी व कान तीक्ष्ण ठेवले पाहिजेत आणि युद्धावर असताना खाण्यापिण्यातील बदल व ऋतुमानातील फरक त्यांनी सहन केले पाहिजेत अशा आपल्या सैनिकांकरिता आपल्याला वेगळी आणि उपयुक्त पद्धत योजावी लागेल. कारण अनिश्चित आरोग्य सैनिकांच्या उपयोगी पडणार नाही.

**ग्लॅकॉन** : माझेही मत तुमच्यासारखेच आहे.

**सॉक्रेटिस** : आपण आत्ताच वर्णन केलेल्या सांस्कृतिक शिक्षणाला उत्तम व्यायामपद्धतीची जोड दिली पाहिजे ना ?

**ग्लॅकॉन** : तुमच्या मते कोणती पद्धत ?

**सॉक्रेटिस** : आपल्या योद्धयांना योग्य अशी साधी पण नियमित पद्धत दिली पाहिजे.

**ग्लॅकॉन** : ती कशा प्रकारची असेल ?

**सॉक्रेटिस** : या मुद्द्यावर आपणाला होमरकडून माहिती मिळू शकेल. कारण तुम्हाला माहिती आहे की होमर जेव्हा आपल्या सैनिकांना रणांगणावर जेवण देतो तेव्हा जरी ते हेलेस्पांटच्या किनाऱ्यावर असले तरी त्यांना मासे अथवा तळलेले मांस देत नाही. फक्त भाजलेले मांसच देतो. कारण सैनिकांना ते सहजगत्या मिळू शकते, तसेच भांडी व तवा न नेता, नुसत्या विस्तवाचा उपयोग करणे अधिक सोयीचे असते.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : माझ्या माहितीप्रमाणे होमरने चवदार अन्नाचे कधीच वर्णन केले नाही. व्यायाम घेणाऱ्या लोकांनासुद्धा हे माहीत असते की, स्वादिष्टपणापासून अलिप्त राहिले तरच चांगले शरीर कमावण्याची इच्छा पुरी होऊ शकते.

**ग्लॅकॉन** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : तर मग तुम्हाला सिराकुसन पद्धतीची मेजवानी व सिसीलियन पक्वान्ने पसंत पडणार नाहीत असे मला वाटते.

**ग्लॅकॉन** : होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आरोग्यपूर्ण शरीराच्या लोकांना कोरिंथ शहरातील स्त्रियांबद्दल ओढ वाटावी हेही तुम्हाला आवडणार नाही.

**ग्लॅकॉन :** अर्थात नाही.

**सॉक्रेटिस :** सुप्रसिद्ध ॲथिनियन मेवामिठाई तुमच्या दृष्टीने त्याज्यच असेल ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** अशा तऱ्हेच्या खाण्याच्या व राहण्याच्या पद्धतीची पॅनहार्मोनियम संगीताच्या पद्धतीशी तुलना बरोबर होईल असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** ही तुलना खात्रीनेच बरोबर होईल.

**सॉक्रेटिस :** संगीतातील विविधता जशी आत्म्यामध्ये विकृती निर्माण करते त्याचप्रमाणे आहारातील विविधता शरीरात रोग निर्माण करते. आणि संगीतातील साधेपणा ज्याप्रमाणे आत्म्यामध्ये आत्मसंयमन निर्माण करतो त्याचप्रमाणे व्यायामातील साधेपणा सुदृढ शरीर निर्माण करतो.

**ग्लॅकॉन :** हे अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** पण जेव्हा बदफैलीपणा आणि अनारोग्य यांचा शरीरात प्रादुर्भाव होतो, त्या वेळेस न्यायालये व दवाखाने मोठ्या प्रमाणावर उघडले जातात त्या वेळी चांगले घरंदाज लोकही वकिली व वैद्यकीय व्यवसाय करू लागतात व त्यामुळे या व्यवसायांना उच्च दर्जा प्राप्त होतो.

**ग्लॅकॉन :** हे स्पष्टच आहे.

**सॉक्रेटिस :** जेव्हा पहिल्या प्रतीच्या वैद्यांची व न्यायाधिशांची जरुरी केवळ हलक्या लोकांनाच नव्हे तर हलक्या व सुशिक्षित लोकांनाही भासू लागते, तेव्हा तीच गोष्ट राज्यामध्ये हलक्या प्रतीचे दुर्गुण उत्पन्न करणारे शिक्षण चालू आहे हे सिद्ध करीत नाही काय? घरी योग्य न्याय मिळत नसल्याने लॉर्ड आणि न्यायाधीश यांच्याकडून न्याय मागावा लागणे हा सदोष शिक्षणाचाच पुरावा असून ते अत्यंत लाजिरवाणे आहे असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** होय, माझेही मत तुमच्यासारखेच आहे.

**सॉक्रेटिस :** वादी किंवा प्रतिवादी या नात्याने न्यायालयात हेलपाटे घालण्यात आपल्या आयुष्याचा बराचसा काळ घालविलेले, इतकेच नव्हे तर ह्या गोष्टींबद्दल ऐट मिरवून आपली हीन अभिरुची दाखविणे, तसेच गुन्हे करण्यात आपण तरबेज असून लबाडी व टाळाटाळी करण्यात आपण निष्णात असल्याने या ना त्या मार्गाने आपण न्यायाच्या कचाटचातून सुटू शकतो, अशा प्रकारची बढाई मारणे, तसेच न्याय मागण्याकरिता न्यायालयात न जाता सरळ साधे आयुष्य जगणे किती उपयुक्त आहे हे माहीत नसणे याही गोष्टी लाजिरवाण्या आहेत असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** ग गोष्टी तर पहिल्यापेक्षा अधिक लाजिरवाण्या आहेत.

**सॉक्रेटिस :** जखम न होताच अथवा साथीचा ताप वगैरे न येताच वैद्याची मदत घेणे अयोग्य नाही काय ? आपल्या आळशीपणाने आणि अनियमितपणाने आपल्याला थंडी किंवा प्लीहा होऊन एक्स्लीपिअसच्या हुषार मुलांना आमवात, शैत्य वगैरे रोगांची नावे शोधून काढावी लागली हे हास्यास्पद आहे.

**ग्लॅकॉन :** रोगांची ही नावे तर फारच चमत्कारिक, नवीन व विचित्र आहेत.

**सॉक्रेटिस :** एक्स्लीपिअसच्या वेळेस ही नावे अस्तित्वातही नव्हती. ट्रॉयमध्ये जेव्हा युरिपिलस जखमी झाला तेव्हा एका बाईने त्याला बार्ली व चीज यांबरोबर प्रॅग्नियन दारूचा एक घोट दिला. हे मिश्रण अतिकडक असूनही त्याच्या मुलांनी तिला दोष दिला नाही. तसेच पॅट्रोक्लसने त्याच्या जखमा धुतल्या म्हणून त्याचीही निंदा केली नाही.

**ग्लॅकॉन :** वास्तविक तशा अवस्थेत ते औषध देणे योग्य नव्हते.

**सॉक्रेटिस :** श्रीमंत माणसाच्या मुलाची सेवा करण्यास ज्याप्रमाणे नोकर असतो, त्याप्रमाणे रोगांची शुश्रूषा करणारी एखादी पद्धत हिरोडिकसच्या वेळेपर्यंत अस्तित्वात नव्हती हे लक्षात घेतले म्हणजे युरिपिलसला दिलेले वरील औषध तुम्हाला चमत्कारिक वाटणार नाही. हिरोडिकस आजारी पडल्यावर त्याने स्वतः अशा प्रकारचा व्यायाम केला व औषध घेतले की त्यामुळे त्याला स्वतःला तर त्रास झालाच शिवाय इतरांनाही झाला.

**ग्लॅकॉन :** हे कसे काय ?

**सॉक्रेटिस :** आपला मृत्यू लांबणीवर टाकून प्राणघातक रोग झाला असूनही तो त्याने क्रमाक्रमाने वाढू दिला. आणि स्वतः तो रोग बरा करण्यास असमर्थ झाल्यावर नुसता पडून राहू लागला. नेहमीच्या खाण्यापिण्यात थोडा जरी बदल झाला तरी तो चिडत असे. अशा तऱ्हेने मृत्यूशी झगडत असता केवळ स्वतःच्या वैद्यकीय कौशल्यामुळेच तो म्हातारपणापर्यंत जगू शकला.

**ग्लॅकॉन :** स्वतःच्या हुशारीचे त्याला चांगलेच बक्षीस मिळाले.

**सॉक्रेटिस :** एक्स्लीपिअसला ही पद्धत माहिती होती किंवा त्याने तिचा उपयोग केला नव्हता. म्हणूनच त्याने आपल्या वंशजांना ती सांगितली नाही, असा एखादा अडाणी मनुष्य म्हणेल. सुव्यवस्थित राज्यामध्ये प्रत्येकाला आपापले नेमून दिलेले कार्य करावयाचे असल्यामुळे, कुणालाही वैद्याची औषधे घेत झोपून राहण्यास वेळ नसतो. हे तत्त्व माहीत असल्यामुळेच वरील प्रकारची पद्धत त्याने उपयोगात आणली नसावी. हे तत्त्व आपण श्रमजीवी लोकांसंबंधी बोलताना हास्यास्पद आहे असे समजतो.

**ग्लॅकॉन :** ते कसे काय ?

**सॉक्रेटिस :** एखादा सुतार जर आजारी पडला तर वैद्याच्या औषधामुळे उलट्या होऊन किंवा शौचास होऊन आपला आजार जाईल असे त्याला वाटते. डाग दिल्याने वा शस्त्रक्रिया केल्यानेही तो नाहीसा होऊ शकेल अशी त्याला आशा असते. पण एखाद्या वैद्याने जर दीर्घ

मुदतीचे पथ्य पाळावयास सांगितले अथवा पट्टया बांधून ठेवावयास सांगितले तर ते त्याला परवडणार नाही. तो वैद्याला म्हणेल, "वैद्यमहाशय, आजारी पडायला मला वेळ नाही. रोगाची चिंता करण्यात दिवस घालवणे मला शक्य नाही. कारण माझ्या नेहमीच्या कामाकडे मला दुर्लक्ष करता येणार नाही." नंतर वैद्याला 'शुभप्रभात' असे म्हणून तो आपल्या नेहमीच्या कार्यक्रमाला सुरुवात करील आणि आपला कामधंदा करीत, प्रकृती सुधारण्याच्या प्रयत्नाला लागेल. जर त्याची शरीरप्रकृती रोगाशी टक्कर देण्यात अयशस्वी झाली तर स्वाभाविकच तो मृत्यूमुखी पडून सर्व त्रासातून मुक्त होईल.

**ग्लॅकॉन** : होय. त्याच्यासारखी श्रमजीवी माणसे वैद्याचा इतपतच उपयोग करून घेऊ शकतील.

**सॉक्रेटिस** : स्वतःचे नेमून दिलेले कार्य करता आले नाही, तर जगण्यात राम नाही असे त्याला वाटते ना?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : पण श्रीमंत मनुष्याला ठराविक असे काम कधी नसतेच! त्यामुळे ते पूर्ण झाले नाही तर आपले आयुष्य फुकट गेले असेही त्याला वाटत नाही.

**ग्लॅकॉन** : होय. श्रीमंत लोकांना काही काम नसते असे म्हणतात.

**सॉक्रेटिस** : पोटापाण्याची व्यवस्था झाली म्हणजे माणसाने सदाचाराने वागावे हे फोसीलिडीसचे म्हणणे तुम्हाला मान्य आहे ना?

**ग्लॅकॉन** : त्यापूर्वीही माणसाने सदाचाराने वागावे असे मला वाटते.

**सॉक्रेटिस** : ह्या विषयावर चर्चा करण्यात वेळ घालविण्यात काही अर्थ नाही. श्रीमंत लोकांनी सदाचाराने वागणे आवश्यक आहे काय? ते सदाचाराने वागले नाहीत तर आयुष्य निरर्थक होईल काय? सुतारकामासारख्या धंद्यात लागणाऱ्या बुद्धीच्या एकाग्रतेला रोगट प्रकृती हितकारक नसली तरी फोसीलिडीसच्या म्हणण्याला त्यामुळे बाध येतो काय? हे प्रश्न आपण विचारात घेतले पाहिजेत.

**ग्लॅकॉन** : वस्तुतः व्यायामापलीकडे शरीराची अतिकाळजी करणे यासारखे विघ्न दुसरे कोणतेच नाही. कारण घरगुती धंदा करणारा काय, शेतात काम करणारा काय किंवा न्यायाधिशाचे काम करणारा काय, कोणीही शरीराची अतिकाळजी घेणे त्रासदायक असते.

**सॉक्रेटिस** : पण याहीपेक्षा ज्ञानार्जन करणाऱ्याला, विचारवंताला व स्वतःशी मनन करणाऱ्याला प्रकृतीची अतिकाळजी करणे हा एक मोठा अडथळाच आहे. कारण तत्त्वज्ञानाच्या अभ्यासामुळे आपले डोके दुखते, चक्कर येते असे उगीचच माणसाला वाटते. बौद्धिक अभ्यासाने, सद्गुणांचे अस्तित्व व आचरण सिद्ध करण्यास, शरीराची अति काळजी करणे फार त्रास देते. कारण तिच्यामुळे आपण सारखे आजारीच आहोत असे वाटते. आणि आरोग्याची सदैव चिंता करीत बसल्यामुळे मानसिक स्वास्थ्य कधीच मिळत नाही.

**ग्लॅकॉन :** होय. हे स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस :** एक्स्लीपिअसला हे सर्व माहीत होते व त्याने रोग बरे करण्याची कला, ज्यांची मूलतः प्रकृती चांगली आहे आणि ती वाईट सवयीने बिघडलेली नसून, काही विशिष्ट दुखण्याने बिघडलेली आहे, त्यांच्याचकरिता उपयोगात आणली असे आपल्याला म्हणता येईल. रोग्याच्या विशिष्ट तक्रारी तो औषधाने किंवा शस्त्रक्रियेने घालवीत असे आणि राज्यहित प्रथम पाहून, त्यांना त्यांचे उद्योगधंदे करू देत असे. पण मनुष्य जर संपूर्णतया रोगग्रस्त असेल, तर त्यांच्याकरिता निराळी उपाययोजना अमलात आणून त्यांचे आयुष्य सुसह्य करीत असे व त्यांच्यासारखीच रोगग्रस्त मुले होऊ नयेत याची काळजी घेत असे. कारण जो आपले नियमित कार्य करण्यासच असमर्थ आहे तो स्वतःच्या व राज्याच्या दृष्टीनेही निरुपयोगी आहे असे त्याला वाटत असे.

**ग्लॅकॉन :** एक्स्लीपीअस हा मोठा राजकारणी पुरुष होता असे आपणांस म्हणावयाचे आहे काय ?

**सॉक्रेटिस :** अर्थातच ! तो राजकारणी होता त्यामुळेच त्याच्या मुलांनी ट्रॉयच्या युद्धात शूर लढवय्ये म्हणून नाव मिळविले. आणि मी सांगितल्याप्रमाणे वैद्यककला उपयोगात आणली. मिनिलास[1] जेव्हा पॅन्डारच्या भालाफेकीत जखमी झाला त्यावेळी जखमेतील रक्त शोषून घेऊन त्याने तिच्यावर सौम्य स्वरूपाचे उपचार केले, हे तुम्हास आठवत असेल. युरिक्युलसला त्यांनी जो उपचार केला त्यापेक्षा मिनिलासच्या पथ्यपाण्याची त्यांनी अधिक उपाययोजना केली नव्हती. त्याचे कारण ज्यांचे आयुष्य निरोगी आणि नियमित असते त्यांच्या जखमांना औषधी वनस्पतींचे उपचार पुरेसे असतात. अशा माणसांनी अन्न, दारू, मलई यांचे मिश्रण जरी घेतले तरी आपणाला ते बाधणार नाही असा त्यांना विश्वास होता. परंतु ज्यांची प्रकृती रोगट, अनियमित असते त्या व्यक्तीच्या जीवनाचा तिला आणि इतरांना काहीच फायदा नाही असे त्यांना वाटते. अशा माणसांकरिता वैद्यकीय कलेचा उपयोग नसून, एखादा रोगी जरी मिडासपेक्षा श्रीमंत असला तरी त्याच्यावर उपाय करणे चुकीचे आहे असे त्यांना वाटते.

**ग्लॅकॉन :** तुझ्या दृष्टिकोनातून एक्स्लीपीअसची मुले फारच धूर्त दिसतात.

**सॉक्रेटिस :** साहजिकच आहे ! पण शोकरसात्मक कविता लिहिणारे कवी आणि पिंडार यांना मात्र हे मान्य नाही. एक्स्लीपीअस हा अपोलोचा मुलगा हे ते मान्य करतात, पण आसन्नमरण श्रीमंत व्यक्तीला त्याने लाच घेऊन बरे केले म्हणून त्याच्यावर वीज पडली असे ते म्हणतात. पण आपणांस ही दोन्ही विधाने मान्य नाहीत. आपल्या दृष्टीने जर तो देवपुत्र असेल, तर लोभी असणार नाही, जर लोभी असेल, तर देवपुत्र असणार नाही.

[1] Illiad IV 218.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३८६
दा. क्र. २५११९
दिनांक २८।१०।०६

**ग्लॅकॉन :** तुझे म्हणणे योग्य आहे पण आपल्या राज्यात चांगले वैद्य पाहिजेत का ? याविषयी तुला काय म्हणावयाचे आहे ? ज्यांना विविध स्वभावाची माणसे माहिती आहेत असे न्यायाधीश उत्कृष्ट असतात. तसेच अनेक रोगी आणि निरोगी लोकांची शरीरे ज्यांनी तपासली आहेत असे वैद्य चांगले असतात.

**सॉक्रेटिस :** आपल्या राज्यात चांगले डॉक्टर आणि चांगले न्यायाधीश असले पाहिजेत हे मला मान्य आहे. पण चांगल्या डॉक्टरविषयी माझी समजूत तुम्हांस माहीत आहे काय ?

**ग्लॅकॉन :** तू सांगशील का ?

**सॉक्रेटिस :** मी तसा प्रयत्न करेन. पण तू माझ्या प्रश्नात दोन वेगवेगळ्या गोष्टींचा उल्लेख केला आहेस.

**ग्लॅकॉन :** तो कसा काय ?

**सॉक्रेटिस :** जर डॉक्टरांना स्वतःच्या व्यावसायिक अभ्यासाच्या बरोबरीने प्रत्येक रोगाचा स्वानुभव असला आणि अनेक रोगी त्याने तपासले असले तर त्यांना चांगली मर्मदृष्टी येते हे खरे आहे. अर्थात त्यांना स्वतःला विशेष आरोग्य नसले तरी चालेल. दुसऱ्यांचे रोग डॉक्टर काही स्वतःच्या शरीराने बरे करीत नाहीत. तसे असते तर डॉक्टरांना कोणताही रोग कोणत्याही वेळी होऊन चालले नसते. पण डॉक्टरांचे मन चांगले नसेल तर कोणत्याही रोग्याला त्यांना योग्य उपाय करता येणार नाही. डॉक्टरांचे मनच रोग्यांचे शरीर दुरुस्त करीत असते.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** पण न्यायाधिशाच्या मनाची दुसऱ्या मनावर सत्ता चालत असते. म्हणून त्याच्या मनावर दुर्गुणी व्यक्तींचे संस्कार होऊन चालणार नाही. एक वेळ शारीरिक व्याधीचा स्वानुभव शक्य व योग्य आहे, मात्र इतरांचे अपराध शोधण्यास आपण निष्णात व्हावे म्हणून न्यायाधिशाने स्वानुभवासाठी सर्व गुन्हे करू नयेत. उत्तम न्यायाधीश होऊन आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी तारुण्याच्या प्रारंभी न्यायाधीश वाईट व्यक्ती, अनुभव आणि सवयी यांपासून अलिप्त असला पाहिजे. सत्प्रवृत्त तरुण, दुष्प्रवृत्त लोकांच्या हिकमतीला सहज बळी पडतात. कारण त्यांना दुष्ट विकारांची योग्य जाणीवच नसते.

**ग्लॅकॉन :** अशा रीतीने फसविले जाणे शक्य आहे.

**सॉक्रेटिस :** याकरिता चांगला न्यायाधीश कधी तरुण असू नये. तो वृद्ध असला पाहिजे. अन्यायाबद्दलचे ज्ञान त्याने वृद्धावस्थेपर्यंत संपादन केले पाहिजे. त्यासाठी स्वतःच्या नव्हे, तर इतरांच्या अंतःकरणात दिसणारी अन्यायाची वाईट दृश्ये त्याने बरीच वर्षे पाहिली पाहिजेत. म्हणजेच स्वानुभवाऐवजी त्याला हे ज्ञान मिळाले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** खरेच हा न्यायाधिशाचा उत्तम आदर्श म्हटला पाहिजे.

**सॉक्रेटिस :** तसाच तो चांगल्या स्वभावाचाही आदर्श आहे. त्याचे अंतःकरण सज्जन असते. हुषार आणि संशयी न्यायाधीश जर तो स्वतः गुन्हेगार असला तर स्वानुभवाप्रमाणे इतरांना न्याय देत असताना तो आपणांस फाजील शहाणा समजतो. जेव्हा वयोवृद्ध सज्जन माणसाशी त्याचा संबंध येईल तेव्हा स्वतः सद्‌गुणी नसल्याने तो त्या व्यक्तीच्या सत्प्रवृत्तीबद्दल अज्ञान प्रगट करतो. हा मूर्खपणा होय. सज्जनापेक्षा दुष्टाशी त्याचा जास्त संबंध येतो. म्हणून तो स्वतःस हुषार समजतो. इतरांनाही त्याच्या मूर्खपणाऐवजी तो हुशार आहे असे वाटते.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मग अशा माणसाऐवजी आपण वर्णन केलेला माणूसच ज्ञानी आणि सत्प्रवृत्त न्यायाधीश बनेल असे समजणे योग्य होईल. दुर्गुणाला स्वतःचे ज्ञान असते पण सद्‌गुणाचे असत नाही. सद्‌गुणी माणसाला मात्र अनुभवाने सद्‌गुण आणि दुर्गुण या दोन्हीचे ज्ञान होऊ शकते. म्हणून दुर्गुणी माणसाऐवजी सद्‌गुणी माणूसच उत्तम न्यायाधीश होतो, असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** मला हे पटते.

**सॉक्रेटिस :** मग आपल्या आदर्श राज्यामध्ये वैद्यक आणि कायदा या व्यवसायांचे स्वरूप आपल्या वर्णनाप्रमाणे ठरवावयाचे ना? त्यांचा उपयोग ज्यांचे शरीर व मन चांगले आहे अशा नागरिकांनाच आपण करून देऊ. जे शरीरांनी वाईट त्यांना आपण मरू देऊ, जे स्वभावाने दुष्ट आणि दुर्व्यसनी त्यांना आपण मारून टाकू. हेच तू करशील ना?

**ग्लॅकॉन :** हो. रोगी आणि राज्य यांचे हित लक्षात घेता हाच मार्ग उत्तम होय.

**सॉक्रेटिस :** ज्या सांस्कृतिक शिक्षणाने माणसाचे अंतःकरण सभ्य बनते, त्या शिक्षणाचे परिणाम जोपर्यंत तरुणांवर आहेत तोपर्यंत ते कायद्याचा वापर करण्यास तयार होणार नाही.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** सांस्कृतिक शिक्षणात तज्ज्ञ असणाऱ्या विद्यार्थ्याला आकस्मिक परिस्थिती-शिवाय वैद्यकीय मदत लागणार नाही, एवढा व्यायाम घेणे त्याला अवघड आहे का?

**ग्लॅकॉन :** नाही. ते शक्य आहे.

**सॉक्रेटिस :** पण व्यायाम घेण्याचा त्याचा हेतू शारीरिक सामर्थ्य मिळविण्याऐवजी तेजस्वी मनोवृत्ती वाढविणे हा असेल. म्हणून तालीमबाजाप्रमाणे विशिष्ट प्रकारचे अन्न खाऊन तो केवळ शारीरिक शक्तीसाठी व्यायाम करणार नाही.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मला असे वाटते की, सांस्कृतिक आणि शारीरिक शिक्षणाची योजना जे तयार करतात त्यांना संस्काराचा उपयोग मानसिक सुधारणा असतो आणि न्यायाचा उपयोग शारीरिक सुधारणा असतो हे तत्त्व माहीत नसते. तसे त्यांचे ध्येय पण नसते.

**ग्लॅकॉन :** जर ते तसे नसेल तर दुसरे कोणते असणार ?

**सॉक्रेटिस :** ते दोन्ही विषयांचे शिक्षण केवळ आत्मिक सुधारणेस देतील.

**ग्लॅकॉन :** ते कसे ?

**सॉक्रेटिस :** ज्यांना आयुष्यात फक्त व्यायामच माहीत असतो, सांस्कृतिक शिक्षणाची काहीच ओळख नसते अशा माणसांचा स्वभाव आणि याविरुद्ध प्रकारच्या लोकांचा स्वभाव तू पाहिला नाहीस का ?

**ग्लॅकॉन :** तू कशा प्रकारचे म्हणतोस ?

**सॉक्रेटिस :** पहिल्या प्रकारची माणसे राठ आणि चिवट असतात तर दुसऱ्या प्रकारची नाजुक व सौम्य असतात.

**ग्लॅकॉन :** हो. जे केवळ व्यायामच करतात ते प्रमाणापेक्षा अधिक उद्धट असतात. जे केवळ सांस्कृतिक शिक्षण घेतात ते प्रमाणापेक्षा अधिक सौम्य असतात.

**सॉक्रेटिस :** पण उद्धटपणा तेजस्वी वृत्तीचे प्रतीक आहे आणि योग्य तऱ्हेने विकास झाला तर त्याचे रूपांतर शौर्यात होते. जर अयोग्य विकास झाला तर स्वभाव कठोर आणि पाशवी होतो हे तुला माहिती आहेच.

**ग्लॅकॉन :** मला तसेच वाटते.

**सॉक्रेटिस :** तात्त्विक स्वभावाची माणसे सौम्य नसतात का ? सौम्यपणा फार वाढला, तर तो नाजुकपणा होतो, पण योग्य तऱ्हेने वाढवला, तर त्याचे रूपांतर सभ्य सुव्यवस्थितपणा यात होते.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या दृष्टीने आपल्या राज्याच्या संरक्षकात दोन्ही प्रकारचे गुण असले पाहिजेत.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** पण दोन्ही गुणांत सुसंगती नको का ?

**ग्लॅकॉन :** पाहिजे.

**सॉक्रेटिस :** जर अशी सुसंगती असेल तर अंतःकरण संयमी आणि शूर बनत नाही का ?

**ग्लॅकॉन :** खात्रीने.

**सॉक्रेटिस** : ही सुसंगती नसेल तर, व्यक्तीचा स्वभाव भित्रा आणि गावंढळ होत नाही का ?

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : जेव्हा एखादी व्यक्ती केवळ संगीताला वाहून घेते, तेव्हा मृदू आणि शोककारक स्वर यांनी आपले अंतःकरण भरून टाकते, सारे आयुष्य केवळ गाणे गुणगुणत आनंदात घालवते तेव्हा त्या माणसातील तेजस्विता ठिसूळ बनते. ती निरुपयोगी न बनता उपयोगी बनते. पण जर संगीताचा अतिरेक झाला, तर त्याच्यातील तेजस्विता पूर्ण नष्ट होते, अंतःकरण दुर्बल बनते आणि तो दुबळा सैनिक होतो.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : जर तो स्वभावानेच कमी तेजस्वी असेल तर असा परिणाम लवकर घडेल ; जर तेजस्विता जास्त असेल तर संगीताने तो दुबळा बनेल. किरकोळ कारणाने अशी व्यक्ती रागावते आणि लगेच थंडावते. हे लोक तेजस्वी होण्याऐवजी शीघ्रकोपी, चिडचिडे आणि खिन्न स्वभावाचे होतात.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : याउलट जर एखाद्याने केवळ व्यायामालाच वाहून घेतले तर सांस्कृतिक शिक्षण आणि तत्त्वचिंतन यांपासून तो अलिप्त राहील. मनसोक्त खाण्यापिण्यात आनंद मानेल. सुदृढ शरीरामुळे त्याच्यात आत्मविश्वास आणि तेजस्विता प्रथम निर्माण होईल. पूर्वीपेक्षा आपण अधिक शूर आहोत असे त्याला वाटेल.

**ग्लॅकॉन** : सॉक्रेटिस, बरोबर.

**सॉक्रेटिस** : पण संस्कृतीला बाजूस सारून केवळ व्यायामावर लक्ष केंद्रित केले तर परिणाम काय होईल ? त्याला ज्ञानाची आवड आहे असे गृहीत धरले तरी ज्ञान, जिज्ञासा, वादविवाद यांच्या साहाय्याने ती आवड पुरविली जाणार नाही. त्या आवडीस उत्तेजन, पोषण न मिळाल्याने त्याची ज्ञानेंद्रिये स्वच्छ होणार नाहीत. ती दुर्बल, बहिरी आणि आंधळी होणार नाहीत का ?

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : त्याचा परिणाम म्हणजे अशी व्यक्ती तत्त्वज्ञानाचा द्वेष करून अडाणी होते. बुद्धिवाद सोडून देते. जंगली श्वापदाप्रमाणे आपले सर्व व्यवहार दांडगाईने करते. नेहमी अज्ञान आणि कुसंस्कार या वातावरणात राहिल्याने तिच्या व्यक्तिमत्वात सौंदर्य आणि सौष्ठव उरत नाहीत.

**ग्लॅकॉन** : हो, असे होते.

**सॉक्रेटिस :** परमेश्वराने तेजस्विता आणि ज्ञान असे दोन स्वतंत्र स्वभाव निर्माण केले आहेत. त्यासाठी संगीत आणि व्यायाम अशा दोन कला निर्माण केल्या आहेत. आत्मा आणि शरीर यांकरिता प्रत्येकीचा वेगळा उपयोग असतो असे नाही. दोन्ही स्वभावांची योग्य तऱ्हेने वाढ व्हावी आणि उभयतांत सुसंवाद किंवा समन्वय निर्माण व्हावा अशी परमेश्वराची इच्छा दिसते.

**ग्लॅकॉन :** हो, असे दिसते.

**सॉक्रेटिस :** याकरिताच ज्या व्यक्तीच्या जीवनात शारीरिक शिक्षण आणि सांस्कृतिक शिक्षण यांचा समन्वय आढळतो त्यांचा त्याच्या मनावर योग्य परिणाम घडतो. ती व्यक्ती वीणेच्या तारा छेडून स्वरनिर्मिती करणाऱ्या कलावंतापेक्षा खरी व पूर्ण स्वरसाधना करते असे आपण म्हटले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** हो, आपण तसे साधार म्हणू शकतो.

**सॉक्रेटिस :** आपले आदर्श राज्य टिकण्यासाठी या शैक्षणिक योजनेवर देखरेख करणारा अधिकारी आपणाला आवश्यक आहे.

**ग्लॅकॉन :** असा अधिकारी हवाच.

**सॉक्रेटिस :** आपण आतापर्यंत सांस्कृतिक शिक्षण आणि शारीरिक शिक्षण यांची योजना तयार केली. यानंतर आपल्या आदर्श राज्यात कोणती नृत्ये, शिकारी, शर्यती, मैदानी व मर्दानी खेळ असावेत हे तपशीलवार ठरविण्याची आता आवश्यकता नाही. कारण एकदा रूपरेषा ठरविल्यानंतर तो तपशील ठरवणे सोपे आहे.

**ग्लॅकॉन :** हो, तशी अडचण नाही.

□ □

# प्रकरण दहा
# प्रशासकांची निवड आणि जीवनपद्धती

**[III-412-B—IV-421-C]**

**कथासूत्र :**

[शैक्षणिक पूर्वतयारीचा विचार पूर्ण केल्यानंतर प्लेटोने आदर्श राज्याच्या व्यवस्थेसाठी योग्य नागरिकांमधून प्रशासकांची निवड कशी करायची ती तत्त्वे व त्यांचे स्वरूप विशद केले आहे. जन्म आणि आर्थिक दर्जा हे त्याने निवडीचे निकष मानले नाहीत. गुणवत्ता, पात्रता, अभ्यास ही त्याने स्वीकारलेली निवडतत्त्वे होत.

उत्पादन करणारे सामान्य नागरिक, रक्षण करणारे सैनिक आणि ध्येय धोरणे ठरवणारे प्रशासक या वर्गांतील व्यक्तींची निवड यानुसारच त्याने ठरविली आहे. प्रत्येकाला आपापल्या स्वभावानुसार आणि पात्रतेनुसार जगण्याची आणि काम करण्याची संधी मिळावी आणि काही निवडक व्यक्तींऐवजी किंवा एखाद्या वर्गाऐवजी, सर्वांना सामाजिक व्यवस्थेत, न्यायाच्या प्रस्थापनेत, सुखसंपादनात स्थान व हक्क मिळावेत असा त्याचा प्रयत्न आहे.

हिसियडच्या एका पुराणकथेचा त्याने सामाजिक वर्गीकरणास आधार घेतला आहे. त्यानुसार समाजातले हे वर्ग सुवर्ण, रौप्य आणि ब्राँझ प्रकृतीचे असतात असे त्याने मानले आहे. प्रशासकांची निवड करताना त्यांची सर्वांगीण पात्रता हाच निकष त्याने मानला आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. आता हे शिक्षण ज्यांनी घेतले आहे त्यांच्यापैकी राज्यकारभार कोणी करावा आणि सामान्य प्रजाजन कोण असावेत या प्रश्नाचा आपण विचार सुरू करू या ना ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** राज्यकारभार करणारे वयोवृद्ध हवेत आणि प्रजाजन तरुण हवेत हे निःसंशय.

**ग्लॅकॉन :** अर्थात.

**सॉक्रेटिस :** फक्त उत्कृष्ट लोकच राज्यकर्ते बनले पाहिजेत.

**ग्लॅकॉन :** तेही खरेच.

**सॉक्रेटिस :** जे लोक फक्त शेती करतात तेच उत्तम शेतकरी नसतात का ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** आपल्या आदर्श राज्यास उत्तम संरक्षकांची आवश्यकता आहे. म्हणून अत्यंत समर्थ असेच लोक आपण निवडले पाहिजेत ना ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** ते हुशार, पराक्रमी आणि राज्याची काळजी असणारे हवेत.

**ग्लॅकॉन :** अर्थात असे लोक पाहिजेत.

**सॉक्रेटिस :** ज्यांच्याविषयी माणसाच्या मनात प्रेम उत्पन्न होते त्याविषयी काळजीही वाटणारच.

**ग्लॅकॉन :** अर्थातच वाटणार.

**सॉक्रेटिस :** ज्यांचे हितसंबंध आपल्या हितसंबंधाप्रमाणेच आहेत व दुसऱ्यांच्या हितातच आणि भरभराटीत वा विपत्कालात आपले हित आहे अशा लोकांवर ती व्यक्ती खात्रीने प्रेम करते.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** मग, आपल्या संरक्षक गणांतून आपण योग्य परीक्षेचे निवडक असे लोक निवडले पाहिजेत. त्या लोकांनी आपले सर्व आयुष्य राज्याच्या कल्याणात इतरांपेक्षा उत्साहाने घालवले असले पाहिजे. राज्याच्या अहिताचे काम करण्याचे कटाक्षाने टाळले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** होय. हेच लोक पात्र आहेत.

**सॉक्रेटिस :** आयुष्यातल्या सर्व अवस्थांत आपण त्यांच्यावर नजर ठेवली पाहिजे. 'राज्याचे हित ते आपले कर्तव्य' अशी इच्छा ते आयुष्यभर बाळगतात की मधेच त्या ध्येयापासून परावृत्त होतात हे आपण पाहिले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** ध्येयापासून परावृत्त होणे म्हणजे काय ?

**सॉक्रेटिस :** माझे ऐक. मनुष्य आपली ध्येये स्वेच्छेने किंवा जबरदस्तीने सोडून देतो. जेव्हा चूक कळून चुकते तेव्हा माणूस आपले अयोग्य किंवा असत्य मत स्वेच्छेने सोडून देतो. पण जेव्हा सत्य किंवा योग्य मताचा त्याग करायचा असतो तेव्हा तो इच्छेविरुद्धच केला पाहिजे.

**ग्लॅकॉन :** 'स्वेच्छेने सोडलेले मत-' माझ्या लक्षात आले. पण इच्छेविरुद्ध मताचा त्याग माझ्या लक्षात अजून आला नाही.

**सॉक्रेटिस :** चांगल्या गोष्टी माणसाच्या इच्छेविरुद्ध आणि वाईट गोष्टी या इच्छेनुसार हिरावून घेतल्या जातात हे तुला मान्य आहे ना ? असत्याला बळी पडणे ही गोष्ट वाईट आहे आणि सत्याचा आधार घेणे ही चांगली गोष्ट आहे असे नाही का ? वस्तूची कल्पना जेव्हा मूळ स्वरूपाला अनुसरून केली जाते तेव्हा त्याला सत्य म्हणतात, असे आपण म्हणू शकतो की नाही ?

**ग्लॅकॉन :** होय. तुमचे म्हणणे योग्य आहे. माणसाचे रास्त मत त्याच्या इच्छेविरुद्ध त्याच्याकडून हिरावून घेतले जाते असे माझेही मत आहे.

**सॉक्रेटिस :** अशी जेव्हा वस्तुस्थिती असते तेव्हा त्याचे कारण चोरी, चेटूक किंवा जबरदस्ती असते.

**ग्लॅकॉन :** अजूनही हे माझ्या लक्षात आले नाही.

**सॉक्रेटिस :** मला असे वाटू लागले आहे की, करुणरसपूर्ण नाटकाप्रमाणे मी काही दुर्बोध भाषा तर वापरीत नाही ना ? हे पहा, ज्या माणसांचा विश्वास वादविवादाने नाहीसा होतो किंवा काही काळाने स्मरणात रहात नाही अशा लोकांचीच मते चोरली जातात असे माझे मत आहे. मला वाटते ते तुला समजले असावे.

**ग्लॅकॉन :** हो. समजले.

**सॉक्रेटिस :** ज्या लोकांवर जुलूम होतो असे मी म्हणतो ते लोक म्हणजे दु:खाने किंवा शोकाने मतपरिवर्तन होणारे असतात.

**ग्लॅकॉन :** बरोबर. तुमचे म्हणणे मला समजले.

**सॉक्रेटिस :** जे मोहाला बळी पडतात ते सुखाच्या अभिलाषेने आणि दु:खाच्या जबरदस्तीने मत बदलणारे असतात.

**ग्लॅकॉन :** होय, जे फसवे असते ते मोहविणारेच असते.

**सॉक्रेटिस :** जे राज्याच्या हिताचे ते आपले कर्तव्य असे ज्यांना वाटते, असे उत्तम प्रशासक कोण त्याचा आपण शोध घेतला पाहिजे. त्यांचा आत्मविश्वास नष्ट होईल, त्यांची फसवणूक होईल अशांपासून त्यांना लहानपणापासून वेगळे ठेवून त्यांच्यावर सतत देखरेख ठेवली पाहिजे. स्मरणशक्ती चांगली असणारे, न फसवले जाणारे लोक निवडून इतरांना आपण वगळले पाहिजे. खरे ना ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** श्रम, त्रास, वादविवाद या वातावरणात त्यांना ठेवून त्यांच्या वर्तनाची परीक्षा आपण घेतली पाहिजे.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** आणखी एक परीक्षा म्हणजे मोहिनी विद्येचा प्रयोग करून त्यांच्या वर्तनाचा अभ्यास केला पाहिजे. उमदे घोडे, गोंगाट आणि हलकल्लोळ, अशा वातावरणात नेऊन त्यांचा भित्रेपणा पाहिला जातो. तसेच आपल्या तरुणांना भयप्रद वातावरणात ठेवून, सुखद वातावरणात ठेवून, सोन्याची जशी अग्निपरीक्षा घेतली जाते, त्यापेक्षा काटेकोर परीक्षा आपण त्यांची घेतली पाहिजे. जर ते अशा परिस्थितीत टिकले, त्यांचे वर्तन चांगले राहिले, स्वत:चे आणि समाजाचे ते चांगले संरक्षक बनले, लय आणि स्वरमेळविषयक नियम त्यांनी अमलात आणले, तरच त्यांचे शिक्षण त्यांना आणि राज्याला कितपत उपयुक्त ठरेल ते आपल्याला पाहता येईल. लहानपण, तारुण्य व प्रौढत्व अशा विविध अवस्थांत प्रत्येक परीक्षेत जो सुखरूप व सुरक्षित यशस्वी होईल त्यालाच आपल्या आदर्श राज्याचा राज्यकर्ता

व संरक्षक नेमले पाहिजे. त्याचा मृत्यू घडल्यानंतर सन्मानपूर्वक प्रेतसंस्कार करून त्याच्या स्मृतीस आपण अभिवादन केले पाहिजे. ज्यांचे वर्तन याविरोधी असेल त्यांना आपण वगळले पाहिजे. राज्यकर्ते आणि संरक्षक निवडण्याची ही योग्य पद्धत आहे असे मला वाटते. विशेष तपशील न देता मी फक्त रूपरेखा मांडली आहे.

**ग्लॅकॉन :** माझेही मत तुमच्यासारखेच आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या राज्यातील नागरिकांना आणि बाहेरच्या शत्रूंना ज्यांच्या कर्तृत्वामुळे कसलाही अपाय करण्याची ताकद आणि इच्छा राहणार नाही त्यांनाच आपण खरे संरक्षक म्हणणार नाही का ? जे तरुण राज्यकर्त्यांना मदत करतील, राज्यकर्त्यांचे ठराव अमलात आणतील आणि संरक्षण करतील त्यांना सहायक संरक्षक किंवा सैनिक म्हणता येणार नाही काय ?

**ग्लॅकॉन :** मलाही तसेच वाटते.

**सॉक्रेटिस :** काही वेळेला राज्यकारभारात असत्याचा उपयोग करावा लागतो. त्याकरिता एखादी विलक्षण युक्ती आपण वापरू शकणार नाही का ? राज्यकर्ते आणि प्रजाजन यांचा विश्वास बसेल अशी कल्पना आपण सांगू का ?

**ग्लॅकॉन :** कोणत्या तऱ्हेची कल्पना ?

**सॉक्रेटिस :** त्यात काही नवीन नाही. अशी फोनेशियन कल्पना फार पूर्वीपासून उपयुक्त मानली गेली आहे. कवींनी तिचे वर्णन केले आहे आणि माणसांनी तिच्यावर विश्वास ठेवला आहे. आजच्या काळात ती दिसत नसल्याने किंवा ती दिसणे शक्य नसल्यामुळे आज लोकांना तिच्याबद्दल विश्वास वाटेल किंवा खात्री पटेल हे अवघड वाटते.

**ग्लॅकॉन :** ती कल्पना उघड करण्यास तू नाराज दिसतोस.

**सॉक्रेटिस :** मी का नाखूष आहे ते मी सांगितल्यावर सहज कळू शकेल.

**ग्लॅकॉन :** पण तरीही तू बेधडकपणे ती बोलून दाखव.

**सॉक्रेटिस :** ठीक. ती सांगण्यास मला धैर्य होईल की नाही, किंवा मी ती योग्य शब्दांत सांगू शकेन की नाही याचा मला विश्वास वाटत नाही. राज्यकर्ते आणि सैनिक यांचे प्रथम मन वळवून मी इतरांना सांगेन, "जेव्हा तुम्हांस शिक्षण देण्यात येत होते, तेव्हा आमच्याबद्दल तुम्हांस खात्री वाटत होती. पण तो भासच होता. खरे पाहता पृथ्वीच्या गर्भात असताना तुमचे शिक्षण व पूर्वतयारी सुरू होती. तुमचे चिलखत, शस्त्रे इत्यादी सामग्री तयार होत होती. तेव्हा ती सर्व तयारी पूर्ण झाली आणि तुमचा जन्म झाला त्या वेळी या जन्मभूमीचे आणि संगोपन करणाऱ्या दाईचे संरक्षण करण्याची कामगिरी तुमच्यावर आली. आता तुम्ही, एकाच मातेची मुले म्हणून परस्परांशी बंधुभावाने वागले पाहिजे."

**ग्लॅकॉन :** असे काल्पनिक कारण देताना तुला संकोच वाटत होता तो यथार्थ वाटतो.

**सॉक्रेटिस :** ठीक. आता पुढे ऐक. आपल्या नागरिकांना आपण असे सांगू, " लोक हो ! तुम्ही एकमेकांचे भाऊ आहात. असे असले तरी तुमच्यापैकी राज्यकारभार करण्यास जे लायक त्यांच्या शरीरात देवाने सोने घातले आहे. म्हणून ते श्रेष्ठ आहेत. राज्यकर्त्यांना सहाय्य करणाऱ्या लोकांमध्ये देवाने रुपे घातले आहे. शेतकरी, कामगार आणि कारागीर यांच्यात देवाने लोखंड आणि तांबे घातले आहे. तुम्ही जरी परस्परांचे नातेवाईक असला आणि तुमच्या मुलांचे जन्म इतरांसारखे होत असले तरी केव्हा केव्हा असेही घडेल की, सुवर्णगुणी मातापिता रौप्यवर्णी मुलास जन्म देतील, तर काही वेळा, रौप्यवर्णी मातापिता सुवर्णगुणी मुलांना जन्म देतील. अशा रीतीने मातापिता भिन्न प्रकृतीच्या मुलांना जन्म देतील. राज्यकर्त्यांनी जन्मलेल्या मुलाच्या आत्म्यात कोणत्या धातूचे गुणधर्म आहेत ते पाहिले पाहिजेत. तशी परमेश्वराची आज्ञा आहे. संरक्षकांच्या वर्गात जर तांबे आणि लोखंड या मिश्रणाचे मूल जन्मले, तर कोणतीही दयाबुद्धी न ठेवता त्या मुलास त्यांनी त्याच्या किंमतीनुसार कारागीर वा शेतकरी वर्गात घातले पाहिजे. कारागीर वा शेतकरी वर्गात सुवर्ण वा रौप्यगुणी मूल जन्मले तर, त्याची परीक्षा घेऊन त्याला संरक्षक किंवा सहायक वर्गात बढती दिली पाहिजे. ' लोखंड आणि तांबे यांच्या हाती जेव्हा राज्याचा कारभार जातो तेव्हा सर्वनाश होतो !' अशी भविष्यवाणी आहे."

अशा तऱ्हेचे काल्पनिक असत्य, ज्यावर लोकांचा विश्वास बसेल असे आपण सांगू शकू का ?

**ग्लॅकॉन :** ज्या लोकांमधून आपण आदर्श राज्य निर्माण करणार आहोत त्यांच्या पहिल्या पिढीलाच ही फसवण्याची युक्ती वापरता येईल असे मला वाटत नाही. पण त्यानंतरच्या सर्व पिढ्या आणि सर्व माणसे यांचा मात्र त्यावर विश्वास बसू शकेल.

**सॉक्रेटिस :** तुझी अडचण कळली. परंतु राज्यातील नागरिकांना परस्परांची काळजी वाटेल असे करण्यास तिचा चांगला उपयोग होईल. अर्थात या कल्पनेचे काहीही होवो. आपल्या जन्मभूमीच्या या मुलांना शस्त्रसज्ज करून त्यांच्या हाती कारभार देण्यापूर्वी त्यांना आपण अधिकाऱ्यांच्या हुकमतीखाली ठेवू. जे कायद्याचे उल्लंघन करतील त्या नागरिकांना शासन करणे आणि जे शत्रू लांडग्याप्रमाणे हल्ला करतील त्यांचा प्रतिकार करणे, ही कामे त्यांना करता येतील. त्यासाठी त्यांनी हल्ल्यास योग्य अशी जागा पाहून तिथे तळ ठोकावा. झोपण्याच्या जागेची व्यवस्था करून त्यांनी देवतांची प्रार्थना करावी, खरे ना ?

**ग्लॅकॉन :** हो, ठीक आहे.

**सॉक्रेटिस :** हिवाळ्यातील थंडी आणि उन्हाळ्यातील कडक उष्मा, यांपासून संरक्षण करू शकतील असा निवारा त्यांनी शोधावयास नको का ?

**ग्लॅकॉन :** अर्थात. म्हणजे राहण्याचीच घरे ना ?

**सॉक्रेटिस** : हो. पण श्रीमंतांचे महाल नसून शिपायांना योग्य अशी घरे होत. दोन्हीत फरक कोणता ? तो मी आता सांगतो. " जर धनगरांनी मेंढयांच्या संरक्षणासाठी बेफाम स्वभावाची भुकेली, वाईट सवयीची कुत्री ठेवली तर मेंढयांच्या संरक्षणाऐवजी ती त्यांना त्रास देतील आणि कुत्र्यांऐवजी ती लांडग्याप्रमाणे वागतील. धनगरांचे हे कृत्य निंद्य होय."

**ग्लॅकॉन** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : मग शहरातील नागरिकांपेक्षा बलवान असलेले सैनिक लोकांशी रानटी, क्रूर श्वापदाप्रमाणे न वागता मित्राप्रमाणे वागतील अशी आपण काळजी घेणे आवश्यक नाही का ?

**ग्लॅकॉन** : घेतलीच पाहिजे.

**सॉक्रेटिस** : चांगले शिक्षण मिळाले तर ते चांगले संरक्षण करतील ना ?

**ग्लॅकॉन** : ते चांगले संरक्षक असतातच.

**सॉक्रेटिस** : पण ग्लॅकॉन असा त्यांच्या स्वभावाविषयी आग्रह वा विश्वास ठेवणे बरोबर नाही. परस्परांशी वा लोकांशी ते सौजन्याने वागतील असे आपण त्यांना शिकविले पाहिजे. आपल्या यापूर्वीच्या म्हणण्याचे आपण समर्थन केले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : शिक्षणाबरोबरच निवास, आर्थिक परिस्थिती या बाबतीत आपण सैनिकांच्या संदर्भात असे धोरण वापरले पाहिजे की ज्यामुळे ते स्वकर्तव्यापासून च्युत होणार नाहीत. हीच भूमिका विचारी माणसाची असेल.

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : आपले सैनिक आपल्याला अपेक्षित स्वभावाचे व्हावयाचे असतील तर त्यांची राहणी, निवारा यांबद्दल माझी योजना तुम्ही लक्षात घ्या. पहिले म्हणजे आपल्या सैनिकांजवळ खाजगी मालमत्ता असू नये. जिथे इतरांना प्रवेश नाही अशी खाजगी खोली वा घर असू नये. संयमी आणि शूर सैनिकांना ज्या वस्तूंची आवश्यकता असते तेवढयाच त्यांना राज्यातील नागरिकांकडून नोकरीच्या पगाराप्रमाणे नियमित मिळाव्यात. हा पगार एवढाच असावा की ज्यामुळे वर्षभरात शिल्लकही राहणार नाही आणि तूटही पडणार नाही. त्यांनी एकत्र रहावे आणि लष्कराच्या छावणीत वावरावे. त्यांच्या आत्म्यातच सोने आणि रुपे हे मौल्यवान धातू ईश्वराने ठेवले असल्याने, ती दैवी देणगी त्यांना मिळाली असल्याने पृथ्वीवरील अन्य संपत्तीची त्यांना गरज नाही असे आपण त्यांना सांगू. त्यांच्याकडे जी अध्यात्मिक संपत्ती आहे तिच्यात मृत्युलोकातील सोने मिसळून त्याने ती भ्रष्ट करू नये. जगात पैशामुळेच अधर्म घडतो. संरक्षकांचे पावित्र्य टिकावे म्हणून त्यांनी सोने आणि रुपे यांना स्पर्शसुद्धा करू नये. इतरांप्रमाणे संपत्तीने मढवलेल्या घरात राहू नये. मौल्यवान पोषाख, अलंकार घालू नयेत, मौल्यवान धातूच्या पेल्यातून पेय पिऊ नये. असे नियम

पाळल्यास त्यांना स्वतःचे आणि राज्याचे संरक्षण करता येईल. जर आपले सैनिक आणि संरक्षक, जमिनी, घरे, खाजगी संपत्ती यांचा संग्रह करतील तर आदर्श राज्यकर्ते बनण्याऐवजी ते सद्‌गृहस्थ आणि शेतकरी बनतील. लोकमित्र बनण्याऐवजी लोकशत्रू बनतील. इतरांचा द्वेष करतील आणि स्वतः द्वेषास पात्र होतील. इतरांविरुद्ध कारस्थाने करतील आणि त्यांच्याविरुद्ध कारस्थाने होतील. परक्या शत्रूऐवजी स्वकीय शत्रूचीच भीती त्यांना वाटेल. भयग्रस्त जीवन ते जगतील. असे घडले तर त्यांचा आणि राज्याचा विनाशकाळ जवळ येईल. म्हणूनच संरक्षक आणि सैनिक यांची राहणी, निवास आणि काम यांबद्दलची आपली भूमिका बरोबर आहे. त्यानुसार आपण कायदे करावेत ना?

**ग्लॅकॉन** : जरूर करावेत.

**ॲडिमँट्स** : पण, सॉक्रेटिस! जर या योजनेबद्दल कुणी म्हटले की, यामुळे आपण संरक्षकवर्गाला दुर्दैवी बनवीत आहोत, तर तू काय म्हणशील? या राज्यकर्त्यांना सुख न लाभणे यात त्यांचाच दोष आहे. वस्तुतः राज्याची मालकी त्यांच्याकडे पण फायदा मात्र काही नाही. याउलट इतर सर्वसाधारण नागरिक जमिनी विकत घेणार, सुंदर घरे बांधणार, नाना प्रकारच्या वस्तूंनी ती सुशोभित करणार, देवतांना संतुष्ट करण्यासाठी यज्ञ करणार, मित्रांना मेजवानी देणार, सारांश सुख मिळण्यास लागणाऱ्या सर्व वस्तू जवळ ठेवणार. याचा अर्थ आपल्या राज्याचे संरक्षण करण्यास केवळ भाडोत्री म्हणून आपण हे सैनिक तयार केले आहेत असे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : हो. त्यांच्या कामासाठी त्यांना फक्त पोटापुरते अन्न मिळते. इतरांप्रमाणे अधिक पगार मिळत नाही, स्वखर्चाने ते दूरचा प्रवास करू शकत नाहीत, प्रिय व्यक्तींना देणग्या-भेटी देऊ शकत नाहीत, किंवा आपल्या आवडी-छंद पुरवण्यास पैसे खर्च करू शकत नाहीत. तुझ्या विवेचनात हे आणि इतर विषय तू सोडून दिले आहेस.

**ॲडिमँट्स** : त्या विवेचनात या सर्वांचा समावेश झाला आहे असे आपण समजू.

**सॉक्रेटिस** : आता आपल्या भूमिकेविरुद्ध होणाऱ्या टीकेला कसे उत्तर द्यावे असा तुमचा प्रश्न आहे ना?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : आपण पूर्वीच्या पद्धतीनेच विचार करू लागलो तर उत्तर सुचू शकेल असे मला वाटते. माझ्या कल्पनेप्रमाणे आपले संरक्षक व सैनिक आपण त्यांच्यासाठी वर्णन केलेल्या परिस्थितीतसुद्धा जास्त सुखी असू शकतील. आपला आदर्श राज्य तयार करण्याचा हेतू एका वर्गाला अतिरिक्त सुखी करण्यापेक्षा सर्व राज्य अधिक सुखी व्हावे हा आहे. अशा सर्वांना सुख लाभणाऱ्या राज्यातच न्याय असतो, तर अव्यवस्थित राज्यात अन्याय असतो. अशा दोन प्रकारच्या राज्यांची तुलना केल्यावर कोणते राज्य अधिक सुखकारक ते आपण ठरवू शकू. सध्या आपण सुखी आणि आदर्श राज्याची घटना तयार करीत आहोत.

या राज्यात काही लोकांना निवडून त्यांचे जीवन सुखी करायचे हा आपला हेतू नाही. सर्व राज्यच कसे सुखी होईल ते आपण पाहणार आहोत. त्यानंतर आपण विरोधी प्रकारच्या राज्याचे स्वरूप लक्षात घेऊ. उदा. आपण एखादा पुतळा रंगवीत आहोत. एकजणाने विचारले, " शरीराचा सर्वांत सुंदर अवयव म्हणजे डोळा. त्याला निळा रंग न देता काळा का देता ?" मला वाटते आपले पुढील उत्तर पुरेसे आहे. आपण म्हणू, " मित्रा, तसा रंग दिला तर डोळे डोळ्यांसारखे दिसणार नाहीत आणि इतर अवयवानांही वास्तविक सौंदर्य येणार नाही. खोटे सौंदर्य दाखवावे असे तुला वाटत नाही याकरिता प्रत्येक अवयवाला योग्य रंग देऊन त्यानुसार सर्व शरीर सुंदर आणि सौष्ठवपूर्ण बनवतो की नाही याकडे तू कृपया लक्ष दे."

यानुसार या संदर्भात आमचे संरक्षक व सैनिक जे सुख मिळाल्याने अपात्र ठरतील ते त्यांना देण्यास आपण तयार होणार नाही. असे केले तर आमचे शेतकरीसुद्धा पायघोळ कपडे घालतील आणि डोक्यावर सोनेरी मुकुट चढवून मनास वाटेल तशी शेती करतील. आमचे कुंभार विस्तवाजवळ आरामात बसतील, कोचावर बसून दारू झोकतील आणि मर्जीला येईल तेवढेच काम करतील. सर्व लोकांना असे सुख भोगण्याची परवानगी दिली तर सर्व शहर सुखी होईलही.

पण अशा रीतीने सर्वांना सुखी करण्याचा उपदेश आम्हाला नको आहे. जर हा उपदेश ऐकला तर शेतकरी शेतकरी राहणार नाही, कुंभार हा कुंभार राहणार नाही. राज्याला आधार देण्यास आवश्यक व्यवसायही योग्य तऱ्हेने होणार नाहीत. एक वेळ इतर धंदे बिघडले तर फार नुकसान नाही. जर एखादा चांभार व्यसनासक्त, ढोंगी, नालायक असेल तर त्यापासून काही राज्याला धोका नसतो, परंतु राज्यकर्ते जर दिखाऊ पात्रतेचे असतील तर त्यामुळे सर्वनाश घडतो. राज्याची सुखसमृद्धी ही राजकर्त्यांच्या पात्रतेवर अवलंबून असते. शक्यतो जे राज्याचे नुकसान करणार नाहीत असे आदर्श संरक्षक बनवणे हा आपला हेतू आहे. आपल्या विरोधकांना मात्र सणावारी मेजवानी झोडणारे शेतकरी तयार करायचे आहेत. असे लोक राज्याचे नागरिक बनण्यास अपात्र बनतात. अशा लोकांच्या राज्यास राज्य म्हणता येत नाही. आपल्या संरक्षकांना सर्व राज्य सर्वांत सुखी करायचे असते हे आपण विचारात घेतले पाहिजे. त्यासाठी राज्यकर्ते, सहकारी सैनिक आणि सामान्य प्रजाजन यांचे मन आपण घडवले पाहिजे. स्वतःचा व्यवसाय उत्तमपणे करण्यापलीकडे ते अन्य गोष्टींत लक्ष घालणार नाहीत, ढवळाढवळ करणार नाहीत हे आपण पाहिले पाहिजे. असे झाले तर समाजातील प्रत्येक वर्गाला शक्य तितके जास्त सुख भोगता येईल आणि सर्व समाज सुनियंत्रित आणि सुव्यवस्थित होईल.

**ॲडिमँट्स** : तू म्हणतोस ते अगदी बरोबर आहे असे मला वाटते.

□ □

## प्रकरण अकरा

# प्रशासकांची कर्तव्ये

**[IV-421-C—427-C]**

**कथासूत्र :**

[उत्कृष्ट बुद्धिमत्ता, नेतृत्व, संघटना चातुर्य, सामाजिक कल्याणाची मर्मदृष्टी आणि निःस्वार्थ समाजसेवेची तयारी हे प्लेटोने प्रशासकांचे प्रमुख गुणधर्म मानले आहेत. श्रीमंतीमुळे सुखासीनता वाढते आणि दारिद्र्यामुळे असंतोष निर्माण होतो. म्हणजेच दोन्हीच्या अतिरेकाने समाज दुर्बल बनतो. याकरिता व्यक्तीच्या प्रेरणा, सामाजिक वर्गाकडे सोपवलेली कार्ये आणि राज्याचे कल्याण या गोष्टी लक्षात घेऊन सर्व समाजात एकात्मता व सुसंवाद निर्माण करण्याची जबाबदारी प्लेटोने प्रशासक राज्यकर्त्यांवर सोपविली आहे. राज्याचा विस्तार आणि विकास असा व्हावा की, ज्यामुळे अंतर्गत यादवी आणि बाह्य आक्रमण यांच्या धोक्यापासून ते सुरक्षित राहील.

याकरिता समाजाची नैतिक आणि धार्मिक मूल्ये सुस्थिर असणे आवश्यक असते. म्हणून प्लेटोने शिक्षणपद्धती आणि धर्मसंस्था यांचे नियंत्रण करणे, त्यांना दिग्दर्शन व मार्गदर्शन करणे हे कार्य राज्याच्या प्रशासक नेत्याकडे सोपवले आहे. कायद्याचे उल्लंघन होऊ न देता कायदा व न्याय यात अंतर्भूत असणारे जे श्रेष्ठ ‘ न्याय ’ तत्त्व त्याचे प्रतीक म्हणजे प्रशासक राज्यकर्ते होत. म्हणूनच प्लेटोने त्यांना ‘ न्याय विश्वस्त ’ म्हटले आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** आता चर्चा केलेल्या तत्त्वासारखेच दुसरे एक तत्त्व तुम्हाला समाधानकारक वाटेल की नाही याबद्दल मला शंका वाटते.

**अॅडिमँट्स :** ते कोणते ?

**सॉक्रेटिस :** मला वाटते, पुढील कारणांमुळे इतर कारागीर बिघडले जातील की नाही याचा तुम्ही विचार करावा.

**अॅडिमँट्स :** कोणत्या कारणांमुळे ?

**सॉक्रेटिस :** संपत्ती आणि दारिद्र्य.

**अॅडिमँट्स :** या कारणांमुळे ते कसे बिघडतील ?

**सॉक्रेटिस** : कुंभार श्रीमंत झाल्यावर पूर्वीसारखेच आपल्या धंद्याकडे लक्ष देईल असे तुम्हाला वाटते काय ?

**ॲडिमँट्स** : अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस** : पूर्वीपेक्षा तो अधिक आळशी व निष्काळजी होईल ना ?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : मग त्यामुळे तो वाईट कुंभार होणार नाही काय ?

**ॲडिमँट्स** : अर्थातच होईल.

**सॉक्रेटिस** : ह्याउलट दारिद्र्यामुळे धंद्याला आवश्यक असणारी साधने, हत्यारे त्याला घेता आली नाहीत, तर तो हलक्या वस्तू तयार करील व त्याच्या मुलांना व हाताखाली काम करणाऱ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण त्याच्याकडून मिळणार नाही.

**ॲडिमँट्स** : होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : यावरून श्रीमंती व दारिद्र्य या दोन्ही कारणांनी कारागीर व त्यांची कामे बिघडली जातील.

**ॲडिमँट्स** : होय. हे कबूल केलेच पाहिजे.

**सॉक्रेटिस** : आपल्या संरक्षकांनी ज्या अपायकारक गोष्टींची काळजी घेतली पाहिजे, त्या सापडल्या तर त्यांच्यावर त्यांनी पहारा ठेवला पाहिजे व त्यांचा शहरात प्रवेश होऊ न देण्याची काळजी घेतली पाहिजे.

**ॲडिमँट्स** : या अपायकारक गोष्टी कोणत्या ?

**सॉक्रेटिस** : संपत्ती आणि दारिद्र्य. कारण संपत्ती ही विलासीपणा, आळशीपणा निर्माण करते, तर दारिद्र्य हलकेपणा व व्यसनाधीनता निर्माण करते.

**ॲडिमँट्स** : तुम्ही म्हणता ते बरोबर आहे सॉक्रेटिस. पण आपल्या शहरात संपत्ती नसताना जर श्रीमंत व बलाढ्य राज्याविरुद्ध लढाई करण्याचा प्रसंग आपल्या राज्यावर आला तर कसे होणार ?

**सॉक्रेटिस** : अशा एकाच राज्याविरुद्ध लढाई करणे अवघड जाईल. पण अशी दोन राज्ये असतील तर ते सोपे जाईल.

**ॲडिमँट्स** : ते कसे शक्य आहे ?

**सॉक्रेटिस** : जर आपल्याला लढणे भाग पडले तर त्या वेळेस आपणाकडे निष्णात सैनिक असतील व विरुद्ध बाजूला फक्त श्रीमंतच असतील.

**ॲडिमँट्स** : हे शक्य आहे.

**सॉक्रेटिस** : ॲडिमँट्स, एक निष्णात मुष्ठियोद्धा, मुष्ठियुद्धाचे अजिबात ज्ञान नसणाऱ्या दोन श्रीमंत व लठ्ठ माणसांना सहजपणे जिंकू शकणार नाही काय?

**ॲडिमँट्स** : जर ते दोघे एकदम अंगावर धावून आले तर तो कदाचित जिंकू शकणार नाही.

**सॉक्रेटिस** : का बरे? प्रखर सूर्यप्रकाशात सामना चालू असता, एका प्रतिस्पर्ध्याला दुसऱ्याच्या पुढे येऊ द्यावयाचे व नंतर त्याच्यावर उलटून त्याला गराडा घालून छापा घालावयाचा. अशा पद्धतीचा वरचेवर उपयोग करून वरील दोन प्रतिस्पर्ध्यांनाच नव्हे तर अनेक प्रतिस्पर्ध्यांनाही तो भारी होणार नाही काय?

**ॲडिमँट्स** : यात आश्चर्यकारक असे काहीच नाही.

**सॉक्रेटिस** : युद्धकलेपेक्षा मुष्ठियुद्धाचे तात्त्विक व अनुभविक ज्ञान श्रीमंतांना अधिक असते, हे तत्त्व तुम्हाला मान्य आहे ना?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : मग आपले निष्णात सैनिक नक्कीच त्यांच्यापेक्षा दुप्पट-तिप्पट संख्येला भारी होतील.

**ॲडिमँट्स** : तुमचे म्हणणे बरोबर असल्यामुळे, मला ते मान्य करणे भागच आहे.

**सॉक्रेटिस** : अशी कल्पना करा की, आपल्या लोकांनी ह्या दोन प्रतिस्पर्धी शहरांपैकी, एका शहराकडे आपले शिष्टमंडळ पाठवून पुढीलप्रमाणे निवेदन केले, " आमच्याजवळ सोने वा चांदी अजिबात नसून आम्हांला त्याचा संग्रह करण्याचीदेखील परवानगी नाही. म्हणून तुमचे सैन्य घेऊन तुम्ही आम्हांला मिळा व दुसऱ्या शहराची मालमत्ता लुटून तुम्हीच ती घ्या." तर क्षीण व किरकोळ कुत्र्यांशी युद्ध करण्यापेक्षा त्यांच्याबरोबर मैत्री करून, लठ्ठ परंतु नाजुक अशा मेंढराविरुद्ध युद्ध करणेच ते शहर पसंत करणार नाही काय?

**ॲडिमँट्स** : शक्य आहे. पण एका शहरात संपत्तीचा साठा झाला असता, त्यापासून संपत्ती नसलेल्या शहराला धोका नाही काय?

**सॉक्रेटिस** : आपण ज्या तऱ्हेची शहराची रचना करीत आहोत तसे ते शहर नसेल तर त्याला 'एक शहर' म्हणणे अडाणीपणाचे नाही का?

**ॲडिमँट्स** : मग तुमचे काय म्हणणे आहे?

**सॉक्रेटिस** : इतरांना शहराशिवाय निराळे नाव दिले पाहिजे. कारण त्यांपैकी प्रत्येक शहर पुष्कळ शहरांचे बनलेले असते. म्हणून 'सिटीज' नावाच्या खेळाप्रमाणे (चकत्यांनी खेळला जाणारा एक प्रकारचा खेळ) त्याला एक शहर असे म्हणता येणार नाही. निदान त्यामध्ये एकमेकांविरुद्ध अशी दोन शहरे असतात. एक गरीब लोकांचे शहर व दुसरे श्रीमंत लोकांचे शहर. आणि ह्यांपैकी प्रत्येकात पुष्कळ शहरे असतात. ह्या सर्वांना 'एक शहर'

समजण्यात तुमची फार मोठी चूक होईल. पण जर तुम्ही त्यांना पुष्कळ शहरे असे गणले आणि त्यांपैकी एका वर्गाला सत्ताधिकार व दुसऱ्या वर्गातील लोक दिले, तर तुम्हाला मित्र पुष्कळ मिळतील व शत्रू थोडेच राहतील. आणि जोपर्यंत तुमचे आदर्श शहर आताच घालून दिलेल्या तत्त्वाप्रमाणे चालविले जाईल, तोपर्यंत ते पुष्कळ मोठे असेल. त्यामुळे ते ' मोठे शहर ' आहे अशी त्याची प्रसिद्धी होईल असे नाही. पण एकंदरीत त्यातील सैनिकांची संख्या हजारावर नसली तरी ती खऱ्या अर्थाने ते मोठेच शहर असेल. ग्रीक वा रानटी लोकांमध्ये, जरी तुमच्या आदर्श शहरापेक्षा अनेक पटींनी मोठी अशी शहरे असली, तरी ती खऱ्या अर्थाने मोठी असणार नाहीत, केवळ दिखाऊच असतील. तुमचे मत यापेक्षा वेगळे आहे काय ?

**ॲडिमँट्स** : नाही.

**सॉक्रेटिस** : राज्याच्या आकाशाप्रमाणेच, राज्याची जमीन मर्यादित ठेवण्याकरिता आपल्या राज्याधिकाऱ्यांनी पुढील प्रमाण उपयोगात आणावे.

**ॲडिमँट्स** : ते कोणते ?

**सॉक्रेटिस** : जोपर्यंत ऐक्याला बाध येणार नाही, तोपर्यंतच शहराचा विस्तार होऊ द्यावयाचा, हीच माझ्या मते योग्य मर्यादा आहे.

**ॲडिमँट्स** : वा ! उत्तम !

**सॉक्रेटिस** : शिवाय आपण संरक्षकांना असा हुकूम करू की शहर फार लहान अथवा मोठे नसावे आणि त्याचे ऐक्य व स्वयंपूर्णता अबाधित राहील अशी त्यांनी दक्षता घेतली पाहिजे.

**ॲडिमँट्स** : पण ही फारच किरकोळ कामगिरी झाली.

**सॉक्रेटिस** : ह्यापेक्षा साधी, किरकोळ कामगिरी त्यांनी करावयाची आहे. तिचा उल्लेख आपण पूर्वी केलाच आहे. त्यानुसार संरक्षकांमध्ये जन्मास आलेल्या निकृष्ट प्रकृतीच्या मुलाला त्यांनी दुसऱ्या वर्गात घातले पाहिजे व दुसऱ्या वर्गातील सुदृढ प्रकृतीच्या मुलांना संरक्षकांच्या वर्गात घातले पाहिजे. या योजनेमुळे शहरातील इतर लोक आपापल्या आवडीनुसार काम करतील आणि प्रत्येकजण, अनेक कामे न करता, केवळ एक विशिष्ट काम करीत राहिल्याने शहरात एकसूत्रीपणा निर्माण होऊन, एकविध शहराची स्थापना होऊ शकेल.

**ॲडिमँट्स** : पूर्वीपेक्षा हे काम अगदीच कमी महत्त्वाचे आहे.

**सॉक्रेटिस** : मित्रा, एखाद्याला या आज्ञा कठीण वाटतील, पण वस्तुतः त्या तशा नाहीत. जर संरक्षकांनी एक मुद्दा ध्यानात घेतला तर त्यांना या आज्ञा सोप्या वाटतील. तो मुद्दा मोठा म्हणण्यापेक्षा, आपल्या कामाला उपयोगी आहे म्हणणेच संयुक्तिक आहे.

**ॲडिमँट्स :** तो कोणता ?

**सॉक्रेटिस :** शिक्षण आणि पालनपोषण. कारण योग्य शिक्षणामुळे ते लोक विचारी बनतील. त्यामुळे आताचे हे सर्व प्रश्न व सध्या बाजूला ठेवलेले इतर प्रश्न ते ताबडतोब सोडवतील. स्त्री-पुरुषांतील परस्पर संबंध, विवाह आणि प्रजोत्पत्ती हेच ते बाजूला ठेवलेले विषय होत. या सर्व विषयांत, 'मित्रामित्रांमध्ये सर्व वस्तूंवर समाईक मालकी असते' या म्हणीचा त्यांना प्रत्यय येईल.

**ॲडिमँट्स :** होय. ही योजना चांगली आहे.

**सॉक्रेटिस :** आणि एकदा राज्य व्यवस्थित चालावयाला लागले म्हणजे त्याची वाढ वर्तुळाकार प्रगतीने होते. शिक्षण व पालनपोषण या चांगल्या पद्धतीचा अवलंब केल्याने चांगले स्वभाव निर्माण होतात. त्यांना चांगल्या शिक्षणाची जोड मिळाल्यावर ते अधिक चांगले होऊन त्यांची प्रजोत्पादनशक्तीही चांगल्या प्रकारे वाढते. खालच्या वर्गातील प्राण्यांमध्येही आपल्याला हेच आढळून येते.

**ॲडिमँट्स :** हे अगदी स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस :** थोडक्यात म्हणजे, आपल्या राज्याच्या संरक्षकांनी पुढील तत्त्वाचा काटेकोर अवलंब केला पाहिजे. त्या तत्त्वाचे संरक्षण ही महत्त्वाची गोष्ट समजून त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये. हे तत्त्व म्हणजे व्यायाम व सांस्कृतिक शिक्षण यांच्या ठराविक पद्धतीचा अवलंब करून कोणत्याही प्रकारे त्यात बदल न करणे. जेव्हा "एखादे गाणे ऐकल्यावर त्याच्या संगीताने गायक मोहीत होतात," तेव्हा गानप्रिय लोकांकडून असे सांगितले जाते की, गायक नवी गाणी गात नसून, गाण्याची पद्धत नवीन असते, म्हणून नाविन्याचा पुरस्कार करण्यात यावा. पण आपण नाविन्याचा पुरस्कार करून चालणार नाही. कारण नवीन तऱ्हेची संगीताची पद्धत, सर्व राज्याचे नुकसान करणारी आणि म्हणूनच त्याज्य आहे. संगीताच्या पद्धतीत बदल केला असता त्याचा महत्त्वाच्या राजकीय संस्थांवर परिणाम होतो या डेमानच्या म्हणण्यावर माझा विश्वास आहे.

**ॲडिमँट्स :** डेमानच्या या तत्त्वावर माझाही विश्वास आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणून आपल्या संरक्षकांनी, एखाद्या किल्ल्याप्रमाणे संगीताचे रक्षण केले पाहिजे.

**ॲडिमँट्स :** अजाणतेपणाने संगीतामध्ये बेकायदेशीरपणा निश्चितच शिरतो.

**सॉक्रेटिस :** होय. प्रथम तो करमणुकीच्या स्वरूपात शिरतो, त्यामुळे तो अपायकारक आहे, असे वाटत नाही.

**ॲडिमँट्स :** खरे आहे. पण हळूहळू शिरकाव करीत तो चालीरीती व आचार यांच्यावरही अत्याचार करतो. चालीरीतीमधून तो अधिक वेगाने बाहेर पडून परस्पर सहायक संघात शिरतो. तेथून तो कायदे व राज्यघटना यांच्यावर आघात करून, उद्धटपणाचे इतके प्रदर्शन करतो की, त्यामुळे सार्वजनिक व खाजगी गोष्टींत मोठी खळबळ माजते.

**सॉक्रेटिस :** हे खरे आहे काय ?

**ॲडिमँट्स :** होय, माझे तरी मत तसे आहे.

**सॉक्रेटिस :** तर मग, आपण सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे, आपल्या मुलांना पहिल्यापासूनच पद्धतशीर करमणुकीतच वाढवावयास हवे. कारण करमणुकी जेव्हा गैरशिस्त असतात आणि मुलांना त्या आवडतात, तेव्हा ती मुले राजनिष्ठ व सद्‌गुणी निघणे जरा अशक्यच असते.

**ॲडिमँट्स :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मुलांच्या आयुष्याची सुरुवात योग्य खेळांनी होऊन त्यांच्या मनात सांस्कृतिक शिक्षणाने राजनिष्ठा उत्पन्न झाल्यास आपणांस योग्य परिणाम दिसून येतो. कारण त्यांच्या सर्व कृत्यांत एकनिष्ठपणा दिसून त्यांची प्रगती होते. आणि एखादी राजकीय संस्था अधोगतीला गेली असेल तर एकनिष्ठतेच्या जोरावर ती वर आणता येते.

**ॲडिमँट्स :** होय. अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** असे लोक, पूर्वीच्या लोकांनी जे नियम क्षुल्लक म्हणून वगळलेले असतात ते शोधून काढण्याचा प्रयत्न करतात.

**ॲडिमँट्स :** ते कोणते ?

**सॉक्रेटिस :** वडील माणसांच्या समोर तरुणांनी विनयाने मौन स्वीकारावे, त्यांना वंदन करावे, आत आले असता उठून उभे रहावे आणि अशा रीतीने वडील माणसांबद्दल आदर दाखवावा. तसेच केसांची रचना विशिष्ट तऱ्हेने करावी, पोशाख व पादत्राणे ठराविक पद्धतीचीच वापरावीत, शारीरिक सौंदर्यही विशिष्ट पद्धतीचे असावे, वगैरेबाबतचे किरकोळ नियम वरील लोक करीत बसतात. तुम्हास काय वाटते ?

**ॲडिमँट्स :** मलाही तुमच्यासारखेच वाटते.

**सॉक्रेटिस :** पण मला वाटते अशा किरकोळ गोष्टीत कायद्याचे बंधन असणे मूर्खपणाचे आहे. अशा बाबतीत कोणी कायदे करीत नाहीत आणि केले तरी ते कायम टिकत नाहीत अशी माझी खात्री आहे.

**ॲडिमँट्स :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मित्रा, शिक्षणामुळे निर्माण झालेली सत्प्रवृत्ती या सामान्य गोष्टींचे नियम ठरवील. कारण दोन समानधर्मी गोष्टींत आकर्षण असते.

**ॲडिमँट्स :** नक्कीच !

**सॉक्रेटिस :** आपल्या या पद्धतीचा शेवट चांगला, कदाचित वाईट होणारा असला तरी तो फार महत्त्वाचा असेल असे मला वाटते.

**ॲडिमँटस** : होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणून वरील क्षुल्लक गोष्टींच्या नियमनाकरिता, कायद्याची मर्यादा वाढवावी असा प्रयत्न मी करणार नाही.

**ॲडिमँटस** : हो, तशी आवश्यकताच नाही.

**सॉक्रेटिस** : मग मला असे सांगा की, खाजगी रीत्या बाजारात होणारी देवाणघेवाण, कारागिरांचे करार, अब्रुनुकसानी, मारामारी, कोर्टातील खटले, पंचांच्या नेमणुकी, जकातीचे प्रश्न, तसेच बाजारात वा बंदरात आवश्यक असणाऱ्या दस्तुरीची वसुली आणि सामान्यतः बाजार, शिपाई, मांडवी वगैरे गोष्टींसंबंधी आपण कायदे करणे महत्त्वाचे आहे काय ?

**ॲडिमँटस** : चांगल्या व सुशिक्षित लोकांना हयाविषयी सूचना करण्याची आवश्यकताच नाही. कारण जरुरीपुरते कायदे ते स्वतःच करतील.

**सॉक्रेटिस** : खरे आहे. ज्या तऱ्हेच्या कायद्याची आपण चर्चा केली, ते कायदे पाळण्याची जर ईश्वराने त्यांना शक्ती दिली तर असे घडून येईल.

**ॲडिमँटस** : नाहीतर पूर्णतः मिळविण्याकरिता या गोष्टींकरिता असंख्य कायदे करावयाचे आणि नंतर त्यांत सुधारणा करायची. या व्यापातच त्यांचे सारे आयुष्य खर्च होईल.

**सॉक्रेटिस** : ज्याप्रमाणे निकृष्ट प्रकृतीचे लोक, आत्मसंयमनाच्या अभावी अपायकारक आयुष्यक्रम सोडू शकत नाहीत, त्याप्रमाणेच या लोकांचे आयुष्य असते, तसे तुमचे मत दिसते.

**ॲडिमँटस** : होय.

**सॉक्रेटिस** : खरोखरच अशा लोकांचे आयुष्य मोठे मनोरंजक असते ! वैद्य लोकांच्या तावडीत सापडल्यामुळे त्यांची दुखणी बरी तर होत नाहीत, उलट वाढतच जातात ! आणि इतक्या वेळा येऊनही त्यांना आशा वाटत असते की आपण कुठल्या तरी औषधाने बरे होऊ.

**ॲडिमँटस** : अशक्त प्रकृतीच्या लोकांचे वागणे असेच असते.

**सॉक्रेटिस** : "जोपर्यंत तुम्ही दारू पिणे, खादाडपणा, विषयासक्तता व आळशीपणा सोडणार नाही तोपर्यंत कोणतेही औषध, शस्त्रक्रिया, गंडेदोरे वा इतर उपाय यांचा काहीही परिणाम होणार नाही" असे त्यांना कोणी सांगू लागला तर त्याला शत्रू मानणे अधिकच हास्यास्पद नाही का ?

**ॲडिमँटस** : हे काही बरोबर नाही. कारण जो चांगला उपदेश करतो, त्याच्यावर रागावण्यात काही अर्थ नाही.

**सॉक्रेटिस** : अशी माणसे तुम्हाला आवडत नाहीत असे दिसते.

**ॲडिमँटस** : मला अशी माणसे अजिबात आवडत नाहीत.

**सॉक्रेटिस :** तर मग सर्व शहर अशा प्रकारे वागू लागले तर तेही तुम्हाला आवडणार नाही. वाईट राज्यपद्धती असलेल्या शहरात एखादा मनुष्य राज्यपद्धती बदलू लागला तर अधिकाऱ्यांकडून त्याला फाशीची धमकी देण्यात येते. उलट चालू राज्यपद्धतीप्रमाणे, नोकरी करून, राज्याधिकाऱ्यांची मर्जी राखून, त्यांच्या इच्छेप्रमाणे वागणारा माणूस चांगला, ज्ञानगंभीर आणि सत्काराला पात्र समजला जातो. अशा प्रकारेच अधिकारी लोक वागतात ना ?

**ॲडिमँट्स :** होय. हे दोन्ही प्रकारचे लोक सारखेच आहेत. अशा प्रकारे वागणे मला मुळीच पसंत नाही.

**सॉक्रेटिस :** पण अशा शहरांची सेवा करण्यास जे तयार व उत्सुक असतात त्यांचे धैर्य व कौशल्य तुम्ही वाखाणीत नाही काय ?

**ॲडिमँट्स :** जरूर वाखाणतो. पण जेव्हा पुष्कळ लोकांकडून स्तुती झाल्यावर आपण खरेच राजकारणी पुरुष आहोत असा समज ते करून घेतात तेव्हा मात्र मी त्यांची वाखाणणी करीत नाही.

**सॉक्रेटिस :** तुमच्या मते ते क्षमा करण्यास पात्र नाहीत काय ? जेव्हा एखादा माणूस मोजमाप कसे करावे या बाबतीत अडाणी असतो, तेव्हा त्याला इतर अडाणी माणसांनी तो सहा फूट उंच आहे सांगितले तर ते खरे न वाटणे शक्य आहे काय ?

**ॲडिमँट्स :** अशक्य आहे.

**सॉक्रेटिस :** तर मग अशा लोकांवर रागावू नका. ज्यांना आपल्या क्षुल्लक कायदेकानूंच्या ठरावामुळे व त्यातील दुरुस्तींमुळे व्यवहारात घडून येत असलेली लबाडी आणि गोंधळ बंद पाडता येईल असे वाटते ते लोक इतरांच्या गमतीचा विषय ठरतात. कारण त्यांना कल्पना नसते की, हाइड्राची डोकी तोडण्यासारखाच निष्फळ प्रयत्न ते करीत असतात ! (हाइड्रा हा ग्रीक पुराणातील जलचर राक्षस. ह्याचे एक डोके तोडले असता दोन डोकी उगवत असत.)

**ॲडिमँट्स :** खरोखर ते असेच करीत असतात.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच मला असे वाटते की, कायदा व राज्यकारभार यांच्या क्षुल्लक बाबतीत, अस्सल कायदेपंडिताने, राज्य सुव्यवस्थित वा अव्यवस्थित असले तरी, लक्ष घालू नये. कारण अव्यवस्थित राज्य असले तर नियमांचा काहीच उपयोग होत नाही आणि सुव्यवस्थित राज्य असले तर असे काही नियम कोणत्याही माणसाला शोधून काढता येतात व बाकीचे नियम पूर्वी घेतलेल्या शिक्षणाचा परिणाम म्हणून पाळले जातात.

**ॲडिमँट्स :** मग कायदेपंडिताने काय करावयाचे ?

**सॉक्रेटिस :** काहीच नाही. पण डेल्फीयन अपोलोने सांगितलेली अत्यंत महत्त्वाची, उदात्त व श्रेष्ठ अशी कायद्याची कामे करावयाची राहिली आहेत.

**ॲडिमँट्स :** ती कोणती ?

**सॉक्रेटिस :** देवळांचे बांधकाम करणे, देव व देवतुल्य पुरुष यांच्या सन्मानार्थ यज्ञ व इतर विधी करणे, तसेच मृतांचा अंत्यसंस्कार करण्याची तऱ्हा व परलोकांतील लोकांची मर्जी संपादन करण्याचे प्रकार ठरविणे, हे विषय आपल्याला समजण्यासारखे नाहीत. म्हणून राज्याची स्थापना करीत असताना आपल्या जुन्या राष्ट्रपुरुषांशिवाय कोणाचेच मत वा उपदेश आपण ग्राहच धरू नये. मला वाटते, पृथ्वीच्या मध्यभागी ओम्फॅलसच्या जागेवर बसून, हाच देव, मानवतेची महती सांगणारा राष्ट्रपुरुष होय.

**ॲडिमँट्स :** तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. आपण असेच केले पाहिजे.

□ □

## प्रकरण बारा

# राज्यातील सद्‌गुण

**[IV-427-C—434-D]**

**कथासूत्र :**

[प्लेटोने सामाजिक व्यवस्थेतील महत्त्वाच्या नैतिक सद्‌गुणांचे, मूल्यांचे किंवा तत्त्वांचे विवेचन केले आहे. समाज म्हणजे व्यक्तींचे व्यापक स्वरूप होय अशी भूमिका घेऊन या सामाजिक जीवनात कोणत्या वर्गात कोणते सद्‌गुण असतात ते त्याने सांगितले आहे. स्थूलमानाने आत्मसंयम, धैर्य आणि ज्ञान हे अनुक्रमे उत्पादक, संरक्षक आणि प्रशासक या सामाजिक वर्गांचे सद्‌गुण होत असे त्याचे मत आहे. प्रत्येकाने आपापल्या अभिरुचीनुसार आणि पात्रतेनुसार स्वधर्माचे पालन किंवा स्वकर्तव्याची पूर्ती करावी यावर त्याने भर दिला आहे. असे घडल्यास समाजात सुसंवाद, एकात्मता निर्माण होते. या सामाजिक सुसंवादास त्याने सामाजिक न्याय असे म्हटले आहे. सामाजिक हित, कल्याण, सुख त्यावरच अवलंबून असते. राज्यकर्त्यांना मानवी जीवनाच्या आदर्श मूल्याविषयी ज्ञानदृष्टी, मर्मदृष्टी असणे, संरक्षक सैनिकांना नीतिधैर्य असणे आणि उत्पादक सामान्य नागरिकांत वासना, विकार आणि स्वार्थप्रवृत्ती यांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती असणे या गोष्टी आदर्श राज्यकारभाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात असा प्लेटोचा दृष्टिकोन आहे. स्वधर्मपालनाची निष्ठा हाच खरा सामाजिक सद्‌गुण होय.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** ॲरिस्टॉनच्या मुला, आता आपल्या आदर्श राज्याच्या व्यवस्थेची चर्चा आपण पूर्ण केली. आता तुझा भाऊ, पोलेमार्कस आणि इतर यांच्या सहकार्याने आणि जेथून याबद्दलचे आवश्यक ते ज्ञान तुला मिळेल ते मिळवून या व्यवस्थेचे परीक्षण करणे हे तुझ्यापुढील कार्य आहे. या व्यवस्थेत न्याय, अन्याय कोठे आढळतात, त्यात फरक कोठे दिसतो ते पाहून, देवता आणि मानवी व्यक्ती यांना कळो वा न कळो, परंतु ज्यांना सुखाची अपेक्षा आहे, त्यांनी न्याय किंवा अन्याय यांपैकी कोणत्या तत्त्वाचा स्वीकार करावा हे तुम्ही सर्वांनी निश्चित केले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** पण सॉक्रेटिस, तुला ही टाळाटाळ करून चालणार नाही. न्यायाचे समर्थन करण्यासाठी तू आपले सर्व सामर्थ्य पणास लावले आहे. आता जर त्यासाठी तू तुझे वाक्चातुर्य खर्च केले नाहीस, तर ते पाप ठरेल. चर्चेच्या प्रारंभी तूही आम्हास तसे बजावले आहेस आणि चर्चा सुरू केली आहेस.

**सॉक्रेटिस** : मला तुझे बोलणे आठवते. पण तुम्ही सर्वांनीही मला सहकार्य दिले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : आम्ही सर्वजण तुला निश्चितच मदत करू.

**सॉक्रेटिस** : मग आपल्या संशोधनाचे अंतिम फळ आपणांस निश्चितच मिळू शकेल अशी मला आशा आहे. आपल्या राज्याची रचना आपण उत्कृष्ट रीतीने केल्यामुळे ते एक अत्यंत चांगले राष्ट्र बनले आहे अशी माझी खात्री झाली आहे.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : आपले नागरिक ज्ञानी, शूर, संयमी आणि न्यायी असले पाहिजेत हे उघडच आहे.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : या राज्य व्यवस्थेत जर यांपैकी काही गुणांचा शोध आपण घेऊ शकलो तर फारच थोड्या गुणांचे संशोधन उरेल.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : एखाद्या विषयात चार गोष्टींचा समावेश असतो अशी आपण कल्पना करू. यांपैकी एकीचा शोध आपण घेत आहोत. चौथीचा शोध इतर तिन्हीपूर्वी घेतला तर आपले समाधान होईल. पण जर इतर तिन्ही अगोदर शोधल्या तर उरलेली चौथी मिळाल्यासारखेच होईल. कारण उरलेली चौथी हीच शेवटची गोष्ट असणार!

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आपण ज्या गुणांचा शोध घेत आहोत त्यांची संख्या चारच असल्याने आपल्या संशोधनासाठी आपण हीच पद्धत स्वीकारू या ना?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : आपल्या राज्यात अंतर्भूत असणाऱ्या सद्‌गुणांत ज्ञान किंवा शहाणपण हा प्रथमतःच स्पष्टपणे आढळतो. त्याबद्दल एक विरोधाभासात्मक वस्तुस्थिती आढळून येते.

**ग्लॅकॉन** : ती कशी?

**सॉक्रेटिस** : आपण ज्या राज्याचे वर्णन केले ते ज्ञानसंपन्न आहे. कारण या राज्यात घडणारी सल्लामसलत दूरदर्शी स्वरूपाची असते.

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : सल्लामसलतीसाठी दूरदर्शीपणा हा ज्ञानाचाच एक आविष्कार आहे. कारण अज्ञानापेक्षा ज्ञानच माणसाचा विचार दूरदर्शी बनविते.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** परंतु, राज्यातील ज्ञानाचे विविध प्रकार असू शकतात.

**ग्लॅकॉन :** निश्चितच !

**सॉक्रेटिस :** राज्यातील सुताराकडे सुतारकीचे ज्ञान असते म्हणून राज्य शहाणे वा दूरदर्शी असते असे म्हणता येईल का ?

**ग्लॅकॉन :** मुळीच नाही. फार तर या ज्ञानामुळे या राज्यात चांगले सुतार आहेत असे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस :** याचा अर्थ लाकडाची उपकरणे तयार करण्यासाठी लागणारे ज्ञान असले म्हणजे त्यामुळे राज्य शहाणे होते असे नाही.

**ग्लॅकॉन :** अर्थातच !

**सॉक्रेटिस :** पितळ किंवा इतर धातूंची उपकरणे ज्या ज्ञानामुळे तयार करता येतात ते ज्ञान तरी महत्त्वाचे असते का ?

**ग्लॅकॉन :** मुळीच नाही !

**सॉक्रेटिस :** तसेच, जमिनीमधून धान्य निर्माण करण्याचे ज्ञानसुद्धा राज्याला शहाणपणा मिळवून देणार नाही. फार तर या ज्ञानाचा अर्थ राज्य कृषिप्रधान आहे असा होईल.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या राज्याच्या व्यवस्थेत जे नागरिक राहतात त्यांच्यापैकी एखाद्या वर्गात असे ज्ञान असते का की, जो राज्याच्या व्यवस्थेपैकी एका गोष्टीबद्दल नियम करण्याऐवजी सर्व राज्यासंबंधी नियम करू शकेल आणि अंतर्गत आणि परराष्ट्रीय संबंध चांगले राखू शकेल ?

**ग्लॅकॉन :** असे ज्ञान असते.

**सॉक्रेटिस :** असे ज्ञान कोणते आणि ते कोणत्या वर्गात असते ?

**ग्लॅकॉन :** या ज्ञानास संरक्षणशास्त्र म्हणता येईल. ज्यांना आपण संरक्षक किंवा राज्यकर्ते म्हटले त्या वर्गात हे ज्ञान असते.

**सॉक्रेटिस :** हे ज्ञान असले तर त्या राज्याचे वर्णन कसे करता येईल ?

**ग्लॅकॉन :** सल्लामसलत करण्यात दूरदर्शी आणि खऱ्या अर्थाने ज्ञानी राज्य असे आपण वर्णन करू शकू.

**सॉक्रेटिस :** आपल्या राज्यात कासार लोक जास्त असतील की संरक्षक जास्त असतील ?

**ग्लॅकॉन :** कासार लोक.

**सॉक्रेटिस :** याचा अर्थ ज्यांना ज्ञानाच्या बाबतीत तज्ज्ञ म्हणता येईल अशा ज्ञानी लोकांचा सगळ्यात लहान वर्ग, संरक्षकांचा असणार नाही काय ?

**ग्लॅकॉन :** हो, तो सर्वांत लहान वर्ग असेल.

**सॉक्रेटिस :** मग प्रमुख राज्यकर्त्यांचा जो सर्वांत लहान वर्ग त्यांच्या ज्ञानाच्या पायावर उभारलेले राज्य सामान्यतः शहाणे बनते. सर्व ज्ञानशाखांमध्ये ज्याला शहाणपण म्हणता येईल त्याच्याविषयी अभ्यास करण्याचा अधिकार ज्यांना असतो अशा लोकांची संख्या अर्थातच कमी असणार !

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** मग, या पद्धतीने चार गुणांपैकी ज्ञान या एकाचा शोध करून आपण आपल्या राज्यातील त्याचे स्थान निश्चित केले आहे.

**ग्लॅकॉन :** हो. आपले संशोधन चांगले झाले आहे.

**सॉक्रेटिस :** आता आपल्याला धैर्य हा दुसरा गुण सापडणे अवघड नाही. त्याचप्रमाणे तो कोणत्या वर्गात सापडेल आणि त्यामुळे ते राज्य शूर लोकांचे आहे की नाही हेही समजणे अवघड होणार नाही.

**ग्लॅकॉन :** ते कसे काय ?

**सॉक्रेटिस :** राज्य हे भ्याड की शूर लोकांचे आहे हे ठरविण्यासाठी ज्या वर्गाकडे राज्याचे संरक्षण असते आणि जे लोक युद्धावर जातात त्या वर्गापेक्षा अन्य कोणत्या वर्गाकडे आपण लक्ष देऊ ?

**ग्लॅकॉन :** इतर कोणत्याही वर्गाकडे देणार नाही.

**सॉक्रेटिस :** बरोबर. कारण राज्याचा भ्याडपणा किंवा शूरपणा इतर वर्गांच्या अभ्यासाने ठरविता येतच नाही.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** मग जर राज्यामध्ये शूर आणि शहाण्या लोकांचा वर्ग असेल तर ते राज्य शूर आणि शहाणे म्हटले जाईल. ज्याबद्दल भय वाटावे असे कायदेपंडित म्हणतात त्याबद्दल लोकांना भय वाटले पाहिजे. त्यालाच धैर्य असे आपण म्हणत नाही का ? ही शक्ती या वर्गात असते.

**ग्लॅकॉन :** तुझे म्हणणे मला कळले नाही. म्हणून कृपया पुनः सांग.

**सॉक्रेटिस :** माझ्या मते धैर्य हा एक संरक्षणाचा प्रकार आहे.

**ग्लॅकॉन :** तो कसा ?

**सॉक्रेटिस :** शिक्षणाच्या संस्काराने कायद्यातील काही गोष्टींबद्दल भय वाटले पाहिजे. कायद्यात जे तत्त्व अंतर्भूत असते त्याचे रक्षण करणे आवश्यक असते. सुख, दुःख, इच्छा, भीती या सर्व प्रसंगांत कायद्याचे भय या तत्त्वाचे संरक्षण केले पाहिजे. त्याचा त्याग करून चालणार नाही. तुमची इच्छा असल्यास मी एका उदाहरणाने सांगतो.

**ग्लॅकॉन :** मला ते आवडेलच.

**सॉक्रेटिस :** रंगारी जेव्हा लोकरीला जांभळा रंग देऊ इच्छितो तेव्हा अनेक रंगांतून पांढऱ्या रंगाची लोकर निवडून काढतो. श्रमपूर्वक साफसूफ करतो हे तुला माहीत आहेच. विशिष्ट रंग जास्तीत जास्त उठावदार रहावा हा त्याचा हेतू असतो. त्यानंतर तो रंगविण्यास सुरुवात करतो. असा रंग दिला तर तो पक्का होतो. मग साबणाने धुतला तरी त्याची तकाकी जात नाही. जांभळा किंवा इतर कोणताही रंग अशा पूर्वतयारीशिवाय पक्का होत नाही.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे. अशी तयारी नसेल तर कोणताही रंग उडून जातो.

**सॉक्रेटिस :** आपण सैनिकांना निवडून जेव्हा सांस्कृतिक आणि शारीरिक शिक्षण देत होतो त्या वेळी काय घडवीत होतो ते वरील उदाहरणावरून कळून येईल. कायदा आणि न्याय यांविषयी विलक्षण आत्मविश्वास सैनिकांनी आत्मसात केला पाहिजे असा आपला प्रयत्न होता. ज्याची भीती वाटली पाहिजे किंवा वाटावयास नको याबद्दल किंवा अन्य बाबतीत, सैनिकांची मते योग्य शिक्षण संस्कारांनी आपण पक्की करीत होतो. त्यांच्या मनावरील हा न्यायप्रेमाचा रंग कोणत्याही रामबाण औषधानेसुद्धा धुतला जाऊ नये अशी आपली इच्छा होती. अशा औषधात कोणत्याही क्षारयुक्त मिश्रणापेक्षा अधिक परिणामकारक ठरणाऱ्या सुखांचा समावेश होतो. तसेच कसल्याही द्रावणापेक्षा वा रसायनापेक्षा ज्यांचा प्रभाव अधिक असतो त्यांमध्ये दुःख, भीती आणि इच्छा यांचा समावेश होतो. ज्याबद्दल भीती वाटावी किंवा वाटू नये अशा गोष्टींना चिकटून राहण्याची शक्ती किंवा जे योग्य आणि कायद्यास अनुसरून त्यास चिकटून राहण्याची शक्ती म्हणजे धैर्य अशी माझी धैर्याची व्याख्या आहे. तुमची हरकत नसेल तर मी तिला धैर्य मानतो.

**ग्लॅकॉन :** माझी काहीच हरकत नाही. कारण अशाबद्दल शिक्षण नसताना पशू किंवा गुलाम यांनी योग्य मत बनविले तर ते योग्य ठरणार नाही. त्यांना धैर्याऐवजी वेगळे नाव द्यावे लागेल.

**सॉक्रेटिस :** खरे आहे.

**ग्लॅकॉन :** धैर्याचे हे स्वरूप मी स्वीकारतो.

**सॉक्रेटिस :** नागरिकांच्या धैर्याचे वर्णन निदान तात्पुरते तुम्ही मान्य कराल. तुमची इच्छा असल्यास पुढे कधीतरी आपण या प्रश्नाचा अधिक विचार करू. आपली मुख्य चर्चा न्याय या तत्त्वाबद्दल असल्याने सध्या आपण धैर्य या गुणाची अधिक चर्चा करणे अनावश्यक आहे असे माझे मत आहे, म्हणून धैर्याबद्दल आपले एवढे विवेचन पुरेसे आहे.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** राज्यातील दोन गुणांच्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. एक म्हणजे संयम किंवा नेमस्तपणा आणि दुसरा म्हणजे आपल्या सर्व चर्चेस पायाभूत असलेला न्याय.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : संयमाची चर्चा न करता, अन्य मार्गाने न्यायाचा शोध घेता येईल का ?

**ग्लॅकॉन** : मला ते शक्य दिसत नाही. जर आपण संयमाची प्रथम चर्चा करणार नसू तर न्यायाबद्दलही प्रथम चर्चा करण्याची माझी तयारी नाही. म्हणून न्यायापूर्वी माझ्यासाठी आपण संयमाची चर्चा करावी.

**सॉक्रेटिस** : मलाही तसे वाटते.

**ग्लॅकॉन** : मग चर्चा सुरू करा.

**सॉक्रेटिस** : ठीक. आपल्या सध्याच्या मतानुसार, इतर गुणांपेक्षा संयमाचा तादात्म्याशी सारखेपणा असतो.

**ग्लॅकॉन** : तो कसा ?

**सॉक्रेटिस** : माझ्या मते सयम वा नेमस्तपणा म्हणजे व्यवस्थितपणा किंवा शिस्तबद्धता. सुख किंवा इच्छा यांवर नियंत्रण ठेवणे होय. माणसे या वा त्या मार्गाने स्वतःवर ताबा ठेवतात, असे काही लोक म्हणताना आपण ऐकतो. अशा अर्थाची जेव्हा अन्य विधाने केली जातात त्यांचाही अर्थ असांच दिसतो. खरे ना ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : पण ' स्वतःचा स्वामी ' ही परिभाषा अर्थहीन नव्हे का ? जो स्वतःचा मालक तो स्वतःचा गुलाम असू शकतो, आणि जो स्वतःचा गुलाम असतो तो मालकही असतो. कारण हे सर्व वर्णन त्या माणसाचेच असते.

**ग्लॅकॉन** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : माझ्या दृष्टीने माणसाच्या अंतःकरणात एक चांगले आणि दुसरे वाईट अशी दोन तत्त्वे असतात. जेव्हा चांगल्याचे वाईटावर नियंत्रण असते तेव्हा माणूस ' स्वतःचा स्वामी ' बनून तो स्तुतीस पात्र होतो. पण जेव्हा वाईट शिक्षणाने, कुसंगतीने चांगले तत्त्व दुर्बल होते आणि वाईटाकडून पराभूत होते, तेव्हा माणूस निंदेस पात्र होतो. तो स्वतःचा गुलाम किंवा दुष्प्रवृत्त म्हटला जातो.

**ग्लॅकॉन** : हे वर्णन ठीक आहे.

**सॉक्रेटिस** : आता आपण आपल्या राज्याविषयी विचार करू. त्यात एक गोष्ट आढळेल. जेव्हा चांगल्याचा वाईटावर विजय होईल तेव्हा समाजस्थिती नेमस्त, संयमी, नियंत्रित स्वरूपाची होईल. असे राज्य ' स्वतःचे धनी ' म्हणता येईल, हे तुम्हांस मान्य होईल.

**ग्लॅकॉन** : तुमच्या बोलण्यातील सत्यता मला मान्य आहे.

**सॉक्रेटिस** : नानाविध स्वरूपाच्या इच्छा, वासना, सुखदुःखे आपल्याला लहान मुले, स्त्रिया, नोकरमाणसे यांत आढळतात. तशीच कनिष्ठ दर्जाच्या लोकांत आढळतात.

**ग्लॅकॉन** : ठीक आहे.

**सॉक्रेटिस** : ज्यांच्या इच्छा बुद्धीच्या, विचाराच्या नियंत्रणाखाली असतात, ज्यांचा स्वभाव सुशिक्षित, सुस्वभावी, नेमस्त स्वरूपाचा असतो, असे लोक फार थोडे आढळतात.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : आपल्या राज्यात दोन प्रकारच्या इच्छांना अवसर आहे. बहुसंख्यांक व्यक्तींच्या इच्छा अल्पसंख्य ज्ञानी व्यक्तींकडून नियंत्रित होतात.

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : स्वतःचे आणि स्वसुखाचे धनी असे आपल्या राज्याचे वर्णन करता येईल ना ?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच या राज्यास नेमस्त, संयमी म्हणता येईल ना ?

**ग्लॅकॉन** : खात्रीने तसे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : राजा कोण आणि प्रजा कोण या प्रश्नाबद्दल ज्या राज्यात एकमत आढळते, असे आपले राज्य आहे ना ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : राज्यातील नागरिकांपैकी कोणत्या लोकांत नेमस्तपणा असतो, असे म्हणता येईल ? राज्यकर्त्यांमध्ये की सामान्य प्रजाजनांत ?

**ग्लॅकॉन** : माझ्या दृष्टीने दोन्ही वर्गांत.

**सॉक्रेटिस** : नेमस्तपणा हा एकतानतेचा प्रकार आहे, असे आपण म्हटले होते, ते असत्य नव्हे, हे तुम्हांस समजले ना ?

**ग्लॅकॉन** : ते कसे काय ?

**सॉक्रेटिस** : त्याचे कारण धैर्य, ज्ञान यांसारखा संयम हा गुण नाही. धैर्य आणि ज्ञान हे गुण जरी थोडचा नागरिकांत असले तरी त्यामुळे सर्व राज्य शूर आणि ज्ञानी मानले जाते. नेमस्तपणा मात्र बुद्धिमत्ता, शरीरसामर्थ्य, संख्या, सांपत्तिक स्थिती यांमुळे भिन्नता असलेल्या नागरिकांत एकात्मता निर्माण करतो, एकी घडवितो. व्यक्ती आणि समाज यांच्या संदर्भात, स्वाभाविक चांगल्या आणि स्वाभाविक वाईट अशांपैकी कोणत्या तत्त्वाने सत्ता वापरावी, प्रशासन स्वीकारावे, याबद्दल नेमस्तपणा हा गुण एकमत घडवितो. अशा गुणालाच नेमस्तपणा म्हणता येईल.

**ग्लॅकॉन** : मला तुमचे विवेचन मान्य आहे.

**सॉक्रेटिस :** ठीक. अशा तऱ्हेने आपल्या आदर्श राज्यव्यवस्थेतील चारपैकी तीन तत्त्वांचा आपण शोध पूर्ण केला. निदान तसे आपण समजू. यापुढे ज्या गुणामुळे राज्य सद्‌गुणी होते, असा कोणता गुण उरला ? आपल्याला खात्रीनेच ' न्याय ' या गुणाचा निर्देश करावा लागेल.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** हे पहा ग्लॅकॉन, शिकाऱ्याप्रमाणे आता आपण झाडाच्या सावलीत पोहोचलो आहोत. आता न्यायाचे अनुसंधान सुटणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. आता न्यायाचा शोध नक्की लागणार. म्हणून शोध घेऊन पहा. कदाचित तुम्हांस तो प्रथम आढळेल. आढळला की सांगा. चर्चेचा जोरदार प्रयत्न करा.

**ग्लॅकॉन :** न्याय भेटावा असे मला वाटते. पण ज्याला न्यायाचे दर्शन घडले तर कळेल, असा मी तुमच्या पाठीशी आहे असे समजलेस, तर चांगले होईल.

**सॉक्रेटिस :** माझ्यासह प्रार्थना कर आणि माझ्याबरोबर चल.

**ग्लॅकॉन :** मी तयार आहे. पण तू मार्ग दाखव.

**सॉक्रेटिस :** न्यायाचा शोध जिथे आपण घेत आहोत ती जमीन घनदाट झाडीने व्यापलेली असली, तरी आपला शोध चालूच हवा.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** मला न्यायाचे अंधुक दर्शन घडले. मी उद्‌गारलो, " वा ! ग्लॅकॉन ही पहा वाट ! आता न्यायाची शिकार सापडणारच. "

**ग्लॅकॉन :** चांगली गोष्ट आहे.

**सॉक्रेटिस :** खरे पाहता आपली अडचण अगदीच हास्यास्पद होती.

**ग्लॅकॉन :** ते कसे ?

**सॉक्रेटिस :** गृहस्था ! आपण ज्याचा शोध घेत होतो ते तत्त्व आपल्या पायाशीच लोळण घेत होते. पण आपण पाहिलेच नाही. हे हास्यास्पद नाही का ? आपल्याच हाती वस्तू असून माणसे तिला इकडे तिकडे शोधतात तसेच घडले. जवळच असणाऱ्या वस्तूकडे न पाहता दूर नजर लावून बसलो आणि जे शोधायचे ते निसटून गेले.

**ग्लॅकॉन :** तू काय बोलतोस ते कळले नाही.

**सॉक्रेटिस :** आपण ज्या न्यायाबद्दल चर्चा करीत होतो ते तत्त्व आपण ओळखूच शकलो नाही, असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** तुझे प्रास्ताविक फारच लांबले.

**सॉक्रेटिस :** ठीक. आता मी म्हणतो ते ऐक आणि योग्य-अयोग्य ते ठरव. आपण एक काल्पनिक आदर्श राज्य उभारीत आहोत. " प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक प्रवृत्तीला अनुकूल किंवा स्वधर्मानुसार असा विशिष्ट व्यवसाय तिला दिला पाहिजे " असे आपण सुरुवातीसच तत्त्व सांगितले आणि वारंवार सांगितले. या तत्त्वालाच न्याय म्हणतात.

**ग्लॅकॉन :** प्रत्येकाने एकच विशिष्ट काम केले पाहिजे, असे आपले मत होते.

**सॉक्रेटिस :** इतरांच्या व्यवसायात ढवळाढवळ न करणे, प्रत्येकाने आपापल्या स्वधर्मानुसार कर्तव्य करीत राहणे म्हणजे न्याय होय. असे इतरांचे मत आहे. आपलाही तसा दृष्टिकोन आहे.

**ग्लॅकॉन :** हो, तशी आपली भूमिका आहे.

**सॉक्रेटिस :** त्यावरून असे दिसते की, ' स्वधर्मपालन म्हणजे न्याय होय '. मी कशासाठी हे म्हणतो माहीत आहे ?

**ग्लॅकॉन :** नाही, कृपया सांग.

**सॉक्रेटिस :** ज्ञान, धैर्य आणि नेमस्तपणा हे सद्‌गुण राज्यातून वेगळे काढल्यावर एकच गुण उरतो. तो असा असला पाहिजे की, त्यामुळे या तीन गुणांचा प्रवेश आणि त्यांचे संरक्षण शक्य झाले पाहिजे. चार गुणांपैकी तीन आढळले की चौथा गुण न्यांयच असणार असे आपण नुकतेच मान्य केले आहे.

**ग्लॅकॉन :** नि:संशय !

**सॉक्रेटिस :** प्रशासक आणि प्रजा यांत एकमत असणे ; कशाचे भय असावे, कशाचे असू नये याबद्दल सैनिकांची कायद्यानुसार निर्माण होणाऱ्या न्यायाबाबतची श्रद्धायुक्त चिकाटी ; राज्यकर्त्यांमधील दक्षता आणि मर्मदृष्टी ; किंवा राज्यातील स्त्रिया, मुले, गुलाम, स्वतंत्र नागरिक, कारागीर, अधिकारी, सामान्य लोक यांच्या मनात " प्रत्येकाने स्वधर्म पालन करावे ", " इतरांच्या कामात ढवळाढवळ करू नये " या तत्त्वाबद्दलची आस्था ; यांपैकी कोणत्या गुणामुळे राज्याचा उत्कर्ष होईल, ते ठरवणे अवघड आहे.

**ग्लॅकॉन :** खरोखर, या प्रश्नाची सोडवणूक करणे कठीण आहे.

**सॉक्रेटिस :** राज्याचा उत्कर्ष होत असताना ज्ञान, धैर्य आणि नेमस्तपणा या गुणांशी ' स्वधर्म पालन ' करण्यास प्रवृत्त करणारी शक्ती स्पर्धा करेल असे वाटते.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** या सद्‌गुणाशी स्पर्धा करणारे तत्त्व म्हणजे न्याय ना ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस** : आता या समस्येकडे दुसऱ्या दृष्टिकोनातून पाहिले तर हेच उत्तर येते, असे दिसून येईल. राज्यकर्त्यांकडे न्यायालयातील खटल्यांचा निकाल आपण सोपवू ना?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : दुसऱ्याच्या वस्तूचा वापर वा अपहरण कोणीही करू नये, या नियमानुसारच ते निकाल देतील ना?

**ग्लॅकॉन** : प्रामुख्याने ते तसा प्रयत्न करणार.

**सॉक्रेटिस** : कारण तसे न्यायास अनुसरून ठरेल, म्हणून ना?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : मग, याच भूमिकेतून आपली वस्तू स्वतःजवळ असणे, आणि स्वधर्मानुसार जे युक्त ते काम करणे म्हणजे न्याय, हे मान्य होणार.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आता मी म्हणतो ते तुला मान्य आहे की नाही ते पहा. आपली हत्यारे बदलून, विशिष्ट कामांची अदलाबदल करून एकाच माणसाने दोन धंदे त्यांच्यातील भेद लक्षात घेऊन करावयाचे ठरविले; आणि त्यानुसार चांभाराने सुताराचे आणि सुताराने चांभाराचे काम स्वीकारले, तर आपल्या राज्याचे फार नुकसान होईल का?

**ग्लॅकॉन** : फार होणार नाही.

**सॉक्रेटिस** : एखादी व्यक्ती स्वधर्माने कारागीर आहे, शेतकरी आहे. शरीर सामर्थ्य, वशिला, श्रीमंती यांमुळे त्याला गर्व आहे. त्याने सैनिकी पेशा स्वीकारला, किंवा एखादा सैनिक पात्रता नसताना कायदेपंडितांच्या वा राज्यकर्त्यांच्या वर्गात शिरला. अशा तऱ्हेने नागरिकांनी आपली शस्त्रे, व्यवसाय, कर्तव्य बदलण्यास सुरुवात केली. किंवा एकच व्यक्ती सर्व कामे एकदम करण्याचा प्रयत्न करू लागली. असे घडले तर परस्परांच्या कामात ढवळाढवळ होईल. त्यामुळे राज्याच्या उत्कर्षाची हानी होईल.

**ग्लॅकॉन** : निःसंशय!

**सॉक्रेटिस** : आपल्या राज्यात तीन वर्ग आहेत. एकाने दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करणे, दुसऱ्याचे काम करणे, हे राज्याच्या उत्कर्षास अपायकारक ठरेल. ती वाईट गोष्ट घडेल.

**ग्लॅकॉन** : बरोबर.

**सॉक्रेटिस :** आपल्या राज्याच्या उत्कर्षास अपाय, बाध आणणे म्हणजे अन्याय म्हणता येईल ना ?

**ग्लॅकॉन :** खात्रीने.

**सॉक्रेटिस :** यालाच आपण अन्याय म्हणू. याउलट व्यापारी, सैनिक व संरक्षक या तीन वर्गांतील लोकांनी आपापल्या स्वधर्माचे पालन करणे, यालाच न्याय म्हणतात. याच गुणामुळे राज्यही न्यायी बनते असे आपण म्हणू शकू.

**ग्लॅकॉन :** मी तुमच्याशी पूर्ण सहमत आहे.

□ □

# प्रकरण तेरा

# आत्म्याचे तीन भाग

**[IV-434-D—441-C]**

**कथासूत्र :**

[राज्यातील सद्‌गुण विशद केल्यानंतर त्यामागील मानसशास्त्र विशद केले आहे. राज्यात जसे तीन वर्ग असतात तसे मानवी व्यक्तिमत्वाचे तीन भाग असतात—वासना, अस्मिता, विचार. त्यांची कार्येही सामाजिक वर्गांच्या कार्याप्रमाणे असतात. वासनेची प्रवृत्ती सुख संपादनाची असते. संचय हा तिचा स्वभाव असतो. अस्मिता किंवा स्वाभिमान याची प्रवृत्ती आत्मसंरक्षणाची असते, तर विचाराची प्रवृत्ती ज्ञान संपादनासाठी असते.

वासना व्यक्तीला उपभोगप्रवण बनविते, अस्मिता त्यामधील धोके, प्रमाद दाखवते तर विचार सद्‌सद्विवेकाचा आधार असतो.

प्लेटोने या तिन्हीना एकाच जीवन प्रवृत्तीच्या तीन अवस्था मानलेल्या आहेत. सुख, सन्मान आणि ज्ञान यांच्या प्राप्तीचे ते तीन मार्ग होत. आपल्या Timaeus या संवादग्रंथात प्लेटोने व्यक्तीमध्ये हे तीन भाग शीर्ष, ऊर आणि उदर यांमध्ये असतात असे म्हटले आहे आणि ज्ञान ही शरीरापासून विभक्त करता येणारी अमर प्रवृत्ती होय असे म्हटले आहे. पुढे प्लेटोने हे स्पष्ट केले आहे की, आत्म्याचे तीन भाग असतात. याचा अर्थ विभक्त करता येण्यासारखी आत्मा ही जड वस्तू नव्हे, एकाच व्यक्तीची संदर्भानुसार बदलणारी ती कार्यप्रवृत्ती होय. म्हणजेच या तीन भागांतील भेद रचनात्मक नसून कार्यात्मक आहेत. वासना, अस्मिता आणि ज्ञान ही त्रिमूर्ती सर्व व्यक्तिगत जीवनाचा पाया होय.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** न्यायाविषयी इतक्या ठामपणे आपल्याला आताच बोलता येणार नाही. न्यायाची कल्पना व्यक्तीला राज्याप्रमाणे लावता येऊन तिचे सत्यत्व प्रस्थापित झाले तरच आपण निःशंक होऊ. नाहीतर, आपण सध्या नवीन विषयावर चर्चा सुरू करू. मोठ्या वस्तूंत न्यायाचे स्वरूप सापडले तर लहान वस्तूंत सापडणे ते अधिक सोपे जाते या सिद्धान्तानुसार जी चर्चा आपण सुरू केली आहे ती पूर्ण करू. आपल्याला मोठ्या विषयामध्ये म्हणजे राज्यामध्ये न्याय दिसून आला म्हणून चांगल्या शहरात न्यायाची निश्चितच वस्ती असली पाहिजे या खात्रीने आपण आपल्या सामर्थ्याप्रमाणे उत्तम राज्याची उभारणी केली. त्या वेळची कल्पनाच आपण व्यक्तिमात्राला लावून पाहिली आणि तशी ती जुळली तर

आपल्याला खरे समाधान मिळेल. पण त्यात जर भिन्नपणा दिसून आला तर आपण आपल्या आदर्श शहराकडे वळू व आपल्या कल्पनेची पुनः उजळणी करू. राज्य व व्यक्ती यांची उदाहरणे जवळजवळ मांडून त्यांचे एकमेकांवर घर्षण करू म्हणजे वाळलेल्या लाकडांचे तुकडे एकमेकांवर घासल्यावर ज्याप्रमाणे अग्नी प्रज्वलित होतो, त्याप्रमाणे अशा घर्षणाने न्याय अधिक चमकू लागेल. अशा तऱ्हेने न्याय दिसू लागल्यावर त्याची प्रतिमा आपण मनात बरोबर साठवू शकू.

**ग्लॅकॉन :** आपली कल्पना ठीक आहे. आपण तसे करू या.

**सॉक्रेटिस :** एक मोठी व एक लहान अशा दोन वस्तू जेव्हा एकाच नावाने संबोधल्या जातात आणि त्यांना एकच नाव लावण्यात येते, तेव्हा त्या सारख्याच असतात की भिन्न असतात ?

**ग्लॅकॉन :** सारख्या असतात.

**सॉक्रेटिस :** तर न्यायी मनुष्य, न्यायी राज्याहून वेगळा असणार नाही. कारण न्यायाची कल्पना दोन्हीतही अंतर्भूत असल्याने दोन्हीही सारखीच असणार.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** ठीक. राज्यातील तिन्ही वर्गातील लोक जेव्हा आपापली कामे करण्यात गुंतलेली असतात तेव्हा राज्य न्यायी असते असे आपण ठरविले आहे. या वर्गांच्या वृत्तीमुळे व स्थितीमुळे ते संयमी, शूर व शहाणे समजले जातात.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** व्यक्तीबद्दलही आपल्याला असेच ठरविता येईल. व्यक्तीच्या आत्म्यामध्ये अशाच प्रकारचे भाग असल्यामुळे राज्यातील वर्गांना जी नावे दिली आहेत तीच ह्या भागांना द्यावीत, कारण ह्या भागांच्या व राज्यातील वर्गांच्या प्रवृत्तीही सारख्याच असतात.

**ग्लॅकॉन :** असे असणे स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस :** मित्रवर्या, आत्म्याच्या स्वरूपाविषयीच्या एका साध्या प्रश्नावर आपण पुनः अडकून पडलो आहोत. तो प्रश्न म्हणजे आत्म्यात असे तीन भाग असतात काय ?

**ग्लॅकॉन :** मला वाटते ह्रा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही. पण मित्रा लौकिक म्हण अशी आहे की, सौंदर्य हे दुष्प्राप्य असते.

**सॉक्रेटिस :** खरे आहे. पण ग्लॅकॉन, माझे स्पष्ट मत आहे की, सध्या ज्या पद्धतीने आपण चर्चा करीत आहोत तीच पद्धत आपण चालू ठेवली तर ह्याविषयी संपूर्ण सत्य आपणांस कधीच कळणार नाही. त्या ध्येयप्राप्तीचा मार्ग फारच लांब व कष्टकारक आहे. तरीही आपल्या हल्लीच्या पद्धतीनुसार आपण पूर्वीइतके सत्य गाठू शकू असा मला विश्वास वाटतो.

**ग्लॅकॉन :** तेवढ्याने आपले समाधान होणार नाही काय ? माझे तरी होईल.

**सॉक्रेटिस :** माझेसुद्धा एवढ्याने समाधान होईल.

**ग्लॅकॉन :** तर मग विलंब न लावता आता चर्चेस सुरुवात करा.

**सॉक्रेटिस :** राज्यामध्ये दिसून येणारे स्वभावविशेष प्रत्येक व्यक्तीमध्ये दिसून येत नाहीत असे आपणांस म्हणता येईल काय ? माझ्या मते राज्यात जे हे स्वभावविशेष दिसतात ते व्यक्तीमधूनच आलेले असतात. राज्यामध्ये असलेल्या तेजस्वी तत्त्वाचा उगम व्यक्तीत सापडत नाही म्हणणे अयोग्य आहे. कारण थ्रेस, सिथिया आणि मुख्यत्वेकरून उत्तरेकडचे प्रदेश या ठिकाणी राहणारे लोक तेजस्वी स्वभावाचे म्हणून ओळखले जातात. तसेच ज्ञानाची आवड आपल्या देशातील लोकांना आणि संपत्तीची आवड फेनिशिअन्स व इजिप्शियन लोकांना विशेषत्वाने असते असे मानतात.

**ग्लॅकॉन :** नक्कीच !

**सॉक्रेटिस :** ही गोष्ट सत्य असून समजण्यास सोपी आहे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** आपल्या सर्व क्रिया एकाच वरिष्ठ शक्तीकडून घडून येतात की तीन स्वतंत्र शक्तींकडून घडून येतात असा प्रश्न येथे उपस्थित होतो. एका अंतस्थ शक्तीने आपण ज्ञान मिळवितो, दुसऱ्या शक्तीमुळे रागावतो, तिसऱ्या शक्तीने क्षुधा, तृष्णा व मैथुन ह्या वासनांची तृप्ती करतो, असे होते काय ? का कोणत्याही क्रियेची प्रेरणा उत्पन्न झाल्यावर या सर्व क्रिया आपला आत्माच करावयास लागतो काय ? हे सर्व मुद्दे समाधानकारक रीतीने सुटणे जरा कठीण आहे.

**ग्लॅकॉन :** माझेही मत असेच आहे.

**सॉक्रेटिस :** ह्या शक्ती निरनिराळ्या आहेत की एकच आहेत हे ठरविण्याचा आपण प्रथम प्रयत्न करू.

**ग्लॅकॉन :** या संदर्भात तुमची काय योजना आहे ?

**सॉक्रेटिस :** एकाच वस्तूला दोन विरोधी गोष्टी करता येत नाहीत, तसेच एकाच भागामध्ये, एकाच विषयासंबंधी, दोन विरोधी स्थितींमध्ये एक वस्तू जाऊ शकत नाही. म्हणून जेव्हा असे विरोधी प्रकार दिसून येतील तेव्हा आपण असे समजावे ह्या वस्तू एकच नसून अनेक आहेत.

**ग्लॅकॉन :** ठीक आहे.

**सॉक्रेटिस :** आता मी काय म्हणतो त्याचा विचार करा.

**ग्लॅकॉन :** सांगा.

**सॉक्रेटिस :** एकाच वस्तूला, एकाच वेळी, एकाच भागामध्ये स्थिर राहणे व गतिमान असणे शक्य आहे का ?

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** यापेक्षा अधिक स्पष्ट खुलासा झाला नाही तर चर्चेला सुरुवात केल्यानंतर मतभेदाला प्रारंभ होईल. समजा, एक स्थिर उभा राहून आपले हात व डोके हलवीत आहे, अशा वेळी तो मनुष्य स्थिरही आहे व गतिमानही असे जर कोणी म्हटले तर त्याला आपण विरोध करू व असे म्हणू की, अशा मनुष्याचा काही भाग स्थिर असून काही भाग गतिमान आहे, असेच ना ?

**ग्लॅकॉन :** होय. आपण असेच म्हणू.

**सॉक्रेटिस :** विरोधक व्यक्ती आणखी प्रयत्न करून असे म्हणेल की, एका विशिष्ट जागी टोकावर फिरणारा भोवरा एकाच वेळी स्थिर असतो आणि फिरताही असतो ; किंवा ती असे म्हणेल की, एकाच जागी फिरत असलेली कोणतीही वस्तू ही याच उदाहरणाचे निदर्शक आहे. पण आपल्याला हे उदाहरण मान्य नाही. कारण या वस्तू एकाच भागाबद्दल स्थितिशील किंवा गतिशील असत नाहीत. आपल्याला असे म्हणता येईल की, या वस्तूंना व्यास आणि परिघ असतो. जर वस्तू कोणत्याही एका बाजूला वाकत नसतील तर त्याचा अर्थ व्यास स्थिर असून परिघाचे मात्र भ्रमण सुरू आहे. जर भ्रमणक्रिया चालू राहिली आणि व्यास एकाच वेळेला डावी-उजवीकडे किंवा पुढे-मागे वाकला तर ती वस्तू कोणत्याही अर्थाने स्थिर आहे असे आपण म्हणू शकणार नाही.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** तर मग एकच वस्तू, एकाच भागात, एकाच विषयाबद्दल दोन विरुद्ध तऱ्हेने परिणाम करीत असेल किंवा दोन परस्पर विरुद्ध स्वरूपाची बनेल, किंवा दोन परस्पर विरुद्ध कार्ये घडवील, परंतु असे घडण्याची खात्री कोणत्याही आक्षेपात असणार नाही.

**ग्लॅकॉन :** माझेही तसेच मत आहे.

**सॉक्रेटिस :** पण अशा आक्षेपांबद्दल विचार करून त्यात अर्थ नाही हे सिद्ध करण्यात वेळ दवडण्याऐवजी आपण असे गृहीत धरू की, या आक्षेपात अर्थ नाही. आपली चर्चा अशा समजुतीने पुढे करू की, जर आपले तत्त्व खोटे असेल तर त्यानुसार तयार केलेले निष्कर्ष अप्रमाण ठरतील.

**ग्लॅकॉन :** ठीक आहे.

**सॉक्रेटिस :** मग मला सांग की, आवड-नावड, इच्छा-कंटाळा, आकर्षण-तिटकारा ही परस्पर विरोधी द्वन्द्वे नव्हेत का ?

**ग्लॅकॉन :** आहेत.

**सॉक्रेटिस :** ठीक. क्षुधा, तृष्णा, वासना, अपेक्षा, इच्छासिद्धीच्या प्रयत्नांची इच्छा यांचा तू पहिला वर्ग तयार करशील ना ? उदा. इच्छाधीन व्यक्ती इच्छित वस्तूच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करीत नाहीत का ? किंवा त्याला जे हवे असते त्याला तो आकर्षित करीत नाही का ? किंवा जे हवे त्याची इच्छा करताना मनातच त्याबद्दल प्रश्न विचारून तो स्वतःच स्वतःला होकार देत नाही का ?

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : नावड, नाखुषी, तिटकारा या सर्वांना मानसिक नापसंतीच्या वर्गात घालून, ही द्वन्द्वे पहिल्या वर्गाच्या विरोधी आहेत, असे नव्हे का ?

**ग्लॅकॉन** : खात्रीने.

**सॉक्रेटिस** : याचा अर्थ तृष्णा, क्षुधा या इच्छांचा एक विशिष्ट वर्ग बनत नाही का ?

**ग्लॅकॉन** : हो. तसे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : पिण्याची इच्छा आणि खाण्याची इच्छा असते ना ?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : तृषेमध्ये पेयाव्यतिरिक्त आणि काय इच्छा असते ? म्हणजे तहान या शब्दात उष्ण वा शीत पेय, कमी वा जास्त पेय असा म्हणजेच 'विशिष्ट पेयाची तहान' असा अर्थ असतो का ? तहान लागल्यावर उष्ण हवा असताना थंड पेयाची इच्छा किंवा थंड हवा असताना उष्ण पेयाची इच्छा होते हे ठीक आहे. मात्र 'तहान' ही मानसिक अवस्था मात्र 'पेय पिणे' यापेक्षा इतर अधिक इच्छा निर्देशित करीत नाही. तीच गोष्ट अन्नाच्या संदर्भातल्या भुकेची.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे. साधी इच्छा साध्या वस्तूशी संलग्न असते. विशिष्ट इच्छा विशिष्ट वस्तूशी संलग्न असते.

**सॉक्रेटिस** : पण माणसाला साध्या तृषापूर्तीऐवजी विशिष्ट चांगल्या पेयाची इच्छा असते. साध्या क्षुधापूर्तीऐवजी विशिष्ट चांगले अन्न मिळावे अशी तो इच्छा करतो. असा आक्षेप घेऊन आपण अविचारी आहोत असे मानून आपणांस चर्चेमध्ये कोणी आडकाठी करू नये. तहान ही इच्छा आहे. इच्छा ही चांगल्या वस्तूची असते. ही चांगली वस्तू चांगले पेय, चांगले अन्न इ. काही असो. आपले मत त्या सर्वांनाच लागू पडते.

**ग्लॅकॉन** : अशा आक्षेपात अर्थ दिसतो.

**सॉक्रेटिस** : पण परस्परसंबंधी वस्तूबद्दल जे शब्द असतात, त्यांपैकी पहिला विशेषणयुक्त असेल तर दुसराही तसा असतो, हे लक्षात घे. पहिला साधा असेल तर दुसराही तसा असतो.

**ग्लॅकॉन** : मला हे समजले नाही.

**सॉक्रेटिस** : 'अधिक मोठे' या संज्ञेमध्ये अन्य वस्तूचा निर्देश अंतर्भूत असतो. कळले ?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : या संज्ञेपासून 'अधिक कमी' या संज्ञेचा बोध होतो ना?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : म्हणजेच 'अधिक मोठे' ही संज्ञा 'अधिक कमी' संज्ञा निर्देशित करते.

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : ज्याप्रमाणे 'अधिक मोठे' ही संज्ञा 'अधिक कमी' चा निर्देश करते, त्याचप्रमाणे 'पुढे मोठे होणारे', 'पुढे कमी होणारे' अशा संज्ञांचाही निर्देश करते ना?

**ग्लॅकॉन** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : हीच भूमिका 'अधिक', 'कमी', 'दुप्पट', 'अर्धा' अशा सर्व संख्यावाचक शब्दांना लागू पडते ना? तशीच ती अधिक जड, हलके, हळू, थंड, उष्ण यांसारख्या विशेषणांनाही लागू पडत नाही का?

**ग्लॅकॉन** : खात्रीने लागू पडते.

**सॉक्रेटिस** : विज्ञानाच्या विविध ज्ञानशाखांबद्दल काय भूमिका घेता येईल? ही भूमिका तिथेही मुक्त ठरत नाही का? शुद्ध ज्ञान हे ज्ञानगम्य विषयाचे, ज्ञेय विषयाचे असते. विशिष्ट शास्त्राचा विषयही विशिष्टच असतो. उदा. स्थापत्यशास्त्र जेव्हा तयार झाले तेव्हा 'गृहबांधणीशास्त्र' म्हणून इतराहून ते भिन्न ठरून स्वतंत्र शास्त्र बनेल ना?

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : अन्य शास्त्रांत जे नाहीत पण शास्त्रात जे आहेत, अशा विशिष्ट विषयामुळेच त्याला स्वतंत्र शास्त्र हा दर्जा प्राप्त झाला ना?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : हे विशिष्टत्वही अभ्यास विषयाच्या विशिष्टत्वामुळे दिसते ना? अन्य शास्त्रे व कला यांबद्दलही हेच म्हणता येईल ना?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : तर माझ्याही बोलण्याचा हाच अर्थ आहे. अन्योन्य संबंध दाखवणाऱ्या दोन संज्ञांपैकी जर एक निरुपाधिक असेल तर दुसरीही तशी असते. जर दुसरी विशेषणयुक्त असेल तर पहिलीही असते. याचा अर्थ दोन्हीची विशेषणे सारखीच असतात असे नव्हे. आरोग्यशास्त्र निरोगी असते, रोगांचा अभ्यास करणारे शास्त्र रोगट असते, 'असत्' चा अभ्यास करणारे ते असत्-शास्त्र, 'सत्' चा अभ्यास करणारे ते सत्-शास्त्र असा माझा अभिप्राय नाही. परंतु निरुपाधिक विषयाचा अभ्यास सोडून जेव्हा एखादे शास्त्र विशिष्ट विषयाचाच अभ्यास करते तेव्हा त्याची व्याप्ती मर्यादित होते. उदा. रोगी आणि निरोगी अशा शारीरिक अवस्थांचा अभ्यास करणारे शास्त्र हे 'शास्त्र' न उरता 'आरोग्यशास्त्र' बनते.

**ग्लॅकॉन :** तुझी भूमिका समजली आणि ते सत्य आहे.

**सॉक्रेटिस :** आता जरा तृषेचा पुन्हा विचार करू. तृषा मान्य केली तर तिच्याशी सापेक्ष अशी वस्तू नसते का ?

**ग्लॅकॉन :** 'पेय' ही ती वस्तू होय, असे मला वाटते.

**सॉक्रेटिस :** पण विशिष्ट पेयाची तहान ही विशिष्ट स्वरूपाची असते. निरुपाधिक तृषा ही कमी-अधिक, चांगल्या-वाईट अशा पेयांची नसते. म्हणजेच विशिष्ट पेयाऐवजी ती फक्त पेयाची तृषा असते.

**ग्लॅकॉन :** समजले.

**सॉक्रेटिस :** जर माणसाला तहान लागली तर ती शांत होईपर्यंत पिण्याव्यतिरिक्त अन्य इच्छा त्याला नसते. पिण्याचीच इच्छा वा प्रवृत्ती त्याच्यात असते.

**ग्लॅकॉन :** उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** याचा अर्थ तृषार्त व्यक्तीला पेयाकडे आकर्षित करणारे तत्त्व हे पेयापासून दूर सारणाऱ्या तत्त्वाहून भिन्न असते. त्याचे कारण एकच वस्तू, एका वेळी, एकाच संदर्भात, एकाच विषयाच्या बाबतीत दोन परस्पर विरोधी गोष्टी करू शकणार नाही, असे आपण पूर्वीच मान्य केले आहे.

**ग्लॅकॉन :** हो. ते अशक्य आहे.

**सॉक्रेटिस :** धनुर्धारी व्यक्ती एकाच वेळी धनुष्य जवळही करते आणि दूरही सारते असे मात्र आपण म्हणू शकणार नाही. त्याचे कारण तो एका हाताने ते दूर सारीत असतो पण दुसऱ्या हाताने जवळ ओढीत असतो.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** तहान लागलेली असूनही काही वेळा माणसाला पिण्याचीं इच्छा नसते, खरे ना !

**ग्लॅकॉन :** हो. बऱ्याच व्यक्तींच्या बाबतीत असे घडते.

**सॉक्रेटिस :** या संदर्भात आपण असे म्हणू शकू की त्याच्या आत्म्यातील एक तत्त्व त्यांना पिण्याचा आदेश देते, तर आत्म्यातील दुसरे बलवान तत्त्व पिण्यापासून परावृत्त करते.

**ग्लॅकॉन :** हो. मलाही तसे वाटते.

**सॉक्रेटिस :** सुखापासून परावृत्त करणारी शक्ती ही सद्सद्विवेकातून स्फुरत नाही का ? उलट माणसाला सुखोपभोगास प्रवृत्त करणाऱ्या शक्ती मानसिक विकार, विकृती यांमधून निर्माण होतात ना ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** मग ही दोन तत्त्वे परस्परभिन्न आहेत असे सप्रमाण मानता येईल. त्याचप्रमाणे ज्या आंतरिक तत्त्वाच्या सहाय्याने विचार, वाद करता येतो, त्या तत्त्वास 'विवेक तत्त्व' म्हणता येईल. तसेच ज्या तत्त्वाच्या प्रभावामुळे क्षुधा, तृषा, प्रेम इ. वासना अनुभवता येतात त्याला 'अविवेकी तत्त्व' किंवा 'उपभोग तत्त्व' म्हणता येईल. कारण हे तत्त्व सुखासीनता, चैन यांच्याशी संलग्न असते.

**ग्लॅकॉन :** ठीक. अशी दोन तत्त्वे मानण्यास हरकत नाही.

**सॉक्रेटिस :** अशी दोन तत्त्वे आत्म्यात असतात हे आपण सिद्ध केले. आता ज्या तत्त्वामुळे आपणांस राग येतो असे 'तेजस्विता तत्त्व' तिसरे व विभिन्न स्वरूपाचे असते का ? वरीलपैकी कोणत्या तत्त्वाशी ते अधिक जवळचे असते ?

**ग्लॅकॉन :** बहुतेक उपभोग तत्त्वाच्या.

**सॉक्रेटिस :** आता मी एक ऐकलेली गोष्ट सांगतो, जिच्यावर माझा विश्वास आहे. एके दिवशी, एग्लियानचा पुत्र लिओनशिअस पिरिअसकडून येत होता. 'तेव्हा उत्तरेकडच्या भिंतीजवळ त्याला काही मृत शरीरे व त्यांच्याजवळ एक मांग उभा असलेला दिसला. त्यांच्याकडे पाहण्याची त्याला तीव्र इच्छा झाली, परंतु अशा विचाराचा खेद वाटून त्याने आपले मन दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न केला. काही वेळ डोळे घट्ट मिटून घेऊन तिकडे न बघण्याचाही प्रयत्न केला. पण त्याला वरील दृश्य पाहण्याची आपली इच्छा आवरता आली नाही. शेवटी डोळे उघडून त्या दृश्याकडे तो धावत गेला आणि स्वतःशीच म्हणाला, "दुष्ट डोळ्यांनो ! घ्या ! ह्या सुंदर दृश्याकडे बघून आपल्या नेत्रांचे पारणे फेडून घ्या !"

**ग्लॅकॉन :** मी पण ही गोष्ट ऐकली आहे.

**सॉक्रेटिस :** वरील गोष्टीवरून असे म्हणता येईल की, ही दोन स्वतंत्र तत्त्वे असून राग काही वेळा इच्छांच्या विरुद्ध युद्ध पुकारतो.

**ग्लॅकॉन :** असे म्हणता येईल खरे !

**सॉक्रेटिस :** जेव्हा विवेकाच्या आज्ञांचे उल्लंघन करून, विकारांचे प्राबल्य होते तेव्हा मनुष्य स्वतःची निंदा करतो. विकारांच्या अशा अत्याचारामुळेच क्षुब्ध होऊन, अशा युद्धांमध्ये त्याच्या ठिकाणी असलेले तेजस्विता तत्त्व विवेकाच्या बाजूकडे जाते. असा प्रकार आपणांस इतरत्रही दिसून येत नाही काय ? पण जेव्हा बुद्धीची आज्ञा असते की, विकारांनी तिच्याविरुद्ध जाऊ नये तेव्हा तेजस्विता विकारांशी सख्य करते. मला वाटते अशी स्थिती तुम्ही अनुभवलेली नसेल आणि पाहिलीही नसेल.

**ग्लॅकॉन :** नाही. अशी स्थिती मी पाहिलेली नाही.

**सॉक्रेटिस :** जेव्हा एखादी व्यक्ती आपण चुकलो आहोत असे मान्य करते तेव्हा ती उदात्त स्वभावाची असते. त्यामुळेच त्याला भोगावी लागणारी क्षुधा, थंडी अथवा इतर दुःखे यांच्याबद्दल कमी राग वाटतो. कारण केलेली शिक्षा न्याय्य आहे असा उदात्त स्वभावाच्या व्यक्तीचा विश्वास असल्यामुळे शिक्षा करणाऱ्या व्यक्तीचा सूड घेण्याचा विचार त्याच्या मनात येत नाही.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** पण ह्याउलट आपल्याला अन्यायाने वागविण्यात आले आहे असे वाटते तेव्हा चिडून, रागावून त्या व्यक्तीला जी बाजू न्यायाची वाटते तिकडे ती वळतेच ना ? तसेच न्याय मिळेपर्यंत भूक, तहान व इतर दुःखे तो मुकाट्याने सोसतो ना ? असा मनुष्य जिंकेपर्यंत किंवा मरेपर्यंत, धनगर ज्याप्रमाणे आपल्या कुत्र्याला बोलावून आणतो, त्याप्रमाणे त्याच्या विवेकाचे समाधान होईपर्यंत आपल्या उदात्त ध्येयापासून परावृत्त होतो काय ?

**ग्लॅकॉन :** वरील दृष्टान्त अगदी योग्य आहे. म्हणूनच आपल्या राज्यातील सहायकांना (कुत्र्यांना) राज्यकर्त्यांच्या (धनगराच्या) ताब्यात ठेवले आहे.

**सॉक्रेटिस :** माझे म्हणणे तुला बरोबर समजले आहे. आता माझे दुसरे निरीक्षणही तुम्ही जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

**ग्लॅकॉन :** ते कोणते ?

**सॉक्रेटिस :** आताच आपण तेजस्विता तत्त्वाविषयी प्रकट केलेले मत बरोबर उलटे झाले आहे. पूर्वी आपणांस वाटले की, विषयोपभोगी असा त्याचा स्वभाव आहे. पण आता आपण असे म्हणतो की, आत्म्यामध्ये होणाऱ्या लढाईत बुद्धिवादाच्या तत्त्वाकडेच तेजस्विता तत्त्वाचा ओढा असतो.

**ग्लॅकॉन :** नक्कीच !

**सॉक्रेटिस :** असे असेल तर मग तेजस्विता तत्त्व विवेचक तत्त्वापासून भिन्न आहे काय ? की ते ह्या तत्त्वाचाच थोडाफार फरक आहे, आणि त्यामुळे आत्म्यामध्ये तीनऐवजी दोनच—म्हणजे बुद्धीचे व विषयोपभोगाचे—तत्त्वे राहतात काय ? किंवा आपणांस असे म्हणता येईल का की, ज्याप्रमाणे शेतकरी, सहायक व मुत्सद्दी अशा तीन वर्गांवर राज्य उभारलेले असते, त्याचप्रमाणे आत्म्यामध्येसुद्धा तेजस्विता हे तिसरे तत्त्व असून, ते जर शुद्ध स्वरूपात असेल—भ्रष्ट झालेले नसेल—तर ते विवेचक तत्त्वाला मदत करते.

**ग्लॅकॉन :** होय, ते तिसरे तत्त्व मानले पाहिजे.

**सॉक्रेटिस :** जर तेजस्विता तत्त्व, विषयोपभोगी तत्त्वाप्रमाणेच विवेचक तत्त्वापासूनही भिन्न आहे असे ठरले, तर ते तिसरे तत्त्व होय.

**ग्लॉकॉन** : आणि ते सिद्ध करणे सहज शक्य आहे. कारण लहान मुलांतसुद्धा असे आढळून येते की, जन्मापासूनच त्यांच्यामध्ये तेजस्विता असते. पण विवेचक तत्त्व हे त्यांच्यामधील काहीजणांना पुष्कळ वर्षांनी संपादन करता येते तर काहीजणांना कधीच करता येत नाही.

**सॉक्रेटिस** : वा ! तुम्ही छान बोललात. हिंस्र पशूंमध्येसुद्धा तुम्ही म्हणता तशी तेजस्विता दिसून येते. पूर्वी आपण होमरच्या काव्यातून उद्धृत केलेला उतारा याला पुष्टी देणारा आहे.[1] "त्याने आपल्या छातीवर हात मारून घेऊन, आत्म्याची निर्भर्त्सना केली." ह्या ओळीमध्ये कृत्याचा चांगलेपणा अथवा वाईटपणा ठरविणारे तत्त्व, अविचाराने शोक करणाऱ्या तत्त्वाची निर्भर्त्सना करीत आहे असे होमरने दाखवून दोन्ही तत्त्वांत फरक केला आहे.

**ग्लॉकॉन** : बरोबर.

□ □

[1] Odyssey XX 17.

# प्रकरण चौदा
## व्यक्तीमधील सद्‌गुण

**[IV-441-C—445-B]**

**कथासूत्र :**

[जसे प्लेटोने सामाजिक वर्ग, त्यांची कार्ये आणि त्यांचे सद्‌गुण यांच्या विवेचनाधारे सामाजिक न्यायाचे स्वरूप विशद केले त्याप्रमाणेच त्याने व्यक्तिमत्वाचे विभाग, त्यांची कार्ये आणि सद्‌गुण विशद केले आहेत. म्हणजेच व्यक्ती व समाज यांच्यातील **समांतरता** हा प्लेटोच्या विवेचनाचा आधार आहे.

प्लेटोच्या मते आत्मसंयम, धैर्य आणि ज्ञान हे अनुक्रमे वासना, अस्मिता आणि सद्‌गुण यांचे विचार होत. व्यक्ती म्हणजे समाजाचे अंशस्वरूप होय. आत्मसंयमामुळे वासना विकारावर ताबा राहून व्यक्तीच्या अंतर्गत जीवनात सुसंवाद निर्माण होतो आणि स्वेच्छाचारी, अतिरेकी उपभोगाऐवजी जीवनाचा समतोल आणि शिस्त यांना बाधा न आणणारे सुख व्यक्ती संपादन करते. अस्मितेमुळे व्यक्तीच्या मनात दुर्गुण आणि पाप यांचे भय निर्माण होते. तसेच नीती, न्याय आणि सद्‌गुण यांच्यात निर्भय पालनाची श्रद्धा निर्माण होते. ज्ञानदृष्टीमुळे विचाराला सम्यक् कल्याणाची दिशा प्राप्त होते. असा सुसंवाद ज्या व्यक्तीच्या जीवनात निर्माण होतो ती व्यक्तीच न्यायी, सुखी आणि समर्थ बनते.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** बरेच वेळा गटांगळ्या खात, मोठ्या चिकाटीने आपण आता किनारा गाठला आहे. राज्यात ज्याप्रमाणे वर्ग असतात त्याप्रमाणेच व संख्येनेही तितकेच वर्ग आत्म्यामध्ये असतात असे आपण सर्वांच्या संमतीने ठरविले आहे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** यावरून ज्याप्रमाणे व ज्या कारणाने राष्ट्र शहाणे असते, त्याप्रमाणे व त्या कारणाने व्यक्तीही शहाणी असते असा निष्कर्ष काढता येईल. माझे म्हणणे बरोबर आहे ना ?

**ग्लॅकॉन :** अगदी निश्चितपणे.

**सॉक्रेटिस :** ज्याप्रमाणे आणि ज्यामुळे व्यक्ती शूर असते, त्याप्रमाणे व त्यामुळे राज्यसुद्धा शूर असते आणि सद्‌गुणाला पोषक असे जे एकामध्ये असते ते दुसऱ्यामध्येही असते.

**ग्लॅकॉन :** नक्कीच !

**सॉक्रेटिस :** तर मग ग्लॅकॉन, आपणांस असेही म्हणता येईल की, ज्याप्रमाणे राज्य न्यायीपणाचे आढळून आले त्याचप्रमाणे मनुष्यही न्यायी असतो.

**ग्लॅकॉन :** असा निष्कर्ष स्वाभाविकच आहे.

**सॉक्रेटिस :** राज्यातील तीनही वर्ग आपापली कामे करीत असतात, म्हणूनच राज्य न्यायी असते, हे तत्त्व आपण लक्षात ठेवले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की, जर माणसाच्या स्वाभाविक शक्ती त्यांना योग्य असलेली कामे करीत असतील, तर असा मनुष्य न्यायी व आपले ठरलेले काम करणारा होईल.

**ग्लॅकॉन :** अर्थातच !

**सॉक्रेटिस :** तर मग, ज्याअर्थी, विवेचक तत्त्व शहाणे असून, त्याला सर्व आत्म्याची काळजी घ्यावी लागते ; त्याअर्थी, त्याचे कार्य अधिकार गाजविण्याचे नाही काय ? आणि तेजस्विता तत्त्वाने त्याच्याशी सहकार्य करून त्याचे नोकर असणे योग्य नाही काय ?

**ग्लॅकॉन :** होय. नक्कीच !

**सॉक्रेटिस :** कला आणि आरोग्यशास्त्र यांच्या मिश्रणाने ह्या दोन तत्त्वांमध्ये ऐक्य निर्माण करता येणार नाही काय ? उच्च विचारांच्या आणि शास्त्रीय शिक्षणाच्या मदतीने एका तत्त्वाला उच्च वातावरणात नेऊन, दुसऱ्या तत्त्वाला शांतपणाने उपदेश करून त्यातील रानटीपणा काढून टाकून, संगीत व आरोग्यशास्त्र यांना त्यामध्ये ऐक्य निर्माण करता येईल.

**ग्लॅकॉन :** होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** ही दोन तत्त्वे अशा प्रकारे तयार करण्यात आल्यामुळे व आपले काम कसे करावयाचे ह्याचे योग्य शिक्षण मिळाल्यामुळे, विषयोपभोगाच्या तत्त्वावर ती ताबा ठेवू शकतील. विषयोपभोगाचे तत्त्व प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यात मोठी जागा बळकावून असून, ते स्वभावतःच अतृप्त व अत्यंत लोभी असते. वरील दोन तत्त्वांनी या तत्त्वावर योग्य नजर ठेवली तर शारीरिक सुखोपभोगांनी धष्टपुष्ट होऊन, आपले योग्य काम करण्याचे तो नाकारणार नाही. तसेच ज्या प्रांतावर (वर्गावर) अमल चालविण्याचा त्याला अधिकार नाही, अशांवर अधिकार मिळविण्याची इच्छा धरून, सर्व लोकांचे आयुष्य संपूर्णतया बदलून टाकणेही या तत्त्वाला शक्य होणार नाही.

**ग्लॅकॉन :** वरील तत्त्वे अशी नजर नक्कीच ठेवू शकतील.

**सॉक्रेटिस** : आत्मा व शरीर यांचे बाहेरच्या शत्रूंपासून संरक्षण करण्यास हीच दोन तत्त्वे उपयोगी ठरणार नाहीत काय? त्यातील एक तत्त्व योग्य मार्गदर्शन करील व दुसरे तत्त्व सत्ताधिकाऱ्याच्या आज्ञेप्रमाणे मोठ्या शौर्याने लढण्याचे काम करील.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : व्यक्तीमध्ये जे तेजस्विता तत्त्व असते ते जेव्हा, सुखदुःखाच्या प्रसंगी, 'कशाला भ्यावे व कशाला भिऊ नये' याविषयी विवेकबुद्धीने केलेल्या आज्ञा एकनिष्ठेने पार पाडते, तेव्हाच त्या व्यक्तीला आपण शूर म्हणतो.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : ज्या अधिकारयुक्त अशा लहान भागातून त्याला या आज्ञा मिळत असतात व ज्या भागाला ह्या तीन तत्त्वांवर उभारलेल्या व्यक्तीचे व त्यातील प्रत्येक तत्त्वाचे हित कशात आहे याचे ज्ञान असते त्या भागाच्या सामर्थ्यावरच आपण व्यक्तीला शहाणी समजतो.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : शिवाय, ज्या दोन तत्त्वांवर विवेकबुद्धीचा अधिकार असतो, ती तत्त्वे विवेकबुद्धीला योग्य अधिकारी समजून, जेव्हा तिच्या अधिकाराला विरोध करीत नाहीत तेव्हा ह्या तत्त्वांमध्ये एकजूट व सामंजस्य असते. अशा व्यक्तीलाच आपण विवेकी म्हणतो ना?

**ग्लॅकॉन** : अर्थात. राज्यामध्ये वा व्यक्तीमध्ये असलेल्या विवेकाचा दुसरा अर्थ शक्यच नाही.

**सॉक्रेटिस** : आपण वरचेवर वर्णन केलेल्या साधनांनी व मार्गांनीच मनुष्य न्यायी होईल ना?

**ग्लॅकॉन** : निःसंशय!

**सॉक्रेटिस** : आपल्या न्यायाच्या कल्पनेत तुम्हाला असा काही अस्पष्टपणा जाणवतो काय की ज्यामुळे राज्यातील न्यायतत्त्व व व्यक्तीतील न्यायतत्त्व भिन्न मानावे लागेल?

**ग्लॅकॉन** : मला असे जाणवत नाही.

**सॉक्रेटिस** : तुमच्या मनात काही शंका असेल तर सामान्य उदाहरणे घेऊन त्या दूर करता येतील व आपले मत निश्चित करता येईल.

**ग्लॅकॉन** : कोणती उदाहरणे?

**सॉक्रेटिस** : समजा, काही रक्कम, न्यायी राज्य आणि स्वभावाने व शिक्षणाने न्यायी बनलेली व्यक्ती यांच्या हवाली केली तर ते तिचा अपहार करतील अशी कोणी कल्पना करील का?

**ग्लॅकॉन** : नाही.

**सॉक्रेटिस** : धर्मादायाची चोरी अथवा साधी चोरी, मित्रांचा विश्वासघात अथवा देशद्रोह, असा मनुष्य करील असे कोणास वाटेल काय ?

**ग्लॅकॉन** : नाही.

**सॉक्रेटिस** : तसेच शपथा व करार झालेल्या व्यवहारांमध्ये तो गैरविश्वासूपणा कधीच दाखविणार नाही.

**ग्लॅकॉन** : नक्कीच !

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे जारकर्म अथवा आईवडिलांविषयी अनादर, देवांच्या पूजेबद्दल अनास्था या बाबतीतही तो दोषार्ह असणार नाही.

**ग्लॅकॉन** : अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस** : या सर्वांचे कारण म्हणजे, त्याच्यामधील अंतस्थ तत्त्वे ही अनुशासित व अधिकारी या नात्याने आपापली कामे करीत असतात.

**ग्लॅकॉन** : होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : अशा व्यक्ती व अशी राज्ये निर्माण करण्याची, न्याय ही एक शक्ती आहे. यापेक्षा न्यायाबद्दल दुसरे काही स्पष्टीकरण आवश्यक आहे काय ?

**ग्लॅकॉन** : नाही. अजिबात नाही.

**सॉक्रेटिस** : तर मग आपले स्वप्न खरे झाले किंवा आपण राज्य उभारण्याच्या कामास सुरुवात करण्याच्या वेळेपासून, काहीतरी दैवी संकेताने न्यायाच्या मूल स्वरूपाकडे ओढले जात आहोत, असा जो भास होत होता तो खरा ठरला.

**ग्लॅकॉन** : होय, खरे आहे.

**सॉक्रेटिस** : ज्या व्यक्तीला निसर्गाने पादत्राणे तयार करण्याच्या कामाकरिता निर्माण केले तिने त्याच धंद्याला चिकटून रहावे, आणि जिचा सुतारकामाकडे ओढा अधिक आहे त्या व्यक्तीने सुतारकीचेच काम करावे या तत्त्वामध्ये खरोखरच न्यायाची प्राथमिक उपयुक्तता व स्वरूप दिसून येते.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : न्यायाचे जरी वरील उदाहरणांशी साम्य असले तरी न्यायाचा बाहचकृतीऐवजी अंतःप्रवृत्तीशीच संबंध असतो. म्हणून न्यायी मनुष्य, स्वतःमध्ये असलेल्या निरनिराळ्या तत्त्वांना त्यांचे नैसर्गिक कामच करावयास लावतो. तसेच आत्म्याच्या निरनिराळ्या वर्गांना एकमेकांशी विरोध करू देत नाही. उलट स्वतःच्या मनावर ताबा ठेवून, ज्याप्रमाणे उच्च, मध्यम, कनिष्ठ व यांच्यामधील इतर स्वर या सर्वांमध्ये संगती आणली जाते, त्याप्रमाणे वरील तीन तत्त्वांमध्ये संगती घडवून आणून, शांत व सुव्यवस्थित आयुष्य घडवील. अशा तऱ्हेने या तत्त्वांची एकवाक्यता करून, स्वतःचा स्वभाव संयमी व सुव्यवस्थित बनवून त्याला जे काम दिले असेल ते तो करील. द्रव्यार्जन, शरीरसंरक्षण, राजकारण अथवा अन्य काही खाजगी काम करीत असताना त्याचा असा दृढविश्वास असेल

की, जे वरीलप्रमाणे मनाला एकसंधपणाची सवय लावते, तेच न्याय्य व योग्य कृत्य होय व अशा कृत्याचे अधिष्ठान असणारे ज्ञान हेच ‘ खरे ज्ञान ’ होय व ज्यामुळे ही सवय कमी केली जाते ते कृत्य अन्याय्य असून अशा कृत्याचे अधिष्ठान असणारे ज्ञान हे ‘ अज्ञान ’ होय.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे मला मान्य आहे.

**सॉक्रेटिस** : यावरून आता आपल्याला असे म्हणता येईल की, न्यायी मनुष्य आणि न्यायी राज्य या दोघांमध्ये आढळणाऱ्या न्यायाचे आपण संशोधन केले आहे हे म्हणणे सर्वस्वी खोटे आहे असे समजले जाणार नाही.

**ग्लॅकॉन** : नक्कीच !

**सॉक्रेटिस** : मग आता आपण असे समजावे ना ?

**ग्लॅकॉन** : होय. जरूर.

**सॉक्रेटिस** : ठीक. आता आपल्याला अन्यायाचे संशोधन करावयाचे आहे.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : वरील तीन तत्त्वांमध्ये संघर्ष असणे, दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ व अडथळा निर्माण करण्याची इच्छा असणे, तसेच ज्या भागाने सेवा करावयाची त्याने आपली योग्यता व अधिकार नसताना आत्म्याविरुद्ध बंड उभारून अधिकाराचे स्थान मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणे म्हणजेच अन्याय होईल ना ? अशा प्रकारे गोंधळ व अव्यवस्था असली म्हणजे अन्याय, बदफैलीपणा, भ्याडपणा, मूर्खपणा. थोडक्यात म्हणजे सर्व दुर्गुणांचे साम्राज्य पसरते.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : न्याय व अन्याय यांचे स्वरूप आपल्याला माहीत झाले आहे. त्यावरूनच अन्याय्य वागणूक व न्याय्य वागणूक यांचेही ज्ञान आपणांस झाले आहे असे म्हणता येईल. आत्म्यामधील हे प्रकार शरीरातील आरोग्य व अनारोग्य याप्रमाणे आहेत. रोगीपणा आणि निरोगीपणा या जशा शरीराच्या अवस्था तसे आत्म्याचे वरील प्रकार होत.

**ग्लॅकॉन** : आपणांस काय म्हणावयाचे आहे ?

**सॉक्रेटिस** : आरोग्याच्या स्थितीत शरीर रोगमुक्त असते आणि रोगीपणामुळे शरीरात रोग उत्पन्न होतो.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे न्यायाने वागण्याची पद्धत न्यायाची सवय लावते व अन्यायाने वागण्याची पद्धत अन्यायाची सवय लावते.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस :** आरोग्य निर्माण करणे म्हणजे शरीरातील शक्ती नैसर्गिक रीत्या एकमेकांवर वचक ठेवतील किंवा एकमेकांच्या ताब्यात राहतील असे करणे. रोग वाढविणे म्हणजे निसर्ग नियमाविरुद्ध शारीरिक शक्तींना प्रबल होऊ देणे.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** त्याचप्रमाणे न्याय उत्पन्न करणे म्हणजे आत्म्यातील शक्तींना आदर्श स्वभावानुसार परस्पर पूरक बनविणे आणि अन्याय निर्माण करणे म्हणजे आदर्श स्वभावाविरुद्ध आत्म्यातील शक्तींना प्रबल होऊ देणे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** यावरून असे दिसून येईल, सद्‌गुण म्हणजे आत्म्याचे आरोग्य, सौंदर्य व सुस्थिती होय आणि दुर्गुण म्हणजे रोग, कुरूपता व दुःस्थिती होय.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** मनुष्य सद्‌गुणाने आपले आयुष्य प्रतिष्ठित किंवा दुर्गुणाने अप्रतिष्ठित बनवितो.

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** न्यायाने वागणे आणि अन्यायाने वागणे यांतील फायदेशीर कोणते या प्रश्नांचा आता आपल्याला विचार करावयाचा आहे. न्यायीपणाविषयी प्रसिद्धी असली किंवा नसली तरी मनुष्याने न्यायीपणाने वागणे व उदात्त ध्येयाचे पालन करणे फायद्याचे आहे काय ? का शिक्षा चुकवून व शिक्षेमुळे होणारा परिणाम टाळून मनुष्याने अन्यायाने वागणे फायदेशीर आहे ?

**ग्लॅकॉन :** न्याय व अन्याय यांचे खरे स्वरूप माहीत झाले असता वरील प्रकारचा प्रश्न विचारणे माझ्या दृष्टीने हास्यास्पद आहें. मनुष्याचे आरोग्य ठीक नसेल तर सर्व प्रकारच्या चैनी, संपत्ती आणि सत्ता जरी त्याला मिळाली तरी त्याला जगण्यात अर्थ वाटणार नाही. ज्या तत्त्वावर आपण जगतो ते तत्त्व समूळ नाश पावत असताना जगण्यात अर्थ आहे असे कोणी म्हटले तर त्यावर आपण विश्वास ठेवाल काय ? मनुष्याला जोपर्यंत आपल्या इच्छेप्रमाणे जगता येते आणि दुर्गुण व अन्याय यांचेपासून मुक्त होऊन तो सद्‌गुण व न्याय संपादन करतो तोपर्यंतच जगण्यात सार्थकता असते.

**सॉक्रेटिस :** होय.

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ... 
३९८६
ग्रं. ५५९७८६
ठाणे (स्थळ ग्रं.)

# प्रकरण पंधरा
# स्त्रियांचे समान हक्क

**[IV-445-B—V-457-B]**

**कथासूत्र :**

[आदर्श राज्यामध्ये विवाह आणि कुटुंबसंस्थेचे स्थान, भवितव्य आणि कार्य काय ? या महत्त्वाच्या प्रश्नांची मीमांसा प्लेटोने केली आहे. त्याने आपल्या प्रशासक राज्यकर्त्यांना सर्वसत्ताधारी बनवले असले, तरी विवाह, कुटुंब आणि संपत्ती या संदर्भातले कोणतेही खासगी मालमत्तेविषयीचे हक्क त्यांना दिले नाहीत. त्यांनी खरेखुरे साम्यवादी किंवा साम्ययोगात्मक जीवन जगावे अशी त्याची अपेक्षा आहे.

स्त्री व पुरुष यांमध्ये असणारा नैसर्गिक लिंगभेद लक्षात न घेता जर तिच्या अंगी आवश्यक ती पात्रता असेल, तर तिला प्रशासन, संरक्षण आणि उत्पादन या सर्व क्षेत्रांत पुरुषाच्या बरोबरीने पुरुषाइतकेच समान हक्क व समान संधी मिळाली पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. ज्या काळात अथेन्सच्या शहर राज्यामध्ये स्त्रियांना कोणताही सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा नव्हती, त्या काळात प्लेटोने मांडलेले स्त्री-पुरुष समानतेचे हे तत्त्व निःसंशय क्रांतिकारक स्वरूपाचे म्हटले पाहिजे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** आतापर्यंत आपण केलेल्या चर्चेवरून निश्चित स्वरूपाच्या निर्णयाप्रत येऊन पोहोचलो आहोत, त्यामुळे आता आपण प्रयत्नांत कसूर करून चालणार नाही.

**ग्लॅकॉन :** होय. आपण जोरात प्रयत्न केले पाहिजेत.

**सॉक्रेटिस :** माझ्या मते जे दुर्गुणांचे प्रकार संशोधनास योग्य आहेत त्यांचाच विचार करावयास तुम्ही माझ्याबरोबर या.

**ग्लॅकॉन :** मी तुमच्याबरोबर येत आहेच. मला फक्त प्रकारांची नावे सांगा.

**सॉक्रेटिस :** आता आपण वादाच्या शेवटच्या पायरीवर चढलो आहोत, त्यामुळे शिखरावरून निरीक्षण करणाऱ्या माणसाप्रमाणे मला असे दिसते की, सद्गुणाचा जरी एकच प्रकार असला तरी दुर्गुणांचे असंख्य प्रकार असून त्यातील चारांचाच निर्देश करणे योग्य होईल.

**ग्लॅकॉन :** तुम्हांला काय म्हणावयाचे आहे ?

**सॉक्रेटिस** : राज्यकारभाराच्या विशिष्ट प्रकारांप्रमाणेच आत्म्याचेही विशिष्ट प्रकार आहेत.

**ग्लॅकॉन** : किती आहेत ?

**सॉक्रेटिस** : प्रत्येकाचे पाच प्रकार आहेत.

**ग्लॅकॉन** : ते कोणते ?

**सॉक्रेटिस** : आपण जे वर्णन करीत आहोत तो एक प्रकार असून त्यालाच दोन नावे आहेत. राज्याधिकारी मंडळात जर एक मनुष्य श्रेष्ठ असेल, तर त्याला राजा असलेले राज्य म्हणतात, आणि सारख्याच योग्यतेचे अनेक लोक असले, तर त्याला उत्तम लोकांचे राज्य म्हणतात.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : याला मी एकच प्रकार मानतो ; कारण श्रेष्ठ सत्ता एका अथवा अनेक लोकांच्या हातात असली तरीसुद्धा जर अशा लोकांचे शिक्षण आपण वर्णिल्याप्रमाणे झाले असले तर राज्यातील महत्त्वाच्या कायद्यांचे परिवर्तन होणार नाही.

**ग्लॅकॉन** : होय. अशी आशा करण्यास हरकत नाही.

**सॉक्रेटिस** : अशा प्रकारची घटना अथवा राज्य मी चांगले म्हणतो आणि चांगला मनुष्यही असाच असतो. ही घटना जर योग्य म्हटली तर बाकीच्यांना वाईट व अयोग्य म्हणता येईल. राज्याच्या घटनेला व व्यक्तीच्या स्वभावाला या संज्ञा वापरल्या म्हणजे दुष्ट राज्यव्यवस्थांचे व दुर्गुणांचे चार प्रकार होतात.

**ग्लॅकॉन** : ते कोणते ?

यानंतर माझ्या मते हे प्रकार एकातून दुसरे कसे तयार होतात हे सांगण्यास मी सुरुवात करणार होतो, परंतु तेवढ्यात अॅडिमँट्सपासून जरा दूर अंतरावर बसलेल्या पोलेमार्क्सने त्याच्या अंगरख्याला धरून आपल्याजवळ ओढले आणि पुढे वाकून त्याच्या कानात काहीतरी सांगितले. त्यातील पुढील भागच मला ऐकावयास आला. " आपण काय करावे, त्याला तसेच जाऊ द्यावे काय ? " त्यावर अॅडिमँट्स मोठ्याने म्हणाला, " अर्थातच नाही. " त्यावर मी म्हणालो, " कोणाला जाऊ न देण्याविषयी तुम्ही बोलत आहात ? "

**अॅडिमँट्स** : तुम्हांला आम्ही जाऊ देणार नाही.

**सॉक्रेटिस** : का ?

**अॅडिमँट्स** : आमचा असा समज झालेला आहे की, अत्यंत महत्त्वाचा भाग तुम्ही लपवून ठेवत आहात आणि त्याचे स्पष्टीकरण करण्याचे टाळत आहात. " मित्रामित्रांमधील सर्व वस्तू समान असतात " या म्हणीनुसार वरील विषयाचा ओझरता निर्देश करून पुढच्या विवेचनास सुरुवात केल्याची गोष्ट आमच्या ध्यानात आलेली नसेल अशी तुमची कल्पना झालेली दिसते.

**सॉक्रेटिस** : माझे हे म्हणणे योग्य नाही काय ?

**ॲडिमँट्स** : होय. परंतु इतर शब्दांप्रमाणे ' योग्य ' ह्या शब्दाचे स्पष्टीकरण करणे जरूर आहे. अनेक योजनांपैकी कोणत्या योजनेनुसार सार्वजनिक मालमत्तेची कल्पना अमलात आणावयाची हे तुम्ही स्पष्ट केले पाहिजे. ते तुम्ही टाळू नका. प्रजोत्पादन कोणत्या परिस्थितीत करावे, मुलांचा जन्म झाल्यावर त्यांची जोपासना कशी करावी आणि स्त्रिया व मुले यांच्यावर सार्वजनिक हक्क कसा असावा याविषयी तुम्ही सविस्तर स्पष्टीकरण कराल याची आम्ही वाट बघत होतो. आमचे मत असे आहे की, ही योजना ज्या पद्धतीने कार्यवाहीत आणली जाईल त्या पद्धतीच्या बरेवाईटपणावरच राज्याचे महत्त्व ठरेल. हे मुद्दे निश्चित करायचे सोडून तुम्ही राज्यघटनेच्या दुसऱ्या एका प्रकाराचे विवेचन करू लागल्याचे आढळून आले, तेव्हाच आम्ही असा निश्चय केला की, इतर प्रश्नांप्रमाणे या प्रश्नावरही चर्चा केल्याशिवाय तुम्हांला सोडावयाचे नाही.

**ग्लॅकॉन** : माझी ह्या म्हणण्याला पूर्ण अनुमती आहे.

**थ्रॅसिमॅकस** : तुम्ही असे समजायला हरकत नाही की, आमचे सर्वांचे एकमत आहे.

**सॉक्रेटिस** : माझ्यावर एकदम हल्ला करून तुम्ही काय करत आहात याची तुम्हांला कल्पना आहे का ? आपल्या आदर्श राज्याविषयी जणू काही आपण आताच चर्चा सुरू करत आहोत अशा तऱ्हेने तुम्ही हा मोठा प्रश्न उपस्थित केला आहे. याविषयीचा सांगोपांग विचार पूर्ण झाला आहे या कल्पनेने मी आनंदित झालेलो होतो. हे विषय पुन्हा उकरून काढून तुम्ही प्रश्नरूपी मधमाशांना उठवीत आहात याची तुम्हांला कल्पनाही नसेल. हा त्रास चुकविण्याकरिताच मी तो विषय तसाच सोडून दिलेला होता.

**थ्रॅसिमॅकस** : तात्त्विक विवेचन ऐकण्याऐवजी सोने कोठे सापडेल असल्या शुष्क विषयाचे विवेचन ऐकण्यास आम्ही येथे जमलो आहोत अशी तुमची समजूत आहे काय ?

**सॉक्रेटिस** : नाही. पण तात्त्विक विवेचनातसुद्धा मर्यादा पाळली पाहिजे.

**ग्लॅकॉन** : पण सूज्ञ लोकांच्या दृष्टीने सर्व आयुष्यभर तात्त्विक चर्चा करीत राहणे, हीच योग्य कालमर्यादा होय. तुम्ही आमच्याविषयी काळजी करू नका. फक्त तुम्ही दमणार नाही याची काळजी घ्या. आपल्या संरक्षकवर्गामध्ये स्त्रिया व मुले यांच्यावरील सार्वजनिक हक्काचे स्वरूप काय असावे ? जन्मापासून वयात येईपर्यंतचा लहान मुलांचा काळ हा सर्वांत अवघड असतो. त्या काळातील शिक्षण कसे असावे हे प्रश्न कोणत्या रीतीने सोडवावेत हे तुम्ही स्पष्ट करून सांगा.

**सॉक्रेटिस** : मित्रा ! या प्रश्नांची चर्चा करणे हे काम काही सोपे नाही. आपल्या पूर्वीच्या तत्त्वापेक्षाही यात अविश्वसनीय भाग बराच आहे. प्रथम असे की, आपल्या योजनांची उपयुक्तता लोकांना पटणार नाही, आणि जरी पटली तरी ती योजना योग्य आहे की नाही याबद्दल वाद उत्पन्न होईल. " कल्पनासाम्राज्यात विहार करणारा " असे मला म्हणतील या भीतीमुळे या विषयावर चर्चा करण्याचे काम मी नाईलाजानेच स्वीकारीत आहे.

**ग्लॅकॉन :** तुम्हांला तसे वाटण्याचे कारण नाही. कारण तुमचे श्रोते मूर्ख, अश्रद्धाळू किंवा वैरी नाहीत.

**सॉक्रेटिस :** मित्रांनो, तुमच्या या आश्वासनाने तुम्ही मला उत्तेजन देत आहात असेच मी समजू ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** असे असेल तर तुमची मोठी चूक होत आहे. प्रस्तुत विषयासंबंधी मला पूर्ण माहिती आहे अशी जर माझी खात्री असती तर तुमचे उत्तेजन योग्य ठरले असते, कारण विषयाचे सम्यक् ज्ञान असले, म्हणजे हुषार मित्रांच्या संगतीत अत्यंत महत्त्वाच्या व मनोरंजक विषयावर बोलणे ही गोष्ट कोणालाही धैर्याने व सुरक्षितपणाने करता येण्यासारखी असते; परंतु स्वतःच साशंक मनःस्थितीत असताना एखादी योजना प्रतिपादन करणे—माझे हसे होईल म्हणून नव्हे, कारण असे मानणे पोरकटपणाचे होईल—हा मार्ग धोक्याचा व निसरडा आहे असे मला वाटते. मला अशी भीती वाटते की, माझा सत्याचा आश्रय सुटून जाऊन ज्या पायरीवर सावधपणे पाऊल टाकावयाचे त्या पायरीवरच मी माझ्या मित्रांबरोबर कोसळून पडेन. मी जे काही म्हणणार आहे त्याबद्दल नेमिसिस देवतेने माझ्यावर कोप करू नये, अशी मी प्रार्थना करतो; कारण माझा असा विश्वास आहे की, एखाद्या मनुष्याची उदात्त, चांगल्या व न्याय्य संस्थांविषयी फसवणूक करणे यापेक्षा अप्रत्यक्षपणे एखाद्या मनुष्याच्या मृत्यूस कारणीभूत होणे हे अधिक क्षम्य आहे. अशा तऱ्हेचे धाडस मित्रांपेक्षा शत्रूच्या बाबतीत करणे चांगले म्हणून तुम्ही मला उत्तेजन दिलेत, हे ठीक झाले.

**ग्लॅकॉन :** (हसून म्हणाला) सॉक्रेटिस, जर तुमच्या प्रतिपादनापासून आमच्या जीवाला काही धक्का पोचला तर आमच्या खुनाचा आरोप तुमच्यावर येणार नाही, असे आम्ही करू. आम्हांला फसविण्याच्या आरोपापासून आम्ही तुम्हांला मुक्त करतो. तेव्हा न भीता जे बोलावयाचे आहे ते बोला.

**सॉक्रेटिस :** कायद्याचे म्हणणे असे आहे की, जेव्हा मनुष्य मुक्त करण्यात येतो, तेव्हा त्याची स्वर्गातूनही त्यापासून शुद्धी होते, आणि म्हणून बहुतकरून हचा लोकीही होते.

**ग्लॅकॉन :** वाद सुरू करण्यात तुम्हांला या भीतीची आडकाठी होणार नाही.

**सॉक्रेटिस :** आता आपल्या विषयाच्या, ज्यासंबंधी अधिक स्पष्टीकरण आवश्यक आहे, त्या भागाकडे मी वळतो. त्या दृष्टीने आताचाच क्रम योग्य आहे. पुरुषवर्गासंबंधीची चर्चा पुरी झालेली आहे, म्हणून आता स्त्रियांसंबंधीच्या चर्चेस सुरुवात करू. ज्या पुरुषांचा जन्म व शिक्षण आपण वर्णन केलेल्या पद्धतीप्रमाणे झालेले आहे त्यांनी मुले आणि स्त्रिया यांची प्राप्ती व संगोपन नैसर्गिक भावनांना अनुसरून केली पाहिजे. संरक्षकांनी जणू गुरांच्या कळपांचे संरक्षक-कुत्रे बनावे, असे आपले ध्येय आहे.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : आणि त्यानुसारच प्रजोत्पादन व मुलांचे संगोपन ह्यासंबंधी आपण नियम करू आणि ते योग्य आहेत की नाहीत ते ठरवू.

**ग्लॅकॉन** : तुम्हांला काय म्हणावयाचे आहे ?

**सॉक्रेटिस** : पहारा करणाऱ्या कुत्र्यांमधील स्त्री-जातीने कुत्र्यांच्या बरोबरीने कळपाच्या संरक्षणाची, शिकारीची व इतरही कामे केली पाहिजेत ; असे तुम्हांला वाटते का ? अथवा लहान पिलांना जन्म देऊन त्यांचे संगोपन करण्याकरिता स्त्री-जातीने घरी रहावे आणि पुरुष-जातीने श्रम करून कळपाच्या संरक्षणाची जबाबदारी घ्यावी, असे तुम्हांला वाटते ?

**ग्लॅकॉन** : जे काही करणे आवश्यक आहे त्यात स्त्री-जातीनेही भाग घ्यावा असे आम्हांला वाटते. अर्थात स्त्री-जात ही अशक्त व पुरुष-जात ही सशक्त असते असे आम्हांला वाटते.

**सॉक्रेटिस** : एकाच प्रकारचे शिक्षण दिलेले नसेल तर निरनिराळ्या प्राण्यांना एकच काम करता येईल का ?

**ग्लॅकॉन** : नाही.

**सॉक्रेटिस** : तर मग पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना काम करावयाचे असेल तर स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणेच शिक्षण दिले पाहिजे. स्त्रियांना मन आणि शरीर यांच्या वाढीकरिता पुरुषांप्रमाणेच दोन शाखांचे—व्यायाम आणि संगीत—त्याचप्रमाणे लष्करी विद्येचे शिक्षण देऊन पुरुषांप्रमाणेच वागणूक त्यांनाही मिळाली पाहिजे.

**ग्लॅकॉन** : असा निष्कर्ष आपोआपच निघतो.

**सॉक्रेटिस** : त्यातील आपल्या पुष्कळशा कल्पना जर प्रत्यक्षात आल्या तर त्या विलक्षण म्हणून हास्यास्पद वाटतील.

**ग्लॅकॉन** : हो. त्या नक्कीच तशा वाटतील.

**सॉक्रेटिस** : ज्याप्रमाणे कुरूप, वृद्ध पुरुष अंगावर सुरकुत्या पडल्या असताही व्यायामशाळेत व्यायाम करण्याची इच्छा दाखवितात, त्याचप्रमाणे केवळ तरुण स्त्रियांनीच नव्हे, तर वृद्ध स्त्रियांनीदेखील विवस्त्रपणे व्यायाम करणे ही गोष्ट सर्वांत जास्त हास्यास्पद ठरेल असे तुम्हांला वाटत नाही काय ?

**ग्लॅकॉन** : होय. आपल्या सध्याच्या कल्पनेनुसार हे नक्कीच हास्यास्पद वाटेल.

**सॉक्रेटिस** : ज्याअर्थी, आपण ह्या विषयाची चर्चा सुरू केली आहे ; त्याअर्थी, चांगल्या लोकांनी कितीही चेष्टा केली तरी आपण भीता कामा नये. विशेषतः चिलखत घालणे, घोड्यावर स्वार होणे ह्याविषयीची चेष्टा आपण मनावर घेऊन चालणार नाही, उलट आपण हा वाद सुरू केल्यामुळे त्याबरोबरीचा कायद्याचा कठोरपणाही स्वीकारला पाहिजे.

चेष्टा करणाऱ्या लोकांना त्यांची नेहमीची सवय टाकून देऊन गंभीर होण्याचा प्रयत्न करा, असे बजावले पाहिजे. आपण त्यांना याचीही आठवण करून दिली पाहिजे की, ज्याप्रमाणे हल्ली नग्नस्थितीत मनुष्याला पाहिले जाणे, हे लाजिरवाणे व हास्यास्पद समजले जाते; त्याप्रमाणे थोड्या काळापूर्वी ग्रीक लोकांच्यामध्येही समजले जात होते. प्रथम क्रीट्समध्ये आणि नंतर स्पार्टामध्ये जेव्हा व्यायाम करण्याची पद्धत सुरू झाली तेव्हा त्या वेळच्या विनोदप्रिय लोकांनी त्यांची टर उडविण्याची संधी घेतली होती. परंतु अनुभवाने जेव्हा असे सिद्ध झाले की, व्यायाम करताना शरीरावर वस्त्र असण्यापेक्षा नसणे अधिक बरे, तेव्हा या योजनेमुळे डोळ्यांना दिसणारा हास्यास्पद प्रकार बुद्धिवादाने नष्ट केला जाऊन नग्नपणाची श्रेष्ठता प्रस्थापित केली गेली. मला वाटते त्याच वेळी असेही सिद्ध झाले की, अज्ञान व दुर्गुण यांच्याखेरीज इतर सर्व गोष्टींना जो हसतो आणि जे चांगले आहे त्याविरुद्धच्या सर्व गोष्टी स्तुती करण्यास योग्य आहेत असे समजतो तो मनुष्य मूर्ख असतो.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : आपण जे नियम करणार आहोत ते व्यवहार्य आहेत किंवा नाहीत हे आपण प्रथमतः निश्चित केले पाहिजे. तसेच मानवी स्त्री-जात पुरुषवर्गाची सर्व कामे करण्यास समर्थ आहे काय किंवा वस्तुस्थितीमुळे ती काही कामे करू शकेल किंवा एकही काम करणार नाही हे शक्य आहे काय ? लष्करी काम स्त्री-जातीला करता येईल का ? अशा तऱ्हेचे प्रश्न विनोदी अथवा गंभीर, दोन्ही प्रकारच्या लोकांना विचारण्याची संधी द्यावयास हवी. "उत्तम सुरुवातीने अर्धे काम होते" ह्या न्यायानुसार, ह्या पद्धतीनुसारच सुरुवात करणे चांगले होणार नाही काय ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : ह्या चर्चेत प्रथम विरोधी पक्ष मांडून आपणच आपल्याविरुद्ध विधाने करू. विरोधी पक्षाची बाजू मांडण्यात आली नाही असे कोणी म्हणावे असे आम्हांला वाटत नाही.

**ग्लॅकॉन** : ठीक आहे.

**सॉक्रेटिस** : तर विरोधी पक्षाकडून, "ग्लॅकॉन, तुमच्या विधानाविरुद्ध बाजू मांडण्याची मुळीच जरुरी नाही, कारण राज्याच्या स्थापनेस सुरुवात करण्याच्या आरंभीच तुम्ही स्वतः असे कबूल केले आहे की, त्यातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या स्वभावास अनुरूप असे काम केले पाहिजे." "होय, आम्ही हे कबूल केले आहे." "पुरुष व स्त्री यांच्या स्वभावात मूलतःच फरक आहे." "होय, निश्चितच." "तर मग विशिष्ट स्वभावानुसार निरनिराळे काम स्त्री व पुरुष यांना देणे बरोबर नाही काय ?" "होय." "पण तुम्ही ज्याअर्थी असे म्हणता की, पुरुष व स्त्रिया यांचे स्वभाव अगदी भिन्न असूनही त्यांनी एकाच तऱ्हेची कामे करावी, त्याअर्थी तुमची विचारसरणी चुकीची असून तुम्ही स्वतःच विसंगतीचा दोष ओढवून घेत आहात." ग्लॅकॉन ह्या आक्षेपाला तुम्ही काही उत्तर देऊ शकाल काय ?

**ग्लॅकॉन** : ह्याच क्षणाला उत्तर सापडणे सोपे नाही. मी तुम्हांला एवढेच सांगू शकतो की, आपल्या बाजूचे जे मुद्दे असतील ते पुढे मांडून त्यांचीच चर्चा करावी.

**सॉक्रेटिस** : ग्लॅकॉन, हे व असेच इतर आक्षेप येतील अशी मी पूर्वीच अपेक्षा केली होती आणि म्हणूनच स्त्रिया व मुले यांच्या मालकीबाबत व मुलांच्या संगोपनाबाबत प्रचलित असलेल्या कायद्यांमध्ये मी ढवळाढवळ करण्यास नाखूष होतो.

**ग्लॅकॉन** : हे काम दिसते तितके सोपे नाही.

**सॉक्रेटिस** : खरे आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, पोहण्याकरिता असलेल्या लहान तळ्यात, तुम्ही पडलात काय किंवा सागराच्या मध्यात पडलात काय तुम्हांला पोहून गेलेच पाहिजे. एखादा डार्फियन मासा स्वतःच्या पाठीवर आपणांस घेऊन जाईल किंवा अनपेक्षित रीतीने आपली कशी तरी सुटका होईल अशी आशा करणे व्यर्थ आहे. ह्या वादातून सुरक्षितपणे बाहेर पडण्याचा प्रयत्न करणे हेच योग्य नाही काय ?

**ग्लॅकॉन** : मलाही असेच वाटते.

**सॉक्रेटिस** : चला तर मग. आपल्याला बाहेर पडण्याचा काही मार्ग दिसतो काय हे पाहून आपण असे कबूल केले आहे की, निरनिराळ्या स्वभावांना निरनिराळी कामे दिली पाहिजेत व पुरुष व स्त्रिया यांचे स्वभाव भिन्न आहेत आणि आता आपण म्हणतो की, असे भिन्न स्वभाव असूनही एकाच प्रकारची कामे त्यांनी केली पाहिजेत. ह्याच विसंगतीचा आरोप तुम्ही करीत आहात ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : खरोखरच वादविवाद कलेचा प्रभाव लोकांवर किती पडतो नाही ?

**ग्लॅकॉन** : तो कसा काय ?

**सॉक्रेटिस** : मला असे वाटते की, इच्छेविरुद्धही पुष्कळ लोक वादविवादाच्या फंदात पडतात आणि नुसती शाब्दिक लढाई करताना त्यांना वाटते की, आपण खराखुरा वादविवाद करीत आहोत. ह्याचे कारण असे की, त्यांना शब्दाच्या अर्थातील फरक कळत नसतो. कोणत्याही प्रश्नाची चर्चा सुरू झाली म्हणजे जे काही पुढे मांडण्यात आले असेल त्यावर शाब्दिक युद्धकला उपयोगात आणून नुसत्या शब्दांवरच ते टीका करतात. ही त्यांची पद्धत, तात्त्विक चर्चा करण्याची नसून, नुसती वाग्युद्धाचीच असते.

**ग्लॅकॉन** : पुष्कळांची अशी पद्धत असते खरी. पण प्रस्तुत चर्चेशी तिचा काय संबंध ?

**सॉक्रेटिस** : खात्रीनेच आहे. आपण अजाणतेपणाने केवळ शाब्दिक वादात पडलो आहोत हे उघड आहे. "निरनिराळ्या स्वभावाच्या लोकांनी एकाच कामामध्ये पडू नये" ह्या

विधानाचा केवळ वादाच्या आवेशात आपण शाब्दिक अर्थ करीत बसलो आहोत. परंतु 'एकच स्वभाव' व 'निरनिराळे स्वभाव' हे शब्द आपण कोणत्या अर्थाने वापरले, तसेच लोकांनी आपल्या स्वभावाला अनुसरून धंदे करावेत असे जेव्हा आपण म्हटले तेव्हा आपली काय व्याख्या होती, या सर्वांकडे आपण दुर्लक्ष केले आहे. आपल्याला असे विचारता येईल की, टक्कल पडलेले व लांब केस असलेले लोक यांचा स्वभाव एक असतो की भिन्न ? भिन्न स्वभाव असतो असे कबूल करून आपल्याला असे म्हणता येईल की, जर टक्कल पडलेले लोक जोडे तयार करत असतील, तर लांब केसाच्या लोकांनी जोडे करता कामा नयेत ; आणि जर लांब केसांचे लोक जोडे करत असतील, तर टक्कल पडलेल्या लोकांनी जोडे करता कामा नयेत.

**ग्लॅकॉन** : असे म्हणणे हास्यास्पद होईल.

**सॉक्रेटिस** : खरे आहे. कारण सारखेपणा व भिन्नता यांचे ठराविक प्रकार विचारात घेऊन आपण विशिष्ट धंदे ठरविले होते आणि त्या वेळेस 'एकच' व 'निराळे' शब्द सामान्य अर्थाने वापरले नव्हते. उदा. आपण म्हटले होते की, ज्या लोकांच्या मानसिक देणग्या वैद्याच्या धंद्याला उपयुक्त असतात त्यांचा स्वभाव एकच असतो आणि जो मनुष्य चांगला वैद्य असतो त्याचा स्वभाव चांगल्या सुताराच्या स्वभावाहून निराळा असतो.

**ग्लॅकॉन** : होय. निश्चितच.

**सॉक्रेटिस** : म्हणून जर एखाद्या धंद्यातील कर्तबगारीत अथवा कलेतील कौशल्यात स्त्री व पुरुष यांच्यात विशेष भिन्नता दिसून आली, तर आपण असे म्हणू की, असा धंदा अथवा कला, स्त्रीने किंवा पुरुषानेच करावा. पण जर स्त्री व पुरुष यांच्यातील फरक प्रजोत्पादन क्रियेमधील त्यांच्याकडे असणाऱ्या वेगवेगळ्या कामगिरीतच दिसून आला, तर आपण असे निश्चितच सांगू शकू की, स्त्री व पुरुष हयांच्यामधील हा फरक कोणत्याही प्रकारे आमच्या हेतूला बाधक ठरत नाही. उलट आपल्या संरक्षकांनी व त्यांच्या बायकांनी एकाच प्रकारची कामे करावीत ही विचारसरणी चालू करणेच योग्य आहे.

**ग्लॅकॉन** : अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आपल्या विरोधी पक्षाला आपण आता असे विचारू की, राज्यकारभारात अशी कोणती कला वा धंदा आहे की ज्यामुळे स्त्रीचा स्वभाव हा पुरुषाच्या स्वभावाहून भिन्न आहे असे म्हणता येईल ?

**ग्लॅकॉन** : हा एक चांगला प्रश्न आहे.

**सॉक्रेटिस** : ज्याप्रमाणे थोडया वेळापूर्वी तुम्ही उत्तर दिले की, एका क्षणात त्याचे उत्तर देणे सोपे नाही, त्याचप्रमाणे इतरांकडूनही असेच सांगण्यात येईल. पण जर विचार करावयास वेळ मिळाला तर याचे उत्तर देणे कठीण जाणार नाही.

**ग्लॅकॉन** : शक्य आहे.

**सॉक्रेटिस** : राज्यकारभार करण्यास ज्या धंद्याची आवश्यकता असते असा कोणताही धंदा स्त्रियांना करता येईल असे दाखवून देण्याच्या कामात प्रतिपक्षाने आपल्याबरोबर यावे अशी आपण त्यांना विनंती करू या. आपण त्यांना असे विचारू, "जेव्हा तुम्ही असे म्हणता की, एखाद्या मनुष्याची एखाद्या विशिष्ट विषयासंबंधी बुद्धी चांगली असते व दुसऱ्याची नसते, तेव्हा पहिला मनुष्य तो विषय लवकर शिकतो व दुसरा जरा प्रयत्नाने शिकतो असाच अर्थ करता ना? तसेच पहिला मनुष्य थोडच्या शिकविण्यानेसुद्धा स्वतःच पुष्कळ ज्ञान मिळवू शकतो व दुसरा पुष्कळशा शिकवणीने व अभ्यासाने मिळविलेले ज्ञान टिकवू शकत नाही, पहिल्याचे मन शारीरिक शक्तीने विकास पावते व दुसऱ्याचे संकोच पावते असेच तुम्ही म्हणता ना? कोणत्याही विषयासंबंधी स्वाभाविक बुद्धीचे अस्तित्व टिकविण्यास हीच साधने तुम्ही उपयोगात आणता ना?"

**ग्लॅकॉन** : कोणीही असेच उत्तर देईल.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. मानवी उद्योगांची अशी कोणती शाखा तुम्हांला माहीत आहे की ज्यात स्त्रियांपेक्षा पुरुष सरस ठरत नाहीत. विणकाम करणे, पॅस्ट्री (कबाब तयार करणे), लोणची, मुरंबा घालणे इत्यादी कलांमध्ये स्त्रिया निष्णात समजल्या जातात व यासंबंधो त्यांचे अज्ञान हास्यास्पद समजले जाते.

**ग्लॅकॉन** : बहुतेक धंद्यांमध्ये एक जात ही दुसऱ्या जातीपेक्षा वरचढ असते हे खरे आहे. बऱ्याच स्त्रिया बऱ्याच गोष्टींत बऱ्याच पुरुषांपेक्षा श्रेष्ठ असतात हयात शंका नाही. परंतु संपूर्ण जातीचा विचार करता, तुम्ही म्हणता त्याप्रमाणेच वस्तुस्थिती आहे.

**सॉक्रेटिस** : हयावरून असा निष्कर्ष काढता येतो की, राज्य व्यवस्थित चालण्यास जे धंदे लागतात त्यांमध्ये स्त्री ही स्त्री म्हणून व पुरुष हा पुरुष म्हणून उपयुक्त नसतात. स्वाभाविक देणग्या स्त्री व पुरुष हया दोघांमध्येही सापडतात. स्त्री ही जरी अबला असली तरी स्त्री व पुरुष हयांचे स्वभाव लक्षात घेतले असता कोणताही धंदा त्यांना करता येणे शक्य आहे.

**ग्लॅकॉन** : अगदी बरोबर.

**सॉक्रेटिस** : मग सर्व धंदे फक्त पुरुषांनीच करावे असे आपल्याला म्हणता येईल काय?

**ग्लॅकॉन** : निश्चितच नाही.

**सॉक्रेटिस** : उलट आपणांस असे म्हणता येईल की, एखाद्या स्त्रीला वैद्यकीय शाखेचे ज्ञान असेल तर दुसरीला अजिबात नसेल. एखाद्या स्त्रीला संगीताचे ज्ञान असेल तर दुसरीला अजिबात नसेल.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : एखाद्या स्त्रीला व्यायामाची व युद्धाची आवड असेल तर दुसरीला हयांपैकी कशाचीच नसेल.

**ग्लॅकॉन** : शक्य आहे.

**सॉक्रेटिस** : एखाद्या स्त्रीस ज्ञानाची आवड असेल तर दुसरीला त्याचा तिटकारा असेल. एखादी स्त्री धीट असेल तर दुसरी भित्री असेल.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : हे जर खरे तर काही स्त्रिया संरक्षकाच्या कामाला लायक व काही नालायक असतात. पुरुषांच्या बाबतीत आपण हेच गुण आवश्यक म्हणून ठरविले होते. म्हणून राज्यातील संरक्षणासंबंधी असे म्हणता येईल की, स्त्री व पुरुष ही स्वभावतः भिन्न नसून केवळ शारीरिक शक्तीचे कमीअधिक प्रमाण त्यांच्यातील भिन्नतेचे कारण असते.

**ग्लॅकॉन** : उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : योग्य पुरुषांच्या बरोबरीने राज्यकारभारात भाग घेऊ शकतील अशा योग्य स्त्रिया आपण निवडल्या पाहिजेत. कारण आपणांस असे दिसून आले आहे की, पुरुषांप्रमाणेच स्त्रियांचा स्वभाव असून अशा कामाला त्या योग्य आहेत. एकाच स्वभावाच्या मनुष्याला आपण एकच काम दिले पाहिजे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : तर मग वर्तुळाकार फिरून आपण पूर्वीच्याच मुद्द्यावर आलो. तो असा की, संगीत व व्यायाम यांचे ज्ञान संरक्षकांच्या बायकांना देणे हे निसर्गाच्या विरुद्ध नाही. ज्याअर्थी आपण योजलेला कायदा निसर्गाच्या विरुद्ध नाही त्याअर्थी आपल्या कायद्याचे तत्त्व, हे अव्यवहार्य व केवळ काल्पनिक आहे, असे म्हणता येणार नाही. उलट आपल्या तत्त्वाच्या विरुद्ध असलेला प्रचलित प्रकारच निसर्गाच्या विरुद्ध आहे असे म्हणता येईल.

**ग्लॅकॉन** : होय. असे दिसते.

**सॉक्रेटिस** : आपली योजना व्यवहार्य असून ती अत्यंत इष्टही आहे याबद्दल तुम्हाला शंका होती. पण ती व्यवहार्य आहे याबद्दल आपली खात्री झाली आहे. स्त्रीला संरक्षकाच्या कामाला कसे योग्य बनविता येईल असा जर प्रश्न असेल तर पुरुषांचे शिक्षण निराळे व स्त्रियांचे शिक्षण निराळे असे आपण करणार नाही. कारण दोघांचे स्वभाव एकच आहेत. आता पुढील प्रश्नावर तुमचे मत मला सांगा.

**ग्लॅकॉन** : कोणता प्रश्न ?

**सॉक्रेटिस** : एक मनुष्य दुसऱ्यापेक्षा चांगला असे तुम्ही कोणत्या तत्त्वावर ठरविता, का सर्वांना सारख्याच योग्यतेचे समजता ?

**ग्लॅकॉन** : मी सर्वांना सारख्याच योग्यतेचे समजत नाही.

**सॉक्रेटिस** : तर मग आपल्या आदर्श राज्यामध्ये तुमच्या मताप्रमाणे कोणते लोक चांगले ? आपल्या योजनेप्रमाणे सुशिक्षित असलेले लोक की जोडे तयार करणारे चांभार ?

**ग्लॅकॉन :** हा प्रश्न विचारण्याची आवश्यकताच नाही. तो अत्यंत हास्यास्पद आहे.

**सॉक्रेटिस :** आपण वर्णिलेली स्त्री व पुरुष सर्वोत्तम नागरिक आहेत काय ?

**ग्लॅकॉन :** होय. ते सर्व उत्तम नागरिक आहेत.

**सॉक्रेटिस :** उत्तम पुरुष व स्त्रिया राज्यात असणे ह्यापेक्षा राज्यात अधिक चांगली गोष्ट असू शकेल काय ?

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** आपण वर्णन केलेल्या, संगीत व व्यायाम ह्यांच्या शिक्षणानेच, हा परिणाम घडून येईल ना ?

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** यावरून आपली नियोजित कल्पना केवळ व्यवहार्यच आहे, असे नव्हे तर राज्यहिताच्या दृष्टीनेही ती अत्यंत इष्ट आहे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** तर मग आपल्या संरक्षकांच्या स्त्रियांनी सद्‌गुण हेच वस्त्र समजून व्यायाम केला पाहिजे ; आणि दुसरे कोणतेही धंदे न करता संरक्षकाच्या कर्तव्यात समाविष्ट असलेली युद्धादी कामे केली पाहिजेत. अर्थात स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षा अशक्त असल्यामुळे ह्या कामांमध्ये हलकी कामेच त्यांना दिली जातील. उदात्त हेतूने स्त्री वस्त्रविहीन स्थितीत व्यायाम करत असताना जेव्हा एखादा मनुष्य हसतो, तेव्हा त्या मनुष्याचे हसणे, म्हणजे "ज्ञानवृक्षापासून तोडलेले अपरिपक्व फळ" होय. अशा मनुष्याला आपण कशाला हसतो आहोत व आपण काय करीत आहोत ह्याचे भानच नसते. जे उपयुक्त आहे तेच उदात्त व जे अपायकारक आहे ते क्षुद्र हेच सनातन सत्य तत्त्व आहे.

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

□ □

# प्रकरण सोळा

# कुटुंब संस्थेचे उच्चाटन

**[V-457-B—466-D]**

**कथासूत्र :**

[स्वार्थ आणि संचय प्रवृत्ती यामुळे निर्माण होणारे दोष आणि दुर्गुण प्रशासक राज्यकर्त्यांत निर्माण होऊ नयेत आणि त्यामुळे त्यांचे नेतृत्व आणि समाजकल्याणाची ध्येयदृष्टी यांना बाधा येऊ नये म्हणून प्लेटोने प्रशासक राज्यकर्त्यांच्या संदर्भात खासगी कुटुंबसंस्था नष्ट केली आहे. मात्र खासगी मालमत्ता आणि खासगी कुटुंब या संदर्भातील प्लेटोचा हा साम्यवाद फक्त प्रशासक वर्गापुरताच मर्यादित आहे. सामान्य वर्गाला त्याने उत्पादन व उपभोग यांचे सर्व हक्क दिले आहेत.

उच्च दर्जाच्या बुद्धिमत्तेचे आनुवंशिक संवर्धन व्हावे, व्यापक सामाजिक हिताच्या आड संकुचित कुटुंब हित येऊ नये आणि सर्व राज्यव्यवहारात सुनियंत्रितपणा व एकात्मता रहावी म्हणून प्लेटोने असा थोडा कडक विचार स्वीकारलेला दिसतो.

प्रशासक वर्गातील व्यक्तींची जीवनावश्यक संपत्ती, स्त्रिया व मुले यांवर समाईक मालकीहक्काची कल्पना त्याने मांडली आहे. स्त्री-पुरुषातील स्वेच्छाचारी कामसंबंधांवर त्याने कडक नियंत्रणे घातली आहेत. विवाहसंस्था व कुटुंबसंस्था यांवरील सामाजिक नियंत्रणावरील प्लेटोची दृष्टी आजही क्रांतिकारक समजावी लागेल.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** स्त्रियांच्या कायद्यांचे स्वरूप कसे असावे त्याबद्दलचे आक्षेप आता आपण संपविले आहेत असे आपण म्हणू. आपल्या राज्यातील संरक्षक स्त्री-पुरुषांनी आपले व्यवसाय एकत्रच केले पाहिजेत हे आपले म्हणणे रद्द ठरविण्याऐवजी आपलाच दृष्टिकोन योग्य आणि व्यवहार्य असल्याचे आपण दाखवून दिले आहे.

**ग्लॅकॉन :** तुम्ही निरसन केलेला आक्षेप फारच मोठा होता.

**सॉक्रेटिस :** आता दुसरा आक्षेप जर तुम्ही लक्षात घेतलात तर त्याच्या तुलनेने पहिला आक्षेप मोठा होता असे तुम्ही म्हणणार नाही.

**ग्लॅकॉन :** ठीक. सांगा पाहू.

**सॉक्रेटिस** : आपले पूर्वीचे नियम आणि आता सांगितलेले नियम यापासून पुढील नियम तयार होतो.

**ग्लॅकॉन** : कोणता ?

**सॉक्रेटिस** : संरक्षक वर्गातील कोणत्याही व्यक्तीला स्वतःची बायको असणार नाही. सर्व समाईक बायका असणार. मुलेही समाईक असणार. मुलांना आपले आई-बाप आणि आई-बापांना आपली मुले कोणती ते सांगितले जाणार नाही.

**ग्लॅकॉन** : पूर्वीच्या कायद्यापेक्षा याची व्यवहार्यता आणि इष्टता ठरविणे वादग्रस्त ठरेल.

**सॉक्रेटिस** : स्त्रिया व मुले समाईक असणे हे फायद्याचे व इष्ट आहे हे कोणी नाकबूल करू शकणार नाही. मात्र त्याच्या व्यवहार्यतेसंबंधी वाद माजेल.

**ग्लॅकॉन** : दोन्ही गोष्टी वादग्रस्तच ठरतील.

**सॉक्रेटिस** : मग दोन्हींचा विचार एकदमच करणे भाग पडेल. एकदा तुम्ही माझ्या दृष्टिकोनाची उपयुक्तता मान्य केली तर एक प्रश्न सुटेल, दुसऱ्या प्रश्नाबद्दलही खूप चर्चा होईल असे मी मानतो.

**ग्लॅकॉन** : प्रश्नाच्या सोडवणुकीतून मुक्त होण्यापूर्वी तुम्ही सध्या त्यात अडकलेले आहात म्हणून त्याचे स्पष्टीकरण करा.

**सॉक्रेटिस** : न्याय हा पाळलाच पाहिजे. पण एका बाबतीत कृपा कर. आळशी लोक एकट्याने प्रवास करताना स्वतःशी विचार करण्याचे सुख अनुभवीत असतात ते मला मिळण्याची परवानगी दे. अशी माणसे, तुला हे माहीत असेल की, स्वतःची इच्छा प्रत्यक्षात येण्यासाठी आवश्यक साधने मिळण्यापूर्वी साधनांचा विचार दूर ठेवतात. स्वतःच्या इच्छा व्यवहार्य आहेत की नाहीत याबद्दलच्या विचारांचा त्यांना त्रास होतो. इच्छा पूर्ण झालीच आहे असे ते गृहीत धरतात. ती पूर्ण झाल्यावर काय करावयाचे ते अगोदरच ठरवितात आणि समाधान मानतात आणि आळशी माणसाला आणखीनच आळशी बनवितात. मीसुद्धा थोडा आळशीपणाला शरण जाणार आहे आणि आपल्या योजनेच्या शक्यतेची चर्चा पुढे ढकलणार आहे. तत्पूर्वी अशी शक्यता गृहीत धरून ती अमलात आणण्यासाठी आपल्या राज्यातील अधिकाऱ्यांनी काय करावे ते सांगणार आहे. ही योजना आपले राज्य आणि आपले संरक्षक यांच्या हिताच्या दृष्टीने, व्यावहारिक दृष्टीने अत्यंत फायदेशीर आहे हे मी दाखविणार आहे. तुझी परवानगी असेल तर अगोदर या प्रश्नांची पूर्ण चिकित्सा करून मग दुसरे प्रश्न विचारात घ्यावेत असे मला वाटते.

**ग्लॅकॉन** : ठीक, चर्चेला सुरुवात करा.

**सॉक्रेटिस** : आपले राज्यकर्ते आणि त्यांचे सहायक जर योग्य तऱ्हेने वागले तर ते आपल्या कायद्यानुसार वागतील आणि आपण सोपविलेला अमलबजावणीचा तपशील ते पूर्ण करतील आणि कायद्याची तत्त्वे काटेकोरपणे अमलात आणतील.

**ग्लॅकॉन** : तशी आपण आशा करू.

**सॉक्रेटिस** : कायद्यातील तज्ज्ञ म्हणून तुम्ही स्त्री-पुरुषांची निवड करा. समान स्वभावाचे स्त्री-पुरुष एकत्र आणणे तुमचे कर्तव्य ठरेल. त्यांचे राहणे, जेवणे एकत्रच असेल. कोणतीही खासगी मालमत्ता जवळ न बाळगण्याचा निर्बंध त्यांच्यावर असेल. एकत्र राहत असताना, दैनिक व्यवहार करताना, व्यायाम करताना स्त्री-पुरुषांचे सहवास घडतील. अपरिहार्यपणे, स्वाभाविक प्रेरणेमुळे त्यांचे परस्परसंबंध जुळतील ना?

**ग्लॅकॉन** : गणिती मार्गाऐवजी प्रेमाच्या मार्गाने हे संबंध जुळतील. सर्वांना स्वतःकडे वळविण्याची प्रवृत्ती प्रेमात जास्त असते.

**सॉक्रेटिस** : बरोबर. पण ग्लॅकॉन, कोणत्याही समृद्ध शहरातील लोकांत स्वैरसंबंध, अव्यवस्था असणे हे भ्रष्टतेचे लक्षण होय. म्हणून अधिकारी तिला मान्यता देणार नाहीत.

**ग्लॅकॉन** : हे योग्यच आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच लग्नसंबंध पवित्र ठेवणे आवश्यक ठरेल आणि विशेषतः हे पावित्र्य लोककल्याणासाठी झालेल्या लग्नात राखणे अधिक आवश्यक ठरेल.

**ग्लॅकॉन** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : पण हे कसे साधेल? ते तू सांग. तुम्ही तुमच्या घरी शिकारी कुत्रे किंवा पकडून आणलेले पक्षी ठेवता. त्यापासून प्राण्यांची चांगली संतती कशी उत्पन्न केली जाते ते तू कृपया मला सांग.

**ग्लॅकॉन** : कशा प्रकारची?

**सॉक्रेटिस** : प्रथम मला असे विचारावयाचे आहे की जरी सर्वांचे जन्म चांगल्या स्थितीत झाले तरी काही इतरांपेक्षा श्रेष्ठ असतात, खरे ना?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : सर्वच उत्पन्न झालेल्या प्राण्यांपैकी आपण फक्त उत्तम जातीचीच काळजी घेतो ना?

**ग्लॅकॉन** : हो. उत्तमांचीच.

**सॉक्रेटिस** : कोणत्या वयात? कोवळ्या, वृद्ध की तारुण्यात?

**ग्लॅकॉन** : तारुण्यात.

**सॉक्रेटिस** : याऐवजी आम्ही काही केले तर पक्षी व कुत्रे कमी दर्जाचे निपजणार नाहीत का?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : घोडे वा अन्य प्राणी यांविषयी काही वेगळा नियम आहे का?

**ग्लॅकॉन** : मुळीच नाही. तशी कल्पना करणे चमत्कारिक ठरेल.

**सॉक्रेटिस** : वा ! वा !! मग प्रिय मित्रा, जर मानवी प्राण्याविषयी काही नियम असला तर आपले अधिकारी अधिक कुशल असायला हवेत.

**ग्लॅकॉन** : होय. माणसांना हाच नियम लागू पडतो. पण अधिकारी कुशल हवेत असे का ?

**सॉक्रेटिस** : कारण औषधांचा उपयोग त्यांना बऱ्याच प्रमाणात करावा लागेल. अशक्तांना औषधाची गरज नसते आणि पथ्य पाळण्यास ते तयार असतात, तेव्हा सामान्य वैद्यही पुरतो. पण औषधांची गरज असेल तेव्हा विशेष तज्ज्ञ वैद्य लागतो.

**ग्लॅकॉन** : पण याचा आपल्या विवेचनाशी संबंध कोठे येतो ?

**सॉक्रेटिस** : तो असा. प्रजेच्या हितासाठी असत्य आणि फसवणूक यांचा उपयोग आपल्या राज्यकर्त्यांना करावा लागेल. औषध योजनेत सारेच उपयोगी असते असे आपण म्हटले होते ना ?

**ग्लॅकॉन** : हो. आपले मत बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : ठीक. मग असे दिसते की, अशा योग्य तत्त्वांचा संबंध लग्न आणि प्रजोत्पादन यांना विशेष लागू पडतो.

**ग्लॅकॉन** : तो कसा ?

**सॉक्रेटिस** : आता आपण जे मान्य केले आहे त्यावरून असे दिसते की, उत्तम स्त्री-पुरुषांना वारंवार एकत्र आणले पाहिजे आणि वाईटांना परस्परांपासून दूर ठेवले पाहिजे. समाजात पहिल्या प्रतीची प्रगती हवी असेल तर प्रथम श्रेणीच्या स्त्री-पुरुषांच्या संबंधापासून प्रजोत्पादन केले पाहिजे आणि कनिष्ठ स्त्री-पुरुषांची संतती वगळली पाहिजे. अर्थात हे सारे फक्त अधिकाऱ्यांनाच माहीत हवे. अंतर्गत यादवीपासून आपले संरक्षण अलिप्त असणे आवश्यक आहे.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : मग काही धार्मिक उत्सव सुरू करून त्यावेळी सुदृढ वधूवरांना एकत्र आणून, यज्ञविधी करून प्रसंगोचित कविता म्हणून त्यांची लग्ने केली पाहिजेत. लग्नसंख्या मर्यादित करणे हे अधिकाऱ्याचे काम आहे. युद्धे, रोगराई, अन्य नैसर्गिक आपत्ती यांचे परिणाम लक्षात घेऊन अधिकारी लोकसंख्या नियंत्रित करतील आणि आपले राज्य फार मोठे वा फार लहान होऊ देणार नाहीत.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : चिठ्ठ्या टाकण्याची पद्धती आपण वापरली पाहिजे असे मला वाटते. कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तींना लग्नाच्या जोड्या अधिकारी जुळवीत नसून दैवयोगाने तशा जुळल्या आहेत, असे वाटेल, अशी युक्ती आपण केली पाहिजे.

**ग्लॅकॉन** : निश्चितच !

**सॉक्रेटिस** : अन्य क्षेत्रात किंवा रणांगणावर कर्तृत्व दाखविणाऱ्या आणि प्रसिद्धी लाभणाऱ्या तरुणांना इतर बक्षिसे, हक्काबरोबरच योग्य स्त्रियांबरोबर संभोग करण्याची उदार परवानगी आपण दिली पाहिजे. कारण त्या युक्तीमुळे अशा जोडप्यांपासून आपणांस पुष्कळ योग्य मुले मिळतील.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : मुलांचा जन्म झाल्याबरोबर नियुक्त केलेले स्त्री-पुरुष अधिकारी त्यांना स्वीकारतील. राज्यातील अधिकाऱ्यांच्या जागा स्त्री-पुरुषांना सारख्याच मिळतील असे मी मानतो.

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : आपले अधिकारी चांगल्या माता-पित्यांची मुले स्वीकारून शहराच्या विशिष्ट भागात राहणाऱ्या विशिष्ट दायांच्या हाती त्यांना देतील. त्यांचे संगोपन बालगृहात केले जाईल. कनिष्ठ दर्जाच्या माता-पित्यांची मुले आणि अपूर्णावस्थेत जन्म झालेली मुले अज्ञात ठिकाणी पाठविली जातील.

**ग्लॅकॉन** : संरक्षक वर्गाच्या संततीशुद्धीसाठी आपण हे मान्य केलेच पाहिजे.

**सॉक्रेटिस** : ज्यांचे स्तन दुधाने भरले आहेत त्या स्त्रियांना बालगृहांतील मुलांना पाजू देणे ; कोणत्याही आईला आपले मूल ओळखता येणार नाही याची दक्षता घेणे ; मातांच्या स्तनांत दूध नसल्यास दुधाचा पुरवठा अन्य स्त्रियांकडून करणे ; मुलांना पाजण्याच्या वेळा मातांना ठरवून देणे ; निसर्गविधी, रात्रीचा सांभाळ या गोष्टी दाई वा नोकरवर्गावर सोपविणे ; या सर्व बालसंगोपन कार्यावर अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवणे आवश्यक नाही का ?

**ग्लॅकॉन** : संरक्षकांच्या स्त्रियांना बालसंगोपनाचे कार्य तुम्ही फारच सोपे केले आहे.

**सॉक्रेटिस** : हो. ते आवश्यक आहे. आता आपण दुसरा विषय विचारात घेऊ. पूर्वी आपण असे म्हटले होते की, तारुण्यातच स्त्री-पुरुषांनी प्रजोत्पादन केले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : स्त्रियांच्या बाबतीत वीस वर्षे आणि पुरुषांच्या बाबतीत तीस वर्षे तारुण्याचा काल मानणे तुला योग्य वाटतो ना ?

**ग्लॅकॉन** : ही वयोमर्यादा कशी ठरविली ?

**सॉक्रेटिस** : वीस ते चाळीस वर्षांपर्यंत स्त्रियांनी मुलांना जन्म द्यावा. पुरुषांनी कोवळे तारुण्य संपल्यावर म्हणजेच २५ ते ५५ वर्षांपर्यंत प्रजोत्पादन करावे असा आपण नियम करू.

**ग्लॅकॉन :** स्त्री-पुरुषांचा हा निश्चितच शारीरिक-मानसिक तरुणकाल होय.

**सॉक्रेटिस :** या वयोमर्यादेपूर्वी किंवा नंतर जर एखादी व्यक्ती प्रजोत्पादन करेल तर ते तिचे कृत्य अधार्मिक आणि अन्याय्य असल्याचे आपण मानू. सद्‌गुणी आणि उपयुक्त माता-पित्यापेक्षा मुले अधिक सद्‌गुणी आणि उपयुक्त झाली पाहिजेत. याकरिता सपत्नीक उपाध्यायाकडून प्रत्येक लग्नप्रसंगी होम, प्रार्थना केल्या जातील. या व्यतिरिक्त धर्मसंस्कारशून्य, विकारवश, अंधारात, गुप्ततेने निर्माण केली जाणारी संतती दोषास्पद मानावी लागेल.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** त्याचप्रमाणे प्रजोत्पादनास योग्य असताना योग्य स्त्रीबरोबर अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय एखादी व्यक्ती संभोग करेल तर आपल्या कायद्याप्रमाणे आपल्या राज्यात बेकायदेशीर, अनौरस आणि अपवित्र प्रजा निर्माण करण्याचा त्याने गुन्हा केला असे आपण मानू.

**ग्लॅकॉन :** अगदी बरोबर.

**सॉक्रेटिस :** आपण नेमलेली वयोमर्यादा संपली की पुरुषांना मुलगी, आई, मुलीची मुलगी, आजी ह्यांना वगळून अन्य स्त्रियांबरोबर मैत्री करण्याची परवानगी देण्यात येईल. त्याचप्रमाणे स्त्रियांना मुलगा व बाप, वरची व खालची पिढी यांमधील पुरुष वगळून अन्य पुरुषांबरोबर मैत्री करण्याची परवानगी देण्यात येईल. पण अशा नात्यातील कोणत्याही संबंधापासून मुले जन्मता कामा नयेत असा आपण दंडक घालू. आणि जर तसे घडलेच तर 'अयोग्य प्रजा वाढवावयाची नाही' या नियमानुसार अशा मुलांना नष्ट करण्याची योजना तयार करण्यात येईल.

**ग्लॅकॉन :** ही योजना बरोबर दिसते. परंतु या सर्वांनी बाप, कन्या ही नाती कशी ओळखावयाची ?

**सॉक्रेटिस :** ओळखण्याची गरजच नाही. विवाहानंतर सातव्या महिन्यापासून दहाव्या महिन्याच्या आत जे मूल जन्मेल ते मुलगा असेल तर पुत्र व मुलगी असेल तर कन्या असे पुरुषांनी मानावे. मुलेही त्याला पिता मानतील. त्यांच्या मुलांना तो नातवंडे मानील. त्याला आणि त्याच्या बरोबरच्या वधूवरांना आजोबा-आजी मानतील. विशिष्ट काळात, विशिष्ट माता-पित्यांना होणारी मुले परस्परांना भाऊ-बहीण मानतील. स्त्री-पुरुषांचे विकारवश संबंध असू नयेत असे आपण म्हटले आहे. पण प्रसंगच ओढवला आणि डेल्फियन देवतेने मान्यता दिली तर भाऊ-बहीण यांच्या संबंधांनाही कायद्याची मान्यता दिली जाईल.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या संरक्षकांना अशा तऱ्हेने स्त्रिया व मुले असतील. आपल्या आदर्श राज्याच्या कल्पनेला ही योग्य व उत्तम योजना आहे असे आपण म्हटले पाहिजे. दुसरा काही मार्ग सुचतो का?

**ग्लॅकॉन :** तुमच्या म्हणण्याप्रमाणेच करू या.

**सॉक्रेटिस :** आदर्श राज्याच्या घटनेत अतिशय कल्याणकारक गोष्ट कोणती आणि त्यानुसार कायदेपंडितांनी कोणते कायदे करावेत, कोणती गोष्ट अपायकारक मानावी, आपण सांगितलेली योजना कल्याणकारक आहे की अपायकारक आहे असे सारे प्रश्न आपण राज्यातील एकात्मता टिकविण्यासाठी विचारणे आवश्यक नाही का?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच त्यांचा विचार व्हावयास हवा.

**सॉक्रेटिस :** राज्याचे भाग पाडून असंख्य राज्ये तयार होणे विशेष अन्यायकारक नाही का? त्याचप्रमाणे राज्य एकत्रित करून, एकच संघटित राज्य तयार करणे विशेष कल्याणकारक नाही का?

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** सुखदुःखाचे प्रसंग राज्यावर आल्यावर जेव्हा सर्व नागरिक सारखेच सुख-दुःख अनुभवतात त्यावेळी ती समभावना त्यांच्यात एकी निर्माण करीत नाही का?

**ग्लॅकॉन :** निश्चितच!

**सॉक्रेटिस :** राज्यातील काही लोकांना ज्या घटनांमुळे आनंद होतो तर त्यामुळे इतर काहींना दुःख वाटते, अशी सुखदुःखांची भिन्न भावना निर्माण झाल्यावर राज्यात फाटाफूट होत नाही का?

**ग्लॅकॉन :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** 'माझे' आणि 'माझे नव्हे' त्याचप्रमाणे 'त्याचे' आणि 'त्याचे नव्हे' या शब्दांचा नागरिकांनी भिन्न अर्थ केल्यामुळे असे घडत नाही का?

**ग्लॅकॉन :** बरोबर. असेच घडते.

**सॉक्रेटिस :** एकच वस्तू 'माझी' आणि 'माझी नव्हे' असे नागरिक समान अर्थाने म्हणतात तेव्हा ते राज्य आदर्श बनते असे नाही का?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच वेगळ्या भाषेत असे म्हणता येईल की जेव्हा व्यक्ती आणि राज्य यांची समान स्थिती होते तेव्हा ते सर्वोत्तम राज्य बनते. आपल्या एका बोटास दुखापत झाली तर ती सर्व शरीरात पसरून आत्म्यात एकत्रित होते. म्हणून जखमेची जाणीव होऊन दुखापत झालेल्या भागाबद्दल सर्वत्र एकदम सहानुभूती निर्माण होते. त्यावरून आपण म्हणतो की, बोट दुखावले आहे. असेच सर्व शरीराविषयी म्हणता येईल. जेव्हा दुखापत होते तेव्हा दुःख होते, जेव्हा शरीर सुखरूप असते तेव्हा त्यास सुख होते.

**ग्लॅकॉन** : ही स्थिती आणि उत्तम राज्य यात अतिशय सारखेपणा निःसंशय आहे.

**सॉक्रेटिस** : जेव्हा एखाद्या नागरिकास सुख वा दुःख होते तेव्हा इतर कोणत्याही राज्यपद्धतीपेक्षा आपल्या आदर्श राज्यातील व्यक्तींना स्वतःलाच सुख वा दुःख झाले आहे असे वाटेल आणि सर्व राज्य त्या व्यक्तीच्या सुखदुःखाबद्दल सहानुभूती व्यक्त करेल.

**ग्लॅकॉन** : राज्याच्या सुव्यवस्थेनुसार असेच घडेल.

**सॉक्रेटिस** : आपण आता आपल्या राज्याविषयी अधिक विचार करू. ज्या सद्गुणांचा आपण एकमताने विचार केला आहे ते सद्गुण आपल्या राज्यात उत्कर्षाने दिसतात का ? आणि सद्गुणांच्या बाबतीत आपल्या राज्यपद्धतीपेक्षा अन्य राज्यपद्धतीत वरचढपणा आहे का ते पाहिले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : इतर राज्यपद्धतीत आपल्याप्रमाणेच अधिकारी व प्रजाजन असेच वर्ग असतात ना ?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : ते परस्परांना नागरिकच म्हणतील ना ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : परस्परांना नागरिक म्हटल्यावर इतर राज्यातील अधिकाऱ्यांना नागरिक काय म्हणतील ?

**ग्लॅकॉन** : बऱ्याच ठिकाणी त्यांना धनी म्हटले जाईल तर लोकशाहीमध्ये त्यांना फक्त अधिकारी म्हटले जाईल.

**सॉक्रेटिस** : आपल्या राज्यात 'नागरिक' या शब्दाऐवजी कोणत्या शब्दाने प्रजा अधिकाऱ्यांचा निर्देश करील ?

**ग्लॅकॉन** : ते अधिकारीवर्गास 'संरक्षक आणि सहायक' म्हणतील.

**सॉक्रेटिस** : अधिकारी प्रजेला काय म्हणतील ?

**ग्लॅकॉन** : करदाते आणि पोषक.

**सॉक्रेटिस** : इतर राज्यातील अधिकारी प्रजेला काय म्हणतील ?

**ग्लॅकॉन** : नोकर.

**सॉक्रेटिस** : अधिकारी एकमेकांना काय म्हणतील ?

**ग्लॅकॉन** : अधिकारी-बांधव.

**सॉक्रेटिस** : आणि आपले अधिकारी काय म्हणतील ?

**ग्लॅकॉन** : संरक्षक-बांधव.

**सॉक्रेटिस** : इतर राज्यातील अधिकारी, स्वतःच्या अधिकारी-बांधवापैकी, एकाला आपला मित्र व दुसऱ्याला परका असे मानतील काय ?

**ग्लॅकॉन** : पुष्कळ अधिकारी असे करीत असतील.

**सॉक्रेटिस** : अशा तऱ्हेने, ते एकाला परका व एकाला आपला असे मानतात ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : आपल्या संरक्षकांपैकी कोणीही, आपल्या संरक्षक-बांधवाला परका मानेल काय ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच नाही. आपले संरक्षक परस्परांना भेटल्यावर त्यांनी परस्परांना भाऊ, बहीण, माता, पिता, पुत्र अशा नात्यांनीच संबोधले पाहिजे.

**सॉक्रेटिस** : छान ! आणखी एका प्रश्नाचे उत्तर द्या. नुसत्या नामधारी कौटुंबिक नात्यावर तुम्ही संतुष्ट व्हाल की त्यानुसार त्यांनी प्रत्यक्षतः वागले पाहिजे असे तुम्ही म्हणाल ? मुलाने मातापित्याचा मान ठेवून, मदत करून, त्यांचे आज्ञापालन केले पाहिजे. तसे न घडले तर धर्म आणि न्याय पायदळी तुडविणारा पुत्र इहलोकात आणि परलोकात दुर्दशेला जातो, हे आपल्या मुलांच्या कानावर पडायला नको का ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच कौटुंबिक नाती नुसती तोंडाने सांगून, कृती न करणे हास्यास्पदच होय.

**सॉक्रेटिस** : एखाद्या व्यक्तीवर चांगला-वाईट प्रसंग गुदरल्यावर आपल्या राज्यातील प्रत्येक नागरिक ' माझे बरे झाले ', ' माझे वाईट झाले ' असे शब्द उच्चारून सार्वजनिक सहानुभूती प्रकट करील.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : असे विचार व्यक्त करण्याची पद्धत असली म्हणजे सुखदुःखाविषयी सर्वसामान्य सहानुभूती असते हे आपण मान्य केले आहे ना ?

**ग्लॅकॉन** : होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : एकाच वस्तूला ' आपली ' म्हणताना समानहिताची भावना, समसुखदुःखाची भावना नागरिकांत विशेषत्वाने दिसणार नाही का ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच दिसेल.

**सॉक्रेटिस** : आपल्या राज्यघटनेप्रमाणे स्त्रिया व मुलांच्या बाबतीत समाईक मालकीचे तत्त्व मान्य केल्यामुळेच हे तत्त्व दिसणार नाही काय ?

**ग्लॅकॉन** : हो. त्यामुळेच दिसेल.

**सॉक्रेटिस** : सर्व शरीराचा सुखदु:खाच्या अनुभवात सर्व अवयवांशी संबंध असतो. तसाच संबंध सव्यवस्थित राज्याचा प्रजेशी असतो. अशा तुलनेवर आधारलेली समभावना अतिशय कल्याणकारक असते, असे आपण म्हटले नाही का ?

**ग्लॅकॉन** : होय. आपण ते मान्य केले आहे.

**सॉक्रेटिस** : याचा अर्थ संरक्षक वर्गातील लोकांत स्त्रिया व मुलांच्या बाबतीत समाईक मालकीचे तत्त्व मान्य करणे ही राज्याच्या कल्याणाची पराकाष्ठा होय असे आपणांस म्हणता येईल.

**ग्लॅकॉन** : हो. तसेच आहे.

**सॉक्रेटिस** : आपल्या संरक्षकांना शहरातील नागरिकांकडून त्यांच्या कामाबद्दल पोषणासाठी आवश्यक वेतन मिळेल पण त्यापेक्षा घर, जमीन, अन्य खासगी संपत्ती संरक्षकाकडे असू नये असा आपण निर्बंध घातला आहे. त्याला धरूनच ही व्यवस्था आहे.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आपण पूर्वी वर्णन केलेल्या नियमानुसार जर आपले सर्व नियम पाळले गेले तर आपल्याला अस्सल संरक्षक मिळतील. 'माझे नव्हे' या शब्दाचे विविध अर्थ करून ते शहरात फूट पाडणार नाहीत. इतरांपेक्षा वेगळी, स्वतंत्र घरे बांधून, केवळ स्वत:ची बायको-मुले सांभाळून ते स्वतंत्र सुख-दु:खांना जन्म देणार नाहीत. कशाविषयी आपुलकी बाळगावयाची याविषयी त्यांचे एकमत असल्याने त्यांच्या सुखदु:ख भावनाही सारख्याच राहतील आणि एकाच ध्येयाच्या पूर्ततेसाठी ते झगडतील.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : त्यांना स्वत:च्या शरीरापलीकडे स्वत:चे असे काहीच नसणार ! त्यामुळे दिवाणी, फौजदारी दावे आपोआपच थांबतील ना ! पैसा, मुले, अन्य वस्तू यांवरच्या वैयक्तिक मालकीमुळे निर्माण होणाऱ्या माणसामाणसातील संघर्षापासून या संरक्षकांची सुटका होईल.

**ग्लॅकॉन** : हो. ते त्यापासून दूर राहतील.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे गैरहक्क, जबरदस्तीचा कब्जा, शिव्या देणे, मारामारी इत्यादी संदर्भातील खटले होणार नाहीत. समान वयाचा मनुष्य मारामारी करू लागला तर प्रतिकार करणे, आत्मसंरक्षण करणे यात मान व न्याय आहे, ते आवश्यक आहे असे आपण ठरवू.

**ग्लॅकॉन** : बरोबर.

**सॉक्रेटिस :** अशा नियमाचा आणखी एक फायदा म्हणजे असा माणूस दुसऱ्यावर धावून गेला तर दुसऱ्याबरोबर त्याचा झगडा होऊन त्याचा स्वतःचा राग शांत होईल आणि भांडणाचा शेवट विशेष गंभीर होणार नाही.

**ग्लॅकॉन :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** पण वृद्ध माणसालाच स्वतःपेक्षा लहान असणाऱ्या व्यक्तीला आज्ञा व शिक्षा देण्याचा अधिकार असेल.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय वृद्धास मारणे किंवा शिक्षा करणे याची परवानगी तरुणास असणार नाही. तरुणास वृद्धाचा अपमानही करता येणार नाही. भय आणि लज्जा यांपासून तो दूर ठेवला जाईल. पितृतुल्य माणसास मारण्यास त्या तरुणास लाज वाटेल आणि वृद्धाच्या मदतीला येणारे पुत्र, पिता, भाऊ पाहून त्यास भय वाटेल.

**ग्लॅकॉन :** होय. आपल्या कायद्याचे हे चांगले परिणाम होतील.

**सॉक्रेटिस :** यामुळे आपल्या राज्यात पूर्ण शांतता राहील.

**ग्लॅकॉन :** हो. बऱ्याच प्रमाणात.

**सॉक्रेटिस :** आपले संरक्षक अंतर्गत यादवीपासून मुक्त असतील. परस्परांचे झगडे किंवा नागरिकांशी तंटे यांचे भय उरणार नाही.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** गरिबांनी श्रीमंतांची लाळ घोटणे, कुटुंबाच्या पालनपोषणात निर्माण होणारा गोंधळ व त्रास, कुटुंबीय व नोकर यांच्या अन्नवस्त्राकरिता पैसे मिळविण्यास पडणारे कष्ट, उसनवारीला मिळणारा नकार, वाईट मार्गांनी पैसे मिळविण्याचा त्रास, बायका व नोकर यांच्या ताब्यात सर्व देण्याचा त्रास, या सर्व गोष्टी क्षुद्र असल्या तरी त्यांचे वाईट परिणाम घडतात. त्यापासून आपले संरक्षक अलिप्त राहतील.

**ग्लॅकॉन :** हे दुष्परिणाम आंधळ्यालाही कळतील.

**सॉक्रेटिस :** त्या दुष्परिणामापासून ते अलिप्त राहिल्याने ऑलिंपिक खेळातील विजयी वीरापेक्षाही त्यांचे आयुष्य अधिक समाधानी होईल.

**ग्लॅकॉन :** ते कसे ?

**सॉक्रेटिस :** आपल्या संरक्षकांना जे सुख मिळते त्यापैकी फारच थोडे ऑलिंपिक खेळातील विजयी वीरांना मिळते. संरक्षकांचा खर्च सार्वजनिक पैशातून होतो. शिवाय त्यांना कीर्तीही बरीच मिळते. संरक्षकांनी मिळविलेल्या विजयामुळे राज्याचे संरक्षण होते. त्या मोबदल्यात त्यांना, ते जिवंत असेपर्यंत, व त्यांच्या मुलांना अन्नवस्त्र व आयुष्यातील इतर आवश्यक गरजा भागविण्याची सोय सरकारकडून करून दिली जाते. आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा सन्मानाने प्रेतसंस्कार होतो.

**ग्लॅकॉन :** हे हक्क निश्चितच अभिमानास्पद आहेत.

**सॉक्रेटिस :** तुम्हाला आठवत असेल की, 'संरक्षकांना आपण सुखी केले नाही' असा आरोप थोडयाच वेळापूर्वी आपल्यावर ठेवण्यात आला होता. नागरिकांकडून सर्व गरजा भागविल्या जात असल्या तरी स्वतःच्या मालकीचे असे त्यांच्याजवळ काहीच नसते. अन्य कुठल्याही वर्गाच्या सुखाचा विचार न करता, आपले संरक्षक उत्तम संरक्षक कसे होतील व त्यामुळे आपले सर्व राज्य कसे सुखी होईल या प्रश्नाचाच आपण विचार करीत होतो. त्यामुळे वरील आक्षेपाचे उत्तर आपण पुढे देऊ असे म्हटले होते.

**ग्लॅकॉन :** हो. मला असे म्हटल्याचे आठवते.

**सॉक्रेटिस :** आपल्या संरक्षक लोकांचे आयुष्य ऑलिंपिक खेळांतील विजयी वीरांच्या आयुष्यापेक्षा अधिक सन्मान्य व विलोभनीय असे दिसून आल्यावर, चांभार आणि इतर कारागीर, शेतकरी हयांच्या आयुष्याची त्यांच्या आयुष्याची तुलना होऊ शकेल का ?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच होणार नाही.

**सॉक्रेटिस :** मागे जे मी म्हटले तेच आता पुन्हा सांगणे आवश्यक आहे. आपले संरक्षक, त्यांचे संरक्षकत्वच नष्ट होईल, अशा तऱ्हेने जर सुख उपभोगण्याचा प्रयत्न करतील आणि संयमी आणि स्थिर आयुष्यात समाधान मानण्याऐवजी सुखाची मूर्ख व पोरकट कल्पना बाळगून, अधिकाराच्या जोरावर शहरांतील चांगल्या वस्तू बळकावण्याची इच्छा करतील, तर त्यांना असे आढळून येईल की, 'अर्ध्याची किंमत पूर्णापेक्षा जास्त असते' हे हिसियडचे म्हणणे खरोखरच शहाणपणाचे आहे.

**ग्लॅकॉन :** जर ते माझ्या उपदेशाप्रमाणे वागतील तर ते अधिक सुखी होतील.

**सॉक्रेटिस :** तर मग शिक्षण, मुलांचे संगोपन आणि शहरी लोकांवरील पहारा या बाबतीत स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा समजायचा ना ? त्यांना कुठेही—घरात काय किंवा रिंगणात काय—ठेवले तरी त्यांनी पुरुषांच्या बरोबरीने सर्व कामे करावयाची. अशा तऱ्हेने संरक्षणाच्या कामानिमित्त एकत्र रहात असताना, नैसर्गिक संबंधाला अपायकारक असे काहीही न करता, स्त्रिया योग्य प्रकारे वागतील असे तुम्हांला वाटते ना ?

**ग्लॅकॉन :** होय. मला हे सर्व कबूल आहे.

□ □

## प्रकरण सतरा

# युद्धाचे उपयोग

**[V-466-D—471-C]**

**कथासूत्र :**

[परकीय आक्रमणापासून स्वातंत्र्य आणि स्वराज्य यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी प्रशासक राज्यकर्त्यांची असल्याचे प्लेटोने म्हटले आहे. त्याचप्रमाणे अंतर्गत सामाजिक जीवनातील अव्यवस्था, गोंधळ दूर करण्याची त्यांची जबाबदारी आहे. युद्धकार्यातही प्लेटोने स्त्री-पुरुषांना समान हक्क दिले आहेत. युद्धाचा हेतू नैतिक मूल्यांचे संरक्षण होय.

मात्र प्लेटोच्या काळात राज्याची कल्पना शहर राज्यापुरतीच मर्यादित होती. त्यामुळे त्याच्या युद्धकल्पनेमध्ये अशा विविध शहरराज्यातील परस्पर शत्रू-मित्र संबंध आणि त्यावर आधारलेली युद्धनीती एवढाच भाग अभिप्रेत असलेला दिसतो. अर्थात निरपराधी व्यक्तींना त्रास होऊ नये, अकारण हत्या, लुटालूट टाळली जावी, कोणत्याही राज्यातील स्त्रिया, वृद्ध, मुले यांना संरक्षण मिळावे अशा प्रकारच्या आदर्श मार्गदर्शक तत्त्वांचे अधिष्ठान त्याने आपल्या युद्धनीतीस दिले आहे ही गोष्ट महत्त्वाची ठरते. कारण त्यामध्येच आजच्या आंतरराष्ट्रीय युद्धनीतीची बीजे आढळतात.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** पशूंचा जसा समूह असतो, तसा माणसांत तो असतो का ? असल्यास कोणत्या परिस्थितीत असतो ते ठरवायला हवे ना ?

**ग्लॅकॉन :** मी ते सुचवणारच होतो, परंतु तुम्ही त्याचा अगोदर उल्लेख केला.

**सॉक्रेटिस :** त्यांचे युद्धातील वर्तन कसे असते ते समजणे सोपे आहे.

**ग्लॅकॉन :** ते कसे ?

**सॉक्रेटिस :** अन्य कारागीर मुले बरोबर नेतात, त्याप्रमाणे आपले संरक्षक स्त्री-पुरुष सुदृढ मुलांना युद्धभूमीवर बरोबर नेतील. मोठेपणी हीच कामे त्यांनाही करायची आहेत. या धोरणाने मुलांना युद्धाचे प्रेक्षक म्हणून वागता येईल. कुंभारांची मुले स्वतः भांडी करावयास शिकण्यापूर्वी आपल्या आई-वडिलांच्या कामाचे निरीक्षण करीत असतात आणि किरकोळ कामे घरण्यात त्यांना मदत करीत असतात असा प्रकार तुम्ही पाहिला आहे ना ?

**ग्लॅकॉन :** होय. मी बघितला आहे.

**सॉक्रेटिस** : कुंभारांनी स्वतःच्या मुलांना काम बघण्याचे व करण्याचे योग्य शिक्षण देण्यात अधिक काळजी दाखवावी काय ?

**ग्लॅकॉन** : ही कल्पना हास्यास्पद आहे.

**सॉक्रेटिस** : प्रत्येक संरक्षक आपली मुले जवळ असताना अधिक शौर्य गाजवितो, हे खरे आहे काय ?

**ग्लॅकॉन** : खरे आहे. पण युद्धामध्ये लढत असताना आई-बापांबरोबर मुलांचीही कत्तल होण्याची शक्यता असते आणि त्यामुळे कधीही भरून न येणारे नुकसान होते व शहराची शक्ती कमी होण्याची शक्यता असते.

**सॉक्रेटिस** : हे खरे आहे. परंतु प्रत्येक भावी संकटाची उपाययोजना अगोदरच करून ठेवली पाहिजे असे आपल्यावर बंधन आहे काय ?

**ग्लॅकॉन** : अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. जर संकटाला तोंड द्यावयाचे असेल तर त्यातून सुटका झाल्यानंतर संरक्षकांची अधिक सुधारणा होईल अशाच प्रसंगांना सामोरे जावे लागेल.

**ग्लॅकॉन** : उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : ज्या लोकांना तरुणपणी लढाईवर जायचे आहे त्यांनी लहानपणापासूनच लढाईचे निरीक्षण करणे आणि धोक्याच्या प्रसंगांना सामोरे जाणे आवश्यक नाही का ?

**ग्लॅकॉन** : ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच मुलांनी लढाईत प्रेक्षकाचे काम केले पाहिजे असा नियम करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांच्या संरक्षणाचीही व्यवस्था केली पाहिजे, बरोबर आहे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : त्यांचे आईबाप लढाईत कोणते प्रसंग धोक्याचे व कोणते सुरक्षितपणाचे असतील याविषयी अंदाज करू शकतील ना ?

**ग्लॅकॉन** : होय. बहुतेक करू शकतील.

**सॉक्रेटिस** : असे जर आहे तर पहिल्या प्रकारच्या प्रसंगामध्ये ते मुलांना आपल्याबरोबर घेणार नाहीत आणि दुसऱ्या प्रकारच्या प्रसंगामध्ये मुलांना बरोबर घेतील.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : अनुभवाने शहाणे झालेले व वयोवृद्ध असे लोक त्यांना मार्गदर्शन करतील.

**ग्लॅकॉन** : असे करणे योग्यच आहे.

**सॉक्रेटिस** : परंतु त्याचबरोबर आपल्याला हेही मान्य करावे लागेल की लढाईत पुष्कळ वेळा अपेक्षेविरुद्ध गोष्टी घडून येतात.

**ग्लॅकॉन** : होय. असा अनुभव येतो खरा.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच असे प्रसंग टाळण्याकरिता आपल्या मुलांना पहिल्यापासूनच योग्य ते शिक्षण दिले पाहिजे ; त्यायोगे अडचणीच्या प्रसंगातूनही ते सहीसलामत सुटू शकतील.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे मला समजले नाही

**सॉक्रेटिस** : मला असे म्हणावयाचे आहे कीं, मुलांना लहान वयातच घोडयावर बसण्याचे शिक्षण दिले पाहिजे आणि लढाई करावयास जातेवेळी त्यांना चांगल्या लढाऊ घोडयावर न बसविता चपळ व कहयात ठेवता येणाऱ्या घोडयांवर बसविले पाहिजे. त्यामुळे त्यांच्या भविष्यकाळच्या कामाचे त्यांना व्यवस्थित निरीक्षण करता येते आणि संकटकाळी ते वृद्ध व अनुभवी सेनापतीबरोबर सुखरूप बाहेर पडू शकतील.

**ग्लॅकॉन** : तुमची कल्पना चांगली आहे.

**सॉक्रेटिस** : आता लष्करी नोकरीच्या नियमांसंबंधी आपण विचार करू. सैनिकांचा परस्परसंबंध कसा असावा यासंबंधी माझी पुढील मते बरोबर आहेत की नाहीत ते सांगा.

**ग्लॅकॉन** : ती काय आहेत ते सांगा.

**सॉक्रेटिस** : एखादा सैनिक आपली तुकडी सोडून देऊन आणि शस्त्राचा त्याग करून देऊन पळून गेला तर त्याला आपण कारागीर अथवा शेतकरी यांच्या वर्गात घालावे ना ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : जर एखादा सैनिक जिवंतपणी शत्रूच्या हाती सापडला तर त्याच्यावर शत्रूची मालकी समजण्यात येऊन शत्रूला त्याचे वाटेल ते करण्यास मोकळीक द्यावी ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : जर एखाद्या सैनिकाने युद्धात अप्रतिम कौशल्य दाखविले तर त्याच्याबरोबर असलेल्या इतर सैनिकांनी पुष्पहार घालून त्याचे अभिनंदन करावे ना.?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : त्याच्याशी हस्तांदोलनही त्यांनी केले पाहिजे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : माझ्या दुसऱ्या प्रस्तावास तुम्ही संमती द्याल अशी माझी अपेक्षा आहे.

**ग्लॅकॉन** : कोणत्या ठरावाला ?

**सॉक्रेटिस** : त्याने सर्वांचे चुंबन घ्यावे व सर्वांनी त्याचे चुंबन घ्यावे.

**ग्लॅकॉन :** माझी हचा ठरावाला पूर्ण संमती आहे. एवढेच नव्हे तर असाही नियम करावा, लढाई करत असताना ज्या मनुष्याचे त्याला चुंबन घेण्याची इच्छा आहे ती पूर्ण केली जावी. कारण चुंबन घेणे हे आपल्या शौर्याचे बक्षीस घेण्यासारखे आहे असे वाटून वरील नियमांमुळे तो जास्त शौर्याने लढेल.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. आपण पूर्वी असे म्हटले आहे की, संरक्षकाला सामान्य माणसापेक्षा अधिक विवाह करण्याची सवलत द्यावी. अशी सवलत देण्यामुळे त्याच्यासारख्या शूर स्वभावाची अधिक मुले निर्माण होऊ शकतील.

**ग्लॅकॉन :** आपण असे म्हटले होते खरे.

**सॉक्रेटिस :** जे संरक्षक आपल्या पराक्रमामुळे प्रसिद्ध होतात त्यांचा विविध प्रकारे सत्कार करावा असे होमरचे मत आहे. अजॅक्सने लढाईत शौर्य गाजविल्यामुळे त्याला गोमांस[1] देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कारामुळे त्याची कीर्ती तर वाढलीच शिवाय शिक्षणाच्या सुरुवातीस तो अत्यंत आवश्यक असल्यामुळे शारीरिक व मानसिक शक्ती वाढविण्यास कारणीभूत झाला.

**ग्लॅकॉन :** हा प्रयोग स्तुत्य आहे.

**सॉक्रेटिस :** हचा बाबतीत तरी आपण होमरच्या मताची अमलबजावणी करावी. आपणसुद्धा यज्ञ आणि त्याच्यासारख्याच इतर प्रसंगी गुणी सैनिकांचा त्यांनी दाखविलेल्या शौर्यानुरूप असा केवळ गाण्यांनी वा सवलती देऊन सत्कार न करता मद्यपूर्ण पेले, [2]मांस व मानाची जागा देऊन सत्कार करावा. यामुळे शूर पुरुष व स्त्रिया यांचा योग्य तो आदर केला जाऊन त्यांचे बळ वाढेल.

**ग्लॅकॉन :** ही योजना छान आहे.

**सॉक्रेटिस :** ज्यावेळी सैनिक लढाईत मारले जातात त्या वेळेस जे रणांगणावर मेले ते आपल्या कुलाला ललामभूत झाले असे आपण म्हणतो.

**ग्लॅकॉन :** आपण असे नक्कीच म्हणू.

**सॉक्रेटिस :** जेव्हा अशा लोकांपैकी एखादा मरतो तेव्हा हिसिअडच्या पुढील कल्पनेवर आपण विश्वास ठेवावा का ? हे[3] लोक पिशाचयोनी धारण करून पृथ्वीवर हिंडत असतात. ते दयाळू, पवित्र व वाईट गोष्टींपासून रक्षण करणारे असून गुणी लोकांचे संरक्षक असतात.

**ग्लॅकॉन :** होय. या कल्पनेवर आपण विश्वास ठेवू.

**सॉक्रेटिस :** अलौकिक व दैवी पुरुषांचे प्रेतसंस्कार व पुरण्याच्या जागा आपण भविष्यवाणीच्या निर्देशाप्रमाणे ठरवावी ना ?

---

[1] Illiad VII 321. [2] Illiad VII 162. [3] Works and Dadys 121.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : त्यांची थडगी ही मंदिरे समजून त्यांची आपण आदराने पूजा केली पाहिजे. शौर्य गाजविल्यामुळे प्रसिद्धी मिळविलेला कोणीही नागरिक म्हातारपणामुळे अथवा इतर कोणत्याही कारणाने मरण पावला असता ह्याच चाली आपण पाळावयास पाहिजेत.

**ग्लॅकॉन** : असे करणे संयुक्तिक आहे.

**सॉक्रेटिस** : आपल्या संरक्षकांनी शत्रूबरोबर कसे वागावे ?

**ग्लॅकॉन** : कोणत्या बाबतीत ?

**सॉक्रेटिस** : प्रथम गुलाम करण्याचेच उदाहरण घेऊ. ग्रीस शहरातील स्वतंत्र लोकांना ग्रीक लोकांनी गुलाम करणे योग्य आहे का ? गुलामगिरीची ही पद्धत रानटी लोकांकडून आपला वंश गुलाम केला जाऊ नये म्हणून मोडून काढण्याचे प्रयत्न केले गेले पाहिजेत, बरोबर आहे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : त्यासाठी त्यांनी ग्रीक गुलाम स्वत:जवळ बाळगू नयेत व इतरांनाही बाळगू देऊ नयेत.

**ग्लॅकॉन** : नक्कीच. असे केल्यामुळे रानटी लोकांविरुद्ध लढण्यासाठी ते एकजूट करतील आणि एकमेकांना त्रास देणार नाहीत.

**सॉक्रेटिस** : युद्धात विजय मिळविल्यानंतर अंगावरील शस्त्रास्त्रे काढून घेण्यापलीकडे मृत शत्रूला अधिक नागविणे योग्य नाही. तसे केल्यास भित्रे सैनिक लढत असलेल्या शत्रूबरोबर सामना न करता मृत शरीरावर बंदूक रोखून आपण युद्ध खेळत असल्याचा देखावा करतील. लुटालूट करण्याच्या अनिष्ट पद्धतीमुळे बऱ्याचशा सैन्यांचा धुव्वा उडाला आहे.

**ग्लॅकॉन** : मृताला लुबाडणे ही एक अत्यंत हीन गोष्ट आहे. शत्रू लढाईत मारला गेल्यानंतर त्याच्या मृत शरीराविषयी वैर ठेवणे ही गोष्ट मनाचे क्षुद्रत्वच दाखविते. त्याचे हे वागणे कुत्रे ज्याप्रमाणे त्यांना दगड मारले असता, दगड मारणाराला सोडून, दगडांवरच भुंकतात त्यासारखे असते.

**ग्लॅकॉन** : खरोखरच त्यांचे वागणे कुत्र्यांप्रमाणे असते.

**सॉक्रेटिस** : मृत सैनिकांच्या हालअपेष्टा करणे व त्यांच्या प्रेतसंस्कारामध्ये अडचणी निर्माण करणे हे प्रकार आपण बंद केले पाहिजेत ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : इतर ग्रीक लोकांचे आपल्याविषयी चांगले मत व्हावे अशी जर आपली इच्छा असेल तर आपल्या शत्रूंची विशेषत: ग्रीक लोकांची शस्त्रास्त्रे आपण देवाला अर्पण करता

कामा नयेत. कारण आपल्या बांधवांचा पराभव करून मिळविलेली ही विजयचिन्हे, देवळात नेली असता देऊळ अपवित्र होण्याची भीती असते. अर्थात भविष्यवाणीनेच निराळा कौल दिला तर इलाज नाही.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे मला मान्य आहे.

**सॉक्रेटिस :** ग्रीक लोकांच्या जमिनीची नासधूस व घरांची जाळपोळ ह्या बाबतीत तुमचे सैनिक शत्रूशी कसे वागतील ?

**ग्लॅकॉन :** ह्या बाबतीत मला तुमचे मत ऐकावयाचे आहे.

**सॉक्रेटिस :** ह्या दोन्हीही पद्धती मला मान्य नाहीत. माझे असे मत आहे की, जमिनीतील पीक तेवढे काढून न्यावे.

**ग्लॅकॉन :** का ?

**सॉक्रेटिस :** युद्ध व वर्गकलह ह्या दोन संज्ञेत अर्थभिन्नता आहे. जेव्हा मित्र व नातलग ह्यांच्याशी वैरभाव असतो तेव्हा त्याला वर्गकलह म्हणतात आणि जेव्हा परकीय लोकांशी वैरभाव असतो तेव्हा त्याला युद्ध असे म्हणतात.

**ग्लॅकॉन :** तुम्ही सांगितलेला फरक तर्क दृष्ट्या योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** ग्रीक जातीतील सर्व लोक एकमेकांना मित्र व नातलग समजतात, पण रानटी लोकांना ते शत्रू समजतात. माझे हे विधान बरोबर आहे ना ?

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणून ग्रीक लोक व रानटी लोक यांच्यामध्ये जेव्हा लढाई होते, तेव्हा स्वाभाविक शत्रू एकमेकांविरुद्ध लढाई करीत आहेत असे आपण समजून त्यांच्या वैरभावाला युद्ध असे म्हणू. परंतु ग्रीक लोकांमध्येच जेव्हा असा वैरभाव निर्माण होतो, तेव्हा स्वभावतः एकमेकांचे मित्र असल्यामुळे, त्यांच्या या वैरभावाला वर्गकलह असे म्हणता येईल.

**ग्लॅकॉन :** या मताला माझा पाठिंबा आहे.

**सॉक्रेटिस :** जेव्हा वर्गकलह निर्माण होऊन शहरात फूट पडते व एक पक्ष, दुसऱ्या पक्षाच्या जमिनीची नासधूस, घरांची जाळपोळ करतो, तेव्हा हा कलह पापाधारित असून. दोन्ही वर्गांना देशद्रोही म्हणण्यात येते. कारण जर ते खरे देशभक्त असते तर मातेप्रमाणे पवित्र अशा आपल्या जन्मभूमीची वाताहत करण्यास ते कधीही धजावले नसते. विजयी पक्षाने, पराभूत झालेल्या पक्षाच्या लोकांची पिके काढून नेण्यापेक्षा अधिक नुकसान करू नये. दोन्ही पक्ष कालांतराने एक होतील अशी आशा बाळगून, युद्ध टाळण्याचा प्रयत्न करावा.

**ग्लॅकॉन :** ही भावना मनाचा सुसंस्कृतपणाच दाखविते.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. तुम्ही जे शहर घडवीत आहात, ते ग्रीक शहरच आहे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : त्यातील नागरिक सभ्य व दयाळू असतील ना ?

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : सर्व हेलास हा आपलाच देश समजून, आपल्या देशबांधवांबरोबर समानतेने वागणारे ते ग्रीक लोक देशभक्त असतील ना ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : सर्व ग्रीक लोकांना ते बांधव समजून आपापसात झालेल्या भांडणास ते केवळ वर्गकलहच समजतील ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच आपली पुनः एकी होईल अशी आशा ते करतील ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : ह्यामुळे ते मित्रत्वाच्या नात्याने विरुद्ध पक्षाची चूक सुधारतील व शत्रूप्रमाणे त्यांना गुलाम न करता, त्यांचा नाश न करता, शिक्षकाप्रमाणे सौम्य शिक्षा करतील.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : ते स्वतः ग्रीक असल्यामुळे ग्रीस देशाचा नाश, घरांची जाळपोळ करणार नाहीत आणि शहरांतील स्त्री-पुरुष व मुले यांना शत्रू समजणार नाहीत. पुष्कळ ठिकाणी घरांचे व जमिनींचे मालक हे त्यांचे मित्रच असतील. त्यामुळे त्यांचे नुकसान करण्यास ते तयार होणार नाहीत. अपराधी लोकांना निरपराधी लोकांकडून शासन होईपर्यंतच ते आपला लढा चालू ठेवतील.

**ग्लॅकॉन** : आपल्या नागरिकांनी विरोधी पक्षाबरोबर वागताना हे नियम पाळावेत असे मला वाटते. तसेच ग्रीक लोक एकमेकांशी जसे वागतात, तसेच त्यांनी रानटी लोकांशीही वागावे असेही माझे मत आहे.

**सॉक्रेटिस** : तर मग, आपल्या संरक्षकांनी जमिनीची नासधूस व घरांची जाळपोळ करू नये, असा आपण कायदा केला पाहिजे.

□ □

# प्रकरण अठरा

# तत्त्वज्ञ राज्यकर्ते

**[V-471-C—474-B]**

**कथासूत्र :**

[' रिपब्लिक ' या ग्रंथातील अत्यंत महत्त्वाच्या विवेचनास प्रारंभ येथून होतो. या विवेचनात ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञान याविषयींची प्लेटोची मते प्रकट झालेली आहेत. त्याचप्रमाणे समाज आणि राज्यशासन यांना आदर्श नीतिमूल्यांचे अधिष्ठान मिळण्यासाठी, जीवनाची सम्यक्‌दृष्टी असलेल्या, तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांची का गरज आहे आणि ती गरज कशी पूर्ण करता येईल याविषयीचेही प्लेटोचे दृष्टिकोन क्रमशः व्यक्त झालेले आहेत.

प्लेटोच्या मते स्थलकालातीत, शाश्वत, सत्‌-तत्त्वांचे (Ideas) ज्यांना पूर्ण ज्ञान आहे आणि क्षणभंगुर सुखाऐवजी पूर्णत्वाची ज्ञानसाधना जे करतात, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच व्यक्ती आणि समाज यांचे जीवन आदर्श होऊ शकेल.]

* * * * *

**ग्लॅकॉन** : परंतु का हो सॉक्रेटिस, मला असे वाटते की, अशा तऱ्हेने जर तुम्हाला बोलू दिले, तर हया प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी जो प्रश्न आपण बाजूला ठेवलेला आहे की ही घटना शक्य असेल की नाही, अथवा शक्य असल्यास ती अमलात कशी आणता येईल याबद्दल विचार करणे तुम्ही विसरणार तर नाही ना ? तथापि ही घटना समजा अमलात आली, तर तीपासून शहराला सर्व तऱ्हेचे फायदे मिळतील. याच्या पूर्ततेसाठी तुम्ही ज्या गोष्टी गाळल्या त्या मला सांगता येतील. आई-वडील, बंधू-भगिनी ही एकमेकांत असलेली नाती माहीत असल्यामुळे नि या नात्यांनी आपण एक दुसऱ्यास हाका मारीत असल्यामुळे ही माणसे एक दुसऱ्यास सोडण्यास तयार नसतात. म्हणून ती स्वतःच्या शत्रूंविरुद्ध कौशल्याने लढतात. त्याप्रमाणेच पुरुषांच्या बरोबरीने काम करणे, शत्रूंच्या मनात भीती निर्माण करणे अशा जरुरीच्या प्रसंगी मदत करण्याकरिता, खास राखून ठेवलेले सैनिक म्हणून स्त्रियांना सैन्यात घेतले तर आपले सैनिक अजिंक्य होतील. शिवाय आपण विचार न केलेले गृहसौख्याचे फायदेही मला स्पष्ट दिसताहेत. तेव्हा या पद्धतीचा अवलंब केल्यास असे अनंत फायदे त्यामुळे होऊ शकतील हे मला पूर्ण मान्य असल्यामुळे आपण अधिक वर्णन करण्याची काय आवश्यकता ? म्हणून इतर सर्व प्रश्न सोडून, ही व्यवहार्य असलेली पद्धतच ती कशी व्यवहार्य करता येईल, यावरच अधिक विचार करू.

**सॉक्रेटिस :** माझ्या विवेचनातील पाल्हाळीकपणाविषयी तुम्ही काहीच दया दाखविली नाही. किती अचानक हल्ला हा ! मी नुकत्याच कुठे आता दोन लाटा ओलांडल्या इतक्यात तुम्ही डोंगराएवढी मोठी भयंकर लाट माझ्यावर लोटीत आहात याची तुम्हाला काय कल्पना असणार ? जेव्हा आपण पहाल अथवा ऐकाल त्यावेळी मी असा का नकार देत होतो हे तुमच्या लक्षात येऊन, तुम्ही मला क्षमा कराल.

**ग्लॅकॉन :** असे जर तुम्ही बोलणार असाल तर तुमच्याकडून अधिक विवेचन ऐकण्याची आम्ही घाई करू. म्हणून ते स्पष्टीकरण लगेच सुरू करा.

**सॉक्रेटिस :** ठीक तर. न्याय-अन्याय या स्वरूपाविषयी विचार करताना आपण प्रस्तुत मुद्यापर्यंत तर आलो.

**ग्लॅकॉन :** खरे आहे. परंतु याचा प्रस्तुत ठिकाणी संबंधच काय ?

**सॉक्रेटिस :** तसा काही नाही. तेव्हा न्याय म्हणजे काय हे पाहिल्यानंतर न्यायी मनुष्याचा स्वभाव, हा न्यायापासून भिन्न असण्याऐवजी, तो न्यायाचीच केवळ नक्कल करीत आहे असे आपण दाखविले पाहिजे काय ? किंवा न्यायी मनुष्य, न्यायाच्या शक्य तितक्या जवळ असतो व न्यायाचा अंश जगातील इतर मनुष्यांपेक्षा त्याच्यामध्ये जास्त असतो, एवढे जरी सिद्ध केले तरी त्याने आपले समाधान होईल का ?

**ग्लॅकॉन :** दुसऱ्या प्रकारानेही समाधान मानता येईल.

**सॉक्रेटिस :** न्यायाचे स्वरूप आणि पूर्णपणे न्यायी मनुष्याचा स्वभाव, तसेच, अन्यायाचे स्वरूप आणि पूर्णपणे अन्यायी मनुष्याचा स्वभाव, यांविषयी चर्चा करताना आपला असा हेतू होता की, या दोन स्वभावांना आपण आदर्श समजावयाचे आणि सुख व दुःख ह्या दोन बाबतीत ह्या दोन आदर्शांचा संबंध कसा असतो हे पहावयाचे. ज्याचा स्वभाव न्यायाच्या किंवा अन्यायाच्या आदर्शाशी जसा जुळत असेल, तसाच त्याचा आयुष्यक्रम बनेल असे ठरवू.

**ग्लॅकॉन :** हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** समजा एखाद्या चित्रकाराने मानवी सौंदर्याचा अत्यंत सुंदर नि निर्दोष असा एक आदर्श मनुष्य रंगविला आहे. पण सत्यसृष्टीत त्या चित्राइतका सुंदर मनुष्य त्याला दाखविता आला नाही म्हणून काही त्या चित्राचे महत्त्व कमी ठरत नाही.

**ग्लॅकॉन :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच आपणही निर्दोष राज्यसंस्थेचा आदर्श कल्पनेने उभारीत आहोत.

**ग्लॅकॉन :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** तेव्हा आपल्या कल्पनेनुसार एखादे शहर उभारणे शक्य आहे हे जर आपण सिद्ध करू शकलो नाही तर आपली कल्पना खोटी ठरेल का ?

**ग्लॅकॉन :** अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस :** हीच तर वस्तुस्थिती आहे. तेव्हा तुम्हाला असे विचारतो की, तुमच्या समाधानाकरिता कोणत्या तऱ्हेने आणि कोणत्या परिस्थितीत आपले ध्येय पुरे करता येईल ?

**ग्लॅकॉन :** कोणत्या तऱ्हेने ?

**सॉक्रेटिस :** कल्पनेने रंगवलेली रूपरेषा व्यवहारात पूर्णत्व पावू शकणार नाही. निसर्गाचा नियमच असा आहे की, कल्पनेइतके सत्याशी कृतीचे सान्निध्य होणार नाही. तेव्हा तुमचे काय मत आहे ?

**ग्लॅकॉन :** तुमच्या प्रमाणेच आहे.

**सॉक्रेटिस :** तेव्हा मग आपली कल्पना बरोबर आहे किंवा नाही हे दाखविणे माझ्यावर सोपवू नका. परंतु तुमच्या वर्णनाशी जुळेल अशी राज्याची रचना करता येणे शक्य आहे हे जर दाखविता आले तर तुम्ही कबूल कराल की मला जो विचार करावयास सांगता, तो अमलात आणण्याचा मार्ग आपण शोधून काढला. एवढे सिद्ध झाले तर तुम्हाला समाधान वाटेल ना ? मला स्वतःला वाटेल.

**ग्लॅकॉन :** मलाही वाटेल.

**सॉक्रेटिस :** चालू राज्यपद्धतीमध्ये, अशी कोणती चूक आहे की, ज्यामुळे आपल्या वर्णनाप्रमाणे राज्यकारभार चालविला जात नाही ते आपण शोधले पाहिजे. त्याप्रमाणेच आपल्या काल्पनिक राज्याप्रमाणेच हल्लीची राज्ये कशी सुधारता येतील, हे दाखविले पाहिजे. मात्र असे फरक संख्येने व परिणामाच्या दृष्टीने कमीच असले पाहिजेत.

**ग्लॅकॉन :** असा प्रयत्न आपण करू या.

**सॉक्रेटिस :** ठीक, असा एक फरक आहे की त्यामुळे योग्य ती क्रांती घडवून आणता येईल. मात्र तो फरक लहान अथवा सोपा नाही. शक्य मात्र आहे.

**ग्लॅकॉन :** तो कोणता ?

**सॉक्रेटिस :** जिला मी मोठी लाट म्हटले तिलाच तोंड देण्याचा आता मजवर प्रसंग आला. तेव्हा खरोखरच हास्य व अपकीर्ती, ह्यांच्या लाटेने मी वाहून जाण्याची जरी भीती असली तरी कल्पना बोलून दाखविलीच पाहिजे. तेव्हा लक्ष द्या.

**ग्लॅकॉन :** बोला.

**सॉक्रेटिस :** राज्यामध्ये राज्याचा अधिकार तत्त्वज्ञानी लोकांना मिळाला पाहिजे. अथवा सध्या जे राजे व सत्ताधिकारी आहेत त्यांच्यामध्ये खऱ्या अर्थाने तत्त्वज्ञानाचे बीजारोपण झाले पाहिजे. म्हणजे एकाच व्यक्तीमध्ये राजकीय सत्ता व तत्त्वज्ञान ह्यांचा मिलाफ झाला पाहिजे. तरच शहरांची व मानवजातीची सुटका होईल. हल्ली तत्त्वज्ञान्यांना राजकीय सत्तेपासून दूर ठेवले जाते. राज्यकारभार करणारे तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत नाहीत. तेव्हा

ही परिस्थिती योग्य नाही. तसेच कल्पनेने उभारलेले आदर्श राज्यसुद्धा असा बदल झाल्याशिवाय जन्मास येणार नाही. ह्या विधानाने सामान्य विचारांना कदाचित धक्का बसेल ही जाणीव असल्यामुळेच मी हे आतापर्यंत बोलू शकलो नाही. तेव्हा राज्याला अथवा व्यक्तीला अन्य कोणत्याही प्रकाराने सौख्य मिळविता येणार नाही अशी लोकांची खात्री पटवून देणे कठीण आहे.

**ग्लॅकॉन :** सॉक्रेटिस, तुमची ही भाषा व भावना अशा स्वरूपाच्या आहेत की, क्षणाचाही विलंब न लावता लोक मिळेल ते शस्त्र हातात घेऊन तुमच्यावर हल्ला करण्याकरिता धावून येतील. तेव्हा वादविवादाच्या शस्त्रांनी त्यांना तुम्ही परतवू शकला नाही तर तुमची थट्टा होईल. तुम्हाला शिक्षा भोगावी लागेल.

**सॉक्रेटिस :** अहो पण हा प्रसंग तुम्हीच माझ्यावर आणलात.

**ग्लॅकॉन :** होय, मी योग्य तेच केले. पण मी तुम्हाला सोडून जाणार नाही हे वचन देतो. उलट माझ्या सदिच्छा व उत्तेजन ह्यांनी मी तुम्हाला मदत करीन आणि तुमच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची अधिक दक्षता घेईन. म्हणून माझ्यावर विसंबून अविश्वासू लोकांना तुमच्या विधानाची सत्यता पटवून देण्याचा प्रयत्न करा.

□ □

# प्रकरण एकोणीस

# तत्त्वज्ञ आणि तत्त्वज्ञान

**[V-474-B—483]**

**कथासूत्र :**

[प्लेटोच्या मते ज्ञानजिज्ञासा हा तत्त्वचिंतनाचा पाया होय. पण विविध स्वरूपाचे कला-कौशल्य, कारागिरी किंवा विविध स्वरूपातील शास्त्रे म्हणजे तत्त्वज्ञान नव्हे. अंतिम सत्य आणि अंतिम सत्ता यांचे सम्यक् ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान होय.

स्थलकालातीत, सत्-तत्त्वांचे ज्ञान हेच खरे सत्यज्ञान होय. त्यालाच विद्या किंवा ज्ञान अशी संज्ञा युक्तपणे वापरता येईल. याउलट, दृश्य, भौतिक, अशाश्वत अशा वस्तू, व्यक्ती, घटना यांच्याविषयीची मते म्हणजे असत्य होय.

**सत् आणि असत् हे द्वन्द्व, सत्य आणि असत्य हे द्वन्द्व प्लेटोच्या मीमांसेत महत्त्वाचे आहे. म्हणजेच प्लेटोची** ज्ञानमीमांसा आणि प्लेटोचे सत्ताशास्त्र परस्परावलंबी आहेत. ह्या दोन्हींचे अधिष्ठान त्याचा सत्-तत्त्व-सिद्धान्त (Theory of Ideas or Forms) हा आहे.

सॉक्रेटिसने इन्द्रिय ज्ञानाऐवजी आणि त्याद्वारा मिळणाऱ्या संवेदनांऐवजी बुद्धी हे ज्ञानाचे साधन मानून बौद्धिक संकल्पनांना सत्यज्ञानाचे विषय मानले होते. सॉक्रेटिसप्रणीत ज्ञानशास्त्राचाच सत्ताशास्त्रीय विकास आपल्याला प्लेटोच्या तत्त्वज्ञ आणि तत्त्वज्ञान यांच्या विवेचनात आढळतो.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** मी मदत करावी अशी तुमची अपेक्षा आहे. ती मी पुरी केलीच पाहिजे. जे लोक आक्रमक आहेत, त्यांच्याकडून आपली सुटका होण्याची शक्यता असल्यास, मला वाटते, आपण त्यांना 'तत्त्वज्ञानी' या शब्दाची व्याख्या सांगितली पाहिजे. तसेच ज्या लोकांनी राज्य केले पाहिजे असे आपण म्हणतो, त्यांचेही वर्णन केले पाहिजे. तत्त्वज्ञानी लोकांच्या स्वभावाचे पूर्ण स्पष्टीकरण केल्यावर आपणांस असे दिसून येईल की, तत्त्वज्ञानाचे परिशीलन करून राज्यकारभारात पुढाकार घेणे हेच त्यांचे कार्य असून, इतरांनी तत्त्वज्ञानाचा त्याग करून, त्यांच्या हाताखाली काम करावे.

**ग्लॅकॉन :** तत्त्वज्ञानी लोकांची व्याख्या करण्यास हीच योग्य वेळ आहे.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. आपली कल्पना अधिक स्पष्ट करण्याच्या कामाला आपण सुरुवात करू. तुम्ही माझ्या पाठोपाठ या.

**ग्लॅकॉन :** ठीक आहे.

**सॉक्रेटिस :** जेव्हा एखादा मनुष्य, एखाद्या वस्तूवर प्रेम करतो, तेव्हा तो त्या वस्तूच्या एका भागावर प्रेम करीत नसून, सर्व वस्तूंवरच प्रेम करतो असे आपण पूर्वी म्हटले होते ना ?

**ग्लॅकॉन :** मला नीट आठवत नाही आणि तुम्ही काय म्हणता ते पण समजत नाही.

**सॉक्रेटिस :** ग्लॅकॉन, असे म्हणणे दुसऱ्या एखाद्या माणसाला शोभले असते. तुमच्यासारख्या स्वभावाच्या माणसाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, मुलांवर प्रेम करणारा मनुष्य, तारुण्याच्या ऐन उमेदीत असलेल्या सर्व मुलांच्या शारीरिक सौंदर्याने आकर्षिला जातो. शिवाय त्याला असेही वाटते की, सर्व मुलांनी त्याचे लक्ष व प्रेम ओढून घ्यावे. आपल्या आवडत्या व्यक्तींबरोबर तुम्ही अशाच प्रकारे वागता ना ? एखाद्या मुलाचे नाक उंच असेल तर तुम्ही अभिमानाने म्हणाल की, त्याचा चेहरा आकर्षक आहे. एखाद्याचे नाक वाकलेले असेल, तर तुम्ही म्हणाल की, तो राजासारखा दिसतो. एखाद्याचे नाक या दोन टोकांना सोडून मध्यम प्रकारचे असेल, तर त्याचा चेहरा सुंदर व रेखीव आहे असे म्हणाल. शामवर्णाच्या मुलांना मर्दानी, तर सुंदर चेहऱ्याच्या मुलांना देवकुमार म्हणून तुम्ही त्यांची स्तुती कराल. एखाद्या प्रियकराच्या तारुण्यामुळे गालावर आलेल्या फिक्कटपणाचे, इतर कारण नसल्यामुळेच ' ऑलिव्हप्रमाणे फिक्कट ' असे विशेषण प्रचारात आले असेच तुम्हाला वाटते ना ? थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, या ना त्या कारणाने यौवनावस्थेमुळे सुंदर दिसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची तुम्ही स्तुतीच करीत असता ना ?

**ग्लॅकॉन :** माझ्या स्वतःच्या अनुभवावरून जर तुमचे मत असे असेल की, प्रणयी लोकांचे वर्तन असे असते तर, आपली चर्चा पुढे चालू रहावी म्हणून मी हे सर्व मान्य करतो.

**सॉक्रेटिस :** जे लोक दारू पिणारे असतात त्यांचे वर्तन असेच असते का ? कोणत्या तरी निमित्ताने ते दारूच्या विविध प्रकारांची स्तुती करीत नाहीत का ?

**ग्लॅकॉन :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** तुला याचाही निश्चित अनुभव असेल की, ज्यांना प्रतिष्ठेची हाव असते त्यांना सेनाधिपती जरी होता आले नाही तरी आपल्या भोवती ते लोकांचा घोळका जमा करू शकतात. जरी मोठ्या आणि महत्त्वाच्या व्यक्तीकडून त्यांना मान मिळाला नाही तरी सामान्य आणि क्षुल्लक माणसाकडून मान मिळाल्यास त्यांना आनंद होतो. कशाही रीतीने मान मिळावा अशी त्यांची इच्छा असते.

जेव्हा एखाद्या व्यक्तीस एखाद्या गोष्टीची अपेक्षा असते त्यावेळी ती त्या गोष्टीच्या सर्व भागांची इच्छा करते की, एकाची इच्छा करून दुसऱ्याकडे लक्ष करते ?

**ग्लॅकॉन :** सर्व भागांची इच्छा ती व्यक्ती करते.

**सॉक्रेटिस** : तत्त्वज्ञानी किंवा ज्ञानी काही ज्ञानाची अपेक्षा न करता सर्व ज्ञानाची अपेक्षा करतो असे आपण म्हणू शकू ना ?

**ग्लॅकॉन** : हो. तो सर्व प्रकारच्या ज्ञानाची अपेक्षा करतो.

**सॉक्रेटिस** : याकरिता चांगले काय, वाईट काय हे कळण्याची पात्रता नसेल आणि जर एखादा तरुण अभ्यासात दुर्लक्ष करू लागला तर आपणांस असे म्हणता येईल की, त्यास ज्ञान किंवा शहाणपणा याची खरी आवड नाही. खाद्य पदार्थांची चोखंदळ अभिरुची ज्याला असते, त्याला बुभुक्षू किंवा खादाड असे आपण म्हणत नाही.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : याउलट, कोणतेही ज्ञान स्वेच्छेने मिळविण्यास तयार असणारा आणि ज्ञानसाधनेच्या बाबतीत नेहमी अतृप्त असणारा माणूसच खरा तत्त्वज्ञानी होय असे आपणांस म्हणता येईल ना ?

**ग्लॅकॉन** : तुम्ही केलेल्या वर्णनात विविध प्रकारच्या व्यक्तींचा समावेश होतो असे तुम्हास आढळेल. मग देखावे पाहण्याची आवड असलेल्या माणसासही तत्त्वज्ञानी म्हणावे लागेल. कारण तेसुद्धा काही प्रकारचे ज्ञान मिळवून आनंद मिळवितातच. त्याचप्रमाणे संभाषण किंवा गायन ऐकण्यानेही ज्यांना आनंद होतो त्यांनाही तत्त्वज्ञानी म्हणावे लागेल. असे लोक शक्यतो तात्त्विक वादविवादाच्या कार्यक्रमांना गैरहजर राहतात आणि शहरात किंवा खेडचात भरणाऱ्या 'डायोनिषियन' उत्सवप्रसंगी आपले कान ते सर्व प्रकारच्या गाण्याच्या कार्यक्रमांना भाडचाने देतात. अशांना किंवा अशा विषयाचा अभ्यास करणाऱ्या लोकांना, छोटचा छोटचा कलावंतांनासुद्धा आपल्याला तत्त्वज्ञ म्हणावे लागेल, होय ना ?

**सॉक्रेटिस** : मुळीच नाही. ते खोटे तत्त्वज्ञानी होत.

**ग्लॅकॉन** : मग खरा तत्त्वज्ञानी कुणास म्हणावयाचे ?

**सॉक्रेटिस** : ज्या व्यक्तींना सत्यदर्शनाची आवड असते त्यांनाच.

**ग्लॅकॉन** : तुमची ही व्याख्या चुकीची नाही. पण तुम्ही तुमचे म्हणणे अधिक स्पष्ट कराल का ?

**सॉक्रेटिस** : आणखी कोणी प्रश्न विचारला असता तर माझे काम थोडे अवघड झाले असते. मला वाटते, मी आता जे म्हणतो, ते तुला मान्य होईल.

**ग्लॅकॉन** : ते कोणते ?

**सॉक्रेटिस** : जर सौंदर्य आणि कुरूपता परस्परविरुद्ध असतात तर सौंदर्य आणि कुरूपता या दोन वस्तू भिन्न असतात असे आपणांस म्हणता येईल.

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस :** जर, त्या दोन आहेत तर त्या स्वतंत्र आहेत.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** न्याय-अन्याय, सत्-असत् या सर्वांबद्दल आपण असे म्हणू शकू की, त्या स्वतंत्र वस्तूच आहेत. पण क्रिया, पदार्थ आणि कल्पना यांचे जर मिश्रण झाले तर त्यांचे एकत्व आणि स्वतंत्रता नाहिशी होऊन त्या भिन्न आणि अनेक वाटू लागतात.

**ग्लॅकॉन :** तुमची भूमिका बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** दृष्टिसुखाचा आनंद घेणारे कलावंत आणि व्यवहारचतुर व्यक्ती ही खऱ्या तत्त्वज्ञानी व्यक्तीपेक्षा भिन्न असते असे मी मांडलेल्या तत्त्वाच्या आधाराने म्हणत आहे.

**ग्लॅकॉन :** तुमची भूमिका अधिक स्पष्ट कराल का ?

**सॉक्रेटिस :** ज्यांना दृष्टिसुख, श्रवणसुख आवडते त्यांना सुरेल स्वर, नाद, रंग, आकृती आवडतात आणि त्यांचा समावेश असणाऱ्या कलाही आवडतात. पण अशा व्यक्तींची बुद्धी शुद्ध स्वरूपाचे सौंदर्यत्व जाणू शकत नाही.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** परंतु सौंदर्याच्या शुद्ध स्वरूपाचे बौद्धिक वर्णन करू शकणारे लोक थोडेच असतात ना ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** जी व्यक्ती सुंदर वस्तूंचे अस्तित्व मान्य करते पण शुद्ध सौंदर्य मानत नाही किंवा शुद्ध सौंदर्याचे ज्ञान जर कुणी करून दिले तर तिला ते समजत नाही अशी व्यक्ती स्वप्नसृष्टीत वावरते की जागृतावस्थेत त्याचा तुम्ही विचार केला पाहिजे. जेव्हा माणूस प्रतिमेलाच वस्तू समजतो तेव्हा तो स्वप्नातच वावरत नाही का ?

**ग्लॅकॉन :** त्यावेळी ती व्यक्ती स्वप्नात वावरते हे मला मान्य आहे.

**सॉक्रेटिस :** याऐवजी जो शुद्ध सौंदर्य मानतो, ते सौंदर्यत्व ओळखतो आणि त्याचा समावेश ज्या वस्तूंमध्ये होतो त्या वस्तूंनाही ओळखतो; शिवाय वस्तू आणि तत्त्व या दोन गोष्टी भिन्न आहेत हे ज्याला बरोबर कळते अशी व्यक्ती स्वप्नावस्थेत असते की जागृतावस्थेत ?

**ग्लॅकॉन :** निश्चितच जागृतावस्थेत.

**सॉक्रेटिस :** मग जागृतावस्थेला ज्ञान म्हणणे योग्य नव्हे का ? कारण त्या व्यक्तीलाच खरे ज्ञान होते. याउलट स्वप्नस्थितीतील ज्ञानाला केवळ मतप्रदर्शन म्हणणे योग्य नव्हे का ?

**ग्लॅकॉन :** हो, बरोबर.

**सॉक्रेटिस** : ज्ञान नसलेली आणि केवळ मतप्रदर्शन करू शकणारी व्यक्ती जर आपल्यावर चिडून आपले म्हणणे बरोबर नाही असे म्हणू लागली तर तिचा राग शांत करून, शांतपणे तिचे मन ठिकाणावर नाही असे आपण तिला पटवून देऊ शकू ना ?

**ग्लॅकॉन** : असे करणे खात्रीनेच योग्य होईल.

**सॉक्रेटिस** : तिला आपण काय सांगावयाचे याचा आता आपण विचार करू या. तिला आपण असे म्हणू, "जर तुला खरोखरीच ज्ञान प्राप्त झाले असेल तर त्यात आम्हाला आनंदच आहे." त्यानंतर आपण तिला विचारू, "जो ज्ञानी असतो तो काही जाणतो की जाणत नाही ?" या बाबतीत, ग्लॅकॉन तू कृपया उत्तर दे.

**ग्लॅकॉन** : तो काहीतरी जाणतो.

**सॉक्रेटिस** : ज्याला अस्तित्व आहे त्याविषयी की, ज्याला अस्तित्व नाही त्याविषयी तो जाणतो ?

**ग्लॅकॉन** : अर्थातच अस्तित्व आहे त्याविषयी ! जे अस्तित्वातच नाही त्याचे ज्ञान कसे होणार ?

**सॉक्रेटिस** : जे पूर्णपणे अस्तित्वात असते त्याचे पूर्ण ज्ञान होऊ शकते आणि जे मुळीच नसते ते पूर्णतः अज्ञातच राहते. कसाही विचार केला तरी आपणांस असे खात्रीने म्हणता येईल ना ?

**ग्लॅकॉन** : हो. त्याची मला पूर्ण खात्री आहे.

**सॉक्रेटिस** : बरं. जर एखादे असे असेल की, जे एकाच वेळी असेल व नसेल तर ते पूर्ण अस्तित्वात असणे आणि मुळीच नसणे यामध्ये कोठेतरी असेल ना ?

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : जर ज्ञानाचा संबंध असणाऱ्या वस्तूशी असतो आणि अज्ञानाचा संबंध नसणाऱ्या वस्तूशी असतो, त्याअर्थी ज्ञान व अज्ञान यांच्यामध्ये असलेली वस्तू, जी असते व नसते, ती कोणती हे पाहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : समज किंवा मत याचे अस्तित्व आपण मान्य करतो ना ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : ज्ञान आणि समज या गोष्टी भिन्न आहेत, की एकच आहेत ?

**ग्लॅकॉन** : भिन्न आहेत.

**सॉक्रेटिस** : याचा अर्थ, समज आणि ज्ञान यांचे क्षेत्र भिन्न असून दोहोंचे कार्य आपापल्या शक्तीनुसार होत असते.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** जर आहेपणाचा संबंध ज्ञानाशी असतो तर असलेली वस्तू कशी असते हे ज्ञानाचे कार्य नव्हे काय ? मला वाटते आणखी एक फरक आपण दार्खविला पाहिजे.

**ग्लॅकॉन :** तो कोणता ?

**सॉक्रेटिस :** स्वतःला आणि इतरांना ज्या ज्या गोष्टी करता येतात त्या सामान्यपणे इंद्रियांच्या मदतीने होतात. उदा. पाहणे, ऐकणे इ.

**ग्लॅकॉन :** समजले.

**सॉक्रेटिस :** या इंद्रियांच्या शक्तीबद्दल मला जे वाटते ते मी सांगतो. रंग, रूप इ. गुणांनी मला एक वस्तू दुसरीहून भिन्न आहे असे म्हणता येते. ते गुण मला वस्तूंत दिसतात, पण इंद्रियांच्या शक्तीमध्ये दिसत नाहीत. शक्तीमध्ये तिचे कार्य आणि क्षेत्र मला दिसते. ज्यावेळी हे कार्य आणि क्षेत्र एकच असते त्यावेळी मी तिला एकच शक्ती मानतो. जेव्हा ती भिन्न असतात तेव्हा मी त्यांना भिन्न शक्ती जाणतो. तुझे मत काय आहे ?

**ग्लॅकॉन :** तुमच्याप्रमाणेच आहे.

**सॉक्रेटिस :** ठीक. ज्ञानाच्या बाबतीत आपण काय म्हणू ? ज्ञान ही शक्ती म्हणता येईल का ?

**ग्लॅकॉन :** हो. सर्व शक्तींमध्ये ती अत्यंत सामर्थ्यवान आहे.

**सॉक्रेटिस :** समज ही शक्ती म्हणता येईल का ? का त्याला अन्य काही म्हणावे ?

**ग्लॅकॉन :** त्याला दुसरे काही म्हणण्याची गरज नाही. आपल्याला समज किंवा मत बर्नावता येते तेव्हा त्यांना अन्य काही म्हणण्याची गरज नाही.

**सॉक्रेटिस :** काही वेळापूर्वी तू हे कबूल केले आहेस की, ज्ञान आणि समज या गोष्टी एक नाहीत.

**ग्लॅकॉन :** कोणता शहाणा माणूस प्रमादातीत आणि प्रमादक्षम यांना एकच मानेल ?

**सॉक्रेटिस :** ठीक. मग ज्ञान आणि समज या गोष्टी भिन्न आहेत यांविषयी आपले.एकमत झाले.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** मग तात्त्विक दृष्टीने त्यांचे क्षेत्र व उपयुक्तता भिन्न आहेत.

**ग्लॅकॉन :** अर्थात.

**सॉक्रेटिस :** सद्वस्तूचे रूप जाणणे हा ज्ञानाचा विषय आहे.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** समज किंवा मत यांचा विषय समज किंवा मत बनविणे हा आहे.

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** ज्ञान ज्या सद्वस्तूचे असते ते समजाविषयीही विचार करते काय ? म्हणजेच समज आणि ज्ञान यांचे विषय एकच आहेत की, तसे असणे अशक्य आहे ?

**ग्लॅकॉन :** अशक्य आहे. भिन्न कार्यशक्तींचे क्षेत्र भिन्न असते. ज्ञान आणि समज या भिन्न शक्ती आहेत असे एकदा मान्य केल्यानंतर त्यांचे अभ्यासविषय एकच आहेत असे म्हणणे अशक्य आहे.

**सॉक्रेटिस :** सत् हा जर ज्ञानाचा विषय मानला तर समज किंवा मत ह्याचा विषय सत्खेरीज अन्य काहीतरी मानावा लागेल.

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** नाहीपणा हा समज किंवा मत ह्याचा विषय होऊ शकेल का ? किंवा जे अस्तित्वातच नाही त्याच्याविषयी मत बनविणेसुद्धा अशक्य आहे का ? जेव्हा मनुष्य एखादे मत बनवितो तेव्हा ते कशाबद्दल तरी असते ना ! का जे अजिबात अस्तित्वातच नाही त्याबद्दल तो मत बनवितो असे म्हणता येईल का ?

**ग्लॅकॉन :** असे असणे शक्य नाही.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच मनुष्य जेव्हा मत किंवा समज सांगतो तेव्हा तो कशाबद्दल तरी असतो ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** वस्तुतः जे नाही ते काहीतरी आहे असे म्हणता येत नाही. उलट ते काहीच नाही असे म्हणणेच खरे ठरेल.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** नसणाऱ्या वस्तूंबद्दल अज्ञान नसून असणाऱ्या वस्तूंबद्दल ज्ञान असते असे आपण म्हटले आहे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** यावरून आपल्याला असे म्हणता येईल की, अस्तित्वात असणाऱ्या किंवा नसणाऱ्या वस्तू समज किंवा मत ह्याचा विषय होऊ शकत नाहीत.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच समज किंवा मत म्हणजे अज्ञानही नव्हे किंवा ज्ञानही नव्हे.

**ग्लॅकॉन :** उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** यावरून समज हा ज्ञान व अज्ञान ह्याच्यापलीकडे असून तो ज्ञानाला स्पष्टपणात व अज्ञानाला गूढपणात मागे टाकतो असे म्हणता येईल.

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** मग ज्ञानापेक्षा थोडाफार गूढ व अज्ञानापेक्षा थोडाफार प्रकाशमान असे समजाचे वर्णन करता येईल काय ?

**ग्लॅकॉन :** ज्ञान व अज्ञान यांच्यापासून तो इतक्या स्पष्ट रीतीने भिन्न दाखविता येईल.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच ज्ञान व अज्ञान या दोन टोकांच्या मध्ये तो असतो काय ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच समज ह्या दोन टोकांपैकी कुठेतरी असतो.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मघाशी आपण असे म्हटले होते की, जी वस्तू एकाच वेळी असते आणि नसते, ती केवळ सत् व केवळ असत् ह्यांच्यामध्ये असते आणि अशी वस्तू ज्ञान व अज्ञान या दोहोंचा विषय न होता तिसऱ्याच एका शक्तीचा विषय होते.

**ग्लॅकॉन :** होय. आपण असे म्हटले होते.

**सॉक्रेटिस :** समज किंवा मत ही आपण तिसरी शक्ती समजू या.

**ग्लॅकॉन :** ठीक.

**सॉक्रेटिस :** आता आपणांस सत् व असत् यांच्याशी संबंध असूनही त्यांच्यापैकी एक असे ज्याचे वर्णन करता येणार नाही असे जे आहे त्याचा शोध घेतला पाहिजे. कारण अशाचा जर आपणांस शोध लागला तर तो समज किंवा मत ह्याचा विषय म्हणता येईल. म्हणजेच विरुद्ध टोकांच्या शक्तीच्या विषयाबरोबरच मध्यम शक्तीचासुद्धा विषय ठरविता येईल. माझे म्हणणे बरोबर आहे का ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** ह्या गोष्टी निश्चित केल्यानंतर, जो मनुष्य सुंदरतेतील विविधता मानतो पण अविकारी सनातन निरुपाधिक सौंदर्याचे अस्तित्व मानीत नाही ; तसेच दृष्टीसुखाचा भोक्ता असूनही सौंदर्य एक आहे, न्याय एक आहे या गोष्टी ऐकून घेत नाही अशा मनुष्याला मी पुढील प्रश्न विचारीन, "हे गृहस्था, सर्व सुंदर वस्तूंमध्ये अशी एखादी वस्तू आहे का की, जी कुरूप दिसणार नाही ? सर्व न्याय्य कृत्यांपैकी एखादे कृत्य असे आहे का की, जे अन्याय्य वाटणार नाही, अथवा पवित्र वस्तूंपैकी एखादी वस्तू अशी आहे का की, ती पवित्र वाटणार नाही ?"

**ग्लॅकॉन** : म्हणजेच ती वस्तू सुंदर, कुरूप, न्यायी, अन्यायी, पवित्र, अपवित्र अशा दोन्ही प्रकारची वाटली पाहिजे.

**सॉक्रेटिस** : अनेक वस्तूंच्या दुप्पटीचा जसा विचार करता येतो तसा त्यांच्या निम्पटीचाही करता येतो ना ?

**ग्लॅकॉन** : होय. करता येतो.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे ज्या वस्तू लहान-मोठ्या, हलक्या-जड म्हणून वर्णन करतो त्यांना त्यांच्याविरुद्ध असलेल्या वस्तूंपेक्षा अशा संज्ञांना जास्त अधिकार पोहोचतो काय ?

**ग्लॅकॉन** : नाही. विरुद्ध वस्तूंनाही सारखाच अधिकार आहे.

**सॉक्रेटिस** : मग पुष्कळ वस्तूंपैकी प्रत्येक वस्तू तिच्याविषयी जे म्हणण्यात येते त्याप्रमाणे असते व नसते असे म्हणणे योग्य होईल का ?

**ग्लॅकॉन** : मेजवानीच्या प्रसंगी अथवा मुलांचे मनोरंजन करण्याकरिता "काही लोक एका षंढाने वाघुळाला फेकून मारले" असे कोडे घालतात ते कशाने मारले व वाघूळ कशावर बसले होते याविषयी गर्भित सूचना देऊन ज्याप्रमाणे वरील कोडे सोडवावयास सांगतात त्याप्रमाणे तुमची भाषा आहे. आपण ज्या वस्तूंबद्दल विचार करत आहोत त्यांचेही स्वरूप अस्पष्ट आहे. त्यामुळे त्या वस्तू आहेत किंवा नाही किंवा आहेतही, नाहीतही अथवा यांपैकी काहीच नाहीत अशा प्रकारचे निश्चित विधान करता येणार नाही.

**सॉक्रेटिस** : अशा वस्तूंचे काय करावे. सत् व असत् यांच्यामधील जागेपेक्षा अधिक योग्य जागा त्यांना देता येईल का ? नसणाऱ्या वस्तूंपेक्षा त्या अधिक गूढ नसल्यामुळे त्या नसणाऱ्या वस्तूंपेक्षा कमी प्रतीच्या नाहीत व असणाऱ्या वस्तूंपेक्षा त्या अधिक प्रकाशमान नसल्यामुळे असणाऱ्या वस्तूंपेक्षा त्या जास्त प्रतीच्याही नाहीत.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : यावरून आपणांस असे म्हणता येईल की, समाजात प्रचलित असलेल्या सौंदर्य, न्याय इ. कल्पना केवळ सत्, केवळ असत् यांच्या मध्यावर भटकत असतात.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच आपण पूर्वी म्हटल्याप्रमाणे अशा प्रकारच्या 'काही' चा शोध लागल्यावर ते ज्ञानाचा विषय नसून समज किंवा मत ह्याचा विषय आहे असे समजावे. कारण मध्येच भटकणाऱ्या त्या वस्तू मधल्या प्रकारच्या शक्तीनेच पकडल्या जातात.

**ग्लॅकॉन** : आपण पूर्वी असे ठरविले आहे.

**सॉक्रेटिस** : लोकांना सुंदर वस्तूंच्या समूहाकडे जरी बघता येत असले तरी केवळ सौंदर्य समजण्याची जेव्हा त्यांना दृष्टी नसते किंवा कोणी सांगितले तरी ग्रहण करण्याची शक्ती

नसते. तसेच न्यायाची कृत्ये जरी बघता आली तरी न्यायाची केवळ कल्पना त्यांना समजत नसते, तेव्हा आपणांस असे म्हणता येईल की, त्यांना फक्त आपला समज किंवा मत त्या बाबतीत सांगता येते पण ज्यांच्याविषयी ते समज बनवितात त्यांचे खरे ज्ञान त्यांना नसते.

**ग्लॅकॉन** : हा तर्क योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : जे चिरंतन व अविकारी वस्तू तत्त्वाबद्दल विचार करीत राहतात त्यांना आपण केवळ 'समज' बनविणारे न म्हणता, ज्ञाते असे म्हणतो.

**ग्लॅकॉन** : हो. हे खरे आहे.

**सॉक्रेटिस** : ज्ञाते लोक ज्ञानाचे विषय वाखाणून त्यांच्यावर प्रेम करतात व इतर लोक मत बनविता येणाऱ्या विषयांवर प्रेम करतात असे आपण म्हणणार नाही काय ? कारण दुसऱ्या प्रकारचे लोक सुंदर रंग, सुरेल आवाज इ. कडे पाहतात व ती त्यांना आवडतात. सौंदर्याच्या केवळ स्वरूपाचे अस्तित्व त्यांना ऐकवत नाही, असे आपण म्हटल्याचे तुम्हास आठवते का ?

**ग्लॅकॉन** : होय. आठवते.

**सॉक्रेटिस** : अशा लोकांना 'तत्त्वज्ञानी' म्हणण्याऐवजी 'अर्धवट' ज्ञानी अथवा ज्ञानाची आवड असण्याऐवजी मत बनविण्याची आवड असणारे असे म्हटले तर चूक होईल काय ? आणि असे आपण त्यांचे वर्णन केले तर त्यांना राग येईल काय ?

**ग्लॅकॉन** : जर ते माझ्या सांगण्याप्रमाणे वागतील तर रागावणार नाहीत. कारण सत्याचा राग मानणे चूक आहे.

**सॉक्रेटिस** : जे लोक खरोखर अस्तित्वात असलेल्या वस्तूंबद्दल प्रेम दाखवितात त्यांना अर्धवट ज्ञानी म्हणण्याऐवजी आपण 'तत्त्वज्ञानी' म्हणणार नाही काय ?

**ग्लॅकॉन** : नक्कीच म्हणू.

□ □

## प्रकरण वीस

# तत्त्वज्ञाची राज्यकर्ता होण्याची पात्रता

**[VI-484-A—487-A]**

**कथासूत्र :**

[राज्यकारभार आदर्श होण्यासाठी तत्त्वज्ञांच्या हाती राज्यकारभार सोपविला पाहिजे हे सांगितल्यानंतर आणि तत्त्वज्ञानाचे स्वरूप विशद केल्यानंतर तत्त्वज्ञ व्यक्ती राज्यकारभार करण्यास कितपत पात्र असते, उपयुक्त ठरते या प्रश्नाची चिकित्सा प्लेटोने केली आहे. त्याच्या मते पूर्णत्वाची ज्ञानसाधना करणारा तत्त्वज्ञ हा लोकसमजुतीप्रमाणे स्वप्नरंजनात मश्गुल होणारा आदर्शवादी असतो. त्यामुळे राज्यावर नियंत्रण ठेवण्यास आणि शासकीय व्यवहारांची पूर्तता करण्यास तो अपात्र ठरण्याची शक्यता असते. अर्थात सत्याविषयी आत्यंतिक निष्ठा असल्यास आणि व्यक्ती व समाज यांच्याविषयीची न्यायबुद्धी चांगल्या शिक्षणाने विकसित केली गेल्यास योग्य व उपयुक्त राज्यकर्ते मिळू शकतील असा प्लेटोचा विश्वास आहे. तत्कालीन समाजात तत्त्वज्ञानाचे स्थान, कार्य व महत्त्व काय होते याची चर्चा त्याने केली आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** ग्लॅकॉन, अशा तऱ्हेने खूप चर्चा करून थोडया फार प्रयत्नाने आपण खरे तत्त्वज्ञानी कोण आहे, कोण नाही हे शोधले.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे. ही चर्चा थोडक्यात आटपणे अशक्य होते.

**सॉक्रेटिस :** उघडच आहे. परंतु सद्गुणी आयुष्य दुर्गुणी आयुष्यापेक्षा कसे श्रेष्ठ आहे हे निश्चितपणे सांगण्यासाठी अजून विचार न केलेले प्रश्न बाजूस ठेवून फक्त खरे तत्त्वज्ञानी कोण ? हाच प्रश्न चर्चेस घेतला असता तर माझ्या मते आपला वरील निष्कर्ष जास्त स्पष्टपणे सांगता आला असता.

**ग्लॅकॉन :** मग आता आपण कोणत्या प्रश्नाचा विचार करू या ?

**सॉक्रेटिस :** क्रमाने पुढच्या प्रश्नाचाच विचार करायला हवा. जर निरंतन व अविकारी अशा गोष्टी ज्यांच्याजवळ आहेत ते तत्त्वज्ञानी आहेत आणि विकृती व विविधता ज्यांच्याजवळ कायम असते असे लोक तत्त्वज्ञानी नाहीत, तर राज्याच्या अधिकाऱ्यांना ह्या दोहोंपैकी काय म्हणावे ?

**ग्लॅकॉन :** ह्या प्रश्नास निश्चित उत्तर मी काय देऊ ?

**सॉक्रेटिस :** ह्या दोहोंपैकी राज्यातील कायदे व चालीरीतींचे रक्षण करण्यास कोण समर्थ आहे हे ठरवून त्यांना संरक्षक नेमले पाहिजेत.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** एखाद्या गोष्टीचे संरक्षण करून ती सुरक्षित ठेवण्याच्या कामी अंध दृष्टीचा माणूस योग्य अथवा तीक्ष्ण दृष्टीचा माणूस योग्य ह्याबद्दल कधी प्रश्न निर्माण होईल काय ?

**ग्लॅकॉन :** याबाबत प्रश्नच निर्माण होणार नाही.

**सॉक्रेटिस :** ज्या व्यक्ती वस्तूंच्या खऱ्या स्वरूपाबाबत अतिशय अज्ञानी असतात व ज्यांच्यापुढे विशिष्ट ध्येय असे नसते व चित्रकाराप्रमाणे फक्त सत्याचे असे काही प्रमाण नसल्याने ज्यांना सौंदर्य, सत् व न्याय ह्याविषयी नियम तयार करता येत नाहीत किंवा तयार केले तर त्यांचे संरक्षण करता येत नाही अशा लोकांची स्थिती व अंध लोकांची स्थिती ह्यांत तीळभरही फरक आहे असे तुम्हास वाटते काय ?

**ग्लॅकॉन :** खरोखरच काही फारसा फरक नाही.

**सॉक्रेटिस :** प्रत्येक वस्तूचे खरे ज्ञान ज्यांनी मिळविले आहे व जे व्यवहारचातुर्यात किंवा गुणोत्कर्षाच्या कोणत्याही शाखेत कमी प्रतीचे नाहीत अशा लोकांना मागे सारून आपण वरील प्रकारच्या अंध व्यक्तींना संरक्षकांच्या जागेवर नेमावे काय ?

**ग्लॅकॉन :** जर इतर गुण त्यांच्यात भरपूर असतील तर त्यांना मागे सारून दुसऱ्यांना नेमणे अतिशय चमत्कारिक होईल. कारण जो गुण त्यांच्यात इतरांपेक्षा जास्त आहे तोच सर्वांत महत्त्वाचा गुण होय.

**सॉक्रेटिस :** दोन्ही प्रकारचे गुण ह्याच व्यक्तीत कसे असू शकतात हे स्पष्ट करून आपण सांगावे काय ?

**ग्लॅकॉन :** खुशाल.

**सॉक्रेटिस :** वादविवादाच्या सुरुवातीस आपण सांगितल्याप्रमाणे त्यांच्या खऱ्या स्वभावाची आपण पूर्ण परीक्षा केली पाहिजे व माझ्या मते जर आपले ह्या मुद्द्यावर एकमत झाले तर अशा व्यक्तींमध्ये हे दोन्ही गुण एकत्रित असू शकतात व अशाच स्वभावाचे लोक इतर व्यक्ती नव्हेत–राज्याचे अधिकारी होण्यास पात्र आहेत असे आपणांस ठरविणे शक्य होईल.

**ग्लॅकॉन :** ते कसे काय ?

**सॉक्रेटिस :** तत्त्वप्रवण स्वभावाबाबत आपण असे गृहीत धरून चालू की, तत्त्वज्ञानी लोक ज्या ज्ञानामुळे जनन व मरण ह्यांच्या फेऱ्यातून मुक्त असलेले, खरे व चिरकाल टिकणारे अस्तित्वाचे स्वरूप पाहू शकू अशा सर्व ज्ञानाचे भोक्ते असतात.

**ग्लॅकॉन :** ठीक आहे. असे आपण गृहीत धरू या.

**सॉक्रेटिस :** असेही आपणांस गृहीत धरता येईल की, तत्त्वज्ञानी व्यक्तींना खऱ्या अस्तित्वाच्या सर्व भागांबद्दल प्रेम असते आणि त्या भागांपैकी कोणताही भाग लहान किंवा मोठा, सन्मान्य अथवा निंद्य असला, तरी तो टाकून देण्यास ते खूश नसतात. आपण यापूर्वी एका प्रसंगी महत्त्वाकांक्षी आणि प्रणयी पुरुषाबाबत बोलतानासुद्धा हेच सांगितले आहे.

**ग्लॅकॉन :** तुमचे मत अगदी योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** आपण वर्णन केलेल्या तत्त्वज्ञानी व्यक्तींच्या स्वभावांत एक तिसरे तत्त्व आहे काय, हे आपण पाहू.

**ग्लॅकॉन :** आपल्या मते कोणते तत्त्व ?

**सॉक्रेटिस :** सत्यवादीपणा म्हणजे शक्यतोवर कोणत्याही स्वरूपात खोटेपणाला स्थान नाही; उलट खोटेपणाचा तिरस्कार करून सत्याबद्दल प्रेम ठेवावयाचे.

**ग्लॅकॉन :** होय. हा गुण सापडण्याची शक्यता आहे.

**सॉक्रेटिस :** माझ्या मित्रा, केवळ शक्यताच आहे असे नाही तर प्रणयी माणसाला आपल्या प्रिय वस्तूंशी निगडित असलेल्या सर्व गोष्टींबाबत प्रेम वाटणे अतिशय अपरिहार्य आहे.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** सत्यापेक्षा इतर कोणत्याही गुणाचा शहाणपणाशी जवळचा संबंध असू शकतो काय ?

**ग्लॅकॉन :** निश्चितच नाही.

**सॉक्रेटिस :** एकाच स्वभावाच्या माणसाला, शहाणपणाबाबत प्रेम वाटणे व असत्याबाबतही प्रेम वाटण्याची शक्यता आहे काय ?

**ग्लॅकॉन :** कधीच शक्यता नाही.

**सॉक्रेटिस :** म्हणून ज्ञानाबद्दल खरे प्रेम असलेला तरुणपणापासूनच सत्याचा शोध करण्याकरिता झटत असतो.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** ज्यावेळी एखाद्या माणसाच्या इच्छा एका ठराविक दिशेकडे निश्चित झालेल्या असतात त्यावेळी त्या दुसऱ्या दिशांकडे कमी जोराने वळतात. झऱ्याच्या पाण्याची गती दुसऱ्या पात्राकडे वेगाने वळत नाही हा आपणांस नेहमीच अनुभव येतो.

**ग्लॅकॉन :** यात संशयच नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणून शास्त्र व त्याच्या सर्व शाखा ह्यांच्या अभ्यासात माणसाचे लक्ष लागले म्हणजे त्याच्या इच्छा फक्त मानसिक सुखाकडेच केंद्रित होतात आणि शारीरिक सुखे तो टाकतो. म्हणजेच माणसाचे ज्ञानाबद्दलचे प्रेम कृत्रिम नसून खरे असले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : अशा प्रकारचा माणूस नियमित असून तो लोभी नसतो. कारण ज्या वस्तूंद्वारे माणसांना कशाही प्रकारे पैसा मिळवावासा वाटतो त्या वस्तूंना तो कधीच महत्त्व देत नाही.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : तत्त्वज्ञानी स्वभाव तत्त्वज्ञानी नसलेल्या स्वभावापेक्षा भिन्न आहे हे दर्शविताना दुसरा एक मुद्दा विचारात घेतला पाहिजे.

**ग्लॅकॉन** : तो कोणता ?

**सॉक्रेटिस** : क्षुद्रपणाकडे तुम्ही दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण मनाचा क्षुद्रपणा, आत्म्याला दैवी व मानवी स्वभावाचे खरे व सार्वत्रिक स्वरूप ग्रहण करण्यास विरोध करतो.

**ग्लॅकॉन** : हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस** : उच्च विचारात गुंग असूनही काल व अस्तित्व ह्याबद्दल चिंतन करीत राहणारा माणूस ह्या मर्त्य आयुष्याला विशेष प्राधान्य देईल असे तुमचे मत आहे ?

**ग्लॅकॉन** : हे शक्यच नाही.

**सॉक्रेटिस** : तर, असा माणूस मृत्यूला भयंकर समजतो काय ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणून खऱ्या तत्त्वज्ञानात क्षुद्र व भित्र्या स्वभावाला स्थानच मिळत नाही.

**ग्लॅकॉन** : असं माझंही मत आहे.

**सॉक्रेटिस** : तर मग, ज्या माणसाचे मन सुव्यवस्थित असून लोभ, क्षुद्रता, आढ्यता व भित्रेपणा ह्यांच्यापासून जो मुक्त आहे तो व्यवहारात कठोर किंवा अन्यायी असू शकतो काय ?

**ग्लॅकॉन** : अर्थात नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणून तत्त्वप्रवण असलेल्या व तत्त्वप्रवण नसलेल्या स्वभावाचे निदर्शक गुण शोधताना तरुणपणीच माणसाचे मन न्यायी व सभ्य अथवा एकलकोंडे व तापट आहे हे पाहिले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आणखी एक मुद्दा मुळीच विसरून चालणार नाही.

**ग्लॅकॉन** : तो कोणता ?

**सॉक्रेटिस :** माणसाचे मन, शिक्षणात चलाख किंवा मंद आहे काय हे पाहिले पाहिजे, कारण जे काम करताना माणसाला कष्ट वाटतात आणि मोठ्या कष्टाने ज्यात त्याची थोडीच प्रगती होते अशा कामात त्याला समाधान वाटणार नाही.

**ग्लॅकॉन :** समाधान वाटणे शक्य नाही.

**सॉक्रेटिस :** जे शिकून झाले ते सुद्धा जर माणसाला स्मरणात ठेवता आले नाही तर तो ज्ञानशून्य होणार नाही का ?

**ग्लॅकॉन :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच विसराळू मनाच्या व्यक्तींना तत्त्वज्ञानाच्या व्यासंगी मंडळात आपण प्रवेश देता कामा नये. कारण चांगली स्मरणशक्ती असणे, हा प्रवेश देण्यास आवश्यक गुण मानला पाहिजे.

**ग्लॅकॉन :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** आपल्याला असेही म्हणता येईल की, असंस्कृत व अडाणी स्वभावाचा कल बेढबपणाकडे असतो.

**ग्लॅकॉन :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** सत्य बेढब की प्रमाणबद्ध आहे ?

**ग्लॅकॉन :** प्रमाणबद्ध असते.

**सॉक्रेटिस :** इतर आवश्यक गुणांमध्ये "जे मन स्वभावतः सुप्रमाणबद्ध व सुंदर असून वस्तूमात्रांचे खरेखुरे स्वरूप ग्रहण करू शकते" अशा गुणाची भर घातली पाहिजे.

**ग्लॅकॉन :** होय. असे मन शोधणे जरूर आहे.

**सॉक्रेटिस :** आत्म्याला खऱ्या अस्तित्वाचे पूर्ण व समाधानकारक ज्ञान होण्यास जे गुण आपण वर्णन केले आहेत ते अनावश्यक अथवा एकमेकांशी विसंगत आहेत असे तुमचे मत आहे काय ?

**ग्लॅकॉन :** ते अतिशय आवश्यक आहे.

**सॉक्रेटिस :** जे काम समाधानकारक रीतीने पार पाडण्याकरिता एखाद्या मनुष्यामध्ये चांगली स्मरणशक्ती, शीघ्र ग्राहकबुद्धी, उदात्त मनोभावना, सौंदर्याबाबत सर्दभिरुची व सत्य, न्याय, धैर्य आणि नियमितपणा याबाबत प्रेम इत्यादी गुण आवश्यक असले आणि त्यानुसार त्या मनुष्याने ते काम केले तर ते काम सदोष आहे असे कोणीतरी सांगू शकेल काय ?

**ग्लॅकॉन :** नाही. टीकेच्या देवतेला पण यात दोष काढता येणार नाही.

□ □

प्रकरण एकवीस

# समाजात तत्त्वचिंतक निरुपयोगी का ठरतो ?

**[VI-487-B—497-A]**

**कथासूत्र :**

[प्लेटोच्या काळातील समाजजीवनात 'सोफिस्ट' संज्ञा असलेल्या व्यक्तींना तत्त्वज्ञ मानले जाई. या व्यक्ती चरितार्थ चालविण्यासाठी वादविवाद करीत आणि वादपटुत्वाचे शिक्षण इतरांना देत. चारित्र्य आणि सद्‌गुण यांऐवजी शब्दच्छल, तार्किक कसरती यांवरच त्यांचा भर असे. साहजिकच अशा व्यक्तींवर खऱ्या ज्ञानी व्यक्तींचा रोष असे.

तत्त्वज्ञ हा राज्यकर्ता बनला पाहिजे, त्याशिवाय राज्यव्यवहार आदर्श होणार नाही, या सॉक्रेटिसच्या दृष्टिकोनावर साहजिकच त्याचे ॲडिमँट्‌ससारखे सहकारी हल्ला करतात.

त्यांना उत्तर देताना सॉक्रेटिसने सोफिस्ट प्रवृत्तीवर प्रखर टीका केली आहे. स्वार्थासाठी न्याय आणि नीती यांची मूल्ये पायदळी तुडविणाऱ्या नकली ज्ञानवंतापासून सावध राहण्याचा त्याने इशारा दिला आहे.

शिवाय लोकशाहीच्या नावाखाली अपात्र व्यक्तींच्या हाती सत्ता आणि संपत्ती सोपविण्यातले धोके त्याने दाखविले आहेत.

व्यक्ती व समाज यांना ज्ञान व नीती यांची आदर्श बैठक देणाऱ्या निःस्वार्थ समाजसेवकांची राज्यकर्ते म्हणून नियुक्ती झाली पाहिजे ही त्याची भूमिका सार्वकालिक महत्त्वाची आहे.]

* * * * *

**ॲडिमँट्‌स :** सॉक्रेटिस, या सिद्धांतात कोणासही काही आक्षेप घेण्यासारखे नाही, हे खरे आहे. पण जेव्हा तू हे सिद्धांत मांडतोस तेव्हा ऐकणाऱ्यांना पुढील प्रकारची शंका येते. संवादपद्धतीचा सराव नसल्याने, तुझ्या दृष्टिकोनामुळे ऐकणारे प्रत्येक वेळी थोडे आडवाटेला जातात. पण चर्चेच्या अखेरीस सुरुवातीस क्षुल्लक वाटलेले हे आडरस्ते पुढे मोठी चूक घडवतात. त्यामुळे ऐकणाऱ्यांना आपण स्वतःच आपल्या पूर्वीच्या कल्पनांना विरोध करीत आहोत असे दिसून येते. त्यामुळे ड्रॉफ्ट नावाच्या खेळामध्ये निष्णात खेळाडूंकडून अडाणी खेळाडू कोपऱ्यात अखेरीस असे अडवले जातात की त्यांना आपली चकती अखेर हलवताच येत नाही. त्याप्रमाणेच तुमच्यासमोर श्रोते चकत्यांऐवजी शब्दांचा खेळ खेळत असतात. हा

खेळ खेळताना ते अडवले जातात. त्यांना मौन स्वीकारण्याशिवाय गत्यंतरच नसते. अखेरीस जो निष्कर्ष तू काढतोस तो सत्य आहे अशी मात्र त्यांची मुळीच खात्री झालेली नसते. आता आपल्या पुढचा प्रसंग तुझ्या बोलण्यातील खरेपणा पटवून देऊ शकेल. आता तुम्हांस एखादी व्यक्ती सांगेल की, प्रत्येक प्रश्नाला शाब्दिक विरोध ती करू शकत नाही. तरी प्रत्यक्ष व्यवहारात तिला असे दिसते की, तरुणपणी केवळ शिक्षणासाठी ज्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आणि प्रौढपणी ज्यांनी त्याचा व्यासंग ठेवला ते अत्यंत तऱ्हेवाईक, अनीतीमान बनतात असे नाही. त्याचप्रमाणे जे लोक फार प्रतिष्ठित वाटतात ते तू स्तुती केलेल्या तत्त्वज्ञानाच्या व्यासंगामुळेच इतके नादान बनलेले असतात की, त्यांचा देशाला काहीच उपयोग नसतो.

**सॉक्रेटिस :** हा आक्षेप खोटा आहे असे तुला वाटते का ?

**ॲडिमँट्स :** मी खात्रीने काही सांगू शकत नाही. तुझा दृष्टिकोन मात्र मी आनंदाने ऐकेन.

**सॉक्रेटिस :** तर मी तुला सांगतो की, हा आक्षेप खरा आहे.

**ॲडिमँट्स :** मग, असे तत्त्वज्ञानी लोक त्यांच्याच कबुलीप्रमाणे कुचकामाचे असतील तर ते अधिकारी झाल्याशिवाय नागरिकांचे दुःख दूर होणार नाही असे म्हणणे कितपत बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** तुझ्या प्रश्नाचे उत्तर मी उदाहरणांनी देतो.

**ॲडिमँट्स :** जणू काही तुला उदाहरणे द्यायची सवयच नाही ?

**सॉक्रेटिस :** जो विषय समजण्यास कठीण असतो तो माझ्यावर सोपवून तुम्ही माझी थट्टा करता का ? असो, माझा दृष्टांत ऐका. म्हणजे या बाबतीतसुद्धा मी किती बारकाईने लक्ष देतो आहे ते तुम्हांस समजू शकेल. हे सभ्य लोक इतक्या वाईट परिस्थितीत असतात की, तशी कोणत्याच वस्तूची परिस्थिती असू शकत नाही. ज्याप्रमाणे चित्रकार बोकड, हरीण असे विचित्र प्राणी रंगवताना निरनिराळ्या ठिकाणांहून साधने जमवतो, त्याप्रमाणे या लोकांच्या बचावास मला बरेच श्रम करणे आवश्यक आहे.

तुमच्या डोळ्यांसमोर एक जहाज आहे अशी कल्पना करा. त्यावर पुढीलप्रमाणे अवस्था आहे. त्या जहाजाचा कप्तान इतर खलाशांपेक्षा अधिक उंच, धिप्पाड पण बहिरा, कमी दिसणारा, नौकानयन कलेत कमी कौशल्य असणारा असा आहे. त्या जहाजाचे नेतृत्व कोणाकडे असावे याबद्दल खलाशांत भांडणे सुरू आहेत. प्रत्येकाला वाटते जहाज चालविण्याचा अधिकार आपणाला मिळावा. प्रत्येकाची तयारी अशी आहे की, कोणीच त्या कलेचा अभ्यास केलेला नाही. कोणाकडून शिक्षण घेतले त्याचे नाव, ती वेळ, केव्हा उमेदवारी केली हे काहीच कोणाला सांगता येत नाही. " कला शिकवता येणे शक्यच नाही " असे प्रत्येकाचे मत आहे. ज्यांना हे मत मान्य नाही त्यांचे हे लोक वाभाडे काढू शकतात.

अशी स्थिती असूनसुद्धा त्या कप्तानाभोवती सारे जमतात. आपल्याला नेता नेमावे म्हणून लाळघोटेपणाने विनंती करतात. काहीवेळा त्याचे मन वळवण्याचे काहीजणांचे प्रयत्न यशस्वी होत नाहीत, इतरांचे यशस्वी होतात. असे झाले की निराश लोक विजयी प्रतिस्पर्ध्याला ठार मारतात किंवा पाण्यात फेकून देतात. त्या बाणेदार करारी नेत्याला अतिशय बेहोशी आणणारे मद्य देतात किंवा अन्य उपायांनी असमर्थ करतात. त्याचे हातपाय बांधतात. आपणच जहाजाचे मालक होतात. सर्व सामान स्वतःसाठी वापरतात. अशा खलाशांकडून दुसरे काय काम होणार ? असे लोक आपला वेळ खाण्यापिण्यात मजेत घालवतात. जहाजाचे नेतेपण स्वतःला देण्याबद्दल कप्तानाचे मन वळवताना किंवा त्याला तसे भाग पाडताना जी माणसे त्यांना मदत करतात अशा खलाशांची 'योग्य खलाशी , 'उत्तम तांडेल', 'निष्णात नावाडी', अशा शब्दांनी स्तुती करतात. इतरांची निंदा करतात. जहाजाचे नेतृत्व करण्यास वर्ष, ऋतू, आकाश, नक्षत्रे, वारे या सर्व गोष्टींचा काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे याची या लोकांना कल्पनाच नसते. त्याचप्रमाणे नौकानयन कलेबरोबरच इतर खलाशांचा प्रसंगी विरोध झुगारून हुकमत गाजविण्याची कला मिळवणे आणि तसे वागणे याही गोष्टी त्यांना अशक्यच वाटतात. जर जहाजावर अशी अवस्था असेल तर कप्तान आपल्या कलेत निष्णात असूनसुद्धा तो अशा स्वभावाच्या खलाशांकडून कुचकामी, बडबड्या, नक्षत्रे पाहणारा आळशी म्हटला जाणार नाही का ?

**ॲडिमँट्स** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : बरोबर. माझे उदाहरण पुन्हा एकदा नजरेखालून घालावे असे तुम्ही मला सांगणार नाही. कारण तुम्हांस हे माहितच आहे की, तत्त्वज्ञानी माणसाविषयी आपल्या शहरात जो दृष्टिकोन आहे त्याचेच हे चित्र आहे.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : आपल्या शहरात तत्त्वज्ञानी व्यक्तींना मान दिला जात नाही याचे कोणाला आश्चर्य वाटेल त्याला हे उदाहरण सांगून उलट म्हणा की, तत्त्वज्ञानी माणसाला आदर देण्यात आला तरच आश्चर्य होय !

**ॲडिमँट्स** : बरोबर. मी तसेच सांगेन.

**सॉक्रेटिस** : शिवाय असे सांगा की, तत्त्वज्ञानात पारंगत असलेले पुष्कळ सभ्य लोक जगाला उपयोगी ठरत नाहीत हे सत्य आहे. पण त्याचा दोष तत्त्वज्ञानी लोकांकडे येत नाही. जे लोक त्यांची सेवा करण्याचे नाकारतात त्यांच्याकडे तो येतो. नावाड्यांनो, "तुम्ही माझा आदेश माना" अशी खलाशांना विनंती करणे किंवा ज्ञानी माणसाने श्रीमंताच्या दारी तिष्ठत उभे राहणे बरोबर नाही. खरे सांगायचे तर जसे आजारी माणसाने श्रीमंती-गरिबी बाजूला ठेऊन डॉक्टरांच्याकडे गेलेच पाहिजे त्याप्रमाणे राज्यकारभार चांगला व्हावा अशी ज्यांची इच्छा असते, त्यांनी राज्यकारभार करण्यास लायक असणाऱ्या लोकांच्या घरी गेलेच पाहिजे. राज्यकारभारास राज्यकर्ता योग्य असेल तर त्याने लोकांच्याकडे जाऊन त्यांना

विनंती करणे अनैसर्गिक आहे. हल्लीच्या काळात मुत्सद्दी लोकांची तुलना खलाशांशी केली आणि हल्लीचे राजकारणी लोक, ज्यांना कुचकामी, कल्पनासृष्टीत रमणारे, बडबडे म्हणतात त्यांची तुलना नावाड्यांशी केली तर ते चूक ठरणार नाही.

**ॲडिमँट्स** : तुझे मत बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : अशी परिस्थिती आणि असे लोक जर असतील तर सर्वोत्तम विषयाचा म्हणजे तत्त्वज्ञानाचा अभ्यास विरोधी लोक चांगला म्हणतील असे नाही. अतिशय अपायकारक आणि पूर्वग्रहदूषित असा गैरसमज तत्त्वज्ञानाविषयी जर कोणाचा होत असेल, तर तो तत्त्वज्ञानाविषयीच्या अनुयायांकडूनच होय. तत्त्वज्ञानावर आक्षेप घेणारी व्यक्ती जेव्हा म्हणते की, त्याचा अभ्यास करणारे बरेच लोक नादान असतात, विद्यार्थी कुचकामी असतात, तेव्हा हेच लोक तिच्या मनात असतात आणि हे म्हणणे खरे आहे हे मी मान्यच केले आहे.

**ॲडिमँट्स** : बरोबर. तू कबूल केले आहेस.

**सॉक्रेटिस** : चांगले लोक निरुपयोगी का असतात हे आपण सांगितले ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : पुष्कळ विद्वान नादान का असतात त्याची चर्चा करणे आणि शक्य असल्यास तत्त्वज्ञान हे त्याचे कारण आहे हे दाखवून देणे आवश्यक आहे ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : जो पूर्ण विद्वान आणि सद्‌गुणी होऊ इच्छितो, त्याचा स्वभाव कसा असावा ते सांगताना आपण जे ठरविले आहे ते लक्षात घेऊन आपण चर्चा करू या. माणसाच्या स्वभावाचे प्रमुख लक्षण म्हणजे सत्यनिष्ठा होय. त्याने सत्याचा मार्ग निष्ठापूर्वक अनुसरला पाहिजे. जर तो केवळ तोतया ठरला तर खऱ्या तत्त्वज्ञानात तो काहीही भाग घेऊ शकणार नाही.

**ॲडिमँट्स** : हो. आपण तसे म्हटले होते.

**सॉक्रेटिस** : या विषयावर सध्या प्रचलित असलेल्या मतांविरुद्ध हे वैशिष्टच नाही काय ?

**ॲडिमँट्स** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : खरी ज्ञानी व्यक्ती खऱ्या अस्तित्वाकडे पोहोचण्यास अतिशय परिश्रम करण्यास तयार असते. सृष्टीतील असंख्य चमत्कार की ज्यांच्या अस्तित्वाचे वर्णन करताना मर्यादा पडतात त्यांचाच अनुभव तेवढा न घेता ज्ञानाची आराधना न सोडता, धैर्य न सोडता ती आपला मार्ग चालूच ठेवते. आत्म्याच्या खऱ्या अस्तित्वाचे विषय तो समरसतेने जाणू शकतो. त्या विशिष्ट ज्ञानदृष्टीने प्रत्येक वस्तूच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान होईपर्यंत त्याला समाधान प्राप्त होत नाही. जे खरे अस्तित्वात असते त्याच्या निकट जाऊन त्याचा परिचय करून घेऊन तो ज्ञान आणि सत्य मिळवतो. ते मिळाले की त्याला जीवनातला खरा आनंद

आणि खरी समृद्धी प्राप्त होते. बाळंत होईपर्यंत स्त्रीला वेदनांचा त्रास सहन करावा लागतो, त्याप्रमाणेच ज्ञानप्राप्तीसाठी ज्ञानवंताला त्रास सोसावा लागतो. पण शेवटी तो मुक्त होतो.

**ॲडिमँट्स** : हे तुझे उत्तर सर्वोत्कृष्ट आहे.

**सॉक्रेटिस** : अशा माणसाला खोटेपणाची आवड असू शकेल का ? उलट खोटेपणाचा त्याला तिरस्कारच वाटणार नाही का ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : सत्य मार्गदर्शक असेल तर त्याच्या जोडीने वाईट गोष्टी येऊ शकतील असे आपण कधीच म्हणू शकणार नाही.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : याउलट सत्याच्या जोडीने सुव्यवस्थितपणा, न्यायीपणा, शांतपणा आपोआपच येतो असे आपण म्हणू शकतो.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : आपली तत्त्वे पुन्हा सांगण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानी माणसाचे स्वभावविशेष सांगण्याचीही आवश्यकता नाही. धैर्य, उदात्तता, तीक्ष्ण गृहणशक्ती, चांगली स्मरणशक्ती हे त्याचे स्वाभाविक गुण आहेत. यावर तुम्ही अशी शंका उपस्थित कराल की, ही तत्त्वे कोणी अमान्य करीत नसले तरी त्याबद्दलचा वाद बाजूला ठेऊन तत्त्वज्ञानी व्यक्तींकडे पाहिले की कोणासही वाटेल की त्यांपैकी काही लोक कुचकामी आहेत आणि बरेचसे नादान आहेत. याचा अर्थ तत्त्वज्ञानी व्यक्तींविषयी असलेल्या प्रतिकूल गैरसमजुतीच्या कारणाची आपण चौकशी केली आणि बरेच लोक नादान का असतात त्या प्रश्नाजवळ आपण येऊन पोहोचलो आहोत. त्यासाठी खऱ्या तत्त्वज्ञानी लोकांच्या स्वभावाची चिकित्सा करून आपणांस व्याख्या करणे आवश्यक आहे.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : पुष्कळ व्यक्तींत असलेला तत्त्वज्ञानी स्वभाव ज्या घातक कारणांनी मृत होतो ती कारणे आपण शोधली पाहिजेत. जे या कारणापासून स्वतःला वाचवू शकतात ते जरी नादान ठरले नाहीत तरी तुमच्या मताप्रमाणे कुचकामी ठरू शकतील. खऱ्या तत्त्वज्ञानी स्वभावाचे अनुकरण करणारे लोक ज्ञानाचा व्यासंग करताना फार अभ्यास करतात. त्यामुळे त्यांच्या हातून विचित्र चुका घडतात. त्या चुकांमुळे तत्त्वज्ञानी माणसांची सगळीकडे कशी निंदा होते ते आपण पाहिले पाहिजे.

**ॲडिमँट्स** : तू म्हणतोस ती घातक कारणे कोणती ?

**सॉक्रेटिस** : माझ्या कुवतीनुसार ती मी सांगतो. तत्त्वज्ञानासाठी आवश्यक असणारे गुण म्हणून जे आपण म्हटले ते सारे गुण असणारा स्वभाव माणसामध्ये दुर्मिळच आढळतो. याविषयी आपल्या सगळ्यांचे एकमत होईल. तुझे मत भिन्न आहे का ?

**ॲडिमँट्स** : खरोखरच नाही.

**सॉक्रेटिस** : असे दुर्मिळ असणारे स्वभाव किती प्राणघातक संकटांनी वेढलेले असतात याचा विचार करा.

**ॲडिमँट्स** : कोणती संकटे ?

**सॉक्रेटिस** : अतिशय आश्चर्यकारक वाटणारी गोष्ट म्हणजे आपण स्तुती केलेल्या प्रत्येक गुणाची प्रवृत्ती, हे गुण असणाऱ्या आत्म्याला तत्त्वज्ञानापासून परावृत्त करीत असते. धैर्य, नेमस्तपणा इत्यादी गुणांचे आपण वर्णन केले होते त्यांना उद्देशून मी हे म्हणत आहे.

**ॲडिमँट्स** : हे थोडे चमत्कारिक वाटते.

**सॉक्रेटिस** : सौंदर्य, संपत्ती, शरीरसामर्थ्य, राज्यातील महत्त्वाचे संबंध यांचे अनुषंगिक परिणाम या सर्वांमुळे आत्मा बिघडण्याचा, तो तत्त्वज्ञानापासून परावृत्त होण्याचा संभव असतो. माझ्या दृष्टिकोनाची रूपरेखा मी तुम्हांस सांगितली का ?

**ॲडिमँट्स** : हो. पण अधिक सविस्तर ऐकण्याची माझी इच्छा आहे.

**सॉक्रेटिस** : सर्व बाजूंनी विचार केला तर तुला हे स्पष्टपणे कळेल आणि माझे अगोदरचे विचार तुला फारच चमत्कारिक वाटणार नाहीत.

**ॲडिमँट्स** : तुमची माझ्याकडून काय अपेक्षा आहे ?

**सॉक्रेटिस** : वनस्पती किंवा प्राणीसृष्टीतील बीजासंबंधी तसेच वाढ होणाऱ्या सर्व वस्तूंसंबंधी आपल्याला हे माहीत आहे की, ज्या प्रमाणात योग्य खत, ऋतुमान, जमीन मिळत नाही, त्या प्रमाणात काही विशेष दणकट वस्तू सोडल्या तर त्यांचे गुण कमी दिसतात. याचे कारण मला वाटते की, जे वाईट आहे त्या गोष्टींचा वाईटापेक्षा जे चांगले आहे त्या गोष्टींशी जास्त विरोध असतो.

**ॲडिमँट्स** : खात्रीने.

**सॉक्रेटिस** : मग आपण असा निष्कर्ष काढू शकू की, ज्यांचा स्वभाव सर्वांत उत्तम असतो त्यांना वाईट पोषण मिळाले तर कमी प्रतीच्या स्वभावापेक्षा त्यांना अधिक इजा होते.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : मग ॲडिमँट्स, उच्च प्रकारच्या मनांना जर वाईट शिक्षण मिळाले तर ती अधिक दुष्ट माणसे बनणार नाहीत का ? मोठे गुन्हे, मोठी पापे यांची शक्यता कुशिक्षणाने होणाऱ्या उत्तम स्वभावाच्या माणसांच्या अध:पतनापेक्षा क्षुद्र स्वभावात अधिक असते, कमकुवत स्वभाव, कोणतेही मोठे कार्य चांगले किंवा वाईट करू शकतो, हे तुला पटते का ?

**ॲडिमँट्स** : नाही. मी तुझ्या मताशी सहमत आहे.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. आपल्या कल्पनेप्रमाणे तत्त्वज्ञानी माणसाचा स्वभाव ज्या प्रकारचा ठरविला, तो जर त्यास योग्य शिक्षण मिळाले तर पूर्ण उत्कर्षास पोहोचलाच पाहिजे. पण तोच जर अयोग्य भूमीवर पेरला जाऊन वाढविण्यात आला, तर त्याचे अतिशय विरुद्ध प्रकारच्या दुर्गुणांत रूपांतर होते. अशा वेळी एखादी देवताच दैवयोगाने त्याचा बचाव करू शकते. सामान्य लोकांच्या समजुतीप्रमाणे तुमचेही असे मत आहे काय की, सोफिस्ट लोकांकडून तारुण्यातच काही व्यक्ती बिघडविल्या जातात किंवा काही विशिष्ट सोफिस्ट खाजगी रीतीने फार मोठ्या प्रमाणावर लोकांना बिघडवीत असतात. उलट अशा प्रकारे बोलणारे लोक, स्वतःच मोठे सोफिस्ट असून, आपल्याला हव्या त्या प्रकारचे शिक्षण तरुण व वृद्ध स्त्री-पुरुषांना अतिशय श्रमाने देऊन तयार करतात असे तुमचे मत आहे ना ?

**ॲडिमँट्स :** अशा प्रकारचे शिक्षण ते केव्हा देतात ?

**सॉक्रेटिस :** हे लोक जनतेला सभांमध्ये, कोर्ट-कचेऱ्यांत, नाटकगृहांत, लष्करांत किंवा मोठ्या जनसमुदायाच्या एखाद्या सभेत जाऊन तेथील गडबड करणाऱ्या मंडळींमध्ये बसून तेथे चाललेल्या काही गोष्टींची निंदा किंवा काहींची अवास्तव स्तुती करतात व मोठ्याने ओरडून टाळ्या पिटून इतरांना त्रास देतात. अशा वेळी तरुण माणसाचा स्वतःच्या मनावर ताबा राहणार नाही. त्याने घेतलेल्या खाजगी शिक्षणाचा तेथील निंदा-स्तुतीच्या वर्षावामुळे टिकाव लागणे कठीण. अशा प्रकारच्या वातावरणामुळे शेवटी तोही वरील माणसांप्रमाणे वंद्य व निंद्य कोणते हे ठरवून त्यांचे अनुकरण करून त्यांच्यासारखाच बनू शकेल.

**ॲडिमँट्स :** सॉक्रेटिस, हा परिणाम निश्चितच होईल.

**सॉक्रेटिस :** तथापि अत्यंत खात्रीने परिणाम होईल असे साधन आपण सांगितलेच नाही.

**ॲडिमँट्स :** ते कोणते ?

**सॉक्रेटिस :** शिक्षक व सोफिस्ट ह्यांचे भाषण ज्यावेळी निरुपयोगी व अयशस्वी ठरते, त्यावेळी ह्या साधनांचा प्रत्यक्ष व्यवहारात ते वापर करतात. कारण तुम्हाला माहितच आहे की, जे त्यांची आज्ञा पाळत नाहीत, त्यांचे ते हक्क काढून घेतात, त्यांना दंड करतात व मृत्यूची शिक्षा करतात.

**ॲडिमँट्स :** ते असे करतात यात संशयच नाही.

**सॉक्रेटिस :** तर मग, दुसरा कोणी सोफिस्ट अथवा खाजगी मनुष्य अशा परिणामांचा प्रतिकार करू शकेल काय ?

**ॲडिमँट्स :** कोणीच नाही.

**सॉक्रेटिस :** कोणालाच करता येणे शक्य नाही. असा प्रयत्नसुद्धा शुद्ध मूर्खपणाच होईल. जनसमुदायाच्या सार्वजनिक सभांमधून मिळणाऱ्या शिक्षणाने ज्याचा स्वभाव तयार झाला आहे त्याला सद्गुणाबद्दल वेगळ्या भावनाच कधी वाटत नाहीत, वाटल्या नाहीत, वाटणारही

नाहीत. मी मानवी स्वभावाबाबत बोलत आहे. दैवी स्वभावांचा आपण विचार केलेला नाही. पण तुमची खात्री असू दे की, ईश्वरी योजनेमुळेच, राज्यपद्धती अशा प्रकारची असूनही काही राखले गेले आहे किंवा चांगले करण्यात आले आहे.

**ॲडिमँट्स** : माझेही हेच मत आहे.

**सॉक्रेटिस** : तुमच्या मतांमध्ये आणखी एकाचा विचार केला पाहिजे.

**ॲडिमँट्स** : तो कोणता ?

**सॉक्रेटिस** : ज्यांना जनसमुदाय सोफिस्ट समजूनही प्रतिस्पर्धी समजतो असे हे सर्व भाडोत्री धाडसी लोक लोकांच्या मोठ्या जमावाला बहुजन समाजाचीच मते शिकवितात. त्यालाच गौरवाने ज्ञान म्हटले जाते. अशा लोकांची तुलना पुढे वर्णिलेल्या मनुष्याशी करता येईल. आपल्या ताब्यात असलेल्या एखाद्या भयंकर व प्रबल राक्षसाच्या लहरींचे व इच्छांचे निरीक्षण करून कोणत्या तऱ्हेने त्याच्याजवळ जावे व कशा तऱ्हेने त्याला स्पर्श करावा याचा अभ्यास करून कोणत्या वेळी व कोणत्या परिस्थितीत तो भीतीदायक किंवा नम्र होतो व कोणत्या प्रसंगी निरनिराळ्या आरोळ्या मारतो, दुसऱ्या माणसाने कोणते आवाज काढले असता तो शांत होतो किंवा त्रासतो ह्या सर्वांचा खूप दिवसांच्या परिचयाने चांगला अभ्यास केल्यावर ह्या ज्ञानाला शहाणपण म्हणून कलात्मक, योग्य रचना करावी. ह्या लहरींपैकी किंवा इच्छांपैकी कोणत्या चांगल्या व वाईट, न्याय व अन्याय ह्याबाबत तो पूर्णपणे अज्ञानी असतो आणि म्हणून ही सर्व नावे त्या मोठ्या प्राण्याच्या लहरींना लावतो. त्या प्राण्याच्या चांगल्या व वाईट आवडी यांचे दुसऱ्या प्रकारे स्पष्टीकरण त्या माणसाला करता येत नाही. तो सक्तीने केल्या जाणाऱ्या गोष्टींना न्याय्य व चांगल्या समजतो. कारण त्याला सक्तीने केलेले कर्म व खरे सत्कर्म ह्यांतील जे खरोखर अंतर आहे ते कळलेले नसते. त्यामुळे लोकांनाही त्यातील फरक त्याला सांगता येत नाही. म्हणूनच माझ्या मते असा मनुष्य एक चमत्कारिक शिक्षक होय.

**ॲडिमँट्स** : होय. मलापण असेच वाटते.

**सॉक्रेटिस** : सभा भरलेली असताना त्यातील लोकांच्या लहरी व सुखाच्या कल्पना ह्यांचा अभ्यास करून चित्रकला, संगीत किंवा राजकारण ह्यांबाबत बहुजन समाजाचीच मते सांगणे त्याला ज्ञान समजणारा मनुष्य व वरील वर्णनाचा मनुष्य ह्यांच्यात काही भिन्नता आहे काय ? मनुष्य बहुजन समाजाशी मिसळून स्वतःच्या एखाद्या कवितेविषयी, कलेविषयी किंवा राज्याकरिता केलेल्या कामगिरीबाबत लोकमताचा अंदाज घेऊन लोकांचा अधिकार त्याने अधिक मानला तर त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागणे, करणे त्याला भाग पडेल. हे जरी सत्य असले तरी समाज जे मानतो तेच चांगले व सुंदर हे सिद्ध करण्याकरिता लोकांनी केलेले प्रतिपादन कधी हास्यास्पद झाले नाही असा एखादा आयुष्यातील प्रसंग सांगू शकाल काय ?

**ॲडिमँट्स** : नाही. आठवत नाही.

**सॉक्रेटिस** : हे जर तुम्ही चांगले समजला तर दुसरा मुद्दा मला मांडायचा आहे. बहुजन समाजास चांगल्या वस्तूंच्या असंख्य समुदायांपासून वेगळी अशी सौंदर्याची कल्पना शक्य अथवा विश्वसनीय वाटेल काय ? त्याचप्रमाणे विशिष्ट आकृतीपासून भिन्न अशी आकाराची केवळ कल्पना अस्तित्वात आहे काय ?

**ॲडिमँट्स** : निश्चितच नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणजेच बहुजन समाज तत्त्वज्ञानी नसतो.

**ॲडिमँट्स** : असत नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणून तत्त्वज्ञानी लोकांना बहुजनसमाज निंद्य ठरवितो.

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : जनसमुदायाशी सुसंगत राहून व त्यांची खुशामत करणारा धाडसी सोफिस्टही तत्त्वज्ञानी लोकांची निंदा करेल.

**ॲडिमँट्स** : उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : अशा स्थितीत तत्त्वज्ञानी स्वभावाच्या माणसाने ध्येय साध्य होईपर्यंत, अभ्यास चालू ठेवण्याबाबत त्याचा दृढविश्वास होण्यास काय केले पाहिजे ? तत्त्वज्ञानी स्वभावाकरिता तीक्ष्ण ग्रहणशक्ती, चांगली स्मरणशक्ती, धीटपणाची वृत्ती, उमदेपणा हे गुण आवश्यक आहेत.

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : मानसिक शक्तीप्रमाणेच शारीरिक शक्ती त्याच्या चांगल्या असतील तर लहानपणापासून असा मनुष्य प्रत्येक बाबतीत अग्रेसर ठरू शकेल.

**ॲडिमँट्स** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : तो जसजसा म्हातारा होईल तसतसा त्याचे मित्र, देशबंधू स्वतःच्या कामाकरिता त्याचा उपयोग करतील.

**ॲडिमँट्स** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : पुढे तो सर्वश्रेष्ठ होणार अशा कल्पनेने ते त्याच्या पायावर डोके ठेवून त्याची स्तुती करतील व प्रार्थना करतील.

**ॲडिमँट्स** : होय. ही गोष्ट नेहमीच्याच अनुभवात येते.

**सॉक्रेटिस** : अशा परिस्थितीत अशा माणसाच्या वर्तणुकीबाबत तुमची काय कल्पना आहे ? जर तो बलाढ्य राज्यातील श्रीमंत व उच्च कुलातील असून उंच, देखणा असेल तर त्याच्या वर्तणुकीबाबतचे तुमचे मत काय ? भरपूर महत्त्वाकांक्षेने फुगून ग्रीक व परराष्ट्रीय राजकारणाची कामे करण्यास आपण पात्र आहोत असे दाखवून देऊन तो प्रतिष्ठितपणाचा आव आणेल. मोठेपणाच्या कल्पनेने व पोकळ मूर्खपणाची घमेंड दाखवून गर्विष्ठ होईल.

**ॲडिमँट्स :** निश्चितच असे होईल.

**सॉक्रेटिस :** अशा मन:स्थितीत तो असताना त्याला शांतपणाने असे समजावून देण्याचा प्रयत्न केला की, तुमच्याजवळ शहाणपण नाही. ते मेहनतीने संपादन करावे लागते. तर वरील वाईट व अपायकारक वातावरणात तो वावरत असल्यामुळे त्याचे या गोष्टींकडे लक्ष वेधणे कठीण आहे.

**ॲडिमँट्स :** कठीणच आहे.

**सॉक्रेटिस :** पण चांगल्या स्वभावामुळे व तत्त्वज्ञानाच्या आवडीमुळे वरील उपदेश विचारात घेऊन तत्त्वज्ञानाकडे पूर्ण लक्ष देण्याचे ठरविले तर त्याच्याकडून मिळणाऱ्या मदतीची व मैत्रीची अपेक्षा करणाऱ्या लोकांच्या वर्तनाबाबत तुमचे काय मत आहे ? खाजगी रीत्या उचापती करून त्याच्यावर खटले भरून, त्याला त्रास देऊन तत्त्वज्ञानाचा त्याच्यावर काहीही परिणाम होणार नाही याबाबत धडपड करतील काय ?

**ॲडिमँट्स :** असे जरूर करतील.

**सॉक्रेटिस :** अशा परिस्थितीत असा मनुष्य तत्त्वज्ञानाचा व्यासंगी राहणे कठीण.

**ॲडिमँट्स :** होय. बरोबरच आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्याला असे दिसून येईल की, तत्त्वज्ञानी स्वभावाचे आवश्यक गुण अपायकारक परिस्थितीत ठेवले गेले तर तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात माणसास दूर खेचतील व संपत्तीचे फायदे, बाह्य डामडौल व चांगली स्थिती ही कारणे या कामास साह्य करतील.

**ॲडिमँट्स :** होय. हे निरीक्षण बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** माझ्या चांगल्या मित्रा, उदात्त विषयाचे परिशीलन करणाऱ्या चांगल्या स्वभावाचा अशा तऱ्हेने अत्यंत अध:पात व नाश होतो. अशा प्रकारचा स्वभाव क्वचितच आढळतो. राज्याला व त्यातील व्यक्तींना अपाय करणाऱ्यांची व राज्याच्या कल्याणाकरिता योग्य वेळी मेहनत करतात त्यांची गणना ह्याच वर्गात केली जाते. सामान्य व क्षुद्र मनाची माणसे राज्याला व त्यातील व्यक्तींना कधीच अपाय करीत नाहीत.

**ॲडिमँट्स :** हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** अशा पद्धतीमुळे असे घडते की, तत्त्वज्ञानाचे जवळचे लोकच, ज्यांनी त्याची बाजू सावरायची, ते दूर सरून तत्त्वज्ञानाला असहाय व अपूर्ण स्थितीत टाकून देतात. अशी माणसे अयोग्य व असत्य आयुष्य कंठतात व नातेवाईकांनी दूर लोटल्यामुळे योग्य लोकांकडून तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यास सुरुवात होत नाही. अशा प्रकारचे लोक तत्त्वज्ञानाला खाली खेचतात व तुमच्या म्हणण्याप्रमाणे तत्त्वज्ञानाची निर्भर्त्सना होते व शेवटी तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी क्षुल्लक किंमतीचे व खूप मोठ्या शिक्षेस पात्र ठरतात.

**ॲडिमँट्स :** असे सर्वसामान्य समजतात.

**सॉक्रेटिस** : होय. ते अगदी स्वाभाविक आहे. कारण स्वतःच्या धंद्यात निष्णात असलेले गुन्हेगार तुरुंगातून मुक्तता करून घेऊन देवळांत शिरतात त्याचप्रमाणे इतर हलक्या प्रतीचे लोक मोठाली नावे व डामडौल दाखविणाऱ्या पदव्या यांचे रिकामे क्षेत्र पाहून स्वतःचे उद्योग सोडून तत्त्वज्ञानाकडे धावतात. तत्त्वज्ञानाची निर्भर्त्सना झालेली असली तरी इतरत्रांहून त्यास अधिक मान आहे. ज्यांची बौद्धिक शक्ती पूर्वीपासूनच कमकुवत आहे व ज्यांचे आत्मे काबाडकष्ट व कारागिरीत गुंतलेले आहेत अशा पुष्कळ लोकांना तत्त्वज्ञानाच्या वैभवाचा मोह खरोखरच वाटतो.

**ॲडिमँट्स** : होय. यात संशयच नाही.

**सॉक्रेटिस** : माझ्या कल्पनेप्रमाणे एक टक्कल पडलेला, जुन्या वस्तू दुरुस्त करणारा गुलाम आहे. थोड्या मिळकतीनंतर त्याचे दास्यत्व काढून घेऊन त्याला चांगल्याप्रकारे सजवून (चांगला पोषाख) नवरा-मुलगा म्हणून उभा केला. त्याचा दरिद्री व निराधार धनी आपल्या मुलीचे त्याचेशी लग्न लावण्याच्या विचारात आहे. अशा माणसाची व वर वर्णन केलेल्या माणसाची स्थिती सारखीच आहे.

**ॲडिमँट्स** : ह्या दोहोंची स्थिती सारखीच आहे.

**सॉक्रेटिस** : अशा विवाहापासून निर्माण होणारी संतती हलक्या व क्षुद्र दर्जाची असणार नाही काय ?

**ॲडिमँट्स** : मग कशी असतील ?

**सॉक्रेटिस** : शिक्षणास अपात्र व्यक्तींनी आपली पात्रता नसताना तत्त्वज्ञानाशी संबंध ठेवला तर त्यांच्या दृष्टिकोनांचे स्वरूप काय असेल ? शुद्ध ज्ञान नसणारी, सत्याचा आभास निर्माण करणारी अशीच मते पसरणार नाहीत का ?

**ॲडिमँट्स** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : मग ॲडिमँट्स, तत्त्वज्ञानाशी संबंध असणाऱ्यांचा वर्ग फारच लहान असणार. या वर्गात उदार स्वभावाचे, सुशिक्षित मनाचे, हद्दपारीची शिक्षा झालेले, दुष्ट गोष्टींपासून अलिप्त, स्वतःच्या स्वभावाशी प्रामाणिक, तत्त्वज्ञानाची आस्था असणारे असे काही असतात. स्वतःच्या देशातील राज्यकारभाराकडे तुच्छतेने पाहणारे, छोट्या देशांत जन्मलेले पण मोठ्या मनांचे लोक त्यात असतात. आपल्या व्यवसायाबद्दल काही कारणाने तिरस्कार वाटणारे, भिन्न व्यवसायातील बुद्धिमान तत्त्वज्ञानाचा आसरा घेतात. प्रकृती चांगली नव्हती म्हणून थीएजीस तत्त्वज्ञानाकडे वळला. अन्य कोणत्याही कारणाने तो राजकारणातून बाहेर पडू शकला नसता. थीएजीसप्रमाणे इतरही काही लोक प्रकृती चांगली नसते म्हणून तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतात. मला स्वतःला आदेश मिळाल्याने तत्त्वज्ञानाचा त्याग करावा वाटत नाही. तो आदेश उघड करावा वाटत नाही. माझ्यापूर्वीसुद्धा एखाद्याच व्यक्तीला तो आदेश मिळाला असेल. ज्याने ज्ञानी माणसांच्या मेळाव्यात प्रवेश केला आहे, आपल्या

जवळचे ज्ञान जीवनास किती उपकारक व कृतार्थता निर्माण करणारे आहे याचा ज्याला अनुभव आहे, सार्वजनिक कामांत कोणीही योग्य तऱ्हेने वागत नाही, अनेकांचे वर्तन वेडेपणाचे असते अशी ज्याला पूर्ण खात्री पटली आहे, न्यायाने वागणाऱ्या माणसाच्या मदतीला जाण्यासाठी ज्याची मदत घेता येईल असा एकही मनुष्य नाही असे ज्याला समजले, एवढेच काय पण जर तसा प्रयत्न केला तर आपणच हिंस्र श्वापदांच्या कचाट्यात सापडल्यासारखी आपली स्थिती होईल हे ज्याला कळून चुकले आहे, लोकांच्या पापात मदत करण्याची स्वतःची इच्छा नसतानाही केवळ लोकांच्या रागाला एकट्याने तोंड देणे शक्य नसल्याने, देश, मित्र यांची सेवा, आपले किंवा इतरांचे चांगले कार्य, यापूर्वीच आपला नाश केला जाईल ही शक्यता ज्याला समजली आहे, अशी व्यक्ती माझ्या मताप्रमाणे शांतपणे स्वतःच्या कामात मग्न राहील. वादळ-वाऱ्यात, धूळ-पावसात सापडल्यावर एखादा माणूस भिंतीच्या आश्रयाने स्वतःचे संरक्षण करतो तसे या माणसाचे वर्तन आहे. स्वतःच्या आश्रयाच्या जागी उभे राहून, माणसांचे बेबंद वर्तन पहात असताना तो स्वतः पाप, अपवित्र यांपासून अलिप्त रहात, उरलेले आयुष्य घालवून; आनंदी, गंभीर, उल्हसित मनाने तो मृत्यूचे स्वागत करून, जगाची रजा घेतो, त्यावेळी त्यास समाधान वाटते.

**ॲडिमँट्स :** पण जगाचा निरोप घेण्यापूर्वीच बरीच महत्त्वाची कामे करतो.

**सॉक्रेटिस :** जर स्वतःला योग्य अशी आदर्श राज्यघटना त्याला मिळाली नाही तर तो महत्त्वाचे काम करून जातो असे म्हणता येणार नाही. अशा घटनेमुळेच पूर्णतेच्या दृष्टीने स्वतःचा विकास करून त्याला स्वतःचे व देशबांधवांचे कल्याण साधता येईल.

□ □

# प्रकरण बावीस
# तत्त्वज्ञ राज्यकर्ता मिळणे अशक्य नाही

**[VI-497-A—502-C]**

**कथासूत्र :**

[ज्ञानाच्या आणि नीतीच्या क्षेत्रात सर्वांना आदर्शभूत ठरणारा मार्गदर्शक राज्यकर्ता मिळणे दुर्घट आहे, असे प्लेटोला वाटत नाही. सर्व सत्ताधारी असलेली पण सत्तेचा वापर स्वार्थासाठी न करता समाजकल्याणासाठी करणारी व्यक्ती लाभली तर समाजात खरी नैतिक क्रांती घडेल असे त्याला वाटते. एखाद्या विद्यापीठात (अ‍ॅकेडमी) प्रदीर्घकालपर्यंत शिक्षण देऊन, संस्कार करून अशा व्यक्ती तयार करणे शक्य आहे, असे त्याचे मत आहे. त्यानुसारच आदर्श राज्यकर्त्यासाठी द्यावयाच्या विशेष शिक्षणक्रमाचा त्याने पुढे विचार मांडला आहे.

मात्र अशी सर्वसत्ताधारी व्यक्ती प्लेटोच्या मते स्वेच्छाचारी वृत्तीची हुकूमशहा असणार नाही. अशा व्यक्तीची तुलना त्याने निश्चित ध्येयदृष्टी असणाऱ्या सृजनशील कलावंताबरोबर केली आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** तत्त्वज्ञानाविषयीचे दुष्ट पूर्वग्रह व त्याचे तत्त्वज्ञानावर होणारे अन्याय याचे समाधानकारक विवेचन केले. जर आणखी काही सुचवावे वाटल्यास आपण सुचवावे.

**अ‍ॅडिमँट्स :** मला हचाबाबत काहीच सांगायचे नाही. परंतु तत्त्वज्ञानाला योग्य अशी आपल्या काळातील चालू असलेल्यांपैकी एखादी राज्यघटना सांगता येईल काय ?

**सॉक्रेटिस :** एकही नाही. तत्त्वज्ञानी स्वभावाला योग्य अशी एकही राज्यघटना अस्तित्वात नसल्यामुळे असा स्वभाव हाय खाऊन वाईट होतो अशी माझी तक्रार आहे. ज्याप्रमाणे दुर्मिळ असे परदेशी बी परक्या जमिनीत पेरल्यावर, सवयीमुळे कमकुवत होते व स्वतःचे स्वरूप घालविते आणि देशातील सर्वसामान्य रोपट्यांप्रमाणेच वाढते, त्याप्रमाणे सध्याच्या काळात अशा स्वभावाची माणसे आपले वैशिष्टच कायम राखण्यास समर्थ होत नाहीत. विरुद्ध गुणधर्म अंगी येऊन पतित होतात. परंतु जर त्याच्या स्वभावाला पूर्णपणे योग्य अशी राज्यघटना आढळून आली तर तो असे सिद्ध करून दाखवेल की त्याचा स्वभाव खरोखर दैवीस्वरूपी आहे व इतर स्वभाव व धंदे केवळ मानवी होय. “अशी कोणत्या प्रकारची राज्यघटना” असा प्रश्न तुम्ही निश्चित मला विचारणार ?

**ॲडिमँट्स :** नाही. तुमची कल्पना चुकीची आहे. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, आपण ठरविलेल्या राज्यघटनेचा आपण विचार करता की, अन्य कुठल्या ?

**सॉक्रेटिस :** तिचाच. परंतु एक वेगळा मुद्दा विचारात घेऊन तोच आपल्या चर्चेत निर्देशिला आहे. ज्या दृष्टिकोनातून कायदेपंडित म्हणून राज्यघटना पाहिली त्याच दृष्टिकोनातून पाहणारी अशी एक कायमची सत्ता राज्यात असावी असे आपण सांगितले आहे.

**ॲडिमँट्स :** होय. असेच मला सांगायचे आहे.

**सॉक्रेटिस :** परंतु हा मुद्दा मी विस्तृत केला नाही. कारण तुमच्या आक्षेपांनी घाबरून असे वाटले की, "हे काम कठीण व कंटाळवाणे होईल". आपल्या चर्चेत राहिलेला भाग काही सोपा नाही.

**ॲडिमँट्स :** कोणता भाग ?

**सॉक्रेटिस :** "राज्यावर पूर्ण नाश होण्याची वेळ येणार नाही" अशा रीतीने सरकारने तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची पद्धत दाखविली हे आपण दर्शविले पाहिजे. कारण सर्व मोठ्या गोष्टी जोखमीच्या असतात व "सुंदर वस्तू प्राप्त होणे कठीण असते" अशी म्हण आहे.

**ॲडिमँट्स :** आपले वर्णन पूर्ण होण्यासाठी हा मुद्दा स्पष्ट करणे जरूर आहे.

**सॉक्रेटिस :** त्यात येणाऱ्या अडचणीस इच्छेची उणीव नसून फक्त शक्तीची उणीवच कारणीभूत होईल. माझ्या स्वतःच्या उत्साहामुळे मी छातीठोकपणे असे विधान करतो की, तत्त्वज्ञानाचा अभ्यास चालू पद्धतीच्या अगदी उलट प्रकाराने चालावा असे सरकारने ठरवावे.

**ॲडिमँट्स :** कोणत्या प्रकाराने ?

**सॉक्रेटिस :** जे लोक सध्या अभ्यास करतात, त्यांचे पोरपण नुकतेच संपून तरुणपण चालू झालेले असते व ते घरकाम व त्यांचा व्यवसाय सांभाळून उरल्यासुरल्या वेळातच अभ्यास करतात. ह्या अभ्यासातील अतिशय कठीण भाग म्हणजे 'ब्रह्मविद्या' होय. त्यात थोडे लक्ष देतात व लगेच अभ्यास बंद ठेवतात व अशा लोकांनाच मोठे तत्त्वज्ञानी समजतात. ज्यांचे सर्व लक्ष तत्त्वज्ञानातच असते अशा माणसांचे व्याख्यानास येणे त्यांना कमीपणाचे वाटते. कारण त्यांचा असा समज असतो की, "तत्त्वज्ञान हा मुख्य व्यवसाय नसावा" असे हे अर्धवट तत्त्वज्ञानी वृद्धावस्थेत हिराक्लिट्सच्या सूर्याहून अधिक मावळतात. कारण त्यांना सूर्याप्रमाणे पुन्हा प्रकाशमान होणे शक्य नसते.

**ॲडिमँट्स :** तर मग योग्य अशी योजना सांगा.

**सॉक्रेटिस :** ह्याच्या अगदी विरुद्ध अशी ती आहे. तारुण्य व पोरवयात अशा लोकांना वयोमानास योग्य असे तत्त्वज्ञानाचे शिक्षण द्यावे. तारुण्यात शरीराचा विकास होत असतानाच त्यांचेवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कारण शरीरविकास तत्त्वज्ञानाला अतिशय

उपयोगी आहे. ह्याच सुमारास मन पक्व बनण्यास जास्त कठीण असे मानसिक श्रम देणे जरूर आहे. अखेर सार्वजनिक व लष्करी व्यवसायाच्या निवृत्तीनंतर शारीरिक शक्ती मंदावते त्यावेळी फक्त तत्त्वज्ञानाच्या व्यासंगास वाहून घेतले पाहिजे म्हणजे इहलोकी सुखाचे आयुष्य काढता येईल व मृत्यूनंतर परलोकांतही इहलोकाप्रमाणे सुखाचे (सुदैवी) आयुष्य मिळविता येईल.

**ॲडिमँट्स** : सॉक्रेटिस, तुमच्या उत्साहाबद्दल मी साशंक नाही. परंतु माझी अशी कल्पना आहे की, " थ्रॅसिमॅक्ससारखे किती तरी श्रोते आपल्यास जास्त उत्साहाने विरोध करतील व त्यांची नापसंती स्पष्टपणे दाखवितील. "

**सॉक्रेटिस** : नुकतेच माझ्यात व थ्रॅसिमॅक्स यात मित्रत्व निर्माण झाले आहे, तरी आपण माझ्यात व त्यांच्यात वाद उत्पन्न करू नये. याचा अर्थ आम्ही दोघे शत्रू होतो असे नव्हे. माझ्या मताप्रमाणे त्याचे व इतरांचे मन वळविल्याशिवाय किंवा पुढील जन्मी अशा प्रकारचे वाद घालण्याची संधी मिळाल्यास ह्या चर्चेचा फायदा होईल याकरिता मी प्रयत्न करेन.

**ॲडिमँट्स** : फारच थोडी मुदत दिली !

**सॉक्रेटिस** : सर्व काळाच्या दृष्टीने ही मुदत फारच कमी आहे. पुष्कळ लोकांचा माझ्या मतांवर विश्वास नाही. यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. कारण ते त्यांची प्रस्तुत कल्पना मूर्त स्वरूपात पाहात नाहीत. त्यांच्यापुढे आपल्या कल्पनेसारख्या आणखी काही कल्पना मांडल्या ; परंतु आपल्या कल्पनेप्रमाणे स्वाभाविक एकता त्या कल्पनांत नसेल. स्वतःसारखा परिपूर्ण असलेल्या राज्यात राज्य करणारा, शब्दांनी व कृतींनी सद्गुणी असणारा असा एक तरी मनुष्य त्यांना पाहता आला असेल का ?

**ॲडिमँट्स** : खरोखरच नसेल.

**सॉक्रेटिस** : केवळ ज्ञानाच्या लालसेने सत्य शोधण्याकरिता उच्च व उदात्त पद्धतीचे वादविवाद त्यांनी कमीच ऐकले असतील. अशा प्रकारचे वादविवाद, खाजगी चर्चेत किंवा सामन्यात, फक्त वाद वाढविणे किंवा शाबासकी देणे अशा हेतूने केलेल्या वादाच्या पद्धतीपासून दूर ठेवणे जरूर आहे.

**ॲडिमँट्स** : तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : जे सध्या भ्रष्ट नाहीत परंतु निरुपयोगी असे मानले जातात असे थोडे तत्त्वज्ञानी लोक, खूष असोत अथवा नसोत, जोपर्यंत त्यांना राज्यकारभाराची जबाबदारी घेणे क्रमप्राप्त नसते व राज्य त्यांच्याशी आज्ञाधारकपणे वागत नाही, किंवा हल्लीचे सार्वभौम राजे व त्यांचे पुत्र ह्यांच्यात खऱ्या तत्त्वज्ञानाबाबत खरी भक्ती दैवी योगाने उत्पन्न होत नाही तोपर्यंत कोणतीही राज्यघटना अथवा व्यक्ती पूर्णत्व पावत नाही. असे विधान एका प्रसंगी संशय व भय असूनही सत्याच्या आवेशाने स्पष्टपणे मांडले आहे. ह्या दोहोंपैकी कोणाचेही म्हणणे शक्य आहे असे म्हणणे मला समंजसपणाचे वाटते. जर दोन्हीही अशक्य असतील तर काल्पनिक उपपत्त्या प्रतिपादन करणारे म्हणून हेटाळले जाणे योग्य. बरोबर आहे ना माझे मत ?

**ॲडिमँट्स** : होय. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : तत्त्वज्ञानाचे उत्तम प्रतीचे प्राविण्य प्राप्त केले आहे. त्यांनी जर बऱ्याच काळामागे राज्यकारभाराचे काम केले किंवा आपल्या डोळयासमोरच्या बऱ्याच काळामागे परकीय देशांत असे लोक आता किंवा पुढे राज्यकारभार सक्तीने करतील किंवा करणार आहेत असे दाखवून दिले तर अशी राज्यघटना अस्तित्वात होती, आहे व असेल असे मी मरेपर्यंत वाद घालून सिद्ध करेन. कारण ज्ञानदेवता राज्यस्वामिनी आहे. माझे असे मत आहे की, आपल्या कल्पनांची मूर्तावस्था शक्य आहे व विचारही व्यवहार सोडून नाहीत. तरीसुद्धा त्यातील अडचणी आपणांस मान्य आहेत.

**ॲडिमँट्स** : माझे पण हेच मत आहे.

**सॉक्रेटिस** : परंतु बहुजन समाज याच मताचा आहे असे म्हणण्यास तयार आहात का ?

**ॲडिमँट्स** : कदाचित नाही.

**सॉक्रेटिस** : माझ्या मित्रा, बहुजनसमाजावर आपण केवढा आरोप करता ? वाद न घालता तत्त्वज्ञान्याची व्याख्या, त्यांचा स्वभाव व शिक्षण ह्याबाबत शांतपणाने माहिती सांगून बहुजनसमाजाचा 'ज्ञाना' बाबतचा वाईट पूर्वग्रह काढण्याचा प्रयत्न केल्यास निश्चितच लोकांची मते बदलतील. त्यांचेसमोर हल्ली उभे राहणारे स्वभाव हे पूर्वी सांगितलेल्या माहितीप्रमाणे तत्त्वज्ञानी स्वभावाचे आदर्श नाहीत हे त्यांना पटेल. आपल्या मताप्रमाणे जरी तत्त्वज्ञानींचे निरीक्षण केले तरीही तुमच्यापेक्षा वेगळे त्यांचे मत आहे व वेगळे उत्तर मिळेल असे धाडसाने म्हणाल काय ? वेगळ्या शब्दांत असे म्हणता येईल की, "जो स्वतः द्वेष करीत नाही व सभ्य आहे तो मनुष्य भांडखोर नसलेल्याशी भांडेल व द्वेषी नसलेल्याचा द्वेष करील." असे तुमचे मत आहे का ? माझ्या मते अशा प्रकारचा दुष्ट, हट्टी स्वभाव अतिशय थोड्या लोकांत आढळेल. परंतु एकंदरीत बहुजनसमाज तसा असणार नाही. तुम्ही ह्या मताशी सहमत आहात का ?

**ॲडिमँट्स** : मी संपूर्णपणे आपल्याशी सहमत आहे.

**सॉक्रेटिस** : जसे झिंगलेले लोक संबंध नसलेल्या जागी घुसतात, एकमेकांना शिवीगाळ करून भांडणे काढण्यात आनंद मानून नेहमी निंदाच करतात, तशी तत्त्वज्ञानाच्या व्यासंगास अयोग्य असणारांची वागणूक आहे. माझ्या मते लोकांच्या वर्तनामुळे, तत्त्वज्ञानाबाबत वाईट ग्रह उत्पन्न होतात व समाजात पसरतात. तुमचे पण हेच मत आहे का ?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : ॲडिमँट्स, जो वस्तूच्या खऱ्या स्वरूपाचा विचार करतो त्याला व्यवहाराकडे लक्ष देण्यास व मनुष्याबरोबर वादविवाद करून मत्सर व वैरभावना मनात आणण्यास वेळच नसतो. तो सर्व वेळ सुव्यवस्थित व अविकारी अशा काही विशिष्ट वस्तूंबद्दल विचार करण्यात घालवितो. अशा वस्तू अपाय करीत नाहीत किंवा अपाय केल्या जात नाहीत. अशा वस्तूंबाबत बुद्धीची एकात्मता व सुव्यवस्थेशी आज्ञाधारकपणा पाहून तो आपले आयुष्य घालविण्याचा प्रयत्न करतो. ज्याबाबत आदर निर्माण होतो, त्याचे अनुकरण करण्याचे टाळणे त्यास शक्य आहे असे तुमचे मत आहे का ?

**ॲडिमँट्स :** नाही. हे अशक्यच आहे.

**सॉक्रेटिस :** दैवी व सुव्यवस्थित असणाऱ्याशी सहवास ठेवून, तत्त्वज्ञानी मनुष्य, मनुष्यास जेवढे शक्य आहे तेवढा सुव्यवस्थित व दैवी होतो. असे असले तरी इतरांप्रमाणे त्याचेकडून चूक केली जाण्याची शक्यता आहे.

**ॲडिमँट्स :** तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** ज्या गोष्टी तत्त्वज्ञानी माणसाला उच्च वातावरणाकडे नेतात, त्या गोष्टी सामान्य लोकांच्या खासगी व सार्वजनिक आयुष्यामध्ये कशा जातील ? व त्यांचे आयुष्य कसे सुधारतील ? याविषयी जर त्याला एखादी योजना तयार करण्यास लावले तर नेमस्तपणा, न्याय व सर्व सार्वजनिक सद्‌गुण याची निर्मिती करण्यात निष्काळजी चित्रकाराप्रमाणे वागेल, असे तुम्हांस वाटते का ?

**ॲडिमँट्स :** नाही.

**सॉक्रेटिस :** जर समाजाला आपण पटवून दिले की, आपले वर्णन योग्य आहे, तर त्यांना तत्त्वज्ञानी लोकांचा राग येईल का ? चांगल्या दैवी आदर्शाची नक्कल करणारे तत्त्वज्ञानी चित्रकार यांनी राज्यघटना केल्याशिवाय राज्याला खरे सुख मिळणार नाही असे आपण म्हटले तर त्यावर ते विश्वास ठेवणार नाहीत का ?

**ॲडिमँट्स :** त्यांना समजून दिल्यावर ते रागावणार नाहीत हे खरे. पण तत्त्वज्ञानी लोक चित्र कसे रेखाटणार याचे तुम्ही वर्णन कराल काय ?

**सॉक्रेटिस :** राज्य व मनुष्याचा नैतिक स्वभाव हा चित्रफलक समजून तो ते प्रथम स्वच्छ करतील. अर्थात हे काम सोपे नाही. तुम्हांला माहितच आहे की, इतर कलावंतांच्या व तत्त्वज्ञानी लोकांच्यामध्ये फरक आहे. तत्त्वज्ञानी लोक स्वच्छ फलक मिळेपर्यंत अथवा स्वतःच्या प्रयत्नांनी तो तसा होईपर्यंत मनुष्य अथवा शहर यांच्या व्यवहारात ते ढवळाढवळ करणार नाहीत. किंवा कायदे करण्यास उद्युक्त होणार नाहीत.

**ॲडिमँट्स :** हे त्यांचे करणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** मग त्यांच्या आवडीच्या राज्यघटनेची रूपरेषा ते रेखाटतील काय ?

**ॲडिमँट्स :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** ही रूपरेषा भरून काढताना न्याय, सौंदर्य, नेमस्तपणा व इतर गुण ह्यांच्या आदर्शाकडे पाहतील. त्याविषयी मानवी प्राण्याच्या प्रचलित कल्पना पाहतील. अशा प्रकारे अभ्यास करून काढलेले निष्कर्ष मानवी शरीरात उतरविण्याचा प्रयत्न करतील. होमर कवीने देवतुल्य व देवी मानलेली मानवांची उदाहरणे ह्या कामात उपयोगी ठरतील.

**ॲडिमँट्स** : तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : माझ्या मते काहीसे पुसून व थोडा आणखी रंग भरून मनुष्य स्वभाव, देवांना संतोष वाटण्याइतका चांगला करून दाखवतील.

**ॲडिमँट्स** : त्यांचे चित्र फारच चांगले होईल.

**सॉक्रेटिस** : जे लोक आपल्यावर जोराने हल्ला करीत होते त्यांचे मन वळविण्याच्या प्रयत्नांत आपण यशस्वी झालो आहोत असे तुम्हांस वाटते ना ? ज्या चित्रकाराची आपण स्तुती केली व ज्या मनुष्याच्या हातात आपली शहरे दिली म्हणून लोकांना राग आला तोच चित्रकार अशा राज्यघटनेची चित्रे काढणारा होय असे त्यांना सांगितले तर त्याचा राग थोडा कमी होईल ना ?

**ॲडिमँट्स** : जर ते शहाणे असतील तर त्यांना राग येणार नाही.

**सॉक्रेटिस** : माझेही असेच मत आहे. कारण त्यांना आक्षेप घेता येणार नाही. तत्त्वज्ञानी लोकांना खऱ्या अस्तित्त्वाचे व सत्याचे प्रेम असते हे त्यांना नाकारता येईल काय ?

**ॲडिमँट्स** : नाही.

**सॉक्रेटिस** : ठीक. आपण वर्णन केलेल्या तत्त्वज्ञानी लोकांचा स्वभाव पूर्णावस्थेशी जुळणारा नाही असे त्यांना म्हणता येईल का ?

**ॲडिमँट्स** : असे त्यांना म्हणता येणार नाही.

**सॉक्रेटिस** : असा स्वभाव योग्य अभ्यासक्रमाच्या मर्यादेत जरी बसविला तरी तो संपूर्णतः चांगला व तात्त्विक होणार नाही असे ते म्हणतील काय ? अथवा ज्या लोकांना आपण त्याज्य ठरविले त्यांचीच ते निवड करतील काय ?

**ॲडिमँट्स** : निश्चितपणे नाही.

**सॉक्रेटिस** : मग मी असे म्हटले की, जोपर्यंत राज्यामध्ये तत्त्वज्ञानी लोकांना श्रेष्ठ अधिकार दिले जाणार नाहीत तोपर्यंत अशा राज्यांची व त्यातील लोकांची वाईटापासून सुटका होणार नाही व जी काल्पनिक राज्यघटना आपण वर्णन करीत आहोत ती कधीही मूर्त स्वरूपात येऊ शकणार नाही. तर त्यांना अजूनही राग येईल का ?

**ॲडिमँट्स** : कदाचित त्यांना कमी राग येईल.

**सॉक्रेटिस** : ते कमी रागावतील. एवढेच नव्हे तर त्यांचे पूर्ण समाधान होईल असे गृहीत धरण्यास तुमची काय हरकत आहे ? अशा तऱ्हेने त्यांना लाजवून आपल्या म्हणण्यास मान्यता द्यायला लावू.

**ॲडिमँट्स** : तुम्ही खुशाल असे गृहीत धरा.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. हया लोकांची खात्री करून दिली असे आपण गृहीत धरा. राजे व सार्वभौम सत्ताधीश यांना तत्त्वज्ञानी स्वभावाचा मुलगा होणे शक्यच नाही, असे कोणी म्हणेल काय ?

**ॲडिमँट्स :** जगात एकही मनुष्य असे म्हणणार नाही.

**सॉक्रेटिस :** जन्मतः जरी तत्त्वज्ञानी स्वभाव असला तरी पुढे भ्रष्ट होतील असे कोणी म्हणेल काय ? अशा स्वभावाचे संरक्षण करणे कठीण आहे. हे मी कबूल करतो. तरीपण मला असे विचारावेसे वाटते की, कालाच्या ओघामध्ये अशा स्वभावाच्या मुलापैकी एकही भ्रष्टतेपासून संरक्षिला जाणार नाही. असे कोणी म्हणेल का ?

**ॲडिमँट्स :** नाही.

**सॉक्रेटिस :** अशा मनुष्याच्या अधिपत्याखाली जर नम्र स्वभावाचे राज्य असेल तर ज्या गोष्टी आता विश्वासार्ह वाटत नाहीत त्या तो प्रत्यक्षात करून दाखवील.

**ॲडिमँट्स :** शक्य आहे.

**सॉक्रेटिस :** आपण विस्तृतपणे वर्णन केलेल्या कायदे व चालीरीती जर राज्यकर्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करेल तर शहरवासियांना त्या पाळणे कठीण जाणार नाही.

**ॲडिमँट्स :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** आपल्याला जे योग्य वाटते ते दुसऱ्यांनाही योग्य वाटेल असे होणे अशक्य, चमत्कारिक आहे काय ?

**ॲडिमँट्स :** असे होणे चमत्कारिक नाही असे मला वाटते.

**सॉक्रेटिस :** मला असे वाटते की, आतापर्यंत झालेल्या वादविवादावरून आपली योजना जर शक्य असली तर सर्वोत्तम आहे अशी आपली खात्री झाली आहे.

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** यावरून आपल्या कायद्यासंबंधी आपण पुढील निष्कर्ष काढू शकू. आपण जे म्हणतो ते प्रत्यक्षात येणे शक्य असेल तर ते अत्युत्तम आहे आणि ते प्रत्यक्षात आणणे कठीण जरी असले तरी अशक्य मात्र खासच नाही.

**ॲडिमँट्स :** असा निष्कर्ष आपण निश्चितच काढू.

□ □

# प्रकरण तेवीस
# अंतिम सत्तेचे स्वरूप

**[VI-502-C—509-C]**

**कथासूत्र :**

[तत्त्वज्ञ राज्यकर्ता आवश्यक आहे, शक्य आहे, हे सांगितल्यानंतर आणि तत्त्वज्ञानाची रूपरेखा दिल्यानंतर ज्ञानाचा अंतिम विषय जी परमसत्ता (Ultimate Reality) तिचे स्वरूप प्लेटोने विशद केले आहे.

दृश्य सृष्टीतील, इंद्रियवेद्य वस्तू, व्यक्ती, घटनांचे नियंत्रण करणारी आदर्श तत्त्वे म्हणजे प्लेटोच्या मते सत्-तत्त्वे (Ideas or Forms) होत. या सत्-तत्त्वांचे नियंत्रण करणारे सर्वश्रेष्ठ सत्-तत्त्व म्हणजे परमसत्ता होय. यालाच त्याने 'Good' असे म्हटले आहे.

ज्ञानशास्त्रीय दृष्टया, नीतीशास्त्रीय दृष्टया आणि सत्ताशास्त्रीय दृष्टया हीच एकमेव परमसत्ता होय. बौद्धिक मर्मदृष्टीने होणारे सत्याचे ज्ञान, विशुद्ध नैतिक चारित्र्याने होणारे न्यायाचे ज्ञान या परमसत्तेच्या साक्षात्काराच्या दोन बाजूच होत.

ही परमसत्ता स्थल-काल-कारण निरपेक्ष आहे. तीच परमसत्य आणि परममूल्य आहे. तिचा साक्षात्कार हेच तत्त्वज्ञानाचे परमध्येय असते. त्याची पूर्ती हाच परमपुरुषार्थ होय. तेच मानवी जीवनाचे परमकल्याण होय.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** कोणत्या पद्धतीने, कोणत्या प्रकारच्या अभ्यासांनी व व्यासंगांनी आपल्या राज्यपद्धतीचे संरक्षण करणारा वर्ग तयार करता येईल आणि हे अभ्यास स्वतंत्रपणे कोणत्या वयात करावयाचे या प्रश्नांचा विचार आता आपण करावा ना?

**ॲडिमँटस :** होय. निःसंशय करावा.

**सॉक्रेटिस :** स्त्रियांची मालकी, मुलांचे उत्पादन व अधिकारी लोकांच्या नेमणुकी या बाबतीत निर्माण होणारे कठीण प्रश्न वगळणे मला काहीच फायद्याचे नाही. याबाबत अत्यंत योग्य अशी पद्धत अमलात आणणे फार कठीण जाईल व त्याबाबत लोकमतही विरुद्ध होईल या भीतीने मी या प्रश्नांचा विचार केला नाही. मी कितीही सावधगिरी बाळगली तरी हे प्रश्न सोडविण्याचीच वेळ माझ्यावर येऊन ठेपली आहे. स्त्रिया व मुले यासंबंधी आपण विचार केला. पण अधिकाऱ्यांच्या नेमणुकीबाबत मात्र पुन्हा चर्चा सुरू करणे आवश्यक

आहे. अधिकाऱ्यांचे वर्णन करताना आपण असे म्हटले होते की, त्यांची देशभक्ती संशयातीत असण्यासाठी सुख व दुःखांच्या प्रसंगांतून त्यांची परीक्षा घेणे जरूर आहे. जर एखादेवेळी सहनशक्तीने दगा दिला तर, आपली सत्ता जाईल या भीतीने श्रम, संकटे आणि दैवविलास अशा वातावरणातही ते आपली तत्त्वे सोडत नाहीत असा अनुभव आपल्यास येतो. ज्याप्रमाणे अग्नितून सोने जसे शुद्ध होऊन बाहेर पडते, दोषरहित जर ते बाहेर आले तर अधिकाराच्या जागेवर त्यांची नेमणूक करावी व ते जिवंत असेपर्यंत त्यांना हक्क व देणग्या मिळाव्या अशी सोय करावी, अशा प्रकारचा आपल्या विचारांचा अभिप्राय होता. परंतु केवळ भीतीमुळेच तो उपस्थित केला गेला नाही व तसाच राहिला.

**ॲडिमँट्स** : आपण केलेले वर्णन अगदी बरोबर आहे व मला पूर्णपणे असे म्हटल्याचे आठवत आहे.

**सॉक्रेटिस** : त्यावेळी माझी मते मी स्पष्टपणे मांडण्यास कचरलो होतो. परंतु पुढील विधान मी आता धिटाईने मांडत आहे. "अत्यंत योग्य अशा तत्त्वज्ञानी लोकांनाच आपण संरक्षक केले पाहिजे."

**ॲडिमँट्स** : ठीक आहे.

**सॉक्रेटिस** : असे थोडेच लोक सापडतील. कारण तत्त्वज्ञानी स्वभावाचे वेगवेगळ्या प्रकारचे आवश्यक गुण म्हणून जे सांगितले आहेत ते एकत्रित सापडणे कठीण आहे. पुष्कळ वेळा ते निरनिराळ्या लोकांच्यात विखुरलेले असतात.

**ॲडिमँट्स** : तुमचे म्हणणे मी समजू शकलो नाही.

**सॉक्रेटिस** : आपल्याला माहीत आहेच की, तीक्ष्ण ग्रहणशक्ती, उत्तम स्मरणशक्ती, शहाणपणा, कुशाग्र बुद्धिमत्ता व इतर गुण असलेले लोक सहजासहजी उदार व उच्च मनाचे होत नाहीत व त्यांना नियमित, शांत व स्थिर आयुष्य घालविण्यात आनंदही वाटत नाही. याउलट असे लोक तीक्ष्ण बुद्धीमुळे इकडेतिकडे वहात जाऊन स्थिर आयुष्य गमावून बसतात.

**ॲडिमँट्स** : हे खरे आहे.

**सॉक्रेटिस** : जे लोक स्थिर स्वभावाचे असल्यामुळे त्यांना विश्वासाने काम द्यावे असे वाटते व जे युद्धात डगमगत नाहीत ते अभ्यासही धीमेपणाने करतात. म्हणजेच ते मंद व मूर्ख असतात आणि मानसिक कष्ट करीत असताना ते वारंवार डुलक्या घेतात व जांभया देतात.

**ॲडिमँट्स** : हे खरे आहे.

**सॉक्रेटिस** : आपण असे ठरविले की, मनुष्यामध्ये हे दोन्ही तऱ्हेचे गुण बऱ्याच अंशी असल्याशिवाय त्याला उत्तम शिक्षण, मान व अधिकाराची जागा देऊ नये.

**ॲडिमँट्स** : आपले म्हणणे अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** परंतु अशा स्वभावाचे लोक थोडेच असतात ना ?

**अॅडिमँट्स :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच श्रम, संकटे व सुखे अशाप्रसंगी त्यांचे वर्तन पाहून आपण समाधान मानू नये. त्यावेळी आपण जे मार्ग काढले त्या मार्गांनी त्यांची परीक्षा केली पाहिजे. त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे अभ्यास करावयास लावून, त्यांची बुद्धी उच्च विषयांचे अभ्यास करण्यास कितपत समर्थ आहे किंवा नाही, अथवा अशा परीक्षांमध्ये इतर लोक ज्याप्रमाणे माघार घेतात त्याचप्रमाणे हे माघार घेतात किंवा नाही हे पहावयास पाहिजे.

**अॅडिमँट्स :** अशाप्रकारे त्यांची परीक्षा घेणे योग्यच आहे. पण कोणते विषय आपण उच्च समजता ?

**सॉक्रेटिस :** आत्म्याचे आपण तीन विभाग मानून, त्यातून न्याय, नेमस्तपणा, धैर्य व शहाणपणा हे स्वभाव शोधले हे आपल्याला आठवते का ?

**अॅडिमँट्स :** जर मी हे आठवू शकलो नाही तर पुढील विवेचन ऐकण्यास मी योग्य ठरणार नाही असे समजावे.

**सॉक्रेटिस :** हे स्वभाव शोधून काढण्याअगोदर आपण काय म्हटले होते हे आपल्याला आठवते काय ?

**अॅडिमँट्स :** ते कोणते ?

**सॉक्रेटिस :** आपण असे म्हटले होते की, प्रश्नाचा सर्वोत्कृष्ट विचार करण्यासाठी आपण वेगळा व दूरचा मार्ग स्वीकारावयास पाहिजे. त्यामुळे आपल्याला त्या विषयातील पूर्णदृष्टी मिळेल. तथापि आपल्या पूर्वीच्या निष्कर्षावरून हा प्रश्न सोडविता येणे शक्य आहे असेही आपण म्हटले. यावर तुम्ही म्हणालात की, अशा रीतीने प्रश्न सोडविला तरीसुद्धा तुमचे समाधान होईल व आपण वर्णन केलेली चर्चा सुरू झाली. ती अपूर्णच होती असे माझे मत आहे. परंतु तुम्हाला ती समाधानकारक वाटली काय ?

**अॅडिमँट्स :** माझे व्यक्तीशः मत असे की, ही चर्चा प्रमाणशीर होती व इतरांचेही हेच मत होते.

**सॉक्रेटिस :** ज्या प्रमाणामुळे सत्य सापडत नाही ते केव्हाही योग्य म्हणता येणार नाही, कारण ते अपूर्ण असल्यामुळे ते कोणत्याही गोष्टीचे प्रमाण होणार नाही. लोकांना काही वेळा असे वाटते की, झाले हेच वर्णन खूप झाले. तेव्हा अधिक चर्चेची जरुरी नाही.

**अॅडिमँट्स :** होय. आळशीपणापासून ही सर्वसाधारण सवय जडते.

**सॉक्रेटिस :** होय. परंतु राज्याचे व त्यातील कायद्याचे जे संरक्षक आहेत अशांना ही सवय असणे अतिशय दूषण देणारे आहे.

**अॅडिमँट्स :** होय. मला पण असेच वाटते.

**सॉक्रेटिस :** जर असे आहे तर संरक्षकाने दूरचा मार्ग स्वीकारला पाहिजे आणि शारीरिक अभ्यास व बौद्धिक अभ्यास काळजीपूर्वक केले पाहिजेत. अन्यथा आपण पूर्वी सांगितल्या-प्रमाणे उत्तम प्रकारचे ज्ञान देण्याची महत्त्वाकांक्षा ते पूर्ण करू शकणार नाहीत. या ज्ञानाचा तेच अभ्यास करणार आहेत.

**ॲडिमँट्स :** म्हणजे काय ? आपण ज्यांचा उल्लेख केला ते सर्वश्रेष्ठ ज्ञानाचे प्रकार नव्हेत का ? न्यायशास्त्राचे विषय आपण पाहिले. त्यापेक्षा उत्तम दर्जाचे ज्ञान असते का ?

**सॉक्रेटिस :** निश्चितच. आतापर्यंत आपण नुसती रूपरेषाच पाहिली. आता त्याचे संपूर्ण विवेचन केले पाहिजे. त्याशिवाय आपल्याला समाधान मिळणार नाही. क्षुद्र महत्त्वाच्या विषयाकरिता खूप परिश्रम करावयाचे; त्याचे परिपूर्ण स्वरूप समजून घ्यावयाचे; मात्र सर्वश्रेष्ठ जे ज्ञान त्याचे महत्त्व न ओळखून त्याचे पूर्ण स्पष्ट असे पूर्ण संशोधन करावयाचे नाही हे हास्यास्पद नव्हे का ?

**ॲडिमँट्स :** तुमचा दृष्टिकोन अतिशय योग्य आहे. पण तुम्ही ज्याला अत्यंत श्रेष्ठ शास्त्र म्हणता ते कोणते ? त्याचा विषय काय ? हे सांगितल्याशिवाय तुमची सुटका होणार नाही.

**सॉक्रेटिस :** अर्थातच. म्हणून तूच प्रश्न विचार. बऱ्याच वेळा त्याचे उत्तर तुम्ही ऐकले आहे. पण आता एक तर तू विसरला असशील किंवा आक्षेप उपस्थित करून उत्तर देणे टाळत असशील. मला वाटते दुसरी गोष्टच खरी असावी. तुम्ही असे वारंवार ऐकले असेल की, ज्ञानाचा सर्वश्रेष्ठ विषय म्हणजे सद्-वस्तू होय. तिच्या संदर्भातील तत्त्वांच्या मदतीने न्यायशास्त्र किंवा सर्व निर्माण झालेल्या वस्तूंविषयीचे ज्ञान उपयुक्त व फायदेशीर होते. आता मी ते तत्त्वच मांडणार आहे. त्याचा आपणांस अजून पूर्ण परिचय झाला नाही असे माझे मत आहे. याच्याशी तुम्हीही सहमत व्हाल. हे तत्त्व आपणांस समजल्याशिवाय अन्य कोणतेही ज्ञान आपण मिळविले तरी त्याचा उपयोग नाही. सद्-वस्तूच्या प्राप्तीशिवाय अन्य काहीही मिळाले तरी त्याचा फायदा नाही. सर्व वस्तू मिळाल्या पण चांगली वस्तू मिळाली नाही तर त्याचा काय उपयोग ? म्हणजेच सद्-वस्तू व सौंदर्य यांचे ज्ञान झाल्याविना आपल्याला इतर कोणताही विषय कसा समजू शकेल ?

**ॲडिमँट्स :** मलासुद्धा ते शक्य वाटत नाही.

**सॉक्रेटिस :** सर्वसामान्य माणसाला चांगली वस्तू म्हणजे सुख, तर शहाण्या लोकांच्या दृष्टीने ज्ञान हीच चांगली वस्तू होय. हे तुम्हास माहीत आहे.

**ॲडिमँट्स :** हो. मला माहीत आहे.

**सॉक्रेटिस :** ज्यांचा दुसरा दृष्टिकोन आहे त्यांना ज्ञान म्हणजे काय हे सांगता येत नाही. शेवटी त्यांना एवढेच म्हणावे लागते की, ज्ञान म्हणजे सत्‌चे ज्ञान होय.

**ॲडिमँट्स :** हो. असा हास्यास्पद दृष्टिकोन ते मांडतात.

**सॉक्रेटिस :** खरेच त्यांची अशी स्थिती होते. जे सत् आहे त्याविषयी तुम्ही अज्ञानी असता म्हणून ते तुमची निंदा करतात. पण तुम्हांजवळ ते अशा तऱ्हेने बोलतात की तुम्हांस ते माहितच आहे. ते म्हणतात सत् म्हणजे सत्‌विषयीचे ज्ञान. त्यावेळी ते असे गृहीत धरतात की, सत् असा शब्द उच्चारला की, तो सर्वांना समजलाच पाहिजे.

**ॲडिमँट्स :** हो. खरे आहे.

**सॉक्रेटिस :** शिवाय सत् म्हणजे सुख असे जे म्हणतात त्यांची अशी चूक होते. कारण चांगल्या व वाईट प्रकारचे सुख असते हे त्यांना मान्य करावे लागते.

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** यावरून हे सिद्ध होते की, एकच वस्तू चांगली व वाईट असे ते सिद्ध करतात.

**ॲडिमँट्स :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** याचा अर्थ हा विषय अतिशय वादग्रस्त आहे.

**ॲडिमँट्स :** यात शंका नाही.

**सॉक्रेटिस :** जे न्याय्य सुंदर दिसते पण वस्तुतः तसे नसते ते करण्यास, करीत असल्याचे दाखविण्यास किंवा आपल्याजवळ आहे असे दाखविण्यास पुष्कळ लोक तयार असतात, पण जर चांगल्या वस्तूबद्दल प्रश्न निर्माण झाला तर जे केवळ चांगले दिसते ते मिळाल्यावर कोणासही समाधान होत नाही. सत्-तत्त्वाच्या प्राप्तीची प्रत्येकजण धडपड करीत असतो. या सत्-तत्त्वाच्या प्राप्तीतील दिखाऊपणा सर्वांनाच निंद्य वाटतो.

**ॲडिमँट्स :** हो. खरे आहे.

**सॉक्रेटिस :** प्रत्येक आत्मा हे सत्-तत्त्व आपल्या कृतीचे ध्येय म्हणून शोधतो. सत्-तत्त्वाच्या अस्तित्वाची त्याला जाणीव असते. पण त्याचे स्वरूप स्पष्टपणे न कळल्याने तो गोंधळून जातो. इतर वस्तूंबद्दल जशी निश्चित खात्री असते तशी या तत्त्वाविषयी नसते. म्हणून त्यापासून होणारा फायदाही त्याला सोडावा लागतो. म्हणूनच अशा अत्यंत महत्त्वाच्या विषयासंबंधी, ज्यांच्या हातात सर्व राज्यकारभार द्यावयाचा आहे अशा श्रेष्ठ लोकांनी अज्ञानी असणे योग्य होईल काय ?

**ॲडिमँट्स :** अजिबात नाही.

**सॉक्रेटिस :** असो. मला वाटते न्याय व सुंदर वस्तू, सत् कशाप्रकारे होऊ शकतात हे माहीत नसणारा अज्ञानी मनुष्य ह्या वस्तूंचा चांगला संरक्षक होऊ शकणार नाही. ज्याला सत्‌विषयी ज्ञान नाही तो ज्ञान व सौंदर्य योग्यप्रकारे जाणू शकणार नाही असे माझे मत आहे.

**ॲडिमँट्स :** तुमचे मत बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** ह्या विषयासंबंधी ज्यांनी शास्त्रीय ज्ञान मिळविले, अशा संरक्षकांच्या नेतृत्वाखाली आपल्या राज्यघटनेची अंमलबजावणी होऊ शकणार नाही काय ?

**ॲडिमँट्स** : नक्कीच पूर्ण होईल. पण सॉक्रेटिस, सत्-तत्त्व म्हणजे शास्त्र किंवा सुख, का या दोहोपेक्षा भिन्न आहे?

**सॉक्रेटिस** : माझ्या मित्रा, हया विषयावर इतरांची जी मते आहेत ती तुम्हाला मान्य होणार नाहीत हे मी पूर्वीच ओळखले आहे.

**ॲडिमँट्स** : सॉक्रेटिस, ज्या मनुष्याने हया प्रश्नांवर दीर्घ काळ विचार केला आहे त्याने इतरांची मते सांगावीत पण आपली मात्र सांगता येऊ नयेत, हे काही भूषणावह नाही.

**सॉक्रेटिस** : ज्या विषयाची आपल्याला पूर्ण माहिती नाही त्या विषयावर आपणांस सर्व काही माहिती आहे अशा थाटाने बोलणे तुम्ही योग्य समजता काय?

**ॲडिमँट्स** : सर्व काही माहिती आहे अशा थाटाने बोलणे केव्हाही चुकीचेच. पण मला असे वाटते की, आपले मत कसेही असले तरी ते स्पष्टपणे मांडणे योग्यच होय.

**सॉक्रेटिस** : शास्त्रापासून अलग असलेली मते वाईट समजली जाऊन ती अंध असतात हे तुम्हास माहीत नाही काय? जे पूर्ण ज्ञानाशिवाय बरोबर मत बनवू शकतात ते सरळ मार्गाने चालणाऱ्या अंधांपेक्षा श्रेष्ठ असतात काय?

**ॲडिमँट्स** : मुळीच नाही.

**सॉक्रेटिस** : तर मग दुसऱ्या लोकांपासून तेजस्वी व सुंदर विषय शिकणे शक्य असताना वाईट, अंध व वक्र अशा विषयांवर विचार करीत बसणे तुम्हांला आवडेल काय?

**ग्लॅकॉन** : **सॉक्रेटिस, कृपया तुम्ही आपला वाद संपला असे समजून विषय मागे घेऊ नका अशी मी विनंती करतो. ज्या पद्धतीने तुम्ही न्याय, नेमस्तपणा व इतर विषयांची चर्चा केली त्याच पद्धतीने मुख्य सत्‌ची चर्चा केली तर आम्हांला समाधान वाटेल.**

**सॉक्रेटिस** : माझ्या मित्रा, मलाही तसे करण्याने पूर्ण समाधान वाटेल. परंतु स्वतःच्या शक्तीवरच माझा विश्वास नाही. माझा विचित्र उत्साहच माझे हसे करील अशी भीती वाटते. माझ्या गुणी मित्रांनो, तूर्त तरी मुख्य सत्‌च्या स्वरूपाविषयीची चर्चा आपण बाजूला ठेवू या. कारण मला असे वाटते हया विषयात माझे जे मत आहे तेसुद्धा स्पष्टपणे मांडणे अवघड जाईल. परंतु तुमची ऐकण्याची इच्छाच असेल तर अगदी सत्-तत्त्वासारखी अशी दुसरी शाखा मी वर्णन करतो. अर्थात तुमची इच्छा नसल्यास मी वर्णन करणार नाही.

**ग्लॅकॉन** : तुम्ही वर्णन जरूर करा. त्याशिवाय सत्‌चे स्वरूप सांगण्याचे कर्ज तुम्हांस द्यावे लागेलच.

**सॉक्रेटिस** : मी तुम्हांला मुख्य व्याज देतो व तुम्ही ते घ्यावे अशी माझी इच्छा आहे. त्यापासून मिळणाऱ्या केवळ व्याजावरच संतुष्ट राहू नये. मी आता मुख्य सत्-तत्त्वाचे फळ व अंकूरच तुम्हांस देतो. फक्त या फळाचे खोटे वर्णन मी तुमच्यावर लादणार नाही एवढी काळजी तुम्ही घ्या.

**ग्लॅकॉन** : आम्हाला शक्य असेल तेवढी काळजी घेऊ. तुम्ही सुरुवात करा.

**सॉक्रेटिस** : मी सुरुवात करतो. परंतु त्या अगोदर आपण पूर्वी केलेल्या विधानांची तुम्हांला आठवण करून देऊन आपले एकमत केले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : कोणती विधाने ?

**सॉक्रेटिस** : चर्चेच्या ओघात आपण असे म्हटले की, सौंदर्य, सौजन्य इ. गुणांनी युक्त अशा अनेक वस्तू आहेत.

**ग्लॅकॉन** : होय. असे म्हटले आहे.

**सॉक्रेटिस** : तसेच सौंदर्य व सत् यांच्या निरुपाधिक कल्पनेचे अस्तित्व आपण मानून, ज्या वस्तूंना आपण अनेक असे संबोधितो त्यांच्याविषयी एक विशिष्ट निरुपाधिक कल्पना असते असे आपण मानले.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आपण असेही म्हणतो, अनेकत्व हे डोळ्यांना दिसते. पण शुद्ध बुद्धीला दिसत नाही. म्हणजे वस्तूमात्रातील एकत्व हे फक्त बुद्धीस पटते पण डोळ्यांस दिसत नाही.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : दृश्य वस्तू आपण शरीराच्या कोणत्या भागाने पाहतो ?

**ग्लॅकॉन** : डोळ्याने.

**सॉक्रेटिस** : त्याचप्रमाणे कानाने आवाज ऐकतो व इतर इंद्रियांनी तत् गम्य वस्तू जाणतो, हे खरे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : बघण्याची व बघितले जाण्याची शक्ती इंद्रियांच्या कारागिरांनी किती अमर्याद खर्चाने उत्पन्न केली आहे हे तुम्हांस माहीत आहे काय ?

**ग्लॅकॉन** : बरोबर माहीत नाही.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. तुम्ही असा विचार करा की, कान व आवाज ह्यांना आवश्यक असणारी अशी एखादी तिसरी वस्तू आहे काय ? की जिच्यामुळे कानाला ऐकायला येते व आवाज ऐकतो ? तसेच जिच्या अभावामुळे कान ऐकणार नाही व आवाज ऐकला जाणार नाही अशी ती आहे काय ?

**ग्लॅकॉन** : अशी तिसरी वस्तू नाही.

**सॉक्रेटिस :** इतर इंद्रियांपैकीसुद्धा फारच थोड्यांना ह्या तिसऱ्या वस्तूची गरज भासत असेल. अशी जरूर असणारे एखादे इंद्रिय सांगू शकाल काय ?

**ग्लॅकॉन :** नाही. मला सांगता येणार नाही.

**सॉक्रेटिस :** डोळे व दृश्य वस्तू यांच्या बाबतीत आणखी एका गोष्टीची जरुरी असते असे तुम्हांला आढळून येत नाही काय ?

**ग्लॅकॉन :** मला तुमचे म्हणणे समजले नाही.

**सॉक्रेटिस :** डोळ्यांमध्ये बघण्याची शक्ती म्हणजेच दृष्टी आहे व दृष्टीचा मालक ती दृष्टी वापरण्याचा प्रयत्न करतो. शिवाय वस्तूंमध्ये पण रंग असतात, परंतु ह्या कामालाच वाहिलेली अशी तिसरी गोष्ट हजर असल्याशिवाय दृष्टीला काही दिसणार नाही व रंग अदृश्यच राहतील हे तुम्हांला माहीत आहे.

**ग्लॅकॉन :** कृपया तिसरी गोष्ट कोणती ते सांगा.

**सॉक्रेटिस :** मी प्रकाशाला उद्देशून बोललो हे उघड आहे.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** ह्यावरून असे दिसून येते की, दृष्टीचे इंद्रिय व बघितले जाण्याची शक्ती यांचा उदात्त अशा साखळीने सांधा जोडला जातो त्या साखळीचे स्वरूप क्षुद्र तर अजिबातच नाही. अर्थात प्रकाशालाच तुम्ही क्षुद्र म्हणत असाल तर नाईलाज आहे.

**ग्लॅकॉन :** नाही. प्रकाश हा अजिबात क्षुद्र नाही.

**सॉक्रेटिस :** स्वर्गातील कोणत्या देवांना या शुभ देणगीचा कर्ता व दाता असे म्हणाल ? हा कोणाचा प्रकाश आहे की, ज्यामुळे आपल्या डोळ्यांना चांगल्या रीतीने बघता येते आणि दृश्य वस्तू दिसू शकतात ?

**ग्लॅकॉन :** या विषयावर एकच मत असू शकेल. तुमच्या प्रश्नाचे उत्तर सूर्य.

**सॉक्रेटिस :** तर मग दृष्टी आणि देवता यांतील संबंध कशाप्रकारचा आहे ?

**ग्लॅकॉन :** तुम्हीच त्याचे वर्णन कराल काय ?

**सॉक्रेटिस :** दृष्टी किंवा दृष्टीची जागा म्हणजे डोळा व सूर्य ही एकच आहेत असे म्हणता येणार नाही.

**ग्लॅकॉन :** नक्कीच नाही.

**सॉक्रेटिस :** परंतु मला असे वाटते की, सर्व इंद्रियांमध्ये सूर्याशी साम्य असणारे इंद्रिय म्हणजे डोळा होय.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : डोळ्यामध्ये असलेली शक्ती सूर्यापासून मिळालेली असल्यामुळे ती बाहय शक्ती नव्हे काय ?

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : सूर्य व दृष्टी ही एकच नसली तरी दृष्टीचे कारण सूर्य आहे व सूर्यामुळेच दृष्टीला दिसते, हे खरे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : सत्पासून निर्माण होऊन त्याच्याशी अतिशय साम्य असणारी अशी जी शाखा मी म्हटली ती सूर्य होय. माझ्या म्हणण्याचा थोडक्यात अर्थ असा, ज्याप्रमाणे मुख्य सत् बौद्धिक जगात शुद्ध बुद्धी व तिचे विषय हयांच्याशी संबंध ठेवते त्याचप्रमाणे सूर्य दृश्य जगातील दृष्टी आणि तिच्यातील वस्तू हयांच्याशी संबंध ठेवतो.

**ग्लॅकॉन** : त्या संबंधाचे अधिक विस्ताराने वर्णन कराल काय ?

**सॉक्रेटिस** : दिवसाचा प्रकाश ज्या वस्तूंवर रंग पसरत आहे अशा वस्तूंवर मनुष्याने बराच वेळ दृष्टी ठेवून शेवटी चंद्र व तारका हयांनी प्रकाशित केलेल्या वस्तूंवर दृष्टी फिरविली म्हणजे त्याचे डोळे मंद होतात आणि जणू काही स्पष्ट दिसण्याची त्या डोळयांना शक्तीच नव्हती, असे होऊन ते जवळजवळ अंधच होतात. हे तुम्हांला माहीत आहे ना ?

**ग्लॅकॉन** : मला हे पूर्ण माहीत आहे.

**सॉक्रेटिस** : परंतु हाच मनुष्य सूर्याचा प्रकाश पडत असलेल्या वस्तूंवर जेव्हा दृष्टी फेकतो तेव्हा हेच त्याचे डोळे स्पष्टपणे बघावयास लागतात व स्पष्ट दर्शन घेणारे होतात.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : आत्म्याची स्थितीपण अशी आहे अशी कल्पना करा. सत्य व खरे अस्तित्व यांनी जी वस्तू खरी आहे तिच्यावर आत्म्याचे लक्ष खिळले म्हणजे बुद्धीच्या जोरावर आत्मा ती वस्तू ग्रहण करतो व तिचे ज्ञानही संपादन करतो आणि अशा रीतीने आत्मा बुद्धियुक्त आहे असे सिद्ध होते. परंतु अंधःकाराने आच्छादित अशा जन्ममृत्यू यांच्या सृष्टीवर जेव्हा लक्ष जाते तेव्हा मताच्या अवस्थेतच आत्मा स्थिर होतो, दृष्टी मंद होते, आत्म्याची मते बदलतात व त्याला बुद्धी नाही असे समजण्यात येते.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : जिच्यामुळे खऱ्या ज्ञानाचे जे विषय आहेत, त्यांना त्यांच्यातील सत्य पुरविले जाते व ज्याला हे विषय माहीत असतात त्याला ज्ञान करून घेण्याची बुद्धी मिळते, अशा शक्तीपासून ज्ञानाचा उदय होतो व ज्ञानाच्या मार्गात सत्याचा जो अंश असतो तोही यामुळेच असतो. ज्ञान व सत्य ही दोन्ही जरी सुंदर असली तरी सत्-तत्त्व हे त्यांच्यापासून भिन्न पण अधिक सुंदर आहे. ज्याप्रमाणे प्रकाश व दृष्टी ही सूर्यासारखी आहेत हे म्हणणे जरी बरोबर

असले तरी सूर्य व ती एकच आहेत असे म्हणणे चुकीचे आहे; त्याप्रमाणे ज्ञान व सत्य सत्सारखी आहेत असे म्हणणे जरी बरोबर असले तरी ती दोन्ही सत्-तत्त्वेच आहेत असे म्हणणे चुकीचे आहे. कारण सत्-तत्त्वाचे स्थान ह्या दोहोंपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

**ग्लॅकॉन :** ज्ञान व सत्य यांचा उगम सत्-तत्त्वापासून होतो. एवढेच नव्हे तर सौंदर्यातही सत्-तत्त्व त्यांना मागे सारते. ह्यावरून त्याचे सौंदर्यही अनिर्वाच्य ठरते. सत्-तत्त्व म्हणजे सुख असे तुम्ही मानत नाही असे मी धरून चालतो.

**सॉक्रेटिस :** छे! छे!! सुखासंबंधी मी एक शब्दसुद्धा काढला नाही. तरी पण मला वाटते की, हा दृष्टांत आपण आधी तपासावा.

**ग्लॅकॉन :** तो कसा काय?

**सॉक्रेटिस :** तुम्ही हे कबूल करालच की, सूर्य दृश्य वस्तूंना बघितले जाण्याची शक्ती देतो. एवढेच नव्हे तर त्यांना जीवनशक्ती, वाढ होण्याची शक्तीसुद्धा देतो. तरीपण सूर्य म्हणजे जीवनशक्ती नव्हे.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** तसेच तुम्ही हेही कबूल कराल की, सत्-तत्त्वापासून ज्ञानाचे विषय ज्ञात होतात. एवढेच नव्हे तर त्याला खरे अस्तित्वही दिले जाते. पण खरे अस्तित्व म्हणजे सत्-तत्त्व नव्हे. कारण भव्यता व शक्ती या गुणातही सत्-तत्त्व अस्तित्वाहून श्रेष्ठ असते.

**ग्लॅकॉन :** [चेष्टेने हसून] ही श्रेष्ठता तर चमत्कारपूर्ण आहे.

**सॉक्रेटिस :** ह्या विषयावर माझी मते सांगण्यास तुम्ही मला भाग पाडले म्हणून या चेष्टेलाही तुम्ही जबाबदार आहात.

**ग्लॅकॉन :** सूर्याची उपमा पूर्णपणे स्पष्ट केल्याशिवाय तुम्ही चर्चा बंद करू नये अशी मी विनंती करतो. इतर काही गाळले तरी चालेल.

**सॉक्रेटिस :** खरे सांगायचे म्हणजे मी बरेच गाळतो आहे.

**ग्लॅकॉन :** निदान महत्त्वाचे तरी गाळू नका.

**सॉक्रेटिस :** मला वाटते मला पुष्कळच गोष्टी गाळाव्या लागतील तरी पण जाणूनबुजून मी काही गाळणार नाही.

**ग्लॅकॉन :** तुम्ही काहीच गाळू नये अशी माझी विनंती आहे.

□ □

# प्रकरण चोवीस

# ज्ञानाच्या चार श्रेणी

**[VI-509-D—513-E]**

**कथासूत्र :**

[परमसत्तेचे आणि परममूल्याचे स्वरूप विशद केल्यानंतर प्लेटोने त्यांच्या ज्ञानाविषयीची आपली भूमिका मांडली आहे. श्रीमत् शंकराचार्यांचा ' सत्तात्रयवाद ' आणि ब्रिटिश तत्त्वज्ञ ब्रॅडले यांचे ' सत्याच्या आणि सत्तेच्या श्रेणी ' हे तत्त्व यांचे स्मरण प्लेटोचे विवेचन वाचताना होते.

त्याच्या मते (१) कल्पना, (२) मत, (३) विचार आणि (४) प्रज्ञा या ज्ञानाच्या चार अवस्था आहेत. त्यांच्याशी संबंधित असणारे ज्ञेय विषय म्हणजे (१) प्रतिमा, (२) दृश्यवस्तू, (३) गणिती आकार आणि (४) सत्-तत्त्वे हे होत.

ज्ञानप्रक्रिया आणि ज्ञेयाचे स्वरूप यांची ही विकासश्रेणी मांडून प्लेटोने अधिकाधिक वरच्या श्रेणीचे ज्ञान संपादन करण्याचे आवाहन केले आहे.

अशाश्वत विषयांची तहान ही अशाश्वत ज्ञान किंवा अज्ञान निर्माण करते ; तर शाश्वत सत्याची उपासना ही व्यक्तीला प्रज्ञावंत बनवते, पूर्णत्वाची प्राप्ती करून देते.

तत्त्वचिंतकाला हा सद्सद्विवेक असतो आणि असला पाहिजे. अशा विवेकनिष्ठ ज्ञानी माणसांचे मार्गदर्शन व्यक्ती व समाज यांना न्यायी आणि सुखी बनवू शकते, असा प्लेटोचा अभिप्राय आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** असे समजू की, दोन शक्ती अंमल बजावीत असल्या तर " बौद्धिक क्षेत्र व दृश्य जग " असे त्यांचे क्षेत्र असते. ही दोन्ही क्षेत्रे आपण जाणता आहात ना ?

**ग्लॅकॉन :** आहोत.

**सॉक्रेटिस :** अशी कल्पना करा की, एका रेषेचे दोन विषम भाग पाडले. एक दृश्य भाग व दुसरा बौद्धिक गोष्टी दाखविणारा. त्यांचे पुन्हा दोन भाग केले व नंतर ती विभागाची लांबी, स्पष्टपणा किंवा अस्पष्टपणा दाखविते असे समजले तर जो भाग दृश्य

जग दाखवितो, त्यातील दोन भागांपैकी एक भाग सर्व प्रतिमा दाखवितो. प्रतिमा याचा अर्थ सुरुवातीस छाया व नंतर पाण्यातील तसेच घन, मऊ व तेजस्वी पदार्थांची प्रतिकृती होय. माझे मत आपल्याला समजले का?

**ग्लॅकॉन** : होय. समजले.

**सॉक्रेटिस** : दुसरा भाग प्रतिमांच्या खऱ्या वस्तू दर्शवितो. त्यात आपल्या भोवतालच्या सर्व प्राणी, सृष्टी व कला यांचा समावेश होतो.

**ग्लॅकॉन** : छानच.

**सॉक्रेटिस** : हया वर्गीकरणाने तुम्ही असे मान्य कराल की, सत्यासत्याच्या दृष्टीने नक्कल व अस्सल हयातील फरक हा मत व ज्ञानातील फरकाप्रमाणेच आहे?

**ग्लॅकॉन** : निश्चितच मी कबूल करेन.

**सॉक्रेटिस** : आपल्या संपूर्ण रेषेतील बौद्धिक जग दर्शविणारा भाग कसा विभागला याबद्दल विचार करू.

**ग्लॅकॉन** : कसा विभागायचा?

**सॉक्रेटिस** : आपण अशी कल्पना करू की, पहिल्या भागाचा आपण छाया म्हणून उपयोग करावयाचा. नंतर आत्म्याचे संशोधन करण्याकरिता सुरुवातीसच तत्त्वापर्यंत प्रवास न करता सिद्धांतापर्यंत करणे हे सर्व विषय दाखविणारा एक तुकडा मानावयाचा. आत्म्याचे विषय दुसरा तुकडा दर्शवितो. आपण गृहीत धरलेल्या कल्पनेप्रमाणे प्रथम तत्त्व आत्मा गाठतो. हयाबाबतचे विषय त्यात दाखविले जातात, हे गृहीत धरलेले नसते व छायेकरिता उपयोगात आणलेल्या पहिल्या तुकडयाची मदत घेतलेली नसते. तत्त्वापर्यंतचा प्रवास, आवश्यक कल्पना मदतीस घेऊनच, आत्मा करतो.

**ग्लॅकॉन** : आपले विवेचन मला म्हणावे तसे समजले नाही.

**सॉक्रेटिस** : आपण पुन्हा प्रयत्न करू. सुरुवातीसच थोडी टीका केली म्हणजे तुम्हांस समजणे सोपे पडेल. तुम्हांस हे माहीत आहे की, भूमिती व अंकगणित हयांचे अभ्यासू संशोधनात सम व विषम आकडे, आकृती, तीन प्रकारचे काटकोन हे साहित्य गृहीत धरून त्यांचे स्पष्टीकरण ते स्वतः करीत नाहीत व दुसऱ्यानांही सांगत नाहीत. कारण त्या स्वयंसिद्धच आहेत असे ते मानतात. अशा प्रकारे सुरुवात करून त्यांच्या विषयाचा शेष भाग गाठतात व संशोधनाच्या विषयाचा एकमताने निष्कर्ष काढतात.

**ग्लॅकॉन** : हे मला संपूर्ण माहीत आहे.

**सॉक्रेटिस** : स्वतःच्या मदतीस दृश्य आकृती ते घेऊन त्यांच्याबद्दल चर्चा करतात. पण त्यांचे विचार खरोखरच दृश्य आकृतीबद्दल नसून त्यांच्या अस्सल कल्पनांबद्दल असतात. हे

तुम्हांस माहीत आहे. त्याचप्रमाणे त्यांचे विचार विशिष्ट वर्तुळ किंवा व्यास याबद्दल नसून केवळ वर्तुळ किंवा व्यासाबद्दल असतात. छाया व प्रतिकृती पाण्यात दिसणाऱ्या आकड्यांच्या व आकृतीच्या प्रतिमांचा उपयोग त्यांनी केला तरी वस्तुतः केवळ विचारांच्या दृष्टीनें बघता येणाऱ्या कल्पनाच ते पाहण्याचा प्रयत्न करतात.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : माझ्या मते अशा वस्तूंचा वर्ग म्हणजे बौद्धिक. परंतु मी सुरुवातीसच सांगितले की, संशोधनाकरिता ह्या वस्तू गृहीतच धराव्या लागतात. प्रथम तत्त्वाकडे प्रवास करणे शक्य नसते. कारण, कल्पनांच्या प्रतिमा म्हणून खाली असलेल्या वस्तूंच्या नकलांचाच आत्म्यास उपयोग करावा लागतो. त्यामुळे गृहीत कल्पनांचे क्षेत्र आत्मा ओलांडून जाणे अशक्य असते. नकलांची अस्सल बरोबर जुळणी केली जाऊन त्यांची योग्यता अडाणी माणसे मोठी मानतात.

**ग्लॅकॉन** : भूमिती व त्याचप्रमाणे दिसणाऱ्या इतर कला ह्यांच्या विषयाच्या आधारे तुम्ही म्हणता असे मी मानतो.

**सॉक्रेटिस** : माझ्या मते बौद्धिक जगात दुसऱ्या तुकड्याचा अर्थ असा की, हा तुकडा तत्त्वविद्येच्या जोरावर जे पटते ते दाखवितो. आत्म्याचा समज असा आहे की, गृहीत कल्पना प्रथम-तत्त्वे म्हणून न मानता त्या साधनभूत असणाऱ्या अशा पायऱ्या किंवा प्रेरणा आहेत. ह्याच्या आधारें आत्मा उच्च विचारशक्तीच्या जोरावर जे गृहीत नाही ते गाठून प्रत्येक वस्तूचे मूळतत्त्व ओळखतो व ते पक्के ग्रहण करतो. यानंतर आत्मा प्रथम तत्त्वाला जे पकडते ते तो पकडतो व शेवटी इंद्रियगम्य अशा कोणत्याही वस्तूंची मदत न घेता केवळ स्वयंसिद्ध कल्पनांच्या मदतीने आपले निष्कर्ष काढू शकतो.

**ग्लॅकॉन** : तुम्ही अतिशय कठीण विषय प्रतिपादन केल्याने मला फारसे समजले नाही. परंतु एवढे मात्र समजले की, ब्रह्मविद्येच्या शास्त्राने अभ्यास केले जाणारे अस्तित्व व शुद्ध बुद्धी ह्यांचे क्षेत्र हे कलांनी अभ्यासिलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक निश्चयात्मक आहे. कलेत गृहीत कल्पनाच प्रथम-तत्त्वे मानल्यामुळे, कलेच्या विद्यार्थांना त्या कल्पनांचा इंद्रियाऐवजी मनानेच विचार करणे भाग पडते. असे जरी असले तरी ते प्रथम-तत्त्वे विचारात न घेता गृहीत कल्पनांच्या प्रमेयांवर संशोधन करतात. त्याबाबत स्वतःच्या शुद्ध बुद्धीचा वापर करीत नाहीत. प्रथम-तत्त्वाच्या दृष्टीने हे प्रश्न शुद्ध बुद्धीच्या क्षेत्रातच येतात. माझ्या मते भूमिती शास्त्रविदांच्या मानसिक संवयीस शुद्ध बुद्धी न म्हणता ग्रहणशक्ती म्हणावे. कारण मत व शुद्ध बुद्धी यांच्या दरम्यान ग्रहणशक्ती असते, हे तुम्हांला माहितच आहे.

**सॉक्रेटिस** : माझे म्हणणे तुम्हांला समाधानकारक पद्धतीने समजलेले दिसते. आत्म्याच्या चार अवस्था म्हणजे हे चार तुकडे. शुद्धबुद्धी म्हणजे सर्वांत उच्च तुकडा. ग्रहणशक्ती हा

दुसरा तुकडा. मत हा तिसरा तुकडा व अनुमान हा चवथा. ह्या गुणानुक्रमाने सर्व तुकडे लावून असे माना की, त्यांच्या विशिष्ट विषयातील सत्याच्या प्रमाणातच त्यांच्यात स्पष्टपणा दिसून येतो.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे मला पूर्णपणे मान्य आहे. त्याचप्रमाणे मी अनुक्रम लावतो.

□ □

## प्रकरण पंचवीस

# अंधारातून प्रकाशाकडे !

**[VII-514-A—521-B]**

**कथासूत्र :**

[जी सत्ताशास्त्रीय आणि ज्ञानशास्त्रीय मीमांसा केली गेली, त्यांमधील प्रमुख तत्त्वांचेच प्रतिपादन प्लेटोने एका काव्यमय रूपकाच्या आधारे केले आहे. त्यालाच प्लेटोची ' Allegory of the Cave ' म्हटले जाते. मजकूर जरी नेहमीच्या संवादपद्धतीने दिलेला असला, तरी सारे प्रकरण म्हणजे एक गद्यकाव्य आहे.

दृश्य, भासमान, अशाश्वत सृष्टीत राहणाऱ्या आणि अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या व्यक्ती, ज्ञानाची, सत्याची उपासना करणाऱ्या व्यक्ती आणि अंतिम सत्तेचा साक्षात्कार झालेल्या व्यक्ती यांची प्रातिनिधिक शब्दचित्रेच प्लेटोने या प्रकरणात रंगवली आहेत. 'अज्ञानी-साधक-सिद्ध' या क्रमाने माणसाची पूर्णत्वाची उपासना घडते.

गुहेबाहेरचा सत्याचा प्रकाश अनुभवल्यावर, गुहेतील अंधारात, अज्ञानात खितपत पडलेल्या आपल्या बांधवांना मुक्त करण्यासाठी, प्रसंगी देहदंड सोसण्यास तयार असलेल्या तत्त्वज्ञाचे वर्णन वाचताना भगवद्‌गीतेतील लोकसंग्रही स्थितप्रज्ञाचे स्मरण होते, तसेच प्रज्ञा आणि करुणा यांनी सेवाश्रयी होणाऱ्या बोधिसत्वाचे स्मरण होते.]

* * * * *

**सॉक्रेटिस** : ज्ञान व अज्ञान यांसंबंधी आपली स्वाभाविक स्थिती पुढीलप्रमाणे आहे अशी कल्पना करा : जमिनीखालील एका गुहेत बरेच लोक बसलेले असून त्या गुहेत प्रकाश येऊ शकेल असे एक दार आहे. या गुहेत पाय व मान बांधल्यामुळे ज्यांना आपल्या जागेवरून अजिबात हलता येत नाही असे हे लोक त्यांच्या लहानपणापासूनच तेथे कोंडलेले आहेत. डोके आजूबाजूला फिरविता येणे अशक्य असल्याने त्यांना फक्त समोर दिसणाऱ्या गोष्टीच पाहता येतात. हया लोकांच्या वर व पाठीमागे तेजस्वी अग्नी पेटत असून अग्नी व ते लोक यांच्यामधून जाणारा असा एक उंच रस्ता आहे. गारुडीलोक प्रेक्षकांसमोर आपले कौशल्याचे खेळ जशा पडद्यावर दाखवतात त्यासारखी वरील रस्त्याला लागूनच एक सपाट भिंत आहे.

**ग्लॅकॉन** : मी तुम्ही सांगितल्याप्रमाणे कल्पना केली आहे.

**सॉक्रेटिस :** लाकूड, दगड व इतर साधनांनी केलेले मनुष्यांचे पुतळे, इतर प्राण्यांच्या आकृती व इतर अनेक वस्तू घेऊन काही लोक भिंतीच्या पाठीमागून जात आहेत त्यांच्यापैकी काही बोलतात तर काही गप्प आहेत, अशीही पुढे कल्पना करा.

**ग्लॅकॉन :** तुमचे हे देखावे व कैदी विचित्र दिसतात.

**सॉक्रेटिस :** ते कैदी आपल्यासारखेच आहेत. हे कैदी लोक त्यांच्या समोरील गुहेच्या भिंतीवर अग्नीच्यां प्रकाशामुळे पडत असलेल्या स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या सावल्यांपलीकडे पाहू शकतील काय?

**ग्लॅकॉन :** सर्व जन्मभर डोके न हलविताच बसावे लागत असल्यामुळे ह्याशिवाय ते दुसरे काय करणार?

**सॉक्रेटिस :** त्यांच्या समोरून नेल्या जाणाऱ्या वस्तूंविषयी त्यांचे ज्ञान मर्यादित असेल ना?

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** आणि जर ते एकमेकांबरोबर बोलू लागले तर त्यांना समोर ज्या वस्तू दिसतात त्यांना संज्ञा देण्याची सवय जडेल ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** समोरच्या भागातून जर प्रतिध्वनी ऐकू येत असला तर जवळून जाणाऱ्या मनुष्यांपैकी जरी एखादा काही बोलला तरी समोरून जाणाऱ्या छायेने हे भाषण केले असे त्याला वाटेल ना?

**ग्लॅकॉन :** होय. त्याला असेच वाटेल.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच मनुष्यनिर्मित वस्तूंच्या छायांना ते खऱ्या वस्तू समजतील.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** समजा, या कैद्यांची वरील बंधनातून व भ्रमातून सुटका केली तर काय घडून येईल? अशी कल्पना करा की, त्यांच्यापैकी एकाला सोडून देऊन उभे राहण्यास व प्रकाशाकडे उघडचा डोळ्यांनी पाहण्यास सांगितले. ह्या सर्व क्रिया तो मोठ्या कष्टाने पार पाडीत आहे. पूर्वी ज्या वस्तूंच्या छाया तो बघू शके त्यामागील खऱ्या वस्तू डोळे दिपून गेल्यामुळे तो आता बघू शकत नाही. ह्या वेळेस जर त्याला कोणी असे सांगितले की, पूर्वी तो वस्तूंच्या केवळ छाया पाहात होता व आताच त्याला सत्याच्या जवळ आल्यामुळे वस्तूंचे खरे स्वरूप दिसत आहे. तर तो काय उत्तर देईल? तसेच इकडून तिकडे नेत असलेल्या वस्तू दाखवून, या वस्तू काय आहेत असे जर कोणी विचारले तर तो गोंधळून जाऊन ह्याच्या दृष्टीसमोर आणलेल्या खऱ्या वस्तूंपेक्षाही पूर्वीच्या त्यांच्या छायाच अधिक खऱ्या आहेत असे आपण समजणार नाही काय?

**ग्लॅकॉन :** तशी शक्यता आहे.

**सॉक्रेटिस :** तसेच प्रत्यक्ष प्रकाशाकड त्याला पाहावयास लावले तर त्याचे डोळे दुखणार नाहीत काय ? ज्या वस्तू त्याला स्पष्टपणे दिसतात त्यांच्याकडे बघून त्याच वस्तू त्याला दाखविण्यात येणाऱ्या नवीन वस्तूंपेक्षा अधिक स्पष्ट आहेत असेच तो समजेल ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** जर गुहेतून कोणी तरी त्याला जबरदस्तीने खडकाळ व चढणीच्या रस्त्यावर नेले व सूर्यप्रकाश आल्याशिवाय सोडायचे नाही असे सांगितले तर तो चिडणार नाही काय ? शिवाय प्रकाशाच्या तेजाने त्याचे डोळे दिपून जाऊन कोणताही पदार्थ पाहण्यास तो असमर्थ होणार नाही काय ?

**ग्लॅकॉन :** सुरुवातीला तरी असे होईल खरे.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच बाहयसृष्टीतील वस्तू बघण्याची त्याला सवय करावी लागेल, असे मला वाटते. सुरुवातीला त्याला छाया कळू लागते व नंतर माणसे, इतर त्यांची प्रतिबिंबे त्याला कळू लागतात व नंतर खऱ्या वस्तू कळतील. त्यानंतर चंद्र व इतर तारे यांच्याकडे तो बघू शकेल आणि सूर्य व सूर्यप्रकाश यांचा दिवसा अभ्यास करण्यापेक्षा आकाश व तारे यांचा रात्रीच्या वेळी अभ्यास करणे त्याला सोपे जाईल.

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** पुढे पुढे तर सूर्याचे स्वरूप पाण्यात व इतर माध्यमांत न बघता प्रत्यक्ष सूर्य कसा आहे हे बघण्याची शक्ती त्याच्या अंगी येईल, असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** याच्या पुढची पायरी म्हणजे ऋतू व वर्षे. ही सूर्यापासून निर्माण होतात, दृश्य जगतातील सर्व वस्तूंचा तो संरक्षक आहे आणि कैदी व त्याचे सोबती ज्या वस्तू बघत होते त्यांचेही कारण सूर्यच आहे असा निष्कर्ष तो काढू शकेल.

**ग्लॅकॉन :** होय. हीच पुढची पायरी आहे.

**सॉक्रेटिस :** पूर्वीची राहण्याची जागा, तेथील शहाणपण, जुने कैदी यांची आठवण होईल तेव्हा झालेल्या बदलाबद्दल आनंद मानून आपल्या कैदी मित्रांबद्दल त्याला सहानुभूती वाटणार नाही काय ?

**ग्लॅकॉन :** निश्चितच वाटेल.

**सॉक्रेटिस :** जवळ असणारी वस्तू ज्याला तीक्ष्ण दृष्टीने पाहता येते आणि ती चांगली लक्षात राहते, तसेच पुढे काय होणार याचा तर्क ज्याला चांगला करता येतो त्याला मान, शाबासकी देण्याचो प्रथा जर त्यांच्यात असली तर बाहेरील प्रकाश पाहिलेला मनुष्य त्यांच्या अभिनंदनाची पर्वा करील का ? जे असे मान, अधिकार मिळवितात त्यांच्याबद्दल त्याला हेवा वाटेल का ? याउलट होमरने सांगितल्याप्रमाणे निर्धन धन्याची जमीन नांगरणे एक वेळ परवडेल पण गुहेतील माणसांचे आयुष्य व त्यांची मते नकोत. त्याऐवजी इतर काहीही परवडेल, असे त्याचे मत असणार नाही का ?

**ग्लॅकॉन** : मला वाटते तसे आयुष्य घालविण्याऐवजी त्याला इतर काहीही सहन होईल.

**सॉक्रेटिस** : या माणसाने गुहेत परत आल्यावर जर तो पूर्वीच्या जागी बसला तर काय होईल ? तीव्र सूर्यप्रकाशातून एकदम आत आल्यावर गुहेतील अंधारात आपण आंधळे आहोत असे त्याला वाटणार नाही का ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : मंद व चंचल दृष्टी झालेल्या माणसाला गुहेतील कैद्यांनी दिसणाऱ्या छायेविषयी जर त्याचे मत विचारले तर त्यातील चर्चा बराच वेळ चालेल. मग त्याचे हसे होणार नाही का ? तो बाहेर गेला आणि आपली दृष्टी घालवून बसला म्हणून इतरांनी गुहेबाहेर जाण्याचा प्रयत्न करणे निरर्थक होय, असे गुहेतील कैदी त्याला म्हणणार नाहीत का ? गुहेतील लोकांची मुक्तता करून त्यांना बाहेर नेणारा माणूस जर कैद्यांचे हाती सापडला तर ते त्याला ठार मारण्यासही कमी करतील का ?

**ग्लॅकॉन** : नाही.

**सॉक्रेटिस** : मग ग्लॅकॉन, हे उदाहरण आपण आपल्या पूर्वी केलेल्या विधानांना लावून पाहू. गुहेत डोळ्यांना दिसणारा प्रदेश म्हणजे तुरुंग समजू. गुहेतील अग्नीचा प्रकाश म्हणजे सूर्य मानू. तसेच गुहेतून वर चढून जाणे, गुहेबाहेरील जगाचे चिंतन करणे म्हणजे आत्म्याने बौद्धिक वातावरणात रममाण होणे असे तुम्ही सर्वांनी मानले तर मला काय म्हणायचे आहे ते तुम्हांला कळेल. माझी मते बरोबर की चूक ते ईश्वरास माहीत ! पण काहीही असले तरी माझे मत पूर्वीप्रमाणेच आपल्या ज्ञानात सद्‌वस्तूचे खरे स्वरूप काय, याचा शोध घेणे हीच आपल्या ज्ञानसाधनेची पराकाष्ठा. ती सद्‌वस्तू क्वचितच आपणांस दिसू शकेल. पण जर दिसली तर तेज व सौंदर्य यांचे ते उगमस्थान आहे असेच आपणांस म्हणावे लागेल. ते अंतिम तत्त्व, दृष्टीला दिसणारा प्रकाश व सूर्य आणि बुद्धीला कळणारे सत्य व बुद्धी या सर्वांचे उगमस्थान होय. ज्याला आपल्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात ज्ञानदृष्टीने वागावयाचे आहे त्या व्यक्तीने आपल्यापुढे सद्‌वस्तूंचा श्रेष्ठ आदर्श ठेवला पाहिजे.

**ग्लॅकॉन** : मला हे मान्य आहे.

**सॉक्रेटिस** : ज्या व्यक्ती उच्च ज्ञानाच्या वातावरणात असतात त्या सर्वसामान्य व्यवहारात भाग घेण्यास तयार असत नाहीत. पण याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण त्यांचे आत्मे उच्च ज्ञानाचे वातावरण सोडण्यास तयार नसतात. आपण घेतलेले उदाहरण जर योग्य असेल तर हे घडणे स्वाभाविक नव्हे का ?

**ग्लॅकॉन** : अगदी स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस :** माणसाच्या दुर्बलतेचा अभ्यास करण्याकरिता ज्याने अध्यात्मचिंतन सोडले आहे, ज्याच्या दृष्टीला तेज अजून झेपत नाही, समोर असणाऱ्या अज्ञानाचा ज्याला परिचय झालेला नाही अशा माणसाला न्यायालयात किंवा अन्यत्र न्यायाची छाया किंवा आकृती यासंबंधी वाद घालण्यास सांगितले, ज्यांना न्याय-तत्त्वाची थोडीसुद्धा सवय नाही अशाबरोबर झगडा करण्यास सांगितले तर त्याची वागणूक चमत्कारिक व हास्यास्पद ठरेल. पण यात काही आश्चर्य करण्यासारखे आहे का ?

**ग्लॅकॉन :** मला त्यात आश्चर्य वाटत नाही.

**सॉक्रेटिस :** बरोबर. ज्ञानी माणसाला हे लक्षात येईल की, प्रकाशातून अंधारात व अंधारातून प्रकाशात गेल्याने म्हणजेच दोन प्रकाराने, दोन कारणाने दृष्टी व आत्मा यांचा गोंधळ होतो. मनाचा गोंधळ झाल्याने वस्तूची ओळख पटत नाही. असा गोंधळलेला माणूस जेव्हा ज्ञानी माणसाला दिसतो तेव्हा तो अविचाराने हसत नाही. तेजोमय ज्ञानातून बाहेर आल्याने व अंधाराच्या नवीनतेमुळे दृष्टी अंध झाली आहे की अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानमय तेजात आल्याने दृष्टी दिपून गोंधळली आहे ? या प्रश्नांची प्रथम मीमांसा केल्याशिवाय शहाणा माणूस पहिल्या अवस्थेला सुखमय, सहानुभूती योग्य असे मानणार नाही. त्याला जरी हसू आले तरी ते हास्य गुहेबाहेरच्या उच्च, ज्ञानमय, प्रकाशमय वातावरणातून गुहेत गेल्यानंतर जसे निर्माण होईल त्यापेक्षा कमी हास्यास्पद असेल.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** जर ते खरे असेल तर आंधळ्या डोळ्यांत दृष्टी घालता येते. तसेच ज्ञानहीन आत्म्यात ज्ञान घालता येते. हे काही शिक्षकांचे मत शिक्षणाच्या खऱ्या स्वरूपाशी सुसंगत नाही असे आपण म्हणू शकू.

**ग्लॅकॉन :** अशा प्रकारचे त्यांचे मत असते, हे खरे आहे.

**सॉक्रेटिस :** याऐवजी आपल्या दृष्टीने हे सिद्ध होते की, प्रत्येक माणसाच्या आत्म्यात अशी एक ज्ञानशक्ती असते की, जिच्यामुळे तो शिकू शकतो. अंधाराकडून प्रकाशाकडे दृष्टी वळविण्यासाठी सर्व शरीर फिरवावे लागते, त्याप्रमाणे ही ज्ञानशक्ती विनाशी जगाऐवजी आत्म्याकडे वळवावी लागते. त्यावेळीच तेजोमय सद्वस्तूचा विचार शक्य असतो. माझी भूमिका योग्य आहे ना ?

**ग्लॅकॉन :** हो.

**सॉक्रेटिस :** म्हणून मला असे वाटते की, ही दृष्टीबदलाची कला साध्य झाली पाहिजे. त्यामुळे आपल्यातील बदल सहज, परिणामकारक घडवून आणता येईल. माणसामध्ये पाहण्याची शक्ती निर्माण करणे हे उद्दिष्ट असणार नाही. मनुष्याचा मार्ग चुकलेला असतो. तो योग्य गोष्टीकडे पहात नाही. परंतु पहाण्याची शक्ती असते म्हणून चुकीच्या मार्गाकडे पाहण्याचा दोष दूर करणे हेच ध्येय असणार !

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : शरीरात जसे गुण असणार तसे आत्म्यात अन्य सद्‌गुण असणार असे आपणांस आढळेल. हे अन्य गुण प्रथमपासून नसतात. सवय व व्यासंग यांनी ते वाढतात. पण ज्ञान हा सद्‌गुण दैवी असल्याने तो नष्ट होत नाही. परिस्थिती जशी बदलेल तसा तो उपयोगी किंवा निरुपयोगी, फायदा किंवा तोटा करणारा बनतो. जी माणसे हुशार पण दुर्गुणी असतात त्यांच्या बाबतीत असे दिसते की त्यांचा आत्मा तीक्ष्ण दृष्टीचा असतो. जिकडे ते पाहतात तिकडे त्यांची दृष्टी सूक्ष्म असते. म्हणजेच त्यांची दृष्टी मंद नसते तर दुष्ट प्रवृत्तीचे ते दास बनल्याने त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीचा वापर पापाचरणासाठी होतो.

**ग्लॅकॉन** : हो. हे खरे आहे.

**सॉक्रेटिस** : आपल्या आत्म्याला वासनांच्या भाराखाली दडपून क्षुद्र इंद्रियजन्य सुखे व त्यांचे विषय यांच्याकडे बघावयास लावले जाते. म्हणून लहानपणापासूनच जर आत्म्यांना त्याच्या पाशातून मुक्त केले व सद्‌वस्तूकडे पाहण्याची सवय लावली तर माणसाचा आत्मा जसा सुख प्राप्तीत तीक्ष्ण दृष्टी दाखवितो तसा तो सत्यशोधातही दाखवेल.

**ग्लॅकॉन** : हो. शक्य आहे.

**सॉक्रेटिस** : शिवाय आपल्या पूर्वीच्या म्हणण्याचा असा निष्कर्ष निघतो की, अशिक्षित, सत्याविषयी अज्ञानी असणारे, आयुष्यभर शिकणारे लोक राज्यकारभार करण्यास नालायक असतात. काही लोकांच्या सार्वजनिक किंवा वैयक्तिक आयुष्यास कोणत्याच ध्येयाची प्रेरणा नसते. तर काही लोक आपण सुदैवी आहोत अशी कल्पना करून कोणतेही काम भाग पाडल्याशिवाय करीत नाहीत.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : याकरिताच आपल्या आदर्श राज्यात उदात्त स्वभावाच्या व्यक्तींना अत्युच्च अभ्यास करणे भाग पाडले पाहिजे. सद्‌वस्तूकडे दृष्टी वळविली पाहिजे. उच्च प्रकारचे ज्ञान संपादन करून काही लोक काहीच करीत नाहीत त्याला आपण बंदी केली पाहिजे.

**ग्लॅकॉन** : त्यांना आपण कोणती मोकळीक देतो ?

**सॉक्रेटिस** : केवळ उच्च ज्ञान साधने व राहण्याची सवलत देऊन चालणार नाही. आपल्या अज्ञानात बद्ध असलेल्या बांधवांना अज्ञानातून सोडवून उच्च ज्ञान व प्रतिष्ठा मिळवून देण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली पाहिजे.

**ग्लॅकॉन** : पण याचा अर्थ उच्च प्रकारचे आयुष्य घालविण्याऐवजी नीच प्रकारचा जीवनक्रम घालविणे असे सांगून आपण त्यांच्यावर अन्याय करीत नाही का ?

**सॉक्रेटिस** : पण तू हे विसरतोस की, आदर्श राज्यात विशिष्ट लोकांना चांगल्या प्रकारचे जीवन जगण्यास देणे हे कायद्याशी सुसंगत नाही. सर्व नागरिकांना चांगल्या प्रकारे जीवन

जगता यावे हा कायद्याचा हेतू असतो. त्यासाठीच सहकार्याने किंवा सक्तीने कायदा सर्वांचे नियंत्रण करतो. प्रत्येक व्यक्ती सर्वांच्या सुखासाठी जे करते त्याचा फायदा सर्वांना मिळावा अशी परिस्थिती निर्माण करतो. याकरिताच राज्यात श्रेष्ठ प्रकारचे लोक निर्माण करून त्यांना स्वेच्छेप्रमाणे वागण्यास कायद्याचे नियंत्रण असते. सर्वांचा उपयोग करून घ्यावा असा राज्याचा व न्यायाचा हेतू असतो.

**ग्लॅकॉन** : ते मी विसरलोच.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच ग्लॅकॉन आपल्या आदर्श राज्यातील भावी तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांना जर आपण देशबांधवावर लक्ष ठेवणे, त्यांची काळजी घेणे ही कामगिरी सोपविली तर त्यांच्यावर अन्याय न करता न्याय होईल. आपण त्यांना म्हणू–

"तुमचे इतर राज्यातील बांधव राज्यकारभार करण्यास सकारण नकार देतात. आज असलेल्या राज्यघटनेस न मानता अशा प्रवृत्तीच्या लोकांची वाढ स्वतंत्रपणाने होत असते. स्वयंभू वृक्ष आधारासाठी कोणावर अवलंबून नसतो. म्हणून त्याच्या राखण्याचा खर्च देण्यास तयार नसतो, हे त्याच्या दृष्टीने योग्य. पण तुमची परिस्थिती तशी नाही. आम्ही तुम्हांला राज्यासाठी निर्माण केले आहे, नेतृत्त्व निर्माण केले, इतरांपेक्षा अधिक चांगले शिक्षण देऊन तयार केले, नागरिक म्हणून राज्यकारभारास समर्थ केले. म्हणून तुम्ही थोर मंडळींनी उच्च वातावरणातून खाली आले पाहिजे, लोक समुदायात मिसळले पाहिजे, अमूर्त विषयांचे चिंतन केले पाहिजे. अशा सवयींमुळे इतर नागरिकांपेक्षा तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे जगू शकाल. सौंदर्य, न्याय, सत् यांचे खरे स्वरूप तुम्हांस माहीत असते. छाया व सद्वस्तू यांतील फरक तुम्ही ओळखू शकता. म्हणून आपले आदर्श राज्य इतर राज्याप्रमाणे भास नसून सत् व सद्वस्तूंचा आविष्कार आहे हे समजून येईल. आपल्याला राज्याधिकार आहे ही फार मोठी कृपा आहे. इतर राज्यातील राज्यकर्ते परस्परात भांडतात. परंतु त्यांचे आयुष्य भास व छायांनी भरलेले असते. वस्तुतः खरे राज्यकर्ते राज्य करण्यास तयार नसतात व तेच राज्य सर्वांत चांगले असते शांतपणे चालविले जाते. ज्या राज्यात नकली राज्यकर्ते फार उत्सुक असतात त्याचे स्वरूप फार वाईट असते."

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : तुम्हांस असे वाटते का की, ज्ञानाच्या तेजस्वी वातावरणात बराच वेळ घालवितात त्यांना तशी मोकळीक दिली व त्यांची अशी समजूत घातली तर ते वरील आज्ञा पाळणार नाहीत व राज्यकारभार करणे नाकारतील.

**ग्लॅकॉन** : ते शक्य नाही. आपली आज्ञा योग्य असून तिचे पालन करणारे न्यायी प्रवृत्तीचेच आहेत. शिवाय आजच्या राज्यकर्त्यांच्या प्रवृत्तीने नव्हे तर एक आवश्यक कर्तव्य म्हणून प्रत्येकजण कारभार करेल.

**सॉक्रेटिस** : हो. खरे आहे. आपल्या राज्यकर्त्यांसाठी राज्यकारभार करण्यापेक्षा अधिक चांगला जीवनक्रम शोधला तर व्यवस्थित चालणारे राज्य तुम्ही निर्माण करू शकाल. अशा

राज्यात संपत्तीने नव्हे तर ज्ञान व सदाचाराने संपन्न असे अधिकारी असतील. मात्र भिकारी, खाजगी स्वार्थाकरिता हपापलेले, राज्यकारभार हाती घेतात तेव्हा सर्वत्र गोंधळ होतो. असे लोक अधिकाराचा उपयोग करून पाहिजे तसे वागण्याचे स्वातंत्र्य आहे असे मानतात. अशा राज्यात अधिकाराच्या जागेमुळे भांडणे होतात आणि अशा प्रकारच्या अंतर्गत भांडणामुळे केवळ भांडणाऱ्या पक्षांचेच नव्हे तर सर्व राज्याचे नुकसान होते.

**ग्लॅकॉन** : हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस** : खऱ्या तत्त्वज्ञानी माणसाशिवाय इतर कोणता माणूस अधिकाराच्या जागेचा तिरस्कार करेल, हे सांगता येईल का ?

**ग्लॅकॉन** : तसे मला सांगता येणार नाही.

**सॉक्रेटिस** : राज्यकारभाराची हाव नसणाऱ्या लोकांनी राज्यकारभार करणे आवश्यक आहे. नाही तर लोभी लोक अधिकाराकरिताच भांडत बसतील.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : राज्यकारभार चांगल्या रीतीने कसा करावा याचे ज्यांना पूर्ण ज्ञान आहे व त्यांचे आयुष्य मुत्सद्दी माणसांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारचे आहे अशा लोकांकडे तुम्ही राज्यकारभार दिला नाही तर इतर कोणत्या लोकांना तुम्ही राज्याच्या संरक्षकांची कामे करण्यास प्रवृत्त कराल ?

**ग्लॅकॉन** : मी अशाच लोकांची राज्यकारभारासाठी निवड करेन.

□ □

# प्रकरण सव्वीस

# उच्च शिक्षणपद्धती

**[VII-521-C—531-C]**

**कथासूत्र :**

[तत्त्वज्ञ राज्यकर्त्यासाठी कोणत्या प्रकारचे ज्ञान आवश्यक आहे, हे सांगितल्यानंतर प्लेटोने ते श्रेष्ठ ज्ञान त्यांना देण्यासाठी जो उच्च शिक्षणक्रम उपयोगात आणावयाचा त्याचे सविस्तर विवेचन केले आहे.

खगोलशास्त्र, भूमिती, घनभूमिती, अंकगणित आणि संगीत या विद्याशाखांचा विशेष अभ्यास हा उच्च शिक्षणक्रमाचा आशय होय. इंद्रियवेद्य दृश्य सृष्टीपासून किंवा अशाश्वत विश्वापासून तत्त्वज्ञानाची दृष्टी विशुद्ध विचाराकडे, प्रज्ञेच्या विकासाकडे लागावी, वाढावी असा त्याचा यात हेतू आहे.

या ज्ञानाचे स्वरूप मुख्यतः निगामी विचार प्रक्रियेचे असते. इंद्रियानुभव निरपेक्ष अशा स्वतःप्रमाण, स्वतःसिद्ध तत्त्वांचा शोध घेऊन त्या आधारे गणितशास्त्र व सृष्टिशास्त्र यांतील निष्कर्ष अनुमानित केले जात.

प्लेटोच्या सर्व विचारात इंद्रियगम्य ज्ञानाऐवजी बुद्धिनिष्ठ संकल्पना व सत्-तत्त्वे (Ideas or Forms) यांना प्राधान्य व महत्त्व दिलेले आढळते. हीच भूमिका त्याच्या उच्च शिक्षण पद्धतीलाही त्याने आधारभूत मानलेली आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** ज्याप्रमाणे खालच्या जगातून स्वर्गीय वातावरणाकडे शूर पुरुष चढतात, त्याचप्रमाणे राज्यात संरक्षक लोक निर्माण करून, प्रकाशापर्यंत त्यांना कसे न्यावयाचे याचा विचार आता आपण करावा ना ?

**ग्लॅकॉन :** निश्चितच. माझी पण हीच इच्छा आहे.

**सॉक्रेटिस :** " शंख उलटा करावा " अशा सामान्य प्रश्नाचा आपण विचार करीत नसून, आत्म्याचे रात्रीसारख्या दिवसापासून अस्तित्वाच्या खऱ्या दिवसापर्यंत ज्या प्रकाराने परिभ्रमण होते, त्याचा आपण विचार करावयाचा आहे. अशा परिभ्रमणालाच खरे तत्त्वज्ञान म्हणतात.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : कोणत्या विषयाच्या ज्ञानात अशा तऱ्हेची शक्ती आहे याचा आपण विचार करावयास नको का ?

**ग्लॅकॉन** : होय. अवश्य केला पाहिजे.

**सॉक्रेटिस** : ग्लॅकॉन, बदलणाऱ्या वस्तूपासून, सत्य वस्तूकडे आत्म्याला ओढून नेणारे असे एखादे शास्त्र सांगता येईल काय ? मी नुकतेच म्हटल्याचे आठवते की, 'आपल्या विद्यार्थ्यांना तरुणपणीच लढाईचे शिक्षण दिले पाहिजे'.

**ग्लॅकॉन** : होय. असे आपण म्हटले होते.

**सॉक्रेटिस** : ज्या शास्त्राच्या शोधात आपण आहोत त्या शास्त्रात पूर्वीचा व हाही गुण असणे आवश्यक आहे.

**ग्लॅकॉन** : कोणता गुण ?

**सॉक्रेटिस** : युद्धप्रवण माणसांनाही या शास्त्राची उपयुक्तता वाटणे.

**ग्लॅकॉन** : हो, शक्य असेल तर !

**सॉक्रेटिस** : संगीत व व्यायाम या शास्त्रांचा आपण पूर्वीच्या शिक्षणक्रमात समावेश केलेला होता.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : ज्याअर्थी शरीराची वाढ व नाश याबद्दल व्यायामशास्त्र विचार करते, त्याअर्थी या शास्त्राचा विकारी व विनाशी वस्तूंशी संबंध असतो.

**ग्लॅकॉन** : हे उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : ज्या शास्त्राचा आपण शोध करीत आहोत ते व्यायामशास्त्र तर असू शकणार नाही ना ?

**ग्लॅकॉन** : अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस** : आपण चर्चा केलेल्या संगीतशास्त्राबद्दल तुमचे काय मत आहे ?

**ग्लॅकॉन** : तुम्हाला आठवत असेल की, संगीताने आपल्या संरक्षकांना सवयीच्या तत्त्वावर शिक्षण देऊन, शास्त्रीय ज्ञानाऐवजी, एक प्रकारचा सुस्वरपणा व प्रमाणशीरपणा शिकविला आहे. म्हणून संगीत केवळ व्यायामाची नक्कल होती. संगीताने जे विषय शिकविले ते खोटे असोत किंवा खरे असोत, त्यांच्यात अशाच गुणांचा समावेश होतो. परंतु ज्या तऱ्हेचा फायदा आपण शोधीत होतो, तसा फायदा करून देणाऱ्या एकाही शाखेचा संगीतात समावेश नाही.

**सॉक्रेटिस** : तुमची स्मरणशक्ती चांगली दिसते, कारण खरोखरच संगीतात अशा प्रकारचे काहीच आढळत नाही, परंतु ग्लॅकॉन, आपणाला हवे आहे ते कोठे मिळू शकेल ? सर्व उपयुक्त कला अधःपतन करणाऱ्या आहेत असे आपण ठरविले.

**ग्लॅकॉन :** निश्चितच. परंतु संगीत, व्यायामशास्त्र व उपयुक्त कला यांच्याखेरीज एखादे शास्त्र शिल्लक आहे काय ?

**सॉक्रेटिस :** ह्यांच्यापलीकडचे व ह्यांच्याहून भिन्न असे आपणांस काहीच सापडले नाही. तेव्हा सर्वत्र लागू पडणाऱ्यांपैकीच एका विषयाचा विचार करू.

**ग्लॅकॉन :** कोणता विषय ?

**सॉक्रेटिस :** सर्व कला, विचारमालिका व शास्त्रे यात ज्यांचा उपयोग केला जातो व प्रत्येक मनुष्याने जो विषय शिकला पाहिजे तो म्हणजेच सर्वसाधारण विषय.

**ग्लॅकॉन :** त्याचे स्वरूप तरी सांगा.

**सॉक्रेटिस :** माझ्या मते एक, दोन, तीन असे अंक जे शास्त्र भिन्न करून दाखविते ते गणितशास्त्र होय. प्रत्येक कलेला व शास्त्राला ह्याचा उपयोग करून घ्यावा लागतो काय ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** युद्धाचे शास्त्र अंकशास्त्रापैकीच आहे काय ?

**ग्लॅकॉन :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** पलामिडिस असे सिद्ध करून दाखवितो की, ॲगमेम्नॉन हा एक मूर्ख सेनापती होता. पलामिडिसने अंकपद्धती शोधून काढली व सैन्याची आणि जहाजांची गणती करून ठेवली. यावरून निष्कर्ष काढला गेला की, त्या काळी वरील गोष्टींची गणती करता आलेली नव्हती व ॲगमेम्नॉनला अंकशास्त्राचे ज्ञान नसल्यामुळे स्वतःचे पायदेखील नीट मोजता येत नव्हते. असे असले तरी हा सेनापती म्हणून कसा काय होता ?

**ग्लॅकॉन :** हे जर खरे असले तर तो एक विचित्र सेनापती होता असे मी म्हणेन.

**सॉक्रेटिस :** गणिताचे ज्ञान सैनिकाला असणे आवश्यक आहे असे आपण ठरविणे जरूर आहे ना ?

**ग्लॅकॉन :** होय. सैन्याची व्यवस्था करणे व धीटपणा अंगी आणणे हे शिकण्यासाठी या ज्ञानाची जरुरी आहे.

**सॉक्रेटिस :** शास्त्रविषयक आपल्या दोघांच्या कल्पना एकच आहेत काय ?

**ग्लॅकॉन :** तुमची कल्पना काय आहे ते सांगा.

**सॉक्रेटिस :** आपण ज्या शास्त्राचा शोध करीत आहोत, त्या शास्त्रांपैकीच विचार करावयास लावणारे हे शास्त्र आहे. ते आत्म्याला खऱ्या वस्तुत्वाकडे नेणारे आहे, असे समजून त्याचा योग्य असा उपयोग कोणीच करीत नाही.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे स्पष्ट सांगाल काय ?

**सॉक्रेटिस** : मी प्रयत्न करतो. हेतु-साध्याकरिता ज्या गोष्टी उपयुक्त किंवा अनुपयुक्त मी मानतो त्याविषयी संमती वा विरोध दर्शवून तुम्ही मला मदत करावी म्हणजे या शास्त्राच्या स्वरूपाविषयीचे माझे तर्क बरोबर आहेत किंवा नाहीत हे आपल्याला स्पष्टपणे समजेल.

**ग्लॅकॉन** : तुमचे स्पष्टीकरण सांगा.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. तुम्हांला असे दिसून आले असेल की, काही पदार्थ आपल्या बघण्यात पूर्ण दिसतात आणि त्यामुळे आपल्या विचारशक्तीला चालना मिळत नाही. याउलट, काही अपूर्ण दिसतात व त्यामुळे विचारशक्तीवर जोराचा ताण बसतो.

**ग्लॅकॉन** : दूर अंतरावरून दिसणारे पदार्थ व यथार्थदर्शन चित्रकला याचबद्दल आपण बोलत आहात ना?

**सॉक्रेटिस** : मी जे म्हणालो ते तुम्हांला बरोबर समजलेले दिसत नाही.

**ग्लॅकॉन** : तर तुमच्या मते दुसरे कोणते पदार्थ आहेत?

**सॉक्रेटिस** : माझ्या मते जे पदार्थ एकाच वेळेला दोन परस्परविरोधी संवेदना उत्पन्न करीत नाहीत, ते सर्व पदार्थ अनुद्‌बोधक होत. याउलट विरोधी संवेदना उत्पन्न करणाऱ्यांना मी उद्‌बोधक म्हणेन. म्हणजेच जवळचा वा दूरचा जरी पदार्थ असला तरी दृष्टीला दोन सारख्याच ठळक पण विरोधी संवेदना निर्माण होतात. पुढील उदाहरणाने माझे म्हणणे अधिक स्पष्ट होईल. लहान, मधले व तिसरे अशा तुमच्या तीन बोटांबद्दल विचार करा.

**ग्लॅकॉन** : ठीक आहे.

**सॉक्रेटिस** : असे समजा की, ती अगदी जवळून पहावयाची आहेत. आता याबद्दल आणखी एका मुद्द्याचा विचार करावयाला हवा.

**ग्लॅकॉन** : तो कोणता?

**सॉक्रेटिस** : ती सर्वच बोटे असल्यामुळे ज्या बोटाकडे आपण पाहू, ते मधले किंवा बाजूचे, पांढरे किंवा काळे, जाड किंवा बारीक असा फरक जाणवणार नाही. कारण जोपर्यंत या मुद्द्याबद्दल आपण विचार करतो, तोपर्यंत मनाला बोट म्हणजे काय याचा विचार करण्याची जरुरी वाटत नाही. वरील उदाहरणात बोट हे बोट नसून दुसरे काही तरी आहे याबद्दलची माहिती मनाला दृष्टीकडून मिळत नाही.

**ग्लॅकॉन** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : सहाजिकच अशा संवेदना विचाराला चालना देणाऱ्या वा उद्‌बोधक नसतात.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस :** परंतु बोटांच्या वेगवेगळ्या आकारमानाबद्दल आपण काय म्हणू ? दृष्टी त्यातील फरक समाधानकारक करेल काय ? एखादे बोट मध्ये अथवा बाजूस असल्यामुळे दृष्टी काही फरक मानते काय ? तसेच स्पर्श केला असता जाडपणा व बारीकपणा, कठीणपणा किंवा मृदुपणा समाधानकारक रीत्या जाणवतो काय ? इतर इंद्रियांच्या संवेदनांत हा दोष दिसून येतो काय ? वरील इंद्रियांची अशा प्रकारची स्थिती नसते काय ? ज्या इंद्रियाला कठीणपणा जाणवतो त्यास मृदुपणा जाणवण्याची जरुरी नसते का ? व ते इंद्रिय एकच वस्तू कठीण किंवा मृदू आहे असे मनाला पटवून देत नाही का ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** जेव्हा स्पर्शेंद्रिय एकच वस्तू कठीण व मृदू मानते त्यावेळी मनात गोंधळ निर्माण होत नाही का ? ज्यावेळी हलकी वस्तू जड आहे व जड वस्तू हलकी आहे हे पटवून दिले जाते त्यावेळी जडपणा व हलकेपणा ह्यांच्या अर्थासंबंधी शंका निर्माण होत नाही का ?

**ग्लॅकॉन :** होय. अशा प्रकारच्या संवेदना मनाला चमत्कारिक वाटल्या तरी त्यांचे स्पष्टीकरण करणे जरूर आहे.

**सॉक्रेटिस :** मन स्वाभाविकच अशा वातावरणात तर्कशक्ती व विचार ह्यांचे सहाय्य घेऊन प्रत्येक संवेदना एक आहे किंवा दुहेरी आहे हे ठरवीत असेल.

**ग्लॅकॉन :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** दुहेरी आहे असे मानल्यास प्रत्येक संवेदनेचा प्रत्येक भाग स्वतंत्र स्वभावाचा व एकत्रित आहे हे उघड करावे लागत नाही का ?

**ग्लॅकॉन :** हे उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** प्रत्येक जर एक आहे व दोन्ही मिळून दोन होतात असा मनाने निष्कर्ष काढला तर ती दोन स्वतंत्र करता येतील. कारण ती स्वतंत्र करता आली नसती तर ती एक असून दोन नाहीत असेच मनाला म्हणावे लागले असते.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** डोळ्याने आपल्याला मोठ्या वस्तू व लहान वस्तू वेगवेगळ्या आहेत याबद्दल ज्ञान न देता गोंधळच निर्माण केला. बरोबर आहे ना माझे मत ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** परंतु इंद्रियज्ञान स्पष्ट होण्यासाठी ह्या पद्धतीचा उलट वापर करून मोठ्या व लहान वस्तू भिन्न (वेगळ्या) आहेत असे विचारशक्तीला मानणे भाग पाडले.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस** : अशा प्रकारचा विरोध आपल्याला मोठेपणा व लहानपणा याच्या अर्थाबद्दलचा प्रश्न निर्माण करीत नाही का ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : याचप्रमाणे बुद्धीचे विषय व दृष्टीचे विषय यांत भिन्नता निर्माण करणे आपण शिकत नाही का ?

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : यापूर्वीच मी सांगितले की, असे काही विषय असतात की, ते विचारांना चालना देतात व काही जागृती निर्माण करीत नाहीत. याचा वरीलप्रमाणे अर्थ होतो. पहिल्या वर्गात मोडणाऱ्या वस्तू इंद्रियावर एकाच वेळी विरोधी संवेदनांचा आघात करतात. परंतु दुसऱ्या वर्गात असे घडत नाही.

**ग्लॅकॉन** : तुमचे मत मला समजले. मी त्याच्याशी सहमत आहे.

**सॉक्रेटिस** : संख्या व एकपणा यांना वरीलपैकी कोणत्या वर्गातील मानावे ?

**ग्लॅकॉन** : याचे उत्तर देता येत नाही.

**सॉक्रेटिस** : आपली पूर्वीची विधाने निर्णय देण्यास सहाय्य करतील. दृष्टी अथवा इतर इंद्रिये बोटाप्रमाणे एकपणा जर ग्रहण करीत असेल तर त्या एकपणात खऱ्या अस्तित्वाकडे मनाला ओढून नेण्याची शक्ती नसते. पण एकपणाच्या सर्व दृश्यांत विरोधाचे मिश्रण असेल व त्यामुळे एकपणाप्रमाणेच अनेकपणा दिसून आला तर गोंधळ उडेल व विचारशक्तीला जागृत करून "एकपणाचे केवळ स्वरूप काय" असा प्रश्न विचारणे भाग पडेल. अशा तऱ्हेने एकांकांचा अभ्यास आपल्याला खऱ्या अस्तित्वाचे चिंतन करावयास लावतो.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. तीच वस्तू त्याच वेळी एक वाटते किंवा अनंत वाटते त्यामुळे एकांकामध्ये हा गुण विशेष प्रमाणात असतो.

**सॉक्रेटिस** : एकांकाची जी स्थिती तीच सर्व अंकांची असणार नाही ना ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच असावी.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. परंतु अंकगणितात केवळ अंकाबद्दलच विचार केला जातो.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : व ते आपल्याला सत्याप्रत नेते.

**ग्लॅकॉन** : होय. विलक्षण पद्धतीने.

**सॉक्रेटिस** : आपल्याला असे दिसून येईल की, आपण ज्या अभ्यासाचा शोध करीत आहोत त्यापैकीच अंकगणित आहे. कारण लष्करी मनुष्य अंकगणिताच्या ज्ञानाच्या आधारे आपल्या

सैनिकांची रचना करतो. त्याचप्रमाणे विकारी जगाला बाजूस सारून सत्यत्वाला चिकटून राहण्यासाठी व वादविवादात कुशल होण्याकरिता तत्त्वज्ञानी माणसाने याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : आपला संरक्षक सैनिक असला तरी तत्त्वज्ञानी आहे.

**ग्लॅकॉन** : यात संशयच नाही.

**सॉक्रेटिस** : ग्लॅकॉन, याचसाठी ह्या विषयाबाबत अभ्यास करण्याची कायद्याने सक्ती केली. जर लोकांना राज्यातील महत्त्वाच्या कामी भाग घेणारे व्हावयाचे असेल तर गणितशास्त्राच्या अभ्यासाकडे त्यांचे मन वेधले पाहिजे व ह्या विषयाचा अभ्यास, निव्वळ हौशी लोकांप्रमाणे न करता अतिशय चिकाटीने करणे जरूर आहे. त्यामुळे शुद्ध बुद्धीच्या आधारे ते अंकांच्या स्वरूपाबद्दल विचार करतील. व्यापाऱ्यांप्रमाणे खरेदी-विक्रीकरिता याचा अभ्यास त्यांनी करू नये. युद्धकामात उपयोग होण्याकरिता व आत्म्याला विकारी जगापासून खऱ्या व सत्य गोष्टीकडे वळविण्यासाठी त्यांना ह्या शास्त्राचे ज्ञान संपादन करणे जरुरीचे आहे.

**ग्लॅकॉन** : आपले मत स्तुत्य आहे.

**सॉक्रेटिस** : गणितशास्त्राबद्दल सांगताना माझ्या आताच लक्षात आले की, हे शास्त्र फार चांगले आहे व आपल्या इच्छापूर्तीकरिता याचा बराच उपयोग होतो. अर्थातच, हे शास्त्र शिकण्याचा फक्त व्यापारी हेतू न मानता केवळ ज्ञान संपादन करण्याचा हेतूच बाळगावा.

**ग्लॅकॉन** : तुमचे मत स्पष्ट कराल काय ?

**सॉक्रेटिस** : आताच सांगितल्याप्रमाणे हे शास्त्र आत्म्यास उच्च वातावरणात नेते व अंकाच्या दृश्य व स्पृश्याबद्दल चर्चा न करता त्यांच्या केवळ स्वरूपाबद्दल विचार करणे भाग पाडते. आपल्याला माहितच असेल की, चांगले गणिती लोक वादविवादात एकांक सोडण्याचा प्रयत्न हास्यास्पद ठरवितात. कारण एकांकाचे जर तुकडे केले तर ते पुन्हा गुणाकार करतात व एकांकाने एकत्व न सोडण्याची व असंख्य स्वरूप न होण्याची फार काळजी घेतात.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : ग्लॅकॉन, अशा लोकांना कोणी असा प्रश्न विचारला, " हुशार मित्रांनो ! अंकांच्या कोणत्या प्रकाराबद्दल तुम्ही चर्चा करता ? तुमचे मत असे असेल की, प्रत्येक एकांक समान व अविभाज्य आहे. परंतु अशा तऱ्हेचा एकांक साधला गेलेला अंक दाखविता येईल काय ? " तुमच्या मते अशा प्रश्नांना ते काय उत्तर देतील ?

**ग्लॅकॉन** : माझ्या मते, " केवळ कल्पनेनेच विचार करता येण्यासाठी अंकाचा विचार करतो " असे उत्तर देतील.

**सॉक्रेटिस** : माझ्या मित्रा, ह्या शास्त्राची आपणांस आवश्यकता नाही का ? ह्या शास्त्रामुळे मनाला शुद्ध सत्य शोधनात युद्धबुद्धीचा उपयोग करणे भाग पडते ना ?

**ग्लॅकॉन :** होय. ह्या शास्त्रात हा गुण विशेषतः दिसून येतो.

**सॉक्रेटिस :** गणिताची आवड असणाऱ्या लोकांची बुद्धी इतर प्रकारची शास्त्रे लवकर ग्रहण करते, असे तुम्हांस निरीक्षणावरून दिसून आले असेलच ! त्याचप्रमाणे मंदबुद्धीच्या लोकांना ह्या शास्त्राच्या शिक्षणाचा इतर काही फायदा झाला नाही तरी ते पर्वीपेक्षा हुशार बनतात.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** माझी खात्री आहे की, अंकगणित हेच शास्त्र विद्यार्थ्याला शिकण्यास त्रास व फार मेहनत पडणारे असे आहे. इतर कुठलेही नाही.

**ग्लॅकॉन :** निश्चितच दुसरे कुठलेही नाही.

**सॉक्रेटिस :** म्हणून ह्या शास्त्राचा त्याग न करता ते उत्तम स्वभावाच्या लोकांना शिक्षण देण्यास उपयोगात आणावे.

**ग्लॅकॉन :** तुमचे व माझे एकच मत आहे.

**सॉक्रेटिस :** हा मुद्दा निश्चित झाला असे समजू. अंकगणितासारख्या दुसऱ्या एखाद्या शास्त्राचा आपण विचार करावा काय ?

**ग्लॅकॉन :** भूमिती शास्त्राच्या विचाराविषयी आपण म्हणता काय ?

**सॉक्रेटिस :** होय.

**ग्लॅकॉन :** या शास्त्राचा जो भाग लष्करी डावपेचास उपयोगी आहे त्याचा विचार करणे आवश्यक आहे, हे उघड आहे. कारण तळ देणे, हल्ला करण्यास योग्य जागा शोधणे, सैन्यास योग्य जागा पाहणे तसेच रणांगणावर जाण्यापूर्वी व गेल्यावर सैन्याची हालचाल करणे या सर्व कामांकरिता लष्करी मनुष्याला भूमितीचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे.

**सॉक्रेटिस :** भूमितीचे व अंकगणिताचे सामान्यज्ञान लष्करी कामाला पूरेसे होईल यात शंका नाही. परंतु या शास्त्रातील सखोल अभ्यासाचा पुढचा भाग सत् तत्त्वाच्या स्वरूपाचे चिंतन करण्यास उपयोगी आहे किंवा नाही हाच खरा प्रश्न आहे. खऱ्या अस्तित्वाचा अत्यंत आनंदमय भाग जो आत्म्याने बघणे आवश्यक असते, तो ज्या वातावरणात असतो, त्या वातावरणात घेऊन जाण्याची प्रवृत्ती त्याच्या ठायी असली पाहिजे.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणजे आपल्याला असे म्हणता येईल की, भूमिती आत्म्याला खऱ्या अस्तित्वाचे चिंतन करणे भाग पाडत असेल तर तिचा खरा उपयोग आहे. परंतु भूमिती जर केवळ विकारी व विनाशी गोष्टीच आपल्याला दाखवत असेल तर तिची आपल्याला जरुरी नाही.

**ग्लॅकॉन** : आपण असे निश्चितच म्हणू शकू.

**सॉक्रेटिस** : भूमितीचा ज्यांना सर्वसामान्य परिचय झाला आहे अशा लोकांना हे कबूल कराव लागेल की, भूमितीशास्त्राचा अभ्यास करणारे जी भाषा वापरतात त्याच्याशी ते विसंगत असते.

**ग्लॅकॉन** : ते कसे काय ?

**सॉक्रेटिस** : हे लोक अत्यंत हास्यास्पद व हीन पद्धतीने बोलत असतात असे मला वाटते. कारण वर्ग करणे, गुणाकार करणे, बेरीज करणे अशी भाषा वापरून त्यांच्या सर्व सिद्धांताना व्यावहारिक ध्येय आहे आणि ते व्यापारात गुंतले आहे अशा प्रकारे ते वागतात, परंतु वस्तुतः या शास्त्राचा अभ्यास आपले ज्ञान वाढविण्यासाठीच करावयाचा असतो.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : आणखी एका मुद्द्यावर आपले एकमत होणे आवश्यक आहे.

**ग्लॅकॉन** : तो कोणता ?

**सॉक्रेटिस** : क्षणभंगुर वस्तूंच्या ज्ञानाकरिता नव्हे तर शाश्वत वस्तूंच्या ज्ञानाकरिता भूमितीचा अभ्यास करावयास हवा.

**ग्लॅकॉन** : या मुद्द्यावर एकमत होणे शक्य आहे.

**सॉक्रेटिस** : मित्रा ! म्हणजेच आपल्याला असे म्हणता येईल की, भूमिती आपल्याला सत्याकडे आकर्षून तत्त्वज्ञानाबद्दल जिज्ञासा निर्माण करील व सध्या अन्यायाखाली चिरडल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञानाला वर आणील.

**ग्लॅकॉन** : होय. भूमिती हे काम निश्चित करेल.

**सॉक्रेटिस** : म्हणून आपल्या शहरातील लोकांना आपण असे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, त्यांनी भूमितीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. तसेच भूमितीचे आनुषंगिक फायदेही कमी महत्त्वाचे नाहीत.

**ग्लॅकॉन** : ते कोणते ?

**सॉक्रेटिस** : युद्ध हालचालीबाबत सांगितलेल्या फायद्याखेरीज दुसरा आणखी एक फायदा म्हणजे ज्ञानाच्या सर्व विषयांत, ज्या विद्यार्थ्याने भूमितीचा अभ्यास केला आहे, त्याची ग्रहणशक्ती ज्याने भूमितीअभ्यास केलेला नाही त्याच्यापेक्षा जास्त असते. म्हणून विद्यार्थ्याने भूमितीचा अभ्यास केलेला आहे किंवा नाही ही गोष्ट पाहणे महत्त्वाचे आहे.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : मग हा विषय आपण आपल्या तरुण लोकांना दुय्यम अभ्यास म्हणून शिकवावा काय ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : तसेच ज्योतिर्विद्या हा आणखी एक विषय त्यांना शिकविण्यास तुमची संमती आहे का ?

**ग्लॅकॉन** : माझी पूर्ण संमती आहे. कारण ऋतू, महिने, वर्षे ह्यासंबंधीच्या ज्ञानाचा फायदा केवळ शेतकरी व खलाशी लोकांनाच होतो असे नव्हे तर सेनापतीलापण होतो.

**सॉक्रेटिस** : निरुपयोगी विषयाच्या अभ्यासाचा आपण आग्रह धरीत आहोत असे बहुजन समाजाला वाटेल अशी जी तुम्हांस भीती वाटते याची मला गंमत वाटते. आतापर्यंतच्या सर्व प्रकारच्या विषयांच्या अभ्यासामुळे आत्म्याच्या दृष्टीला इतर व्यवसायामुळे जो अंधपणा व मंदपणा आलेला असतो तो पूर्णपणे नष्ट केला जातो. अशा विधानावर लोकांचा विश्वास बसणे कठीण आहे. आत्म्याच्या दृष्टीचे संरक्षण करणे हे महस्रावधी लोकांच्या डोळ्यांपेक्षाही अधिक महत्त्वाचे आहे. कारण केवळ आत्म्याच्या दृष्टीनेच सत्य दिसू शकते. ज्यांचे विचार आपल्यासारखेच आहेत ते आपण सुचविलेल्या विषयांवर अनुमती दर्शवितात. परंतु ज्या लोकांना हे तत्त्व मुळीच मान्य नाही त्यांना हे विषय निरर्थक वाटतील कारण व्यावहारिक उपयुक्ततेपेक्षा त्यांच्यापासून काही विशेष फायदा होतो असे त्यांना वाटणार नाही. म्हणून तुम्ही कोणत्या पक्षाबद्दल चर्चा करत आहात हे ठरविणे आवश्यक आहे व कोणताही पक्ष मनात न धरता केवळ स्वतःच्या जबाबदारीवर तुम्हांस वाद करावयाचा असेल तर ह्या वादविवादापासून दुसऱ्या कोणास फायदा झाला तर तुम्ही तक्रार करता कामा नये.

**ग्लॅकॉन** : दुसरा मार्ग मला अधिक पसंत आहे. माझे भाषण व माझी प्रश्नोत्तरे मी माझ्या स्वतःच्या जबाबदारीवर करण्यास तयार आहे.

**सॉक्रेटिस** : मघाशी आपण भूमितीनंतर ज्योतिर्विद्येचा क्रम लावला पण हा क्रम चुकीचा होता असे मला वाटते.

**ग्लॅकॉन** : तो कसा काय ?

**सॉक्रेटिस** : सरळ रेषेचा अभ्यास केल्यावर घन पदार्थांचा स्वतंत्र अभ्यास न करता आपण घन पदार्थ परिभ्रमण स्थितीत कसे असतात याचा विचार करू लागलो. वस्तुतः द्विपरिमाणाचा विचार केल्यावर त्रिपरिमाणाचा विचार करणे हाच योग्य होय. ह्यामुळेच आपल्याला घनाकृतीचा व घन परिमाणांचा विचार करता येतो.

**ग्लॅकॉन** : खरे आहे. पण ह्या विषयांचे अजून संशोधन झालेले नाही.

**सॉक्रेटिस** : त्यांचे संशोधन न होण्याची दोन कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे हे विषय अवघड आहेत आणि कोणतेही राज्य त्यांना आश्रय देत नाही. त्यामुळे त्यांचे संशोधनही उत्साहाने केले जात नाही. दुसरे असे की, हे लोक ज्या विषयाचे संशोधन करतात त्याचा त्यांना मार्गदर्शक लागतो. मार्गदर्शकाशिवाय ते काहीच संशोधन करू शकणार नाहीत. असा मार्गदर्शक सापडणे कठीण व त्यातूनही जरी मिळाला तरी हल्लीचे

घमेंडखोर विद्यार्थी त्याच्या सूचना ऐकत नाहीत. पण जर सरकारच या अभ्यासाला मान्यता देऊन स्वतःच मार्गदर्शकाचे काम करील तर हे विद्यार्थी नम्रपणा दाखवतील व या विषयाचे अधिक संशोधन होऊन त्याचे खरे स्वरूप स्पष्ट होईल. हल्लीसुद्धा सामान्य लोकांबरोबरच, त्याच्या उपयुक्ततेबद्दल ज्यांना काही सांगता येत नाही अशा संशोधकांकडूनही या विषयाची अवहेलना व संक्षेप केला जात आहे. तरीही हा विषय त्याच्या अंगच्या गुणांमुळे प्रगती करून घेत आहे. म्हणून सरकारच्या आश्रयाने वरील अडचणी जर दूर झाल्या तर हा विषय पूर्ण उजेडात येऊ शकेल असा मला विश्वास वाटतो.

**ग्लॅकॉन** : या विषयामध्ये विशिष्ट आकर्षण आहे हे खरे. परंतु तुम्हांस जे म्हणावयाचे आहे ते अधिक स्पष्ट केले तर बरे होईल. भूमिती म्हणजे समान पातळीचे संशोधन अशी तुम्ही व्याख्या केली होती व त्यानंतर तुम्ही ज्योतिर्विद्येचा क्रम लावला व तोही चुकीचा ठरविला.

**सॉक्रेटिस** : जितकी मी घाई करतो तितकीच माझी प्रगती कमी होते. वस्तुतः भूमितीनंतर घनभूमितीचा क्रम योग्य आहे. परंतु या विषयाचा अभ्यास योग्य रीतीने होत नसल्याने गाळला. भूमितीनंतर ज्योतिर्विद्येचा, घनपदार्थांच्या गतीचा क्रम लावला.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : जे शास्त्र आता आपण गाळले ते सरकार जेव्हा उत्तेजन देईल तेव्हा पुढे येईल असे समजून ज्योतिर्विद्या हा अभ्यासक्रमातील चौथा विषय ठरवू.

**ग्लॅकॉन** : सॉक्रेटिस, ही कल्पना चांगली आहे. थोड्याच वेळापूर्वी मी ज्योतिर्विद्येबद्दल अजाणतेपणाने स्तुती केली त्याबद्दल तुम्ही माझी चेष्टा केली. आता तुमच्या तत्त्वाप्रमाणे मी याची स्तुती करतो. ज्योतिर्विद्या आत्म्याला वर बघावयास लावून या जगातील दृष्टी काढून वरच्या जगाकडे नेते हे कोणालाही स्पष्टपणे दिसून येईल.

**सॉक्रेटिस** : माझ्याशिवाय इतर सर्वांना जरी हे स्पष्ट वाटत असले तरी माझे मत भिन्न असल्यामुळे मला हे विधान स्पष्ट वाटत नाही.

**ग्लॅकॉन** : मग तुमचे मत काय आहे?

**सॉक्रेटिस** : ज्योतिर्विद्येला जे लोक तत्त्वज्ञानाइतके श्रेष्ठ ठरवितात ते लोक नक्कीच आत्म्याला खाली बघावयास लावतात.

**ग्लॅकॉन** : ते कसे काय?

**सॉक्रेटिस** : जे शास्त्र आकाशस्थ वस्तूंविषयी विचार करते त्याच्या खऱ्या स्वरूपाबद्दल तुम्ही उगाचच उच्च कल्पना बाळगता. एखादा मनुष्य आपले डोके मागे टेकवून नक्षीदार छताचे चिंतन करून त्यापासून ज्ञान घेऊ लागला तर आपल्या डोळ्यांनी तो विचार न करता बुद्धीनेच करीत आहे असे तुम्ही म्हणाल. कदाचित तुमची कल्पना बरोबर असून माझी

चुकीची असेल परंतु मला स्वतःला असे वाटते की, कोणतेही शास्त्र खऱ्या व अदृश्य वस्तूबद्दल विचार करणारे नसले तर ते आत्म्याला वर बघावयास लावीत नाही. एखादा मनुष्य डोळे पूर्ण उघडे ठेऊन आकाशाकडे बघत असला काय किंवा अर्धवट डोळ्यांनी बघत असला काय त्यापासून त्याच्या ज्ञानात काहीच फरक पडत नाही. जोपर्यंत तो इंद्रियांनी जाणता येणाऱ्या वस्तूंचा अभ्यास करीत आहे तोपर्यंत त्याने काही ज्ञान संपादन केले आहे असे मी कबूल करणार नाही. कारण कोणत्याही इंद्रियगम्य विषयाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करता येत नाही असे मला वाटते आणि म्हणूनच माझे असे मत आहे की, एखाद्या पोहणाऱ्या मनुष्याप्रमाणे समुद्रामध्ये किंवा कोरडया जमिनीवर उताणा पडून तो फार अभ्यास करीत असला तरी त्याचा आत्मा वर बघत नसून खालीच बघत असतो.

**ग्लॅकॉन** : तुमच्या वाग्-दंडामुळे मला योग्य ती शिक्षा मिळाली. परंतु आपल्याला ज्या हेतूकरिता ज्योतिर्विद्येचा अभ्यास व्हावा असे वाटते त्या हेतूच्या दृष्टीने प्रचलित पद्धतीपेक्षा निराळ्या पद्धतीने अभ्यास केला पाहिजे असे जे तुम्ही म्हणालात त्याचे अधिक स्पष्टीकरण कराल काय ?

**सॉक्रेटिस : हो**. अवश्य. हे तारकामय आकाश दृश्य जगताचा एक भाग असल्यामुळे सर्व दृश्य वस्तूंपेक्षा सुंदर व पूर्ण असले तरी खऱ्या अस्तित्वापेक्षा ते पुष्कळच कमी दर्जाचे आहे. केवळ गती व केवळ मंदता खऱ्या अंकामध्ये व आकारामध्ये शिरून ही परिभ्रमणे व त्यांचा परस्परसंबंध घडवून आणतात. ती दृष्टी गम्य नसून बुद्धीने व विचाराने ज्ञात होण्यासारखी असतात. याबद्दल तुम्ही माझ्याशी सहमत व्हाल ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : तारकामय स्वर्गाच्या खऱ्या अस्तित्वाचा अभ्यास करण्यासाठी आदर्श म्हणून उपयोग करता येईल. डोळस अथवा दुसऱ्या एखाद्या कारागिराने काढलेल्या आकृतीप्रमाणे आकाशाचा उपयोग करावा. ज्याला भूमितीचे ज्ञान आहे अशा मनुष्याला वरील आकृती अत्यंत सुंदर वाटते. परंतु केवळ सारखेपणा, दुप्पटपणा अथवा इतर एखादे केवळ प्रमाण यांची खरी कल्पना त्यापासून होईल असे त्याला केव्हाही वाटणार नाही.

**ग्लॅकॉन** : असे वाटणे हास्यास्पद आहे.

**सॉक्रेटिस** : खरा ज्योतिर्विद तारकांच्या गती अशाच भावनांनी पाहील असे तुम्हांस वाटत नाही काय ? याचाच अर्थ असा की, आकाश व त्यातील वस्तू स्वर्गीय कारागिरांनी अत्युत्तम सौंदर्यासह निर्माण केल्या आहेत असे तो समजेल. परंतु दिवसाचे रात्रीशी प्रमाण त्या दोहोंचे महिन्याशी, महिन्याचे वर्षाशी प्रमाण इतर तारकांचे सूर्य व चंद्राशी प्रमाण याविषयी जर एखादा मनुष्य म्हणू लागला की, त्या दृश्य व भौतिक वस्तू विकाररहित व स्थिर आहेत तर त्या मनुष्याकडे तो तुच्छतेने बघणार नाही काय ? आणि त्यांची खरी स्थिती समजून घेण्यास अवास्तव श्रम करणे तो हास्यास्पद समजणार नाही काय ?

**ग्लॅकॉन** : तुम्हांला जे वाटते तसेच मलाही वाटते.

**सॉक्रेटिस :** ज्याप्रमाणे आपण भूमिती व प्रमेयासंबंधी विचार करतो त्याप्रमाणे ज्योतिर्विद्येचा अभ्यास करू पण जर ज्योतिर्विद्या खरोखर समजून घेण्याचा आपला विचार असेल व त्यायोगे आत्म्याच्या नैसर्गिक बुद्धीचा उपयोग करून घ्यावयाचा असेल तर आपल्याला आकाशातील वस्तूंचा विचार करणे सोडून द्यावे लागेल.

**ग्लॅकॉन :** तुमची ही पद्धती प्रचलित असलेल्या ज्योतिर्विद्येच्या अभ्यासाच्या पद्धतीपेक्षा अधिकच परिश्रमाची दिसते.

**सॉक्रेटिस :** होय. आपण कायदेपंडित म्हणून उपयोगी ठरणार असलो तरी अशाच प्रमाणात दुसऱ्याही पद्धती आपणांस ठरवाव्या लागतील. असो, दुसरे कोणते शास्त्र तुम्ही शिकविता ?

**ग्लॅकॉन :** विचार केल्याशिवाय मी ते सुचवू शकणार नाही.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. गती निरनिराळ्या प्रतीची असू शकते. या प्रकारांची नक्की संख्या एखादा विद्वान तत्त्वज्ञ सांगू शकेल. परंतु आपल्यासारख्या लोकांना दोन प्रकार माहीत आहेत.

**ग्लॅकॉन :** ते कोणते ?

**सॉक्रेटिस :** एक आपण अगोदरच वर्णन केला आहे. दुसरा त्याच्यासारखाच आहे.

**ग्लॅकॉन :** तो कोणता ?

**सॉक्रेटिस :** आपल्याला असे आढळून येईल की, डोळ्यांमुळे आकाशातील वस्तूंच्या गती आपण ओळखतो, तर त्या गतींची सुसंगती आपल्याला कानांमुळे ओळखते. यामुळेच पायथागोरिअन्स् म्हणतात त्याप्रमाणे दोन सारखी शास्त्रे निर्माण झाली. तुमचेही मत असेच आहे ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** आपली चर्चा फार लांबू नये म्हणून पायथागोरिअन्स्ना आपण काही प्रश्न विचारा. परंतु तोपर्यंत आपले तत्त्व कायम ठेवू.

**ग्लॅकॉन :** कोणते तत्त्व ?

**सॉक्रेटिस :** आपल्या विद्यार्थ्यांना या शास्त्राच्या कोणत्याही अपूर्ण शाखेचा अभ्यास करू देता कामा नये. तसेच ज्योतिर्विद्येसंबंधी आपण बोलत असताना आपण आताच म्हटले त्याप्रमाणे सर्व वस्तूंचा शेवट ज्या वस्तूंशी होतो तो बिंदू ज्या शास्त्राला गाठता येणार नाही त्या शास्त्राचा अभ्यास करू देता कामा नये. कारण तुम्हांला माहीत असेल की, स्वरशास्त्राचाही ज्योतिर्विद्येसारखा अभ्यास केला जातो. ज्योतिर्विदांप्रमाणे स्वरशास्त्रपंडित सूर व सुरांचा मेळ कानानीच ओळखतात व त्यासाठी निष्फळ प्रयत्न करतात.

**ग्लॅकॉन :** खरोखरच ते स्वतःचे हसे करून घेतात. पुनरावृत्तीबद्दल बोलताना जणू काही आपल्या शेजाऱ्यांकडून सूर काढण्याचा निश्चय केला आहे अशा तऱ्हेने आपले कान तीक्ष्णपणे लावतात. नंतर एक पक्ष म्हणतो मध्यम स्वर अजूनही ओळखता येतो व तो अत्यंत मंद असल्याने त्यालाच प्रमाण मानले पाहिजे. तर दुसरा पक्ष म्हणतो सर्व सुरांत आता एकात्मता आली आहे. अशा तऱ्हेने दोन्ही पक्ष आपल्या बुद्धीऐवजी कानानाच महत्त्व देतात.

**सॉक्रेटिस :** जे लोक तारांना त्रास देऊन खुंटचावर त्यांना छेडतात अशाच लोकांना अनुलक्षून तुम्ही बोलत आहात ना? तारांवर फ्लेक्ट्रमने आघात व त्यांच्यातील दोष याविषयी बोलून ही उपमा लांबविण्याचा मी प्रयत्न करणार नाही. अशा लोकांची मी तुलना करून स्वरशास्त्राबद्दल ज्यांचा सल्ला घ्यावयाचा त्यांचेबाबत मी बोलणार. कारण ज्योतिर्विदांप्रमाणेच हे लोक (स्वरशास्त्रपंडित) ऐकता येणाऱ्या स्वराप्रमाणे गणिती प्रमाण शोधून काढतात. असे करताना कोणते अंक एकमेकांशी सुसंगत आहेत व कोणते नाहीत आणि त्याचे कारण काय? अशा प्रश्नासंबंधी ते विचार करीत नाहीत.

**ग्लॅकॉन :** हे काम करण्यास अती मानवी शक्तीच लागेल.

**सॉक्रेटिस :** हे काम इतर दृष्टीने जरी निरर्थक असले तरी सौंदर्य व सत् यांच्या संशोधनास ते अत्यंत उपयोगी आहे असे म्हणणे योग्य होईल.

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

□ □

# प्रकरण सत्तावीस
# वादपद्धतीचे अध्ययन

**[VII-531-C—535-A]**

**कथासूत्र :**

[गणितशास्त्राच्या अध्ययनानंतर भावी तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांना वयाच्या ३० ते ३५ या कालात तार्किक वादपद्धतीचे शिक्षण दिले जावे, अशी प्लेटोची योजना आहे.

शब्दच्छल, तार्किक कसरती म्हणजे वादपद्धती नव्हे. विविध ज्ञान शाखांचे, विविध विज्ञान शाखांचे अभ्यासविषय भिन्न असतात. त्या सर्वांच्या मागील गृहीत तत्त्वांची मीमांसा करणे, सर्व ज्ञान शाखांतील एकांगी, अपुरे जे असेल ते ओळखून, परमसत्ता व परममूल्य असणाऱ्या अंतिम सत्-तत्त्वाचे (Idea of the Good) ज्ञान होण्याच्या दृष्टीने मार्ग शोधणे व ते ज्ञान करून घेणे हा वादपद्धतीच्या अध्ययनाचा हेतू आहे.

सम्यक् दृष्टी, सम्यक् ज्ञान संपादन करणे हे वादपद्धतीचे ध्येय असल्याने विचार व आचार या उभय क्षेत्रांत मर्मदृष्टी येण्याच्या दृष्टीने तत्त्वचिंतकांना कुशल बनविणे हे तिचे कार्य ठरते.

त्यासाठी इंद्रियवेद्य अनुभव, बुद्धिनिष्ठ संकल्पना, विविध सत्-तत्त्वे यांचे विधायक परिशीलन करून परमसत्तेच्या स्वरूपाचा शोध व वेध घेण्याचा प्रयत्न वादपद्धतीत अंतर्भूत आहे. त्यासाठी प्रश्नोत्तरे, चर्चा, परिसंवाद, वादविवाद यांचा आश्रय तत्त्वचिंतकांनी घ्यावयाचा आहे. त्यांची सत्यजिज्ञासा वाढावी, प्रखर बनावी हीच दृष्टी वादपद्धती (Dialectics) चे अध्ययन करण्यामागे आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** जर ज्ञान शाखांचा अभ्यास हा आपल्याला त्यांच्यातील परस्पर-संबंध व संगती दाखवेल, त्यांचे धागे, त्यांचे स्वरूप सांगेल, तर माझ्या कल्पनेप्रमाणे त्या शास्त्रांचा अभ्यास आपले हेतू पूर्ण करण्यास मदत करेल व त्यासाठी आपले श्रम फुकट न जाता यशस्वी होतील.

**ग्लॅकॉन :** मला पण तसेच वाटते. पण हे काम फार मोठे आहे.

**सॉक्रेटिस :** त्यांच्या सुरुवातीसंबंधी तू म्हणतोस का अन्य कशाविषयी ? आपण ज्या शास्त्राचा अभ्यास करणार आहोत त्याचा हा प्रारंभ आहे याची आठवण करणे आवश्यक

नाही. त्याचे कारण गणितात पारंगत असलेल्या व्यक्तींना आपण आत्मविद्येत त्या पारंगत आहेत असे म्हणणार नाही, असे मी मानतो.

**ग्लॅकॉन** : त्यांपैकी कुणालाच मी तत्त्वविद्येत पारंगत मानत नाही.

**सॉक्रेटिस** : ज्या व्यक्ती तात्त्विक वादविवादात भाग घेण्यास असमर्थ असतात त्यांना योग्य ज्ञानाचा कण तरी माहीत असतो का ?

**ग्लॅकॉन** : मुळीच नाही.

**सॉक्रेटिस** : ज्या सर्वश्रेष्ठ ज्ञानशास्त्रापर्यंत आपण आलो आहोत ते शास्त्र बौद्धिक क्षेत्रात येत असल्याने केवळ दृष्टीमागील शक्तीलाच त्याचे अनुकरण शक्य आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे आपली दृष्टी सुरुवातीस वस्तू, व्यक्तीकडे स्थिरतेने पाहण्याचा यत्न करते. त्यानंतर तारका व शेवटी सूर्य पाहू शकते. जेव्हा एखादी व्यक्ती आत्मविद्येच्या मदतीने इंद्रिय ज्ञानाची मदत घेतल्याविना बौद्धिक चिंतनात सद्-वस्तूंचे संशोधन करू लागते आणि विशिष्ट प्रज्ञेच्या मदतीने सद्-वस्तूचे स्वरूप जाणेपर्यंत थांबत नाही त्यावेळी दृष्टीच्या मदतीने जशी ती दृश्यसृष्टीच्या अंतापर्यंत जाऊ शकेल त्याप्रमाणे ती बौद्धिक विश्वाच्या अंतापर्यंत जाऊ शकेल.

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : या ज्ञानसाधनेस तुम्ही आत्मविद्या म्हणता.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : अज्ञानात बद्ध असलेल्या लोकांची मुक्तता होणे, आकृतीच्या छायांपासून प्रत्यक्ष आकृतीपर्यंत व त्यानंतर प्रकाशापर्यंत त्यांचा प्रवास होणे, गुहेतून सूर्यप्रकाशापर्यंत त्यांचो प्रगती होणे, गुहेबाहेर आल्यावर प्राणी, वनस्पती, सूर्य, प्रकाश यांना प्रत्यक्षतः न पाहता येणे, त्यांना प्रारंभी पाण्यातील प्रतिबिंबे पहावी लागणे, इत्यादी. माझ्या मताप्रमाणे या सर्व गोष्टी आपण वर्णन केलेल्या सर्व कलांच्या अभ्यासात सारख्याच दिसतात. त्या ज्ञानात आत्म्याचा श्रेष्ठ भाग पूर्णत्वाप्रत नेण्याचे सामर्थ्य असते. सद्-वस्तूचे चिंतन करण्यास हे अभ्यास मदत करतात. शरीरातील अत्यंत तेजस्वी घटक म्हणजे दृष्टी होय. भौतिक जगातील सर्व तेजस्वी पदार्थांचे चिंतन करण्यास तिला त्यांचा उपयोग होतो. तसाच उपयोग आत्म्यालाही या जगात होतो.

**ग्लॅकॉन** : आपले हे म्हणणे स्वीकारण्यास कठीण असले तरी मी मान्य करतो. दुसऱ्या बाजूने पाहिले तर तुमची भूमिका नाकारणे अवघड आहे. पण त्याविषयी चर्चा आता पूर्णपणे शक्य नाही. पुढे अनेक वेळा ती चर्चा करावी लागणार आहे. म्हणून तुम्ही जे म्हणता ते खरे आहे असे गृहीत धरू आणि ती सर्वश्रेष्ठ तत्त्वविद्या काय आहे याची चर्चा करू. याकरिता तत्त्वविद्येचे स्वरूप, तिला जाणण्याचे मार्ग याविषयी तुम्ही काही मार्ग सांगावे. त्या मार्गाने अपेक्षित ठिकाणी जाऊ शकू.

**सॉक्रेटिस** : प्रिय ग्लॅकॉन, जरी मला ते आवडत असले तरी यापुढे माझ्याबरोबर तुम्ही येऊ शकणार नाही. मला जी सद्-वस्तू दिसत आहे तिच्याशी सादृश्य नव्हे तर तिचे सत्य स्वरूप तुम्ही पाहू शकाल ? माझे म्हणणे खरे की खोटे ते मी निश्चित सांगू शकत नाही. पण माझे काही फार चुकले आहे असे मला वाटत नाही.

**ग्लॅकॉन** : यात शंका नाही.

**सॉक्रेटिस** : ज्या व्यक्तीने आपण वर्णन केलेल्या विविध शाखांत कार्यक्षमता मिळविली त्यालाच तत्त्वविद्येच्या सहाय्याने तत्त्वविद्येचे खरे स्वरूप मिळविता येईल. इतर कोणताही मार्ग शक्य नाही.

**ग्लॅकॉन** : ह्या प्रश्नावर तुमची भूमिका निश्चित स्वरूपाची आहे असे आम्ही मानतो.

**सॉक्रेटिस** : प्रत्येक वस्तूचे खरे स्वरूप जाणण्याची पद्धत आणि प्रयत्न इतर कोणताही असू शकत नाही, ह्या भूमिकेस फारसा विरोध कोणी करू शकणार नाही. सामान्यतः सर्व कलांचे ध्येय लोकांच्या गरजा व मते याविषयी असते किंवा शरीराची उत्पत्ती, संरक्षण, रचना याविषयी त्या विचार करतात. सत्याची मीमांसा करणारी भूमिती किंवा तत्सम इतर शास्त्रे याबद्दल आपण असे म्हणू की, त्या शास्त्रात खऱ्या सद्-वस्तूबद्दल फक्त कल्पनाच असतात. जोपर्यंत ही शास्त्रे आपली गृहीत तत्त्वे तपासून पहात नाहीत, स्पष्टीकरण देत नाहीत तोपर्यंत त्यांना सद्-वस्तूचे खरे स्वरूप कळणार नाही. जेव्हा माणूस आपल्याला माहीत नसणारे एक तत्त्व गृहीत धरतो व त्यावर पुढील सिद्धांताचे जाळे तयार करतो, अखेर निष्कर्ष काढतो त्यावेळी त्या सिद्धांतांना आपण शास्त्र असे कसे म्हणू शकू ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच नाही.

**सॉक्रेटिस** : याकरिताच तत्त्वविद्येने पुढील मार्ग स्वीकारला. अंतिम ज्ञानतत्त्वापर्यंत सरळ प्रवास करून आपले स्थान निश्चित करण्याकरिता ती गृहीत तत्त्वांचा त्याग करते. आत्म्याची ज्ञानदृष्टी अज्ञानात पूर्णतः गाडलेली असते. म्हणून ज्या कलांची चर्चा केली त्यांच्या मदतीने ती त्या ज्ञानदृष्टीला हळूहळू उच्च वातावरणात नेते. या कलांना आपण प्रस्थापित समजुतीप्रमाणे शास्त्रे असे म्हटले. पण जर त्यामध्ये मतांपेक्षा अधिक पण शास्त्रांपेक्षा कमी स्पष्टपणा दिसत असेल तर त्यांना आपण वेगळे नाव दिले पाहिजे. पूर्वी एकदा अन्य संदर्भात त्यांना आपण मानसिक प्रक्रिया ग्रहण करणारी शक्ती असे म्हटले. अर्थात यापेक्षा अधिक महत्त्वाच्या विषयाची चर्चा करणे ठरविले असल्यामुळे केवळ नावांबद्दल वाद घालणे अर्थशून्य असे मी मानतो.

**ग्लॅकॉन** : हे बरोबर आहे. मनाची अवस्था प्रकट करता येईल असे योग्य नाव दिले तर भागेल.

**सॉक्रेटिस** : आपल्या पूर्वीच्या भूमिकेप्रमाणे पहिला भाग शास्त्र, दुसरा ग्रहणशक्ती, तिसरा श्रद्धा, चौथा अनुमान अशी भूमिका घेणे मला योग्य वाटते. पहिले दोन भाग हा बुद्धीचा प्रांत होय व दुसरे दोन भाग हा मतांचा प्रांत होय. बुद्धी सत्याबद्दल चिंतत असते तर मन किंवा समज हे विनाशी वस्तूंबद्दल असतात. सत्याचा संबंध विकृतीशी असतो.

त्याप्रमाणे बुद्धीचा मतांशी असतो. त्याचप्रमाणे शास्त्राचा श्रद्धेशी, ग्रहणशक्तीचा अनुमानाशी असतो. मानसिक क्रियांचे हे सर्व विषय, मत आणि बुद्धी यांच्या कार्यक्षेत्राची दुहेरी वाटणी यांतील दिसणारा सारखेपणा आपण सोडून देऊ, नाही तर पूर्वी जास्त वादविवाद करावा लागेल.

**ग्लॅकॉन** : मला जे काही कळले त्यानुसार मी तुमचे म्हणणे मान्य करतो.

**सॉक्रेटिस** : जी व्यक्ती प्रत्येक वस्तू व तत्त्व विचारपूर्वक माहिती करून घेते तिलाच तू आत्मविद्या पारंगत म्हणशील ना ? हे ज्ञान ही व्यक्ती स्वतःला किंवा दुसऱ्याला करून घेऊ किंवा देऊ शकत नाही. त्याने शुद्ध प्रज्ञेचा उपयोग अभ्यासाकरिता केला नाही असे म्हणशील ना ?

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : माणसाला सद्-वस्तूचे स्वरूप इतर गोष्टींपासून तार्किक रीत्या वेगळे करून सांगता येत नाही. तसेच विवेचनात यत्किंचितही चूक न करता मतांच्या सहाय्याने नव्हे तर, सत्याच्या सहाय्याने सद्-वस्तूवरील आक्षेपांचे निरसन करता येत नाही. तात्त्विक वादविवाद विलीन करता येत नाहीत ; असे जोपर्यंत घडत नाही तोपर्यंत सद्-वस्तू कळली नाही असे तू म्हणणार नाहीस का ? त्यास सद्-वस्तूचा जो आभास झाला असेल ते शास्त्रशुद्ध ज्ञान नव्हे तर मताचे फळ नव्हे का ? अशी व्यक्ती सर्व जीवन जगत असतानाही निद्रिस्त आहे, स्वप्नांचा अनुभव घेत आहे आणि दुसरे आयुष्य मिळेपर्यंत ती निद्रिस्त राहणार, जागी होणार नाही असे तू म्हणणार नाहीस का ?

**ग्लॅकॉन** : हो. निश्चितच म्हणेन.

**सॉक्रेटिस** : आपण मुलांचे स्वभाव व शिक्षण याची काळजी घेत आहोत. ही मुले जोपर्यंत अविवेकी आहेत तोपर्यंत तू त्यांना राज्याधिकारी नेमून महत्त्वाचे निर्णय घेण्याचे अधिकार देशील का ?

**ग्लॅकॉन** : मुळीच नाही.

**सॉक्रेटिस** : तत्त्वविद्या शास्त्रशुद्ध कशी वापरावी याचे शिक्षण त्यांना देण्यासाठी तुम्ही नियम कराल ना ?

**ग्लॅकॉन** : तुमच्या मदतीने जरूर नियम करीन.

**सॉक्रेटिस** : तत्त्वविद्या हे शिखरशास्त्र आहे. विविध शास्त्रांची श्रेणी आपण पूर्ण केली. त्यामुळे अन्य कोणतेही शास्त्र तत्त्वविद्येपेक्षा वरचढ असणार नाही असे तुला वाटत नाही का ?

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे योग्य आहे.

□ □

## प्रकरण अठ्ठावीस

# शिक्षणपद्धतीची रचना व कालमर्यादा

**[VII-535-A—543-B]**

**कथासूत्र :**

[तत्त्वचिंतकासाठी द्यावयाच्या विशेष शिक्षणक्रमाचे स्वरूप सांगितल्यानंतर प्लेटोने आतापर्यंत झालेल्या शिक्षणविषयक चर्चेचे सार दिले आहे. त्यामध्ये कोणता अभ्यासक्रम केव्हा पूर्ण करावयाचा त्याचे मार्गदर्शन केले आहे. त्यानुसार प्लेटोने व्यक्तिविकासाचे पुढील टप्पे केले आहेत :–

(१) वयाच्या १७ ते १८ वर्षांपर्यंत वाङ्मय, कला, प्राथमिक गणित यांचे शिक्षण;

(२) १७/१८ ते २० वर्षांपर्यंत कडक शिस्तीचे व परिश्रमांचे शारीरिक शिक्षण व लष्करी शिक्षण; त्यानंतर निवड करून–

(३) २० ते ३० वर्षांपर्यंत उच्च गणितशास्त्रांचा अभ्यास;

(४) ३० ते ३५ वर्षांपर्यंत ज्ञान व नीती यांमधील परमतत्त्वे समजण्यासाठी वादपद्धतीचे अध्ययन;

(५) ३५ ते ५० वर्षांपर्यंत सार्वजनिक कार्याचा प्रत्यक्ष अनुभव; यामध्ये जे सर्वश्रेष्ठ ठरतील त्यांना

(६) ५० वर्षांपासून पुढे श्रेष्ठ शासकीय अधिकार प्राप्ती.

आदर्श राज्य कसे प्रस्थापित होणार, या मूलभूत प्रश्नाचे उत्तर प्लेटोने पूर्ण केले आहे. समाजातील श्रेष्ठ, गुणसंपन्न, प्रज्ञावंत व्यक्तींना निवडून, त्यांना योग्य ते पुरेसे शिक्षण देऊन आदर्श राज्यकर्ते निर्माण करता येतील. या व्यक्तींच्या हाती राज्य शासन व सामाजिक व्यवहार यांची सूत्रे राहिल्यास व्यक्ती व समाज यांचे जीवन आदर्श बनेल, अशी प्लेटोची धारणा आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** ज्यांना आपण हे अभ्यास करायला सांगणार आहोत त्यांची निवड करणे व कोणत्या तत्त्वावर अभ्यासाची वाटणी करणार हे निश्चित करणे हीच कामे आता तुम्हांस करणे जरूर आहे.

**ग्लॅकॉन :** उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : थोडया वेळापूर्वीच अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी कोणत्या प्रकारचे लोक आपण पसंत केले ते आपणांस आठवते काय ?

**ग्लॅकॉन** : होय, आठवते.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. ज्या गुणांचा आपण त्यावेळी निर्देश केला ते गुण ज्यांच्यात आहेत अशांचीच आपण निवड करू. याचाच अर्थ निवड करू त्या लोकांमध्ये दृढ निश्चय, शौर्य, सौंदर्य हे गुण असणे आवश्यक आहे. ह्या गुणांव्यतिरिक्त आपल्या शिक्षणपद्धतीस अनुकूल असेही गुण त्यांच्यात असणे आवश्यक आहे.

**ग्लॅकॉन** : ते कोणते ?

**सॉक्रेटिस** : अभ्यासामध्ये तीक्ष्ण बुद्धी व तीक्ष्ण ग्रहणशक्ती हे दोन गुण असणे आवश्यक आहे. कारण शारीरिक कष्टांपेक्षा कठीण अभ्यासक्रमातच मनाची परीक्षा होते. अभ्यासाच्या परिश्रमाचा शरीराशी काही संबंध नसल्यामुळे केवळ मनावरच त्याचा ताण पडतो.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच चांगली स्मरणशक्ती, निर्भीड वागणूक व आपल्या कामाविषयी पूर्ण आवड अशा गुणांनी युक्त असलेला मनुष्य आपण शोधून काढला पाहिजे. जास्त शारीरिक मेहनत करून जास्त बौद्धिक ज्ञान संपादन करणे आवश्यक आहे असे तुम्हांस वाटते काय ?

**ग्लॅकॉन** : नाही. ज्या मनुष्याच्या बौद्धिक शक्ती चांगल्या नाहीत अशा माणसाची आम्ही अजिबात निवड करणार नाही.

**सॉक्रेटिस** : हल्ली लोक तत्त्वज्ञानाचा अभ्यास स्वतःची लायकी नसतानाही करतात. त्यामुळेच तत्त्वज्ञानाविषयी चुकीचा समज लोकांमध्ये पसरला आणि तत्त्वज्ञानाची अपकीर्ती झाली आहे. खरे पाहता तत्त्वज्ञानाचा अभ्यास हलक्या लोकांनी करावयाचा नसून अस्सल लोकांनी करावयाचा असतो.

**ग्लॅकॉन** : असे अस्सल लोक कोणते ?

**सॉक्रेटिस** : मुख्यतः तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाने अभ्यासात खंड पाडता कामा नये. म्हणजेच त्याने अर्धवट अभ्यासू व अर्धवट आळशी असता कामा नये. साधारणतः ज्या मनुष्याला व्यायाम, शिकार व शारीरिक कष्ट यांची आवड असते त्यालाच अभ्यास, श्रवण चिकित्सा इ. बौद्धिक कष्टांचा तिरस्कार वाटतो. त्याला अशा प्रकारच्या वाईट सवयी जडलेल्या असतात. तसेच ज्या लोकांना स्वतःच्या कामाविषयी आवड नसते तेही असेच अर्धवट असतात.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : जो आत्मा स्वेच्छेने असत्याचा तिटकारा करतो व स्वतः अथवा इतर खोटे बोलले असता संतप्त होतो, तो आत्मा अनिच्छेने सत्य शांतपणाने स्वीकारतो, अज्ञान दाखवून दिले असता ते सुधारण्याचा प्रयत्न न करता एखाद्या डुकराप्रमाणे अज्ञानात लोळण्यात आनंद मानू लागला तर तो सत्याच्या दृष्टीने लंगडा अथवा कच्चा असे आपण म्हणू शकू काय ?

**ग्लॅकॉन** : होय. तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : नेमस्तपणा, धैर्य, मनाची उदात्तता व इतर सद्गुण यांच्या दृष्टीने कुलीन व हलके लोक कोणते हे आपण आता शोधले पाहिजे. कारण जेव्हा सरकार किंवा खाजगी लोक यांना अशा सद्गुणांची पारख नसते तेव्हा ते अजाणतेपणाने सत्याच्या दृष्टीने अर्धवट व हलक्या अशा लोकांना अधिकारी किंवा मित्र करतात.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणून याबाबत आपण पूर्ण सावध असले पाहिजे. जर आपण शारीरिक व मानसिक दृष्टया योग्य लोक निवडून त्यांना उच्च अभ्यास व कडक शिक्षेचे वळण लावले तर खुद्द न्यायालाही आपल्यात दोष काढता येणार नाही. आपले राज्य व त्याची घटना यांचे आपणांस नीट रक्षण करता येईल. पण जर आपण वेगळ्या प्रकारचे विद्यार्थी निवडले तर आपण अपयशी होऊन तत्त्वज्ञानाचे अधिकच हसे होईल.

**ग्लॅकॉन** : असे होणे ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

**सॉक्रेटिस** : खरे आहे. पण ह्या क्षणाला मी माझे स्वतःचेच हसे करून घेतले असे मला वाटते.

**ग्लॅकॉन** : ते कसे काय ?

**सॉक्रेटिस** : आपण गंभीरपणे चर्चा करीत आहोत असे समजून मी उगाचच आवेशाने बोललो. तत्त्वज्ञानाची अकारण निर्भर्त्सना होत असलेली पाहून निर्भर्त्सना करणारांवर मी इतका चिडलो की, माझा आवेश मला आवरता आला नाही.

**ग्लॅकॉन** : छे. निदान ऐकत असताना तरी मला असे वाटले नाही.

**सॉक्रेटिस** : पण मी बोलत असताना मला तसे वाटले. असो. पूर्वी आपण आपल्या कामाकरिता वृद्ध लोक पसंत करत होतो पण आता तसे करून चालणार नाही. हे आपणांस विसरून चालणार नाही. जसा मनुष्य वृद्ध होत जातो तसा तो पुष्कळ गोष्टी शिकू लागतो. हे सोलनचे म्हणणे चुकीचे आहे. एक वेळ त्याला धावता येईल पण त्याला शिकता येणार नाही. म्हणून बौद्धिक परिश्रमाचे काम तरुण लोकांवरच सोपविले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : अंकगणित, भूमिती आणि आत्मविद्या यांचा अभ्यास करण्यास ते प्रारंभीचे शिक्षण आवश्यक आहे. त्याच्या सर्व शाखा आपल्या विद्यार्थ्यांना लहानपणीच शिकता आल्या पाहिजेत. मात्र त्या शिक्षणाची सक्ती होऊ नये.

**ग्लॅकॉन** : असे का ?

**सॉक्रेटिस** : स्वतंत्र व्यक्तीच्या ज्ञानसाधनेत कोणतीही सक्ती असू नये. सक्तीचे शारीरिक श्रम शरीरावर वाईट परिणाम करीत नाहीत हे सत्य असले तरी सक्तीचा अभ्यास मात्र मनावर चांगला परिणाम करीत नाही.

**ग्लॅकॉन** : हे ठीक आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणून, कोणत्याही प्रकारची सक्ती न करता, खेळकरवृत्तीने त्यांनी अभ्यास केल्याने, मुलांच्या स्वभावाचा कल कोणत्या विषयाकडे आहे, हे आपल्याला समजू शकेल.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : प्रत्यक्ष युद्धाच्या शिक्षणात, मुलांना अश्वारोहण शिकविले पाहिजे व सुरक्षितपणे रणभूमीवर आणून, शिकारी कुत्र्याप्रमाणे त्यांना रक्ताची चव दाखविली पाहिजे, असे आपण पूर्वी म्हटले होते, ते आठवते ना ?

**ग्लॅकॉन** : मला ते चांगले आठवते.

**सॉक्रेटिस** : ज्यांनी या सर्व कार्यात, अभ्यासात व संकटात, विशेष आत्मसंयम दाखवला, त्यांचीच आपण निवड केली पाहिजे.

**ग्लॅकॉन** : वयाची पातळी कोणती लक्षात घ्यायला हवी ?

**सॉक्रेटिस** : आवश्यक शारीरिक परिश्रमांचा काळ संपल्यावर, जी वर्षे इतर काहीच न करता जातात, म्हणून फुकट जातात, अशा वेळी त्यांची निवड केली पाहिजे. थकवा व झोप हे अभ्यासाचे शत्रू आहेत. पण शारीरिक व्यायामाचे वर्तनही प्रत्येकाच्या स्वभावाची महत्त्वाची कसोटी असते.

**ग्लॅकॉन** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : या कालानंतर वीस वर्षांच्या तरुणांतून निवड केलेले हे विशिष्ट लोक, इतरांपेक्षा अधिक मान्यवर समजले जातील, आणि लहानपणीच जी विविध शास्त्रे ते शिकले असतील, ती एकत्र करून त्यांच्या परस्परांशी व सद्-वस्तूंशी काय संबंध आहे हे त्यांना दाखविले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : हो. याचप्रकारचे शिक्षण मूलग्राही व कायम टिकणारे होईल.

**सॉक्रेटिस** : हे आत्मविद्येचे फार श्रेष्ठ लक्षण आहे. कारण, कोणताही विषय समान भूमिकेतून जो अभ्यासतो, त्यालाच आत्मविद्यापारंगत असे म्हणता येईल.

**ग्लॅकॉन** : माझेही हेच मत आहे.

**सॉक्रेटिस** : याकरिता सम्यक् ज्ञानसाधनेत जे आपली योग्यता चांगल्या प्रकारची दाखवतात, शिवाय अभ्यास, युद्ध यात शिस्तबद्ध वर्तन दाखवून कार्य प्रकट करतात त्यांचेकडे लक्ष दिले पाहिजे. तीस किंवा अधिक वयाचे झाल्यावर पूर्वी निवडलेल्या लोकांतून

यांना वेगळे काढून या निवडक व्यक्तींना अधिक मान दिला पाहिजे. यांच्यापैकी दृष्टी व इंद्रिय ज्ञान यांना दूर सारून सत्याच्या मदतीने सद्-वस्तू कोण जाणू शकतो, याबद्दल अध्यात्मशास्त्राच्या दृष्टीने काटेकोर परीक्षा घेतली पाहिजे. विशेष सावधगिरीचा हाच कालखंड.

**ग्लॅकॉन** : कोणत्या विशिष्ट कारणासाठी ?

**सॉक्रेटिस** : अध्यात्मविद्येमुळे होणारा फार मोठा वाईट परिणाम दिसतो तो तुला माहीत आहे का ?

**ग्लॅकॉन** : कोणता ?

**सॉक्रेटिस** : या शास्त्राचे विद्यार्थी उद्धट दिसतात.

**ग्लॅकॉन** : तुमची भूमिका योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : या गोष्टीचे तुम्हांस आश्चर्य वाटते का ? अशा व्यक्तींना तुम्ही क्षमा करणार नाही ना ?

**ग्लॅकॉन** : तुम्ही तुमचे विधान अधिक विशद कराल का ?

**सॉक्रेटिस** : मी जरा दुसरे उदाहरण देतो. अशी कल्पना करा, एका मुलाचा जन्म झाल्याबरोबर लबाडीमुळे तो श्रीमंत घरात स्तुतिपाठकांच्या सहवासात वाढविला गेला. मोठा झाल्यावर आपले खरे माता-पिता कोण याचा शोध त्याला घेता आला नाही. तरीसुद्धा आतापर्यंत ज्याला तो आपले आई-बाप समजतो ते खरे नव्हेत हे त्याला समजले. आपल्या अदलाबदलीबद्दलचे ज्ञान त्याला नव्हते ते आता कळले. खोटे आई-बाप व स्तुतिपाठक यांच्या संदर्भात त्याचे वागणे आता कसे होईल ? तुझी काय कल्पना आहे ? का माझे मतच ऐकण्याची तुझी इच्छा आहे ?

**ग्लॅकॉन** : तुमचे मतच मला ऐकावयाचे आहे.

**सॉक्रेटिस** : ठीक. माझ्या कल्पनेप्रमाणे जेव्हा त्याला सत्य ज्ञान मिळते तोपर्यंत आपले आई-वडील, नातेवाईक यांना तो स्तुतिपाठकांपेक्षा अधिक मान देत असेल, त्यांना काही कमी पडू देणार नाही. किंवा महत्त्वाच्या प्रश्नाबाबत तो त्यांचा अपमान करणार नाही.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : पण जेव्हा त्याला खरी वस्तुस्थिती कळेल तेव्हा त्याचा आई-वडिलांविषयीचा आदर व मान कमी होईल. स्तुतिपाठकांविषयी आदर वाढेल. त्यांचे म्हणणे तो ऐकून घेईल. त्यांच्या इच्छेप्रमाणे वागेल. उघडपणे त्यांच्यात मिसळेल. त्याचा स्वभाव चांगला असला तरच खोटचा आई-वडिलांची, खोटचा नातेवाईकांची तो पर्वा करील. नाही तर नाही.

**ग्लॅकॉन :** तुमचे वर्णन अगदी स्वाभाविक आहे. पण या उदाहरणाचा आत्मविद्येच्या अभ्यासकाशी काय संबंध आहे?

**सॉक्रेटिस :** तेच मी सांगतो. लहानपणापासून न्याय व सौंदर्य यांबद्दल आपले काही समज निश्चित असतात. आई-वडिलांच्या पुढे नम्रतेने वागण्याचे जसे शिक्षण मिळते तसेच त्या मतांना मान द्यावा, ती पाळावीत असेही आपणांस शिक्षण मिळते.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** याऐवजी आत्म्याची स्तुती करून त्याला आपल्याकडे वळविण्याचा यत्न सुखसंपादन प्रवृत्ती करीत असतात. आपल्या अंगी जर काही खरे सद्‌गुण असले तरी सुखप्रवृत्तीचा मनावर काही परिणाम होत नाही. थोरांची मते आपण पूज्य मानतो. त्यांच्याबद्दल निष्ठा बाळगतो.

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** पण अशा माणसाला सौंदर्यविषयक जेव्हा एखादी समस्या सोडवावी लागते तेव्हा नेहमीच्या चाकोरीतले उत्तर आत्मविद्येच्या कसोटीने योग्य वाटत नाही. ज्याला आपण सुंदर म्हणतो ती तेवढीच कुरूप असते असे विविध चर्चाप्रसंगात पराजयाचे वेळी मान्य करावे लागते. तसेच ज्यांना पूज्य मानतो अशा न्याय, सज्जनपणा या किंवा अशा कल्पना बरोबर नाहीत हे त्यास पटते. मग आपल्या जुन्या मतांविषयी आदर व आज्ञापालनवृत्ती त्याच्यात निर्माण होईल असे तुला वाटते का?

**ग्लॅकॉन :** अर्थातच, आदर व आज्ञापालनवृत्ती निर्माण होणार नाही.

**सॉक्रेटिस :** जोपर्यंत पूर्वीच्या मतांबद्दल त्याला आदर वाटत नाही, त्याचा स्वीकारही करीत नाही व खरी तत्त्वे तो शोधून काढत नाही तोपर्यंत वासना उत्तेजित करणाऱ्या आयुष्याबद्दल त्याला ओढ वाटेल ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे आज्ञाधारकपणा सोडून बेकायदेशीर वागेल.

**ग्लॅकॉन :** यात मुळीच संशय नाही.

**सॉक्रेटिस :** आत्मविद्येच्या अभ्यासकांची ही स्वाभाविक स्थिती नाही काय? आणि म्हणूनच उदार अंतःकरणाने ती क्षम्य मानावयास नको काय?

**ग्लॅकॉन :** शिवाय ती स्थिती कीव करण्यासारखी आहे.

**सॉक्रेटिस :** ह्या तीस वर्षांच्या लोकांबद्दल कीव वाटण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून आत्मविद्येची त्यांना ओळख करून देताना अत्यंत सावधगिरी बाळगावयास हवी का?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस** : तरुण लोकांना तत्त्वविद्येत लुडबूड करणे सावधगिरीचे होणार नाही काय? कारण तुमच्या हे पाहण्यात आले असेल की, मुलांचा जेव्हा तत्त्वविद्येशी प्रथम परिचय होतो तेव्हा ती विद्या एक करमणूक आहे असे समजून तिचा नेहमी विरोध करण्यासाठी उपयोग केला जातो व खंडनविद्येचा अभ्यास करणाऱ्या लोकांच्या युक्त्या व प्रयुक्त्यांची ते नक्कल करतात. जर कोणी त्यांच्या सान्निध्यात येईल त्याला तर्कशास्त्राच्या साहाय्याने छिन्नविछिन्न करून त्याचे तुकडे तुकडे करण्यात त्यांना कुत्र्यांच्या पिलांप्रमाणे आनंद वाटतो.

**ग्लॅकॉन** : होय. यापेक्षा त्यांना इतर कुठलीच गोष्ट प्रिय नसते.

**सॉक्रेटिस** : अनेक जयापजयांचा अनुभव घेतल्यानंतर ते आपली पूर्वीची मते अविश्वसनीय ठरवितात. त्यांच्या अशा वागण्यामुळे जगाच्या दृष्टीने ते व तत्त्वज्ञानाचा पक्ष दोषार्ह समजले गेले आहे.

**ग्लॅकॉन** : हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस** : परंतु मध्यम वयाचा मनुष्य अशा मूर्खपणाने वाहात जात नाही. केवळ मनोरंजनाकरिता विरोध करणाऱ्या लोकांचे अनुकरण करण्याऐवजी, जे लोक वादविवादाने सत्याची परीक्षा करीत असतात, अशांचेच तो अनुकरण करतो आणि आपल्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेच्या जोरावर, तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाविषयी लोकांचा आदर कमी न करता, वाढविण्याचा प्रयत्न करतो.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : हल्लीच्या पद्धतीमुळे लायकी नसलेल्या मनुष्यासही तत्त्वविद्येचा अभ्यास करण्यास मोकळीक असते. यामुळे होणारा दुष्परिणाम टाळण्याकरिता ज्यांना आत्मविद्येचा परिचय करून द्यावयाचा त्यांचे स्वभाव स्थिर व व्यवस्थित असले पाहिजेत असे जे आपण मघाशी म्हटले, ते योग्य होते ना?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : तत्त्वविद्येचे पूर्ण ज्ञान होईपर्यंत केवळ याच अभ्यासास मनुष्याने वाहून घेतले पाहिजे ना? शारीरिक व्यायामाच्या पूर्णतेस लागणाऱ्या वर्षांपेक्षा दुप्पट वर्षे या विद्येच्या अभ्यासास त्याने खर्च केली पाहिजेत ना?

**ग्लॅकॉन** : तुम्हांला किती वर्षे म्हणायची आहेत? चार, सहा.

**सॉक्रेटिस** : वर्षांची संख्या महत्त्वाची नाही. तरीपण पाच वर्षे गृहीत धरू. ज्या गुहेचे वर्णन केले तीमध्ये त्यांना पाठवून देऊ. तरुणांना योग्य अशी युद्धाची अथवा इतर कामे त्यांना दिली पाहिजेत. त्यामुळे आपल्याला शेजाऱ्यांबरोबर कसे वागावे हे कळेल. या ठिकाणी मोहाचा प्रसंग आला असता आपल्या कामात ते स्थिर राहतात का डळमळतात ह्याची परीक्षा घेतली पाहिजे.

**ग्लॅकॉन :** तुमच्या मते हा काळ किती वर्षांचा असावा.

**सॉक्रेटिस :** पंधरा वर्षांचा. पन्नास वर्षांची वयोमर्यादा ओलांडल्यानंतर जे लोक मोहाच्या सर्व पसंगातून व्यवस्थितपणे सुटले आहेत आणि कर्तव्याच्या व शास्त्राच्या प्रत्येक शाखेत ज्यांनी यश संपादन केले आहे अशा लोकांना आयुष्यातील शेवटचे काम करावयास सांगितले पाहिजे. वयोवृद्ध लोकांनी सर्व वस्तू प्रकाशित करणाऱ्या सर्वव्यापी प्रकाशाकडे आपल्या आत्म्याची दृष्टी लावून सत्‌तत्त्वाचे दर्शन करून घेतले पाहिजे व या सत्‌तत्त्वाचा आदर्श आपल्या देशाची, बांधवांची व स्वतःची उन्नती करण्याच्या कामी डोळ्यांपुढे ठेवला पाहिजे. अशा लोकांचे आयुष्य मुख्यतः तत्त्वज्ञानासाठी वेचले जात असेल, वेळ आली असता सार्वजनिक आयुष्यातील जबाबदारीची व अधिकाराची कामे स्वेच्छेने नव्हे तर अपरिहार्य म्हणून देशहिताकरिता त्यांनी केली पाहिजेत. अशा प्रकारे भावी पिढीत चांगले संरक्षण निर्माण करून स्वतःच्या जागेवर त्यांची नेमणूक करून भाग्यशाली लोकांच्या बेटावर ते रहावयास निघून जातील. सार्वजनिक खर्चातून त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ सरकारकडून पुतळे उभारले जातील. पिथीअन भविष्यवाणीने हुकूम दिला तर त्यांना उपदेव किंवा अत्येव सुखी किंवा देवतुल्य माणसे समजून त्यांच्याकरिता यज्ञ करण्यात येतील.

**ग्लॅकॉन :** सॉक्रेटिस, कुशल शिल्पकाराप्रमाणे तुम्ही अधिकारी पुरुषांचे अत्यंत सुंदर व निर्दोष असे पुतळे तयार केलेत.

**सॉक्रेटिस :** ग्लॅकॉन, " अधिकारी बायकांचे सुद्धा " कारण स्वाभाविक गुणांमध्ये स्त्रिया पुरुषांची बरोबरी करीत असल्याने मी जे बोललो ते पुरुषांना अनुलक्षून स्त्रियांनाही होते असे समजा.

**ग्लॅकॉन :** तुमच्या वर्णनाप्रमाणे समानतेच्या तत्त्वावर पुरुषांबरोबर स्त्रियांनीही भाग घ्यावयाचा असल्यामुळे तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** यावर राज्य व राज्य कारभार याविषयी आपण जी कल्पना पुढे मांडली ती केवळ एक स्वप्न नसून अतिशय कठीण पण शक्य कल्पना आहे हे तुम्हाला पटले ना ? आपण म्हटल्याप्रमाणे तिची कार्याला खऱ्या तत्त्वज्ञानापैकी अनेकांना नसली तरी निदान एकाला राज्याचे सर्वाधिकार दिल्याने शक्य आहे ना ? असा मनुष्य हल्लीच्या काळातील मानसन्मान, क्षुद्र व यःकश्चित किंमतीचे समजून त्यांचा तिरस्कार करणार नाही काय ? न्याय व त्यापासून मिळणारा मान यांचे श्रेष्ठत्व त्यास पटल्यामुळे सर्व कर्तव्यांत न्यायाने वागणे हे अत्यंत उच्च कर्तव्य समजून न्यायाचा स्वतःला एकनिष्ठ सेवक व भक्त समजून राज्यामध्ये तो सर्व प्रकारची सुधारणा करणार नाही काय ?

**ग्लॅकॉन :** हे कसे काय घडवून आणावयाचे ?

**सॉक्रेटिस :** शहरामध्ये जे दहा वर्षांहून अधिक वयाचे आहेत त्यांना खेडेगावात पाठवून दिले पाहिजे व त्यांच्या लहान मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्यातील आनुवंशिक स्वभावदोष

काढून टाकून आपण पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे खऱ्या तत्त्वज्ञानी लोकांच्या चालीरीती व कायदे यांच्या वातावरणात त्यांना वाढविले पाहिजे व शिक्षण दिले पाहिजे. आपण वर्णन केलेले राज्य व घटना स्थापित होऊन त्यांची भरभराट होण्यास ही अत्यंत सोपी व शीघ्र पद्धत नाही काय? आणि ज्या राष्ट्रांत हिचे बी रोवले गेले ते धन्य नाही काय?

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे. सॉक्रेटिस, अशी घटना प्रत्यक्षात आणण्याचे उपायही तुम्ही बरोबर सांगितले असे मला वाटते.

**सॉक्रेटिस :** अशा तऱ्हेचे राज्य व त्यास उपयोगी व्यक्ती यासंबंधी चर्चा आपले समाधान होईपर्यंत आपण केली ना? कारण अशी सक्ती कोणत्या स्वभावाची असेल हे उघडच आहे, असे मी गृहीत धरतो.

**ग्लॅकॉन :** उघडच आहे. प्रस्तुत विषयासंबंधीची आपली चर्चा आता पुरी झाली असे मला वाटते.

□ □

## प्रकरण एकोणतीस

# आदर्श राज्याचे अध:पतन

**[VIII-543-C—550-C]**

**कथासूत्र :**

[आदर्श राज्याची आवश्यकता आणि स्वरूप विशद केल्यानंतर आणि आदर्श जीवनाचे चित्र रेखाटल्यानंतर, प्लेटोने व्यक्ती व समाज यांच्या अवनतीच्या अवस्थाही विशद केल्या आहेत. पूर्ण आदर्श हा प्रत्यक्षात कधीच येत नाही आणि जरी तो आला तरी चिरंतन काळपर्यंत तो टिकू शकेल असेही नाही ही भूमिका प्लेटोने मान्य केली आहे.

आदर्श राज्याचे अध:पतन होऊन निर्माण होणारी पहिली अवस्था म्हणजे मानसत्ता होय. विवाह आणि कुटुंब याबाबतच्या नियंत्रणात सैलपणा आल्याने किंवा प्रमाद घडल्याने निर्माण होणारी पिढी ज्ञानाऐवजी प्रतिष्ठा, लोकप्रियता, मानसन्मान याबाबतच्या महत्त्वाकांक्षा महत्त्वाच्या मानू लागते. बुद्धीऐवजी अस्मितेचा प्रभाव वाढतो. शरीरसामर्थ्य, शरीरसौंदर्य, लष्करी कुशलता आणि वीरवृत्ती यांना श्रेष्ठ मूल्यांचे स्थान प्राप्त होते. म्हणजेच प्रज्ञेऐवजी प्रतिष्ठा हे परममूल्य बनते.]

* * * * *

**सॉक्रेटिस** : आपले आदर्श राज्य जर परिपूर्ण व्हावयाचे असेल तर स्त्रिया व मुले यांच्या संदर्भात सर्वांना समान मालकीहक्क असला पाहिजे आणि सर्व प्रकारचे शिक्षण त्यांना सारखे मिळाले पाहिजे. त्याचप्रमाणे युद्ध आणि शांतता या काळात स्त्री-पुरुषांचे व्यवसाय समान मानले पाहिजेत. तत्त्वज्ञान विषयात आणि युद्धामध्ये ज्यांची कार्यक्षमता सिद्ध झाली आहे, अशा व्यक्तींनाच राज्याधिकार मिळाला पाहिजे. ग्लॅकॉन, आपले सर्व प्रश्नांच्या बाबतीत एकमत झाले आहे.

**ग्लॅकॉन** : हो. यावर आपले एकमत आहे.

**सॉक्रेटिस** : राज्यकर्त्यांची सत्ता प्रस्थापित झाल्यावर आपण हेही मान्य केले आहे की, आपल्या सैनिकांना विशिष्ट प्रकारच्या वसतिस्थानात ठेवावयास हवे. त्या ठिकाणी सगळ्यांची संपत्ती समान मालकीची मानण्यात आली पाहिजे. हे वसतिस्थान कसे असावे, त्याचे स्वरूप निश्चित केल्यानंतर, तुला आठवत असेल की, सैनिकांनी कोणत्या गोष्टी वैयक्तिक मानाव्यात तेही आपण निश्चित केले होते.

**ग्लॅकॉन** : होय. ते आठवले. आज जी खाजगी मालमत्तेची पद्धती आहे तिच्यावर आपण टीका केली होती. शिकलेले सैनिक आणि राज्यकर्ते या नात्याने आपल्या संरक्षकांना मिळणारे वेतन हे त्यांच्या दर्जाला शोभणारे, अन्न-वस्त्र स्वरूपात, प्रत्येक वर्षी, सर्व नागरिकांनी त्यांना द्यावे आणि राज्यकर्त्यांनी स्वतःची व राज्याची सर्व दृष्टीने काळजी घ्यावी असे आपण ठरविले होते.

**सॉक्रेटिस** : बरोबर. पण आपण हे सर्व मुद्दे संपविले आहेत. आपल्या चर्चेमध्ये कोणत्या मुद्द्यापासून विषयांतर झाले त्याची आपण आठवण करू, म्हणजे आपल्याला काही मार्ग सापडेल.

**ग्लॅकॉन** : ते फारसे अवघड नाही. तुम्ही आता जसे बोलत आहात, तसे त्यावेळी सांगितले होते की, आपल्या आदर्श राज्याच्या स्वरूपाची चर्चा आपण पुरी केली आहे. आपल्या या राज्याला 'सुराज्य' म्हणता येईल आणि त्यात राहणाऱ्या नागरिकांना 'सज्जन' म्हणता येईल. याहून एखाद्या अधिक चांगल्या राज्याचे व चांगल्या माणसाचे तुम्ही वर्णन करू शकाल असे आम्ही मानीत होतो. जर आपण वर्णन केलेल्या आदर्श राज्याचे स्वरूप योग्य असेल तर इतर राज्यघटनांचे प्रकार चुकीचे ठरतात असे तुम्ही म्हटले होते. या इतर राज्यघटनांचे चार प्रमुख प्रकार तुम्ही सांगितले होते. त्यामधील दोष आणि त्यामधील माणसांचे दोष दाखविल्याशिवाय उत्तम व्यक्ती सर्वांत सुखी आणि वाईट व्यक्ती सर्वांत दुःखी असे आपण ठरवू शकणार नाही, असेही तुम्ही सांगितले होते. त्या चार राज्यघटनांविषयी मी विचारीत असतानाच पोलेमार्क्स आणि ॲडिमँट्स यांनी आपल्या चर्चेत व्यत्यय आणला. नंतर आताच्या मुद्द्यापर्यंत आपण चर्चा केली.

**सॉक्रेटिस** : तुझी स्मृती चांगली आहे.

**ग्लॅकॉन** : मग कसलेल्या मल्लाप्रमाणे आता तुम्ही वादविवादास तयार रहा. मी पूर्वीचाच प्रश्न तुम्हांस विचारतो. तुम्ही त्या वेळेला जे उत्तर देणार होता तेच पुन्हा द्या.

**सॉक्रेटिस** : मी माझ्या कुवतीप्रमाणे प्रयत्न करीन.

**ग्लॅकॉन** : तुम्ही त्या वेळेला ज्या चार राज्यघटना सांगितल्या त्यांचे स्वरूप ऐकण्याची फार इच्छा आहे.

**सॉक्रेटिस** : तुझ्या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. ज्या राज्यघटनांचा मी उल्लेख केला होता त्यांना काही नावे देण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे—क्रीट आणि स्पार्टा यांच्या राज्यघटनांचा गौरव बहुतेक लोक करतात ती मानसत्ता. अल्पजनसत्ता हा दुसरा प्रकार. तिचा फारसा गौरव होत नाही. कारण तिच्यात बरेच दोष आहेत. तिसरी लोकसत्ता. ती दुसरीहून वेगळी आहे. तिच्यानंतर येणारी आहे चवथी हुकूमशाही. ती इतरांपेक्षा सर्वस्वी भिन्न आहे. ती सर्वांत वाईट आहे. एक प्रकारची विकृतीच म्हणेनास! या सर्वांहून आणखी एखादी वेगळ्या आणि स्वतंत्र स्वरूपाची धटना आपण सांगू शकणार नाही. यापैकी एखाद्या प्रकारात मोडणाऱ्या किरकोळ मांडलिक राज्यपद्धती आणि विकत घेता येणारी संस्थाने आपल्याला ग्रीक आणि रानटी लोक यांमध्ये आढळतात.

**ग्लॅकॉन** : हो. त्या विचित्र प्रकारासंबंधीही आपल्याला काही ऐकू येते.

**सॉक्रेटिस** : माणसांचा स्वभाव लक्षात घेऊन जितके माणसांचे स्वभाव तितक्या राज्यघटना होतात. राज्याच्या प्रजेच्या चारित्र्यातून राज्यघटना तयार होत नाहीत, तर त्या झाडावर किंवा खडकावर उगवतात, असे आपण म्हणू शकणार नाही.

**ग्लॅकॉन** : मानवी स्वभावातूनच राज्यघटना उगम पावतात असे मला वाटते.

**सॉक्रेटिस** : याकरिताच माणसांचे स्वभाव पाच प्रकारचे आणि राज्यघटना पाच प्रकारच्या असतात, असे म्हटले पाहिजे.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : आपण वर्णन केलेले आदर्श राज्य ही उत्तम राज्यपद्धती होय. सज्जन स्वभावातून ती निर्माण होते. तिचे वर्णन आपण आतापर्यंत केले आहे.

**ग्लॅकॉन** : हो.

**सॉक्रेटिस** : स्पार्टन राज्यघटनेशी जिचे स्वरूप जुळणारे आहे अशा युद्धप्रिय, महत्त्वाकांक्षी आणि कमी प्रतीच्या नागरिकांनी तयार होणाऱ्या राज्यघटनेच्या वर्णनाने आपण सुरुवात करू. त्यानंतर अल्पजनसत्ता, लोकशाही आणि हुकूमशाही यांमधील मानवी स्वभावाचे वर्णन करू. त्यामुळे अत्यंत अन्यायी व्यक्ती कशी असते ते आपणांस कळेल. आपण त्याची अत्यंत न्यायी व्यक्तीशी तुलना करू शकू. त्यानुसार शुद्ध न्याय आणि शुद्ध अन्याय यांपासून सुख व दुःख कसे निर्माण होते ते पाहू. न्याय व अन्याय यांचे गुण, अवगुण पाहू. त्यामुळे एकतर थ्रॅसिमॅक्सच्या भूमिकेप्रमाणे आपल्याला अन्यायाचा अवलंब करता येईल किंवा आपल्या विवेचनाप्रमाणे न्यायाचा आश्रय घेता येईल.

**ग्लॅकॉन** : आपण अशीच चर्चा केली पाहिजे.

**सॉक्रेटिस** : प्रथम राज्यपद्धतीचे निरीक्षण व नंतर व्यक्तीचे वर्णन असा क्रम जर आपण घेतला तर आपले विवेचन अधिक स्पष्ट होईल. सध्या आपण महत्त्वाकांक्षेवर आधारलेल्या राज्यघटनेची समीक्षा करू. तिला दुसरे कुठले नाव प्रचारात आहे हे मला माहीत नाही. म्हणून तिला आपण सध्या मानसत्ता (Timocracy) म्हणू. महत्त्वाकांक्षी स्वभावाची समीक्षा केल्यावर अल्पजनसत्ता (Oligarchy) आणि त्यातील व्यक्ती यांची आपण समीक्षा करू. त्यानंतर लोकसत्ताक पद्धती आणि स्वभाव यांचा आपण विचार करू. अखेरीस हुकूमशाही आणि त्यामधील वर्तन यांची समीक्षा करू. एवढ्या समीक्षणानंतर आपल्याला योग्य तो निर्णय घेता येईल.

**ग्लॅकॉन** : अशी समीक्षा करून निर्णय घेण्याची पद्धती योग्य दिसते.

**सॉक्रेटिस :** मानसत्ता कशी निर्माण होते, त्याचे आपण वर्णन करू. राज्याधिकाऱ्यांत संघर्ष निर्माण झाल्यामुळे राज्यघटनेत फरक होतो. जोपर्यंत प्रशासक मंडळाचा कारभार एकमताचा असतो तोपर्यंत ते लहान असले तरी त्याचा पाडाव शक्य नसतो.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मग ग्लॅकॉन, आपल्या आदर्श राज्यास कसा धक्का पोहोचेल ? आणि राज्यकर्ते व सैनिक यांत कशी फाटाफूट होईल ? "पहिल्याप्रथम भेद कसे निर्माण झाले ?" असा प्रश्न होमरने म्युझिअस देवतांना विचारला होता. तसे आपण विचारू या का ? म्युझिअस देवतांनी वरून गंभीरपणे, शोकपूर्ण स्वरांत आपल्याला लहान मुले मानून, पुढील उत्तर दिले होते. तसे आपण मानावे का ?

**ग्लॅकॉन :** त्या देवतांनी काय उत्तर दिले ?

**सॉक्रेटिस :** "राज्याला धक्का पोहोचणे कठीण आहे. परंतु जन्मलेल्या प्रत्येक वस्तूला नाश असतोच. म्हणून तुमची राज्यघटना शाश्वत टिकणारी नाही. कालांतराने ती नष्ट होणारच. ती पुढीलप्रमाणे नाहीशी होईल :–

वनस्पती आणि प्राणी यांच्या शारीरिक आणि मानसिक फलनिष्पत्तीमध्ये आणि वंध्यत्वामध्ये फरक होणार. वस्तूंच्या जीवनमानानुसार या फरकांचे स्वरूप वर्तुळाकार असते. तुमच्या आदर्श राज्यातील फलनिष्पत्ती आणि वंध्यत्व याबद्दल असे म्हणता येईल की, राज्यकर्ते कितीही शिकलेले, शहाणे आणि सूक्ष्म नियम पाळणारे असले तरी तेही अयोग्यकाळी बालकांना जन्म देतील. दिव्य जातींचे चक्र पूर्ण अंकात्मक असते. परंतु मानवी वंशचक्र हे भूमितीच्या अंकाप्रमाणे चालत असल्यामुळे त्यानुसार जन्मकालीन चांगले, वाईट गुण निश्चित होतात. जेव्हा तुमचे राज्यकर्ते ही गोष्ट माहीत नसल्याने अयोग्यकाळी विवाहसंबंध जुळवतील तेव्हा त्यामधून निर्माण होणारी मुले सुदैवी आणि सद्‌गुणी असणार नाहीत. पूर्वीच्या प्रशासकांनी या मुलांपैकी जी उत्तम असतील त्यांना जरी अधिकारपदे दिली तरी ती त्यांस पात्र ठरणार नाहीत. वडिलांचे सत्तास्थान मिळाल्यावर राज्यकर्त्यांची कर्तव्ये योग्य तऱ्हेने न करता, ते प्रथम देवतांचा अपमान करतील. नंतर सांस्कृतिक आणि शारीरिक शिक्षण यांचा तिरस्कार करतील. त्यामुळे हे नवे तरुण अधिक कुशिक्षित बनतील. पुढच्या पिढीतील अधिकारीसुद्धा हिसियडने सांगितल्याप्रमाणे सोने, रुपे, तांबे, लोखंड यांतील भेद न समजणारे असतील. त्यांना नेमल्यामुळे, लोखड-चांदी, सोने-तांबे यांचे मिश्रण होऊन श्रेष्ठ-कनिष्ठ भाव आणि अव्यवस्था निर्माण होईल. या दोषांचे बीजारोपण झाले की, शत्रुत्व आणि युद्धे होणारच ! म्हणून आपल्याला निश्चितपणे असे म्हणता येईल की, या पिढीची वाढच फाटाफूट करणारी असेल."

**ग्लॅकॉन :** म्युझिअस देवतांनी दिलेले उत्तर योग्य आहे. हे आम्ही कबूल करतो.

**सॉक्रेटिस :** म्युझिअस देवता अयोग्य कसे बोलतील ?

**ग्लॅकॉन** : त्या आणखी काय म्हणतात ?

**सॉक्रेटिस** : " भांडणे सुरू झाली म्हणजे दोन्ही पक्ष लवकरच विभक्त होतील. लोहवर्ण व ताम्रवर्ण जाती पैसे मिळविण्याच्या मागे लागून सोने, चांदी, जमिनी व घरे यांचा संग्रह करतील. तर इतर दोन जाती सोने व रुपे—श्रीमंत असल्यामुळे सद्‌गुण व जुनी व्यवस्था ह्यांच्याकडे मन वळवतील. परंतु परस्परांमधील भांडणे विकोपाला जाऊन दोन्ही पक्षांना तह करावा लागेल. जमिनी व घरे सर्वांनी सारख्या प्रमाणात वाटून घेऊन, पूर्वी स्वतंत्र असलेले त्यांचे स्नेही व अन्नदाते, ह्यांना कनिष्ठ जात म्हणून गुलाम व नोकर करण्यात यावे आणि दोन्ही पक्षांनी युद्ध थांबवून आत्मसंरक्षण करावे, असे या तहाचे स्वरूप असेल."

**ग्लॅकॉन** : मानसत्तेचा उगम कसा होतो, ते तुम्ही बरोबर सांगितलेत.

**सॉक्रेटिस** : उत्तम राज्यपद्धती व अल्पजनसत्ता या दोन टोकांतील मध्यबिंदू म्हणून ही घटना मान्य होईल ना ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : असा फरक झाल्यानंतर ही नवीन राज्यपद्धती कशा तऱ्हेने वागेल ? पूर्वीची घटना व अल्पजनसत्तेची घटना ह्यांचा मध्यबिंदू, असे या घटनेचे स्वरूप असल्यामुळे दोन्ही घटनांचे काही प्रमाणात अनुकरण करून, शिवाय तिचे स्वतःचे खास असे वैशिष्टच तिच्यात असेल ना ?

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : सैनिकांनी अधिकारीवर्गाला द्यावयाचा मान, हस्तकौशल्याची कामे व इतर अर्थोत्पादक धंदे ह्यांपासून सैनिकांची अलिप्तता, सार्वजनिक जेवणाच्या सोयी, व्यायाम व लष्करी शिक्षणाबद्दल आवड या बाबतीत पूर्वीच्याच राज्यघटनेचे अनुकरण ही घटना करणार नाही काय ?

**ग्लॅकॉन** : जरूर करील.

**सॉक्रेटिस** : अशा राज्यसंस्थेत असणारे विद्वान लोक, साध्या व खऱ्या स्वभावाचे नसून मिश्र स्वभावाचे असल्यामुळे त्यांना अधिकाराच्या जागा देण्याबद्दल साशंक असणे, शांततेपेक्षा युद्धाची ज्यांना आवड आहे, अशा तेजस्वी पण संकुचित लोकांना जवळ करणे, युद्धाकरिता ज्या कला व युक्त्या आवश्यक असतात त्यांना महत्त्व देणे व सदोदित भांडणे चालू ठेवणे अशा पुष्कळ बाबतीत ही घटना आपले वेगळे वैशिष्टच दाखवील ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : अल्पप्रजासत्ताक राज्यातील लोकांप्रमाणे हे लोक संपत्तीचे लोभी असतील आणि सोने व चांदी ह्याविषयी उत्कट पण गुप्त प्रेम बाळगतील. त्यांच्याजवळ घरे व खाजगी तिजोऱ्या असल्यामुळे त्यांना आपली संपत्ती गुप्तपणे ठेवता येईल व भिंतींची घरे असल्यामुळे, गुप्त चोरकप्प्यांसारखा त्याचा उपयोग करून, आपल्या बायकांकरिता अथवा आवडत्या व्यक्तींकरिता आपल्या संपत्तीचा सढळ हाताने उपयोग करता येईल.

**ग्लॅकॉन** : हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस** : त्यांच्या लोभी स्वभावामुळे ते इतरांच्या पैशाच्या बाबतीत उधळेपणा करावयास लावीत असले, तरी स्वतःच्या पैशाच्या बाबतीत मात्र ते फार काटकसर करतील. पैसा हा त्यांच्या दृष्टीने अतिशय पूज्य असल्यामुळे, आपल्याजवळचा पैसा लपवून ठेवून, पैशापासून मिळणारी सुखे ते गुप्त रीतीने उपभोगतील आणि लहान मुले ज्याप्रमाणे आपल्या वडिलांना टाळतात, त्याप्रमाणे ते कायद्याला टाळतील. कारण तत्त्वज्ञाची मैत्रीण जी म्यूज देवता, तिचा अपमान करून, संगीतापेक्षा व्यायामाला अधिक महत्त्व दिल्यामुळे, त्यांचे शिक्षण स्वेच्छेने न होता बळजबरीने झालेले असते.

**ग्लॅकॉन** : चांगले व वाईट यांचे मिश्रण असलेल्या राज्यघटनेचेच तुम्ही वर्णन करीत आहात.

**सॉक्रेटिस** : होय. ती मिश्रच आहे. परंतु तेजस्वी तत्त्वाचा त्यात अधिक प्रभाव असल्यामुळे, तिच्यात प्रामुख्याने एक गोष्ट दिसून येते ती म्हणजे पक्षाभिमान व कीर्तीचे प्रेम.

**ग्लॅकॉन** : ही गोष्ट नक्कीच दिसून येते.

**सॉक्रेटिस** : अशा प्रकारे वरील घटनेचा उगम होतो व तिचे स्वरूपही तशाच प्रकारचे असते. सामान्य रूपरेषा समजावून घेण्यात आपण समाधान मानले तर विशेष विस्ताराची गरज भासणार नाही. एवढ्या रूपरेषेवरूनही आपण अत्यंत न्यायी व अत्यंत अन्यायी स्वभावातील फरक दाखवू शकू. कारण कोणतीही राज्यघटना व कोणताही स्वभाव ह्यांचे सविस्तर वर्णन निराशाजनक असते.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : या परिस्थितीला योग्य अशी कोणती व्यक्ती आहे, तिचा उदय आणि स्वभाववैशिष्टचे सांगशील का ?

**ॲडिमँट्स** : हा मित्र ग्लॅकॉन, पक्षपाती माणसाचा प्रतिनिधी म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : पक्षपाती व्यक्तीशी कदाचित स्वभाव जुळत असेल, पण मी जे सांगतो ते लक्षात घेतले तर ग्लॅकॉनचा स्वभाव तसा नाही हे दिसून येईल.

**ॲडिमँट्स** : तुमची भूमिका काय आहे ?

**सॉक्रेटिस** : माझ्या मते ही व्यक्ती ग्लॅकॉनपेक्षा अधिक स्वतंत्र विचाराची आणि साहित्याची कमी शौकीन असली पाहिजे. ती अभ्यासू, श्रवणप्रिय असली तरी वक्ता असणार नाही. सुशिक्षिताप्रमाणे जरी तिने गुलामांचा तिरस्कार केला नाही तरी गुलामाशी कठोरपणे आणि स्वतंत्र व्यक्तीशी नम्रपणे वागेल. अधिकाऱ्यासमोर ती आज्ञाधारक असेल. व्यायाम आणि मैदानी खेळ यांची तिला आवड असल्याने युद्धाला साजेसे बाहुबल, इतर पराक्रमांचे सुयश संपादन करून, ती सत्ता आणि कीर्ती संपादन करील. पण वक्तृत्व किंवा अन्य कला संपादन करून सन्मान आणि सत्ता प्राप्त करणे तिला शक्य होणार नाही.

मुलगा मोठा झाल्यावर नोकर त्याला उत्तेजन देतात आणि त्या सर्वांचा सूड घेण्यास सांगतात; अधिक शौर्य दाखविण्यास सांगतात. मुलगा बाहेर जातो तेव्हा अशी अनेक उदाहरणे पाहतो, ऐकतो. शांत वृत्तीचे, कोणत्याही व्यवहारात न पडणारे लोक शहरात बावळट मानले जातात, त्यांना कोणी विचारीत्त नाही. उलट कारणाशिवाय लुडबुड करणाऱ्या लोकांची प्रशंसा होते. हे सर्व ऐकल्यावर, पाहिल्यावर, पित्याचे संभाषण ऐकून आणि त्याच्या व्यवसायाची इतरांबरोबर बारकाईने तुलना करून, मुलगा दोन दिशांनी ओढला जातो. पिता त्याच्या आत्म्यातील विवेकाला वाढवीत असतो तर इतर लोक त्याच्यातील वासना आणि तेजस्विता वाढवीत असतात. त्याचा स्वभाव वाईट नसतो पण वाईट लोकांत मिसळल्याने दोन भूमिकांचे संयुक्त परिणाम त्याच्यावर होतात. त्यामुळे तो मध्यम स्थितीकडे ओढला जातो. तापट आणि भांडखोर अशा मध्यम तत्त्वाच्या आहारी त्याचे मन जाते. त्यामुळेच बाणेदार आणि महत्त्वाकांक्षी असा त्याचा स्वभाव बनतो.

**ॲडिमँट्स** : हे त्याच्या स्वभावाचे विश्लेषण तुम्ही अगदी योग्य केले आहे.

**सॉक्रेटिस** : अशा रीतीने राज्यघटनेचा दुसरा प्रकार आणि तिला शोभणारा मानवी स्वभाव यांचे आपण वर्णन केले आहे.

**ॲडिमँट्स** : हो.

□ □

## प्रकरण तीस

# अल्पजनसत्ता : स्वरूप आणि मूल्यमापन

**[VIII-550-C—555-B]**

**कथासूत्र :**

[एकदा ज्ञान आणि चारित्र्य यांची मौलिकता नष्ट झाली की क्रमशः व्यक्ती आणि समाज अर्थसंपादनाचे दास बनतात. जो धनवान तो श्रेष्ठ असे मानले जाऊ लागते. व्यक्तीच्या वासना प्रबल बनतात. अर्थसत्तेच्या हाती राजकीय सत्ता आणि नेतृत्व केंद्रित होते. खाजगी मालमत्तेचा हक्क मानला गेल्याने शोषण आणि संघर्ष यांची बीजे रुजतात. ज्ञान आणि धैर्य याऐवजी संचयप्रवृत्ती हा सद्‌गुण बनतो. म्हणजेच प्रज्ञा आणि प्रतिष्ठा याऐवजी पैसा हे परममूल्य बनते.]

* * * * *

**सॉक्रेटिस** : एश्चिलसने सांगितल्याप्रमाणे यापुढच्या राज्यघटनेच्या प्रकारानुसार असलेल्या मानवी स्वभावाचे वर्णन आपण करू या की आपण ठरविल्याप्रमाणे प्रथम राज्याचे वर्णन करू या ?

**ॲडिमँट्स** : काही हरकत नाही.

**सॉक्रेटिस** : यानंतर आपल्याला ज्या राज्यघटनेचा विचार करावयाचा आहे ती अल्पजनसत्ता होय.

**ॲडिमँट्स** : अल्पजनसत्ता कोणत्या प्रकारच्या घटनेला म्हणतात ?

**सॉक्रेटिस** : या राज्यघटनेचा आधार सांपत्तिक संबंध असतो. तिच्यात श्रीमंत व्यक्ती राज्यकर्त्या असतात. गरिबांना काहीच स्थान नसते.

**ॲडिमँट्स** : समजले.

**सॉक्रेटिस** : मानसत्तेतून अल्पजनसत्तेकडे घडणाऱ्या संक्रमणाच्या पहिल्या अवस्था आपण सांगावयास नकोत का ?

**ॲडिमँट्स** : हो. त्या सांगितल्या पाहिजेत.

**सॉक्रेटिस** : आंधळ्यालाही हे संक्रमण कसे होते ते दिसेल.

**ॲडिमँट्स** : ते कसे ?

**सॉक्रेटिस :** राज्याच्या खजिन्यात सोन्याचा प्रवेश झाला की आतापर्यंत वर्णन केलेली राज्यपद्धती नष्ट होते. कारण संपत्तीचा पहिला परिणाम म्हणजे श्रीमंत लोक पैसा खर्च करण्याचे अनेक प्रकार शोधून काढतात. कायद्याचा दुरुपयोग करतात. आपण आणि आपल्या बायका यांना कायद्याचे उल्लंघन करावयास लावतात.

**अॅडिमँट्स :** तसे त्यांनी केले नाही तरच आश्चर्य!

**सॉक्रेटिस :** ते परस्परांकडे मत्सराने पाहतात. त्यांच्यात स्पर्धा सुरू होते. ते ज्या मंडळात असतात त्यावरही या स्पर्धेचा परिणाम होतो.

**अॅडिमँट्स :** साहजिकच आहे.

**सॉक्रेटिस :** संपत्ती मिळविण्याचे ते अनेक मार्ग शोधतात. त्या प्रमाणात त्यांचा पैशाविषयीचा आदर वाढतो व सद्‌गुणाविषयी आदर कमी होतो. सद्‌गुण आणि संपत्ती यांना तराजूच्या दोन पारड्यांत घालून त्यांचे वजन केले तर एक पारडे वर जाईल आणि एक खाली जाईल, खरे ना?

**अॅडिमँट्स :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** म्हणून संपत्ती आणि श्रीमंत लोक यांना ज्या राज्यात मान्यता असते तेथे सद्‌गुण आणि सद्‌गुणी लोक यांचा अपमान होतो.

**अॅडिमँट्स :** उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** ज्याचा सन्मान होतो त्याचे आचरण होते. ज्याचा अपमान होतो त्याची उपेक्षा होते.

**अॅडिमँट्स :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** म्हणून लोक समाधानी आणि स्वाभिमानी होण्यापेक्षा, फायदा उकळणारे आणि लोभी होतात. श्रीमंतांची स्तुती, गुणगौरव करून त्यांना अधिकारपदे देतात. गरिबांचा तिरस्कार करतात.

**अॅडिमँट्स :** हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** शेवटी अल्पजनसत्ता राज्यघटनेचे मुख्य लक्षण ठरविणारा कायदा ते करतात. त्यानुसार अमुक इतका पैसा ज्याच्याकडे नाही त्याला राज्यकारभारात काहीच हक्क देत नाहीत. जर एखादी गोष्ट धाकदपटशाने त्यांना करता आली नाही तर शस्त्रांच्या मदतीने ते करतात. माझे मत बरोबर आहे ना?

**अॅडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** एका शब्दात सांगावयाचे तर हीच अर्थसत्ताक राज्यपद्धतीची प्रस्थापना होय.

**अॅडिमँट्स :** खरे आहे. पण तिचा स्वभाव काय? तिचा दोष काय?

**सॉक्रेटिस** : या घटनेचा पहिला दोष तिच्या मूलभूत कायद्याच्या स्वरूपातच आहे. चांगल्या नावाड्यांना तो गरीब आहे म्हणून अधिकाराची जागा दिली नाही तर परिणाम काय घडेल ?

**ॲडिमँट्स** : जलप्रवास करणे फारच अवघड होईल.

**सॉक्रेटिस** : हेच तत्त्व इतर कोणत्याही धंद्याच्या व्यवस्थेला लागू पडेल ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : राज्य कारभाराचा यात समावेश करावा की, तो वगळून करावा ?

**ॲडिमँट्स** : राज्यकारभाराचा मी शक्यतो समावेश करीन. कारण राज्यकारभार करणे, ही गोष्ट अतिशय महत्त्वाची व अवघड आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणजेच अर्थसत्ताक राज्यपद्धतीच्या दोषांपैकी हा एक प्रमुख दोष असून, त्याचे स्वरूप भयंकर आहे.

**ॲडिमँट्स** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : यापुढील दोष तर पहिल्याहूनही अधिक भयंकर आहे.

**ॲडिमँट्स** : तो कोणता ?

**सॉक्रेटिस** : अशा शहरातील एकजूट निश्चितपणे कमी होईल. एकाच शहराची दोन शहरे होऊन, एक श्रीमंतांचे व दुसरे गरिबांचे होईल. एकाच ठिकाणी राहूनही ही शहरे एकमेकांच्या विरुद्ध कट करीत राहतील. हा दोष उत्पन्न होणार नाही का ?

**ॲडिमँट्स** : होय. हा दोष पहिल्याइतकाच भयंकर आहे.

**सॉक्रेटिस** : लोकांच्या अंगात युद्ध करण्याची ताकद नसणे हे केव्हाही चांगले नाही. कारण वस्तुस्थिती अशी असते की, अधिकारी लोक जेव्हा युद्धासाठी लोकांच्या हाती शस्त्रास्त्रे देतात, तेव्हा शत्रूपेक्षाही त्यांना आपल्या लोकांचे भय अधिक वाटते. आणि लोकांचे सहाय्य जर घेतले नाही तर, स्वतःच्या अल्पसंख्येमुळे ते युद्ध करण्यास असमर्थ ठरतात. पैशाच्या लोभामुळे युद्धाचे करही द्यावयास त्यांची तयारी नसते, हे निराळेच.

**ॲडिमँट्स** : तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : काही वेळापूर्वी, जे तत्त्व आपण सांगितले, त्याच्याकडे आपण पुन्हा वळू. अशा राज्यपद्धतीमुळे, एका मनुष्याला, एकाच वेळी शेती, व्यापार, युद्ध इ. निरनिराळी कामे करावी लागतात. हे योग्य आहे, असे तुम्हास वाटते का ?

**ॲडिमँट्स** : नाही. मुळीच नाही.

**सॉक्रेटिस** : या पद्धतीमुळे इतर दोषांपेक्षाही अधिक वाईट व इतर पद्धतीत दिसून न येणारा असा पुढील दोष उत्पन्न होतो.

**ॲडिमँट्स** : तो कोणता ?

**सॉक्रेटिस** : एका माणसाला आपली सर्व मालमत्ता विकण्याची परवानगी देणे व दुसऱ्याम ती विकत घेऊ देणे, हाच तो दोष होय. या दोषामुळे मालमत्तेच्या पूर्वीच्या मालकांना व्यापारी, कारागीर, घोडेस्वार वा पायदल सैनिक अशा कोणत्याही नात्याने, शहरात रहाता येत नाही. त्याला संपूर्ण निराधार, भिकारी बनवले जाते.

**ॲडिमँट्स** : आतापर्यंत सांगितलेल्या राज्यपद्धतीत अशा प्रकारचा दोष नव्हता.

**सॉक्रेटिस** : हा दोष अल्पसत्ताक राज्यपद्धती अस्तित्वात असेल, तर टाळता येत नाही. एरवी काही लोकांनी गर्भश्रीमंत असणे व काहींनी अगदी भिकारी असणे, अशी स्थिती उत्पन्न होत नाही.

**ॲडिमँट्स** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : आणखीही एक मुद्दा विचारात घ्यावयास हवा. असा मनुष्य आपल्या श्रीमंतीमुळे, खूप पैसे खर्च करीत असताना, उत्तम नागरिकत्त्वाच्या दृष्टीने राज्याला थोडातरी उपयोगी पडतो का ? याउलट पूर्वी तो राज्यकारभार करीत असूनही अधिकारीही नव्हता व नोकरही नव्हता. राज्याचे उत्पन्न उधळणारा एक प्राणी होता.

**ॲडिमँट्स** : तुमचे दुसरे वर्णन योग्य आहे. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तो केवळ नावाला अधिकारी होता. पण प्रत्यक्षात उधळपट्टी करणारा प्राणीच होता.

**सॉक्रेटिस** : ज्याप्रमाणे भुंगा मधमाशांच्या पोळचात वाढून त्यांनाच शेवटी त्रास देतो, त्याप्रमाणे असा मनुष्य राज्यामध्ये भुंग्यासारखा वाढून शेवटी राज्यालाच त्रास देतो, असे म्हणणे बरोबर होईल ना ?

**ॲडिमँट्स** : सॉक्रेटिस, असे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : ॲडिमँट्स, देवाने उडणाऱ्या भुंग्यांना दंश करण्याची शक्ती जरी दिलेली नाही, तरी त्याने चालणाऱ्या भुंग्यांपैकी काहींना दंश करण्याची भयंकर शक्ती दिलेली आहे. ज्यांना दंश करता येत नाही असे लोक म्हातारपणी भिकारी होतात. पण जे दंश करणारे आहेत, त्यांच्यामधूनच गुन्हेगार निर्माण होत नाहीत का ?

**ॲडिमँट्स** : हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस** : जेव्हा शहरात, ठिकठिकाणी भिकारी लोक आढळतात, त्यावेळी असे समजण्यास हरकत नाही की, त्याच शहरात चोर, खिसेकापू, दरोडेखोर व अशाच तऱ्हेचे इतर गुन्हे करणारे लोक रहात असतात.

**ॲडिमँट्स** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : अर्थसत्ताक पद्धतीच्या राज्यात भिकारी लोक दिसतात ना ?

**ॲडिमँट्स** : हो, दिसतात. अधिकारी लोकांखेरीज बहुतेक सर्व लोक भिकारीच असतात.

**सॉक्रेटिस** : यावरून आपणांस असे निश्चितपणे म्हणता येईल ना की, अशा राज्यात दंश करणारे पुष्कळ वाईट लोक असून त्यांना आपल्या ताब्यात ठेवण्याची दक्षता अधिकाऱ्यांना बाळगावी लागते.

**ॲडिमँट्स** : हो. असे निश्चितपणे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : शिक्षणाचा अभाव, कुशिक्षण व कुराज्यपद्धती यांमुळेच अशी स्थिती उत्पन्न होते ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : अर्थसत्ताक राज्यपद्धतीने जे राज्य चालविले जाते, त्याचा स्वभाव अशा प्रकारचा असेल.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : अर्थसत्ताक राज्यपद्धतीने जे राज्य चालविले जाते त्याचे वर्णन आपण आता थांबवू. आता आपण या पद्धतीशी जुळणारा ज्याचा स्वभाव आहे, अशा मानवी स्वभावाचा उगम व विकास कसा होतो ते आपण पाहू.

**ॲडिमँट्स** : काही हरकत नाही.

**सॉक्रेटिस** : मानी माणसाचे आपण जे वर्णन केले त्याचे अर्थसत्ताक स्वभावात जे परिवर्तन होते ते पुढीलप्रकारे किंवा तशा पद्धतीने होत नाही काय ?

**ॲडिमँट्स** : ते कसे ?

**सॉक्रेटिस** : महत्त्वाकांक्षी माणसाला मुलगा असतो. आपल्या पित्याचे अनुकरण करून तो त्याची बरोबरी करण्याचा प्रयत्न करतो. जसे जहाज खडकावर आपटते तसा आपला पिता राज्यकारभारात आदळून संपत्तीसह फेकून दिला गेला आहे असे मुलाला अचानक आढळते. सेनापतीची जबाबदारी किंवा त्यासारखे महत्त्वाचे काम वडिलांनी केल्यानंतर त्यांच्यावर खटला भरला जाऊन, त्यांची चौकशी होते. त्यांत खोटया साक्षीदारांचे जबाब घेतले जातात. वडिलांना दोषी ठरविण्यात येऊन ठार मारण्यात येते किंवा हद्दपार करण्यात येते वा त्यांचे सर्व हक्क काढून घेण्यात येतात.

**ॲडिमँट्स** : होय. हे सर्व घडणे शक्य आहे.

**सॉक्रेटिस** : हे सर्व घडल्यावर आणि संपत्ती गमावल्यावर मुलगा घाबरतो. महत्त्वाकांक्षी आणि तेजस्विता यांना तिलांजली देतो. दारिद्र्यामुळे तो नमतो. पैसे मिळविण्याचे मार्ग शोधतो. क्षुल्लक काटकसर करून आणि परिश्रम करून तो पैसा साठवितो. अशा व्यक्तीवर क्षुधा आणि लोभ यांचे वर्चस्व असते. पौर्वात्य देशातील राजाप्रमाणे तो या तत्त्वांनाच हिऱ्यामाणकांनी शृंगारतो, आखूड तलवार त्यांना बांधतो. खरं ना ?

**ॲडिमँट्स** : हो.

**सॉक्रेटिस** : पण विवेक आणि तेजस्विता यांना तो या तत्त्वांच्या डाव्या-उजव्या बाजूला जमिनीवर बसवितो. त्यांना प्रजा आणि गुलाम समजतो. बुद्धीचा उपयोग संपत्ती वाढविण्यापलीकडे अन्य कोणत्याही गोष्टीचे संशोधन करण्यास तो करीत नाही. संपत्ती मिळविणे आणि त्यासाठी जे उपयुक्त असेल ते साधणे यापलीकडे इतर कोणत्याही गोष्टीबद्दल महत्त्वाकांक्षा तो ठेवीत नाही.

**ॲडिमँट्स** : महत्त्वाकांक्षी माणसाचे असे जलद आणि पूर्णपणे लोभी माणसात परिवर्तन होणे शक्य आहे.

**सॉक्रेटिस** : मग अशी व्यक्ती अर्थसत्ताक प्रवृत्तीची नाही का ?

**ॲडिमँट्स** : ज्या स्वभावापासून हे परिवर्तन होईल, तो स्वभाव अर्थसत्ताक पद्धतीपूर्वीच्या राज्यपद्धतीसारखा आहे असे दिसते.

**सॉक्रेटिस** : अर्थसत्ताक राज्यपद्धतीशी या स्वभावाचा असणारा सारखेपणा आपण पाहू.

**ॲडिमँट्स** : ठीक.

**सॉक्रेटिस** : संपत्तीला सर्वश्रेष्ठ स्थान देणे या संदर्भात अल्पजनसत्तेचे वैशिष्टच आहे.

**ॲडिमँट्स** : निश्चितच आहे.

**सॉक्रेटिस** : कृपणता, कष्ट करणे, फक्त अत्यावश्यक गरजा भागविणे, अन्य बाबतीत खर्च न करणे, इतर इच्छांना निरर्थक समजणे, त्यांना ताब्यात ठेवणे या संदर्भातही या स्वभावाचे वैशिष्टच आहे.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणजेच वेगळ्या शब्दांत कंजुषपणे वागून प्रत्येक गोष्टीतून फायदा घ्यावयाचा, पैसा साठवावयाचा अशी त्याची वृत्ती असते. अनेकजण या स्वभावाची स्तुती करतात. हे या स्वभावाचे वर्णन या राज्यपद्धतीला जुळते असे समजण्यात चूक होत नाही ना ?

**ॲडिमँट्स** : माझ्या कल्पनेप्रमाणे ही भूमिका योग्य आहे. अर्थसत्ताक पद्धती आणि आपण वर्णन करीत असलेली व्यक्ती पैशालाच महत्त्व देतात हे खरे.

**सॉक्रेटिस** : माझ्या कल्पनेप्रमाणे शिक्षणाकरिता या माणसाने कष्ट घेतलेले नसतात हे त्याचे कारण होय.

**ॲडिमँट्स** : मलाही असेच वाटते. अन्यथा गायक, नर्तक यांच्या मंडळांचा अडाणी, आंधळे पुढारी नियुक्त करून, त्याने इतका सन्मान केला नसता.

**सॉक्रेटिस** : खरे आहे. शिक्षण नसल्याने, भ्रमरवृत्तीच्या, क्षुद्र गुन्हेगारीस प्रवृत्त करणाऱ्या, वासना या माणसात वाढतात. दूरदर्शी विचारामुळेच तो त्यावर नियंत्रण ठेवतो असे आपण म्हणू शकू ना ?

**ॲडिमँट्स** : निश्चितपणे तसे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : अशा माणसांची कृष्णकृत्ये केव्हा उघड होतात तुम्हांस माहीत आहे ?

**ॲडिमँट्स** : कधी ?

**सॉक्रेटिस** : जेव्हा ते मुलांचे पालक असतात तेव्हा किंवा अन्यायाने वागण्याचे पूर्ण स्वातंत्र्य त्यांना मिळते तेव्हा.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : यावरून असे दिसते की, इतर कामात बाहयतः न्याय्य वर्तन करून ते नाव मिळवितात. त्यावेळी स्वतःच्या वाईट वासना दडपून टाकतात. अर्थात हे वासनांचे नियंत्रण बुद्धीच्या मदतीने होत नाही, किंवा वासना पूर्ण करणे बरोबर नव्हे असेही त्यांना वाटत नाही. तर परिस्थितीमुळे, हाती आहे तेही जाईल या भीतीमुळे तो वासना दाबून टाकतो.

**ॲडिमँट्स** : होय. हे उघड आहे.

**सॉक्रेटिस** : या लोकांना जेव्हा आपला पैसा खर्च करावयाचा नसतो तेव्हा त्यांच्या वासना भ्रमरासारख्या दिसतात.

**ॲडिमँट्स** : यात शंका नाही.

**सॉक्रेटिस** : अशी व्यक्ती कधीही शांतचित्त नसते. तिचे मन एकाग्र नसते, द्विधा असते. त्याच्या उच्च वृत्ती, नीच वासना दाबून ठेवतात.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच मला वाटते की, इतरांपेक्षा ही व्यक्ती बाहेरून प्रतिष्ठित दिसते. एकात्मता आणि समन्वय यांनी तयार होणारा आत्म्याचा सद्गुण तिच्याजवळ नसतो.

**ॲडिमँट्स** : मलाही तसे वाटते.

**सॉक्रेटिस** : जर बक्षीस मिळणार असेल, सन्मान देणारे कौशल्य दाखवावयाचे असेल तर ही कंजूष व्यक्ती हीन स्पर्धेला तयार होते यात शंका नाही. या सामन्यात, चढाओढीत आपल्या खर्चिक वासना चेतविल्या जातील अशी तिला भीती असते. जसे काही लोकांना युद्धावर पाठविण्याची अर्थसत्ताक पद्धतीत प्रथा असते, त्याचप्रमाणे ती लोभी व्यक्ती आपल्या पैशाची बचत आणि आपला पराभव करून घेते.

**ॲडिमँट्स** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : अर्थसत्ताक अशा अल्पजन पद्धतीचे राज्य आणि कंजूष स्वभावाची व्यक्ती यांच्यात जे साम्य दिसते त्याबद्दल तुमची खात्री पटली का ?

**ॲडिमँट्स** : आमची पूर्ण खात्री पटली.

□ □

## प्रकरण एकतीस

# लोकशाही : स्वरूप आणि मूल्यमापन

**[VIII-555-B—562-A]**

**कथासूत्र :**

[प्लेटोच्या मते, जेव्हा लोकप्रियता, सत्ता आणि संपत्ती यांविषयी व्यक्तींच्या अपेक्षा अनिर्बंध होतात, तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याची अतिरेकी मागणी निर्माण होते. व्यक्तिगौरवाची ही अवस्था म्हणजेच लोकशाही होय. काही थोड्या व्यक्तींच्या हाती सत्ता आणि संपत्ती केंद्रित होण्याऐवजी ती सर्वांत समान वाटली जावी ही लोकशाहीमागील महत्त्वाची मागणी असते.

प्राचीन अथेनिअन शहर राज्यातील लोकशाही शासनाचा अनुभव लक्षात घेऊन प्लेटोने त्यावर कडक टीका केली आहे. त्याच्या मते, व्यक्तींच्या जन्मसिद्धक्षमता आणि पात्रता भिन्न असतात. साहजिकच, त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात येणारी जबाबदारी, त्यानुसार ठरणारा दर्जा व महत्त्व भिन्न असले पाहिजे. याउलट लोकशाहीत प्रशासनासारख्या सर्वश्रेष्ठ कार्यात सर्वांना सारखे अधिकार दिले जातात. प्लेटोच्या मते हे सामाजिक न्याय-तत्त्वाच्या विरोधी आहे.

याशिवाय आवश्यक, उपयुक्त आणि श्रेयस्कर अपेक्षा कोणत्या याविषयीचा विवेक लोकशाही व्यक्तीमध्ये नसतो. त्यामुळे वासनात्मक सुखासीन जीवन हाच लोकशाही समाजजीवनाचा गाभा बनतो.

आज सर्वच सामाजिक जीवनाचा संदर्भ बदललेला असल्यामुळे प्लेटोने केलेल्या लोकशाहीच्या टीकेस फक्त ऐतिहासिक महत्त्व आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** यानंतर आपण लोकशाही कशी निर्माण होते आणि तिच्यातील मानवी स्वभाव कसा असतो याची चर्चा आपण करू या. त्यामुळे त्या स्वभावाच्या व्यक्तीचा परिचय आपणांस करून घेता येईल. आणि तिच्याविषयी निर्णय घेता येईल.

**ॲडिमँटस :** पद्धतशीर चर्चेसाठी हेच योग्य होय.

**सॉक्रेटिस :** अर्थसत्तेतून लोकशाहीत होणारे परिवर्तन, संपत्तीच्या अनियंत्रित आणि अनिवार इच्छेने घडून येत नाही का ? अनिवार संपत्ती मिळविणे ही भाग्याची गोष्ट आहे आणि ती मिळविणे हे कर्तव्य आहे, असे मानले जात नाही का ? हा बदल पुढीलप्रमाणे होत नाही का ?

**अॅडिमँट्स** : त्या प्रक्रियेचे वर्णन करून सांगाल का ?

**सॉक्रेटिस** : अर्थसत्तेमध्ये अधिकाऱ्यांची हुकमत त्यांच्याकडे असलेल्या मोठ्या प्रमाणातील संपत्तीवर अवलंबून असते. म्हणून व्यसनी तरुणांनी लोकांकडील मालमत्तेची उधळपट्टी करू नये अशा तऱ्हेचा कायदा अधिकारी लोक करीत नाहीत. तरुणांची मालमत्ता खरेदी करून, त्यांना कर्ज देऊन आपण अधिक श्रीमंत आणि प्रतिष्ठित होऊ शकू असे अधिकाऱ्यांना वाटत असते.

**अॅडिमँट्स** : यात शंका नाही.

**सॉक्रेटिस** : यावरून हे उघड होते की, राज्यातील नागरिकांच्या संपत्तीला मान देणे आणि संयम राखणे एकाच वेळी शक्य नसते. म्हणून यांपैकी एकाकडे त्यांचे दुर्लक्ष होणारच.

**अॅडिमँट्स** : हे उघड आहे.

**सॉक्रेटिस** : या राज्यातील अधिकारी अनिर्बंध स्वैराचाराला परवानगी देतात. उच्च कुळातील नागरिकांना गरीब होण्यास भाग पाडतात.

**अॅडिमँट्स** : हो, हे खरे आहे.

**सॉक्रेटिस** : हे दरिद्री लोक माझ्या कल्पनेप्रमाणे शहरात गुन्हा करण्यासाठी छपून राहतात. त्यांच्यापैकी काही कर्जबाजारी असतात. काहींनी मतस्वातंत्र्य आणि इतर हक्क गमावलेले असतात. इतर दोन्ही प्रकारच्या आपत्तींत सापडलेले असतात. हे सर्व नागरिक आपल्या इस्टेटीच्या नवीन मालकाविरुद्ध आणि सुस्थितीत असलेल्या सर्वांविरुद्ध द्वेषबुद्धी ठेवून, गुप्त कारस्थाने करीत राहतात. क्रांतिसाठी उत्सुक असतात.

**अॅडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : उलट श्रीमंत लोक स्वतःच्या हितसंबंधात गर्क राहतात. आपल्या शत्रूकडे दुर्लक्ष करण्याचे ढोंग करतात. जर एखादा शत्रू दरिद्री झाला तर तो त्यांच्या तावडीत सापडतो. त्याला ते विषारी पैसा कर्जाऊ देतात. त्याच्याकडून दाम-दुप्पट वसुली करतात. याप्रकारे त्यांच्या मधुशोषकवृत्तीने भिकारी लोकांची संख्या राज्यात वाढत राहते.

**अॅडिमँट्स** : हो. असे ते करतात.

**सॉक्रेटिस** : कुणासही मालमत्ता विकून टाकण्यावर सक्त बंधन घालून या वाईट गोष्टी दूर करण्याचे ते मनावर घेत नाहीत. किंवा अशा भयंकर गोष्टींचे निराकरण करण्यासाठी जो कायदा आहे त्याचा उपयोग ते करीत नाहीत.

**अॅडिमँट्स** : तो कोणता कायदा ?

**सॉक्रेटिस** : पहिल्या उपायानंतर दुसरा चांगला सद्‌गुणी नागरिक तयार करण्यास तो उपयोगी आहे. असा सर्वसाधारण कायदा जर झाला तर स्वेच्छेने होणारे करार, हे करार करणाऱ्याच्या जबाबदारीवर होतील, आणि आज शहरात निर्लज्जपणे होणारे व्यवहार कमी होतील. शिवाय आपण वर्णन केलेले वाईट प्रकारही थांबतील.

**अॅडिमँट्स** : हो, ते बरेच कमी होतील.

**सॉक्रेटिस** : सध्याचा प्रकार पूर्वीप्रमाणे आहे. मी ज्या आमिषांचा उल्लेख केला त्यामुळे अधिकाऱ्यांना आपल्या प्रजेबरोबर आडदांडपणे वागण्यास उत्तेजन मिळते. प्रत्यक्ष अधिकारी, त्यांची मुले, त्यांच्यातील तरुण शरीराने आणि मनाने चैनी व आळशी होतात. सुस्त व बायकी बनतात. सुखाचा मोह टाळू शकत नाहीत. दुःख सहन करू शकत नाहीत. असे आपल्याला आढळते.

**अॅडिमँट्स** : निश्चितच ते असे बनतात.

**सॉक्रेटिस** : त्यांच्या घरातील वडील मंडळी पैसे मिळविण्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत उदासीन असतात. गरिबांप्रमाणेच सद्‌गुणाविषयी निष्काळजी असतात.

**अॅडिमँट्स** : यात शंका नाही.

**सॉक्रेटिस** : असे असल्यामुळे अधिकारी आणि नागरिक यात्रा किंवा युद्धप्रसंगी, सहप्रवासी किंवा सहसैनिक म्हणून जेव्हा एकत्र येतात किंवा संकटप्रसंगी परस्परांचे साक्षीदार बनतात, त्यावेळी गरिबांचा श्रीमंतांकडून तिरस्कार होणे शक्य नसते. युद्धात असे अनेक वेळा घडते की, चैनबाज आणि त्यामुळे पुष्ट असलेली श्रीमंत व्यक्ती, किरकोळ प्रकृतीच्या कष्टाळू गरिबाजवळ उभी राहते. तेव्हा ती त्याच्याजवळ आपल्या दुःस्थितीचे, जड श्वासोच्छ्वास करीत, वर्णन करते. या प्रसंगी आपल्या भ्याडपणाने या नालायक श्रीमंत व्यक्ती मोठ्या बनतात असे गरिबाला वाटल्याशिवाय कसे राहील ? मग खाजगी भेटीत " आपले अधिकारी कुचकामी आहेत " असे ते म्हणणार नाहीत काय ?

**अॅडिमँट्स** : होय. तशी माझी खात्री आहे.

**सॉक्रेटिस** : रोगट शरीराला छोटे निमित्तही आजारपणास पुरते. बाहेरच्या कारणाव्यतिरिक्तही शरीर बिघडते. रोगट शरीराप्रमाणे जे शहर असते त्यातील अल्पमतात असलेल्या पक्षाकडून किंवा बहुमतात असलेल्या पक्षाकडून जेव्हा बाहेरच्या शत्रूंचे सहाय्य मागितले जाते, त्या वेळी ते अंतःस्थ कलहाला बळी पडत नाहीत का ? बाह्य कारण नसतानाही अंतर्गत यादवीमुळे त्यात फाटाफूट होत नाही का ?

**अॅडिमँट्स** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : गरीब लोक विरुद्ध पक्षांना मारतात. इतरांना हद्दपार करतात. नागरिकत्वाचे हक्क आणि अधिकार उरलेल्या सर्वांत सारखे वाटतात. विजयी होतात. त्या वेळी लोकशाही राज्यघटना अस्तित्वात येते. या राज्यपद्धतीत अधिकारांची वाटणी चिठ्ठ्या टाकून होते.

**ॲडिमँट्स** : खरे आहे. युद्ध पुकारल्याने किंवा दुसऱ्या पक्षाने घाबरून माघार घेतल्याने लोकशाही राज्यघटना अस्तित्वात येते, हे तुमचे वर्णन योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : आता हे लोक राज्यकारभार कोणत्या पद्धतीने करतात आणि त्यांच्या घटनेचे स्वरूप काय ते पाहू. कारण ह्या पद्धतीशी साम्य असणारा मनुष्य अशाच प्रकारच्या वैशिष्टयांनी युक्त असतो असे आपणांस दिसून येईल.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : पहिला मुद्दा असा की, असे लोक स्वतंत्र असून त्यांना आचाराचे व भाषणाचे स्वातंत्र्य नसते काय ? तसेच मनुष्य स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागू शकतो का ?

**ॲडिमँट्स** : होय. आपल्याला असे सांगितले जाते.

**सॉक्रेटिस** : अशा तऱ्हेचे स्वातंत्र्य मिळाले असताना प्रत्येक नागरिक आपल्या स्वतःच्या इच्छेनुसार आयुष्यक्रम ठरवील हे उघड आहे.

**ॲडिमँट्स** : होय. हे स्पष्टच आहे.

**सॉक्रेटिस** : म्हणून मला असे वाटते की, या राज्यघटनेत स्वभाववैचित्र्य बऱ्याच प्रमाणात आढळून येईल.

**ॲडिमँट्स** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : कदाचित ही राज्यपद्धती चांगली असू शकेल. वेगवेगळ्या जातीच्या फुलांनी चमकत असलेल्या वेलबुट्टीच्या पोशाखाप्रमाणे ही राज्यघटना फार सुंदर समजण्यात येईल. आणि ज्याप्रमाणे मुले व स्त्रिया यांना वेगवेगळ्या रंगाचे पोशाख आवडतात, त्याप्रमाणे पुष्कळ लोकांना, ही मानवी स्वभाववैचित्र्याने पूर्ण अशी राज्यघटना अधिक सुंदर वाटेल.

**ॲडिमँट्स** : नक्कीच, पुष्कळांना ती सुंदर वाटेल.

**सॉक्रेटिस** : आपल्याला हव्या असलेल्या राज्यघटनेचे संशोधन या प्रकारच्या घटनेत करणे फायद्याचे होईल.

**ॲडिमँट्स** : ते कसे काय ?

**सॉक्रेटिस** : कारण, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे, व्यक्तिस्वातंत्र्य या घटनेत असल्यामुळे, प्रत्येक प्रकारची राज्यपद्धती त्यात दिसून येईल. ज्या मनुष्याला आपल्या इच्छेप्रमाणे राज्य स्थापन करावयाचे आहे, त्याने लोकशाही स्वरूपाच्या राज्यात जावे. तो जणू काही निरनिराळ्या राज्यघटनांचा बाजारच असतो. त्यामधून पसंतीस येईल ती राज्यघटना त्याने शोधून काढावी व त्यानुसार राज्य करावे.

**ॲडिमँट्स** : निरनिराळे नमुने पाहण्यास त्याला अजिबात अडचण पडणार नाही.

**सॉक्रेटिस** : अशा राज्यामध्ये, तुम्ही तुमच्या बुद्धीच्या जोरावर अधिकाराची जागा पत्करण्यास योग्य असलात तरी तुम्ही त्या जागेवर काम केलेच पाहिजे अशी बळजबरी करता येणार नाही. तसेच जर तुम्हाला ही राज्यपद्धती आवडली नाही तर तुम्ही तिला शरण जाण्याची आवश्यकता नाही. इतर नागरिक युद्धावर गेले असता तुम्ही गेलेच पाहिजे असे नाही अथवा तुम्हाला शांतता नको असली तर तुम्ही ती राखलीच पाहिजे असेही नाही. तसेच कायद्याने, तुम्हाला एखाद्या अधिकाराच्या जागेची अथवा पंच म्हणून बसण्याची मनाई केली असली, तरीही तुमची इच्छा असेल तर ती कामे तुम्हाला करता येतील. अशा तऱ्हेचे जीवन, त्या वेळेपुरते तरी अतिशय सुखाचे वाटणार नाही काय?

**ॲडिमँट्स** : त्या क्षणापुरते वाटणे शक्य आहे.

**सॉक्रेटिस** : न्यायाधीशाने ज्यांच्या खटल्याची चौकशी करून निकाल दिला आहे अशा लोकांचा नम्रपणा तर विशेषच असतो! अशा प्रकारच्या राज्यांत देहान्ताची अथवा हद्दपारीची शिक्षा झालेले लोक, रस्त्यातून एखाद्या वीराप्रमाणे हिंडत असतात. जणू काही त्यांना कोणी बघत नाही अथवा कोणाला त्यांची भीती वाटत नाही. अशी उदाहरणे तुम्ही बघितली आहेत ना?

**ॲडिमँट्स** : अशी किती तरी उदाहरणे मी पाहिली आहेत.

**सॉक्रेटिस** : अशा राज्याची सहनशक्ती किंवा क्षुद्र गोष्टींकडे लक्ष न देण्याची उदारता आश्चर्यकारक नव्हे काय? एवढेच नव्हे तर आपल्या राज्याची उभारणी करीत असताना, जे एक महत्त्वाचे तत्त्व घालून दिले की, लहानपणापासून सुंदर वस्तूंच्या वातावरणात व सुंदर वस्तूंचा अभ्यास करण्यात ज्याने आपले आयुष्य घालविले नाही व ज्याचा स्वभाव सामान्य आहे, असा मनुष्य चांगला होणे शक्य नाही, ह्या तत्त्वाचा ही राज्यपद्धती तिरस्कार करते. कारण अशा राज्यपद्धतीत "समाजाचे आम्ही कल्याण करू इच्छितो" एवढे म्हटल्याने लोकांना राजकारणात शिरता येते. मग त्या लोकांचे पूर्वीचे व्यवसाय काय होते ह्यांची अजिबात चौकशी न करताही ते सन्मानाने वर चढविले जातात व आपण घालून दिलेल्या तत्त्वाला मोठ्या ऐटीत पायाखाली तुडवितात!

**ॲडिमँट्स** : होय. ही गोष्ट खरी आहे.

**सॉक्रेटिस** : लोकशाही राज्यघटनेची ही काही तत्त्वे मी आपणांस सांगितली अशाच तऱ्हेची इतरही बरीच आहेत. ही लोकशाही राज्यघटना सर्वांना आवडणारी, बेशिस्त व विविधवर्णी असून सर्वांना समान दर्जाने–त्यांची लायकी असो वा नसो–वागविणारी आहे.

**ॲडिमँट्स** : तुम्ही ज्या गोष्टी सांगितल्या त्या प्रसिद्धच आहेत.

**सॉक्रेटिस** : आता अशा प्रकारच्या राज्यघटनेतील व्यक्तीच्या स्वभावाचे परीक्षण करण्यास मी तुम्हांस सांगतो. राज्यपद्धतीच्या उगमाप्रमाणेच अशा प्रकारच्या स्वभावाच्या उगमाचे संशोधन करावे ना?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : असा मनुष्य अर्थसत्ताक पद्धतीतील कंजूष स्वभावाच्या माणसाचा मुलगा असून, त्याच्या हाताखाली वाढल्यामुळे, त्याचा स्वभावही आपल्या बापासारखाच असे म्हटले तर बरोबर होईल ना?

**ॲडिमँट्स** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : बापाप्रमाणेच हा मुलगा, जी सुखे उधळेपणास व पैसे घालविण्यास कारणीभूत होतात अशा सुखांवर कडक दाब ठेवील. या सुखांना अनावश्यक सुखे म्हणतात हे तुम्हाला माहीत आहेच.

**ॲडिमँट्स** : खात्रीनेच दाब ठेवील.

**सॉक्रेटिस** : आपली चर्चा सोपी व स्पष्ट व्हावी म्हणून आवश्यक व अनावश्यक वासनांची व्याख्या आपण अगोदर करावी ना?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : ज्या वासना आपल्याला टाळता येणे शक्य नाही व ज्यांची पूर्ती झाली असता आपला फायदा होतो त्या आवश्यक वासना म्हणणे योग्य नाही काय? अशा वासना अनुभविल्याशिवाय आपणांस राहवेल काय?

**ॲडिमँट्स** : निश्चितच नाही.

**सॉक्रेटिस** : तर मग अशा वासना आवश्यक म्हणणे योग्य आहे.

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : लहानपणापासून योग्य शिक्षण घेतल्यास ज्यांचा त्याग करता येतो व ज्यांच्या पूर्तीमुळे आपले कल्याण न होता उलट अहितच होते, अशा वासनांना अनावश्यक म्हणणे बरोबर आहे ना?

**ॲडिमँट्स** : हो. बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : वासनांची सर्वसाधारण कल्पना यावी म्हणून प्रत्येक प्रकारच्या वासनांचे उदाहरण घेणे बरोबर होईल ना?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : आरोग्य व शारीरिक बळकटी यांना पुरेशी अशी अन्नाविषयी असलेली वासना आवश्यक नव्हे काय?

**ॲडिमँट्स** : होय, आहे.

**सॉक्रेटिस** : भाकरीबद्दल वासना दोन कारणांनी आवश्यक असते. ती केवळ हितावहच नव्हे तर शरीर टिकण्यासाठी आवश्यक असते.

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : अर्थात शरीराला बळकटी आणण्यापुरतीच मांसाबद्दल वासना आवश्यक समजावी.

**ॲडिमँट्स** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : स्वादिष्ट व चवदार पक्वानाची अभिलाषा असणे म्हणजे अनावश्यक वासना नव्हे काय? लहानपणापासूनच्या शिस्तीने व शिक्षणाने अशी वासना टाकून देणे शक्य असते. शिवाय अशी वासना शरीराला अपायकारक असून, ज्ञानाच्या व सद्‌गुणांच्या आराधनेत व्यत्यय आणणारी असते.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : दुसऱ्या प्रकारच्या वासना, पैसा खर्च करावयास लावणाऱ्या असतात तर पहिल्या प्रकारच्या वासना, वस्तूंच्या उत्पादनास मदत करणाऱ्या असल्यामुळे पैसे मिळवून देणाऱ्या असतात.

**ॲडिमँट्स** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : प्रेमाचा विकार व इतर वासना यांविषयीही आपणांस असेच म्हणता येईल का?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : ज्या मनुष्याला आपण भ्रमर म्हटले तो खर्चिक सुखे व वासना यांनी पछाडलेला असून अनावश्यक वासनांच्या ताब्यात गेलेला असतो. पण ज्या मनुष्याच्या वासना आवश्यक प्रकारच्या असतात तो कंजूष व अर्थसत्ताक पद्धतीचा भोक्ता असतो, असे आपण वर्णन केले ना?

**ॲडिमँट्स** : होय. आपण असेच वर्णन केले.

**सॉक्रेटिस** : अर्थसत्ताक स्वभावाचा मनुष्य लोकशाही स्वभावाचा कसा होतो ते आता आपण पाहू या.

**ॲडिमँट्स** : त्याच्यात असे परिवर्तन कसे होते?

**सॉक्रेटिस** : अज्ञानाच्या व कंजूषपणाच्या वातावरणात वाढल्यानंतर, तरुण मनुष्य जेव्हा भ्रमरवृत्तीच्या लोकांप्रमाणे मध चाखावयास लागून, विविध प्रकारची सुखे अनुभविण्यास मिळवून देणाऱ्या भयंकर व रानटी स्वभावाच्या लोकांशी ओळख करून घेतो, तेव्हा अर्थसत्ताक स्वभावातून लोकशाही स्वभावात त्याचे परिवर्तन होते.

**ॲडिमँट्स** : अगदी बरोबर.

**सॉक्रेटिस** : राज्यातील दोन पक्षांपैकी एकाला समान स्वभावाची परकीय मदत मिळाल्यास जसा राज्यात बदल होतो, तसाच बदल, तरुण मनुष्याच्या स्वभावात, वासनांच्या दोन पक्षांपैकी एकाला समान स्वरूपाची बाहेरच्या वासनांची मदत मिळाल्यास होतो, असे आपणांस म्हणता येणार नाही काय ?

**ॲडिमँट्स** : खात्रीनेच म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : तरुण मनुष्यामध्ये असलेल्या अर्थसत्ताक तत्त्वाला, त्याच्या वडिलांच्या वा इतर नातेवाईकांच्या निंदेमुळे अथवा उपदेशामुळे आधार मिळाल्यावर त्याच्या अंतःकरणातील वासनांच्या दोन पक्षांमध्ये झटापट होऊन युद्ध सुरू होते.

**ॲडिमँट्स** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : कधी कधी लोकशाही पक्ष अर्थसत्ताक पक्षाला शरण जातो. आणि तरुण माणसाला लाज वाटायला लागल्यामुळे काही वासना मारल्या जातात, काहींचा त्याग केला जातो व तो पुन्हा व्यवस्थित होतो.

**ॲडिमँट्स** : होय. कधी कधी असे घडते खरे.

**सॉक्रेटिस** : त्याग केलेल्याच काही वासना नवीन प्रकाराने पुन्हा वाढीस लागतात व पूर्वी मिळालेल्या शिक्षणात शास्त्रीय ज्ञानाचा अभाव असल्यामुळे त्या असंख्य व बळकट होतात.

**ॲडिमँट्स** : सामान्यतः अशी परिस्थिती दिसते.

**सॉक्रेटिस** : ह्या वासना त्याला आपल्या जुन्या सोबत्यांकडे ओढून नेतात आणि त्यांच्याशी गुप्त सहवास ठेवून दुसऱ्या अनेक वासना निर्माण करतात.

**ॲडिमँट्स** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : आणि शेवटी ह्या वासना तरुण मनाच्या हृदयाच्या बालेकिल्ल्यावर हल्ला करतात. कारण जे देवांना प्रिय आहेत अशा लोकांच्या मनावर जसा पूर्ण ज्ञान, सुंदर विषय व चांगल्या कल्पना यांचा पहारा असतो, तसा या मनुष्यावर नसतो.

**ॲडिमँट्स** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : उलट खोटया, निरर्थक कल्पना व मते यांचा त्यांच्या मनात उदय होतो व त्या त्यांचे मन काबीज करतात.

**ॲडिमँट्स** : होय, करतात.

**सॉक्रेटिस** : शेवटी असा मनुष्य लोटस* फळ भक्षण करणाऱ्या लोकांच्या देशात जाऊन

---

* उत्तर आफ्रिकेत अशी जात असल्याची ग्रीकांची श्रद्धा होती. परकीयांनी हे फळ खाल्ल्यास त्यांना स्वदेश विस्मृती होई. अशी गोष्ट होमरने ट्रोजनयुद्ध आणि युलिसिस यांच्या संदर्भात Odyssey या काव्यात दिली आहे.

त्यांच्यातच मिसळून जातो. त्याच्या आत्म्यामध्ये असणाऱ्या कंजूषपणाच्या तत्त्वाला त्याच्या नातलगांनी मदत पाठविली असता, ही अहंमन्य तत्त्वे हृदयाच्या किल्ल्याचे दरवाजे बंद करून, ती त्याच्यापर्यंत पोहोचू देत नाहीत. इतकेच नव्हे तर वडील माणसांकडून उपदेशाच्या स्वरूपात आलेल्या शिष्टाईलाही ते धुडकावून लावतात. लज्जेला मूर्खपणा असे म्हणून तिला निर्दयतेने हद्दपार करतात. आत्मसंयमनाला भ्याडपणा असे नाव देऊन हाकलून लावतात. निरर्थक वासनांची मदत घेऊन, नेमस्तपणा व व्यवस्थित खर्च म्हणजे गांवढळपणा व अनुदारपणा असे दाखवून देऊन त्यांना बाहेर घालवतात. अशा प्रकारे ही तत्त्वे स्वतः लढून विजयी होतात ना?

**ॲडिमँट्स** : निःसंशय विजयी होतात.

**सॉक्रेटिस** : त्यांच्या ताब्यात असलेल्या मनुष्यांच्या आत्म्यामधून वरील सद्‌गुणांची हकालपट्टी केल्यानंतर, ही तत्त्वे उद्धटपणा, अव्यवस्थितपणा, दुराचार व निर्लज्जता ह्यांना मोठ्या समारंभाने त्यांच्या डोक्यावर मुकुट चढवून व त्यांची स्तुतिस्तोत्रे गाऊन हृदयसिंहासनावर बसवितात. उद्धटपणा म्हणजे चांगली वागणूक, अव्यवस्थितपणा म्हणजे स्वातंत्र्य, दुराचार म्हणजे औदार्य व निर्लज्जता म्हणजे शौर्य अशी नावे त्यांना देता येतात. आवश्यक वासनांची पूर्ती केली म्हणजे झाले, अशा वातावरणात जो लहानपणापासून वाढला आहे, असा मनुष्य वर सांगितलेल्या प्रकारांनी तरुणपणात बदलत नाही काय व त्यामुळे तो अनावश्यक व घातकी सुखांना स्वातंत्र्य देत नाही काय?

**ॲडिमँट्स** : होय. हे उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : त्यानंतर असा मनुष्य आवश्यक सुखाकरिता जितका पैसा, श्रम व वेळ खर्च करतो, तितकाच अनावश्यक सुखांकरिता करावयास लागतो. परंतु स्वतःची स्वैराचारी वागणूक संयमित ठेवून सुदैवाने म्हातारपणी वासनाविकार बरेच कमी झाल्याने, कमी झालेले गुण अंगी पुन्हा बाणवून जर तो पुन्हा दुर्गुणांच्या आहारी गेला नाही तर विविध सुखे एकच मानून प्रारब्धाने मिळेल ते सुख घेऊन, एक मिळाल्यावर दुसरे मिळवावयाचे आणि कोणतेच नाकारावयाचे नाही, सर्व सुखांचा उपभोग घ्यावयाचा अशी सवय त्याला लागेल.

**ॲडिमँट्स** : बरोबर.

**सॉक्रेटिस** : काही सुखांमध्ये चांगल्या आणि योग्य वासनांची पूर्ती होते तर काहींचा संबंध वाईट, अयोग्य वासनांशी असतो. म्हणून चांगले सुख घ्यावे आणि दुसरी वाईट समजून संयम करावा असे त्याला सांगितल्यास, तो हा सदुपदेश ऐकत नाही, किंवा हा उपदेश त्याच्या मनात शिरत नाही. उलट असा उपदेश ऐकून तो म्हणेल सर्वच वासना सारख्याच महत्त्वाच्या असल्याने त्या आपण मानल्या पाहिजेत.

**ॲडिमँट्स** : हो. त्याचे असे वर्तन असते.

**सॉक्रेटिस** : अर्थातच तो तात्पुरत्या वासना पूर्ण करण्यात आपले आयुष्य खर्च करतो. काही वेळा तो संगीत, दारू यांमुळे बेहोष होतो तर काही वेळा फक्त शारीरिक व्यायाम घेतो. केव्हा आळसाने सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करतो तर केव्हा तत्त्वज्ञानाचा व्यासंग करतो केव्हा सार्वजनिक कामात भाग घेऊन स्फूर्तिनुसार बोलतो आणि वागतो. प्रसिद्धीच्या लोभाने सेनापती, यशस्वी व्यापारी यांचे तो अनुकरण करतो, हेवा करतो. अशा रीतीने आपल्या आयुष्यात व्यवस्थितपणा आणि संयम नसतानाही आपले आयुष्य स्वतंत्र, मजेदार, सुखासीन बनवून तो आपले आयुष्य संपवतो.

**ॲडिमँटस** : 'स्वातंत्र्य व समता' ही ध्येय असणाऱ्या मनुष्याचे तुम्ही चांगले वर्णन केले.

**सॉक्रेटिस** : हे आयुष्य स्वभाववैचित्र्याने भरलेले आहे असे मला वाटते. आपण जे शहर वर्णन केले त्याला अनुरूप असा हा वैचित्र्यपूर्ण माणूस आहे. पुष्कळ स्त्रियांना व पुरुषांना अशा मनुष्याच्या आयुष्याचा हेवा वाटेल. अशा मनुष्याच्या स्वभावात, पुष्कळ राज्यपद्धती व स्वभाव ह्यांचे मिश्रण सापडेल.

**ॲडिमँटस** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : असा मनुष्य लोकशाही स्वभावाचा आदर्श समजण्यास हरकत नसावी असे वाटते.

**ॲडिमँटस** : होय.

□ □

## प्रकरण बत्तीस

# हुकूमशाही : स्वरूप आणि मूल्यमापन

**[VIII-562-A—IX-576-B]**

**कथासूत्र :**

[प्राचीन ग्रीक राजकीय इतिहासामध्ये, हुकूमशहा म्हणजे धनवान समूहापासून जनसामान्यांची मुक्तता करणारा लोकत्राता, अशी सर्वसामान्य समजूत प्रचलित होती. आज मात्र, सत्तेचे वाढते केंद्रीकरण हे वाढत्या शोषणाला आवाहन असे मानले जाते.

लोकशाही समाजजीवनात स्वातंत्र्य हे श्रेष्ठ सामाजिक-मूल्य मानले जाते. वस्तुस्थिती अशी घडते की, सत्ता आणि संपत्ती यांच्या संचयाचे स्वातंत्र्य उपभोगताना समाज तीन वर्गांत उभारला जातो : (१) खिळखिळी होणारी सरंजामशाही, (२) व्यापाऱ्यांची भांडवलशाही आणि (३) राजकारणात रस नसलेले आणि आपल्या छोट्याशा चरितार्थाच्या साधनात मग्न असलेले जनसामान्य. सत्ताधीश आणि सत्ताहीन, श्रीमंत आणि गरीब यांच्या संघर्षातून जेव्हा प्रसंगी रक्तमय क्रांतीचा धोका उत्पन्न होतो तेव्हा जनसामान्यांचे कल्याण आणि संरक्षण करण्याच्या उदात्त संकल्पाचा बुरखा पांघरून हुकूमशहा उदयास येतो.

सुरुवातीस काही काळ लोककल्याणाची दृष्टी तो ठेवतो. कालांतराने सत्ता आणि संपत्ती यांचे सर्वश्रेष्ठ केंद्र तो स्वतःच बनतो. विरोधक आणि विरोधी प्रवृत्ती नेस्तनाबूत करून स्वतःचे आसन सुरक्षित राखण्याचा तो अधिकाधिक प्रयत्न करतो. पाशवी वासनांच्या आहारी त्याचे व्यक्तिमत्त्व जाते. लोकांच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी निर्माण झालेली व्यक्ती शेवटी स्वातंत्र्याचाच बळी घेते.

निःस्वार्थ समाजसेवेसाठी जीवन-सर्वस्व वाहणारे प्रज्ञावंत राज्यकर्त्यांच्या आदर्शांचे अधःपतन होत होत त्याची परिणती हुकूमशाहीत होते. पूर्ण न्याय आणि पूर्ण अन्याय या दोन ध्रुवांचे दर्शन प्लेटोच्या विवेचनात आढळते.]

* * * * *

**सॉक्रेटिस** : यानंतर सर्वांना अतिशय प्रिय असणारी राज्यपद्धती आणि सर्वांना अतिशय प्रिय असणारी व्यक्ती म्हणजेच हुकूमशाही आणि हुकूमशहा. यांचेच वर्णन बाकी राहिले आहे.

**अॅडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मित्रा, हुकूमशाही राज्यघटना कशी निर्माण होते ते सांग. लोकशाहीचे ते परिवर्तन आहे हे निश्चित.

**ॲडिमँट्स :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** अर्थसत्ता लोकशाहीला जन्म देते तशीच लोकशाही हुकूमशाहीला जन्म देते ना ?

**ॲडिमँट्स :** हा विचार अधिक स्पष्ट कराल का ?

**सॉक्रेटिस :** अर्थसत्तेमध्ये संपत्तीला फार महत्त्व दिले जात असते. म्हणूनच ती निर्माण होते. खरे ना ?

**ॲडिमँट्स :** हो.

**सॉक्रेटिस :** परंतु संपत्ती मिळविण्याची न संपणारी इच्छा आणि पैशाव्यतिरिक्त इतर गोष्टींची उपेक्षा यांनीच अर्थसत्तेचा नाश होतो.

**ॲडिमँट्स :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** अर्थसत्तेप्रमाणे लोकशाहीतही ज्या गोष्टींना राज्याची प्रतिष्ठा व परमकल्याण मानले जाते त्या अपुऱ्या राहिल्यानेच नाश पावतात असे म्हणू शकू ना ?

**ॲडिमँट्स :** तुमच्या दृष्टीने अशा कोणत्या गोष्टी आहेत ?

**सॉक्रेटिस :** स्वातंत्र्य. माझ्या कल्पनेप्रमाणे लोकशाहीमध्ये तुम्हाला असे सांगण्यात येते की, स्वातंत्र्य हेच खरे ऐश्वर्य होय. स्वातंत्र्यप्रेमी माणसाला हेच योग्य शहर आहे.

**ॲडिमँट्स :** हो. असे आपण ऐकतो.

**सॉक्रेटिस :** म्हणून मी काही वेळापूर्वी म्हणत होतो त्या गोष्टीचा विचार करू. एका विषयाची फार हाव धरली आणि दुसऱ्यांची उपेक्षा केली तर अर्थसत्तेप्रमाणे लोकशाहीपण बदलली जाऊन, हुकूमशाहीचा मार्ग मोकळा होतो. माझे मत योग्य आहे ना ?

**ॲडिमँट्स :** ते कसे ?

**सॉक्रेटिस :** स्वातंत्र्याकरिता आसुसलेले लोकशाही राज्य दुष्ट लोकांच्या हुकमतीखाली येते. अतिरेकी स्वातंत्र्याची नशा त्याला चढते. जर अधिकाऱ्याने या नशेस भरपूर प्रोत्साहन दिले नाही तर त्याचा धिक्कार केला जातो.

**ॲडिमँट्स :** हो. असे घडते.

**सॉक्रेटिस :** हे राज्य, राज्यकर्त्यांशी जे आज्ञाधारकपणे वागतात त्यांना स्वेच्छेने बनलेले गुलाम आणि कुचकामी मानते. अधिकारी जर प्रजेप्रमाणे वागले आणि नागरिक जर अधिकाऱ्याप्रमाणे वागले तर राज्यामध्ये त्यांची सार्वजनिक आणि खाजगी प्रशंसा होते. अशा राज्यात स्वातंत्र्याचा अतिरेक होत नाही का ?

**ॲडिमँट्स** : निश्चितच.

**सॉक्रेटिस** : म्हणून अंदाधुंदीचा कारभार घरातही शिरतो, आणि सर्वत्र पसरून पशूंच्या स्वभावातही शिरतो.

**ॲडिमँट्स** : याचा अर्थ काय ?

**सॉक्रेटिस** : माझे म्हणणे असे की, पिता आपल्या मुलाप्रमाणे वागण्याची सवय ठेवतो. मुलांना नेहमी घाबरतो. मुलगा पित्याप्रमाणे वागतो. आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आई-वडिलांना मान देत नाही वा घाबरत नाही. राज्यातील मूळचे नागरिक, स्थायिक झालेले परकीय आणि पूर्ण परके हे सर्व लोक समान दर्जाने वागू लागतात.

**ॲडिमँट्स** : या वस्तुस्थितीचा परिणाम तुम्ही योग्य रीतीने सांगितला आहे.

**सॉक्रेटिस** : मी आतापर्यंत थोडे सांगितले. आता अशाच प्रकारचे इतर थोडे किरकोळ सांगतो. अशा वातावरणात शिक्षक विद्यार्थ्यांना भितात. त्यांना खूष करतात. विद्यार्थी गुरुजनांचा तिरस्कार करतात. म्हणजे बोलण्यात आणि वागण्यात तरुण व्यक्ती वडील व्यक्तींचे अनुकरण करते आणि वृद्ध लोक तरुणांच्या बरोबरीने हास्यविनोद करतात. तसे घडले नाही तर 'दुर्मुखलेले' आणि 'अधिकार गाजविणारे' असे तरुण आपली निंदा करतील असे भय वृद्धांना असते.

**ॲडिमँट्स** : अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस** : अशा राज्यात विकत घेतलेले गुलाम, मालकाप्रमाणेच स्वतंत्रपणे वागतात, तेव्हा स्वातंत्र्याचा अतिरेक होतो. स्त्री-पुरुषांत स्वातंत्र्य आणि समता यांचा अतिरेक किती होतो ते मी सांगण्याचे विसरूनच गेलो.

**ॲडिमँट्स** : एश्चिलसने म्हटल्याप्रमाणे जे ओठावर आहे ते सांगितले पाहिजे ना ?

**सॉक्रेटिस** : निश्चितच. अनुभव नसतानाही या राज्यात पाळीव जनावरेही मोकाटपणे वागतात, यावर कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही. "शिकारी कुत्रा घराची मालकीण बनतो" अशी आपल्यात म्हण आहे. घोडे, गाढवे हीसुद्धा स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा यांच्यामागे लागतात. रस्त्यावरून जाताना त्यांच्या मार्गातून बाजूस न सरणाऱ्याच्या अंगावर धावून जातात. ही पाळीव जनावरेसुद्धा स्वातंत्र्याच्या वेडाने बेभान होतात.

**ॲडिमँट्स** : तुम्ही तर माझाच अनुभव बोलून दाखवीत आहात. खेड्यातून प्रवास करताना असा अनुभव मला नेहमी येतो.

**सॉक्रेटिस** : यातून एकच निष्कर्ष निघतो. तो म्हणजे या राज्यातील नागरिकांची मने इतकी हळवी बनतात की गुलामगिरीचे प्रतीक असणारी छोटी गोष्टही त्यांना चीड आणते, उतावीळ बनविते. श्रीमंताची छायासुद्धा त्यांना सहन होत नाही हे तुम्हांस माहीत आहेच ! अखेरीस प्रस्थापित किंवा रूढ कायदेही ते जुमानीत नाहीत.

**ॲडिमँट्स :** हो. ते अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणून मित्रा, माझ्या कल्पनेप्रमाणे अशा आकर्षक विलासी सुरुवातीतूनच हुकूमशाही राज्यपद्धती सुरू होते.

**ॲडिमँट्स :** या रंगेलपणाची पुढील अवस्था कोणती ?

**सॉक्रेटिस :** अर्थसत्ताक पद्धती ज्या रोगामुळे नष्ट पावली, तोच रोग लोकशाही राज्यपद्धतीत अधिक जोराने फैलावतो. स्वैराचाराच्या आहारी जाऊन तो लोकशाही राज्यपद्धतीला आपला गुलाम करतो. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला की, तितक्याच जोरदारपणे त्याला प्रतिकारही होतो हे तत्त्व आपणाला वर्षातील ऋतु, प्राणी, सृष्टी याप्रमाणे राज्यपद्धतीतही दिसून येते.

**ॲडिमँट्स :** स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस :** राज्यात आणि व्यक्तीत स्वातंत्र्याच्या अतिरेकाचे रूपांतर गुलामगिरीत होते.

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच लोकशाहीपद्धतीच हुकूमशाही पद्धतीचा पाया घालून ठेवते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे अत्यंत अतिरेकी स्वातंत्र्य, भयानक गुलामगिरीचा पाया रचते.

**ॲडिमँट्स :** हे विधान बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** मला वाटते, तुमचा प्रश्न निराळा होता. लोकशाही व अर्थसत्ताक पद्धतींना जडणारा व लोकशाही पद्धतीचे हुकूमशाहीत परिवर्तन करणारा रोग कोणता ? असा प्रश्न तुम्ही विचारला होता.

**ॲडिमँट्स :** होय. माझा प्रश्न असाच होता.

**सॉक्रेटिस :** ठीक. पूर्वी मी आळशी व उधळ्या स्वभावाच्या लोकांचा उल्लेख केला होता. त्यांच्यापैकी शूर लोक पुढारी असून भित्रे लोक त्यांचे अनुकरण करतात. दंश करणाऱ्या व दंश न करणाऱ्या भ्रमरांशी आपण त्यांची तुलना केली होती, हेही तुम्हांला आठवत असेल.

**ॲडिमँट्स :** हो, आठवते. आणि ती तुलना बरोबर होती.

**सॉक्रेटिस :** शरीरात ज्याप्रमाणे कफ व पित्त असते त्याप्रमाणे प्रत्येक राज्यपद्धतीत हे दोन वर्ग अव्यवस्था निर्माण करतात. म्हणून निष्णात वैद्य व कायदेपंडित यांनी, मधाचे पोळे राखणाऱ्या धूर्त मनुष्याप्रमाणे, यांचा शिरकाव होऊ नये म्हणून अगोदरच उपाययोजना केली पाहिजे आणि इतकी खबरदारी घेऊनही त्यांचा शिरकाव झालाच तर पोळ्यासकट त्यांना उचलून टाकले पाहिजे.

**ॲडिमँट्स :** निःसंशय असे वागावयास हवे.

**सॉक्रेटिस** : आपल्याला जे पहावयाचे आहे ते स्पष्ट दिसावे म्हणून आपण पुढील प्रकारे त्याचा विचार करू या.

**अॅडिमँट्स** : कोणत्या प्रकारे ?

**सॉक्रेटिस** : लोकशाही प्रकारच्या राज्याची तीन विभागांत विभागणी करू या. वस्तुतः ते तसेच असते. आपण ज्याचे वर्णन केले तो यापैकीच एक होय, आणि हा भाग लोकशाही पद्धतीत, अर्थसत्ताक पद्धतीप्रमाणे स्वैराचारामुळेच निर्माण होतो.

**अॅडिमँट्स** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : पण लोकशाही राज्यपद्धतीत तो अधिक बलवान असतो.

**अॅडिमँट्स** : तो कसा काय ?

**सॉक्रेटिस** : अर्थसत्ताक राज्यपद्धतीत याचा तिरस्कार केला जाऊन अधिकारापासून वंचित असतो. त्यामुळे तो गबाळा व अशक्त ठरतो. पण लोकशाही पद्धतीत, काही अपवाद वगळल्यास अशा वर्गाचे मुख्य अधिकारी मंडळ असते. त्यांच्यातील बुद्धिमान लोक भाषणाप्रमाणेच कृतीही करतात. इतर लोक भोवताली बसून टाळ्यांचा गजर करतात व विरोधी पक्षाला बोलण्याची संधी देत नाहीत. अशा प्रकारे लोकशाही पद्धतीचे सर्व व्यवहार अशा मंडळाच्या हातातच असतात.

**अॅडिमँट्स** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : ह्याशिवाय आणखी एक वर्ग समाजापासून नेहमी बाजूला राहिलेला दिसतो.

**अॅडिमँट्स** : तो कोणता ?

**सॉक्रेटिस** : पैशाच्या पाठीमागे लागणाऱ्यांपैकी व्यवस्थित स्वभावाचे लोकच श्रीमंत बनतात.

**अॅडिमँट्स** : असे होणे स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस** : यावरून असा निष्कर्ष निघतो की, भ्रमरवृत्तीचे ऐदी लोक अशा लोकांकडूनच पैसा उकळतात.

**अॅडिमँट्स** : नक्कीच. गरीब लोकांकडून कसा पैसा उकळणार ?

**सॉक्रेटिस** : अशा व्यवस्थित लोकांनाच श्रीमंत म्हटले जाते व त्यांच्यावरच ऐदी लोक जगत असतात.

**अॅडिमँट्स** : अशी स्थिती दिसते खरी.

**सॉक्रेटिस** : लोकशाही राज्यातील तिसऱ्या वर्गाला कमालीचे कष्ट करावे लागतात आणि त्यांची आर्थिक परिस्थितीही खालच्या दर्जाची असते. ते लोक सहसा राजकारणात पडत नाहीत. लोकशाही पद्धतीत अशा लोकांचा वर्ग एक झाला तर तो संख्येने सर्वांत मोठा व महत्त्वाचा असतो.

**अॅडिमँट्स :** खरे आहे. पण मधाचे म्हणजेच संपत्तीचे आकर्षण असेल तरच हे लोक एकत्र येणार.

**सॉक्रेटिस :** ते तसे त्यांना मिळतेच. कारण या वर्गाचे पुढारी लोक श्रीमंतांचे पैसे लुबाडतात. त्यातील बराचसा भाग स्वतःकडे ठेवून उरलेला या लोकांना वाटून टाकतात.

**अॅडिमँट्स :** होय. अशा प्रकारे या वर्गाला पैसा मिळतो खरा.

**सॉक्रेटिस :** जे लोक अशा तऱ्हेने लुटले जातात, ते कामगारांपुढे यथाशक्ती भाषण करून आपला बचाव करू पाहतात.

**अॅडिमँट्स :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** त्यांच्या अशा वागण्यामुळे ते स्वतः क्रांतिकारक नसले तरी, विरोधी लोकांकडून, कामगारांच्या विरुद्ध कट करणारे व अल्पसत्ताक पद्धतीचे मित्र गणले जातात.

**अॅडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** शेवटी अपुऱ्या माहितीमुळे व निंदा करणाऱ्या लोकांच्या प्रयत्नांमुळे जेव्हा कामगार लोक त्यांचे नुकसान करण्यास प्रवृत्त होतात तेव्हा हे लोक, स्वतःची इच्छा असो वा नसो, खरेखुरे अल्पसत्ताक बनतात. दंश करणाऱ्या भ्रमरांमुळेच अशी परिस्थिती निर्माण होते.

**अॅडिमँट्स :** होय. अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** ह्यामुळे एकमेकांविरुद्ध दोषारोप, खटले व चौकशा सुरू होतात.

**अॅडिमँट्स :** ते स्वाभाविकच आहे.

**सॉक्रेटिस :** बहुजनसमाजाच्या हितसंबंधाचे रक्षण करणारा एक पुढारी निवडून लोक त्यालाच मोठेपणा देऊन चढवीत नाहीत काय ?

**अॅडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** जेव्हा एकादा हुकूमशहा तयार होतो तेव्हा त्याचा उगम अशा पुढारीपणातूनच झालेला असतो.

**अॅडिमँट्स :** हे अगदी उघड आहे.

**सॉक्रेटिस :** असा मनुष्य जुलमी कसा बनतो ? अरकेडियातील लिसिअन झ्यूसच्या देवळासंबंधी असलेल्या कथेतील माणसाप्रमाणे जेव्हा असा पुढारी वागावयास लागतो, तेव्हाच त्याच्यामध्ये फरक पडत नाही काय ?

**अॅडिमँट्स :** कोणती कथा ?

**सॉक्रेटिस** : वरील देवळात, बळी दिलेल्या प्राण्यांच्या आतड्यांबरोबर मनुष्यप्राण्याचे आतडेही मिसळलेले असे आणि ते आतडे जो कोणी खाईल तो लांडगा बनत असे. ही कथा तुम्ही ऐकली नाही काय ?

**ॲडिमँट्स** : होय. मी ऐकली आहे.

**सॉक्रेटिस** : ज्ञातिबांधवांचे रक्त सांडताना अशा मनुष्यास विरोध झाला नाही तर तो लोकांचे ऐकेनासा होतो, शत्रूवर कोणत्याही प्रकारचे खटले भरून त्यांना फाशीची शिक्षा करतो, आपल्याच बांधवाच्या रक्ताची तो अभिलाषा धरतो. तसेच कोणालाही हद्दपार करणे, ठार मारणे, जमिनीची वाटणी करणे अशा प्रकारच्या गोष्टी जर तो करू लागला तर तो शत्रूंकडून नाहीसा तरी केला जाईल किंवा त्याचे लांडग्यात रूपांतर होऊन जुलमी बनेल. याशिवाय त्याचे भविष्य वेगळे काय असणार ?

**ॲडिमँट्स** : असेच त्याचे भविष्य असणार !

**सॉक्रेटिस** : श्रीमंत माणसांबरोबर वाकडे असणाऱ्याचे असेच होणार !

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : असा मनुष्य हद्दपार केल्यानंतर, शत्रूचा विरोध असूनही जर पुन्हा देशात आला तर तो पूर्ण जुलमी होईल ना ?

**ॲडिमँट्स** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : जेव्हा त्याचे शत्रू त्याला हाकलून देण्यास वा राजद्रोहाचा खटला भरून ठार मारण्यास असमर्थ ठरतात, तेव्हा ते त्याला गुप्त रीतीने मारून टाकण्याचा प्रयत्न करतात.

**ॲडिमँट्स** : त्यांचा हा खात्रीचा उपाय असतो.

**सॉक्रेटिस** : परंतु जुलमी लोक, हा गुप्त धोका टाळण्याकरिता खास युक्तीचा अवलंब करतात. लोकपक्षाच्या पुढाऱ्याला शरीरसंरक्षक देण्यात यावा अशी ते मागणी करतात.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : लोकही त्याची मागणी मान्य करतात. कारण स्वःबद्दल त्यांना खात्री असली तरी अन्य पुढाऱ्याबद्दल भीती वाटते.

**ॲडिमँट्स** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : क्रोइसूस जसा भविष्यवाणीच्या आज्ञेप्रमाणे, हेरमुस नदीच्या काठाने पळून जातो व भित्रा म्हटला जाण्याची पर्वा करीत नाही, तसा श्रीमंतीमुळे लोकशाही राज्याचा शत्रू मानला गेलेला मनुष्य, वरील प्रकार पाहून पळून जातो !

**ॲडिमँट्स** : कारण पळून जाण्याची तेवढी एकच संधी त्याला असते.

**सॉक्रेटिस :** ज्यांना पकडतात, त्यांना ठार मारतात.

**ॲडिमँट्स :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** परंतु पुढारी वेगळ्याच प्रकारे वागतो. "त्याचा विस्तीर्ण देह जमिनीवर पडला जाण्याऐवजी" तो इतरांना आपल्या मार्गातून उडवून देतो आणि राज्याच्या रथात बसविला जाऊन एक हुकूमशहा बनतो.

**ॲडिमँट्स :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** अशा हुकूमशहांच्या व हुकूमशाहीच्या सुखाविषयी आता आपण चर्चा करू या ना ?

**ॲडिमँट्स :** होय. अशा चर्चेस आपण सुरुवात करू या.

**सॉक्रेटिस :** जुलूम करण्यास तो नुकतीच सुरुवात करतो तेव्हा तो भेटेल त्याला सुहास्य मुद्रेने नमस्कार करतो. जुलमीपणाची कल्पना नाकारून सार्वजनिक व खाजगी रीत्या लोकांना खूप आश्वासने देतो. तसेच लोकांना व आपल्या पक्षाच्या मंडळींना जमिनीच्या देणग्या व कर्जात सूट देऊन, लोकांशी नम्रपणाने व दयाळूपणाने वागण्याचे तो ढोंग करतो.

**ॲडिमँट्स :** त्याचे वागणे असेच असते.

**सॉक्रेटिस :** काही शत्रूंबरोबर मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करून व काही शत्रूंचा नाश करून, बाह्य शत्रूंच्या काळजीतून मुक्त झाल्यावर, लोकांना आपली नेहमी गरज भासावी म्हणून कायम युद्धाचे वातावरण तो ठेवतो.

**ॲडिमँट्स :** हे वर्तन स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस :** तसेच युद्धाच्या करांनी लोकांना गरीब बनवतो आणि आवश्यक गरजा भागविण्यातच त्यांचा सर्व वेळ जाईल अशी व्यवस्था करून, त्यांना इतर कारस्थाने करण्यास मोकळीकच देत नाही.

**ॲडिमँट्स :** उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** जे लोक त्याला सरळपणे राज्याधिकार उपभोगू देणार नाहीत अशा स्वातंत्र्यप्रेमी लोकांचा जेव्हा त्याला संशय येतो, तेव्हा युद्धाच्या कामगिरीवर त्यांना पाठवून त्यांचा परस्पर काटा काढतो व भयमुक्त होतो. या सर्व गोष्टी करण्याकरिता, जुलमी मनुष्याला कायम युद्धाचे वातावरण ठेवणे आवश्यक आहे ना ?

**ॲडिमँट्स :** होय. आवश्यकच आहे.

**सॉक्रेटिस :** यामुळे लोकांकडून त्याचा अधिकाधिक तिरस्कार होतो.

**ॲडिमँट्स :** स्वाभाविकच आहे.

**सॉक्रेटिस :** त्याच्या पक्षातील काही धैर्यवान व वजनदार गृहस्थ स्वतःचे मत त्याच्याजवळ व आपापसांत निर्भीडपणे बोलून, त्याच्या पद्धतीतील दोष दाखविणार नाहीत काय ?

**अॅडिमँट्स :** अशी आशा बाळगता येईल.

**सॉक्रेटिस :** मग हा जुलमी मनुष्य, स्वतःचा अधिकार कायम रहावा म्हणून, अशा लोकांना आपल्या मार्गातून बाजूला काढून, कोणीही महत्त्वाचा मित्र अथवा शत्रू शिल्लक राहाणार नाही अशी व्यवस्था करील.

**अॅडिमँट्स :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** त्याला चाणाक्षपणाने धीट, उदार, दूरदर्शी, श्रीमंत कोण आहे याचा त्याला शोध घ्यावा लागेल. अखेरीस तो अशा चमत्कारिक परिस्थितीत सापडेल की आपली इच्छा असो वा नसो या सर्वांना शत्रू मानून त्यांच्याविरुद्ध कारस्थाने करून त्यांची घाण त्याला राज्यातून काढावी लागेल.

**अॅडिमँट्स :** वा ! हे फारच चांगले शुद्धिकरण आहे.

**सॉक्रेटिस :** डॉक्टर जशी शरीरातील घाण काढतात त्याउलट ही पद्धत आहे. डॉक्टर चांगले ठेवतात आणि वाईट तेवढे काढून टाकतात ; पण हुकूमशहा चांगले बाहेर काढतो व वाईट तसेच ठेवतो.

**अॅडिमँट्स :** राज्य चालविण्यासाठी त्याला हेच करावे लागते.

**सॉक्रेटिस :** तो अशा लोकांच्या सहवासात राहतो जे कुचकामी असतात. त्यामुळे त्यांचा तिरस्कार तरी सहन करावा किंवा आपणच जगू नये अशी त्याची दुःखद अवस्था होते.

**अॅडिमँट्स :** दुसरा मार्गच नाही.

**सॉक्रेटिस :** याकरिताच अशा वर्तनाने ज्या प्रमाणात तो लोकांच्या तिरस्काराला पात्र होतो, त्या प्रमाणात अधिक विश्वासू शरीरसंरक्षक त्याला ठेवावे लागतात.

**अॅडिमँट्स :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** परंतु तो कोणावर विश्वास ठेवणार ? शिवाय त्याला असे विश्वासू लोक कसे मिळणार ?

**अॅडिमँट्स :** पैशाच्या आशेने खूप लोक जमतील.

**सॉक्रेटिस :** मधुशोषक वृत्तीचे परकीय समूह तुला अभिप्रेत आहेत असे मला वाटते.

**अॅडिमँट्स :** हो. खरे आहे.

**सॉक्रेटिस .** पण स्थानिक लोकांतूनच संरक्षकांची भरती तो करणार नाही का ?

**अॅडिमँट्स :** ती कशी ?

**सॉक्रेटिस** : लोकांकडे असलेले गुलाम घेऊन, त्यांना स्वातंत्र्य देऊन, आपले रक्षक म्हणून ठेवणार नाही का ?

**अॅडिमँट्स** : असे करण्यास तो कचरणार नाही हे निश्चित. अशीच विश्वासू माणसे त्याचे नोकर बनतील.

**सॉक्रेटिस** : तुझ्या वर्णनानुसार हुकूमशहा सुदैवी आणि सुखी मानला पाहिजे. पूर्वीच्या व्यक्तींचा नाश करून तो अशा व्यक्तींना स्वतःचे मित्र आणि विश्वासू नोकर करतो.

**अॅडिमँट्स** : तो हा मार्ग स्वीकारतो हे खरे.

**सॉक्रेटिस** : हे नवे लोक त्याची खूप प्रशंसा करतात. त्याच्याबरोबर मैत्री करतात. पण चांगले लोक त्याचा तिरस्कार करतात. त्याला टाळतात. खरे ना ?

**अॅडिमँट्स** : यात शंका नाही.

**सॉक्रेटिस** : शोकान्त नाटकांना योग्य कारणाने लोक चांगले मानतात. यूरिपिडिसला म्हणूनच ते निष्णात लेखक मानतात.

**अॅडिमँट्स** : ते का ?

**सॉक्रेटिस** : त्याने जे लिहिले आहे त्यावरून तो विचारी असला पाहिजे. " हुकूमशहा शहाण्यांशी संभाषण केल्याने शहाणे होतात." ज्या लोकांशी हुकूमशहाची संगत असते त्यांनाच येथे 'शहाणे' म्हटले आहे.

**अॅडिमँट्स** : युरिपिडिस किंवा अन्य कवी यांनी पण जुलूम हा दैवी गुण मानून त्याची प्रशंसा केली आहे.

**सॉक्रेटिस** : शोकान्त काव्याचे कवी शहाणे असल्याने, आपले अनुकरण करणाऱ्या अन्य राज्यकर्त्यांनी, ते जुलमाची प्रशंसा करीत असल्याने, त्यांना आपल्या राज्यात प्रवेश दिला नाही तर क्षमा करतील.

**अॅडिमँट्स** : सर्व सज्जन, शोकान्त कवी निदान आपल्याला क्षमा करतील.

**सॉक्रेटिस** : पण अन्य राज्यात ते गेल्यावर लोकसमूह गोळा करतील, आकर्षक मोठा परिणामकारक आवाज असणारी नट-मंडळी गोळा करतील. आपली नाटके लोकांना ऐकवतील आणि अशा रीतीने सध्याच्या राज्यपद्धतीचे परिवर्तन हुकूमशाही, लोकशाही यात घडवतील, असे मला वाटते.

**अॅडिमँट्स** : खात्रीनेच ते असे करतील.

**सॉक्रेटिस** : याकरिता विशेषतः हुकूमशहाकडून आणि कमी प्रमाणात लोकशाही नेत्याकडून त्यांना पारितोषिक, सन्मान मिळेल. जसजसे ते या राज्यघटना प्रकारांच्या अधिकाधिक वरच्या श्रेणीवर जातात तसतशी त्यांची शक्ती कोंडली जाते आणि सन्मान कमी होतो.

**ॲडिमँट्स** : अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस** : पण हे विषयांतर झाले. हुकूमशहाचे चांगले, मोठे, विविध, बदलणारे लष्कर कसे पोसले जाते त्याविषयी आपण बोलू.

**ॲडिमँट्स** : जर खात्यात धार्मिक आणि पवित्र मालमत्ता असेल तर हुकूमशहा ती खर्च करील. या विक्रीच्या उत्पन्नाच्या प्रमाणात लोकांना कमी युद्धकर द्यावे लागतील.

**सॉक्रेटिस** : पण हे उत्पन्न संपल्यावर तो काय करील ?

**ॲडिमँट्स** : मित्र, भोजनभाऊ, प्रेमपात्रे यांच्या आणि आपल्या पोषणासाठी तो वडिलांच्या संपत्तीतून पैसे घेईल.

**सॉक्रेटिस** : तुझा अभिप्राय समजला. ज्या लोकांनी त्याला निर्माण केले तेच त्याचे आणि त्याच्या परिवाराचे पोषण करतील.

**ॲडिमँट्स** : त्याशिवाय मार्गच नाही.

**सॉक्रेटिस** : कृपया तुझ्या विधानाचे स्पष्टीकरण कर. अशी कल्पना करू की, लोकांना हे पसंत नसले तर ते म्हणतील की, सज्ञान मुलांचे पोषण पित्याने करणे अन्यायाचे आहे. मुलानेच पित्याचे पोषण केले पाहिजे. लोकांनी ज्याला पुढारी केले त्याचा हेतू असा नव्हता की, तो मोठा झाल्यावर लोकांनी त्याचे गुलाम व्हावे. त्याचे आणि त्याच्या परिवाराचे पोषण करावे. उलट, लोकांची अशी इच्छा होती की, त्याच्या नेतृत्वामुळे राज्यातील श्रीमंत आणि प्रतिष्ठित लोकांच्या गुलामगिरीपासून लोकांची मुक्तता होईल. म्हणून पिता आपल्या मुलाला आणि त्याच्या मित्रांना घरातून हाकलून देतो. तसे लोक, त्या परिस्थितीत, जुलमी व्यक्तीस त्याच्या मित्रासकट निघून जाण्याच्या आज्ञा करतात. मग काय घडेल ?

**ॲडिमँट्स** : लोकांना हे कळून चुकेल की, ज्याला आपण निर्माण केले, चढविले, लाडावले त्याच्यापुढे लोक फारच दुबळे आहेत. त्याला हाकून लावणे हे दुर्बलाचे समर्थाबरोबरचे युद्ध होय.

**सॉक्रेटिस** : काय म्हणतोस ? हुकूमशहा लोकांवरच हात उगारेल ? स्वतःच्या इच्छेप्रमाणे पिता वागत नाही म्हणून त्यालाच मारील ?

**ॲडिमँट्स** : पित्याच्या हातातील शस्त्रे काढून तो असेच करील.

**सॉक्रेटिस** : यावरून असे दिसते की, हुकूमशहा पितृहत्या करतो. वृद्धाची सेवा करणारी कठोरहृदयी दायी असा तो असतो. त्यानंतर ते राज्य म्हणजे उघडउघड हुकूमशाही बनते. प्रचलित म्हणीप्रमाणे राज्यातील नागरिक स्वतंत्र लोकराज्याच्या अग्नीतून बाहेर पडतात आणि हुकूमशाही गुलामगिरीच्या फुफाट्यात सापडतात. प्रजेला स्वैर आणि अतिरेकी स्वातंत्र्यामधून कठोर आणि कडवट गुलामगिरी स्वीकारावी लागेल.

**ॲडिमँट्स :** अशी स्थिती होणार यात शंका नाही.

**सॉक्रेटिस :** लोकशाहीतून हुकूमशाहीचा जन्म कसा होतो, तिचे स्वरूप काय असते याविषयी आपली समाधानकारक चर्चा झाली आहे असे आपण म्हटले तर योग्य होईल ना ?

**ॲडिमँट्स :** हो. आपली चर्चा समाधानकारक झाली.

**सॉक्रेटिस :** लोकशाही प्रवृत्तीच्या माणसाचे हुकूमशाही प्रवृत्तीच्या माणसात कसे परिवर्तन होते व ते झाल्यानंतर त्याचा स्वभाव कसा बनतो व त्याचे आयुष्य कसे असते—सुखावह की दुःखावह—या प्रश्नांचा विचार आता आपणांस करावयाचा आहे.

**ॲडिमँट्स :** होय. या प्रश्नांचा विचार अजून राहिलाच आहे.

**सॉक्रेटिस :** आणखी एक प्रश्न शिल्लक राहिला आहे, तो तुम्हांस माहीत आहे काय ?

**ॲडिमँट्स :** तो कोणता ?

**सॉक्रेटिस :** वासनांची संख्या व स्वरूप आपण निश्चित केले नाही असे मला वाटते आणि जोपर्यंत हे काम झाले नाही तोपर्यंत आपली चर्चा दुर्बोधच राहील.

**ॲडिमँट्स :** हे काम करण्याची वेळ गेली काय ?

**सॉक्रेटिस :** निश्चितच नाही. मी जो मुद्दा आता मांडणार आहे त्याचा नीट विचार करा. काही अनावश्यक सुखे व वासना, बेकायदेशीर असतात. प्रत्येकात अशा वासना असतातच. परंतु काही लोकांमध्ये कायद्याच्या व विवेकबुद्धीच्या निर्बंधामुळे चांगल्या प्रकारच्या वासना निर्माण केल्या जाऊन, अनावश्यक सुखे व वासना नाहीशा होतात; आणि इतर लोकांच्या बाबतीत मात्र त्या अधिक बळकट होतात.

**ॲडिमँट्स :** कोणत्या वासना तुम्हांला अभिप्रेत आहेत ?

**सॉक्रेटिस :** झोपेच्या अवस्थेमध्ये ज्या वासना जागृत होतात, त्यांच्याविषयी मी बोलत आहे. विवेकी, नम्र व अधिकार गाजविणारा असा आत्म्याचा भाग जेव्हा झोपी जातो, त्याच वेळेस मांस व मद्य यांनी भरलेला रानटी व पाशवी भाग डोके वर काढतो आणि आपल्या वासनांची पूर्ती करण्याकरिता प्रयत्न करतो. तुम्हाला माहीत आहेच की, अशा वेळेस तो लज्जा आणि विचार यांच्यापासून मुक्त असल्यामुळे कोणतीही गोष्ट करण्यास तो मागेपुढे पाहात नाही. आईशी अथवा एखाद्या पुरुषाशी, देवतेशी अथवा पशूशी अपवित्र असा संगम करण्यास तो भीत नाही. अमानुष खून करण्यास व अशुद्ध असे मांस खाण्यासही तो मागेपुढे पाहात नाही. थोडक्यात म्हणजे त्याचा मूर्खपणा व उद्धटपणा कोणत्या थराला जाईल ते सांगता येत नाही.

**ॲडिमँट्स :** तुमचे वर्णन अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** परंतु निरोगी व संयमी मनुष्य, झोपण्यापूर्वी विवेकी भागाला जागृत करून त्याला उच्च विचार व चर्चा यांची मेजवानी देतो. तसेच वासनात्मक भागाने डोके वर काढून

आत्म्याच्या उच्चतम भागाला त्रास देऊ नये म्हणून, त्यांची थोडी तृप्ती करून, त्या भागाला झोप येईल असे करतो आणि उच्चतम भागाला एकाग्रतेने व चिकाटीने भूत, वर्तमान व भविष्य ह्या काळांतील अज्ञाताचे ज्ञान प्राप्त करून घेण्याचे स्वातंत्र्य मिळावे म्हणून विकाराची प्रत्येक उसळी दाबून ठेवतो. म्हणजेच तीन तत्त्वांपैकी दोन तत्त्वांना शांत करून ज्ञानाच्या तिसऱ्या तत्त्वाला जागृत करून झोपावयास जातो. अशा वेळेसच त्याला सत्याचे ज्ञान होते आणि स्वप्नामध्ये त्याला जी दृश्ये दिसतात ती चांगली असतात.

**ॲडिमँट्स** : माझे मत तुमच्यासारखेच आहे.

**सॉक्रेटिस** : वरील विषयाबद्दल बोलताना आपण बरेच वाहवत गेलो. आपल्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की, प्रत्येक माणसात उच्छृंखल व दुराचारी वासनांची अशी एक भयंकर जात असते. आपण जितेंद्रिय आहोत असे वाटत असले तरी ते पूर्ण सत्य नसते. कारण अशा वासना झोपेत जाग्या होतात. माझे म्हणणे तुम्हाला पटते का ? तुमचेही मत असेच आहे का ?

**ॲडिमँट्स** : होय. माझे मत असेच आहे.

**सॉक्रेटिस** : पुढाऱ्याच्या स्वभावाचे आपण जे वर्णन केले त्याची आठवण करा. धनार्जनाच्या वासनाच तेवढ्या आवश्यक मानणाऱ्या आणि करमणूक व डामडौल तृप्त करणाऱ्या अनावश्यक वासनांचा तिरस्कार करणाऱ्या कंजूष बापाच्या तालमीत, अशा मनुष्याचे लहानपण गेलेले नसते काय ?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : आपण आताच वर्णन केलेल्या वासनाही परिपूर्ण अशा रंगेल माणसांची मैत्री करून, त्यांच्याप्रमाणेच धुंद होऊन तो आपल्या बापाच्या कंजूषपणाचा तिरस्कार करतो. परंतु त्याला बिघडविणाऱ्या लोकांपेक्षा त्याचा स्वभाव चांगला असल्यामुळे दोन विरुद्ध प्रवृत्तींकडे आकर्षिला जाऊन, शेवटी तो मधल्या स्वभावाच्या प्रवृत्तीचा स्वीकार करतो. स्वतःच्या समजुतीप्रमाणेच प्रत्येक सुखाचा आस्वाद घेऊन अनुदार व कायद्याविरुद्ध आयुष्य न घालविता, अर्थसत्ताक वृत्तीतून लोकशाही वृत्तीचा बनतो.

**ॲडिमँट्स** : माझेही मत असेच होते व आहे.

**सॉक्रेटिस** : ठीक. आता अशी कल्पना करा की, असा मनुष्य वृद्ध झाला असून त्याचा मुलगा त्याच्या तालमीत वाढत आहे.

**ॲडिमँट्स** : मी अशी कल्पना केली असे समजा.

**सॉक्रेटिस** : पुढे अशीही कल्पना करा की, त्याच्या बापाने जे मार्ग अनुसरले तेच मार्ग हा तरुण अनुसरित आहे. कायद्याचे उल्लंघन करण्याची, आणि त्याला बिघडविणाऱ्या लोकांच्या भाषेत बोलावयाचे झाले तर पूर्ण स्वातंत्र्याची त्याला परवानगी आहे. त्याचे वडील व इतर नातलग मध्यम प्रतीच्या वासनांना प्रोत्साहन देत असले तरी दुसऱ्या बाजूने तितकाच

जोरदार प्रतिकार होत आहे. अशा वेळी हे जुलमी जादूगार, इतर मंत्रांनी जर त्याचे मन वळविता आले नाही, तर उधळपट्टी करणाऱ्या वासनांचा पुरस्कार करणारा विकार त्याच्या मनात निर्माण करतात. हा विकार म्हणजेच पंखयुक्त मोठा भ्रमर होय. अशा लोकांनी उत्पन्न केलेल्या विकाराचे वर्णन तुम्ही दुसऱ्या प्रकारे करू शकाल काय?

**ॲडिमँट्स** : नाही. मला करता येणार नाही.

**सॉक्रेटिस** : असे झाल्यानंतर धूप, सुवासिक तेले, मध व इतर खाद्यपदार्थ ह्यांनी परिपूर्ण अशा वासना या भ्रमराभोवती गुंगूं करतात. त्याची स्तुती करून त्याच्यामध्ये तीव्र इच्छा निर्माण करतात. तेव्हापासून हा प्रमुख विकारभ्रमर उन्मादाला आपला शरीरसंरक्षक करतो. चांगली मते व वासना त्याला स्वतःमध्ये आढळून आल्यास त्यांना तो हाकलून लावतो व संयमाला छाट देऊन उन्मादाच्या अधीन होतो.

**ॲडिमँट्स** : जुलमी मनुष्याच्या उत्पत्तीचे तुम्ही चांगले वर्णन केले.

**सॉक्रेटिस** : ह्याच कारणामुळे प्रेमालाही जुलमी म्हटले जाते ना?

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : मित्रा, दारुडा मनुष्यही जुलमी स्वभावाचा असतो ना?

**ॲडिमँट्स** : असतो.

**सॉक्रेटिस** : वेडा अथवा मेंदूत बिघाड झालेला मनुष्य, केवळ माणसांवरच नव्हे तर देवांवरही अधिकार गाजविण्याची आपली लायकी आहे असे समजतो.

**ॲडिमँट्स** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : म्हणूनच मित्रवर्या, जेव्हा स्वभावामुळे वा सवयीमुळे मनुष्य हुकूमशहा बनतो, तेव्हा मद्याच्या, प्रेमाच्या वा वेडेपणाच्या अधीन तो झाला आहे असे समजावे.

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : अशा प्रकारे त्याचा उगम व स्वभाव असतो. आता त्याची राहणी कशी असते?

**ॲडिमँट्स** : तेही तुम्हीच सांगावे.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. ज्या लोकांची मने जुलमी विकाराच्या अधीन गेलेली असतात त्या लोकांचे आयुष्य मेजवान्या, नाचरंग, मद्यपान, स्त्रीसहवास व अशाच प्रकारची सुखे अनुभविण्यात व्यतीत होत असते.

**ॲडिमँट्स** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : रोज दिवसा व रात्री गरजांमधून निर्माण होणाऱ्या भयंकर वासना उत्पन्न होतात ना?

**ॲडिमँट्स** : होय. पुष्कळच.

**सॉक्रेटिस** : त्यामुळेच जवळ असलेला पैसा संपून जातो.

**ॲडिमँट्स** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : त्यानंतर पैसा उभा करण्याच्या योजना तयार केल्या जाऊन मालमत्तेचा नाश सुरू होतो.

**ॲडिमँट्स** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : जेव्हा उत्पन्नाच्या प्रत्येक गोष्टीचा नाश होतो, तेव्हा शरीरातील वासना आकांडतांडव सुरू करतात. प्रभुत्व गाजविणारा विकार व त्याच्या संरक्षक अशा इतर वासना ह्यांच्या ताब्यात गेल्याने, असे लोक रागाच्या भरात एखाद्या श्रीमंत मनुष्याला फसवणुकीने व अत्याचाराने लुबाडण्यास तयार होत नाहीत काय ?

**ॲडिमँट्स** : होय. त्यांना असे करणे भाग पडते.

**सॉक्रेटिस** : कारण ते कोणाला लुबाडू शकले नाहीत तर त्यांना भयंकर यातना व दुःखे यांना तोंड द्यावे लागते.

**ॲडिमँट्स** : होय.

**सॉक्रेटिस** : मागाहून निर्माण झालेली सुखे, पूर्वीच्या सुखांना बाजूला सारून आपले वर्चस्व निर्माण करतात त्याप्रमाणेच असा मनुष्य आपल्या आईबापांपेक्षा लहान असूनही, त्यांना मागे सारीत नाही काय ? तसेच स्वतःजवळची संपत्ती संपली म्हणजे वडिलांच्या संपत्तीतून आपला खर्च चालवीत नाही काय ?

**ॲडिमँट्स** : होय. तो असेच करतो.

**सॉक्रेटिस** : त्याचे आईबाप त्याच्या इच्छांना विरोध करू लागले तर तो त्यांना फसविण्याचा प्रयत्न करणार नाही काय ?

**ॲडिमँट्स** : खात्रीनेच करील.

**सॉक्रेटिस** : फसविता येणे शक्य नसले, तर अत्याचाराने त्यांना लुबाडण्यास कमी करील काय ?

**सॉक्रेटिस** : अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस** : त्याचे वृद्ध आई-वडील त्याला विरोध करू लागले तर तो त्यांच्यावर हुकमत गाजवील ना ?

**ॲडिमँट्स** : अशा मनुष्याच्या आई-वडिलांबद्दल मला काळजीच वाटते.

**सॉक्रेटिस** : ॲडिमँट्स, नात्याचा संबंध नसलेल्या व अनावश्यक अशा वेश्येविषयी त्याला वाटणारे प्रेम नवीन असते. पण स्वतःला जन्म देणाऱ्या व आवश्यक अशा आईविषयीचे प्रेम

नसते. तसेच पूर्वी संबंध नसलेल्या पण ऐन जवानीत असणाऱ्या मित्रांबद्दल त्याला वाटणारे प्रेम नवीन असते, पण निस्तेज, वृद्ध पण जुन्या अशा स्वतःच्या बापाविषयीचे त्याचे प्रेम नाहीसे होते. आपल्या प्रिय वेश्येकरिता व मित्रांकरिता तो आईबापांना ठोकरतो. त्यांना घरात आणून तो आईबापांना त्यांचे गुलाम करणार नाही काय?

**ॲडिमँट्स :** माझी अशी खात्री आहे की तो असेच करील.

**सॉक्रेटिस :** एकंदरीत जुलमी मुलाचे आईबाप होणे भाग्याचे आहे ना?

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** आई-वडिलांजवळची संपत्ती संपली तर सुखाचे भुंगे सुटत नाहीत. त्यामुळे एखाद्या घरात जबरदस्तीने घुसणे, किंवा रात्रीच्या वेळी वाट चुकलेल्या प्रवाशांना लुबाडणे यांसारख्या गोष्टी तो करील. हाच त्याचा पहिला धिटाईचा पराक्रम होईल. नंतर एखाद्या देवळातील ऐवज चोरून नेण्याचे धाडसही तो करील. वाईट व चांगल्या कर्माविषयी जी लहानपणापासून जुनी व योग्य मते ऐकली असतील त्यांचा गुलामगिरीतून मुक्त झालेल्या मतांकडून पराभव होईल. कारण दुसरी मते ही अधिष्ठित विकाराची संरक्षक असल्यामुळे त्या विकारांकडून त्यांना मदत मिळेल. जोपर्यंत कायद्याला व बापाला तो जुमानीत होता व त्याचा स्वभाव लोकशाही प्रवृत्तीचा होता तोपर्यंत ही मते झोपेतील स्वप्नामध्येच फक्त स्वतंत्र असत. पण आता विकार हा त्याचा मालक झाल्यावर जो स्वभाव त्याचा स्वप्नामध्ये असायचा तो आता कायमचा होऊन बसतो. भयानक खून, निषिद्ध मांस, अपवित्र कृत्य ह्यांपैकी काहीही करताना तो बिचकत नाही. अत्यंत बजबजपुरी व बेकायदेशीरपणा यांनी भरलेला हा विकार त्याच्या हृदयात स्थान मिळवून त्याच्यावर अधिकार गाजवीत असतो. हा अधिकार पूर्ण अधिकारी बनल्यामुळे, जुलमी राजाप्रमाणे अमर्याद बेपर्वाई दाखविण्यास तो उत्तेजन देतो. स्वतःच्या व इतर वासनांच्या पूर्तिसाठी वाटेल ती उपाययोजना करण्यास भाग पाडतो. कुसंगती, कुविचार ह्यांच्यामुळे मनावरील ताबा नाहिसा होऊन, वरील वासना अंतःकरणात प्रवेश करतात. अशा मनुष्याच्या आयुष्याचे मी जे वर्णन केले ते बरोबर आहे ना?

**ॲडिमँट्स :** होय.

**सॉक्रेटिस :** अशा स्वभावाचे लोक एखाद्या शहरात थोडे असले आणि शांत विचाराचे लोक जास्त असले तर ते शहर सोडून दुसऱ्या एखाद्या हुकूमशहाच्या संरक्षकवर्गात सामील होतात. किंवा कोठे युद्ध चालू असेल तर पगारी सैनिक म्हणून काम करतात. पण शांततेच्या काळातच शहरात राहात असतील तर लहान प्रमाणावर नुकसान करणाऱ्या गोष्टी करीत असतात.

**ॲडिमँट्स :** त्या कोणत्या?

**सॉक्रेटिस :** चोरी अथवा घरफोडी करणे, खिसे कापणे, कपडे चोरणे, देऊळ लुटणे, माणसे पळविणे अशांसारखे गुन्हे ते करतात. चुगलखोर स्वभाव असेल तर गुप्तहेराचे काम करून खोटया साक्षी देतात व लाच खातात.

**अॅडिमँट्स :** असे लोक जर संख्येने लहान असतील तर नुकसानही कमी प्रमाणात होईल.

**सॉक्रेटिस :** ज्या गोष्टी लहान त्यांचे महत्त्वही कमी असते. म्हणूनच या गोष्टी राज्यामध्ये लाचखाऊपणा व दुःख वाढवीत असल्या तरी जुलमी प्रमाणाइतके त्याचे प्राबल्य नसते. असे लोक व त्यांच्या अनुयायांची संख्या जेव्हा राज्यात वाढते व लोकही मूर्खपणाने त्यांना मदत करतात, तेव्हा त्यांच्यापैकीच अत्यंत जुलमी मनुष्य त्यांचा पुढारी होतो.

**अॅडिमँट्स :** असा मनुष्य अत्यंत जुलमी असला पाहिजे. म्हणूनच त्याला पुढारीपण मिळते.

**सॉक्रेटिस :** शहरातील लोक जोपर्यंत खुषीने आज्ञा पाळतात तोपर्यंत सर्व काही सुरळीत असते. पण ते जेव्हा विरोध करतात तेव्हा जुलमी मनुष्य आपल्या तरुण मित्रांच्या सहाय्याने आईबापांप्रमाणेच इतरांना शासन करतो. अशाच लोकांच्या मदतीने आपल्या पितृदेशावर अथवा क्रिटन्स म्हणतात त्याप्रमाणे मातृदेशावर अधिकार गाजवितो. अशा मनुष्याच्या वासनांचा हाच शेवट होय.

**अॅडिमँट्स :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** अधिकार मिळण्याअगोदर खाजगी वागण्यात त्याचा स्वभाव असाच असतो. व्यवहारात त्यांचे सर्व मित्र हे त्यांचे भाट व आश्रित असतात. आपले काम साधावयाचे असेल तेव्हा नम्रपणा धारण करून, दाट मैत्रीचे ढोंग ते करतात. पण काम साधल्यावर साधी ओळखही देत नाहीत.

**अॅडिमँट्स :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** अशा प्रकारे त्यांचे आयुष्य मित्रविहीन असते. ते नेहमी धनी किंवा गुलाम असतात. कारण जुलमी स्वभावाच्या मनुष्याला खरे स्वातंत्र्य व मैत्री कधीच अनुभविता येत नाही.

**अॅडिमँट्स :** अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस :** अशा लोकांना विश्वासघातकी म्हटले तर बरोबर होईल ना ?

**अॅडिमँट्स :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** न्यायाच्या स्वरूपाविषयी पूर्वी आपण जे सिद्धांत मांडले ते जर बरोबर असतील तर हे लोक नुसतेच विश्वासघातकी नसतात तर अत्यंत अन्यायी असतात.

**अॅडिमँट्स :** आपले सिद्धांत पूर्णतया बरोबर आहेत.

□ □

## प्रकरण तेहतीस

# सुखी कोण? न्यायी व्यक्ती की अन्यायी व्यक्ती?

**[IX-576-B—588-A]**

**कथासूत्र :**

[न्यायाच्या प्रस्थापनेसाठी जीवन समर्पण केलेला तत्त्वज्ञ राज्यकर्ता आणि अन्यायाचा मूर्तिमंत पुतळा असणारा हुकूमशहा यांपैकी कोणाचे जीवन खरे सुखी असते याविषयी प्लेटोने तीन भूमिका मांडून ज्ञानी आणि न्यायी अशी व्यक्ती अज्ञानी आणि अन्यायी माणसापेक्षा खरी सुखी असल्याचे दाखविले आहे.

प्लेटोच्या मते, ज्याच्या इच्छा कधीच पूर्ण होत नाहीत, त्यास श्रीमंत म्हणता येत नाही. वासनांच्या आहारी गेलेला आणि भयाच्या दडपणाखाली राहणारा हुकूमशहा खरे सुख मिळवू शकत नाही. स्वेच्छाचार हे खरे स्वातंत्र्य नव्हे. विशुद्ध आत्मप्रवृत्तीतून स्फुरणारा विवेक माणसाला पूर्ण कल्याणाची दिशा दाखवितो. त्या दिशेचा अवलंब हे खरे स्वातंत्र्य होय.

हुकूमशहाचे व्यक्तिमत्त्व विभागलेले, विस्कळीत, अव्यवस्थित असते. प्लेटोच्या मते वासना, अस्मिता आणि प्रज्ञा यांमधील सुसंवाद म्हणजे न्याय व खरे सुख होय. ते फक्त ज्ञानी आणि न्यायी माणसालाच मिळू शकते.

हुकूमशहाचे सुख व्यक्ती, वस्तू व घटना यांवर अवलंबून असते. त्या सुखाला देश, काल आणि शरीर यांच्या मर्यादा असतात. त्याचे स्वरूप फक्त ऐहिक असते. तत्त्वचिंतकाला मिळणारे सुख हे निरपेक्ष, अमर्याद आणि शाश्वत स्वरूपाचे असते.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** आता अत्यंत जुलमी अशा माणसाचे वर्णन आपण करू या. कल्पनेने ज्या स्थितीचे आपण वर्णन केले, त्यांची खरोखरीच तशी स्थिती असते.

**ॲडिमँटस :** अगदी बरोबर.

**सॉक्रेटिस :** अतिशय जुलमी स्वभावाच्या माणसाला अनियंत्रित सत्ता भोगावयास मिळाली म्हणजे त्याचा शेवट असाच होतो. ज्या प्रमाणात त्याचा जुलमीपणा वाढत जातो त्या प्रमाणात तो आपल्या वर्णनाच्या अधिक जवळ येतो.

**ग्लॉकॉन :** हे निःसंशय खरे आहे.

**सॉक्रेटिस :** हे जर खरे असेल तर जो अत्यंत जुलमी असतो, तो अत्यंत दुःखीही असतो असे सिद्ध होईल. लोकांच्या विचारात कितीही मतभेद असोत, जितक्या तीव्र व दीर्घ प्रमाणात अशा माणसांची जुलमी वागणूक चालू असते तितक्याच प्रमाणात त्याचे आयुष्य दुःखी होत नाही काय ?

**ग्लॅकॉन :** हे खरे आहे.

**सॉक्रेटिस :** हुकूमशाही राज्याचा मनुष्य हुकूमशाही प्रवृत्तीचा असतो व लोकशाही राज्याचा मनुष्य लोकशाही प्रवृत्तीचा असतो असे आपल्याला म्हणता येईल का ?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच म्हणता येईल.

**सॉक्रेटिस :** त्यामुळेच सद्‌गुण व सुख या बाबतीत शहरांची जशी तुलना करता येते, तशीच माणसांचीही करता येईल ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** सद्‌गुणाच्या बाबतीत जुलमी मनुष्याच्या अधिपत्याखाली शहर व आपण प्रथम वर्णन केलेल्या राजाच्या अधिपत्याखाली शहर यांच्यामध्ये काही फरक असतो का ?

**ग्लॅकॉन :** ती एकमेकांच्या बरोबर विरुद्ध असतात. एक अत्यंत सद्‌गुणी तर दुसरे अत्यंत दुर्गुणी असते.

**सॉक्रेटिस :** कोणते सद्‌गुणी व कोणते दुर्गुणी हे विचारण्याची आवश्यकताच नाही. कारण ते अगदी स्पष्ट आहे. पण सुख व दुःख यांचा प्रश्न तुम्ही कसा सोडविणार ? समाजाचा एक घटक म्हणून जुलमी मनुष्य व त्यांचे निकटवर्ती यांच्याकडे बघून, आपण दिपून जाता कामा नये. राज्याची सर्वसामान्य पाहणी करून नंतर मत बनविणे हेच अधिक योग्य आहे. त्यानुसार राज्यातील प्रत्येक भागाचे आपण निरीक्षण केले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** तुमची सूचना योग्य आहे. जुलमी राजाचे शहर अत्यंत दुःखी असते व एकसत्ताक शहर अत्यंत दुःखी असते असे सगळ्यांनाच आढळून येते.

**सॉक्रेटिस :** या दोन राज्यपद्धतीच्या लोकांविषयी मत ठरवीत असताना, लहान मुलाप्रमाणे केवळ बाह्य दिमाखाने दिपून न जाता, जो मनुष्यस्वभावाचे सूक्ष्मपणे निरीक्षण करतो अशा मनुष्याचे मतच आपण ग्राह्य धरणे बरोबर आहे ना ? ज्या मनुष्याबद्दल विचार करावयाचा आहे त्याचे वर्तन जवळून ज्याने पाहिले आहे, आपल्या कुटुंबियांशी तो कसा वागतो हे ज्याने पाहिले आहे–कारण घरात वागताना असा मनुष्य नाटकीपणा सोडून देतो–आणि सार्वजनिक प्रसंगीही तो कसा वागतो हे बघितले आहे अशा अनुभवी न्यायाधीशालाच, या सर्व गोष्टी लक्षात घेऊन, सुखाच्या व दुःखाच्या बाबतीत जुलमी माणसाशी तुलना कशी होते, याविषयी मत देण्यास सांगितले तर योग्य होईल ना ?

**ग्लॅकॉन :** ही सूचनाही पूर्ण योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या प्रश्नास उत्तर देण्यास आपण योग्य माणूस निवडला पाहिजे. वरील प्रकारच्या लोकांचा आपण अनुभव घेतला आहे त्याअर्थी आपणच योग्य न्यायाधीश आहोत असे म्हणणे योग्य होईल ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** पुढील प्रश्नांचा विचार तुम्ही करावा अशी मी तुम्हांला विनंती करतो. राज्य व व्यक्ती यांच्यातील साम्य लक्षात घेऊन, दोहोंचा व्यक्तिशः विचार करून, त्यांची परिस्थिती कशी असते ते सांगा.

**ग्लॅकॉन :** कोणत्या परिस्थितीविषयी तुम्ही म्हणत आहात ?

**सॉक्रेटिस :** प्रथम राज्याबद्दल विचार करू. जुलमी मनुष्याच्या अधिपत्याखाली राज्य स्वतंत्र असते की परतंत्र ?

**ग्लॅकॉन :** पूर्ण गुलामगिरीत असते.

**सॉक्रेटिस :** असे असूनही त्यात श्रीमंत व स्वतंत्र लोक दिसतात ना ?

**ग्लॅकॉन :** असे काही लोक दिसतात हे खरे आहे. पण राज्यातील बहुतेक लोकांना अत्यंत अपमानकारक अवस्थेत व पारतंत्र्यात राहावे लागते.

**सॉक्रेटिस :** ज्याअर्थी जुलमी मनुष्य अशा राज्याचे प्रतिबिंब असतो, त्याअर्थी त्याच्या स्वतःच्या बाबतीतही असाच प्रकार असणार नाही काय ? त्याचा आत्मा गुलामगिरीतच असेल ना ? आत्म्याचा उत्तम भाग गुलामगिरीत व क्षुद्र भाग प्रभुत्व पावलेला अशीच स्थिती आपणांस त्याच्या बाबतीत दिसते ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** मग असा आत्मा गुलाम असेल की स्वतंत्र असेल ?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच गुलाम असणार.

**सॉक्रेटिस :** जुलमी मनुष्याच्या गुलामगिरीत असलेले शहर, स्वतंत्रपणे वागण्यास असमर्थ असेल ना ?

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** मग जुलमी मनुष्याचा आत्माही स्वतंत्रपणे वागू शकणार नाही. उलट विकारयुक्त पाशवी शक्तीने ओढला जाऊन अव्यवस्थित व पश्चात्तापदग्ध होईल.

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** जुलमी राजाचे शहर श्रीमंत असेल की गरीब ?

**ग्लॅकॉन :** गरीबच असणार !

**सॉक्रेटिस :** मग जुलमी मनुष्याचा आत्माही गरीब व लोभी असणार.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** यापेक्षा अधिक रडारड, शोक, दु:खे, यातना दुसरीकडे सापडतील काय ?

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** वासना व आकांक्षा ह्यांच्या आहारी गेलेल्या जुलमी मनुष्याखेरीज इतर कोणाच्या ठिकाणी अशा प्रकारची दारुण अवस्था दृष्टोत्पत्तीस येईल का ?

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** ह्या व इतर गोष्टी लक्षात घेता हे शहर सर्वांत दु:खी होय असे तुम्ही मानता ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** तुमचे म्हणणे बरोबर आहे. ह्याच गोष्टी विचारात घेऊन जुलमी मनुष्याचे वर्णन करता येईल ना ?

**ग्लॅकॉन :** सर्व मनुष्यांत त्याच्याइतका दु:खी कोणी नाही असे माझे मत आहे.

**सॉक्रेटिस :** असे म्हणण्यात तुमची चूक होत आहे.

**ग्लॅकॉन :** ती कशी काय ?

**सॉक्रेटिस :** सर्वांहून हा अधिक दु:खी असे म्हणता येणार नाही.

**ग्लॅकॉन :** मग कोणास म्हणता येईल ?

**सॉक्रेटिस :** पुढील मनुष्य अधिक दु:खी आहे अस तुम्हांला दिसून येईल.

**ग्लॅकॉन :** कोणता ?

**सॉक्रेटिस :** जुलमीपणामुळे ज्याला खाजगी आयुष्य सुखाने घालविता येत नाही असा मनुष्य. सार्वजनिक क्षेत्रात सारखी जुलमी सत्ता गाजवावी लागणे हे त्याचे दुर्दैवच आहे.

**ग्लॅकॉन :** तुमच्या पूर्वीच्या बोलण्यावरून तुमचे म्हणणे बरोबर असेल असा तर्क मी करतो.

**सॉक्रेटिस :** नुसता तर्क करून समाधान मानून घेऊ नका. उलट ज्या तर्कबुद्धीच्या आधारे आपण चर्चा करीत आहोत तिच्या मदतीने ह्या विषयाचा पूर्ण विचार करा. कारण चांगले व वाईट आयुष्य कोणते हे ठरविणे, हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** या प्रश्नाचा विचार करताना आपण खालील गोष्टी लक्षात धरून चर्चेस सुरुवात केली पाहिजे.

**ग्लॅकॉन :** त्या कोणत्या गोष्टी ?

**सॉक्रेटिस :** शहरामध्ये बरेच गुलाम ज्यांच्या पदरी आहेत असे श्रीमंत लोक असतात. त्यांचा विचार स्वतंत्रपणे केला पाहिजे. जुलमी मनुष्याशी त्यांचे एका बाबतीत साम्य असते. ते म्हणजे पुष्कळ लोकांवर सत्ता गाजविणे. जुलमी मनुष्याजवळ गुलामांची संख्या अधिक असते एवढाच काय तो फरक त्या दोघांच्यात असतो.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** असे लोक निर्धास्त असून त्यांना नोकरांची भीती वाटत नाही हे तुम्हांला माहीत आहे ना ?

**ग्लॅकॉन :** होय. पण त्यांची भीती वाटण्याचे कारण काय ?

**सॉक्रेटिस :** वाटू नयेच. पण याचे कारण तुम्हांला माहीत आहे काय ?

**ग्लॅकॉन :** होय. कारण सर्व शहर प्रत्येक व्यक्तीचे रक्षण करते.

**सॉक्रेटिस :** तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण अशी कल्पना करा की, एखाद्या देवतेने, पन्नास अथवा जास्त गुलाम जवळ बाळगणाऱ्या श्रीमंत मनुष्याला त्याची बायको, मुले, सर्व संपत्ती व गुलाम ह्यांच्यासह, जेथे त्याला कोणीही मदत करू शकणार नाही अशा ठिकाणी नेले आहे. अशा वेळेस आपल्याला व बायकामुलांना आपले नोकर ठार मारतील अशी त्याला भीती वाटणार नाही काय ?

**ग्लॅकॉन :** होय. अशी भीती जरूर वाटेल.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच त्याला काही कारण नसतानाही त्यांची खुशामत करणे भाग पडून मोठी आश्वासने देऊन स्वातंत्र्य द्यावे लागेल. आणि मग नोकरांची खुशामत करणारा मालक म्हणून तो ओळखला जाईल ना ?

**ग्लॅकॉन :** असे जर त्याने केले नाही तर तो स्वतःचा मृत्यू ओढवून घेईल.

**सॉक्रेटिस :** पण समजा, त्याच्या भोवती इतरांवर अधिकार गाजविणे सहन होत नाही, इतकेच नव्हे तर असा मनुष्य आढळला तर त्याला शिक्षा करतील, अशा लोकांचा जमाव ठेवण्यात आला तर त्या माणसाची काय अवस्था होईल ?

**ग्लॅकॉन :** तो अधिकच संकटात सापडेल. कारण त्याचे संरक्षकच त्याचे शत्रू बनतील.

**सॉक्रेटिस :** जुलमी मनुष्य अशाच प्रकारच्या परिस्थितीत असतो ना ? कारण आपण वर्णन केल्याप्रमाणे त्याचा स्वभाव असला तर अनेक भीतीदायक गोष्टींनी व वासनांनी वेढलेला असतो. जरी तो लोभी व चौकस असला तरी कोणत्याही स्वतंत्र नागरिकाप्रमाणे प्रवास करण्याची व सृष्टिसौंदर्य न्याहाळण्याची त्याला मोकळीक नसते. घरामध्येच स्वतःला डांबून घ्यावे लागत असल्यामुळे जे नागरिक दूरदेशी प्रवासास जातात, सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेऊ शकतात त्यांचा त्याला हेवा वाटतो.

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** अशा तऱ्हेची वाईट परिस्थिती असतानाच खाजगी आयुष्य सोडायला लागून, दैवयोगाने जुलमी सत्ता त्याच्या हातात येते. तेव्हा त्याची स्थिती याहूनही वाईट होते. कारण ज्याप्रमाणे एखाद्या रोगी व इंद्रियासक्त माणसाला एकांतात वेळ काढू न देता इतर लोकांबरोबर झुंजण्यास पाठविले जाते, त्याप्रमाणे स्वतःवरच ज्याला ताबा ठेवता येत नाही अशा ह्या मनुष्याला दुसऱ्यावर अधिकार गाजविण्यास भाग पाडले जाते.

**ग्लॅकॉन :** सॉक्रेटिस, या गोष्टी नक्कीच सारख्या आहेत व तुमचे वर्णनही अगदी योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** प्रिय मित्रा, जुलमी मनुष्याची स्थिती अत्यंत वाईट असते. ज्या मनुष्याचे आयुष्य अत्यंत दुःखी असते त्यापेक्षाही या माणसाचे आयुष्य अधिक दुःखी असते असेच तुम्हाला वाटते ना ?

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** खरा जुलमी मनुष्य अत्यंत हीन प्रकारचा गुलाम असून, अत्यंत दुर्गुणी माणसाचा खुशमस्कऱ्या असतो. स्वतःची एखादी लहानशी गोष्ट जरी पुरविण्याची शक्ती त्याच्याजवळ नसली तरी असंख्य गोष्टी त्याला आवश्यक वाटतात. आध्यात्मिक दृष्ट्या असा मनुष्य खरोखरी भिकारीच असतो. ज्या राज्यावर त्याची सत्ता असते त्याप्रमाणे त्याचा स्वभाव असला तर आयुष्यभर त्याला भीती, क्षोभ, दुःखे यांनाच तोंड द्यावे लागते. हुकूमशाहीप्रमाणेच त्याचा स्वभाव असतो ना ?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** शिवाय त्याच्या हातात असलेल्या सत्तेमुळे तो अधिकच मत्सरी, अविश्वसनीय, अन्यायी व मित्ररहित बनतो. प्रत्येक दुर्गुणांच्या वाढीस कारणीभूत होतो. आणि ह्या दुर्गुणांमुळे स्वतःही दुःखी होतो व इतरांनाही दुःखी करतो.

**ग्लॅकॉन :** कोणत्याही शहाण्या मनुष्याचा या विधानाला विरोध असणार नाही.

**सॉक्रेटिस :** सर्व खटल्याचा विचार करून ज्याप्रमाणे न्यायाधीश निकाल देतो, त्याप्रमाणे तुम्ही सुखाच्या बाबतीत एकसत्ताक, अर्थसत्ताक, लोकशाही, मानीजनसत्ताक व हुकूमशाही यांचे क्रमाने नंबर लावा.

**ग्लॅकॉन :** हे काम सोपे आहे. ज्याप्रमाणे नृत्यगीत मंडळीमध्ये प्रवेशानुसार अनुक्रम लावतात त्याप्रमाणेच मी या लोकांचा सद्‌गुण, दुर्गुण, सुखदुःख यांच्या बाबतीत अनुक्रम लावीन.

**सॉक्रेटिस :** तर मग एखाद्या ललकाऱ्याप्रमाणे मीच असे जाहीर करतो—" अरिस्टानचा पुत्र असा निर्णय जाहीर करीत आहे की, जो एकसत्ताक वृत्तीने अधिकार गाजवितो व उत्तम आणि न्यायी असतो तो मनुष्य सर्वांत सुखी होय. जो मनुष्य स्वतः जुलमी असून स्वतःवर व इतरांवर हुकमत गाजवितो व जो अत्यंत वाईट व अन्यायी आहे, असा मनुष्य सर्वांत दुःखी होय. "

**ग्लॅकॉन :** तुम्ही असे जाहीर करण्यास हरकत नाही.

**सॉक्रेटिस :** सर्व मनुष्यांना व देवांना असे स्वभाव ओळखता आले नाहीत, तरी त्यात काही फरक पडणार नाही असे माझ्या जाहीरनाम्यात म्हणावे काय ?

**ग्लॅकॉन :** हो. जरूर म्हणा.

**सॉक्रेटिस :** आणखी एक विधान तुम्हांस पसंत पडेल का ते बघा.

**ग्लॅकॉन :** कोणते विधान ?

**सॉक्रेटिस :** ज्याअर्थी आत्म्याचे तीन भाग आहेत, त्याअर्थी प्रत्येक भागाला अनुरूप अशी तीन सुखे, तीन तत्त्वे व तीन वासना आहेत, असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** तुमच्या म्हणण्याचे अधिक स्पष्टीकरण कराल काय ?

**सॉक्रेटिस :** आपण असे ठरविले होते की, आत्म्याचा एक भाग ज्ञान प्राप्त करून घेतो तर दुसरा तेजस्विता दाखवितो. तिसरा भाग विविध प्रकारचा असल्यामुळे त्याला विशिष्ट नाव दिलेले नव्हते. त्याच्या महत्त्वाच्या वैशिष्टयानेच आपण त्याचा उल्लेख केला होता. क्षुधा, तृष्णा, मैथुन इ. इंद्रियजन्य सुखांची अपेक्षा या भागात असल्यामुळे आपण त्याला वासनात्मक व द्रव्यलोभी म्हटले. कारण अशा वासनांची पूर्ती होण्याकरिता द्रव्याची आवश्यकता असते.

**ग्लॅकॉन :** होय. आपले म्हणणे बरोबर होते.

**सॉक्रेटिस :** तिसऱ्या भागाचे सुख व प्रवृत्ती ह्यांचा हेतू फायदा मिळविणे हा असतो असे जर आपण थोडक्यात म्हटले तर आत्म्याच्या या भागाविषयी आपल्याला कल्पना येईल ना ? द्रव्यलोभी वा अर्थप्रेमी असे या भागाचे वर्णन करणे बरोबर होईल का ?

**ग्लॅकॉन :** बरोबर होईल असे मला वाटते.

**सॉक्रेटिस :** आत्म्याच्या तेजस्वी भागाचा उद्देश अधिकार, विजय, कीर्ती मिळविणे हाच असतो ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** युद्धप्रेमी अथवा महत्त्वाकांक्षी असे नाव या भागाला देणे बरोबर होईल का ?

**ग्लॅकॉन :** होय. बरोबर होईल.

**सॉक्रेटिस :** आत्म्याच्या ज्या भागाने आपणांस ज्ञान होते, त्याचे सत्य जाणण्यापलीकडे कशातच लक्ष नसते. संपत्ती व कीर्ती यांची त्याला अजिबात किंमत वाटत नाही.

**ग्लॅकॉन :** होय. खरे आहे.

**सॉक्रेटिस :** ह्याला आपण ज्ञानप्रेमी अथवा शहाणपणाची आवड असणारा असे म्हटले तर योग्य होईल ना ?

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** काही लोकांमध्येच हा भाग प्रभुत्व गाजविणारा असतो, तर इतरांमध्ये परिस्थितीनुसार इतर दोन प्रबल असतात.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणून आपल्याला मनुष्याचे ज्ञानप्रेमी, युद्धप्रेमी व अर्थप्रेमी असे तीन वर्ग करता येतील.

**ग्लॅकॉन :** होय. खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** ह्या तीन वर्गांमध्ये, तीन प्रकारची सुखे क्रमाने असतात.

**ग्लॅकॉन :** अगदी बरोबर.

**सॉक्रेटिस :** या तीन तऱ्हेच्या लोकांना जर आळीपाळीने सर्वांत सुखकारक आयुष्य कोणते असे विचारले तर प्रत्येकजण इतरांपेक्षा आपलेच आयुष्य चांगले असे सांगेल. अर्थप्रेमी मनुष्य म्हणेल की, नफा मिळविण्यापासून जे सुख मिळते त्याच्याशी सन्मानाचे सुख व ज्ञानसंपादनाचे सुख ह्यांची तुलना केली असता, ही दोन्ही निरर्थक आहेत. त्यांच्यापासून पैसे मिळविता आले तरच ती सुखावह होत असे त्याचे मत असते.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** महत्त्वाकांक्षी मनुष्य पैशापासून मिळणारे सुख क्षुद्र समजेल, ज्ञानापासून मिळणाऱ्या सुखाला नुसती वाफ म्हणेल. कारण या दोन्ही सुखांपासून कीर्ती मिळत नसली तर ती व्यर्थ होय, असे तो म्हणेल.

**ग्लॅकॉन :** अगदी बरोबर.

**सॉक्रेटिस :** याउलट, ज्ञानप्रेमी मनुष्य सत्याचे ज्ञान करून घेण्यात व सत्याच्या परिशीलनातच खरे सुख असून इतर सुखे क्षुद्र आहेत असे समजेल. इतर सुखांना तो आवश्यक मानतो. जर ती आवश्यक नसती, तर त्यांची इच्छाच त्याला नसती, हे खरे आहे ना ?

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** सौंदर्य व नीती यांच्या कल्पना बाजूला ठेवून, प्रत्येक प्रकारचे सुख व त्यानुसार यांच्यापासून कितपत आनंद वा दुःख मिळते याविषयी प्रश्न उपस्थित झाला असता वरील तीन मनुष्यांपैकी खरे मत कोणाचे मानावयाचे ?

**ग्लॅकॉन :** मी या प्रश्नाचे उत्तर देऊ शकणार नाही.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. निर्णय बरोबर देता यावा म्हणून कोणत्या मार्गाचा अवलंब करावा ? अनुभव, शहाणपणा व तर्क याशिवाय अधिक चांगले असे दुसरे साधन काय ?

**ग्लॅकॉन :** अर्थातच नाही.

**सॉक्रेटिस :** आपण आता वर्णन केलेल्या सुखांचा जास्त अनुभव कोणाला असतो ? पैशाचीच हाव धरणाऱ्या माणसाला सत्याचे ज्ञान असते का की ज्ञानप्रेमी माणसाला नफ्याचे ज्ञान असते त्यापेक्षाही अधिक असेल ?

**ग्लॅकॉन :** अर्थातच नाही. ज्ञानप्रेमी माणसाला पैसा मिळविण्याच्या सुखाची चव लहानपणापासून घ्यावीच लागते. परंतु केवळ नफ्याचे प्रेम असणाऱ्या माणसाला अस्तित्वात असणाऱ्या वस्तूंचे सत्य स्वरूप काय आहे याचे ज्ञान करून घेण्याची आवश्यकता असतेच असे नाही. किंबहुना त्याची तशी प्रवृत्ती असली तरीही अशा प्रकारचे ज्ञानाचे सुख अनुभवणे त्याला कठीण जाईल.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच दोन्ही सुखांशी प्रत्यक्ष संबंध असण्याच्या बाबतीत ज्ञानप्रेमी मनुष्य अर्थप्रेमी मनुष्यापेक्षा श्रेष्ठ असतो.

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच असतो.

**सॉक्रेटिस :** कीर्तीबद्दल प्रेम बाळगणारा माणूस कसा असतो ? ज्ञानप्रेमी मनुष्याला कीर्तीचे सुख माहीत असते तसे ह्या मनुष्याला ज्ञानाचे सुख माहीत असते काय ?

**ग्लॅकॉन :** नाही. ध्येयपूर्तीसाठी धडपडणाऱ्या लोकांना मान मिळतच असतो. तसाच मान श्रीमंत मनुष्यालाही लोकांकडून मिळत असतो. म्हणून लोकांकडून मिळणाऱ्या मानाचे सुख सर्वांनाच माहीत असते. परंतु सत्याच्या चिंतनाच्या सुखाची चव ज्ञानी माणसाशिवाय इतरांना चाखता येत नाही.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच अनुभवाच्या बाबतीत ज्ञानप्रेमी मनुष्यच उत्तम न्यायाधीश होय.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** ज्ञान व अनुभव ह्यांच्यावर त्याचाच हक्क असतो.

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** शिवाय ज्या शक्तीच्या सहाय्याने निर्णय घेता येतो ती अर्थप्रेमी व कीर्तीप्रेमी लोकांजवळ नसून फक्त ज्ञानप्रेमी माणसाजवळच असते.

**ग्लॅकॉन :** ती कोणती ?

**सॉक्रेटिस :** बुद्धीच्या सहाय्यानेच निर्णय देता येतो असे आपण म्हटले होते ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** ज्ञानप्रेमी माणसाजवळ ही शक्ती अधिक प्रमाणात असते.

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** जर प्रश्नांचा निर्णय पैसा व नफा या साधनांनी करावयाचा असेल तर अर्थप्रेमी मनुष्याने केलेली निंदा व स्तुती खरी ठरतील.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** तसेच कीर्ती, विजय व धैर्य ही साधने निर्णयाच्या कामाला उपयोगी असतील तर युद्धप्रेमी माणसाचा निर्णय खरा मानावा लागेल.

**ग्लॅकॉन :** उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** जर अनुभव, ज्ञान व बुद्धी हीच सर्वोत्तम साधने असतील तर काय म्हणता येईल ?

**ग्लॅकॉन :** ज्ञानप्रेमी मनुष्याने सांगितलेले मतच न्याय्य मानले जाईल.

**सॉक्रेटिस :** जर सुखांची संख्याही तीन असेल तर आत्म्याचा ज्ञानप्रेमी भाग अधिक सुखी व आनंददायक नाही का ? आणि या भागाचे ज्याच्यात वर्चस्व असते त्याचे आयुष्य सर्वांत अधिक आनंदमय नाही का ?

**ग्लॅकॉन :** नक्कीच असणार. ज्ञानप्रेमी मनुष्याला स्वतःच्या आयुष्याची स्तुती करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

**सॉक्रेटिस :** ज्ञानप्रेमी आयुष्याच्या खालोखाल कोणत्या आयुष्याचा व सुखाचा क्रम न्यायाधीश लावील ?

**ग्लॅकॉन :** युद्धप्रेमी व महत्त्वाकांक्षी मनुष्याच्या सुखालाच दुसरा नंबर देईन. कारण अर्थप्रेमी माणसाच्या सुखापेक्षा ह्या माणसाचे सुख ज्ञानप्रेमी माणसाच्या सुखाच्या अधिक जवळ आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच अर्थप्रेमी माणसाच्या सुखाचा नंबर शेवटी लागतो.

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** अशा तऱ्हेने अन्यायी माणसाचा न्यायी माणसाकडून दुसऱ्यांदा पराभव झाला. आता तिसरा व शेवटचा सामना, संरक्षक देव ऑलिम्पियन झ्यूस ह्याचे स्मरण करून, सुरू करा. "ज्ञानी मनुष्याच्या सुखाखेरीज इतर सर्व सुखांमध्ये काहीतरी उणीव आणि असत्यपणा असून, चित्राच्या ओबडधोबड रूपरेषेप्रमाणे ती अस्पष्ट असतात." असे एका विद्वान गृहस्थाने म्हटले आहे. या शेवटच्या सामन्यातील पराभव सर्वांत महत्त्वाचा व निर्णायक आहे.

**ग्लॅकॉन :** आपले म्हणणे बरोबर आहे. पण ते अधिक स्पष्ट कराल का ?

**सॉक्रेटिस :** तुम्ही मदत केलीत तर आपला हेतू साध्य होईल.

**ग्लॅकॉन :** तुम्ही प्रथम विचारा.

**सॉक्रेटिस :** दु:ख हे सुखाच्या विरुद्ध असते ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** सुखदु:खाची एकाच वेळी अनुपस्थिती शक्य असते ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच दुसऱ्या अर्थाने तुम्ही असे कबूल करता की, सुखदु:खाच्या दोन टोकांमधील एका बिंदूवर मन स्थिर होते. होय ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** आजारपणात लोक जी भाषा वापरतात ती तुम्हांला आठवते का?

**ग्लॅकॉन :** ती कोणती?

**सॉक्रेटिस :** ते म्हणतात आरोग्यापेक्षा अधिक आनंददायक गोष्ट नाही. वस्तुत: आरोग्याचा आनंद त्यांना आजारी पडण्यापूर्वी कळलेला नसतो.

**ग्लॅकॉन :** होय. हे मला आठवते.

**सॉक्रेटिस :** अत्यंत दु:खी लोक, दु:खापासून मुक्ती ही सर्वांत आनंददायक आहे असे म्हणताना तुम्ही ऐकले असेलच.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** यावरून असे दिसून येईल की, लोक जेव्हा असमाधानी दिसतात, तेव्हा ते प्रत्यक्ष आनंदाची स्तुती करीत नसून असमाधानी स्थितीतून होणाऱ्या मुक्ततेची स्तुती करीत असतात.

**ग्लॅकॉन :** खरे आहे. आणि ह्याचे कारण म्हणजे दु:खविमुक्ती ही खरोखरच आनंददायक असते.

**सॉक्रेटिस :** यावरून आपणांस असेही म्हणता येईल की, मनुष्य जेव्हा आनंदाला मुकतो तेव्हा त्याचे स्वास्थ्यही बिघडते.

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच सुख व दु:ख यांच्यामध्ये असणारी स्वस्थता ही एकदा सुखकारक व एकदा दु:खकारक ठरते.

**ग्लॅकॉन :** होय. असे दिसून येईल.

**सॉक्रेटिस :** जे सुखही नाही व दु:खही नाही ते दोन्ही होऊ शकेल का?

**ग्लॅकॉन :** मला असे वाटत नाही.

**सॉक्रेटिस :** मनातील सुखाचे व दु:खाचे अस्तित्व या भावनाच असतात ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** आपण आताच असे म्हटले की, सुखाचा व दु:खाचा अभाव यांच्यामधील स्थिती स्वस्थता दर्शविते.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** मग दु:खाचा अभाव आनंददायक व सुखाचा अभाव दु:खदायक असतो असे म्हणता येईल का ?

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच स्वास्थ्याची स्थिती वरवर पाहता, दु:खकारक स्थितीपेक्षा आनंददायक व सुखकारक स्थितीपेक्षा दु:खदायक असते असे वाटते. पण खरोखरी ती तशी नसते. खऱ्या सुखाच्या कसोटीला ही सुखे टिकत नाहीत. कारण अशी सुखे म्हणजे एक प्रकारचा मोह आहे.

**ग्लॅकॉन :** आपल्या वादाचा निष्कर्ष असा निघतो.

**सॉक्रेटिस :** सुख म्हणजे दु:खाची समाप्ती व दु:ख म्हणजे सुखाची समाप्ती असा सृष्टीचा नियम आहे, अशी तुमची कल्पना असेल तर ती काढून टाकण्याकरिता, जी सुखे दु:खाच्या समाप्तीपासून निर्माण होत नाहीत, त्या सुखांकडे लक्ष द्या.

**ग्लॅकॉन :** मी कोठे लक्ष द्यावे ? आपणांस कोणती सुखे अभिप्रेत आहेत ?

**सॉक्रेटिस :** बरीच आहेत. सर्वांत चांगले उदाहरण म्हणून सुवासाच्या सुखाचा विचार करा. अगोदर समाधानकारक स्थिती नसतानाही ती निर्माण होतात व ती गेल्यावर दु:ख निर्माण होत नाही.

**ग्लॅकॉन :** हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच खरे सुख दु:खापासून मुक्तता झाल्यावर मिळते व खरे दु:ख सुखाची समाप्ती झाल्याने होते हे म्हणणे योग्य नाही.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** सर्वसाधारणपणे पाहाता, शरीरापासून मनापर्यंत पोचणारी तीव्र सुखे दु:खापासून मुक्तता करणारी असतात हे खरे आहे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** भविष्यकाळातील सुखदु:खांच्या आगाऊ कल्पनांबद्दल असेच म्हणता येईल ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** या सुखांचे स्वरूप काय व त्यांचे कुणाशी साधर्म्य असते हे तुम्हांस माहीत आहे काय ?

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** उच्च, मध्यम व कनिष्ठ अशा स्वाभाविक स्थिती असतात हे तुम्हांला मान्य आहे ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** कनिष्ठ स्थितीतून मध्यम स्थितीत मनुष्य जात असताना, त्याला आपण उच्च स्थितीत जात आहोत असे वाटते ना ? आणि ह्या स्थितीत तो स्थिर झाल्यावर, आपल्या पूर्वीच्या स्थितीपेक्षा सध्याची स्थिती उच्च आहे असे त्याला वाटणार नाही काय ? कारण खरा उच्चपणा त्याने बघितलेलाच नसतो.

**ग्लॅकॉन :** असा मनुष्य यापेक्षा निराळ्या तऱ्हेने विचार करील असे मला वाटत नाही.

**सॉक्रेटिस :** परत पूर्वीच्या जागी त्याला आणले तर आपल्याला कनिष्ठावस्थेत आणले असे त्याला वाटेल ना ?

**ग्लॅकॉन :** निश्चितच.

**सॉक्रेटिस :** खरा उच्चपणा, मध्यमपणा व कनिष्ठपणा त्याला माहीत नसल्यामुळेच असे होईल ना ?

**ग्लॅकॉन :** उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** सत्याचे ज्ञान नसणारे लोक अशी असंख्य व अपरिपक्व मते बनवितात. एवढेच नव्हे तर सुख, दुःख व त्यांच्यामधील प्रकार याविषयीही अशी अपरिपक्व मते बनवितात. जेव्हा ते दुःखकारक परिस्थितीत असतात तेव्हा ते ती बरोबर ओळखतात पण त्यातून त्यांची जेव्हा मुक्तता होते, तेव्हा ते अट्टाहासाने असा समज करून घेतात की, आपण पूर्ण सुखात आहोत. पूर्ण सुखाचा अनुभव कधीच न घेतल्यामुळे दुःखाच्या अभावाशी दुःखाची तुलना करून, दुःखाच्या अभावालाच ते सुख मानतात. पांढरा रंग माहीत नसलेले लोक ज्याप्रमाणे काळ्या रंगाची धूसर रंगाबरोबर तुलना करून, त्यालाच पांढरा रंग म्हणतात, त्याचप्रमाणे हा प्रकार आहे. याचे तुम्हांला आश्चर्य वाटते का ?

**ग्लॅकॉन :** नाही. असे जर नसते तरच मला आश्चर्य वाटले असते.

**सॉक्रेटिस :** क्षुधा, तृष्णा व इतर वासना अशीच शारीरिक रिक्तता दाखवीत नाही काय ?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** त्याचप्रमाणे अज्ञान व मूर्खपणा मानसिक रिक्तता दाखवितात ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस** : अन्नाने शरीराची व ज्ञानाने मनाची तृप्ती होते ना ?

**ग्लॅकॉन** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : चांगल्या तत्त्वामुळे झालेली तृप्ती, कमी चांगल्या तत्त्वाच्या तृप्तीहून अधिक चांगली वा वाईट असेल काय ?

**ग्लॅकॉन** : तत्त्वाच्या चांगलेपणावर ते अवलंबून आहे.

**सॉक्रेटिस** : भाकरी, मांस व सर्वसाधारण अन्न यांच्यातील शुद्ध सद्भाव, शास्त्र, ज्ञान व सद्गुण यांच्यातील शुद्ध सद्भावापेक्षा अधिक मोठा असतो असे तुम्हांला वाटते काय ? या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी पुढील गोष्टीकडे लक्ष द्या. अविकारी, अमर्त्य अशांशी ज्यांचा संबंध असतो ते स्वतःच अविकारी, अमर्त्य असून तत्सदृश वस्तूंमध्ये दिसते व त्याच्यामध्ये अधिक सद्भाव दिसतो ना ? किंवा विकारी वा मर्त्य अशांशी ज्याचा संबंध असतो ते स्वतःच विकारी, मर्त्य असून तत्सदृश वस्तूमध्ये दिसते व त्याच्यामध्ये सद्भाव अधिक दिसून येतो असे तुम्हांला वाटते काय ?

**ग्लॅकॉन** : पहिल्या प्रकारच्या म्हणजे अविकारी वस्तूंचाच सत्भाव हा गुणधर्म आहे असे मला वाटते.

**सॉक्रेटिस** : अविकारी वस्तूंमध्ये सत्भावापेक्षा शास्त्राचा प्रवेश कमी असतो का ?

**ग्लॅकॉन** : मुळीच नाही.

**सॉक्रेटिस** : तसेच सत्य कमी प्रमाणात असते का ?

**ग्लॅकॉन** : नाही.

**सॉक्रेटिस** : म्हणजे सत्याचे प्रमाण कमी असेल तर सत्भावाचेही प्रमाण कमी असते ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : आत्म्यापेक्षा शरीर कमी सत्य व कमी अस्सल असते ना ?

**ग्लॅकॉन** : होय. असे मी मानतो.

**सॉक्रेटिस** : जे अधिक खऱ्या सत्-तत्त्वांनी भरलेले व स्वतः अधिक खरे आहे ते सत् व अस्सलपणा यात कमी असलेल्या वस्तूंपेक्षा अधिक पूर्ण आहे ना ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : स्वाभाविक रीत्या योग्य वस्तूंनी पूर्ण असणे आनंददायक असल्यामुळे, जो विषय खरोखरच अधिक भरलेला व खऱ्या वस्तूंनी भरलेला असतो, तो खऱ्या सुखांना जन्म देतो ; व जो विषय कमी खरेपणाने व कमी मजबुतीने भरलेला असतो, तो कमी खऱ्या व कमी विश्वसनीय सुखांना जन्म देतो.

**ग्लॅकॉन** : हा निष्कर्ष अपरिहार्यच आहे.

**सॉक्रेटिस :** जे लोक ज्ञान व सद्‌गुण यांच्या बाबतीत अज्ञानी असून, आपला सर्व वेळ मेजवान्या व त्याच्यासारख्याच इतर करमणुकीत घालवितात ते उच्च मार्गाच्या मध्यबिंदूपर्यंत जातात व तेथून खाली येतात. ठराविक मर्यादितच ते आयुष्य घालवितात. मर्यादेबाहेर जाऊन ते वरही बघत नाहीत आणि उच्चपणापर्यंत पोहचत नाहीत. खऱ्या वस्तू-तत्त्वांचे त्यांना ज्ञान नसल्यामुळे निर्भेळ व शुद्ध सुख त्यांना उपभोगता येत नाही. जनावरांप्रमाणे ते नेहमी खाली बघत असतात, जेवणाच्या टेबलाभोवती सारखे चरत राहून लठ्ठ होतात.व फक्त प्रजोत्पादन करीत राहतात. भोगलालसा पूर्ण करण्याकरिता आपल्या अवयवांनी एकमेकांना लाथा व टकरा मारतात. कधीकधी तृप्त न होणाऱ्या विकारांच्या धुंदीत एकमेकांना ठारही मारतात. ह्याचे कारण असे की, स्वतःच्या स्वभावातील कमअस्सल व कामासक्त भाग असत्य वस्तूंकडून पोसला जातो.

**ग्लॅकॉन :** सॉक्रेटिस, दैवी शक्ती असल्याप्रमाणे, तुम्ही बहुजनसमाजाचे यथायोग्य वर्णन केलेत.

**सॉक्रेटिस :** खऱ्या सुखाची केवळ ओबडधोबड रूपरेषा व छाया म्हणजेच दुःखमिश्रित सुखे यांना माहीत असतात. ही सुखे दुःखाच्या सान्निध्यामुळे व तुलनेने त्यांना अधिक आकर्षक वाटतात. मूर्ख लोकांमध्ये या सुखाबद्दल वेडसर विकार निर्माण होतो. स्टैसिकीरस म्हणतो त्याप्रमाणे, ट्रॉय येथे, खऱ्या हेलनबद्दल अज्ञान असल्यामुळे, हेलनच्या केवळ आभासाकरिता सैनिक लढत राहिले. तसेच हे लोक सुखाच्या अभिलाषेने भांडत राहतात.

**ग्लॅकॉन :** अशी स्थिती होणे स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस :** आता तेजस्वी तत्त्वाचा विचार करू. विचार व शहाणपणा यांचा त्याग करून, कीर्ती, विजय यांच्या प्राप्तीकरिता जेव्हा मनुष्य धडपडतो, तेव्हा तो महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन मत्सरी बनतो, युद्धाच्या प्रेमामुळे दांडगाई करतो किंवा असमाधानातून निर्माण होणाऱ्या रागाच्या आहारी जातो. याचे परिणाम मघाशी वर्णन केल्याप्रमाणेच होतील ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** यावरून असा निष्कर्ष निघतो की, अर्थप्रेमी व महत्त्वाकांक्षी तत्त्वांना परिचित असलेल्या सर्व वासनांपैकी ज्या शास्त्र व बुद्धी याचे वर्चस्व मान्य करतात व ज्ञानाने दाखविलेली सुखे साध्य करण्याचा प्रयत्न करतात, त्यांनाच सत्यप्रेमामुळे खरी सुखे सापडतात. इतकेच नव्हे तर त्यांना योग्य अशी सुखे मिळतील. कारण जे ज्याला उत्तम वाटते तेच त्याला योग्य वाटते.

**ग्लॅकॉन :** होय. तुमचे म्हणणे योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच आत्म्याने ज्ञानप्रेमी तत्त्वाचे वर्चस्व मान्य केले तर प्रत्येक भागाला आपले योग्य कर्तव्य पूर्ण करून, न्यायीपणाने वागता येईल. इतकेच नव्हे तर योग्य व खरी सुखे अनुभवता येतील.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** ह्याउलट इतर दोन तत्त्वांपैकी एकाचे जेव्हा वर्चस्व निर्माण होते तेव्हा त्याला योग्य असे सुख तर मिळत नाहीच, पण इतर तत्त्वांनाही ते अयोग्य सुख शोधण्यास लावते.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** एखादी वस्तू तत्त्वज्ञान व बुद्धिवाद यापासून जितकी दूर जाईल, तितकी ती वाईट परिणाम घडवून आणते.

**ग्लॅकॉन :** अशी शक्यता बरीच असते.

**सॉक्रेटिस :** कायदा व सुव्यवस्था यापासून जी वस्तू लांब असते ती बुद्धिवादापासूनही दूर असते ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** कायदा व सुव्यवस्था ह्यांच्यापासून विकारी व जुलमी वासना दूर असतात हे सिद्ध झाले आहे ना ?

**ग्लॅकॉन :** होय, सिद्ध झाले आहे.

**सॉक्रेटिस :** एकसत्तात्मक राज्यपद्धती व नियमित वासना या कायदा व सुव्यवस्था यांच्या अगदी जवळ असतात ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच हुकूमशहा हा खऱ्या व योग्य सुखापासून दूर असतो व राजा अगदी जवळ असतो.

**ग्लॅकॉन :** हे विधान नाकारता येणार नाही.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच हुकूमशहाला फार त्रास सहन करावा लागेल तर राजाचे दिवस आनंदात जातील.

**ग्लॅकॉन :** हेही विधान मान्य करावे लागेल.

**सॉक्रेटिस :** हुकूमशहाचे आयुष्य राजापेक्षा किती दुःखकारक असते याची तुम्हाला कल्पना आहे काय ?

**ग्लॅकॉन :** नाही.

**सॉक्रेटिस :** सुखे तीन प्रकारची आहे. एक अस्सल व दोन खोटी. शेवटच्या दोन सुखांच्या मर्यादेचे त्याने उल्लंघन केलेले असते. कायदा व बुद्धिवाद यांचा त्याग करून गुलामगिरीच्या सुखांना त्याने आपले शरीरसंरक्षक नेमलेले असते. अशा मनुष्याच्या गौणत्वाचे प्रमाण सांगणे कठीण आहे. ते साधारणपणे पुढीलप्रमाणे करता येईल.

**ग्लॅकॉन :** ते कसे ?

**सॉक्रेटिस :** अर्थसत्ताकपासून खाली मोजण्यास सुरुवात केली तर जुलमी मनुष्याचा नंबर तिसरा लागतो. कारण लोकशाही प्रवृत्तीच्या माणसाचा नंबर मध्ये लागतो.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** आपण पूर्वी केलेली विधाने खरी मानली तर, जुलमी मनुष्य जे सुख उपभोगतो ते सुख नकलेची नक्कल असते. कारण त्याची खरी नक्कल अर्थसत्ताक माणसाजवळ असते.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** आदर्श राज्य व एकसत्ताकवृत्ती एक मानून त्यांच्यापासून मोजण्यास सुरुवात केली तर अर्थसत्ताक मनुष्याचा नंबर तिसरा लागतो.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** म्हणजे जुलमी मनुष्य खऱ्या सुखापासून तिनाच्या तिप्पट नऊपट दूर असतो.

**ग्लॅकॉन :** उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** जुलमीपणाचे सुख, भूमितीनुसार, नवाच्या आकड्याने दाखविता येईल.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** या अंकाचा वर्ग व घन केला असता जुलमी मनुष्य किती अंतरावर असतो ते कळेल.

**ग्लॅकॉन :** गणित जाणणाऱ्या माणसाला हे कळेल.

**सॉक्रेटिस :** ह्याउलट जुलमी राजापासून खऱ्या सुखाच्या बाबतीत एकसत्ताकवृत्तीचा राजा किती दूर असतो हे गुणाकाराने पुढील प्रकारे सांगता येईल. ७२९ पटींनी एकसत्ताकवृत्तीचा राजा जुलमी मनुष्यापेक्षा सुखाने राहतो किंवा जुलमी मनुष्य एकसत्ताकवृत्तीच्या राजापेक्षा ७२९ पटींनी दुःखी असतो.

**ग्लॅकॉन :** न्यायी व अन्यायी मनुष्य सुखदुःखाच्या बाबतीत एकमेकांपासून किती दूर आहेत हे तुम्ही गणिताने सिद्ध करून अजब निष्कर्ष काढला आहे खरा !

**सॉक्रेटिस :** दिवस, रात्री, महिने व वर्षे यांचा विचार केला तर हा आकडा मानवी आयुष्याला बरोबर लागू पडतो अशी माझी खात्री आहे.

**ग्लॉकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** सज्जन व न्यायी मनुष्य, दुष्ट व अन्यायी मनुष्याला सुखाच्या बाबतीत इतका मागे टाकतो तर सौंदर्य, सद्‌गुण व चांगले आयुष्य यांच्या बाबतीत तर तो फारच मागे टाकणार नाही काय ?

**ग्लॉकॉन :** पुष्कळच मागे टाकील हे निश्चित.

□ □

मराठी ग्रं॰ संग्रहालय ठाणे

## प्रकरण चौतीस

# फायदेशीर काय? न्याय की अन्याय?

**[IX-588-B—594]**

**कथासूत्र :**

['रिपब्लिक' या संवादग्रंथाच्या सुरुवातीस थ्रॅसिमॅक्स या सोफिस्ट प्रवृत्तीच्या विचारवंताने "न्याय म्हणजे बलिष्ठांचे हित" आणि "अन्याय ही सर्व सुखांची जननी" अशी भूमिका मांडली होती. या संवादातील प्रमुख व्यक्तिरेखा सॉक्रेटिस याने आतापर्यंतच्या विवेचनाने थ्रॅसिमॅक्सची सर्व भूमिका खोटी ठरविली आहे. व्यक्तिजीवन आणि समाजजीवन यांचे अधिष्ठान म्हणून न्याय तत्त्वाचा अंगीकार करणे आवश्यक व उपयुक्त आहे हे त्याने सिद्ध केले आहे आणि न्यायाधिष्ठित जीवन हेच सुखी आणि कल्याणप्रद असते असे दाखवून दिले आहे.

हे आदर्श राज्य पृथ्वीच्या पाठीवर कोठे असेल का? असा प्रश्न आणि शंका उपस्थित करून आज ना उद्या केव्हातरी, इथे ना तिथे कोठेतरी असे आदर्श राज्य अस्तित्वात येऊ शकेल असा आशावाद प्लेटोने, सॉक्रेटिस या प्रमुख व्यक्तिरेखेच्या मुखातून व्यक्त केला आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** वादविवादाची पार्श्वभूमी आपण तयार केली. आता आपण वादविवादाला सुरुवात करू या. ज्याची कीर्ती न्यायाने वागणारा अशी आहे, पण प्रत्यक्षात मात्र जो अन्यायाने वागतो त्याला अन्यायापासून फायदा होतो असे पूर्वी विधान आपल्यापुढे करण्यात आले होते ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** न्यायाच्या व अन्यायाच्या परिणामांविषयी आपले एकमत झाले आहे. तेव्हा वरील प्रकारचे विधान मांडणाऱ्या व्यक्तीशी आपण वाद करण्यास हीच वेळ योग्य आहे असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** आपण सुरुवात कोठून करावी?

**सॉक्रेटिस :** आपण काय बोलतो हे वक्त्याला समजण्यासाठी, आत्म्याची मूर्ती आपण कल्पनेने साकार केली पाहिजे.

**ग्लॅकॉन :** ती कशी ?

**सॉक्रेटिस :** पुराणात अनेक राक्षसांचे वर्णन केले आहे. त्यांच्यापैकी किमीरा, सिला, सरबिरस यांच्यासारखी एखाद्या प्राण्याची आपण कल्पना केली पाहिजे. याच राक्षसांच्या अनेक जाती वाढून पुन्हा त्या एकरूप होतात.

**ग्लॅकॉन :** अशा गोष्टी ऐकायला मिळतात खऱ्या.

**सॉक्रेटिस :** पहिल्याप्रथम असंख्य मुखे असलेल्या विविधवर्णी राक्षसाची कल्पना करा. तसेच त्याच्याभोवती पाळीव व रानटी जनावरांच्या डोक्यांची रांग असून, आळीपाळीने तो आपल्या इच्छेनुसार त्यांना उत्पन्न करू शकतो असे समजा.

**ग्लॅकॉन :** हुशार कारागीरही या कामाला अपुरा पडेल. पण मेण व त्यासारख्या इतर पदार्थांपेक्षाही कल्पना ही अधिक लवचिक आहे. आम्ही तशी कल्पना केली असे समजा.

**सॉक्रेटिस :** नंतर त्याला अनुक्रमे सिंहाचा व मनुष्याचा आकार द्या. परंतु हे करताना पहिले रूप सर्वांत मोठे, दुसरे त्याच्या खालोखाल मोठे होईल अशी काळजी घ्या.

**ग्लॅकॉन :** असे करणे फारच सोपे आहे.

**सॉक्रेटिस :** पुन्हा त्या तिघांना एक करा.

**ग्लॅकॉन :** केले असे समजा.

**सॉक्रेटिस :** शेवटी त्याला तिन्हींपैकी एकाचे—मनुष्याचे रूप द्या. जो केवळ बाहचांगच बघतो त्याला हा मनुष्यच आहे असे वाटेल.

**ग्लॅकॉन :** ठीक.

**सॉक्रेटिस :** अशा मनुष्यप्राण्याला दुर्गुणी असणे हिताचे व न्यायी असणे अहितकारक असते असे जो म्हणेल त्याला आपण म्हणू की, त्याचे म्हणणे जर खरे असेल तर हया विचित्र राक्षसाला व सिंहाला नेहमी चांगले अन्न देऊन बळकट करणे व मनुष्याला उपाशी ठेऊन, त्यांच्यापैकी कुणाच्या तरी एकाच्या ताब्यात ठेवणे हे फायद्याचे आहे. त्या तिघांची एकजूट होऊ न देता, ते नेहमी एकमेकांशी भांडत राहतील व एकमेकांचा नाश करण्याचा प्रयत्न करतील अशी परिस्थिती उत्पन्न करणे अधिक फायद्याचे आहे.

**ग्लॅकॉन :** जो अन्यायाची स्तुती करतो तो असेच म्हणेल.

**सॉक्रेटिस :** हयाच्या उलट न्यायप्रिय माणूस असे म्हणेल की, कृती व शब्द असे पाहिजेत की, अंतःस्थ मनुष्य वरील मनुष्यप्राण्यावर पूर्ण ताबा ठेवू शकेल. सिंहाची मदत घेऊन या पुष्कळ डोक्यांच्या प्राण्याला, त्यातील पाळीव प्राण्यांची जोपासना करून व रानटीपणा ताब्यात ठेवून, सुधारता येईल व सर्व भागांची एकजूट साधता येईल.

**ग्लॅकॉन :** न्यायप्रिय माणूस असेच बोलेल.

**सॉक्रेटिस** : न्यायाची स्तुती करणारा खरे तेच बोलेल. कारण सुख, कीर्ती व फायदा ह्या बाबतीत सद्‌गुणी मनुष्याची स्तुती करणारा मनुष्य खरे बोलणारा असून, विरोधी लोकांची टीका केवळ अज्ञानी व पोकळ असते.

**ग्लॅकॉन** : माझेही मत असेच आहे.

**सॉक्रेटिस** : विरोधी माणूस अज्ञानाने पछाडलेला असल्यामुळे आपण शांतपणे त्याचे मन वळवू. त्याला विचारू, " महाराज, आपल्या पाशवी स्वभावाला दैवी अमलाखाली आणणारे ते सत् व आपल्या नम्र स्वभावाला रानटी बनविते ते असत् नव्हे काय ? " यावर तो होकारार्थीच उत्तर देईल ना ?

**ग्लॅकॉन** : माझे म्हणणे जर त्याला पटले तर तो होय म्हणेल.

**सॉक्रेटिस** : या तत्त्वानुसार, अन्यायाने सोने घेणे फायद्याचे आहे काय ? कारण ज्या क्षणाला मनुष्याला असे सोने घेण्याची इच्छा होते, त्याच क्षणाला त्याच्यातील उत्तम भाग वाईट भागाचा गुलाम बनतो. रानटी लोकांना आपला मुलगा वा मुलगी विकून, एखाद्याला कितीही पैसा मिळाला तरी त्यापासून फायदा होतो का ? जो स्वतःमधील दैवी भागाला निर्दयपणे रानटी भागाचा गुलाम बनवितो तो दुर्दैवी नव्हे काय ? एरिफिलीने आपल्या नवऱ्याच्या जीवाच्या किमतीत हार घेतला. यापेक्षाही अधिक हानीकारक लाच मनुष्य घेतो ना ?

**ग्लॅकॉन** : त्याच्या वतीने उत्तर देऊन असे म्हणता येईल की, ही अधिकच हानीकारक गोष्ट आहे.

**सॉक्रेटिस** : अनियमितपणामुळे वरील अजस्र, बहुरूपी व भयंकर प्राण्याला आवश्यकतेपेक्षा अधिक स्वातंत्र्य मिळते. मग त्यामुळेच अनियमितपणा हा निंद्य मानला गेला तर चूक आहे का ?

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : सिंह व साप यांच्या स्वभावासारखी तत्त्वे अतिशय वाढली म्हणजेच त्यांना हट्टीपणा व असंतुष्टता म्हणतात ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : चैन व बायकीपणा या दुर्गुणांमुळे मनुष्य भित्रा व नादान बनतो. म्हणून या दुर्गुणांची निंदा केली पाहिजे ना ?

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : जेव्हा सिंहासारख्या तेजस्वी प्राण्याला मनुष्य एखाद्या राक्षसाचा गुलाम बनवितो, त्या राक्षसाची पैशाची तहान भागविण्याकरिता, तेजस्वी प्राण्याचा सारखा अपमान करून सिंहाचे माकड बनवितो, तेव्हा खुषमस्करी व गुलामगिरी अशी निंदाव्यंजक नावे देतात ना ?

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** आडदांडपणा व ग्राम्यपणा हे दुर्गुण अपकीर्तीकारक का समजले जातात ? स्वतःमधील उच्च तत्त्व क्षीण झाल्यामुळे, मनुष्य नाना विकारांच्या अधीन होऊन ह्या दुर्गुणांची खुषामत करावयास लागतो तेव्हाच त्याला आडदांड आणि ग्राम्य म्हणतात ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** उत्तम मनुष्यावर ज्या शक्तीचे नियंत्रण असते, त्या शक्तीकडूनच या मनुष्याचे नियंत्रण केले जावे म्हणून आपण असे म्हणू की, दैवी तत्त्व ज्याच्यात प्रबळ आहे अशा माणसाचे त्याने नोकर झाले पाहिजे. प्रजेच्या अहिताकरिताच तिच्यावर अधिकार गाजविला जातो असे थ्रॅसिमॅक्सचे मत आहे, पण आमचे मत निराळे आहे. मनुष्याच्या हृदयात असलेल्या सूज्ञ व दैवी शक्तीने त्याच्यावर अधिकार गाजवावा ; पण हृदयात जर शक्ती नसेल तर बाहेरच्या शक्तीने त्याच्यावर अधिकार गाजवावा. त्यामुळे सर्व लोक समान दर्जाने वागविले जाऊन मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित होतील असे आम्हाला वाटते.

**ग्लॅकॉन :** होय. तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** सर्व प्रजेचा मित्र असा जो कायदा, त्याचाही हेतू हाच असतो. आपण मुलांवर देखरेख ठेवतो त्यामागेही हाच हेतू असतो. आपल्या आदर्श राज्यघटनेनुसार मुलांची भूमिका तयार केल्याशिवाय व त्यांच्या स्वभावातील उदात्त तत्त्व बळकट करून त्याला त्यांच्या हृदयाचा संरक्षक व राजा केल्याशिवाय, त्यांना आपण स्वातंत्र्य देत नाही. उदात्त तत्त्व संरक्षक बनल्यानंतरच, मुलांना स्वतंत्रपणे वागण्याची परवानगी आपण देतो.

**ग्लॅकॉन :** होय. हे उघडच आहे.

**सॉक्रेटिस :** मग, ग्लॅकॉन, कोणत्या तत्त्वाच्या आणि विचारसरणीच्या आधारे आपण असे म्हणू शकू की, मनुष्याने अन्यायाने वागून, अपकीर्ती प्राप्त करून घेणे आणि दुर्गुणांमध्ये बुडून जाणे हिताचे आहे ? अशा वागण्याने कदाचित त्याला आपली संपत्ती वाढविता येईल, सत्ताही प्राप्त करून घेता येईल, पण त्यामुळे फायदा झाला असे म्हणता येईल का ?

**ग्लॅकॉन :** कोणत्याही आधाराने आपल्याला असे म्हणता येणार नाही.

**सॉक्रेटिस :** अन्याय्य कृत्य लपवून, शिक्षा चुकवून होणाऱ्या फायद्यांचे समर्थन आपल्याला कोणत्या मुद्द्यांवर करता येईल ? जो पळून जातो तो अधिक दुर्गुणी असतो असे आपणांस म्हणता येणार नाही काय ? उलट त्याला पकडून शिक्षा केली तर त्याच्यातील पाशवी भागावर नियंत्रण ठेवले जाते व सभ्य भाग मुक्त होऊन आत्म्याची उदात्तता वाढीस लागते. अशा प्रकारे ज्या प्रमाणात आत्म्याला शरीरापेक्षा अधिक मूल्य असते, त्या प्रमाणात संयम, न्याय व ज्ञान यांमुळे शक्ती, सौंदर्य व आरोग्य ह्यांनी संपन्न असलेल्या शरीरापेक्षाही अधिक मौल्यवान स्थिती आत्म्याला प्राप्त होते.

**ग्लॅकॉन** : होय. तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : या ध्येयासाठीच बुद्धिमान मनुष्य आपल्या सर्व शक्ती उपयोगात आणील असा निष्कर्ष यावरून काढता येईल. ज्या अभ्यासामुळे स्वभाव उदात्त बनतो, त्या अभ्यासाचा तो आदर करील व इतरांचा तिरस्कार करील.

**ग्लॅकॉन** : उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : शारीरिक आरोग्य व व्यायाम या बाबतीत तो पुढील काळजी घेईल. पाशवी व अविवेकी सुखात तो बुडून जाणार नाहीच, पण आरोग्याचीही तो विशेष पर्वा करणार नाही. शक्ती, आरोग्य, सौंदर्य इत्यादी गोष्टी त्याचा संयम वाढविण्यास मदत करणाऱ्या नसतील तर त्या मिळविण्याचा तो फारसा प्रयत्न करणार नाही. कारण शरीराची एकतानता राखीत असताना, आत्म्याचा सुसंवादीपणा राखला जावा, एवढाच त्याचा हेतू असेल.

**ग्लॅकॉन** : संस्कृतीचा कट्टर पुरस्कर्ता असणारा माणूस असाच वागेल.

**सॉक्रेटिस** : द्रव्यार्जन करतानासुद्धा तो एक प्रकारची पद्धत व सभ्यता राखील. अभिनंदनाच्या वर्षावाने हुरळून जाणार नाही आणि पैशाच्या पाठीमागे लागून स्वतःला दुःखात लोटणार नाही.

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच तो असे वागेल.

**सॉक्रेटिस** : अंतःकरणाला साक्षी ठेवून केवळ अनुकूल नव्हे तर प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही तो मनाचा तोल ढळू देणार नाही. उलट आदर्श तत्त्वानुसारच आपल्या धनाचा व्यय आणि संचय करण्याचा प्रयत्न करील.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : ज्या सन्मानाने त्याचा आर्थिक उत्कर्ष होईल, त्या सन्मानाचा तो आनंदाने स्वीकार करील. पण ज्या खाजगी व सार्वजनिक सन्मानाच्या प्रसंगांनी त्याची सुस्थिती बिघडेल असे प्रसंग तो टाळील.

**ग्लॅकॉन** : अशा प्रकारे वागणे हे त्याचे ध्येय असेल तर त्याला राजकारणात भाग घेता येणार नाही.

**सॉक्रेटिस** : तुमचे मत चुकीचे आहे. जन्मभूमीच्या राजकारणात तो कदाचित भाग घेणार नाही. पण आपल्या आदर्श राज्याच्या राजकारणात तो नक्कीच भाग घेईल. दैवयोगाने एखादेवेळेस तो जन्मभूमीच्या राजकारणातही भाग घेईल.

**ग्लॅकॉन** : समजले. तुमच्या मते, ज्या शहराची घटना आपण पूर्ण केली आणि जे केवळ कल्पनेतच शक्य आहे, अशा शहराच्या राजकारणातच तो भाग घेईल. पण असे शहर या पृथ्वीच्या पाठीवर सापडणे तरी कठीण आहे, असे मला वाटते.

**सॉक्रेटिस** : ज्याला असे शहर पहावयाचे असेल व त्याप्रमाणे सुसंघटित आत्मोन्नती करून घ्यावयाची असेल, त्याला अशा शहराचा आदर्श स्वर्गात सापडेल. सद्य:स्थितीत किंवा भविष्यकाळी असे शहर पृथ्वीवर सापडेल की नाही हा प्रश्न महत्त्वाचा नाही. कारण, काहीही झाले तरी इतर राज्यातील प्रचलित असलेले आचार बाजूला सारून, आदर्श शहराचेच आचार तो अमलात आणील.

**ग्लॅकॉन** : होय. तो असेच वागेल.

□ □

# प्रकरण पस्तीस

# तत्त्वज्ञान आणि काव्य

**[X-595-A—602-B]**

**कथासूत्र :**

[संवाद ग्रंथातील प्रमुख विषयांचे विवेचन पूर्ण झाल्यानंतर काही उरलेल्या महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा सुरू होत आहे.

प्राथमिक शिक्षणक्रमात प्लेटोने कल्पनारम्य वाङ्मय, ललित साहित्य यांवर टीका करून बंधन घातले आहे. तत्त्वज्ञ राज्यकर्ता हा ज्ञानी असल्याने आणि तत्त्वज्ञानाचा संबंध सत्य संशोधनाशी असल्याने, सौंदर्याचे अन्वेषण करणाऱ्या कलेला आदर्श राज्यात कोणते स्थान असावे या महत्त्वाच्या प्रश्नाची चर्चा यात आली आहे.

काव्य आणि साहित्य आणि ते निर्माण करणारे कलावंत किंवा तत्सम सर्व कला आपल्याला परमसत्ता आणि परममूल्य यांचे ज्ञान करून देण्यास असमर्थ असतात अशी प्लेटोची भूमिका आहे. या त्याच्या टीकेमागे त्याचे सत्ताशास्त्र आणि ज्ञानशास्त्र आहे.

त्याच्या मते, सत्-तत्त्वे (Ideas or Forms) आणि त्यांचे ज्ञान हेच खरे ज्ञान होय. दृश्य पदार्थ म्हणजे त्यांच्या छायांच्या छाया होत. कलाकृती या त्यांच्या छाया होत. दृश्य पदार्थ म्हणजे सत्-तत्त्वांची अनुकरणे असतात. साहजिकच, कलावस्तू या अनुकरणांची अनुकरणे असतात. म्हणून कलांच्या सहाय्याने सत्याचे ज्ञान होणे शक्य नाही असे प्लेटोने म्हटले आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** आपल्या राज्य घटनेसंबंधी आपण तयार केलेल्या योजना पूर्णपणे योग्य होत्या, हा माझा विश्वास, निरनिराळ्या प्रकारे विचार करून दृढ झाला आहे. काव्यासंबंधी केलेल्या नियमांवरून तर तो अधिकच दृढ झाला आहे.

**ग्लॅकॉन :** त्या नियमांचे स्वरूप काय आहे ?

**सॉक्रेटिस :** काव्याच्या अनुकरणात्मक शाखेला कोणत्याही कारणास्तव शहरांत येऊ देता कामा नये. अशा प्रकारचे जे आपले नियम होते, त्यांना अनुलक्षून मी बोलत आहे. आत्म्याच्या विशिष्ट भागांची व्याख्या केल्यानंतर तर अशा प्रकारच्या काव्याला जरूर बंदी घातली पाहिजे असे मला खात्रीने वाटते.

**ग्लॅकॉन :** आपले म्हणणे अधिक स्पष्टपणे मांडाल काय ?

**सॉक्रेटिस :** शोकपर्यवसायी नाटक लिहिणारे नाटककार व अनुकरणात्मक काव्य करणारे कवी यांच्याजवळ तुम्ही माझी निंदा करणार नाही अशी माझी खात्री आहे. म्हणूनच मी असे म्हणतो की, अनुकरणात्मक काव्य, ज्यांना त्यांच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान नाही, अशा लोकांच्या दृष्टीने, त्यांच्या बुद्धीला घातक आहे.

**ग्लॅकॉन :** तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय ?

**सॉक्रेटिस :** लहानपणापासून होमर कवीबद्दल वाटणाऱ्या प्रेममूलक आदरामुळे, स्पष्ट बोलण्याचा जरी मला धीर होत नसला, तरीसुद्धा माझे मत तुमच्यासमोर मांडायलाच हवे. माझ्या दृष्टीने होमर कवी सुंदर व शोकरसप्रधान काव्ये लिहिणाऱ्या लोकांचा जनक व नेता आहे. परंतु सत्याची हानी करून कोणत्याही मनुष्याला मान देणे अन्यायाचे असल्यामुळे, मी मला जे काही सांगावयाचे आहे ते सांगतोच.

**ग्लॅकॉन :** खुशाल सांगा.

**सॉक्रेटिस :** मग माझे म्हणणे तरी ऐका किंवा माझ्या प्रश्नांना उत्तरे द्या.

**ग्लॅकॉन :** तुम्ही प्रश्न विचारा.

**सॉक्रेटिस :** अनुकरणाचे सर्वसाधारण स्वरूप कसे असते हे तुम्ही सांगू शकाल काय ? त्याचे खरे स्वरूप काय आहे हे मलाच माहीत नाही.

**ग्लॅकॉन :** तुम्हांला ते माहीत नाही म्हणून ते मला माहीत असेल असे तुम्हांला वाटते काय ?

**सॉक्रेटिस :** तुम्हांला माहीत असणे अशक्य नाही. अदूरदृष्टीच्या लोकांना तीक्ष्ण दृष्टीच्या लोकांपेक्षा वस्तू जास्त लवकर दिसतात असे आपल्याला बऱ्याच वेळा दिसून येते.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे खरे आहे. पण हा शोध जरी मी लावला तरी तो तुमच्यासमोर प्रकट करण्याचे धाडस माझ्याकडून होणार नाही. तेव्हा तुम्हीच तो शोध लावा.

**सॉक्रेटिस :** ठीक आहे. आपल्या नेहमीच्या पद्धतीनेच आपण सुरुवात करू या. प्रत्येक उदाहरणात एखादे तत्त्व वा कल्पना अंतर्भूत असते असे मला वाटते. एकच नाव ज्यांना देण्यात येते अशा सर्व वस्तू या एकाच कल्पनेत समाविष्ट असतात. होय ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** अशा असंख्य वस्तूंपैकी एखादी वस्तू आपण उदाहरणादाखल घेऊ या. पलंग व टेबल पुष्कळ असतात हे तुम्हांला मान्य आहे ना ?

**ग्लॅकॉन :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** परंतु या वस्तूंतील मूलतत्त्वे किंवा कल्पना दोनच आहेत. एक पलंगाची कल्पना आणि दुसरी टेबलाची.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** या वस्तू तयार करणारा कारागीर, पलंग व त्यासारख्या इतर वस्तू तयार करीत असताना त्याची कल्पनाच डोळ्यासमोर ठेवतो ना ? कारण कोणत्याही कारागिराला, कल्पनेला मूर्त स्वरूप देणे शक्य नसते.

**ग्लॅकॉन :** नक्कीच.

**सॉक्रेटिस :** पुढील कारागिरांचे वर्णन तुम्ही कसे कराल ?

**ग्लॅकॉन :** कोणते कारागीर ?

**सॉक्रेटिस :** कारागिरांच्या कार्यक्षेत्रात ज्या ज्या वस्तूंचा समावेश होतो, त्या सर्व वस्तू जो तयार करतो त्याला अनुलक्षून मी बोलत आहे.

**ग्लॅकॉन :** असा मनुष्य विलक्षण बुद्धिमान असला पाहिजे.

**सॉक्रेटिस :** जरा विचार केल्यास हे विधान बरोबर आहे याची तुम्हांला खात्री पटेल. हा कारागीर मानवनिर्मित वस्तू तर तयार करतोच, पण जमिनीवर जे उगवते, तेही तोच निर्माण करतो. सर्व सजीव वस्तू, आकाश, आकाशातील नक्षत्रे, पृथ्वी, देव व पाताळातील प्राणी या सर्व गोष्टी त्याच्याच कौशल्यामुळे निर्माण होतात.

**ग्लॅकॉन :** तुम्ही तर अतिशय कुशल व असामान्य मनुष्याचे वर्णन करीत आहात.

**सॉक्रेटिस :** तुम्ही अतिशय श्रद्धाहीन दिसता. अशा कारागिराचे अस्तित्व शक्य नाही काय ? इतक्या विविध वस्तूंचा कारागीर एका अर्थी असेलही किंवा दुसऱ्या अर्थी नसेलही असे तुम्हांला वाटते काय ? आपल्याला स्वतःलाही अशा विविध वस्तू एका विशिष्ट तऱ्हेने करता येतील, असे तुम्हांला वाटत नाही काय ?

**ग्लॅकॉन :** कोणत्या तऱ्हेने ?

**सॉक्रेटिस :** ती तऱ्हा अत्यंत सोपी, जलद व वेगवेगळ्या प्रकारांनी करता येण्यासारखी आहे. सर्वांत जलद तऱ्हा म्हणजे एक आरसा घ्यावयाचा व तो सर्व बाजूंनी फिरवावयाचा. त्यामुळे तुम्हांला सूर्य, आकाशातील नक्षत्रे, पृथ्वी, स्वतः, इतर सजीव व निर्जिव वस्तू वगैरे सर्व वस्तू तयार करता येतील.

**ग्लॅकॉन :** होय. ह्या वस्तूंचे देखावे बघता येतील पण प्रत्यक्षात खरोखर, त्या करता येणार नाहीत.

**सॉक्रेटिस :** तुमचे निरीक्षण चांगले आहे. चित्रकारही माझ्या मते, अशाच कारागिरांच्या वर्गात मोडतो. होय ना ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : मला वाटते तुम्ही असेही म्हणाल की, त्या सर्व वस्तू असत्य असतात. परंतु चित्रकार एका अर्थाने पलंगच निर्माण करीत नाही काय ?

**ग्लॅकॉन** : होय. चित्रकार दिखाऊ पलंग तयार करतो.

**सॉक्रेटिस** : मग पलंगाच्या कारागिरीबद्दल तुम्ही काय म्हणाल ? मघाशीच तुम्ही असे म्हटले की, पलंग म्हणून सांगणाऱ्या कल्पनेला मूर्त स्वरूप देता आले नाही तरी तो एक भौतिक पलंग तयार करतो.

**ग्लॅकॉन** : होय. मी असे म्हटले.

**सॉक्रेटिस** : खरोखर अस्तित्वात असणारी वस्तू तो तयार करू शकत नाही. म्हणजेच तो खरी वस्तू तयार करीत नसून, खऱ्या वस्तूसारखी दिसणारी वस्तू तयार करतो. पलंग करणारा किंवा दुसरा एखादा कारागीर जी वस्तू तयार करतो ती पूर्ण खरी असते, असे जर कोणी म्हटले तर खरे असेल काय ?

**ग्लॅकॉन** : तत्त्वज्ञानी लोकांच्या दृष्टीने ते खरे असणार नाही.

**सॉक्रेटिस** : वस्तूतत्त्वाशी तुलना करीत असताना, पलंगासारख्या भरीव वस्तूही छायेप्रमाणे असतात ह्यात आपणांस आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : नक्कल करणाऱ्या मनुष्याच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा करताना ह्याच उदाहरणाचा उपयोग करावा ना ?

**ग्लॅकॉन** : तुम्हांला पसंत असल्यास करावा.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. तीन प्रकारचे पलंग आपण आता ठरविले. पहिल्या प्रकारचा पलंग स्वभावसिद्ध असून ईश्वरनिर्मित असतो. ईश्वराशिवाय दुसरा कोणी त्याचा कारागीर असू शकेल काय ?

**ग्लॅकॉन** : नाही.

**सॉक्रेटिस** : पलंगाचा दुसरा प्रकार सुताराकडून केला जातो.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : तिसरा प्रकार चित्रकाराकडून केला जातो ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : ह्याप्रमाणे पलंगाचे तीन प्रकार करून, त्यांचे चित्रकार, सुतार व ईश्वर असे कारागीर आपण ठरविले.

**ग्लॅकॉन** : होय. आपण तीन कारागीर ठरविले.

**सॉक्रेटिस** : ईश्वराने स्वेच्छेने किंवा अनिच्छेने, एकच पलंग या जगात निर्माण केला तो म्हणजेच पलंगाची निरुपाधिक कल्पना. अशा प्रकारचे दोन किंवा दोन्हीहून जास्त पलंग ईश्वराने निर्माण केले नाहीत व करणारही नाही.

**ग्लॅकॉन** : असे कां ?

**सॉक्रेटिस** : कारण ईश्वराने दोन पलंग निर्माण केले तर तिसरा एक पलंग मानावा लागेल. या पलंगाच्या कल्पनेच्या आधारावर पहिले दोन पलंग निर्माण केले असतील आणि हा पलंगच आदर्श असेल.

**ग्लॅकॉन** : तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : हे लक्षात ठेवून व खऱ्या पलंगाचा निर्माता होण्याची इच्छा मनात धरून ईश्वराने एकच आदर्श पलंग निर्माण केला. कारण एका अनिश्चित पलंगाचा, अनिश्चित कर्ता होणे त्याला पसंत नव्हते.

**ग्लॅकॉन** : असे दिसते खरे.

**सॉक्रेटिस** : ह्या आदर्श पलंगाचा कर्ता, ईश्वर मानणे तुम्हांला मान्य आहे का ?

**ग्लॅकॉन** : होय. आणि ते योग्यही आहे. कारण त्याने स्वतःच्या कृतीने हा आदर्श, निरुपाधिक पलंग व इतर वस्तू तयार केल्या आहेत.

**सॉक्रेटिस** : सुतारासंबंधी काय म्हणावे ? आपण त्याला पलंगाचा कारागीर म्हणू शकू का ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : चित्रकारास वस्तूचा कारागीर म्हणता येईल काय ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच नाही.

**सॉक्रेटिस** : मग पलंगाच्या बाबतीत त्याचे काय काम असते ?

**ग्लॅकॉन** : ईश्वर व सुतार हे ज्या वस्तूचे कारागीर आहेत, त्या वस्तूची नक्कल करणारास चित्रकार म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : वस्तूच्या मूळ कल्पनेपासून दुप्पट दूर असणाऱ्या वस्तूंच्या कर्त्यालाच नक्कल करणारा असे म्हणता येईल ना ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : शोकपर्यवसायी नाटक लिहिणारा नाटककार, हा नक्कल करणारा असल्यामुळे, त्याच्याविषयीही आपल्याला असेच म्हणता येईल. इतर नक्कल करणाऱ्यांप्रमाणेच तो सर्वाधीश व सत्य यांच्या खालोखाल–तिसऱ्या नंबरावर असतो.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** नक्कल करणाऱ्या कलावंताचे स्वरूप आपण ठरविले. पण चित्रकार हा मूळ वस्तूची नक्कल करतो की, कारागिराने निर्माण केलेल्या वस्तूची नक्कल करतो ?

**ग्लॅकॉन :** कारागिराने केलेल्या वस्तूंची.

**सॉक्रेटिस :** ह्या कृती जशा स्वरूपात दिसतात तशांची, की त्या निव्वळ दिसतात तशांची ?

**ग्लॅकॉन :** तुमचा प्रश्न अधिक स्पष्ट कराल काय ?

**सॉक्रेटिस :** जेव्हा पलंगाकडे तुम्ही कोणत्या बाजूने बघता, तेव्हा त्याचे एकत्व बदलते काय ? अथवा पलंग जेव्हा बदललेला दिसतो तेव्हा तो एकच असतो काय ? असेच इतर वस्तूंबद्दलही म्हणता येईल काय ?

**ग्लॅकॉन :** दुसऱ्या प्रकारचे वर्णन खरे आहे. तो बदललेला आहे असे वाटते, पण वस्तुतः तो बदललेला नसतो.

**सॉक्रेटिस :** आता पुढील मुद्द्याचा तुम्ही विचार करा. चित्रकला खऱ्या वस्तूंच्या खऱ्या स्वभावाची नक्कल करण्याचा अभ्यास करते की, वस्तूच्या बाह्य स्वरूपाची नक्कल करण्याचा अभ्यास करते ? थोडक्यात म्हणजे ती खऱ्याची नक्कल करते की, नकलेची नक्कल करते ?

**ग्लॅकॉन :** नकलेची नक्कल करते.

**सॉक्रेटिस :** म्हणूनच नक्कल करण्याची कला सत्यापासून लांब असते असे मला वाटते. ही कला बाह्यतः परिणामकारक असते. कारण ती वस्तूच्या लहान व क्षुद्र भागाची नक्कल करते. उदा. चांभार, सुतार वा इतर कारागीर ह्यांच्या धंद्याविषयी चित्रकाराला काही ज्ञान नसतानाही त्यांचे चित्र काढून देतो. एखादा उत्तम चित्रकार, सुताराचे चित्र लांब अंतरावरून दाखवून, मुलांना व वेडपट लोकांना, तो खरोखर सुतार आहे असे भासवून फसवू शकतो.

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** माझ्या मित्रा, या बाबतीत आपण काय विचार केला पाहिजे ते सांगतो. आपल्याला जर कोणी म्हणू लागला "सर्व कलांचे ज्ञान असणारा व इतर कोणापेक्षाही अधिक सूक्ष्मपणाने प्रत्येक कलेत ज्ञान मिळविणारा मनुष्य मला सापडला आहे," तर त्याला आपण गारुडी, नकल्या यांच्या तावडीत सापडलेला वेडगळ म्हणू. कारण शास्त्र, अज्ञान व नक्कल यांच्यातील फरक कळत नसल्यामुळे, तो वरील प्रकारच्या माणसाला सर्वज्ञ समजतो.

**ग्लॅकॉन :** अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** आता आपण शोकपर्यवसायी नाटक लिहिणारे नाटककार व त्यांचा नेता होमर यांच्याविषयी विचार करू. आपल्याला बऱ्याच जणांकडून असे सांगण्यात येते की,

नाटचलेखन करणाऱ्या लोकांना सर्व कलांचे ज्ञान असते, एवढेच नव्हे तर, सद्‌गुण व दुर्गुण ह्यांच्याशी निगडित असलेल्या सर्व मानवी व दैवी गोष्टीही त्यांना ज्ञात असतात. कोणत्याही विषयावर लिहिण्यापूर्वी, चांगल्या कवीला, त्या विषयाचे ज्ञान असल्याशिवाय काहीच लिहिता येणार नाही, असे त्या लोकांना वाटते. म्हणून अशा लोकांची चूक झाली आहे किंवा काय, याचा आपण विचार केला पाहिजे. असे लोक नकली माणसांकडून इतके फसविले गेले असावेत की, कवींच्या नाटचकृती पाहताना, त्या सत्यापासून दुप्पट दूर असतात व केवळ आभासात्मक असल्यामुळे सत्याचे ज्ञान नसतानाही करून दाखविता येतात, हे त्यांना माहीत नसावे. कदाचित, या लोकांचे म्हणणे खरे असून, सामान्य लोकांना वाटते त्याप्रमाणे कवी लोकांना खरोखरच त्या विषयांचे ज्ञान असेलही.

**ग्लॅकॉन** : वरील प्रश्नांचा आपण विचार केला पाहिजे.

**सॉक्रेटिस** : एखाद्या मनुष्याला सत्य व आभासात्मक दोन्हीही करणे शक्य असताना, आभासात्मक कामामध्येच सर्व लक्ष घालून व आपण फार मोठे कार्य करीत आहोत असे समजून आपल्या आयुष्याचे ध्येय, नक्कल करणे हेच तो ठरवील काय?

**ग्लॅकॉन** : मला तसे वाटत नाही.

**सॉक्रेटिस** : ह्याउलट, ज्या वस्तूंची तो नक्कल करतो त्यांच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान त्याला झाले तर नक्कल करण्याऐवजी आपला सर्व उद्योग खऱ्या कृत्यांकडे वळवून, मृत्यूनंतर उदात्त कृत्येच आपले स्मारक ठरतील असा विचार करून, स्तुतिपाठक बनण्याऐवजी स्तुतीचा विषय बनण्याची महत्त्वाकांक्षा तो बाळगील.

**ग्लॅकॉन** : माझेही मत तुमच्यासारखेच आहे. कारण अशी महत्त्वाकांक्षा बाळगल्यानेच त्याला अधिक कीर्ती व फायदा मिळविता येईल.

**सॉक्रेटिस** : होमरला किंवा इतर कवींना सामान्य विषयासंबंधी आपणांस पुढील प्रश्न विचारण्याची आवश्यकता नाही. जर प्राचीन अथवा अर्वाचीन कवी, वैद्यकीय कलेमध्ये केवळ वैद्यकीय भाषेची नक्कल करणारे नसून खरोखर निष्णात असते तर एक्सलिपिअसप्रमाणे त्यांनी गुणकारी औषधे का शोधून काढली नाहीत? किंवा एक्सलिपिअसने जसे आपले शिष्य तयार केले तसे कवींनी आपल्या ज्ञानाने आयुर्वेद विद्यासंपन्न असे शिष्य का तयार केले नाहीत? असे वैद्यकासंबंधी प्रश्न आपण त्यांना विचारणार नाही. तसेच इतर कलांविषयीही आपण त्यांना विचारणार नाही. परंतु युद्ध, सैन्याची हालचाल, शहराची व्यवस्था, शिक्षण इत्यादी महत्त्वाचे विषय जेव्हा होमर आपल्या काव्यात सांगतो त्यावेळेस पुढील प्रश्न विचारणे योग्य आहे. "प्रिय होमर, आमच्या व्याख्येप्रमाणे तुम्ही आभासाचे कर्ते नसून, सत्यापासून दुप्पट दूर नसून, एक पायरीच दूर आहात. कोणत्या व्यवसायामुळे, खाजगी व सार्वजनिक आयुष्यामध्ये, माणसे चांगली व वाईट होऊ शकतात, हे जर तुम्ही सांगू शकता, तर लिसर्गस ज्याप्रमाणे लॅसिडिमॉन शहराच्या घटनेचा कर्ता आहे त्याप्रमाणे तुम्ही कोणत्या शहराच्या घटनेचे कर्ते

आहात ? तुम्ही चांगले कायदे केले म्हणून कोणते राज्य तुम्हांला धन्यवाद देते ? ज्याप्रमाणे इटली व सिसिली चारोन्डासला आपला घटनाकार समजतात, आम्ही सोलोनला समजतो, त्याप्रमाणे कोणते राज्य तुम्हांला असा मान देते ? " असा प्रश्न विचारला असता तो कोणत्या राज्याचे नाव सांगू शकेल ?.

**ग्लॅकॉन** : कोणत्याच नाही. जे कवी त्याला आपला पूर्वज मानतात, त्यांच्याकडूनही आपणाला अशी माहिती मिळत नाही.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. होमरच्या काळातील एखादे युद्ध, होमरच्या सेनाधिपत्यामुळे, वात्सल्यामुळे चांगल्या तऱ्हेने शेवटास गेले असे कधी घडले आहे काय ?

**ग्लॅकॉन** : नाही. असे कधीच घडलेले नाही.

**सॉक्रेटिस** : होमर कवीने, मिलेशियन थेल्स व सिथिअन अॅनाचार्सिस ह्यांच्याप्रमाणे उपयुक्त कला व व्यावहारिक गोष्टी यांच्या संदर्भात अनेक शोध लावले आहेत काय ?

**ग्लॅकॉन** : नाही. असे त्याने काहीही केलेले नाही.

**सॉक्रेटिस** : होमरने सार्वजनिक कार्यात कधी भाग घेत नसला तरी निदान खाजगी रीतीने शिक्षण देऊन, ज्यांना त्याच्या सहवासात आनंद वाटेल, असे शिष्य त्याने तयार केले आहेत काय ? किंवा त्याच्या आयुष्याचा आदर्श उदाहरण म्हणून त्या शिष्यांनी उपयोग केला आहे ? पायथॅगोरसविषयी असे सांगण्यात येते की, मित्र म्हणून तो लोकांना विशेष आवडत असे व त्याचे शिष्य आपण पायथॅगोरिअन पद्धतीने आयुष्य घालवितो असे अजूनही अभिमानाने सांगतात.

**ग्लॅकॉन** : सॉक्रेटिस, अशा प्रकारच्या गोष्टी होमरविषयी सांगितल्या जात नाहीत. उलट, होमरविषयी ज्या गोष्टी सांगितल्या जातात त्या खऱ्या असतील तर क्रिओफेलिस नावाच्या मित्राला त्याने जे शिक्षण दिले ते क्रिओफेलिसच्या नावापेक्षाही हास्यास्पद आहे. कारण असे सांगितले जाते की, क्रिओफेलिसने, होमर जिवंत असेपर्यंत, त्याची उपेक्षाच केली.

**सॉक्रेटिस** : अशी गोष्ट सांगण्यात येते खरी. पण ग्लॅकॉन, होमरला निव्वळ नक्कल करण्यापेक्षा, वस्तूंचे अधिक ज्ञान असते व लोकांना शिक्षण देऊन त्यांना सद्‌गुणी करू शकत असता, तर तुम्हांला असे वाटते काय की, आपल्या भोवती अनेक मित्र जमवून, त्यांच्याकडून प्रेम व आदर तो संपादन करू शकला नसता ? अबडेराचा प्रोटॅगोरस, सिऑसचा प्रॉडिकस व इतर लोक, त्यांच्या वेळच्या लोकांना केवळ म्हणत, " जोपर्यंत आम्हांला तुम्ही शिक्षण मंत्री करीत नाही तोपर्यंत तुमच्या घराची व शहराची व्यवस्था लागणार नाही." एवढे म्हटल्यावर ते त्यांना प्रेमाने आपल्या खांद्यावर उचलून घेत असत. त्यांच्या वेळेस अशी परिस्थिती असताना, होमर व हिसिअड हे कवी लोकांना सद्‌गुणी बनविण्याइतके खरोखरच समर्थ असते तर त्यांना लोकांनी आपली काव्ये ऐकविण्यासाठी भटकायला लावले असते काय ? उलट, देशबांधवांनी, सोन्यापेक्षाही त्यांना अधिक मान

देऊन जवळ केले असते व स्वदेशातच राहाण्यास भाग पाडले नसते काय? स्वदेशात राहाण्याचे जरी त्यांनी नाकारले असते तरी, ते जिकडे जातील तिकडे त्यांच्यामागे जाऊन त्यांचे शिष्य राहिले नसते काय?

**ग्लॅकॉन :** तुम्ही म्हणता ते अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** यावरून होमर वगैरे सर्व कवी, सत्याचे ज्ञान करून न घेता, सद्‌गुण व इतर विषयासंबंधी लिहिताना केवळ त्यांची नक्कलच करीत होते, असे म्हणता येईल ना? आताच आपण म्हटल्याप्रमाणे, चित्रकार जोडे शिवण्याच्या कामासंबंधी अनभिज्ञ असला तरी, तो चांभाराचे चित्र काढू शकेल. त्या चित्रावरून त्यातील रंग व आकार यांच्यावरून त्याच्यासारखेच इतर अज्ञ लोकही ते चित्र चांभाराचे आहे हे ओळखू शकतील.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** चित्रकाराप्रमाणेच, कवीही क्रियापदे, नामे इत्यादी रूपांत असलेल्या रंगांनी, कित्येक धंद्यांचे ज्ञान नसतानाही वर्णन करू शकेल. त्यामुळेच जेव्हा तो चांभारकी, सेनापत्य अथवा इतर कोणत्याही व्यवसायासंबंधी, वृत्तात, लयीत व स्वरसंगतीत वर्णन करतो, तेव्हा त्याचे लेखन, त्याच्यासारख्याच अज्ञानी व केवळ भाषेच्या फुलोऱ्यावर भुलणाऱ्या लोकांकडून उत्तम काव्य म्हणून ठरविले जाते. कारण लय व स्वरसंगती त्यांच्यावर मोहिनी टाकू शकतात. संगीताचा आकर्षकपणा काढून टाकला आणि काव्य केवळ गद्य स्वरूपात वाचले तर ते किती कमी दर्जाचे असते हे तुम्हांला माहीत आहेच.

**ग्लॅकॉन :** होय. मला माहीत आहे.

**सॉक्रेटिस :** काही लोकांचे चेहरे, सौंदर्याऐवजी केवळ तारुण्यामुळे टवटवीत दिसतात. तारुण्यसुलभ टवटवी निघून गेल्यावर ते सुकून जातात. असाच प्रकार काव्याचाही होतो ना?

**ग्लॅकॉन :** बरोबर.

**सॉक्रेटिस :** आता पुढील मुद्द्याचा विचार करा. आपल्या मते, मूर्ती करणारा हा केवळ नक्कल करणारा असून, त्याला फक्त बाह्यांगाचे ज्ञान असते, वस्तुतत्त्व त्याला कळत नाही. असेच ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** याविषयी अर्धवट चर्चा न करता, ती सांगोपांग केली पाहिजे.

**ग्लॅकॉन :** ठीक आहे.

**सॉक्रेटिस :** लगाम व लगामाची वादी यांचे चित्र, एखादा चित्रकार काढू शकेल ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** परंतु लगाम व त्याची वादी कशी तयार करावी हे चित्रकाराला माहीत असते काय ? जिनगर व लोहार हयांनाही या विषयाचे ज्ञान नसून, घोडयावरील स्वारालाच ते फक्त माहीत असते ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** सर्वच वस्तूंबद्दल असे म्हणता येईल ना ?

**ग्लॅकॉन :** आपल्याला काय म्हणावयाचे आहे ?

**सॉक्रेटिस :** प्रत्येक वस्तूमध्ये तीन कला असतात. पहिली वस्तूचा उपयोग करणे, दुसरी ती वस्तू निर्माण करणे व तिसरी म्हणजे त्या वस्तूची नक्कल करणे.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** सर्व सजीव-निर्जीव वस्तूंतील व प्रत्येक मानवी कृत्यातील सौंदर्य व सत्य ही त्या वस्तूच्या निर्मितीमागील हेतूवरूनच ठरवावयाची असतात ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** म्हणून वस्तूचा उपयोग करणाऱ्याने, त्या वस्तूची माहिती चांगल्या प्रकारे करून घेतली पाहिजे आणि तिचा वापर करताना ज्या सोयी, गैरसोयी दिसतील त्यांची कल्पना, ती वस्तू तयार करणाऱ्यास दिली पाहिजे. उदा. आपल्या आवडीकरिता मनुष्य बासरी वाजवितो. त्याची माहिती बासरी तयार करणाऱ्याला सांगतो व त्यानुसार कारागीर ती तयार करतो.

**ग्लॅकॉन :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** बासरीच्या चांगल्या-वाईटाचे ज्ञान एकाला असते तर त्याचा कारागीर दुसराच असतो. होय ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** वाद्यांचे ज्ञान असणाऱ्या मनुष्याशी, वाद्ये करणाऱ्या माणसाने सहवास ठेवल्यामुळे व त्याच्या सूचनेनुसार काम केल्यामुळे वाद्याच्या चांगल्या-वाईटाविषयी त्याला माहिती मिळेल. परंतु वाद्यांचा उपयोग करणाऱ्यालाच त्याविषयी शास्त्रीय ज्ञान असते.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

**सॉक्रेटिस :** नक्कल करणाऱ्या माणसाला हयापैकी कशाचे ज्ञान असते ? ज्या वस्तूंचे तो वर्णन करतो त्या सुंदर व योग्य आहेत की नाहीत याचे शास्त्रीय ज्ञान त्याला असेल काय ? अथवा ज्या मनुष्याला वस्तूंचे खरे ज्ञान आहे अशा माणसाच्या सहवासात राहाण्यास त्याला भाग पाडले असता, त्या वस्तूंविषयी योग्य समज त्याला येईल काय ?

**ग्लॅकॉन :** वस्तूंविषयी शास्त्रीय ज्ञान वा योग्य समज त्याला अजिबात असणार नाही.

**सॉक्रेटिस :** यावरून असे सिद्ध होते की, नक्कल करणाऱ्या माणसाला, तो ज्या वस्तूंची नक्कल करतो त्याच्या सौंदर्याविषयी अथवा वाईटपणाविषयी शास्त्रीय ज्ञान किंवा योग्य समज नसते.

**ग्लॅकॉन :** असे दिसून येते.

**सॉक्रेटिस :** वर्ण्यविषयासंबंधी कवी विलक्षण बुद्धिमत्ता दाखवितो काय ?

**ग्लॅकॉन :** छे ! असे मुळीच म्हणता येणार नाही.

**सॉक्रेटिस :** वस्तूंच्या चांगलेपणाचे वा वाईटपणाचे कारण माहीत नसतानाही कवी त्यांची नक्कल करील. आणि पूर्वीपासून चालत आलेल्या सौंदर्याच्या कल्पनांचे अनुकरण करून तेच अडाणी लोकांना सांगेल.

**ग्लॅकॉन :** तो दुसरे काय करणार ?

**सॉक्रेटिस :** म्हणजेच नक्कल करणारा मनुष्य, ज्या वस्तूंची नक्कल केली जाते त्यांच्याविषयी पूर्ण अनभिज्ञ असतो. म्हणूनच अनुकरण ही केवळ करमणुकीची कला आहे. म्हणून शोकान्त काव्य लिहिणारे कवी सर्वांत श्रेष्ठ नकलाकार होत.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

□ □

# प्रकरण छत्तीस

# नाटचवाङ्मयाची मीमांसा

**[X-602-C—605-C]**

**कथासूत्र :**

[इतर कलांप्रमाणेच प्लेटोने नाटच या महत्त्वाच्या साहित्य प्रकारावर प्रखर टीका केली आहे. पण त्याची ही टीका सत्ताशास्त्रीय किंवा ज्ञानशास्त्रीय नसून मानसशास्त्रीय आहे. वासना, अस्मिता आणि प्रज्ञा हे प्लेटोने आत्म्याचे तीन भाग केले आहेत; आणि त्यामधील सुसंवाद हा व्यक्तिगत सुख, हित व न्याय यांचा पाया मानला आहे.

त्याच्या मते, नाटच किंवा नाटचकाव्य प्रज्ञेऐवजी भावनांना आवाहन करते आणि वास्तवाऐवजी काल्पनिकाची आवड निर्माण करते. तात्त्विक दृष्टचा जे सत्य आणि वास्तव त्याचे ज्ञान अर्थातच नाटचवाङ्मयाच्या माध्यमाने होणे शक्य नाही. उलट त्यामुळे आंतरिक सुसंवाद मात्र बिघडेल अशी त्याची भूमिका आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** अनुकरणाची कला सत्यापासून दुप्पट दूर असते ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** अनुकरण कला मनुष्याच्या कोणत्या भागावर प्रयोग करते?

**ग्लॅकॉन :** तुमचे काय मत आहे?

**सॉक्रेटिस :** एकाच आकाराच्या वस्तू ज्या प्रमाणात आपल्यापासून दूर असतात, त्या प्रमाणात भिन्न दिसतात.

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** काही वस्तू पाण्याबाहेर सरळ दिसतात, पण पाण्यात घातल्यावर वाकडचा दिसतात. त्याचप्रमाणे वर्णविभ्रम सुलभ दृष्टीला त्याच गोष्टी अंतर्गोल किंवा बहिर्वक्र दिसतात. अशाच प्रकारचा गोंधळ आपल्या आत्म्यातही दिसतो. या दुर्बलतेमुळेच चित्रकला, जादूगिरी व इतर कला आपल्यावर चेटूक करू शकतात.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस** : कल्पनांची जादुगिरी नाहीशी करण्याकरिताच मापन करणे, गणित करणे, वजन करणे अशा बौद्धिक पद्धती अस्तित्वात आल्या नाहीत काय ? अंदाजाऐवजी वजन, माप, गणित यांसारख्या निश्चित स्वरूपाच्या बौद्धिक पद्धती निर्माण झाल्या नाहीत काय ?

**ग्लॅकॉन** : नक्कीच.

**सॉक्रेटिस** : आत्म्यामधील विवेचक तत्त्वाचेच हे कार्य नव्हे काय ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : जेव्हा मापन या तत्त्वावरून एक वस्तू दुसऱ्या वस्तूपेक्षा लहान किंवा मोठी आहे हे कळते, तेव्हा त्याच वस्तूंच्या त्याचक्षणी दिसून येणाऱ्या बाह्य स्वरूपामुळे ह्या तत्त्वाशी विरोधही केला जातो.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : एकाच वस्तूविषयी, एकाच वेळेला आत्म्याने विरुद्ध मत बाळगणे अशक्य आहे असे आपण म्हटले होते ना ?

**ग्लॅकॉन** : होय. आपण असे म्हटले होते.

**सॉक्रेटिस** : म्हणजेच आत्म्याच्या ज्या भागाचे मत मापनाच्या विरुद्ध असते तो भाग मापनाच्या बाजूने असणाऱ्या भागापेक्षा वेगळा असणार.

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : मापन व गणित ह्यांच्यावर जो भाग विश्वास ठेवतो तो आत्म्याचा उत्तम भाग होय.

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : ह्या भागाशी विरोध असणारा आत्म्याचा भाग कनिष्ठ मानावा लागेल.

**ग्लॅकॉन** : उघडच आहे.

**सॉक्रेटिस** : चित्रकलेसंबंधी किंवा इतर अनुकरणात्मक कलांविषयी बोलताना हाच मुद्दा निश्चित करण्याचा मी प्रयत्न करीत होतो. सत्यापासून दूर असणाऱ्या कामातच अनुकरणकला गढून गेलेली असते. ती ज्ञानापासून दूर असलेल्या तत्त्वाशी मैत्री करून, त्याची दासी म्हणून राहून, कोणताही चांगला हेतू साध्य करीत नाही.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : अनुकरण कला म्हणजे क्षुद्र मित्राची क्षुद्र दासी व क्षुद्र कृतीची जननी होय.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : दृष्टीशी संबंध असलेल्या कलेविषयीच फक्त असे म्हणता येते काय? श्रवणेंद्रियांशी संबंध असलेल्या कलेसंबंधी म्हणजे काव्याविषयी असेच म्हणता येईल का?

**ग्लॅकॉन** : बहुतेक आपणांस असे म्हणता येईल.

**सॉक्रेटिस** : चित्रकलेच्या संभाव्य पुराव्यावरच आपण अवलंबून राहून चालणार नाही. काव्याची कला ज्या बुद्धीच्या भागाशी निगडित असते, तो भाग चांगला अथवा वाईट असतो याचाही आपण शोध घेतला पाहिजे.

**ग्लॅकॉन** : अर्थातच.

**सॉक्रेटिस** : आपण पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करू. स्वेच्छेने वा सत्तीने केलेल्या कृतीच्या परिणामांवरून जे आपली सुस्थिती किंवा दुःस्थिती ठरवितात आणि ज्यांना आनंदाची व दुःखाची जाणीव असते, अशा मनुष्यांचेच अनुकरण या अनुकरणकला करतात. यात तुम्हाला काही भर घालावयाची आहे का?

**ग्लॅकॉन** : नाही.

**सॉक्रेटिस** : अशा विविध परिस्थितीत असणाऱ्या माणसांच्या मनाची एकात्मता असते काय? दृष्टीच्या संदर्भात बोलताना आपण म्हटले त्याप्रमाणे एकाच वेळेला एकाच विषयासंबंधी परस्परविरोधी मते बनू शकतात त्याप्रमाणे अशा परिस्थितीत असलेल्या माणसांची आत्मविरोधी व विसंगत अवस्था असते ना? या बाबतीत, मला वाटते, पुन्हा एकमत करण्याची आवश्यकता नाही. कारण पूर्वीच्या चर्चेवरून आपण असे ठरविले आहे की, आत्म्यामध्ये अशा अनेक परस्परविरोधी भावना असतात.

**ग्लॅकॉन** : आपण जे ठरविले, ते बरोबर होते.

**सॉक्रेटिस** : पण त्या वेळेस आपण जी गोष्ट वगळली होती ती आता लक्षात घेतली पाहिजे.

**ग्लॅकॉन** : ती कोणती?

**सॉक्रेटिस** : त्या वेळेस आपण म्हटले होते की, सज्जन मनुष्य आपला स्वतःचा मुलगा अथवा अशीच अत्यंत प्रिय वस्तू गमावली असता होणारे दुःख, इतरांपेक्षा अधिक धैर्याने सहन करील.

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : पण त्याला अजिबात दुःख होणार नाही काय? का दुःख होणे अपरिहार्य आहे, असे समजून तो शांत राहील?

**ग्लॅकॉन** : तो शांतपणा स्वीकारील हे अधिक खरे आहे.

**सॉक्रेटिस** : त्याच्यासारख्याच लोकांचे लक्ष त्याच्याकडे गेले असता, तो आपल्या दुःखाशी टक्कर देऊन त्याचा प्रतिकार करील की एकट्याशीच विचार करीत बसेल?

**ग्लॅकॉन :** इतरांचे लक्ष गेल्यावर तो अधिक जोराने दुःखाशी टक्कर देईल असे मला वाटते.

**सॉक्रेटिस :** पण एकटा बसला असता, ज्या गोष्टी इतरांनी बघितल्या वा ऐकल्या असता त्याला लाज वाटेल, अशा पुष्कळ गोष्टी तो करील अथवा बोलेल.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** बुद्धी व कायदा ह्यांचे तत्त्वच त्याला दुःखाचा प्रतिकार करण्यास भाग पाडते ना? दुःखाच्या भावनेनेच त्याला शोक करण्यास प्रोत्साहन मिळते ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** एकाच वस्तूबद्दल, एकाच वेळेस जेव्हा मनुष्यात विरोधी भावना निर्माण होतात, त्या वेळेस त्याच्यामध्ये दोन स्वतंत्र तत्त्वे आहेत असेच सिद्ध होते ना?

**ग्लॅकॉन :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** त्यांपैकी एक तत्त्व कायद्याच्या आज्ञा पाळते ना?

**ग्लॅकॉन :** कोणत्या आज्ञा?

**सॉक्रेटिस :** दुर्दैवाच्या प्रसंगी मनुष्याने शांत राहिले पाहिजे आणि असमाधानाच्या भावना दडपून टाकल्या पाहिजेत असे कायदा सांगतो. कारण दुर्दैवाच्या प्रसंगातून चांगले अथवा वाईट काय निर्माण होणार आहे याची आपल्याला कल्पना नसल्यामुळे उतावळेपणाचा काही उपयोग नसतो. मानवी आयुष्यातील कोणताही प्रश्न विशेष काळजी करण्याइतका महत्त्वाचा नसतो. परंतु दुःख मात्र संकटप्रसंगी आवश्यक असणाऱ्या कृत्याच्या आड येते.

**ग्लॅकॉन :** कोणत्या वर्तनासंबंधी आपण म्हणता?

**सॉक्रेटिस :** सोंगट्यांच्या खेळात, दान पडेल त्याप्रमाणे माणूस सोंगट्यांच्या जागा बदलतो. त्याप्रमाणेच जी गोष्ट घडून गेली आहे तिच्यासंबंधी विचार करणे आपले कर्तव्य असून बुद्धीने सुचविलेल्या मार्गाने आपण संकटाला तोंड देण्याची तयारी केली पाहिजे. पडून जखमी झाली असता, ती घट्ट धरून, लहान मुले फक्त ओरडत बसतात. आपण त्यांच्याप्रमाणे न वागता, आत्म्याच्या ज्या भागाला दुखणे झाले आहे, ते बरे करण्याकरिता मदतीला जाण्याची सवय लावली पाहिजे व औषधाच्या सहाय्याने दुःख कमी केले पाहिजे.

**ग्लॅकॉन :** दुःखप्रसंगी हेच वर्तन योग्य आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या आत्म्याचा चांगला भाग बुद्धिवादाचे नेतृत्व करतो.

**ग्लॅकॉन :** स्वाभाविकच आहे.

**सॉक्रेटिस :** याउलट, जो भाग आपण दुःखाची आठवण देऊन, शोक करावयास लावतो व ज्याला त्याच्यातच अतृप्त अशी गोडी वाटते तो अविवेकी, आळशी, भित्रा आहे असे आपण म्हणू शकू ना ?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** अशा परिस्थितीत, चिडखोर स्वभाव नक्कल करण्यास विविध व पुष्कळ सामग्री पुरवितो. परंतु सूज्ञ व शांत स्वभाव, एकरूप व अविचल असल्यामुळे, नक्कल करण्यास अवघड असतो. सर्वसामान्य माणसाला, नाटकगृहात करून दाखविलेली अशा स्वभावाची नक्कल समजत नाही. कारण अशी मनःस्थिती त्यांना अपरिचित असते.

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** यावरून हे उघड दिसते नक्कल करणाऱ्या कवीचा शांत स्वभावाच्या आत्म्याशी काही संबंध नसतो. उलट, त्याला जर प्रसिद्धी मिळवावयाची असेल तर अशा आत्म्याचे रंजन करण्यात तो आपले डोके खर्च करणार नाही. चिडखोर व विकारी स्वभावांची नक्कल करणे सोपे असल्यामुळे अशा स्वभावाशीच त्याचे काम असते.

**ग्लॅकॉन :** हे स्पष्टच आहे.

**सॉक्रेटिस :** म्हणजेच चित्रकाराच्या जोडीलाच त्याला बसविणे योग्य होईल. कारण सत्याची कसोटी लावली असता, क्षुद्र वस्तू निर्माण करण्यात व आत्म्याच्या कनिष्ठ भागाशी संगत ठेवण्यात, त्याचे वर्तन चित्रकारासारखेच असते. म्हणूनच आपण कवीला आदर्श राज्यात प्रवेश देता कामा नये. कारण आत्म्याच्या क्षुद्र भागाला उद्दिपित करून, खाद्य पुरवून सशक्त करतो व विवेचक भागाचा नाश करतो. ज्याप्रमाणे एखादा राजा दुर्व्यसनी प्रजाजनांना बलवान करून त्यांच्या हातात सत्ता देतो व सुशिक्षित वर्गाचा नाश करतो, त्याचप्रमाणे नक्कल करणारा कवी प्रत्येक व्यक्तीमध्ये वाईट स्वभावाचे बीजारोपण करतो. कारण लहान व मोठे यांतील भेद कळत नसल्यामुळे, एकाच वस्तूला एकदा लहान व एकदा मोठी म्हणणाऱ्या अविवेकी भागाचे कवी पोषण करीत असतो. अशा प्रकारे सत्यापासून खूप दूर असलेल्या आभासांचा, कवी जनक असतो.

**ग्लॅकॉन :** बरोबर आहे.

□ □

## प्रकरण सदतीस

# नाटचवाङ्मयाचे नैतिक परिणाम

**[X-605-C—608-B]**

**कथासूत्र :**

[व्यक्तीच्या चारित्र्यावर होणारा, विशेषतः नाटचाचा होणारा वाईट परिणाम प्लेटोने सांगितला आहे. संयम, धैर्य, ज्ञान आणि न्याय हे चार महत्त्वाचे सद्‌गुण प्लेटोने मानले आहेत. आत्मिक सुसंवादामुळेच या सद्‌गुणांची जोपासना व्यवस्थित होऊ शकते आणि व्यक्तीचे चारित्र्य घडविले जाते. साहित्यामध्ये आणि नाटचामध्ये किंवा कोणत्याही कलात्मक अविष्कारामध्ये वासना, भावना, कल्पना, अनुकरण यांनाच आवाहन होत असल्याने अपेक्षित चारित्र्याची घडण नीट होणार नाही ; असा प्लेटोचा दृष्टिकोन आहे.

एकंदरीत ज्ञान आणि न्याय यांच्या साधनेत साहित्य आणि कला यांना महत्त्वाचे स्थान नाही असाच प्लेटोचा अभिप्राय दिसतो.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** अनेक सज्जन माणसांचे नुकसान करण्याची काव्यात शक्ती आहे असा काव्यावरील सर्वांत मोठा आरोप अजून आपण पुढे आणला नाही.

**ग्लॅकॉन :** हा आरोप निःसंशयच मोठा आहे. परंतु तो सिद्ध करणे आवश्यक आहे.

**सॉक्रेटिस :** त्याकरिताच पुढील म्हणणे ऐका. एखादा शोकग्रस्त नायक आपले दुःख प्रदीर्घ भाषणात व्यक्त करीत आहे, किंवा काही पात्रे ऊर बडवून घेऊन शोक करीत आहेत, अशा प्रकारची होमर व इतर कवी यांच्या काव्यातील वर्णने आपल्यापैकी चांगले लोक वाचीत असताना त्यांना आनंद होतो व भावनावश होऊन शोकमग्न पात्रांशी ते समरस होतात आणि अशी परिस्थिती निर्माण करणाऱ्या कवींची वारेमाप स्तुती करतात, हे तुम्हाला माहीत आहेच.

**ग्लॅकॉन :** होय. माहीत आहे.

**सॉक्रेटिस :** परंतु स्वतःवर जेव्हा दुःखाचा प्रसंग येतो, तेव्हा विरुद्ध आचरण करण्यातच आपण मोठेपणा मानतो. शांतपणाने दुःख सोसणे हे पौरुषत्वाचे लक्षण आहे, तर ज्या वर्णनाची आपण स्तुती केली ते बायकीपणाचे आहे असे आपण मानतो. होय ना ?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** जे कृत्य स्वतः करणे आपण निंद्य व लाजिरवाणे समजतो, तेच कृत्य दुसऱ्याने केले असता त्याविषयी तिरस्कार वाटण्याऐवजी आनंद वाटणे व त्याची स्तुती करणे योग्य आहे का ?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच नाही.

**सॉक्रेटिस :** वेगळ्या दृष्टीने विचार केला तर तुम्हाला ते योग्य वाटेल.

**ग्लॅकॉन :** कोणत्या दृष्टीने ?

**सॉक्रेटिस :** आपल्या स्वतःवर जेव्हा दुःखाचे प्रसंग येतात, तेव्हा मोकळेपणाने शोक व विलाप करून, दुःख हलके करण्याची तीव्र इच्छा असलेल्या भागाला दाबून ठेवतो. अशा भागाचेच कवीकडून वर्णन केले जाते व त्यालाच कवीच्या वर्णनशक्तीत आनंद वाटतो. अशा वेळेस बुद्धी व सदाचार यांचे पुरेसे शिक्षण नसल्यामुळे, विशेष सुसंस्कृत नसलेला आत्म्याचा उच्च भाग, इतरांची दुःखे बघण्यात गुंतला असल्यामुळे व अकाली दुःख करणाऱ्या बाहचतः सज्जन मनुष्याची स्तुती किंवा निंदा करण्यात कमीपणा मानीत असल्यामुळे वरील दयाळू भागावरील वर्चस्व कमी करतो. दयेच्या भावनेपासून मिळणारे सुख हा एक फायदाच आहे असे त्याला वाटते. त्यामुळे सर्व काव्य निंद्य ठरवून हे सुख गमवावे असे त्याला वाटत नाही. इतर लोकांच्या वागणुकीचा आपल्यावर निश्चित परिणाम होतो व अनुकंपेची भावना दुसऱ्यांच्या दुःखावर पोसली जाऊन दृढ होते. परंतु हीच भावना जेव्हा स्वतःवर दुःखाचे प्रसंग येतात तेव्हा तिच्यावर ताबा ठेवणे कठीण असते. असा विचार फारच थोडे लोक करतात.

**ग्लॅकॉन :** हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** हेच प्रतिपादन विनोदी वाङ्मयासही लागू पडते ना ? स्वतः जो विनोद करण्यास लाज वाटते, तोच विनोद नाटकाच्या प्रवेशात अथवा खाजगी आयुष्यात ऐकला असता आनंद वाटतो व तो अश्लील आहे असे वाटत नाही. लोकांनी आपल्याला विदूषक म्हणावे असे वाटत नसल्यामुळे, हास्य निर्माण करणाऱ्या तत्त्वाला बुद्धीच्या लगामाने आपण खेचून धरतो. पण वरील प्रसंगी लगाम सैल करून तत्त्वाला मोकळे सोडले असता, अजाणतेपणाने या तत्त्वाला पाठिंबा देऊन, विनोदाचा स्वतःच्या आयुष्यात स्वीकार करतो.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** आपल्या सर्व कृत्यांत प्रेम, क्रोध, लोभ, दुःख, सुख इत्यादी मनोविकार व भावना दिसतात, त्यांच्यावर कवींच्या काव्याचा परिणाम घडून येतो ना ? कारण काव्याने अशा भावनांना पाणी घातल्यामुळे, अनावृष्टीमुळे त्या मरून जाण्याऐवजी चांगल्या पोसल्या जातात. आपले आयुष्य अधिक सुखी व सद्गुणी होण्यासाठी, अशा भावनांना ताब्यात ठेवणे आवश्यक असते, पण काव्य उलट त्यांनाच सत्ता गाजविण्यास शिकविते.

**ग्लॅकॉन :** मला हे नाकबूल करता येणार नाही.

**सॉक्रेटिस :** ग्लॅकॉन, जेव्हा होमर कवीचे स्तुतिपाठक तुम्हाला सांगतात, "ग्रीस देश होमरमुळे सुशिक्षित झाला, त्यामुळे मानवी कारभारांच्या सुव्यवस्थेचा उपदेशक म्हणून त्याच्या काव्यांचा अभ्यास केला पाहिजे. मनुष्याने आपले आयुष्य त्याच्या उपदेशानुसार व्यतीत केले पाहिजे." तेव्हा अशा सद्‌हेतुप्रेरित लोकांचा सत्कार करून, होमर हा शोकान्त काव्ये लिहिणारांत श्रेष्ठ होता हे कबूल केले पाहिजे. त्याबरोबर तुम्ही हेही लक्षात ठेवले पाहिजे की, ईश्वरविषयक स्तोत्रे व सदाचारविषयक कविता ह्यांच्याशिवाय इतर काव्याचा राज्यामध्ये शिरकाव होऊ देता कामा नये. कारण वीणाकाव्याच्या अथवा महाकाव्याच्या अत्यंत मधुर अशा काव्यदेवतेला राज्यात प्रवेश करू दिला की, कायदा व बुद्धिवाद ह्यांची सर्वमान्य तत्त्वे प्रस्थापित होण्याऐवजी, सुख व दुःख निर्माण होईल.

**ग्लॅकॉन :** हे अगदी खरे आहे.

**सॉक्रेटिस :** आता आपण काव्याकडे वळलो आहोत. आपण वर्णन केल्याप्रमाणे प्रवृत्ती असलेल्या कलेला आपण ज्या तत्त्वावर हद्दपार करतो त्या तत्त्वाचे विवेचन आता पुरेसे झाले आहे. पण आपण फार कडक टीका केली असे काव्यदेवतेला वाटू नये म्हणून, तत्त्वज्ञान व काव्य यांच्यातील विरोध पूर्वापार चालत आलेला आहे असे आपण सांगू. "आपल्या धन्यावर भुंकणारा भांडखोर कुत्रा", "मूर्ख लोकांप्रमाणे घमेंडखोर भाषण करण्यास अग्रेसर", "देवतुल्य निरुपद्रवी लोकांचा जमाव", "कुशाग्र बुद्धीचे दरिद्री तत्त्वज्ञानी", अशाअनेक ओळीमधून तत्त्वज्ञान व काव्य ह्यांच्यातील प्राचीन विरोध व्यक्त होतो. असे असले तरी आपण एवढे मान्य करू की, मनोरजन हे ध्येय असणारे काव्य व अनुकरणकला यांनी सुव्यवस्थित राज्यात त्यांचे अस्तित्व असण्यासाठी काही भक्कम व योग्य पुरावे सादर केले तर आपण त्यांना आनंदाने परत बोलावू. मनोरंजक काव्याची आपल्यावर छाप पडते हे खरे असले तरी सत्याचा विश्वासघात करणे हे पाप आहे. मित्रा, काव्याची, विशेषतः होमरच्या काव्याची, तुमच्यावर मोहिनी पडते, हे खरे आहे ना?

**ग्लॅकॉन :** हो. काव्याचा माझ्यावर फार परिणाम होतो.

**सॉक्रेटिस :** म्हणून वीणागीताच्या पद्धतीने अथवा अन्य पद्धतीने काव्यदेवतेने आपले समर्थन केल्याशिवाय, तिला दिलेली हद्दपारीची शिक्षा कायम ठेवणे योग्य आहे ना?

**ग्लॅकॉन :** अर्थातच.

**सॉक्रेटिस :** स्वतः कवी नसूनही जे काव्याचे शोकी व आश्रयदाते आहेत, अशा लोकांनाही त्यांचे म्हणणे आपण गद्यात मांडावयास सांगू. काव्य हे मनोरंजनात्मक तर आहेच पण ते राज्यकारभाराला व मानवी जीवनालाही अत्यंत उपयुक्त आहे हे त्यांनी पटवून दिले पाहिजे. अशा तऱ्हेचे त्यांचे म्हणणे आपण आनंदाने ऐकू. कारण काव्य रंजक असून त्याचबरोबर उपयुक्तही आहे असे ठरले तर आपल्याला त्यापासून फायदाच आहे.

**ग्लॅकॉन :** नक्कीच आपल्याला फायदा होईल.

**सॉक्रेटिस** : पण असे समर्थन जर त्यांना करता आले नाही तर, मोहक पण अपायकारक वस्तूचा लोक त्याग करतात, त्याप्रमाणे आपल्याला काव्याचा त्याग करावा लागेल. आपल्या आदर्श राज्य घटनेच्या शिकवणुकीनुसार, जोपर्यंत काव्याचे समर्थन आपल्याला करता येत नाही तोपर्यंत त्याच्याविषयी प्रेम वाटून, त्याचे स्वरूप सत्यदर्शी असे वाटले तरी उपयोगी नाही. काव्याच्या बाबतीत आतापर्यंत आपण जे म्हटले ते केवळ मनात ठेवूनच, पोरकटपणाने काव्याच्या आधीन न होण्याची खबरदारी घेतली पाहिजे. काव्याला सत्याचे दर्शन घडते व ते चांगलेही असते, असा खोटा विश्वास बाळगू नये, हे मात्र यापासून आपण निश्चितच शिकलो. आत्म्याच्या उत्तम भागावर हल्ला होईल या भीतीने काव्य ऐकणाऱ्या मनुष्याने सावधगिरी बाळगून आपण जे मत मांडले त्याचा स्वीकार करणेच अधिक योग्य आहे.

**ग्लॅकॉन** : माझे मत तुमच्यासारखेच आहे.

**सॉक्रेटिस** : प्रिय मित्रा, मनुष्याने सदाचारी असावे की दुराचारी असावे हा प्रश्न महत्त्वाचा व फार गंभीर असूनही लोकांचे त्याकडे लक्ष वळलेले नाही. कीर्ती, संपत्ती आणि सत्ता किंवा काव्य यांच्या मोहाने न्यायादी सद्‌गुणांकडे दुर्लक्ष करणे केव्हाही योग्य नाही.

**ग्लॅकॉन** : माझेही मत असेच आहे व इतरांनाही ते पटेल.

□ □

# प्रकरण अडतीस

# आत्म्याचे अमरत्व

**[X-608-C—612-A]**

**कथासूत्र :**

[न्यायाने आणि नीतीने वागणे हे ऐहिक आणि पारलौकिक दृष्ट्या हितकारक आहे अशी प्लेटोची भूमिका आहे. ऐहिक आणि पारलौकिक यांचा सांधा जुळण्यासाठी आत्म्याचे अस्तित्व आणि अमरत्व प्लेटोने मान्य केले आहे. जरा, व्याधी आणि मृत्यू हे शरीराचे विशेष गुणधर्म आहेत असे तो मानतो. त्यामुळे शरीरास मृत्यू आला तरी आत्मा नष्ट होतो असे म्हणता येत नाही. प्लेटोच्या मते आत्मा जरी तीन विभागांचा बनला असला तरी आत्मा म्हणजे भौतिक वस्तू नव्हे. ज्ञान आणि नीती यांचे शाश्वत अधिष्ठान म्हणजे आत्मा होय. वासना आणि वासनात्मक कार्ये यांनी शरीर बनते आणि ते नाश पावते. शरीराचा नाश म्हणजे आत्मनाश नव्हे. ती आत्म्याची मरणोत्तर विशुद्ध स्थिती होय, असा त्याचा दृष्टिकोन आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** अजूनपर्यंत आपण सद्वर्तनापासून मिळणारे फायदे व सर्वांत मोठी बक्षिसे यासंबंधी विचार केलेला नाही.

**ग्लॅकॉन :** आतापर्यंत वर्णन केलेल्यांपेक्षा जर ती जास्त मोठी असतील तर त्यांचे महत्त्वही विशेष असणार.

**सॉक्रेटिस :** परंतु लहान कालावधीत, महत्त्वाची गोष्ट साध्य होणे शक्य आहे काय ? बाल्यावस्था व वृद्धावस्था यांच्यामधील काळ अनंतकालाच्या दृष्टीने लहानच आहे, असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** काहीच नाही म्हणणे अधिक योग्य होईल.

**सॉक्रेटिस :** मग अमर्त्य वस्तूने या क्षुल्लक काळाकडे लक्ष देऊन, अनंतत्वाकडे दुर्लक्ष करावे असे तुम्हाला वाटते काय ?

**ग्लॅकॉन :** अमर्त्य वस्तूने अनंतत्वाचा विचार जरूर केला पाहिजे. पण आपल्या म्हणण्याचा रोख मला कळला नाही.

**सॉक्रेटिस :** आत्मा अमर असून तो कधीही नाश पावत नाही हे तुम्ही शिकला नाही काय ?

**ग्लॅकॉन :** [आश्चर्याने पहात] नाही, खरोखर मी शिकलो नाही. पण याचे समर्थन तुम्ही करू शकाल काय?

**सॉक्रेटिस :** ते तर फार सोपे आहे. मी प्रामाणिक असल्यामुळे मला तर ते करता येईलच, पण तुम्हालाही करता येईल.

**ग्लॅकॉन :** मला ते कठीणच वाटते. पण जर ते तुमच्या म्हणण्याप्रमाणे इतके सोपे असेल तर माझी ऐकावयाची इच्छा आहे.

**सॉक्रेटिस :** मग नीट ऐका.

**ग्लॅकॉन :** ठीक. मी ऐकतो आहे.

**सॉक्रेटिस :** एक गोष्ट चांगली व दुसरी वाईट असे तुम्ही म्हणता ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** या दोन्ही संज्ञांच्या अर्थाविषयी एकच मत आपण धरतो ना?

**ग्लॅकॉन :** तुम्ही कोणते मत धरता?

**सॉक्रेटिस :** माझ्या मते ‘ जे नाश करते व बिघडविते ’ ते ‘ वाईट ’ आणि ‘ जे रक्षण करते व फायदा करून देते ’ ते ‘ चांगले ’.

**ग्लॅकॉन :** माझेही मत असेच आहे.

**सॉक्रेटिस :** प्रत्येक वस्तू चांगली व वाईट असते ना? उदा. डोळचांना खुपऱ्या येणे, आजारी पडणे, धान्याला कीड लागणे, लाकडाला बुरशी येणे, लोखंडाला गंज चढणे इ. म्हणजेच प्रत्येक वस्तूत अंगभूत वाईटपणा असतो ना?

**ग्लॅकॉन :** होय.

**सॉक्रेटिस :** एखाद्या वस्तूला वरीलपैकी व्याधी जडली म्हणजे ती खराब होऊन शेवटी नाश पावते.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** प्रत्येक वस्तू ही तिच्या अंगभूत वाईट गुणांनीच नाश पावते, इतर कोणत्याही कारणाने नाही. कारण जे चांगले असते ते कशाचाही नाश करीत नाही. तसेच जे चांगलेही नाही व वाईटही नाही तेही कशाचा नाश करीत नाही.

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच.

**सॉक्रेटिस :** अस्तित्वात असणाऱ्या वस्तूंपैकी एखादी वस्तू आपल्याला अशी सापडली की, तिच्या अंगच्या वाईटपणामुळे ती जरी खराब झाली तरी नाश पावत नाही, तर आपणांस असे खात्रीने म्हणता येईल की ती वस्तू कधीही नाश पावणार नाही.

**ग्लॅकॉन** : हा निष्कर्ष योग्य आहे.

**सॉक्रेटिस** : आत्म्याला भ्रष्ट करणारी एकही वाईट गोष्ट नाही काय ?

**ग्लॅकॉन** : आहे. आपण नुकतेच वर्णन केलेले, अन्यायीपणा, अनियमितपणा, भित्रेपणा व अज्ञानीपणा हे दुर्गुण आत्म्याला भ्रष्ट करतात.

**सॉक्रेटिस** : पण या दुर्गुणांपैकी एक तरी आत्म्याचा नाश करू शकेल का ? याचा तुम्ही नीट विचार करा. नाही तर, अन्यायी मनुष्याने केलेले गुन्हे जेव्हा उघडकीस येतात, तेव्हा अन्याय ही आत्म्याची भ्रष्टावस्था असल्यामुळे, त्यानेच त्याचा नाश होतो अशी आपली समजूत होईल. रोग म्हणजे शरीराचा खराबपणा होय. तो शरीराचे इतके नुकसान करतो की, तो त्याला मरणावस्थेला नेतो. आताच आपण दाखविलेल्या सर्व वस्तू, त्यांच्या स्वाभाविक दुर्गुणांमुळे अशाच भ्रष्ट होत जाऊन नाश पावतात. माझे म्हणणे बरोबर आहे ना ?

**ग्लॅकॉन** : होय.

**सॉक्रेटिस** : आत्म्याचे परीक्षण याच पद्धतीने करा. आत्म्यामध्ये जेव्हा अन्याय व इतर दुर्गुण वास करतात, तेव्हा स्वतःच्या सहवासामुळे ते आत्म्याची खराबी करतात व शेवटी त्याचा नाश करून त्याला शरीरापासून अलग करतात. हे विधान बरोबर आहे काय ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच नाही.

**सॉक्रेटिस** : स्वतःच्या भ्रष्टतेमुळे एखाद्या वस्तूचा नाश होणे शक्य नसता दुसऱ्याच्या भ्रष्टतेमुळे तिचा नाश झाला असे मानणे, अविचारीपणाचे आहे.

**ग्लॅकॉन** : बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : ग्लॅकॉन, अन्न बुरशी आलेले किंवा खराब झालेले असले तरी त्यामुळे शरीराचा नाश होतो असे आपण समजत नाही. अन्नाच्या खराबपणामुळे जर शरीरात रोग उत्पन्न झाला तर तो रोग किंवा शारीरिक दुर्गुण हे शरीरनाशाचे तात्कालिक कारण असून, खराब अन्न हे दूरचे कारण आहे. अन्न ही वस्तू शरीरापासून भिन्न असल्यामुळे, खराब अन्नामुळे शरीर खराब होते. स्वतःमध्ये खराबी नसतानाही बाहय खराबीमुळे शरीर वाईट होते या म्हणण्याचा आपण इन्कार करू.

**ग्लॅकॉन** : आपले म्हणणे रास्त आहे.

**सॉक्रेटिस** : याच युक्तिवादाच्या आधारावर आपल्याला असे म्हणता येईल की, जोपर्यंत शरीराची खराबी आत्म्याचा नाश घडवून आणीत नाही तोपर्यंत बाहेरील वाईट वस्तू, आत्म्यामध्ये स्वतःचा रोग असल्याशिवाय, आत्म्याचा नाश करू शकणार नाही. कारण आपण जर असे समजलो, तर एक वस्तू दुसऱ्या वस्तूच्या वाईटपणामुळे नाश पावते हे कबूल करावे लागेल.

**ग्लॅकॉन** : तुमचे विधान बरोबर आहे.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. हे तत्त्व आता आपण खोडून काढू या. पण तोपर्यंत आपण ताप अथवा इतर रोग, प्राणघातकी आघात, अथवा शरीराचे तुकडे तुकडे करण्याची क्रिया यांमुळे आत्म्याचा नाश होतो असे म्हणता कामा नये. कारण वरील कारणांनी शरीराची वाईट अवस्था झाली असता आत्मा अधिक अन्यायी व अपवित्र होतो हे अगोदर सिद्ध झाले पाहिजे. आत्मा अथवा एखादी वस्तू, स्वतः स्वाभाविक गुणांनी वाईट नसताना, बाह्य वस्तूतील वाईटपणामुळे त्यांचा नाश होईल असे आपण कोणालाही म्हणू द्यावयाचे नाही.

**ग्लॅकॉन** : मरणाऱ्या लोकांचे आत्मे मरणामुळे अधिक अन्यायी होतात असे कोणीही म्हणणार नाही.

**सॉक्रेटिस** : वरील विवेचनाला विरोध करण्याकरिता व आत्मा अमर आहे हे म्हणणे अमान्य करण्याकरिता, मरणारा मनुष्य अधिक भ्रष्ट व अन्यायी होतो असे कोणी म्हणेल, तर रोगाप्रमाणे अन्यायसुद्धा माणसाचा नाश करतो असे आपल्याला मानावे लागेल. आपल्याला असे दिसून येते की, अन्यायी माणसाला अन्यायी कृत्यांबद्दल शिक्षा होऊन ते मारले जातात. पण वरील तत्त्वानुसार आपणांस असे मानावे लागेल की, ज्या प्रमाणात अन्यायाचा आघात झाला असेल त्या प्रमाणात तो लवकर अथवा सावकाश मरेल.

**ग्लॅकॉन** : जो अन्यायाची कृत्ये करतो, त्याच्या मृत्यूला अन्याय कारणीभूत होत असेल तर अन्याय हा फार भयंकर आहे असे म्हणता येणार नाही. कारण तो त्रासापासून त्याची मुक्तता करतो. पण मला असे वाटते की, अन्याय अन्यायी माणसाला अधिक सशक्त करून जागरूक बनवितो व इतरांना ठार मारतो. कारण स्वतःच्या मालकाला मारण्याची प्रवृत्ती अन्यायात नसते.

**सॉक्रेटिस** : तुम्ही छान बोललात. आत्मा जर स्वतःच्या दुर्गुणांमुळे वा वाईटपणामुळे मारला जात नाही हे खरे असेल, तर दुसऱ्या वस्तूंचा नाश करणारा वाईटपणा, तदनुरूप वस्तूंखेरीज आत्म्याचा व इतर कोणाचाही नाश करू शकणार नाही.

**ग्लॅकॉन** : होय. हा तर्क स्वाभाविक आहे.

**सॉक्रेटिस** : ज्याअर्थी आत्मा स्वतःच्या वा दुसऱ्याच्या वाईटपणामुळे नाश पावत नाही त्याअर्थी तो नेहमीच अस्तित्वात असतो म्हणजेच तो अमर असतो.

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. आत्म्याचे अमरत्व सिद्ध झाले. पण अस्तित्वात असलेल्या आत्म्यांची संख्या कायम राहणे आवश्यक आहे. कारण आत्म्याचा नाश होत नसेल तर त्याची संख्या कमीही होणार नाही आणि वाढणारही नाही. कारण अमर वस्तूंची संख्या वाढली तर कोणत्या तरी मर्त्य वस्तूने ती वाढविली असली पाहिजे. अशा तऱ्हेने प्रत्येक वस्तू अमरत्व होईल.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : पण बुद्धीला हे मत पटणारे नाही. म्हणून त्याचा स्वीकार करता येणार नाही. आत्म्याच्या मूळ स्वरूपात, वैचित्र्य, विभिन्नत्व अशी कल्पना आपल्याला करता येणार नाही.

**ग्लॅकॉन :** तुमचे म्हणणे मला कळले नाही.

**सॉक्रेटिस :** आत्मा अमर असेल तर त्यात पुष्कळ भागांचे मिश्रण असेल काय ?

**ग्लॅकॉन :** खात्रीनेच नाही.

**सॉक्रेटिस :** आताच्या आपल्या विवेचनावरून आत्मा अमर आहे हे निःसंदिग्धपणे सिद्ध झाले आहे. दुसऱ्या प्रकारांनीही ते सिद्ध करता येईल. आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाचा शोध घ्यावयाचा असेल तर शरीर व इतर वाईट गोष्टी यांच्यामुळे खराब झालेल्या आत्म्याचा विचार न करता, बुद्धिवादाने त्याच्या शुद्ध स्वरूपाचे चिंतन केले पाहिजे, तरच त्याचे अप्रतिम सौंदर्य दृष्टीस पडेल आणि न्याय, अन्याय व इतर गोष्टी यांच्याविषयीची चर्चा अधिक स्पष्ट होईल. हल्ली जसा आत्मा दिसतो तशा स्वरूपात आपण त्याचे वर्णन केले आहे. ग्लॉकस नावाच्या जलदेवाच्या स्वरूपातही आपण त्याला बघितला आहे. त्याचे मूळ शुद्ध स्वरूप सहजासहजी दिसणारे नाही. कारण त्याच्या शरीराचे जुने अवयव खराब झाले आहेत. शंख, समुद्रवेली, दगड इ. बाहय वस्तू त्याला चिकटल्यामुळे त्याचे मूळ स्वरूप बदलून तो रानटी पशूप्रमाणे दिसत आहे. आपल्या आत्म्याची अनेक बाहय वस्तूंमुळे अशीच स्थिती झाली आहे. तरीसुद्धा ग्लॅकॉन, आपण आत्म्याच्या एकाच भागावर लक्ष केंद्रित करावयास हवे.

**ग्लॅकॉन :** कोणत्या भागावर ?

**सॉक्रेटिस :** ज्ञानप्रिय भागावर आपण लक्ष केंद्रित केले असता, दैवी, अमर व सनातन वस्तूंशी आत्म्याचा जवळचा संबंध असल्यामुळे, त्याला कोणाचा सहवास हवाहवासा वाटतो हे आपणांस कळेल. आत्म्याने सत्-तत्त्वाचा अभ्यास केला असता, त्यापासून मिळणाऱ्या उत्तेजनाने तो समुद्रातून वर काढला जाईल. पूर्वी जमिनीवर राहात असल्यामुळे व केवळ भोजनभाऊ असल्यामुळे, त्याच्याभोवती चिकटणारे शंख, दगड ह्यांच्यापासून तो वेगळा केला जाऊन त्याचे खरे स्वरूप कळून येईल. त्यानंतर तो एकरूपी आहे की बहुरूपी आहे हे आपल्याला बघता येईल. मानवी आयुष्यातील आत्म्याच्या भावना व त्यांचे आविष्करण याविषयी आपण बरीच चर्चा केली असे मला वाटते.

**ग्लॅकॉन :** होय. आपण बरीच चर्चा केली आहे.

□ □

प्रकरण एकोणचाळीस

# ऐहिक जीवन आणि न्यायाची फलश्रुती

**[X-612-A—613-E]**

**कथासूत्र :**

[काही माणसे न्यायी असतात पण दु:ख भोगतात, तर काही अन्याय करूनही सुखात असतात. ऐहिक जीवनातील या विरोधाभासाचे स्पष्टीकरण करण्यासाठी प्लेटोने कर्म-सिद्धान्त मानला आहे. विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या नियती-तत्त्वाचे स्वरूप भौतिक नसून नैतिक आहे अशी त्याची श्रद्धा आहे. म्हणूनच या जन्मात न्यायी माणसाला होणारी दु:खे हा त्याच्या पूर्वजन्मातील दुर्गुणांचा परिणाम होय असे तो मानतो. तर अन्यायी माणसाला मिळणारे सुख हे त्याच्या पूर्वजन्मातील सत्कृत्याचे फळ होय असे तो मानतो. न्याय-अन्याय, सुख-दु:ख यांची जबाबदारी ईश्वरावर नसून ती मानवी कर्मावर आहे असा त्याचा दृष्टिकोन आहे.

या तात्त्विक भूमिकेप्रमाणेच व्यावहारिक जीवनातही अन्यायाने वागण्यापेक्षा न्यायाचे, प्रामाणिकपणाचे जीवन हेच फायदेशीर, उपयुक्त असते असे त्याने दाखवून दिले आहे आणि त्याद्वारा तात्त्विक आणि व्यावहारिक दृष्टीने न्याय आणि नीती हेच माणसाला हितकारक आहेत हे त्याने सिद्ध केले आहे.]

* * * * *

**सॉक्रेटिस :** आतापर्यंतच्या आपल्या विवेचनात आपण दुय्यम विचार बाजुलाच ठेवले आणि होमर, हिसियड ज्यांचे वर्णन करतात अशी न्यायामुळे मिळणारी बक्षिसे व कीर्ती यांचा विचार न करता ; आपण असे पाहिले की न्याय हा स्वभावत: आत्म्याला उत्तम वाटतो व त्यामुळे गिजिसची अंगठी व हेडसचे शिरस्त्राण नसले तरीही तो न्यायी कृत्येच करतो असा शोध आपण लावला.

**ग्लॅकॉन :** खरे आहे.

**सॉक्रेटिस :** इतर सद्गुणांबरोबर न्यायालाही, देव व मानव यांच्याकडून, केवळ ह्याच जन्मात नव्हे तर मृत्यूनंतरही, जी मोठी बक्षिसे मिळतात त्यांचा विचार आपण करावा ना ?

**ग्लॅकॉन :** जरूर करावा.

**सॉक्रेटिस :** वाद चालू असताना तुम्ही जे उसने घेतले होते ते मला परत देता का ?

**ग्लॅकॉन** : काय उसने घेतले होते ?

**सॉक्रेटिस** : न्यायी मनुष्याची कीर्ती तो अन्यायी आहे व अन्यायी मनुष्याची कीर्ती तो न्यायी आहे अशी असावी असे गृहीत धरण्याची मी तुम्हाला परवानगी दिली होती. मनुष्य व देव यांच्यापासून खरी स्थिती लपविणे अशक्य असले, तरी वादाकरिता वरीलप्रमाणे स्थिती गृहीत धरली तरच न्यायाचे शुद्ध स्वरूप व अन्यायाचे शुद्ध स्वरूप यांची तुलना करता येईल असे तुमचे मत होते. ते आठवते का ?

**ग्लॅकॉन** : मला आठवले नाही, तर मी दोषी ठरेन.

**सॉक्रेटिस** : पण आता न्यायी व अन्यायी माणसांसंबंधी आपण निर्णय दिलेला आहे. म्हणून न्यायाच्या वतीने मी असे मागतो की देव व माणूस ह्यांच्या मते न्यायाची जी खरी किंमत आहे ती मान्य केली जावी. खरोखर न्यायी असल्यामुळे जी सुखे मिळतात, ती न्यायाने वागणाऱ्यांनाच न्यायाकडून सचोटीने दिली जातात. आता, बाह्यस्वरूपामुळे मिळणाऱ्या बक्षिसांचीही त्यांच्यातच बेरीज करू.

**ग्लॅकॉन** : तुमची मागणी न्याय्य आहे.

**सॉक्रेटिस** : न्यायी व अन्यायी मनुष्यांचा खरा स्वभाव काय असतो, याबाबत देवांची चूक झालेली नसते, हे म्हणणे तुम्ही परत कराल ना ?

**ग्लॅकॉन** : होय. करू.

**सॉक्रेटिस** : असे जर असेल तर, पूर्वी कबूल केल्याप्रमाणे न्यायी लोक देवांचे आवडते व अन्यायी लोक नावडते होतील.

**ग्लॅकॉन** : खरे आहे.

**सॉक्रेटिस** : पूर्वीच्या पापांमुळे भोगावे लागणारे दुःख सोडून दिले असता, देवांच्या आवडत्या मनुष्याला सर्व प्रकारच्या उत्तम वस्तू देवांकडून मिळतील असे तुम्हाला वाटत नाही काय ?

**ग्लॅकॉन** : वाटते.

**सॉक्रेटिस** : म्हणून न्यायी माणसाच्या बाबतीत आपण गृहीत धरले पाहिजे की, तो दारिद्र्यात, आजारीपणात अथवा इतर संकटांत आयुष्य काढीत असला, तरी अंतिम फायदा त्याचाच आहे. मग तो फायदा त्याला ह्या जन्मी मिळो किंवा पुढच्या जन्मी. कारण जो मनुष्य न्यायाने व सदाचाराने वागून जास्तीत जास्त देवाप्रमाणे बनण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करतो, त्याची देवांकडून कधीही उपेक्षा होणार नाही.

**ग्लॅकॉन** : जो देवासारखा आहे, तो देवांकडून उपेक्षिला जाणार नाही.

**सॉक्रेटिस** : अन्यायी माणसाच्या बाबतीत आपल्याला उलट म्हणता येईल.

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच.

**सॉक्रेटिस** : मग वरील प्रकारची बक्षिसे, देवांकडून, न्यायी माणसालाच मिळतील.

**ग्लॅकॉन** : मलाही असेच वाटते.

**सॉक्रेटिस** : माणसांकडून त्याला काय मिळते ? पुढीलप्रमाणेच घडते ना ? शर्यतीत, काही लोक सुरुवातीला चांगले धावतात, पण शेवटी शेवटी दमतात. हुशार पण अन्यायी माणसाचे वागणे असेच असते ना ? असे लोक आरंभ मोठ्या चपळाईने करतात खरा पण शेवटी त्यांचा तेजोभंग होऊन त्यांना मुकाट्याने निघून जावे लागते. परंतु जे चांगले धावणारे असतात, तेच शेवटी बक्षीस मिळवून यशस्वी होतात. न्यायी मनुष्याची स्थिती अशीच नसते का ? आयुष्यातील प्रत्येक कृत्यात, प्रत्येक बाबतीत ते चांगले नाव कमावून, आपल्या बांधवांकडून बक्षिसे मिळवीत नाहीत काय ?

**ग्लॅकॉन** : खात्रीनेच मिळवितात.

**सॉक्रेटिस** : अन्यायी मनुष्याविषयी तुम्ही जसे म्हणालात, तसे मला न्यायी मनुष्याविषयी म्हणू द्याल ना ? न्यायी लोक, वृद्धापकाळी त्यांच्या इच्छेनुसार अधिकाराची जागा स्वीकारतात आणि त्यांना पसंत पडेल त्या कुटुंबाशी, स्वतःचे व स्वतःच्या मुलीचे लग्नसंबंध जुळवितात. थोडक्यात म्हणजे अन्यायी माणसासंबंधी तुम्ही जे बोललात तेच मी न्यायी माणसासंबंधी बोलतो. अन्यायी माणसासंबंधी मी असे म्हणेन की, त्यांच्यापैकी पुष्कळ लोक तरुणपणी पकडले गेले नाहीत तरी शेवटी पकडले जाऊन आपले हसे करून घेतात आणि वृद्धापकाळी संकटात सापडल्यामुळे स्वबांधवांकडून व परकियांकडूनही अपमानीत होतात. त्यांना फटके मारण्यात येऊन पीडनयंत्राने छळण्यात येते, शेवटी त्यांचे डोळेही काढले जातात. अशा तऱ्हेच्या कर्णकठोर, रानटी शिक्षा त्यांना भोगाव्या लागतात. मला असे वर्णन तुम्ही करू द्याल ना ?

**ग्लॅकॉन** : हो. कारण तुमचे वर्णन खरे आहे.

□ □

## प्रकरण चाळीस

# न्यायी जीवनाची मरणोत्तर फलश्रुती : ‘अर’ची कथा

**[X-613-E–End]**

**कथासूत्र :**

[ऐहिक जीवनाप्रमाणेच पारलौकिक जीवनात न्याय, अन्याय यांचे फल वा प्रायश्चित्त लाभते की नाही याचा उलगडा करण्यासाठी प्लेटोने अरच्या काल्पनिक कथेद्वारा आत्म्याची मरणोत्तर स्थिती रेखाटली आहे. सत्प्रवृत्त व्यक्तीला पुढे चांगला जन्म मिळतो, स्वर्ग-सुख लाभते तर दुष्प्रवृत्त व्यक्तीला वाईट जन्म घ्यावा लागतो—नरक यातना भोगाव्या लागतात असे दाखवून नीतिमूल्ये आणि कर्मसिद्धांत यांचे पारलौकिक अधिष्ठान प्लेटोने विशद केले आहे.

कर्म करण्याचे किंवा ते न करण्याचे संकल्प करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला आहे. ती त्या बाबतीत सदसद्विवेक करू शकते. मात्र केलेल्या किंवा झालेल्या कर्माचे चांगले वा वाईट सुखदुःखभोगात्मक फळ भोगावयाचे की नाही या बाबतीत मात्र व्यक्तीला स्वातंत्र्य नाही. ते तिला भोगावेच लागेल. कर्मसंकल्पाच्या बाबतीतील स्वातंत्र्य आणि फलभोगाच्या बाबतीतील अपरिहार्यता या दोन तत्त्वाच्या स्वीकाराने प्लेटोने नैतिक जीवनाची पारलौकिक मीमांसा केली आहे.

या ठिकाणी आदर्श राज्याची मीमांसा करणारा प्लेटोचा हा जगद्विख्यात संवाद-ग्रंथ संपतो. मानवी जीवनातील बहुतेक सर्व प्रश्नांचा विचार त्यात आहे. तशीच या जीवनाला नैतिक आणि आत्मिक मूल्यांची बैठक लाभावी अशी तळमळही प्लेटोच्या विवेचनात प्रकट झाली आहे.

मर्मग्राही, मर्मभेदक अशा प्लेटोच्या विशालप्रज्ञेचे दर्शन या संवादात आपणांस घडते.]

* * * * *

**सॉक्रेटिस** : न्यायाने वागल्यामुळे न्यायी माणसाला चांगल्या गोष्टींची प्राप्ती होते. याजन्मीच देव, माणसे यांच्याकडून पारितोषिके, प्रोत्साहन, देणग्या न्यायी माणसाला मिळतात.

**ग्लॅकॉन** : हो. ही बक्षिसे चांगली आणि खात्रीलायक असतात.

**सॉक्रेटिस** : मृत्यूनंतर परलोकांत न्यायी, अन्यायी माणसांना जे पारितोषिक मिळते त्यांची संख्या आणि महत्त्व लक्षात घेतले, तर या जन्मीची पारितोषिके काहीच नव्हेत.

न्यायी-अन्यायी व्यक्तींना आपल्या कर्माची फळे काय मिळतात हे सांगितल्याशिवाय आपला वाद संपणार नाही.

**ग्लॅकॉन** : या वर्णनापेक्षा अधिक आनंददायक काही नसल्याने ते वर्णन तुम्ही करावेच.

**सॉक्रेटिस** : ठीक आहे. ओडिसिस्‌ने आल्सिनसला जी प्रदीर्घ गोष्ट सांगितली तशी न सांगता पॅम्फिलिआत जन्मलेल्या आणि लढाईत मारल्या गेलेल्या अर्मिनिअसचा मुलगा अर याची हकीकत मी सांगतो. जे लोक लढाईत मारले गेले, त्यांची कुजलेली शरीरे दहा दिवसांनी दफन करण्यासाठी काढण्यात आली. त्यावेळी अरचे शरीर ताजेतवाने असल्याचे दिसून आले. म्हणून त्याला घरी नेऊन दफन करण्याचे ठरले. पण बाराव्या दिवशी, मृत असलेला अर जिवंत झाला. परलोकात असताना त्याने जे पाहिले, ती त्याने सांगितलेली हकीकत पुढीलप्रमाणे :–

त्याच्या शरीरातील आत्मा बाहेर पडल्यावर, इतर आत्म्यांबरोबर तो गूढ जागेपर्यंत जाईपर्यंत फिरत राहिला. या जागेला दोन खिडारे होती. ती दोन्ही पृथ्वीमध्येच पण जवळजवळ होती. त्यांच्या बरोबर समोर आकाशात दोन खिडारे होती. या खिडारांच्या मध्यभागी न्यायाधीश बसले होते. हे न्यायाधीश, न्यायी लोकांचा निकाल सांगून व त्यांची काहीतरी खूण त्यांना बांधून वर जाण्याचा मार्ग दाखवीत होते. त्याचप्रमाणे अन्यायी लोकांना, त्यांच्या अपकृत्याचा पुरावा पाठीवर बांधून डाव्या बाजूच्या रस्त्याने खाली जाण्यास सांगत होते. अर जेव्हा तेथे आला, तेव्हा त्याला सांगण्यात आले की तेथील स्थितीचा वृत्तांत त्याने मर्त्यलोकांत सांगावा. त्याकरिता परलोकात घडणारे प्रकार पाहण्याची व ऐकण्याची त्याला परवानगी देण्यात आली. त्यानंतर अर सगळीकडे निरीक्षण करीत राहिला. आत्म्यांचा निकाल सांगून झाल्यावर ते एका बाजूने आकाशातील अथवा पृथ्वीवरील खिडारातून निघून जात असलेले त्याला दिसले. तसेच दुसऱ्या दोन खिडारांच्या ठिकाणी पृथ्वीवरून आलेले हिडीस व मलाच्छादित आत्मे व स्वर्गातून आलेले शुद्ध व तेजस्वी आत्मे त्याला दिसले. प्रत्येक आत्मा प्रवासामुळे थकलेला दिसत होता. एखाद्या उत्सवाच्या वेळेस, लोक कुरणात जाऊन विश्रांतिस्थाने शोधतात, त्याप्रमाणे आत्म्यांनी केले. आपल्या ओळखीच्या आत्म्याला एकमेकांनी नमस्कार केले व एकमेकांनी एकमेकांना त्यांच्या स्थानाविषयी प्रश्न विचारले. पृथ्वीवरून आलेले आत्मे, पृथ्वीवर भोगाव्या लागलेल्या अनेक दुःखांची व यातनांची आठवण करीत अश्रुपूर्ण नयनांनी आपली हकिकत सांगत होते. तर स्वर्गातून आलेले आत्मे स्वर्गीय ऐश्वर्याचे व सुंदर वस्तूंचे वर्णन करीत होते. ग्लॅकॉन, वरील गोष्टींचे सविस्तर वर्णन करणे अवघड आहे. म्हणून सविस्तर न सांगता, महत्त्वाचे मुद्दे तेवढे सांगतो. आत्म्याने केलेल्या गुन्ह्याबद्दल आणि दुखापतीबद्दल त्यांना दसपट शिक्षा भोगावी लागली. मानवी आयुष्याची मर्यादा शंभर वर्षे धरण्यात येऊन शिक्षेचे चक्र दर शंभर वर्षांनी फिरल्यामुळे प्रत्येकाला प्रत्येक गुन्ह्याची शिक्षा दहा वेळा भोगावी लागली. ज्यांनी पुष्कळ खून केले होते, अथवा सैन्याचा वा शहराचा विश्वासघात करून त्यांना गुलाम केले

होते वा इतर वाईट कृत्यांत ज्यांचा हात होता अशा आत्म्यांना त्यांच्या प्रत्येक वाईट कृत्याबद्दल दसपट यातना भोगाव्या लागल्या. याउलट, ज्यांनी दानधर्म करून, पुण्य संपादन केले होते व न्यायीपणाने आयुष्य घालविले होते त्यांना योग्य प्रमाणात पारितोषिके देण्यात आली होती. जन्मानंतर लगेच मृत्यू आलेल्यांचीही माहिती अरने सांगितली, पण ती सांगण्याचे विशेष कारण नाही. तथापि अरच्या वर्णनानुसार अधार्मिकता, आईबापांची अवज्ञा, जवळच्या नातेवाईकांची हत्या ह्याबद्दलच्या शिक्षा फारच कठोर होत्या. तसेच धर्मनिष्ठा व आज्ञाधारकपणा यांना दिलेली बक्षिसेही फार मोठी होती. महान अर्डिअस कोठे आहे म्हणून एका आत्म्याने दुसऱ्या आत्म्याला विचारले तेव्हा अर तेथेच उभा राहून ऐकत होता. हजार वर्षांपूर्वी हा अर्डिअस पॅम्फिलिआचा राजा होता. वृद्ध पित्याला व भावाला ठार मारून इतर आणखीही बरीच दुष्कृत्ये त्याने केली होती. ज्याला वरील प्रश्न विचारला होता, त्याने उत्तर दिले, "तो इकडे येणे शक्य नाही. नुकतेच आम्ही एक भयंकर दृश्य पाहिले. सर्व दुःखे भोगून आम्ही त्या खिडारातून वर येण्याच्या बेतात असता, अर्डिअस व त्याच्याबरोबरचे इतर जुलमी राजे तेथे आले. त्याच्याबरोबर इतरही बडे गुन्हेगार होते. हे लोक जेव्हा वर चढू लागले, तेव्हा त्या खिडाराने त्यांना मागे परतविले. कारण सुधारणा होणे अशक्य अशा पापी लोकांपैकी, किंवा ज्यांनी आपल्या गुन्ह्याचे परिमार्जन केलेले नाही अशा लोकांपैकी कोणी वर चढण्याचा प्रयत्न केला तर हे खिडार ओरडू लागे. खिडाराची आरोळी ऐकल्यावर भयंकर व रागीट लोक अशा लोकांना फेकून देत असत. अर्डिअसचे व त्याच्याबरोबरच्या लोकांचे हात, पाय, तोंड, बांधून त्यांची चाबकांनी चामडी काढण्यात आली. नंतर त्यांना काटेरी झुडपांवर कापसाप्रमाणे पिंजण्यात आले. त्यांना अशा यमयातना का भोगाव्या लागल्या ते इतरांना सांगण्यात येऊन, नंतर त्यांना नरकात फेकण्यात येणार आहे असे जाहीर केले. अनेक भीतीजनक किंकाळ्या आम्ही आतापर्यंत ऐकल्या होत्या परंतु आम्ही वर जात असताना, अशी आरोळी पुन्हा ऐकू येईल की काय अशी जी धास्ती वाटली, तशी पूर्वी कधीच वाटली नव्हती. म्हणून जेव्हा आम्हाला अशी आरोळी ऐकू आली नाही तेव्हा मोठ्या आनंदाने आम्ही वर चढून आलो." वरील वर्णनावरून शिक्षा व यातनांची तुम्हाला कल्पना येईल. अर्थात बक्षिसेही तशीच मोठी असतात.

कुरणामध्ये येऊन सात दिवस झाल्यानंतर प्रत्येकाला ती जागा सोडून देण्याची आज्ञा करण्यात आली. तीन दिवस प्रवास केल्यानंतर ते अशा ठिकाणी आले की, तेथून त्यांना सर्व आकाश व पृथ्वी यांच्यावर पसरलेला उजेडाचा एक इंद्रधनुष्याहूनही अधिक तेजस्वी व स्पष्ट असा खांब दिसला. एक दिवस प्रवास केल्यावर ते त्या खांबापाशी येऊन पोहोचले. प्रकाशाच्या मध्यावर गेल्यावर त्यांना असे दिसले की, ह्या खांबाची दोन्ही टोके साखळीने आकाशाला बांधली आहेत. दोरखंडाने जसे ट्रीरीमी जहाज बांधून ठेवतात, त्याप्रमाणे हा विश्वस्तंभ आकाशाला गवसणी घालून विश्वचक्र धरून ठेवतो. ह्या दोन टोकांना अदृष्ट देवतेची चरकी बांधलेली असल्यामुळे विश्वाची परिभ्रमणे चालू राहतात. ह्या चरकीचा दांडा व आकडा पोलादाचा असतो तर चाती, पोलाद व इतर धातूंच्या मिश्रणाने केलेली

असते. हचा चातीचा आकार इतर चातींप्रमाणेच असतो. पुढील वर्णनावरून तिचे चित्रण आपणांस डोळ्यापुढे उभे करता येईल. मोठी पोकळ अशी चाती आहे. ती आतून संपूर्ण पोखरलेली असून, पेटीत पेटी घातल्याप्रमाणे, तिच्यात आणखी एक चाती बसविलेली आहे. नंतर दुसऱ्यात तिसरी, तिसऱ्यात चवथी व अशा तऱ्हेने आणखी चार मिळून एकूण आठ चाती बसविलेल्या आहेत. प्रत्येक चातीचा काठ बाहेरच्या चातीच्या वर असतो व सर्वांचा मिळून एक भोवरा तयार होतो. हचा भोवऱ्याचा दांडा आठव्या चातीच्या मध्यातून जातो. पहिल्या व शेवटच्या चातीचा काठ अधिक रुंद असतो. नतरचा रुंदीचा क्रम सहावी, चवथी, आठवी, सातवी, पाचवी व तिसरी असा असतो. सर्वांत मोठ्या चातीचा काठ विविध रंगांनी सजविलेला असतो. तर सातवीचा सर्वांत अधिक तेजस्वी असतो. आठवीचा सातवीसारखाच रंग असतो. दुसरीचा व पाचवीचा वरील चातीपेक्षा अधिक भडक रंग असतो. तर तिसरीचा फिकट असतो. चवथीचा रंग तांबडट तर सहावीचा तिसरीसारखाच असतो. चरकी समवेगाने फिरत असते. परंतु ती फिरत असताना आतील सात चाके विरुद्ध दिशेने फिरत असतात. त्यातील आठवी अत्यंत जलद फिरते आणि तिच्यानंतर सातवी, सहावी, पाचवी हचा क्रमाने सारख्या फिरत राहतात. चवथी यांच्यापेक्षा सावकाश फिरते. तिसरीचा वेगामध्ये चवथा व दुसरीचा पाचवा क्रमांक लागतो. अदृष्ट देवतेच्या गुडघ्याखाली चरकी फिरत असते. प्रत्येक चक्रावर एक जलदेवता उभी असून ती एकेक सूर गुणगुणत चक्राभोवती फिरत असते. आठही सुरांतून स्वरसंगती साधलेली असते. तीन निरनिराळ्या सिंहासनावर, सारख्या अंतरावर तीन सटव्या बसलेल्या असतात. अदृष्ट देवतेच्या हचा मुलींची नावे लाचेसिस, क्लोथो व अॅट्रोपोस अशी आहेत, शुभ्र वस्त्रे परिधान करून, डोक्यांवर फुलांच्या माळा घालून त्या जलदेवतांच्या संगीताला साथ देत असतात. लाचेसिस भूतकालाचे, क्लोथो वर्तमानकाळाचे व अॅट्रोपोस भविष्यकाळाचे गीत म्हणत असते. क्लोथो आपल्या उजव्या हाताने चरकीचा सर्वांत बाहेरचा काठ, मधूनमधून गरगर फिरवीत असते. अॅट्रोपोस डाव्या हाताने आतली चक्रे फिरवीत असते तर लाचेसिस कोणत्याही हाताने प्रत्येक चातीला स्पर्श करते.

या ठिकाणी आत्मे आल्यावर त्यांना लाचेसिसकडे जाण्याची आज्ञा झाली. एका व्याख्यात्याने, हचा सर्वांना अनुक्रमाने उभे करून, लाचेसिसजवळून पुष्कळशा चिठ्ठ्या व आयुष्याचे नमुने घेऊन, एका उंच सभास्थानावर उभे राहून पुढील भाषण केले, " अदृष्ट देवतेची कन्या लाचेसिस काय म्हणते ते ऐका. अल्पायुषी आत्म्यांनो ! जनन आणि मरण यांचे नवीन चक्र सुरू व्हावयाचे आहे. तुमचे भवितव्य तुम्हाला ठरवून दिले जाणार नाही. तुम्हालाच ते निवडावे लागेल. प्रत्येकाने एकेक चिठ्ठी उचलून आपले आयुष्य निवडावे व त्याप्रमाणे वागावे. सद्गुण कोणाचा दास नसतो. जो सद्गुणाचा सत्कार किंवा अनादर करील त्याला सद्गुणाचा कमी-अधिक लाभ होईल. निवड करणाऱ्याने स्वतःची जबाबदारी ओळखावी. कारण स्वर्गस्थ देवता निर्दोषी आहेत ! " असे बोलून त्याने सर्व चिठ्ठ्या जमावापुढे टाकल्या. प्रत्येक आत्म्याने त्याच्याजवळची चिठ्ठी उचलली. अरला

मात्र अशी परवानगी नव्हती. प्रत्येकाने आपला नंबर बघितल्यानंतर, हजर असलेल्या आत्म्यांच्या संख्येपेक्षाही अधिक प्रकारच्या आयुष्याचे नमुने त्यांच्यापुढे ठेवण्यात आले. तेथे सजीव वस्तूंचे व सर्व प्रकारच्या मानवी आयुष्यांचे नमुने होते. त्यांच्यामध्ये अनियंत्रित सत्ता देणाऱ्या राज्यपद्धती होत्या. त्यांपैकी काही कायम टिकणाऱ्या, तर काही मध्येच नष्ट होऊन शेवटी दारिद्र्य, हद्दपारी व भिक्षांदेही अनुभवण्यास लावणाऱ्या होत्या. शारीरिक सौंदर्य, शक्ती, खेळातील नैपुण्य वा उच्चकुल पूर्वजांचे पराक्रम ह्यांमुळे प्रसिद्ध लोकांची आयुष्ये तेथे मांडलेली होती. त्याचप्रमाणे प्रसिद्ध नसलेल्या पुरुषांची आयुष्ये व निरनिराळ्या स्त्रियांची आयुष्येही तेथे होती. परंतु आत्म्याचा निश्चित स्वभाव, तेथे कोठेही नव्हता. कारण जन्माच्या फरकानुसार आत्म्यामध्येही फरक असतो. इतर सर्व बाबतीत, आयुष्यातील विविध प्रकारांचे मिश्रण दिसून येत होते. संपत्ती, दारिद्र्य, रोग, आरोग्य व मध्यम स्थितीचेही नमुने होते.

मित्रा ग्लॅकॉन, हा क्षण सर्वांत महत्त्वाचा असतो. कारण ह्यावरच माणसाचे सर्व आयुष्य अवलंबून असते. म्हणून आपले सर्वप्रथम कर्तव्य हे आहे की, इतर सर्व विषय सोडून देऊन, असे शास्त्र शोधून काढावयाचे की, ज्यामुळे चांगले व वाईट यातील फरक ओळखता येईल व आता आपण ज्या गोष्टी सांगितल्या, त्या स्वतंत्रपणे वा संघटितपणे सद्गुणी आचारावर काय परिणाम करतात हे कळून, यथाशक्ति आपल्या आयुष्याची निवड करता येईल. दारिद्र्य किंवा श्रीमंती ह्यांच्या वातावरणात सौंदर्य असताना आत्म्यावर चांगला-वाईट काय परिणाम घडतो ते या शास्त्रामुळे कळेल. उच्च वा नीच कुळातील जन्म, खाजगी वा सार्वजनिक आयुष्य, शारीरिक बळकटी अथवा दुबळेपणा, कुशाग्र वा मंद बुद्धी, आत्म्याच्या आंतरिक वा बाह्य प्रवृत्ती इत्यादी गोष्टींच्या मिश्रणाने काय परिणाम होतो ते वरील शास्त्राने समजेल. ज्या आयुष्यामुळे माणूस अधिक अन्यायी बनतो ते वाईट व ज्यामुळे आत्मा अधिक न्यायी बनतो ते चांगले असे ठरवून, आत्म्याच्या स्वरूपाकडे नेहमी लक्ष ठेवून, वरील माहितीच्या आधारावर आपल्याला चांगल्या किंवा वाईट आयुष्याची निवड करता येईल. कारण जिवंतपणी व मृत्यूनंतरही अशी निवड करणे योग्य आहे हे आपण अनुभविले आहे. परलोकात गेल्यावर मनुष्य आपल्या मताला चिकटून राहिला, तर संपत्ती वा इतर वाईट गोष्टी यांनी तो दिपून जाणार नाही. तसेच दुसऱ्यांचे हक्क बळकावून, दुसऱ्याच्या दुःखास व स्वतःच्या नुकसानीस तो कारणीभूत होणार नाही. तो नेहमी मध्यम स्थितीच्या आयुष्याची निवड करील व या व पुढील आयुष्यात कोणत्याही एका मार्गाचा अतिरेकी अवलंब करणार नाही. हाच मार्ग सुखाचा आहे. असो.

परलोकातून आलेल्या मनुष्याने पुढे असे सांगितले की, तो व्याख्याता पुढे असे म्हणाला, " अगदी शेवटच्या मनुष्यानेसुद्धा जर विचारपूर्वक एखाद्या आयुष्याची निवड केली तर आपले आयुष्य वाईट आहे असे त्याला वाटणार नाही. एवढेच नव्हे तर त्याला त्यात समाधान वाटेल. म्हणून पहिल्याप्रथम येणाऱ्यांनी निष्काळजीपणे निवड करू नये व शेवटच्या लोकांनी निराश होऊ नये." त्याचे भाषण संपताच, पहिल्याप्रथम ज्याने चिठ्ठी उचलली होती, तो

पुढे आला व अनियंत्रित जुलमी सत्तेचे आयुष्य त्याने निवडले. तो अतिशय अविचारी व लोभी असल्यामुळे निवड करण्यापूर्वी त्याने प्रत्येक मुद्द्याचा पूर्णपणे विचार केला नाही. त्यातील इतर दुःखांबरोबर, स्वतःच स्वतःच्या मुलांना भोगावयास लागणाऱ्या दुःखाचा त्याने विचार केला नाही. स्वस्थपणाने विचार केल्यावर त्याला त्याचे फार दुःख झाले व शोकाने छाती बडवून घेऊ लागला. व्याख्यात्याने जरी पूर्वी बजाविले होते तरी दैवालाच दोष देऊ लागला. स्वतःला दोषी समजण्याऐवजी आपल्या दोषाचे खापर तो इतरांवर फोडू लागला. तो स्वर्गातून आलेला होता. पूर्वीच्या आयुष्यात सुसंघटित राज्यात दिवस काढल्यामुळे केवळ सवयीने तो सद्‌गुणी बनलेला होता, पण त्याच्या सद्‌गुणीपणाला तत्त्वज्ञानाची जोड नव्हती. अरच्या वर्णनाप्रमाणे, अशा फसलेल्या लोकांपैकी निम्म्याहून अधिक लोक स्वर्गातून आलेले असल्यामुळे त्यांनी कधीही दुःखाचा अनुभव घेतलेला नव्हता. पृथ्वीवरून आलेल्या लोकांनी मात्र अशा निष्काळजीपणाने निवड केली नाही. कारण त्यांनी स्वतः दुःख अनुभविले होते व दुसऱ्याचेही दुःख बघितलेले होते. वरील कारणांमुळे व चिठ्ठ्यांतील विचित्र दैवघटनेमुळे पुष्कळ आत्म्यांनी चांगले आयुष्य वाईटाकरिता व वाईट आयुष्य चांगल्याकरिता बदलून घेतले. पृथ्वीवर जन्म घेतल्यानंतर, मनुष्याने जर उच्च तत्त्वज्ञानाचा व्यासंग ठेवला व शेवटच्या प्रकाराचे सोडून इतर आयुष्य त्याला निवडता आले तर परलोकातून मिळालेल्या माहितीच्या आधारे आपणांस खात्रीने असे म्हणता येईल की, अशा मनुष्याचे आयुष्य पृथ्वीवर तर सुखाचे होईलच पण मर्त्यभूमीतून परलोकात व परलोकातून मर्त्यभूमीत त्याचा जो प्रवास होईल तोही खराब मार्गाने न होता, स्वर्गाच्या स्वच्छ व सुंदर मार्गाने होईल. अरच्या मते, प्रत्येक आत्म्याने आपले आयुष्य कसे निश्चित केले हा देखावा आश्चर्यकारक असून खेद, हास्य व चमत्कार यांनी भरलेला होता. पूर्वीच्या आयुष्याचा अनुभव त्यांना निवड करताना उपयोगी पडत होता. आराफिअस म्हणून जो आत्मा पूर्वी पृथ्वीवर जन्मला होता, त्या आत्म्याने हंसाचे आयुष्य पसंत केले. कारण स्त्रियांकडून तो मारला गेल्यामुळे स्त्रियांचा त्याला इतका तिटकारा आला होता की, स्त्रीच्या पोटी जन्माला येणेही त्याने नाकारले. थॉमिरसच्या आत्म्याने बुलबुलचे आयुष्य पसंत केले. हंसाने आपला स्वभाव बदलून, माणसाचे आयुष्य पत्करल्याचेही अरने पाहिले. इतर गानप्रिय प्राण्यांनी हंसाचे अनुकरण केले. विसावी चिठ्ठी ज्याने उचलली त्याने सिंहाचा जन्म निवडला. अचिलसच्या कवचाविषयी झालेला निर्णय आठवल्यामुळे, टेलामॉनचा पुत्र अजेक्स हयाने मनुष्यजन्म नाकारून सिंहाचा जन्म घेतला. अगॅमेम्नॉनच्या आत्म्याला, मर्त्यभूमीत भोगाव्या लागणाऱ्या दुःखामुळे त्याचा कंटाळा आला होता. त्याने गरुडाचे आयुष्य पसंत केले. ॲटलान्टाच्या आत्म्याने मधली चिठ्ठी उचलली. मल्लाच्या आयुष्यात मोठी कीर्ती मिळते. त्या कीर्तीच्या मोहाने तिने तो जन्म स्वीकारला. पॅनोपिअसचा पुत्र एपिअस हयाच्या आत्म्याने कुशल मजूर स्त्रीचा जन्म घेतला. लांब अंतरावर, सर्वांच्या शेवटी थेरसिटस हया विदूषकाने, माकडाचे रूप घेतलेले अरने पाहिले. ओडिसिसच्या आत्म्याने सर्वात शेवटी चिठ्ठी उचलली. पूर्व जन्मातील दुःखाच्या आठवणीने त्याची महत्त्वाकांक्षा इतकी मंदावली होती की, तो केवळ

शांततेचे व स्वास्थ्याचे आयुष्य शोधीत राहिला. सर्वांनी उपेक्षिलेले व बाजूला पडलेले असे ते आयुष्य बरेच प्रयत्न केल्यावर त्याला सापडले. त्याची मोठ्या आनंदाने निवड करून तो म्हणाला, "पहिल्याप्रथम जरी ही चिठ्ठी उचलली असती तरी मी हीच निवड केली असती." अशा तऱ्हेने इतर प्राण्यांनी मनुष्यप्राण्यात व इतर जातीत रूपांतर करून घेतले. अन्यायी प्रवृत्तीच्या प्राण्यांनी रानटी व न्यायी प्रवृत्तीच्या प्राण्यांनी पाळीव आयुष्याची निवड केली. अशा तऱ्हेने सर्व प्रकारच्या आयुष्यांचे मिश्रण झाले.

अशा प्रकारे आयुष्याची निवड केल्यानंतर ते आत्मे लाचेसिसकडे गेले. प्रत्येक आत्म्याच्या आयुष्याचे रक्षण करण्यासाठी व त्याची निवड पूर्ण करण्यासाठी, तिने प्रारब्धदेवतेला त्यांच्याबरोबर पाठविले. ह्या प्रारब्धदेवतेने प्रत्येक आत्म्याला क्लोथो देवतेजवळ नेऊन, तिच्या हाताने फिरविल्या जाणाऱ्या चरकीच्या परिभ्रमणाने, प्रत्येकाचे नशीब मंजूर करून घेतले. त्या देवतेला वंदन करून, प्रारब्धदेवतेने आत्म्यांना अट्रोपोसच्या चरकीकडे नेऊन त्यांचे आयुष्य अनुल्लंघनीय बनविले. त्यानंतर आत्मे अदृष्ट देवतेच्या सिंहासनाखाली गेले. इतर आत्मे गेल्यावर अरही गेला. नंतर पोळून काढणाऱ्या उष्ण हवेतून, लता-वृक्षविरहित अशा शुष्क विस्मरण-मैदानावर आले. संध्याकाळी, ज्या नदीचे पाणी कोणासही भांड्याने धरता येत नाही अशा अनास्था नदीच्या काठी त्यांनी मुक्काम केला. या ठिकाणी सर्वांना ठराविक प्रमाणात पाणी पिण्यास भाग पाडले. परंतु अदूरदर्शी आत्मे प्रमाणाबाहेर पाणी प्याले. प्रत्येक आत्मा पाणी प्याल्यावर पूर्वीचे सर्व काही विसरून गेला. आत्मे विश्रांती घेण्यास गेल्यावर, मध्यरात्री मेघनाद होऊन धरणीकंप झाला आणि क्षणार्धात, अचानक उगवणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे, सर्व आत्मे आपापल्या जन्मात गेले. अरला पाणी पिण्याची परवानगी नव्हती. कोणत्या मार्गाने त्याला आपले पूर्व शरीर मिळाले हे त्याला कळले नाही. सकाळी तो जागा झाला तेव्हा आपण चितेवर असल्याचे त्याला दिसून आले.

अशा तऱ्हेने, ग्लॅकॉन, या गोष्टीचे नाशापासून रक्षण करण्यात आले. ह्या गोष्टीतील सूचनांप्रमाणे आपण वागलो तर ती आपलेही रक्षण करील. तिथे म्हणजे अनास्था नदीच्या काठावरून आपण सुखरूपपणे बाहेर पडू. त्यामुळे आपले आत्मे भ्रष्ट होणार नाहीत. आत्मा अमर असतो व तो सत् आणि असत् यांना वागवून घेतो, असा उपदेश मी आता केला. त्यानुसार जर आपण चांगल्या मार्गाला चिकटून राहू, भक्तियुक्त, ज्ञानयुक्त न्यायाचे पालन करू आणि पृथ्वीवरील देवांचे व एकमेकांचे प्रेम संपादन करू तर जसे खेळाडू अभिनंदन करणाऱ्यांकडून पारितोषिके मिळवितात, तसे सद्गुणी वर्तनाबद्दल स्वर्गीय पारितोषिके मिळवू. देवांचे प्रेम संपादन करू, आयुष्यात आणि परलोकात आपली यात्रा सफल होईल.

□ □

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा

# परिशिष्ट एक

# प्लेटोने लिहिलेले संवाद

# (Platonic Dialogues)

1. Apology
2. Charmides
3. Cratylus
4. Critias
5. Crito
6. Euthydemus
7. Ethyphro
8. Gorgias
9. Hippias Major
10. Hippias Minor
11. Laches
12. Laws
13. Lysis
14. Meno
15. Parmenides
16. Phaedo
17. Phaedrus
18. Philebus
19. Protagoras
20. Republic
21. Sophistes
22. Statesman
23. Symposium
24. Theatetus
25. Timaeus

पुढील संवादग्रंथ, साहित्य याविषयी ग्रीक तत्त्वज्ञान, प्लेटोचे जीवन, कार्य व तत्त्वज्ञान यांच्या संशोधक अभ्यासात मतभेद आढळतात :–

26. Alcibiades I
27. Alcibiades II
28. Anterastae
29. Clitophon
30. Epinomis
31. Episttes
32. Hipparchus
33. Ion
34. Minos
35. Menexenus
36. Theages

# परिशिष्ट दोन

## उपयुक्त संदर्भ


**Adams J. :** The Republic of Plato, Cambridge, 1902.

**Adamson R. :** The development of Greek Philosophy, Pt.-II : Plato, W. Blackwood, London, 1908.

**Bosanquet B. :** A Companion to Plato's Republic, 2nd Ed., 3rd Impression, Rivingtons, London, 1906.

**Brumbaugh R. S. :** Plato for the Modern Age, New York, 1962.

**Bambrough R. (Ed.) :** New Essays on Plato and Aristotle, 2nd Impression, International Library of Philosophy and Scientific Method, Routledge and Kegan Paul, New York, 1967.

**Burnet J. :** Greek Philosophy, Pt. I : Thates to Plato, Book III, Chap. XII-XVII, Macmillan, London, 1914.

**Conford F. M. :** The Republic of Plato, Oxford, 1955.

**Crombie I :** An Examination of Plato's Doctrines, Vol. I, II, Routledge, London, 1962, 1963.

**Cross R. C. & Woozley A.D. :** Plato's Republic : A Philosophical Commentary, Macmillan, London 1964.

**Crossman R. H. S. :** Plato Today, 2nd Ed., George Allen and Unwin, 1959.

**Field G. C. :** Plato and His Contemporaries, Methuen, London, 1948.

**Field G. C. :** The Philosophy of Plato, Oxford, 1949.

**Findlay J. N. :** Plato : The Written and Unwritten Doctrines : Chap. V : The Ideological Dialogues : The Republic, International Library of Philosophy and Scientific Method, Routledge and Kegan Paul, New York, 1974.

**Foster M. P. :** The Political Philosophy of Plato and Hegel, Oxford, 1935.

**Friedlander P. :** Plato : An Introduction, Princeton, 1969.

**Gomperz T.** : Greek Thinkers, Vol. II · Book V : Plato John Murray, London, 1905.

**Gomperz T.** : Greek Thinkers, Vol. III : Book V : Plato : Chap. XI-XIII : Republic, John Murray, London, 1905.

**Gould J.** : The Development of Plato's Ethics Cambridge, 1955.

**Grobe G.M.A.** : Plato's Thought, Methuen, London, 1935.

**Guthrie W.K.C.** : A History of Greek Philosophy, Vol. III, Cambridge, 1975.

**Hardie W.F.R.** : A study in Plato, Oxford, 1936.

**Joseph W.H.B.** : Knowledge and the Good in Plato's Republic, Oxford, 1948.

**Jowett B.** : The Republic of Plato, with Introduction, Analysis, 3rd Ed., Oxford.

**Jowett B.** : The Dialogues of Plato, Vol. III : Republic, Oxford.

**Jowett B.** : A Selection of Passages from Plato, Vol. II : The Republic Ed. by M. J. Knight with Introductions, Oxford, 1895.

**Kelsen H.** : Platonic Justice in ' What is Justice ? ', Berkeley, 1960.

**Lutoslawski W.** : The Origin and Growth of Plato's Logic, Chap. VI, Longmans, London, 1905.

**Murphy N. R.** : Interpretation of Plato's Republic, Oxford, 1951.

**Nettleship R. L.** : Lectures on the Republic of Plato, Ed. by Lord Charnwood, Macmillan, London, 1914.

**Pater W.** : Plato and Platonism, Chap. 9 The Republic, Macmillan, 1912.

**Popper K. R.** : The Open Society and Its Enemies, 4th Ed., Routledge, London, 1962.

**Ritter C.** : The Essence of Plato's Philosophy, Eng. Tr. Adam Alles, George Allen and Unwin, 1933.

**Ross D.** : Plato's Theory of Ideas, Oxford, 1951.

**Sabine G. M.** : History of Political Theory, Chap. 7 to 10 on Plato, London, 1951.

**Shorey P.** : Plato : The Republic, Vol. I, II, Cambridge, 1930, 1935.

**Stewart J. A.:** Plato's Doctrine of Ideas, Pt. I : The Republic, Oxford, 1909.

**Stewart J. A. :** The Myths of Plato, Macmillan, London, 1905.

**Taylor A. E.:** Plato : The Man and His Work, Chap. XI : Republic, Methuen, London, 1926.

**तुळपुळे गो. वि. :** प्लेटो : चरित्र व तत्त्वज्ञान, चित्रशाळा, पुणे, १९६०.

**Vlastos G. (Ed.):** Plato : A Collection of Critical Essays, Vol. I : Metaphysics and Epistemology, Modern Studies in Philosophy, Donbleday Anchor, 1971. Vol. II : Ethics, Politics, Philosophy of Art and Religion, 1971.

**Vlastos G.:** Plato's Universe, Oxford, 1975.

**Wild J. :** Plato's Theory of Man, Cambridge, 1946.

**Zeller E.:** Plato and the Older Academy. Eng. Tr. S. F. Alleyne and A Goodwin, Longmans, Green, London, 1888.

**Zeller E.:** Outlines of the History of Greek Philosophy, 2nd Period : III : Plato Eng. Tr. S. F. Alleyne and E. Abbott, Longmans, London, 1914.

□□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## परिशिष्ट तीन

## उपयुक्त लेख

## (Articles)

**Demos R.:** " Paradoxes in Plato's Doctrine of the Ideal State ", Classical Quarterly, Vol. 7, 1957.

**Foster M. P.:** " Plato's Concept of Justice in the Republic ", Philosophical Quarterly, Vol. I, 1950.

**Grey D. R.:** " Art in the Republic ", Philosophy, Vol. 27, 1952.

**Hall R. M.:** " Justice and the Individual in the Republic ", Phronesis, Vol. 4, 1959.

**Malcolm J.:** " The Line and the Cave ", Phronesis, Vol. 7, 1962.

**Mulgan R. G.:** " Individual and Collective Virtues in the Republic ", Phronesis, Vol. 13, 1968.

**Raven J.:** " Sun, Divided Line and Cave ", Classical Quarterly, Vol. 3, 1953.

**Schiller J.:** " Just Man and Just Acts in Plato's Republic ", Journal of the History of Philosophy, Vol. 6, 1968.

**Shorey P.:** " The Idea of Good in Plato's Republic ", Studies in Classical Philosophy, 1895.

**Taylor A. E.:** " Decline and Fall of the State in Republic ", Vol. VIII, Mind, 1939.

**Vlastos G.:** " Does Slavery Exist in Plato's Republic ", Classical Philosophy, 1968.

□ □

REFBK-0025146

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ
तमसो मा ज्योतिर्गमय

Scan
04/03/19

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई